
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८७
जा. २२

REFBK-0002054



मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थापना
अनुक्रम ...७१७६३... दिः ...
अलांक ...३६४९... दोः दिः

REFBK-0002054

अनु. क्र. ७१०८३ वि. वि.
क्रांक ... वो. वि.

प्रस्तावना

लोकमान्य टिळकांच्या केसरींतील लेखांचा हा पहिला भाग आज, म्हणजे त्यांच्या द्वितीय श्राद्धतिथीच्या दिवशीं, प्रसिद्ध करण्यांत येत आहे. सर्वच टिळक-भक्त त्याचा प्रेमपूर्वक स्वीकार करितील अशी आशा आहे.

टिळकांच्या लेखणींतून उतरलेले व केसरींतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले लेख पुस्तकरूपानें संग्रहित करावे, अशा अर्थाच्या सूचना त्यांच्या हयातींत, स्वतः त्यांनांहि, अनेकांकडून करण्यांत आल्या होत्या; व पुढें मागें केव्हां तरी ही गोष्ट करावयाची असें त्यांनीं योजूनहि ठेविलें होतें. परंतु अखेरपर्यंत ती तशीच राहून गेली ! सुमारें चार वर्षांपूर्वी रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यांनीं या कामाकरितां केसरीचीं कांहीं जुनीं फाइलें मिळवून, लोकमान्यांच्या सल्ल्यानें त्यांचे लेख खंडशः छापून प्रसिद्ध करण्याचें मनांत आणून, या कामास लोकमान्यांची संमतीहि विचारली होती. पण या बाबतींतील अखेर योजना निश्चित न होतां इतर कार्यांच्या गर्दीमुळें हें काम तसेंच राहून गेलें. लो० टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांचीं वार्षिक श्राद्धें अनेक प्रकारांनीं होत आहेत; तेव्हां त्यांतच त्यांचे केसरींतील लेख छापून खंडशः वाचकानां दिले तर तो एक प्रकार लोकांना विशेष आवडेल असें आह्मांस वाटतें; व त्याप्रमाणें त्यांच्या लेखांचा हा पहिला भाग श्राद्धतिथीसच बाहेर पडत आहे.

ही योजना कदाचित् गतवर्षाच्या श्राद्धतिथीसच अमलांत यावयाची. पण त्या प्रसंगीं, शक्य तर, लोकमान्यांचें चरित्रच लिहून प्रसिद्ध करावें असाहि एक विचार आमचे मनांत होता. पण १९२०–२१ सालीं फुरसतीचा जो वेळ मिळाला तो या चरित्राच्या साधनांची जुळवाजुळव व टिपणें करण्यांतच गेला. त्यामुळें या लेखांच्या प्रसिद्धीचें काम मागें पडलें. पण गेल्या दीड वर्षाचा अनुभव पाहतां, चरित्रलेखनाचें हें एकटें एकच काम स्वतंत्रपणें पत्करून त्या करितां इतर सर्व चालचलाऊ कामें कित्येक महिने बाजूस ठेवल्याशिवाय चरित्रग्रंथ लिहून होणें अशक्य आहे, अशी खात्री झाली. म्हणून तो योग केव्हां येईल तेव्हां येवो, पण निदान द्वितीय मृत्युतिथी तरी कांहीं वाङ्मयस्वरूपाचें श्राद्ध केल्याशिवाय टळूं देऊं नये असा विचार आम्ही केला; व त्याप्रमाणें हल्लींचें हें पुस्तक छापण्याची तयारी केली.

लो० टिळकांनीं केसरींत सुमारें तीस पस्तीस वर्षेंपर्यंत अनेक विषयांवर लेख लिहिले. त्यांत मुख्य भर अर्थात् राजकीय विषयांवर होता हें सांगावयास नकोच. तथापि याखेरीज इतर विषयांवरील त्यांचे लेखहि, राजकीय लेखांइतकेच, मारदस्त, सणसणीत, मार्मिक व विद्वत्ताप्रचुर असल्यामुळें त्यांचाहि ग्रंथरूपानें संग्रह होणें अवश्य आहे यांत शंका नाहीं. पण हा एकंदर लेखसंग्रह एकदम छापून

निघणें जसें अवघड, तसेंच तो सर्व एकदम विकत घेणें हें वाचकांनाहि गैरसोईचें ठरतें. यामुळें आम्हीं अशी योजना केली आहे कीं, प्रथम केसरींतील लोकमान्यांचे राजकीय विषयावरील लेख, व त्यानंतर त्यांचे सामाजिक, धार्मिक, वाङ्मयात्मक वगैरे विषयांवरील लेख छापावयाचे. राजकीय विषय मोठा असल्याकारणानें त्याचे हल्लींएवढे दोन किंवा कदाचित् तीनहि भाग होतील; व इतर विषय मिळून त्याणखी दोन भाग होतील. अशा रीतीनें सुमारें अडीच तीन हजार पृष्ठांत लोकमान्यांच्या निवडक लेखांचा संग्रह होईल.

राजकीय विषयक लेखांच्या या पहिल्या भागांतील पहिला लेख ता. २१ आगस्ट १८८८ चा असून शेवटचा लेख ता. २० जुलै १८९७ चा आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईलच. या नऊ वर्षांतील लेखांचींच इतकीं पृष्ठें झाल्यामुळें हा भाग येथेंच पुरा करावा लागला हें खरें. तथापि ही खंडमर्यादा इतर स्वाभाविक कारणांनींहि प्राप्त झाली आहे. लो० टिळकांच्या चरित्राप्रमाणें त्यांच्या लेखनव्यवसायाचेहि तीन भाग, कालाच्या दृष्टीनें, आपोआप पडतात. टिळकांनीं राजकीय चळवळ व तदनुषंगानें संपादकाची लेखणी हातीं घेतल्यापासून स० १८९७ सालीं राजद्रोहाचा पहिला खटला व दीड वर्षांची शिक्षा होईपर्यंत पहिला भाग पुरा होतो. दुसऱ्या भागास ' पुनश्च हरिः ॐ ' या त्यांच्या केसरींतील अग्रलेखानें सुरवात होऊन, सन १९०८ सालीं केसरीवरील राजद्रोहाचा दुसरा खटला व त्यांत सहा वर्षांची काळेपाण्याची शिक्षा होण्याचे सुमारास त्याचा शेवट होतो. पुढें मंडालेहून स. १९१४ सालीं लो० टिळक परत आल्यानंतर त्यांनीं केसरीचें संपादकत्व आपल्याकडे घेतलें नाहीं हें खरें. तथापि राजकीय चळवळीच्या भरांत व लेखनव्यवसायाच्या आवडीनें, त्यानंतरहि प्रायः आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांनीं केसरींत अनेक लेख लिहिले आहेत. केसरींतील त्यांच्या राजकीय लेखसंग्रहाचा हा तिसरा भाग होईल. हे तीनहि भागच काय, पण इतर विषयांवरील भागहि, शक्य तितके लवकर छापून प्रसिद्ध करावे असें आम्हीं योजिलें आहे. तथापि वर्षांतून एक किंवा फार तर दोन भाग छापण्याहून अधिक जलदीनें हें काम होणें शक्य नाहीं. आणि ग्राहक व वाचक यांच्याहि दृष्टीनें थोड्या थोड्या कालावधीनें हे भाग बाहेर काढणें हेंच सोयीचें आहे. तात्पर्य, या लेखसंग्रहाचे भाग प्रसिद्ध होण्याच्या मुदती व तारखा आजच निश्चित ठरवितां न आल्या तरी सुमारें तीन वर्षांत यथाक्रम ही योजना पुरी होईल असा आमचा आजचा अंदाज आहे.

आतां या संग्रहांतील खुद्द लेखांसंबंधानें दोन शब्द सांगणें जरूर आहे. आम्हीं छापीत आहों ते ' लो० टिळकांनीं केसरींत लिहिलेले लेख 'च होत. तथापि नेमके या स्वरूपाचेच तेवढे लेख बिनचूक निवडून काढणें हें किंचित् अडचणीचें आहे; तें कां हें मार्मिक वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. स्थूल-

रूपानें केसरी व टिळक यांचा केव्हांहि अनन्य संबंधच आहे अशी सामान्य वाचकांची समजूत असणार, व तींत पुष्कळच तथ्य आहे. तथापि ज्या मुदतींत एखादा मनुष्य एखाद्या वर्तमानपत्राचा जाहीररीतीनें संपादक असतो, त्या मुदतींत त्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले सर्वच काय, पण संपादकीय लेख देखील सर्वच्या सर्व त्यानेंच लिहिलेले असतात असें नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे. या नियमाला अनुसरून, लो० टिळक हे केसरीचे जाहीर संपादक असलेल्या मुदतींत, केसरींत प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखांतून इतरांनीं लिहिलेलेहि अग्रलेख मिसळलेले आहेत. अर्थातच ते या लेखसंग्रहातून वगळले पाहिजेत. पण खर्चाच्या या रकमाप्रमाणें जमेच्याहि कांहीं रकमा आहेत. त्या म्हणजे लो० टिळक हे केसरीचे जाहीर संपादक नसतां त्यानीं केसरींत लिहिलेले लेख या होत. म्हणून प्रस्तुत लेखसंग्रहांत पाहिल्याप्रकारचे लेख वगळून दुसऱ्याप्रकारचे लेख घ्यावे लागणार आहेत.

वर्तमानपत्रांचा शिरस्ताच असा असतो कीं, त्यांत कोणता अग्रलेख कोणी लिहिला याची फोड किंवा नामनिर्देश करणें शिष्टाचाराविरुद्ध मानलें जातें. एवढेंच काय, पण कोणत्याहि वर्तमानपत्राच्या कचेरींत अग्रलेखवार लेखकांच्या नांवनिशाची नोंदहि ठेविली जात नाहीं. यामुळें लेख व त्यांचे लेखक यांचा मेळ घालणें हें काम कोणासहि इतर रीतींनेंच करावें लागतें. हा विवेक करण्याचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे सराईत लेखकांची दृढ बनलेली लेखनपद्धति. या साधनानें परिचित वाचकाला कोणचा लेख कोणाचा हें शंभरांपैकीं नव्वद वेळां बिनचूक ओळखून काढतां येतें. लो० टिळकांची लेखनपद्धति तर अशी विशिष्ट प्रकारची होती कीं, त्यांच्या लेखांच्या लेखकत्वाविषयीं कोणास फारशी संशयाची जागा उरतच नाहीं. तथापि परिचिताची ही दृष्टी चालवूनहि त्यांनीं लिहिलेला एखादा अग्रलेख दुसऱ्याचा व दुसऱ्यानें लिहिलेला अग्रलेख त्यांचा, असा भ्रम चुकून एकाद्याहि ठिकाणीं आम्हांला पडला नसेल अशी खात्री किंवा निर्वाळा आम्हीं देऊं शकत नाहीं हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे.

आतां हा भ्रम सर्वथैव निष्कारणच असतो असें मात्र नाहीं. कित्येक राजकीय अग्रलेखांतील विषयच इतका सामान्य व चलनी स्वरूपाचा असतो कीं, त्यावर स्वतः टिळकांनीं लेख लिहिला तरी तो कदाचित् सामान्य स्वरूपाचाच उतरूं शकेल. कित्येकवेळां सर्व भाषा स्पष्टपणें टिळकांची नसावीसें वाटलें तरी लेखकास विषयाची विचारसरणी टिळकांनीं सांगितली असावी व माहितीचीं साधनें दर्शाविलीं असावी यामुळें लेखांत टिळकांच्या विशिष्ट विचारांचें प्रतिबिंब उमटलेंसें स्पष्ट दिसतें. कित्येक वेळां अग्रलेखाचा एक भाग दुसऱ्याकडून लिहवून, दुसरा भाग पुष्टीकारितां किंवा पूर्तीकरितां स्वतः टिळकांनीं लिहिलेला असावा असा भास होतो; व प्रत्यक्ष व्यवहारांत असें घडतेंहि. अशा वेळीं निवड करणारास ' सोडलें तर पळतें व धरलें तर चावतें, ' या द्वाड म्हणीचा अनुभव सहजच

येतो ! कारखान्यांतील केरकचऱ्यांतून लोखंडाचे कण वायां न जावे म्हणून लोहचुंबकाच्या साहाय्यानें तेवढेच कण उचलून घेऊन बाकीचा केर टाकून देण्याची सोय असते. किंवा शुद्ध सोन्यारुप्यांत हिणकस मिसळलें गेलें असतां तेजाबाच्या साहाय्यानें तीं वेवगेगळीं करितां येतात. पण वर्तमानपत्रांतील लेखांच्या संबंधानें असलें बिनचूक विवेचक साधन कसें मिळणार? म्हणून इतर रीतीनें कार्याचा निर्वाह व मनाचें समाधान करून घेणें प्राप्त होतें. त्यांतूनहि एखादा लेख टिळकांचाच खरोखर असतां तो या संग्रहांतून वगळला गेला तरी ती मोठीशी वाव नाहीं. कारण केसरींतील टिळकांचें अक्षरान् अक्षर संग्रहित करावयाचें हा प्रस्तुत ग्रंथमालेचा उद्देश नाहीं. अडचण काय ती, खरा टिळकांचा लेख नसतां तो प्रस्तुत ग्रंथसंग्रहांत त्यांचा म्हणून चुकून समाविष्ट झाल्याचीच होय; व अशा गोष्टींचें मागाहून ज्ञान झाल्यास ती चूक निवड करणाराच्या मनाला किंवा वाचकालाहि नाजूक शल्यासारखी जाचत राहील हें उघड आहे. पण या बाबतींत मुख्य हेतूकडेच लक्ष देऊन किरकोळ चुकांची उपेक्षा करणेंच योग्य होईल. किंवा किंचित् अडमुठेपणा मुद्दाम स्वीकारून आम्हीं असाहि युक्तिवाद कां न करावा कीं स्वतः जाहीर संपादक असतां, म्हणजे केसरींत आलेले अग्रलेख आपलेच (टिळकांचे) आहेत अशी लोकांची समजूत होण्यासारखी असतां, जे लेख टिळकांनीं संपादकीय म्हणून स्वीकारले ते एका अर्थानें त्यांचेच झाले ! ' आपणांसारिखे करिती तात्काळ ' किंवा ' लोह परिसा खाया जाये । लोह सुवर्णची होये ' या अभंगवाणी प्रमाणें केसरींतील अग्रलेखांसंबंधीं लेखकालेखकांत भेद करणें हें सर्वथा अयोग्यच होईल. म्हणून प्रस्तुत लेखसंग्रहांत टिळकांनीं न लिहिलेला असा एकादा लेख चुकून छापला गेला असें कोणास आढळलें तरी त्या गोष्टीची वाच्यता करण्याचा त्याला अधिकार नाहीं हें जसें कायदेशी रीतीनें म्हणतां येतें, तसेंच, वरील विचारसरणी लक्षांत घेतां, मार्मिकतेच्या आग्रहानेंहि तें म्हणतां येईल.

टिळक हे केसरीचे जाहीर संपादक होण्यापूर्वी त्यांनीं केसरींत फारच थोडे लेख लिहिले. व या काळांत जे लेख त्यांनीं लिहिले ते प्रायः सामाजिक किंवा धार्मिक विषयांवर लिहिले अशी माहिती मिळते. फार काय, पण न्यू इंग्लिश स्कुलांतील भांडणामुळें आगरकरांऐवजीं टिळक हे सन १८८७ सालीं केसरीचे संपादक ठरून जाहीर झाले तरी, त्यानंतर बरेच दिवसपर्यंत ते केसरींत लिहित नसत. आमच्या माहितीप्रमाणें, टिळकांनीं न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज सोडल्यावर जी पहिली राजकीय चळवळ केली ती क्राफर्ड प्रकरणीं, म्हणजे बडतर्फ झालेल्या किंवा होऊं घातलेल्या मामलेदारांच्या तर्फें. या चळवळींत खबूतरखान्यामध्यें टिळकांनीं जाहीर सभेंत भाषण केलें तेंच त्यांचें पहिलें इंग्रजींतील भाषण होय. व ता. २१ आगस्ट १८८८ च्या केसरींत क्राफर्ड प्रकरणावर त्यांनीं लिहिलेला

लेख हाच प्रायः केसरींत राजकीय विषयावर त्यांनीं लिहिलेला पाहिला लेख होय असें सांगतात. तसेंच या भागांतील शेवटचा लेख, ज्या गुन्ह्याच्या आरोपाच्या वातावरणांत त्यांचें सर्व राजकीय चरित्र गेलें त्या राजद्रोहाच्या व्याख्येसंबंधीं आहे. अर्थात् प्रस्तुत खंडांतील हे आद्यंत अनेक दृष्टींनीं मनोरंजक वाटण्यासारखेच आहेत. पुढील भागांतील पहिला लेख, 'पुनश्च हरिः ॐ' हा येईल व दुसरा भागहि लवकरच तयार होईल म्हणून वाचकांनीं पुढील भागाकडे अवधान ठेवावें.

केसरी-मराठा कचेरी,
पुणें, ता. १ आगष्ट १९२२. } नरसिंह चिंतामण केळकर.

विषयानुक्रमणिका

विषय	पृष्ठें
प्रस्तावना	१–५
१८८८ पृ. १ ते ६	
१ क्राफर्ड प्रकरण ...	१
२ ,, ,, ...	४
१८८९ पृ. ७ ते २७	
३ क्राफर्ड प्रकरणाचा शेवट	७
४ नेटीव कामदारांची नीतिमत्ता	१०
५ हाच न्याय काय ?	१४
६ क्राफर्ड प्रकरणावरील आक्षेप	१८
७ क्राफर्ड प्रकरणाचें खरें स्वरूप	२१
८ विश्वासघात ...	२३
१८९० पृ. २७ ते ३०	
९ लष्करी शिक्षणाची शाळा	२७
१८९२ पृ. ३० ते १५०	
१० सालगुदस्त ...	३०
११ शेतकाऱ्यांचा कायदा...	३७
१२ राजद्रोह ...	४१
१३ मोहाचे फुलांचा कायदा	४७
१४ इंडिया कौन्सिल बिल	५२
१५ ह्यूम आणि कॉंग्रेस ...	५५
१६ ऑ. दादाभाई नवरोजी एम्. पी. ...	५८
१७ सरकारी जुलमाचा नवा मासला ...	६३
१७ राज्यकारभारांतील उधळेगिरीचा खर्च ...	६६
१८ इंग्रजी राज्यांत आम्हांस फायदा काय झाला...	७१
१९ सोन्यारुप्याचें नाणें (१)	७४
२० ,, ,, (२)	८०
२१ ,, ,, (३)	८५
२२ ,, ,, (४)	९२
२३ ,, ,, (५)	९८
२४ यंदाची प्रांतिक सभा	१०३
२५ पांचवी प्रां. सभा व तत्संबंधीं लोकांचें कर्तव्य ...	११०
२६ कायदे कौन्सिलांची सुधारणा ...	११५
२७ हें सारा वाढविणें कीं जुलूम	१२०
२८ बंगाल्यांतील ज्यूरीवर गदा	१२३
२९ आठवी राष्ट्रीय सभा	१२५
३० सोन्यारुप्याची लढाई	१२८
३१ हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें लागेल काय ...	१३३
३२ हिंदु शे. बंड करावें लागेल काय ...	१३८
३३ शेतकऱ्यांच्या कामिशनानें काय केलें ...	१४३
३४ शे. कामिशननें सुचविलेले उपाय ...	१४६
१८९३ पृ. १५० ते २५९	
३५ कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ...	१५०
३६ आमच्यावर जुलूम कसा होतो ...	१५५
३७ ज्यूरी प्रकरण ...	१६०
३८ ,, ,, ...	१६५
३९ पुण्यांतील पहिली चिमणी	१६९
४० गव्हर्नरसाहेबांचें उत्तर	१७३
४१ फार दिवस घडत अस-	

	विषय	पृष्ठें
	लेला वचनभंग ...	१७६
४२	चांदी, रुपये आणि पौंड	१८२
४३	फार दिवस घडत असलेला वचनभंग ...	१९२
४४	मुंबईइलाख्याचें बजेट	१९५
४५	हिंदूमुसलमानांचा दंगा	२०२
४६	मुंबईंतील दंगा आणि सरकारचें कर्तव्य ...	२०७
४७	दंगे कशानें बंद होतील	२१२
४८	घुण्यांतील हिंदुलोकांची जंगी जाहीर सभा...	२१७
४९	रा. ब. रानडे व त्यांचे अनुयायी	२२२
५०	स्वतंत्र चौकशी झालीच पाहिजे	२२८
५१	हिंदुमुसलमानांचा समेट	२३२
५२	येवल्याचा दंगा ...	२३६
५३	मुंबईइलाख्याच्या जमाखर्चाचा तक्ता ...	२४०
५४	लॉर्ड लॅन्सडाऊन यांचे गोरक्षणावरील विचार	२४६
५५	मे. ह्यूमसाहेबांची शेवटची भेट	२५१
५६	राजधर्माचे नवे उपदेशक यांतील बीज काय !	२५५
	१८९४ पृ. २५९ ते ३९६	
५७	मुंबईच्या दंग्यावर सरकारचा ठराव... ...	२५९
५८	लॅन्सडौन साहेबांची शेवटची सलामी ...	२६३
५९	मुसलमानांच्या उद्धारार्थ नवा अवतार ...	२६८
६०	येवल्याच्या दंग्याचा पुनः उद्भव	२७१
६१	नेक नामदार लॉर्ड हारीस यांचे हुजुरास ...	२७८
६२	येवलें येथील पोलीस व फौजदारी अधिकाऱ्यांचा दंगा	२८३
६३	मुंबई सरकारची अखेर झाली	२८८
६४	करवीरक्षेत्रीं राजकीय कपिलाषष्ठीचा योग ...	२९५
६५	बदसल्लागार कोण ?	३००
६६	दंगे बंद करण्याचे दोन उपाय	३०४
६७	कायदा आणि शिष्टाचार	३०८
६८	क्यांबेलसाहेबांस ऑनरेबल मि. फेरोझशहा मेथा यांचें उत्तर	३१२
६९	दंगे जास्त होण्याचीं सरकारी चार कारणें	३१७
७०	येथील पोलिसांचें नवें शहाणपण... ...	३२३
७१	हिंदुस्थानचा कारभार	३२९
७२	गणपतीचा उत्सव ...	३३४
७३	औद्योगिक पारतंत्र्य	३४०
७४	यानें तंटे लागतील, मिटणार नाहींत ...	३४४
७५	असें झालें पाहिजे; पण कराल का ! ...	३४८
७६	याचा दोष कोणाकडे !	३५३
७७	परंतु करतो कोण !	३५९
७८	अजून तरी आमच्या सरकारचे डोळे उघडतील काय !	३६३


विषय	पृष्ठें
७९ येथील दंग्याच्या खटल्यांचे निकाल	३६७
८० प्रांतिक व राष्ट्रीय सभा	३७२
८१ अजून सरकार जागें होईल काय ?	३७७
८२ दंगा कोण करतो ...	३८२
८३ पराचा कावळा—१	३८७
८४ ,, ,,—२	३९१
१८९५ पृ. ३९६ ते ४९८	
८५ राष्ट्रीय सभा ...	३९६
८६ रोमन पातशाही आणि इंग्रजी राज्य ...	४०२
८७ लॉर्ड हॅरिस यांचें स्मारक	४०८
८८ लॉर्ड हॅरिस यांच्या स्मारकाचें स्वरूपाविष्करण	४१३
८९ मि. फेरोजशहा मेथा व सर वेस्टलंड यांचे दोन हात	४१८
९० लॉर्ड हॅरिस यांची आरती	४२३
९१ राज्यकारभार कसा चालवावा ?	४२६
९२ लॉर्ड सॅन्डहर्स्ट यांच्या कारकिर्दीचा अंदाज ...	४३२
९३ मा० स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांची कारकीर्द ...	४३६
९४ हिंदुस्थानची दैना ...	४४२
९५ चित्रळवर मोहीम ...	४४६
९६ सर रिचर्ड गार्थ यांचे हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीसंबंधीं विचार ...	४५०
९७ चीन व जपान ...	४५५
९८ स्वागतपर मानपत्रें व त्यांस उत्तर	४५९
९९ श्रीशिवाजी महाराज यांच्या स्मारकाबद्दल सूचना	४६३
१०० लोकनायकांचें कर्तव्य	४६७
१०१ वाद्यांचे नियम ...	४७१
१०२ अकरावी राष्ट्रीय सभा	४७५
१०३ अगांतुक अधिकाराची थोरवी तितपतच ...	४७९
१०४ यंदाचा गणपत्युत्सव	४८४
१०५ अजून तरी डोळे उघडतील काय ! ...	४८८
१०६ जुरीचे हक्कावर गदा	४९३
**१८९६ पृ. ४९८ ते ६०० **	
१०७ अकरावी राष्ट्रीय सभा	४९८
१०८ यापेक्षां जास्त अन्याय तो कोणता !	५०२
१०९ सर जेम्स वेस्टलंड यांचा युक्तिवाद	५१२
११० देशी कपडा वापरण्याबद्दल मि. वाच्छा यांचे विचार	५१६
१११ हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा खर्डा	५२१
११२ उत्तरच पाहिजे वर हें घ्या	५२५
११३ शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव	५३०
११४ कराची येथील नववी प्रांतिक सभा ...	५३४
११५ हा विघ्नसंतोषीपणा नव्हे काय !	५३९
११६ थोर पुरुषांचीं चरित्रें	५४५
११७ अखेर व्हावयाचें तेंच झालें	५४९
११८ मुंबईइलाख्याच्या जमाखर्चाचा खर्डा ...	५५४
११९ राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता	५६१

	विषय	पृष्ठें
१२०	राष्ट्रीय महोत्सवांचेवेळीं सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे	५६६
१२१	श्रीगजाननाचा राष्ट्रिय महोत्सव	५७०
१२२	मुंबईंतिल भयंकर सांथीचा ताप	५७४
१२३	दुष्काळ	५७८
१२४	दुष्काळ निवारण्याची तयारी	५८२
१२५	दुष्काळाचें स्वरूप ...	५८५
१२६	पोलिसाच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्यांत भरलेली रयतेची जंगी सभा	५८८
१२७	ह्या वेळीं तालुक्यांतील पुढारी लोकांचें कर्तव्य	५९२
१२८	जमिनीच्या साऱ्याची तहकुबी व सूट ...	५९८
	१८९७ पृ. ६०१ ते ६८७	
१२९	साऱ्याच्या तहकुबीबद्दल सरकारचा ठराव ...	६०६
१३०	साऱ्याच्या तहकुबीची व सुटीची हकीकत ...	६०४
१३१	ग्रंथिक सन्निपात व सरकार	६०८
१३२	सांथीच्या तापाच्या निवारणार्थ मुंबईसरकारनें केलेले नियम	६१३
१३३	सांथीच्या तापाचा प्रसार बंद करण्याकरितां नवी योजना	६१७
१३४	पुण्यांत सध्यां चालू असलेला धुमाकूळ ...	६२१
१३५	पुणें सार्वजनिक सभा व सरकार	६२४
१३६	पुण्यावर आलेला सध्यांचा प्रसंग	६३१
१३७	मि. दादामाई नौरोजी यांची रॉयल कमिशन पुढील साक्ष ...	६३६
१३८	मि. दिनशा ए. वाच्छा यांची रॉयल कमिशन पुंढील साक्ष ...	६४०
१३९	रॉयल कमिशनपुढें प्रो. गोखले यांची झालेली साक्ष	६४३
१४०	दुष्काळ निवारण्याचे मार्ग	६४७
१४१	महाराणी सरकारचा जयजयकार	६५३
१४२	,, ,, ,,	६५७
१४३	,, ,, ,,	६६२
१४४	गेल्या मंगळवार रात्रीं घडलेला भयंकर प्रकार !	६६८
१४५	सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय ? ...	६७२
१४६	राज्य करणें म्हणजे सूड उगविणें नव्हे ...	६७८
१४७	राजद्रोह कशाला म्हणतात?	६८२

केसरी

वर्ष ७ वें. पुणे:—मंगळवार, तारीख ११ जानेवारी सन १८८७ अंक २

हरी केशव गोखले नवीन घड्याळें विकणार व नीट करणार.



वेग दर्शक, सायकोल, रेसिंगसुपेर, ओनरोक, कुरवाइ. ओ वगैरे वेगाची घड्याळे मोठ्या किंमतीची, मोहक व उत्तम, सूर्यदर्शक दिवाण, घोडे, सायकला, ओव्हरल् वेस्किया व दिवे वगैरे वस्तू स्वस्त किंमत.

दुसऱ्याने दुरुस्ती सांगितलेली, चोरीची व पेटलेली घड्याळे विकत घेणार नाही व घेतल्यास कायदेशीर जबाबदार होईन.

सायकले ठेवून अथवा भाड्याने देणे व सायकलिस्टांचे दुरुस्तीचे काम उत्तम प्रकारचे, व स्वस्त होईल असे करून देणे.

सोनेरी-चांदीचे व इलेक्ट्रीक प्लेट केलेले व इतर घड्याळे दुरुस्त करून मिळतील.

वरील सर्व किंमती रोख दिली पाहिजे, उधारीचे काम करणार नाही याबद्दल मला क्षमा असावी

वरील सर्व माल पुढील ठिकाणी खास विक्रीस ठेवला आहे

हरी केशव गोखले.

मुंबई. कालबादेवी. गोलाबाबांची वाडी.

डाक्टर गर्दे

यांची अति-रस नावाची औषधे.

हीं सर्व औषधें सर्वांनी सदा बाळगण्यासारखी

किंमत वगैरे.

पाकीट वगैरे खालीलपैकी मोठ्या

औषधाच्या दुकानी मोफत मिळते.

सिताफळ साबण.

हा साबण सिताफळाच्या, किंवा इतर

वाढ, कोंडा निघून मुळे

वरील औषधे व साबण मिळण्याचे ठिकाण

डाक्टर गर्दे यांचे औषधालय,

गिरगांव, मुंबई.

सर्व प्रकारचे रोग, विशेषतः

फोजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा

सन १८८२ चा आक्ट १० वा,

हा ग्रंथ मी स्वतः मराठीत भाषांतर करून प्रसिद्ध केला आहे. किंमत फक्त रु. १-८-० आहे. "केसरी" ऑफिसात मिळेल.

V. H. KARANDIKAR,
भाषांतरकार सरकारी.

सदर कामी खात्री करून घेण्याचा दाखला

किंमत सवा रुपया.

अमदाबाद येथे,-विसापोर,-ट इ. मोठी

श्रीसंतलीलामृत.

एक विलक्षण अद्भुत रसाळ, बोधप्रद व आनंदकारक ग्रंथ, मोठी पोथी रु. १ (१० दगड २ आणे) पोस्टेज वेगळे. पुस्तक मिळण्याचा पत्ता:—

हरी दत्तात्रय पटवर्धन,
बाबूची बगीचा दरियापुर
दरवाजा, अहमदाबाद.

रोहोनोक्त

ह्यांचे

फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा

सन १८८२ चा आक्ट १० वा,

ह्याचे मराठी भाषांतर तयार झाले असून किंमत फक्त एक रुपयाभर—किंमत वगैरे पत्र रु. ०-८-० पाठवा. "केसरी" ऑफिसात मिळेल.

V. H. KARANDIKAR,
भाषांतरकार सरकारी.

सदर कामी खात्री करून घेण्याचा दाखला

किंमत सवा रुपया.

अमदाबाद येथे,-विसापोर,-ट इ. मोठी

श्रीसंतलीलामृत.

एक विलक्षण अद्भुत रसाळ, बोधप्रद व आनंदकारक ग्रंथ, मोठी पोथी रु. १ (१० दगड २ आणे) पोस्टेज वेगळे. पुस्तक मिळण्याचा पत्ता:—

हरी दत्तात्रय पटवर्धन,
बाबूची बगीचा दरियापुर
दरवाजा, अहमदाबाद.

नव्या जाहिराती.

धनगर विष्णु आणि केवनी

यांचा इतर भाषा समजत नाहीत

नव्या जाहिराती.

लो० टिळक केसरीचे प्रकाशक म्हणून प्रथम प्रसिद्ध झाले त्या सालच्या केसरीच्या मुखपृष्ठाचें चित्र.

वर्गणीचे दर.

नमूना अगत्य.

एकेक अंकाची अधी आणा

वर्गणी आल्या खेरिज अंक
दुसरा पाठविला जाणार नाही.

केसरी

जाहिरातीचे दर.

सोळा ओळी किंवा त्याचे
आंत एक वेळा
दुसऱ्या खेपेस निम्मे आकार पडेल.

जास्तीच्या ओळींचे मजकुरा-
ला प्रमाणाने आकार पडतील.

स्थिति नो रे दध्याः क्षणमपि मदांधेक्षणसखे गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वनभुवि ।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा-गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ॥

वर्ष १. पुणे:—मंगळवार तारीख ४ जानेवारी १८८१. अंक १.

आज सुमारे दोनशें वर्षांत इंग्लंडांत इतकीं मराठी वर्तमानपत्रें निघत असतां व या शहरांत ही तीन चार चालत असतां, नव्या वर्तमानपत्राची काय जरूर आहे हा विचार आमच्या वाचकांच्या मनांत येणारा आहे. सारांत प्रथमतः या प्रश्नाचा उद्देश लोकांस बोधिणें अवश्य आहे.

वर्तमानपत्रांचा प्रचार पडल्यास आज पांसष्ट वर्षें जरी होऊन गेलीं, व गेल्या दहापंधरा वर्षांत तर यांच्यांत जरी पुष्कळ सुधारणा झाली, तरी अद्याप वर्तमानपत्रकर्त्यांचे आपणांवरची जबाबदारी पुरेपणीं कळूं लागली आहे, किंवा लोकसुधारणेस आपल्या परिश्रमांनी कवढें साहाय्य होणारें आहे याविषयीं त्यांचा पक्का समज झाला आहे, असें सामान्यतः पाहतां आढळणार नाहीं. दोन चार नामांकित वर्तमानपत्रांखेरीज बाकीच्यांची जर स्थिति पाहिली, तर वर्तमानपत्र म्हणजे नागोबाच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचें साधन याच्या पलीकडे वरील शब्दाचा अर्थ पत्रकर्त्यांच्या मनांत कधींही येत असेलसें वाटत नाहीं. आलीकडे तर लहानसान गांवांतून सुद्धां वर्तमानपत्रें निघूं लागलीं आहेत. छापखाना घालणें व पत्र काढणें हा एक व्यापारच बनल्यानें ज्यास विद्येचा विशेष सत्कार नाहीं अशा मंडळीच्या हातींच वरील दोन अमोलिक साधनें पडलेलीं बहुधां आढळतात. अशांत वेवढें खेर आहे कीं, कोणत्याही तऱ्हेनें का होईना, वरील दोन साधनांची वृद्धि ही एकंदर देशास श्रेयस्करच आहे. निदानपक्षीं लोकांत वाचण्याचा प्रघात तरी पाडण्यास वरील साधनांचा उपयोग आहे. पण याच उद्योगांत बरच्या पेक्षां चांगली मंडळी पडली असतां लोककल्याणाचा मार्ग ज्यास खुला होणार आहे हें पुढें आहे.

वर्तमानपत्रांचा मुख्यतः दोन प्रकारांनीं मोठा उपयोग आहे. एक हा कीं, त्यांनीं आपलें काम निःपक्षपातपणें व निर्भीडपणानें बजावलें असतां सरकारी अधिकाऱ्यांवर मोठा दबदबा राहतो. म्हणजे गरीब लोकांस दिले लागलेले असल्यानें व पोलिसांची मस्ती फिरून असल्यानें जो उपयोग होत असतो, तोच उपयोग या जागीं वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सदोदित चालू असल्यानें होत असतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं आपापली कामें चोख रीतीनें चालविलीं असतां त्यांत प्रजेचें किती कल्याण असतें हें कोणास सांगावयास नकोच. पण सरीस चोखपणा राहण्यास त्यांचा सर्व कारभार लोकांच्या नजरेसमोर बरोबर येत जाईल तेव्हां राहणार. सर्व गोष्टी सर्वांच्या समक्ष होत असल्या म्हणजे अर्थातच लांचलुचपत वगैरे जे अन्यायाचे प्रकार एरवी होण्याचा संभव असतो तो पुष्कळ अंशीं नाहींसा होतो. जुन्या एतद्देशीय संस्थानांतून वरील प्रकार किती चालत असे, व अद्याप किती चालतो, हें क्षणभर लक्षांत आणलें असतां पत्रकर्त्यांची गरज लोकांस किती हितावह आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. विलायतेंत खुद्द महाराणी साहेबांपासून व मुख्य प्रधानापासून तों अगदीं खेड्या सरकारी कामगारापर्यंत सर्वांच्या कारभारावर लोकांचा नजर वर्तमानपत्रांच्या द्वारें सारखी लागून राहिलेली असते, त्यामुळें कोणता ही अन्याय प्रायः लपला जात नाहीं, व म्हणून तेथील लोक युरोपांतील इतर राष्ट्रांहून सुधारले आहेत ही गोष्ट सर्व प्रसिद्धच आहे.

तर सरकारी अधिकारी आपापलीं कामें कोणत्या तऱ्हेनें बजावतात याविषयीं केवळ निःपक्षपातबुद्धीनें व कोणाचीही भीड न बाळगतां मजकूर लिहिण्याचा आमचा इरादा आहे. अमुक अमुक गोष्ट आहे तेव्हां त्याच्या विरुद्ध कसें लिहावें, किंवा सरकारनें अमुक अमुक गोष्ट केली तर निंदात्मक चर्चा केली

केसरीच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठाचें चित्र.

लो. टिळकांचे केसरींतील लेख.

* क्राफर्ड प्रकरण

आजकाल येथें लोकांच्या तोंडीं दुसरा विषयच नाहींसा झाला आहे व त्यांतून हणमंतरावावरील खटला सुरू झाल्यापासून तर या प्रकरणास जास्त जास्त रूप येत चाललें आहे. क्राफर्डसाहेबांस मॅजिस्ट्रेट यांनीं सोडून दिलें व सरकारनें आपली परवानगी काढून घेतली तेव्हां कांहीं इंग्रजी वर्तमानपत्रकर्त्यांनीं जो गवगवा केला त्यास भुलून आमच्यापैकींहि कांहीं जणांनीं त्यांच्या पाठीमागून सूर ओढण्यास सुरवात केली होती; पण हणमंतराव यांच्यावरील खटल्यांतील पुरावा जसजसा बाहेर येत चालला, तसतशी ही ओरड कमी होत चालली व लवकरच ती अगदीं नाहींशी होईल यांत संशय नाहीं. इंग्रजींतहि मुंबई ग्याझेटसारखीं विचारानें लिहिणारीं कांहीं पत्रें आहेत; पण सामान्यतः जर पाहिलें तर असें आढळेल कीं, मोठ्या युरोपियन कामगारावर आरोप पाहिला म्हणजे यांचें पित्त भडकतें. क्राफर्डसाहेब खरोखरच गुन्हेगार आहेत कीं नाहीं याचा आम्ही आज विचार करीत नाहीं, व तो करण्याचें साधनहि आज आमचे जवळ नाहीं; परंतु क्राफर्डसाहेबांवद्दल अगदीं भर बाजारांत जे उद्गार ऐकूं येतात व युरोपियन कामदारांच्या कानापर्यंतहि जे अनेक वेळां गेले आहेत ते मनांत आणिले म्हणजे या इंग्रजी पत्रांच्या धाडसाचें, पक्षपाताचें व दुराग्रहाचें कोणासहि अत्यंत आश्चर्य वाटल्यावेरीज राहणार नाहीं. क्राफर्डसाहेबांचीं पूर्वीचीं कृत्यें लक्षांत आणिलीं म्हणजे हे राजश्री येथून दाढी लावून थर्डक्लास मधून जे निघून गेले ते पळण्याच्या हेतूनें गेले नाहींत असें कोण म्हणेल ? पण त्यावरहि टाइम्स, पायोनियर वगैरे एतद्देशीय आंग्लभौम पत्रकारांची कोटी आहेच. कोणी म्हणतो कीं, साहेबांनीं हें काम आपला खटला मॅजिस्ट्रेटकडे जावा एवढ्याचसाठीं केलें. कोणाची हें सर्व प्रकरण क्राफर्डच्या हातावालील लुच्चा ब्राह्मण कामदाराचें कारस्थान आहे अशी खात्री आहे. आणि कोणी क्राफर्डसाहेबांचें व इतर वरच्या युरोपियन कामदारांचें वांकडें आहे म्हणून हा खटला उपस्थित झाला व म्हणूनच क्राफर्डसाहेब कमिशनपुढें चौकशी चालविण्यास नाराजी आहेत असें प्रतिपादन करीत आहे. " स्वजाति दुरतिक्रमा " असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. हाच जर कां एकाद्या नेटिवाविरुद्ध खटला असतां व आमच्या पत्रकारांनीं हल्लीं इंग्रजी वर्तमानपत्रें करताहेत त्याचा शतांशहि जरी ओरड केली असती, किंवा हीं

---

* [केसरी–ता. २१ आगष्ट १८८८]

खटला नेटिव संस्थानांत अगर नेटिव कामदारापुढें चालला असता तर नेटिव पत्रांस किंवहुना सर्व नेटिवांस राजद्रोही ठरविण्यांत टाइम्स, पायोनियर पत्रकारांनीं तेव्हांच पुढारीपणा घेतला असता. पण दुर्दैवानें हें प्रकरण इंग्रज सरकारच्याच अमलांत इंग्रज कामदारापुढेंच चालू आहे. तेव्हां तिकडून या पत्रकारांचें तोंड बांधलें गेलें आहे. तथापि मुंबई सरकारास व त्यांचे कौन्सिलरांस प्रत्यहीं सारख्या शिव्या खाव्या लागत आहेत. आणि त्या कशाकरितां तर सरकारनें एकादा दुसरा खटला कोर्टापुढें व इंग्रजी ज्यूरी आणून कांहींतरी शुल्क मुद्यावर सुटून जाण्याची क्राफर्ड साहेबांस सवड ठेविली नाहीं म्हणून. कमिशनच्या व कोर्टाच्या चौकशींत काय भेद आहे हें ह्यांस माहीत नाहींसें नाहीं. पण कमिशनपुढें एकंदर प्रकरणाची चौकशी व्हावी अशी यांची अर्थात्च इच्छा नसावी. क्राफर्डसाहेबांवर एक किंवा दोनच आरोप असते किंवा त्यास किती शिक्षा करावी हाच जर प्रश्न असता तर गोष्ट निराळी. पण खरा प्रकार अगदीं भिन्न आहे. क्राफर्डसाहेबांविरुद्ध आज निदान २०।२५ खटले तरी सरकाराकडे आहेत व या सर्व प्रकरणांची नक्की चौकशी होऊन खरें बाहेर पडावें अशी त्यांची इच्छा आहे. त्यांस कमिशन खेरीज दुसरा मार्गच राहिला नाहीं. ज्या प्रकरणांत इलाखा गुंतून गेला आहे व ज्यांचीं मुळें खालसा मुलखाबाहेरहि गेलीं असतील त्या त्याच्या स्वरूपाचा निकाल कोर्टापुढें एखादी क्षुल्लक केस आणून करणें शहाणपणाचें आहे असें कोण म्हणेल ? लॉर्ड रे व त्यांचे कौन्सिलर यांनीं या प्रकरणीं जें धैर्य दाखविलें तें खरोखरच वर्णनीय आहे. हें क्राफर्ड प्रकरण आज सरकारापुढें नव्यानेंच आलें आहे असें नाहीं. पण आजपर्यंतच्या सरकारच्या वर्तनावरून क्राफर्डसाहेब म्हणजे एक नवाबच आहेत, अशी लोकांची खात्री झाली होती. तो सर्व भ्रम दूर करून इंग्रजी राज्यपद्धतीचें दूषण काढून टाकण्यास आमचें सरकार इमानानें झटत आहे हें खरोखर प्रशंसनीय होय. क्राफर्ड साहेबांबद्दल आपलें मत कांहींहि असो, त्यांचे कोणावर कसेहि उपकार असोत तरी आज ते सर्व विचार एकीकडे ठेवून आपमतलबी इंग्रजी पत्रकारांच्या कळपांत न जातां प्रत्येकानें होईल तेवढी सत्य बाहेर येण्यास मदत करावी हेंच आमचें खरें कर्तव्य आहे.

हें झालें; पण आतां या मामलेदारांची वाट काय ? असा एक प्रश्न आहे. सरकारच्या बोलावण्यावरून खरें परंतु सरकारची कांहीं सक्ती नसतां बरेच मामलेदार आपलें अंतःकरण सरकारपुढें खुलें करून मोकळे झाले आहेत व आणखी होत आहेत. हा प्रकार सर्वथैव निंद्य आहे असें कित्येकांचें मत आहे. व कित्येकांस तर याखेरीज आतां गत्यंतरच दिसत नाहीं. कोणी म्हणतो कीं, बायकापोरांचे दागिने गाहाण ठेवून किंवा कर्ज काढून हणमंतरावांची भर करणाऱ्या मामलेदारांनीं आतां कोर्टापुढें उभें राहून निलाजरेपणानें मी असें बोललों आणि

यंव केलें, त्यंव केलें असें सांगणें हें त्यांच्या योग्यतेस व कुलास लांछनास्पद आहे. कोणी म्हणतो कीं, पैटकीचा आजारच जर आला तर त्यास लोकांचा तरी काय उपाय ? दुसराहि आणखी असा प्रश्न निघतो कीं, आतां या मळकटलेल्या मामलेदारांस सरकार पुढें आपल्या नोकरींत ठेवणार काय ? व यदाकदाचित् ठेविलें तरी यांची आतां सरकारांत व लोकांत अब्रू ती काय राहिली ? सर्व क्राफर्ड प्रकरणाची चौकशी होऊन खरा प्रकार बाहेर पडेपर्यंत या दोन्ही प्रश्नांस पूर्ण उत्तर देतां येत नाहीं; तथापि सर्व प्रकार बाहेर आला म्हणजे वरील प्रश्नांचा गाऊ बराच कमी होईल, यांत संशय नाहीं. वरील दोन्ही प्रश्न करणारे, सरकाराकडे या बाबतींत कांहीं दोष नाहीं, असें घेऊन चालतात; पण हेंहि कांहीं सर्वथैव खरें नाहीं. इन्व्हेन्यारिटीसाहेब म्हणतात त्याप्रमाणें सरकार म्हणजे काय हें जरी निश्चित सांगतां येत नाहीं, तरी लॉर्ड रेप्रमाणेंच जर सर्व लोक पापभीरु असते तर आज कित्येक गरीब मामलेदार अनीतीच्या खड्ड्यांत पडले नसते. तथापि हाहि प्रकार सर्वत्रच खरा आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. या क्राफर्डसत्राचें भयंकर व घाणेरडें स्वरूप जरा नजरेपुढें आणिलें म्हणजे आम्ही विद्याप्रसाराची कितीहि बढाई मारिली तरी सत्याभिमान, एकनिष्ठा वगैरे ज्या गुणांनीं राष्ट्रें अभ्युदयास येतात ते गुण आमच्यामध्यें अजून हवे तितके आले नाहींत असें म्हणावें लागतें. आगीपासून दोन कोश दूर राहून फुशारक्या मिरविणारे शेंकडों आहेत ! पण आगींत सांपडल्यावर मग सत्वास जागणाऱ्या मनुष्यांची संख्या मोजण्यास एका हाताच्या बोटांची सुद्धां जेथें जरूर पडत नाहीं तें राष्ट्र कसलें व लोक तरी काय !

विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः ।

या कालिदासोक्तीप्रमाणें जेव्हां कांहीं ' धीर ' किंवा ' वीर ' आपणांत निपजतील तेव्हांच आमच्या देशास विद्येचा व सुधारणेचा खरा लाभ झाला म्हणावयाचा. अस्तु; या प्रश्नांचीं खुलासेवार उत्तरें आजच देतां येत नाहींत म्हणून आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे. करितां एकंदर प्रकरणाचा निकाल होईपर्यंत पुनः तोंड दाबून धरितों. तत्रापि हल्लीं जो प्रकार उघडकीस आला आहे तितकाही हल्लींची तरूण मामलेदार मंडळी त्या खाल्यांत नसती तर बाहेर पडला नसता व अजून कित्येक वर्षें आम्ही अशींच अंधःकारांत घालविलीं असतीं हें सांगणें जरूर आहे.

\+ \+ \+ \+ \+

* क्राफर्ड प्रकरण (२)

हणमंतरावावरील खटल्याचा निकाल झाल्यापासून या क्राफर्ड प्रकरणाचें स्वरूप बदलल्यासारखें झालें हें निश्चित आहे. आतां खुद्द क्राफर्डसाहेबांवर जे आरोप आहेत त्याबद्दल स्वतंत्रपणें चवकशी होणें आहे; सबब आज त्या आरोपाविषयीं कांहीं म्हणणें वाजवी होणार नाहीं. तथापि या प्रकरणासंबंधानें लोकांत ज्या नाना प्रकारच्या कंड्या पिकत आहेत व त्यांपासून जो गैरसमज होत चालला आहे, त्यामुळें न्यायाच्या सरळ व विनधोक मार्गांत अडचणी येण्याची आम्हांस भीति वाटते. सबब यासंबंधानें चार खुलाशाचे विचार ल्याहावे व लोकांतील गैरसमज घालविण्याचा प्रयत्न करावा अशा हेतूनें आम्ही हे पुढील शब्द वाचकांस व इतरांस उद्देशून लिहीत आहों.

प्रथमतः या खटल्याच्या साधारण स्वरूपाचा आपण विचार करूं. आज कित्येक वर्षें मि. क्राफर्ड हे ज्या भागावर मुख्य होते त्या भागांतील लोकांची आमच्यावर जुल्मूम होतो व आम्हांस निरुपायास्तव व स्वतःचें हित साधण्याकरितां व स्वतःचे हक्क बचाविण्याकरितां कधीं स्वप्नींहि न येणारें पाप करावें लागतें अशी कुरकुर होती. वाईट हवेवर बदली करणें, वरचेवर इकडून तिकडे हेलपाटे घालावयाला लावणें, बढती न देणें–इत्यादि जुलमाचीं अगर एखाद्या नाठाळ मामलेदाराची खोड मोडून त्यास वठणीला आणण्याचीं जीं भयंकर साधनें कमिशनरच्या हातांत असतात, त्या साधनांचा दुरुपयोग होऊन आपल्याला अत्यंत हाल सोसावे लागतात अगर दुर्मार्गाचें अवलंबन करावें लागतें अशी ओरड किती दिवस चालू होती बरें ? अन्यायाची गोष्ट सांगण्याकरितां दक्षिणा द्यावी लागण्याचें राहिलें एकीकडे, उलटी, न्याय मिळविण्याला देखील किंमत पडूं लागल्याचा बोभाटा आणि तोहि विशेषतः एका व्यक्तीच्या संबंधानें-किती एक दिवस सारखा कानीं येत होता. अशी स्थिति झाली असतां तेथें न्यायाची व नीतीची किंमत काय राहणार ? गेलेला पैसा परत मिळण्याची खटपट करण्याचा विचार एकाद्याला तरी सुचणारच. याप्रमाणें रयतेवर परंपरेनें जुल्मूम होत असल्याचीं कित्येक किटाळें पुष्कळांच्या ऐकण्यांत आलीं असतीलच.

ही स्थिति न्यायाच्या संबंधानें, नीतीच्यासंबंधानें, सुव्यवस्थेच्यासंबंधानें, सारांश, रयतेच्या व सरकारच्या सर्व प्रकारच्या हितासंबंधानें अनिष्ट होती असें कोणीहि समंजस व विचारी मनुष्य कबूल करील. या गोष्टीकडे जितके दिवस सरकारास डोळेझांक करतां आली तितके दिवस त्यानें केली. असें सांगतात कीं, मागें

---

* [केसरी–ता. २ आक्टोबर १८८८]

एका अमदानींत असेंच प्रकरण उपस्थित झालें होतें. गुप्त चवकशी झाली. चवकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचें मत आरोपीवर गुन्हा शाबित होईल असें होतें. असें असूनहि त्या कमिशनचा हा प्रतिकूल रिपोर्ट, कोणत्याहि कारणास्तव कां होईना, दडपून टाकण्यांत आला. तात्पर्य कीं, युरोपियन कामदाराविरुद्ध आलेल्या आरोपांकडे दुर्लक्ष करण्याविषयीं साधारणतः सरकारचा कल असतो त्या अन्वयें याहि प्रकरणांत सरकारचें वर्तन झालें. अखेरीस ही स्थिति अशीच राहणें योग्य नाहीं व या प्रकरणाची चवकशी होऊन एकदां माजत चाललेली घाण नाहींशी व्हावी, न्यायास व नीतिस पुनः त्यांचें गेलेलें स्थान प्राप्त व्हावें म्हणून एका अधिकाऱ्यानें मोठा हिय्या करून लोकांत असलेला बोभाटा सरकारच्या कानीं आणला. तेव्हां सरकारचाहि पण नाइलाज होऊन सरकारानें चवकशीस प्रारंभ केला. या चवकशीचें फळ ८ दिवसांपूर्वीं दिसून आलें, आणि पुढेंहि दिसून येईल. यांत समाधानकारक इतकेंच आहे कीं न्यायाच्या व नीतीच्या शुद्धतेसाठीं याप्रमाणें सरकारापर्यंत धांव मारणारा अधिकारी एक नेटिव गृहस्थच निघाला.

आतां चवकशी सुरू झाली आहे खरी; पण तींत सत्य निष्पन्न होण्यास आमच्या लोकांनीं आणि विशेषतः ज्या लोकांचा घडलेल्या अगर घडल्या असा ज्या विषयीं आरोप आहे अशा गोष्टींशीं संबंध असेल त्यांनीं आपणांस माहीत असलेली हकीगत सांगून न्यायास पूर्ण साहाय्य दिलें पाहिजे. आजपर्यंत बाहेर आलेल्या प्रकारांवरून लोकांना लांच देणें भाग पडलें असावें असें दिसतें. व ही गोष्ट सरकारच्याहि पण नजरेस आलीच असली पाहिजे. सत्तेपुढें शहाणपण नाहीं 'अशी जी म्हण आहे ती सर्वथा खरी आहे. आमचे लोक नाडले गेले असल्यामुळें व सरकारांत दाद लागण्याचा संभव दिसत नसल्यामुळें गरीब बिचाऱ्यांनीं आपल्या मुलाबाळांचें अन्न राखण्यासाठीं एखादे वेळ झक मारली असेल. अशा प्रसंगांत कोण मारणार नाहीं ? आमच्या असें ऐकण्यांत आलें आहे कीं, क्राफर्डसाहेबांचा इतका दरारा असे कीं कित्येकदां कलेक्टर—अर्थात् नांवाजलेले सिविल सर्वंट—देखील त्यांच्या मर्जीनुरूप व्यवस्था करीत, मग ती अन्यायाची असेना. ही सारी स्थिति सरकारच्या कानीं आली आहे. कोणी कोणी, केव्हां केव्हां, कसकशा रीतीनें पाप केलें हेंहि पण सरकारापुढें आलें आहे. या कृत्यांचा अप्रत्यक्ष पुरावा मिळून त्या त्या लोकांवर स्वतंत्रपणें सरकारास अपराध स्थापन करितां येईल. पण सरकारची तशी इच्छा नसावी. सरकार या घाणेरड्या प्रकरणांत मुख्य अपराध्यांशिवाय इतरांना फाजील त्रास देणार नाहीं, कारण त्यांत अन्याय होईल अशी आमची समजूत आहे.

सरकारचा हेतु अशा तऱ्हेनें व्यक्त होत असतां, खरें सांगणाऱ्या लोकांस सरकार कोणत्याहि प्रकारची कडक शिक्षा करण्यास तयार नाहीं याचीं उदाहरणें आमच्या डोळ्यापुढें ढळढळींत दिसत असतांहि कित्येक लोक अजून सरकारच्या

अंतःस्थ हेतूंविषयीं कुतर्क काढीत आहेत व भलभलत्या शंका घेत आहेत हें पाहून आम्हांस फार खेद होतो. बरें; कमिशनपुढें साऱ्या गोष्टी बाहेर आल्या, नंतर सरकारनें डोळ्यावर कातडें ओढलें, असें (सर्वथा असंभवनीय आहे तथापि) घटकाभर कबूल केलें तर त्यापासून सरकारच्या अब्रूस किती धक्का बसेल बरें ? आधींच आजपर्यंत डोळेझांक केल्याबद्दल सरकारावर केवढी जबाबदारी आहे—आणि त्यांत या दुसऱ्या अन्यायाची भर ! आम्हांस निदान हें संभवनीय वाटत नाहीं. आरोपांची चवंकशी व्हावी व सत्य बाहेर यावें जुलमाखालीं अपराध करावयास तयार झालेल्या लोकांना फाजील शिक्षा होऊं नये—असा सरकारचा निश्चय असावा असें आजपर्यंतच्या सरकारच्या वर्तनावरून दिसून येतें.

असें वास्तविक असून अजूनहि कित्येक लोक सरकारच्या इच्छेआड येऊं पहातात ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. काय झालें तें झालें—मुकाट्यानें आतां तें कबूल करून प्रायश्चित्त घेऊन मोकळें व्हावें व पुनः असें न करण्याविषयीं कानाला खडा लाऊन घ्यावा. हाच मार्ग या वेळीं श्रेयस्कर आहे. याचेंच आमच्या लोकांनीं अवलंबन केलें पाहिजे. पण याच्या उलट प्रकार आढळतो. जे लोक केलेलें पाप कबूल करीत नाहींत व अशा रीतीनें पापाशीं आपली जडलेली गट्टी व्यक्त करून दाखवितात—त्यांची उलट पाठ थोपटली जाऊन ज्या ग्राज्वेट व इतर लोकांनीं लाचारमुळें आपल्या हातून वडलेल्या पापांचें प्रायश्चित्त भोगण्यास तयारी दाखविली आहे त्यांची टर उडविण्यांत येते ! वाः ! कोणत्या तऱ्हेची ही नीति ? इकडे न्याय पाहिजे म्हणून मोठी ओरड करावयाची आणि दुसरीकडून न्यायाच्या कामाला अशा रीतीनें व्यत्यय आणावयाचा ! असो; अशा लोकांशीं आम्हांस काहीं करावयाचें नाहीं. परंतु त्यांना म्हणून न्यायाची व नीतीची चाड असेल त्यांनीं यावेळीं खुशालपणें आपल्यास माहीत असलेली अगर आपल्या हातून घडलेली खरी हकीकत सांगून मोकळें व्हावें हेंच आम्हांस सर्वतोपरि इष्ट दिसतें.

× × × × ×

* काफर्ड प्रकरणाचा शेवट

क्राफर्ड प्रकरणावर स्टेटसेक्रेटरीकडून आलेल्या ठरावाचें भाषांतर दुसरीकडे छापलें आहे. त्यावरून या प्रकरणाचा निकाल कसा झाला तें दिसून येईल. तारेंतून बातमी आल्याबरहुकूम हा निकाल क्राफर्ड साहेबांस प्रतिकूल आहे खरा; पण त्या प्रतिकूलत्वाचा अर्थ आमच्या गेल्या अंकांत एका लेखकानें जसा केला तसा मात्र नाहीं. क्राफर्डसाहेबांवर जे दोन आरोप होते,—एक लांचाचा व दुसरा आपल्या ताब्यांतील लोकांपासून कर्ज काढल्याचा—त्यांपैकीं पहिल्याची शाबिती झाली नाहीं, असा कमिशनानें आपला अभिप्राय दिला तोच स्टेट सेक्रेटरींनीं मुकाट्यानें कबूल केला. दुसऱ्या अपराधाविषयीं कमिशनानें जें कांहीं म्हटलें होतें तेंच घेऊन त्या अपराधाची क्राफर्डसाहेबांवर शाबिती झाली असें मानून स्टेट सेक्रेटरींनीं क्राफर्डसाहेबांस अशी शिक्षा केली आहे कीं, त्यांचें नांव सिविलसर्वंटांच्या यादींतून काढून टाकावें. क्राफर्डसाहेबांस नोकरीवरून कायमचें दूर करण्यांत आलें; इतक्या दिवसांच्या त्यांच्या नोकरीवर पाणी पडलें; त्यांचें पेन्शन बुडालें; आजपर्यंत ज्यांनीं सरकारची चाकरी फार फार शहाणपणानें केली; ज्यांच्या हातून शेंकडों सुधारणेचीं व लोकसोयीचीं कामें झालीं; ज्यांच्या लेखन कौशल्याच्या योगें चांगली चांगली विद्वान् कामदार मंडळी देखील चूकून जात; नेटिवांच्या उन्नतीविषयीं जे नेहमीं कळकळ दाखवीत; स्थानिक स्वराज्याचा पाया मजबूत करण्यासाठीं ज्यांनीं सार्वजनिक सभेला मदत केली व एके वेळीं तिच्यावर असणारा बदमाषपणाचा घाणेरडा आरोप केवळ निराधार आहे असें ज्यांनीं आपल्या वर्तनानें सिद्ध करून दाखविलें; कित्येक गरीबगुरीबांचीं इनामें वगैरे अन्यायानें खालसा झालेलीं ज्यांनीं आपल्या कुशल लेखणीनें सरकारची खात्री करून परत देवविलीं; सारांश, ज्यांनीं या महाराष्ट्र व कानडा प्रांतांतील प्रजेंतील लोकांवर निरनिराळ्या रूपानें नानाप्रसंगीं अत्यंत महत्त्वाचे असे उपकार केले त्या बहादर क्राफर्डसाहेबांवर गुजरलेला प्रसंग पाहून कोणाहि सहृदय वाचकांस वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं—पण वाईट वाटून काय उपयोग? ज्याचें जसें कर्म तसें त्याला फळ मिळालें यांत वाईट तें काय झालें? केवळ विकारवश होऊन या ठरावाचा अगर क्राफर्डसाहेबांच्या स्थितीचा विचार करून उपयोग नाहीं. क्राफर्डसाहेब मोठे उदार, कार्यकर्ते, धूर्त, स्नेहास चांगले, कळवळा बाळगणारे असे होते खरे; त्यांच्या अवाढव्य खर्चामुळें त्यांच्या पाशीं आतां फुटकी कवडी देखील राहिली नाहीं. शिवाय डोक्यावर कर्जाचा बोजा आहे तो आहेच.

---

* [केसरी—ता. २३ एप्रिल १८८९]

अशा स्थितींत पेन्शनानें कांहीं मदत व्हावयाची तर तेंहि नाहीं. त्यांचें पुढचें आयुष्य फार कष्टमय स्थितींत जाईल हें उघड दिसतें व याबद्दल मनाला जरा खेद वाटावा हेंहि स्वाभाविकच आहे; पण न्यायदेवता यावेळीं जागृत राहिली, आड मार्गानें कां होईना, तिचा पक्ष विजयी झाला—याबद्दल आपल्याला विशेष आनंद मानला पाहिजे. क्राफर्डसाहेब काय, चार दिवसांचे सोबती. न्यायदेवतेची व आपली जन्माची गांठ. तिचा अंमल जसजसा बसत जाईल तसतसा आपल्या उन्नतीस जोर येईल. तेव्हां दुःख विसरून न्यायदेवतेच्या नांवानें जयजयकार करावा हेंच उचित आहे.

पण या प्रकरणांत न्याय जसा व ज्या रीतीनें व्हावयाला पाहिजे होता तसा झाला नाहीं. जो मुद्दा शाबीत व्हावयाचा तो नाशाबीत आणि जो शाबीत करण्याची जरूर नव्हती—कारण आरोपीस तो कबूलच होता—त्याची शाबिती, आणि शिक्षा विशेष कडक, याप्रमाणें प्रकार झाला आहे. मूळ कमिशनपुढें जेव्हां चवकशी झाली तेव्हां विशेष वजन लांचाच्या आरोपाला देण्यांत आलें होतें. आणि केव्हांहि झालें तरी कर्जापेक्षां लांचाला विशेष महत्त्व मिळणारच. आतां क्राफर्डसाहेबांच्या कर्जाचें मान व स्वरूप वेगळ्या प्रकारचें होतें; तथापि दोन्ही आरोपांपैकीं विशेष घाणेरडा असा लांचाचाच मानला गेला हें स्वाभाविक आहे. कर्ज काढणाराचें मन वाईट असलेंच पाहिजे असा नियम नाहीं. कित्येकदां चांगल्या गुणांनींच कर्ज काढण्याचा प्रसंग येतो. आणि कित्येक कर्जबाजारी कामदार सरळ मार्गानें न्यायाला भिऊन वागणारे आपल्याला आढळतात. क्राफर्डसाहेबांच्या विरुद्ध जो मोठा पुकारा झाला होता तो त्यांचा कर्जाच्या संबंधानें नव्हता. क्राफर्डसाहेबांनीं दोन तीन वर्षांच्या मुदतींत दीड लाख रुपये कर्ज काढल्याचें कमिशनास आढळून आलें व त्यांस त्याबद्दल थोडा चमत्कार वाटला; पण लोकांना याहूनहि मोठा चमत्कार तेव्हां वाटला कीं, ज्यावेळीं क्राफर्डसाहेब या भागांत आल्यावर थोडक्याच दिवसांनीं त्यांनीं एक महिन्यांत रुपये १४,००० गरजू लोकांकडून बुचाडल्याचा पुकारा झाला. पुढचेंहि मान लोकवार्तेंत तरी याहून कमी होतें असें नाहीं. दक्षिणभाग इतका श्रीमंत पण त्यालाहि आमच्या भागानें मागें हटविलें असे उद्गार निघालेले आम्हीं ऐकले आहेत. ज्यांनीं लांच द्यावा त्यांनीं तो व्यवहार गुप्त ठेवण्याविषयीं बिलकुल पर्वा करूं नये. अशा प्रकारची स्थिति असतां कमिशननें दिलेला अभिप्राय पाहून लोकांस हसूं आल्याशिवाय राहणार नाहीं. केवळ कमिशनपुढें आलेला पुरावा घेतला तरी तेवढ्यावरून मि. क्राफर्ड यांनीं लांच खाल्ला असावा अशी खात्री झालीच पाहिजे. कमिशनर विद्वान्, न्यायाच्या कामांत वाकब व निःपक्षपाती होते असें आम्ही कबूल करितों. पण कमिशनरचा अधिकार किती, इकडील मामलेदार वगैरे लोकांची अधिकारशून्यता, कमिशनपुढें आलेल्या साक्षीदारांपैकीं

कांहींची तरी आजपर्यंतची वर्तणूक, खुद्द मि. क्राफर्ड यांची आजपर्यंतची हकीकत-इत्यादि गोष्टी त्यांना माहीत असण्याचा संभव नव्हता. वास्तविक रीत्या त्या माहीत असणें न्यायाच्या कामास अत्यंत जरूर होतें. त्यांनीं अशा प्रकारची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे. ही माहिती त्यांना असती तर त्यांनीं कधींच असें म्हटलें नसतें कीं, क्राफर्डसाहेबांच्या पूर्वींच्या योग्यतेकडे पाहतां व हल्लींच्या हुद्याचा विचार करतां अतोनात कर्ज काढणें व प्रत्यक्ष लांच घेणें या दोन गोष्टींतील अंतर त्यांच्या लक्षांत असावें असें मानावें लागतें. क्राफर्डची पूर्वींची योग्यता कमिशनरांना काय माहीत होती. मागें एका बड्या गोऱ्या अमलदाराच्या स्त्रीविषयीं क्राफर्डसाहेबांवर कसला आरोप आला होता अगर मुंबईहून स्वारीनें कित्येक गोऱ्या व काळ्या मित्रांच्या साहाय्यानें कसा पळ काढला इत्यादि गोष्टी कमिशनानें ध्यांनीं आणल्या होत्या काय ? कां गोरी कातडी हीच सद्गुणांची साक्ष आणि काळी कातडी हाच अविश्वासाचा आधार ? असो; वर लिहिलेल्या कारणामुळें कमिशनानें या मुद्यावर दिलेल्या अभिप्रायास गौणत्व येतें व त्यांची स्वतःची योग्यता कितीहि मोठी असली तरी त्यांचें मत ग्राह्यच समजलें पाहिजे असें नाहीं.

मुंबईसरकारानें तरी याच धोरणानें या साऱ्या खटल्याचा नीट विचार करून व आपल्यापाशीं असलेल्या अवांतर माहितीवरून-जी माहिती पुढें येऊं देण्याचें कमिशनानें नाकारलें—कमिशनचा रिपोर्ट खोडून काढला व क्राफर्डसाहेब दोषी आहेत असें दाखविलें. स्टेट सेक्रेटरींनीं देखील हाच रस्ता धरला असता तर बावगें झालें नसतें. दोन्ही डगरीवर हात ठेवण्याचा त्यांनीं जो प्रकार केला आहे तो आमच्या मतें न्यायास घातक आहे. कमिशनाचा अभिप्राय आपण उलथा पाडूं इच्छित नाहीं असें त्यांनीं म्हटलें आहे; पण दुसरें असेंहि सुचविलें आहे कीं, छापील कागदपत्रावरून आपला अभिप्राय कदाचित् निराळा झाला असता. अर्थात् कमिशनाच्या अभिप्रायास कागदपत्री पुराव्याखेरीज दुसरा कांहीं आधार असला पाहिजे. तो आधार नेटिव लोक सारे खोडसाळ या महातत्त्वाचा तर नसेलना ? स्टेट सेक्रेटरींनीं असें मौग्ध्य न ठेवितां आपला अभिप्राय स्पष्टपणें सांगितला असता तर त्यांच्या न्यायीपणाची व मानसिक धैर्याची लोकांनीं तारीफ केली असती. आतां इतकें खरें आहे कीं, क्राफर्डसाहेबांच्या कर्जाचा विचार करितां असें दिसतें कीं, त्यांच्या कर्जाचें स्वरूप, कर्जाच्या नेहमींच्या स्वरूपाहून वेगळें होतें. एकतर हे मोठे अधिकारी—यांनीं अशा प्रकारें लोकांच्या कह्यांत राहावें हें उचित नाहीं. दुसरें असें कीं हें अवाढव्य कर्ज फेडण्याचा त्यांस कांहीं मार्ग होता काय ? त्यांचा पगार बहुतेक मागील कर्जाच्या फेडीसाठीं व विलायतेस त्यांच्या पत्नीस रुपये पोंचविण्यासाठीं खाऊन दिलेला असे. काय त्या पांचसातशें रुपड्याच यांजपाशीं राहत होत्या.

येवढ्यांतच हें कर्ज फेडतां आलें असतें काय ? एक तर अन्य तऱ्हेनें पैसे मिळवून हें कर्ज फेडावयाचें असा त्यांचा विचार असेल; अगर काय होईल तें होवो त्याचा विचारच करावयाचा नाहीं, आपला 'स्वहिताचा धंदा' चालवावयाचा व प्रसंग आल्यास मागच्याप्रमाणें विलायतचा मार्ग सुधारावयाचा असें त्यांच्या मनांत असेल, यांपैकीं कोणताहि विचार असला तरी तो त्यांच्या नैतिक योग्यतेस घातकच होय. शिवाय या कर्जामुळेंच हणमंतरावाला त्यांनीं जवळ केला व त्याच्या नीतीचें मातेरें केलें. या तिन्ही कारणांवरून कर्जाच्या संबंधानें देखील क्राफर्डसाहेब महादोषी ठरतात व झालेल्या शिक्षेस पूर्ण पात्र आहेत असें म्हणावें लागतें. त्यांच्या संबंधानें अन्याय झाला नाहीं; त्यांच्या कर्माचें त्यांस फळ मिळालें, (—पण बिचाऱ्या हणमंतरावाहून किती वेगळ्या प्रकारचें ?) मात्र मुख्य गुन्ह्यासंबंधानें न्याय न झाल्यानें बिचाऱ्या लांच देणाऱ्या लोकांच्या तोंडांस दुहेरी काळोखी लागली. असो; त्यांचा न्याय लॉर्ड रे यांच्या हातांत आहे. ते त्यांना व्यर्थ मारणार नाहींत अशी आमची खातरी आहे.

\+ \+ \+ \+ \+

* नेटिव कामदारांची नीतिमत्ता

क्राफर्ड प्रकरणाचा निकाल झाला व त्याचें शेंपूटहि लवकरच लयास जाईल. परंतु आंत सांपडलेल्या मामलेदारांची वाट काय असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. मुंबई इलाख्याच्या दोनतृतियांश भागावर नबाबाप्रमाणें ज्यानें आपली कमिशनरी गाजविली त्याचें नांव कांहीं वर्षांनीं फक्त मार्केटावशेषच होऊन राहील पण नेटिव ऑफिसरांच्या सदाचारबुद्धीविषयीं जर कांहीं संशय असला तर तो मात्र आमच्या राज्यकर्त्यांच्या स्मरणांतून कधींहि जावयाचा नाहीं. करितां या कामदारांच्या वर्तणुकीबद्दल विशेष चर्चा होणें जरूर आहे. क्राफर्ड प्रकरणास, सुरुवात झाल्यापासूनच विलायतच्या 'मेघनादा' पासून तों एतद्देशीय सामान्य इंग्रजापर्यंत सर्वांचा या नेटिव कामदारांच्या नांवें एकसारखा ध्वनि सुरू आहे. कोणी म्हणतो कीं या लबाड लोकांनींच क्राफर्डसाहेबांस लांच खाण्याची संवय लावली, कोणाच्या मतें हें सर्व मतलबी ब्राह्मणांचेंच काहूर आहे, व क्राफर्डसाहेब धुतल्या हिऱ्याप्रमाणें अगदीं निर्मळ आहेत. कमिशनरांनीं तर उघड उघड बहुतेक ठिकाणीं 'खोडसाळ, पाजी, व आग्रही' ब्राह्मणांपेक्षां भर कोर्टांत शपथेवर नाकबूल जाणाऱ्या, नखशिखांत कर्जांमध्यें बुडालेल्या क्राफर्डावरच जास्त

* [केसरी—ता. ७ मे १८८९]

भरंवसा ठेविला आहे. गरीब बिचारे मामलेदार करितात काय ?. मुंबई सरकारच्या वचनावर भरंवसा ठेवून अपमान व अपकीर्तीची परवा न धरतां सत्य सांगण्यास तयार झाले, तों तिकडूनहि त्यांच्यावर भडिमार सुरू आहेच. हे निलाजरे, लांचभरू, कबूलजबाबी मामलेदार आतां नोकरीस अगदीं नालायक आहेत असा हायकोर्टाच्या कांहीं जजांनींहि अभिप्राय दिला. पण सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं जरा खैर केली म्हणून या कामदारांस थोडेसें आश्वासन आलें. तत्रापि अजून कांहीं निवडानिवडीचा प्रकार चालू आहे असें म्हणतात. सरकारानें पूर्ण अभिवचन दिलें असून ही निवडानिवड कोणत्या धोरणानें चालली आहे हें समजत नाहीं. तथापि अशी निवडानिवड करण्यापूर्वी सरकारनें एकंदर नेटिव कामदारांच्या वर्तनाबद्दल कायम विचार ठरवून मग या भानगडींत पडावें हें आम्हांस बरें दिसतें. शिवाय वेस्टसाहेब म्हणतात त्याप्रमाणें कांहीं झालें तरी खालच्या प्रतीची नोकरी नेटिवांच्या हातून जर सरकारास घेणें आहे तर त्याहि दृष्टीनें या प्रश्नाचा अगोदर विचार होणें जरूर आहे. सर्वच नेटिव जर लबाड व पाजी ठरले तर मग त्यांत " काळे गोरे " यांची निवड करण्याची खटपट तरी कशास पाहिजे ?

हें प्रकरण उपस्थित झालें त्यावेळीं या कामदारांबद्दल आम्हीं असें लिहिलें होतें कीं त्यांच्या हातून जो प्रकार घडला तो—

विकार हेतौ सतिविक्रियंते येषां न चेतांसि त एव धीराः ॥

या वचनाप्रमाणें यांच्या अंगीं धैर्याचा भाग कमी असल्यामुळें घडला असावा. आतां सर्व खटल्याची हकीकत ऐकून मुंबई सरकारचें मतहि बऱ्याच अंशीं त्याचप्रमाणें झालें आहे हें पाहून आम्हांस आनंद वाटतो. आमच्यांतही क्राफर्डसाहेबाप्रमाणें सगळ्या वर्गांस काळोखी आणणारीं कृत्यें करणारे कांहीं लोक नसतील असें आम्ही म्हणत नाहीं. गांव आहे तेथें म्हारवडा असावयाचाच. पण तेवढ्यावरूनच नेटिव लोकांत स्वभावतःच कांहीं विशेष नीचपणा किंवा पाजीपणा आहे असें मानण्यास कारण दिसत नाहीं. वेस्टसाहेबांस म्हणजे मुंबई सरकारास ही गोष्ट मान्य आहे. तथापि त्यांचें असें म्हणणें आहे कीं एक वरिष्ठ कामगार अन्यायी निघाल्यामुळें सारें खातेंच्या खातें अनीतिमान् झालें, याचें बीज ब्राह्मण कामदारांच्या स्वभावांतच आहे. दक्षणी ब्राह्मण धूर्त व हुशार असतो खरा पण त्याबरोबरच धैर्य, साहस, वगैरे आवश्यक गुणांचा त्यांच्या अंगीं जात्याच अभाव असल्यामुळें स्वतः जरी त्याची अन्यायाकडे प्रवृत्ति नसली तरी वरिष्ठ कामदाराच्या गुणावगुणाची त्याजवर तेव्हांच छाया पडते, व तो अन्यायाचे मार्गानें जाण्यासहि कबूल होतो. कमिशनपुढें झालेल्या या कामदारांच्या साक्षींतील चलबिचलहि त्याच कारणाकरितां होय. ब्राह्मण कामगार म्हटला म्हणजे संशयी असावयाचा

व त्यामुळें त्याचें बोलणें कधींहि ठांसून यावयाचें नाहीं. इकडील नेटिव कामगारांचा हा स्वभाव कमिशनरांस ठाऊक असला तर त्यांनीं हे साक्षीदार वेभरंवशाचे ठरविले नसते असें वेस्टसाहेबांचें मत आहे.

मुंबई सरकारचें हें मत बऱ्याच अंशीं सत्यास व वस्तुस्थितीस अनुसरून आहे. लांचभरू मामलेदारांपैकीं स्वतः अन्यायाचें मार्गानें जाणारे थोडेच आहेत हें खरें, तथापि यांच्या अंगीं जास्त धैर्य असतें तर ही गोष्ट इतक्या विकोपास गेली नसती किंवा हिचा मागेंच निकाल लागता हीहि गोष्ट कबूल केली पाहिजे. परंतु वेस्टसाहेबांनीं नेटिवांचा स्वभावच भ्याड व संशयी म्हणून जें ठरविलें आहे तें मात्र आम्हांस कबूल नाहीं. ब्राह्मणांचा व विशेषतः दक्षिणी ब्राह्मणांचा इतिहास पाहतां त्याजवरून त्यांच्या अंगीं भित्रेपणा व संशयीपणा हे दुर्गुण स्वभावतःच असतात असें कधींहि म्हणतां येणार नाहीं. उलट धैर्य, साहस, आणि निस्पृहता या गुणांनीं उदयास आलेल्या लोकांची पुष्कळ ऐतिहासिक उदाहरणें देतां येतील. हल्लींच्या प्रकरणीं त्या गुणांचा पूर्ण अभाव नसला तरी पुष्कळ अंशीं अभावच नजरेस येतो ही गोष्ट खरी आहे. पण वेस्टसाहेब म्हणतात त्यापेक्षां त्याचीं कारणें फार निराळीं आहेत. आमचें असें मत आहे कीं तरवारीच्या जोरावर राज्य करणाऱ्या परकीय प्रभूंच्या अमलाखालीं व्यक्तीच्या स्वभाववैचित्र्यास स्वातंत्र्यास आतां पूर्वीप्रमाणें अवकाश राहिला नाहीं. उत्साह, ओज, साहस, योजना, वगैरे गुणांची. जेथें जेथें जरूर आहे त्या सर्व जागा राज्यकर्त्यांनीं आपल्या हातीं ठेवून आम्हांस त्यांच्या हुकमतीखालीं केवळ मानवी यंत्रें बनविलीं आहेत. अशा स्थितींत कोणत्या तरी राष्ट्रांतील लोक धैर्यादिगुणसंपन्न राहतील काय ? मुलकी किंवा लष्करी कोणतेंहि खातें घ्या. त्यांतील वरिष्ठ प्रतीच्या म्हणजे हुकमतीच्या जागेवर आमच्या नेटिवांपैकीं कितीसे लोक आहेत ? एकाद दुसरा आणि तोहि आर्जव व खुशामतीच्या जोरानें वर चढलेला; आणि तीच इकडे इंग्रजी अम्मलदारांची स्थिति पहा. वारंट निघून पळून गेला असतांहि तो पुनः कमिशनर होतो ! सारांश हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत नेटिव लोकांचा अधिकार मर्यादितच ठेविल्यामुळें त्यांत आमच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा इतका चुराडा होतो कीं खालच्या प्रतींतील पहिल्या नंबरच्या जागेस रावसाहेब लायख होईपर्यंत त्यांची अगदीं गुळगाबडो होऊन जाते. हीं माणसें हुषार व लायख नसतात किंवा सरकारास हुषार माणसें नको असतात असें नाहीं. पण ज्याअर्थीं वरच्या प्रतीच्या म्हणजे युरोपियन नोकरांना खालच्या म्हणजे नेटिव नोकरांच्या बुद्धीचा किंवा हुषारीचा किंवा धैर्याचा शिरजोरपणा कधींहि खपत नाहीं त्या अर्थीं हुषार असून जोहुकूम म्हणणारेच नेटिव सरकारी नोकरींत प्रायः उदयास येतात. युरोपियन कामदारापुढें आम्हांस एकतर आपलें स्वातंत्र्य व हुषारी गुंडाळून ठेवावी लागते नाहींतर भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणेः—



मौनान्मूकः प्रवचनपटुर्वातुलो जल्पको वा
क्षांत्या भीरुर्यदि न सहते प्रायशो नाभिजातः ।
धृष्टः पार्श्वे वसति नियतं दूरतश्चाप्रगल्भः
सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ॥

असें म्हणण्याची पाळी येते. आमच्यावर कोणाचाहि कधीं पूर्ण विश्वास नसतो तेव्हां अर्थातच क्राफर्ड साहेब लांच खातात असें आपणच प्रथम सांगण्यांचीहि चोरी व अभयवचन दिलें तरी मागाहून सर्व खरा प्रकार साफ सांगण्यांचीहि चोरीच ! अशी स्थिति असल्यावर जो वरिष्ठ येईल त्याप्रमाणेंच आम्ही बनल्यास त्यांत आमचा तरी काय दोष ? हल्लींची राज्यव्यवस्थाच अशी आहे कीं त्यांत व्यक्तिस्वातंत्र्य गुंडाळून ठेवणारींच माणसें पुढें यावयाचीं. मनुष्य सालस असल्यास यापलीकडे तो फारसा जातच नाहीं, पण त्यांतहि जर मग शारीरिक तरतरी असली तर मग वाममार्गांतील " पंच प्रकारां " पैकीं यथाशक्ति दोहोंचें, तिहींचें किंवा चोहोंचें सेवन सुरू होतें ! तात्पर्य व्यक्तिस्वातंत्र्याचा फारसा अभिमान नसून जे हुषार किंवा तरतरीत आहेत त्यांचीच हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत विशेष चहा आहे. याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि गुणांकडे किंवा अवगुणांकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचें लक्ष नसतें व म्हणूनच दोन तीन ' म ' कारवालेहि त्यांचे स्नेही असूं शकतात. असल्या हुषार हुकूम बजावणाऱ्यांत धैर्यसाहसादि गुण कोठून यावे बरें ? वेस्टसाहेब म्हणतात त्याप्रमाणेंच चांगल्या व्यवस्थेखालीं हे गुण नजरेस येतील, पण ती व्यवस्था करणें म्हणजे आज केवढी उलाढाल करावी लागणार ? ती करावी कोणी व करण्याची इच्छा तरी कोणाची आहे ?

असो. हा थोरला प्रश्न जरी एकीकडे ठेविला तरी नेटिव मामलेदार जात्या निरपराधी असून धैर्य व साहस इत्यादि गुणांच्या अभावामुळें त्यांच्या हातून ही कृती घडली ही गोष्ट जशी सरकारास तशी आम्हांसहि मान्य आहे. आतां त्यांतहि जो निवडानिवडीचा प्रकार चालविला आहे तो कशाला ? वेस्ट साहेब स्वतःच कबूल करतात कीं खुषीनें व नाखुषीनें पैसे देणाऱ्यांत विशेषसा भेद नाहीं व त्या सगळ्यांस दिलेलें अभिवचन सरकारास सारखेंच पाळिलें पाहिजे. शिवाय दुसरी हीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं प्रत्येक खटल्याची या दृष्टीनें तपासणी करण्यापुरता सरकाराजवळ पुरावाहि नाहीं व तो मिळेल कीं नाहीं यार्चाहि शंकाच आहे. तेव्हां अगदीं उघड वाईट खटले असतील तेवढे सोडून बाकी या निवडानिवडीच्या भानगडींत न पाडतां वेस्ट साहेब म्हणतात त्याप्रमाणें नेटिव लोकांच्या अंगीं जे गुण नाहींत, किंवा सध्यां दृष्टीस येत नाहींत ते उदयास आणण्यासारखी राज्यव्यवस्था प्रचारांत आणण्यास सरकारानें झटावें हेंच त्यांस योग्य आहे. नेटिव

लोक जाल्या कांहीं अनीतिमान नाहींत. परंतु त्यांच्या अंगचे गुण उदयास येण्यास त्यांस आहे याहून वरची पदवी आली पाहिजे.

× × × × × ×

*हाच न्याय काय ?

सर्वशक्ति देवाला व्याघ्रादि हिंस्र पशूंचा बलि आवडत नाहीं. गरीब बिचाऱ्या निरुपद्रवी कोंबड्याबकऱ्यांचा बलिच त्याला प्रिय वाटतो व या समजुतीनें या आपल्या देशांत हजारों मुक्या व दुबळ्या जनावरांचे देवांच्या नांवानें प्राण हरले जात आहेत. त्याप्रमाणेंच आमच्या मुंबई इलाख्यांत या एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुधारलेल्या व समंजस म्हणविणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या हातून प्रकार होऊं पहात आहे असें ऐकून आम्हांस फार वाईट वाटतें. सरकार जें अन्यायाचें व अनीतिचें कृत्य करूं पाहत आहे तें आमच्या देशी बांधवांच्या सूचनांच्या जोरावर करूं पाहत आहे हें पाहून तर आम्हांस विशेष वाईट वाटतें.

शिकार धरली असावी वाघाची पण ती अंशतः हातची निसटली म्हणजे शिकारी जसा संतापून जातो व आपण काय करतों काय नाहीं याचें त्यालाच भान राहत नाहीं, त्याप्रमाणेंच क्राफर्ड प्रकरणांत स्टेट सेक्रेटरीचा निकाल आल्यापासून मुंबईसरकारास झालें आहे असें कुत्सित लोक बोलतात; पण यांत तथ्य असेल असें वाटत नाहीं. मात्र मामलेदार वगैरे लोकांच्या संबंधानें सरकारचें जें धरसोडीचें वर्तन आहे तें अशा प्रकारच्या कंड्या पिकविणारांस चांगलें साहाय्य करतें असें कोणाहि समंजस मनुष्यास कबूल करावें लागेल. आज इतकीं वर्षें अव्याहतपणें रयत आणि सरकार यांना न पुसतां बेधडक उघडपणें ज्या अनीतिमान पुरुषानें आपल्या अधिकाराचा व हुकुमाचा उघड विक्रय चालविला होता, ज्याला पकडण्यासाठीं मूळ सरकारानें मामलेदार वगैरे लोकांस जवळ बोलावून, त्यांस आश्वासून त्यांच्या तोंडांतून सारी हकीकत वदविली, तो क्राफर्ड बहादर सरकारी नोकरींतून अब्रूचें थोडेंसें शेवट हातीं धरून बाहेर पडला; आणि ज्या लोकांच्या मदतीखेरीज सरकारास हें प्रकरण मुळीं हातींच धरतां आलें नसतें, ज्यांनीं सरकारच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवून आपल्याला कशाचेंहि भय उरलें नाहीं असें मानून आपल्या गळ्यास फास लावणारे शब्द उच्चारण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, त्या मामलेदार लोकांस त्याच त्यांच्या तोंडच्या शब्दाच्या आधारावर, आपल्या आश्वासनास जरा मागें ठेवून, सरकार दंडूं पाहत आहे हें ऐकून

* [केसरी—ता. २१ मे १८८९]

आम्हांस फार खेद होतो. आम्हांस त्या फसलेल्या कामदारांची कींव येते व तितकाच सरकारच्या आरोपित हेतूबद्दल त्वेषहि येतो.

जुने लोक आम्हांस नेहमीं उपदेश करीत असतात कीं बाबांनो, या इंग्रजी थाटमाटाला आणि अघळपघळ सुंदर शब्दांनीं व सदुक्तींनीं भरलेल्या वचनास तुम्ही भुलूं नका. 'उप्पर तो खूप बन रही है, अंदरकी बात राम जाने' याप्रमाणें येथें कृतीमध्यें आणि उक्तीमध्यें ज़मीन-अस्मानचें अंतर असावयाचें. यांच्याशीं चागणें तें लबाडचिें व धूर्ततेचें असलें पाहिजे. राजे आणि प्रजा परस्पर भिन्न वर्णाचीं, धर्माचीं आणि नीतीचीं असलीं कीं तेथें असा प्रकार असावयाचाच हें राज्यनीतिचें पहिलें प्रत्यक्ष प्रमाण आहे. या क्राफर्ड प्रकरणांत शेवटीं तुम्हांला आमच्या वचनाचा प्रत्यय येईल. तो गोरा, सरकार गोरें, येथें नाहीं विलायतेंत कोठें तरी कोणी तरी त्याचा पाठिंबा उभा राहून त्यास सोडवून घेईल. मग या तुमच्या साक्षीदार मंडळीवर क्राफर्डसाहेबांचे सजातीय स्नेही ताव उगवून घेण्यास कधींहि संकोचणार नाहींत. या लोकांनीं तोंडांतून ब्र काढला नाहीं तर सरकार यांचें काय घेणार व यांना कोणत्या सबबीनें त्रास देणार ? सरकारास क्राफर्डचें काहीं करावयाचें असेल तर खुशाल करूं दे. दोघेहि समान योद्धे आहेत. आपण मध्यें शिरल्यानें फुकाचे मधल्यामध्यें चिरडून जाऊं. आम्हांस ही विचारसरणी बिलकूल पसंत पडली नाहीं. आम्ही तरण्या दमाचे. आमचीं मतें या जगांतील घाणेरड्या व विपरितपरिणामी अनुभवानें गढूळ झालीं नाहींत. आमची 'सत्यमेव जयते' या तत्त्वावर फार भिस्त. अखेरीस न्यायाचीच सरशी व्हावयाची असा आमच्या मनाचा पक्का दृढनिश्चय. या महान् तत्त्वावर आमचा भरंवसा विशेष खंबीर रीतीनें बसण्यास कारण लॉर्ड रे यांच्या अंगचे अलौकिक गुण हे झाले. त्यांनीं आजपर्यंत नेटिव व युरोपियन यांच्यांत असमता ठेविली नाहीं, आपल्या अगोदर गव्हर्नर पद भोगून गेलेल्या पुरुषांप्रमाणें त्यांनीं हें प्रकरण आंतल्याआंत विझविण्याचा प्रयत्न केला नाहीं, जननिंदेला [आणि तीहि स्वकीयांनींच केलेली] न जुमानतां त्यांनीं हातीं धरलेलें काम शेवटास नेण्याचा दृढ व न ढळणारा निश्चय, त्यांनीं आजपर्यंत केलेलीं कृत्यें, हीं सर्व आम्हांस आश्वासणारीं झालीं. यांच्यापुढें सत्य सांगणारांस कशाचेंहि भय नाहीं असा आमचा भाव दृढ झाला, आणि त्यांतून सरकारानें आपण होऊन या मामलेदार वगैरे लोकांस आश्वासन दिलें कीं, तुमच्यावर खटला केला जाणार नाहीं अगर सरकारी नात्यानें तुम्हांस शिक्षा होणार नाहीं, अगर तुमचें नुकसान व्हावयाचें नाहीं. यास फक्त एकच अट होती. ती ही कीं, त्यांनीं सत्य सांगितलें पाहिजे. ही अट मामलेदार लोकांनीं पाळली आहे. खुद्द सर रेमंडवेस्ट यांचें असें म्हणणें आहे कीं, बुद्धिपुरःसर खोटें सांगून अगर कांहीं छपवाछपव करून या लोकांनीं आपल्यास मिळालेल्या आश्वासनाचा हक्क घालविला असें मानण्यास आधार नाहीं.

मग आतां या मामलेदारांच्या एका केंसासहि धक्का लावण्याचा अधिकार सरकारास पोंचत नाहीं. ज्या अटीवर सरकारानें त्यांना मुक्तीचा मार्ग खुला ठेविला ती अट त्यांनीं पाळली असें एका अनुभवी, न्यायकर्मकुशल, विद्वान्, नेटिव लोकांचीं मनें जाणणाऱ्या कौन्सिलरचें मत आहे. आतां या मामलेदारांच्या संबंधानें ढवळाढवळ करण्यापासून सरकारची अपकीर्ति मात्र होईल. वचन मोडल्याचें सरकारास फारसें वाईट वाटणार नाहीं; कारण याहि पेक्षां अधिक महत्त्वाचीं वचनें सार्वभौम सरकारांकडून कोठें पाळलीं जातात ? पण सरकार न्यायी आहे, न्यायाच्या कामीं कोणाची भीडमुर्वत धरली जात नाहीं, हा सरकारचा लौकिक हल्लींच्या त्यांच्या कृतीनें कितपत राहील याची आम्हांला मोठी शंका आहे. शुद्ध दांडगाईनें खोटें बोलणारा व धडधडीत पाप करणारा ठरतो निर्दोषी—आणि ज्यांनीं धर्माला भिऊन व सत्याला जाणून खरी हकीकत सांगितली त्यांची होणार अप्रतिष्ठा! याचा सरकारानें पूर्ण विचार केला आहे काय कीं, या मामलेदारांत निवडानिवड करूं पाहणें फार कठीण व नाजूक काम आहे. ज्यांनीं कबूल केलें आहे त्यांच्यांतच दोन प्रकार आहेत. कोणी म्हणतो माझ्यावर जुल्म झाल्यामुळें मला पैसे भरावे लागले; दुसरा म्हणतो साऱ्यांनींच जेव्हां पैसे देऊन कामें करून घेण्यास सुरुवात केली तेव्हां आपल्याहि मनांत आलें कीं द्यावे वाहत्या गंगेंत हात धुवून. कोणीं बढतीकरतां लांच दिला; कोणीं आपले हक्क संभाळण्यासाठींच पैशाचा भरणा केला. यांच्यांत कमी अधिक दोषाचें मान ठरवावयाचें कसें ? गव्हर्नर साहेबांच्या खालोखाल ज्याचा अधिकार, ज्याच्या सह्यावांचून मुलकी प्रकरणांत इकडचें पान तिकडे हलावयाचें नाहीं, ज्याचा कलेक्टरांवरसुद्धां मोठा दरारा अशा अधिकाऱ्यानें मनावर घेतल्यास व राज्यसूत्रें भित्र्या पुरुषाच्या हातीं असल्यास सारा प्रांत दुष्टच व घाणेरड्या प्रकारांनीं भरून जाईल यांत नवल नाहीं; व अशा स्थितींत असतां अधिकाराच्या भीतीनें एखादा पापकर्म करण्यास सहाय्य झाला अगर भोंवतालच्या अनुकूल स्थितीमुळें एकाद्याची पापबुद्धि जोर पावली तर त्याचा दोष त्या माणसांवर न देतां ज्यांनीं हा प्रकार घडूं दिला, ज्यांच्या हातीं तो बंद करण्याचें होतें, त्यांच्याच डोक्यावर अपयशाचें खापर फुटणें रास्त आहे. मागच्या गव्हर्नरांनीं डोळ्यांवर पांघरूण ओढलें नसतें तर इतक्या थराला ही गोष्ट आलीच नसती. या गोष्टीचाहि नीट विचार केल्याशिवाय मामलेदारांच्या प्रश्नाचा निकाल करणें सरळ व न्यायास अनुसरून होणार नाहीं.

अशी निवड करावयाची तरी अडचणच आहे. सर रेमंड वेस्ट यांनीं या प्रश्नाची वास्तविक मीमांसा केली आहे. ते म्हणतात कीं, ज्यांनीं आपण होऊन लांच दिला व ज्यांनीं जुल्मास्तव दिला या दोहोंतहि अंतर फारच थोडें आहे. लांचाचा प्रकार जारीनें चालू नसता तर पहिल्या प्रकारच्या लोकांनीं देखील लांच

दिला नसता. सारांश, जेथें सर्व हवा लांचमय झाली होती तेथें असे प्रकार घडल्याचा मोठासा विधिनिषेध नाहीं. हवा बिघडण्याचें बीज निघून गेलें तेव्हां यापुढें दक्षता ठेवण्यापलीकडे कांहीं राहिलें नाहीं. आणि ज्या मामलेदार लोकांनीं लांच दिल्याचें कबूल केलें आहे त्यांची अप्रतिष्ठा व त्यांचें नुकसान करून ज्यांनीं ती गोष्ट केली असूनहि कानावर हात ठेविले व ज्यांच्यावर ती शाबीद करण्यास पुरावा नाहीं अशांसच बढती द्यावयाची कीं नाहीं ? असें केल्यानें न्यायदेवतेस मोठें समाधान होईल नाहीं ? आणि इंग्रज सरकारच्या न्यायीपणाची पण लोक मोठी धन्यता गातील ? या मामलेदारांनीं लांच दिल्याचें कबूल केलें, यांचें आतां लोकांवर वजन बसावें कसें ? व यांच्या हातांतून न्याय व्हावा कसा ? असें विचारण्याची कित्येकांनीं पद्धत घातली आहे, त्यांस उलट असें दिचारावयाचें कीं, तुम्हांला लांच दिलेल्या पण सरकारपाशीं नाकबूल केलेल्या अशा लोकांनीं न्याय केलेला पसंत वाटतोना ? ज्यांनीं लांच दिला त्यांचीं नांवें ठाऊक नाहींत असें नाहीं; तथापि त्यांचें लोकांवर वजन असतें कीं नाहीं ? तें तुम्हांस मान्य आहेना ? कबूल झालेल्या मामलेदार लोकांचे अधिकार काढून घेणें अगर अन्य तऱ्हेनें त्यांस कमीपणा आणणें म्हणजे खऱ्याला शिक्षा आणि खोट्याला बक्षीस देणें असें होय. अशा प्रकारचा नीतीचा मासला जगास दाखविण्यास लॉर्ड रे तयार होतील काय ?

आणखी असें करण्यांत पूर्वापार विरोध कसा येतो पहा. या लोकांनीं क्राफर्डसाहेबांस लांच दिल्याचें सांगितलें. कमिशनानें ही मंडळी भरंवशालायक नाहीं असें म्हणून क्राफर्डसाहेबांस लांचाच्या आरोपापासून मुक्त केलें. स्टेटसेक्रेटरींनीं या मुद्यावर कमिशनचा अभिप्राय मान्य केला. मग तो मुंबई सरकारानेंहि मान्य करावयास कोणती हरकत आहे ? जर क्राफर्ड साहेबांस त्या मुद्यावर शिक्षा नाहीं तर मामलेदार लोकांस तरी कां ? आम्हांस असें वाटतें कीं, कोणत्याहि दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केला तरी सरकारानें दिलेल्या आश्वासनास धरून चालावें हेंच श्रेयस्कर आहे. असें जर सरकार करणार नाहीं तर त्यांचें वर्तन एकतर्फी, हेकेखोर अन्यायाचें, असेंच साऱ्या लोकांस वाटेल व आतांपर्यंत या क्राफर्ड प्रकरणासंबंधानें मुंबई सरकारानें इकडील लोकांत मिळविलेली मान्यता तें गमावील. आम्हीं अशी उमेद बाळगतों कीं लॉर्ड रे व त्यांचे सहकारी मुत्सद्दी इतक्या थराला ही गोष्ट येऊं देणार नाहींत.

* क्राफर्ड प्रकरणावरील आक्षेप

येथील प्रांतिकसभेवर टाइम्स ऑफ् इंडिया वर्तमानपत्रांतून जे आक्षेप आले आहेत ते वाचले म्हणजे दुरभिमानानें मनुष्य कोणीकडे वाहत जातें याची कल्पना करतां येते. राष्ट्रीयसभा व प्रांतिकसभा यांजबद्दल या इंग्रजी आन्हिकपत्रकारांचें मत पहिल्यापासूनच प्रतिकूल आहे. त्यांत आणखी क्राफर्ड प्रकरणाची भर पडल्यावर त्यांच्या रागास आणखी ऊत आला यांत कांहीं नवल नाहीं. क्राफर्ड प्रकरणाची चौकशी करण्याचे कामीं आणि सरकारी नोकरांमध्यें ज्या दुर्व्यसनाचा फैलाव झाला होता त्याचा बींमोड करण्याचे कामीं मुंबईसरकारनें जें वर्तन केलें तें लोकांस पसंत आहे व त्याबद्दल लोक त्यांचे फार आभारी आहेत असा गेल्या प्रांतिकसभेंत एक ठराव झाला आहे, परंतु अशा तऱ्हेचा ठराव क्राफर्डचे पक्षकार यांस मान्य नसल्यामुळें, त्यांनीं प्रांतिकसभा म्हणजे केवळ महाराष्ट्र ब्राह्मणांची सभा अशी हाकाटी करून वरील ठरावाचें व सभेचें मत कमी करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी सभेची खरी हकीकत समजून घेण्याची या इंग्रजी पत्रकारांनीं थोडी जरी मेहनत घेतली असती तर बरें झालें असतें. क्राफर्ड प्रकरणाचा सभेंत पसंत झालेला ठराव एक दोन व्यक्तींखेरीज सर्वांस पसंत होता ही गोष्ट टाइम्स पत्रकारास पूर्णपणें कळली आहे कीं नाहीं याची आम्हांस अद्याप शंकाच वाटते. त्यांचें असें म्हणणें आहे कीं पहिल्या दोन दिवशीं हा ठराच सभेपुढें येऊन नापसंत झाला होता व तो नापसंत करण्याचीं कारणेंहि सभेपुढें सयुक्तिक तऱ्हेनें मांडलीं गेलीं होतीं. परंतु वस्तुतः पाहतां या दोन्हीहि गोष्टी चुकीच्या आहेत. प्रांतिकसभेपुढें कोणचे विषय आणावे याचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमिली होती. त्या कमिटीपुढें क्राफर्ड प्रकरणाचा विषय प्रथमतः आला होता व त्या कमिटींत या विषयासंबंधीं सूचना नापसंत ठरली होती. एवढाच काय तो खरा प्रकार आहे. अशा तऱ्हेनें कमिटीनें नापसंत केलेले विषय थोरल्या सभेपुढें अध्यक्षाचे परवानगीनें नेहमीं आणतां येतात ही गोष्ट इंग्रजीपत्रकारांस अवश्य माहीत असली पाहिजे. या रीतीसच अनुसरून क्राफर्ड प्रकरणाचा विषय सभेच्या दुसरे दिवशीं सभेपुढें रा. रा. यशवंत नागेश रानडे यांनीं आणला. रा. रानडे यांच्या सूचनेंत दोन भाग होते. पहिला क्राफर्डचा व दुसरा मामलेदारांचा. या दोन्ही भागाविषयीं सकाळीं बराच वादविवाद होऊन सर्वानुमतें असें ठरलें कीं, विषय नेमणाऱ्या कमिटींत ज्या अर्थीं कांहीं मतें या विषयास प्रतिकूल होतीं त्या अर्थीं घाई न करितां हा विषय संध्याकाळपर्यंत तहकूब

---

* [केसरी–ता. ४ जून १८८९]

देवावा. संध्याकाळीं रा. रानडे यांच्या सूचनेपैकीं एका भागास बहुतेक सर्वांची अनुमती असून दुसऱ्या भागासंबंधें तितकें एकमत होण्याचा संभव नव्हता असें आढळून आल्यावरून रा. रा. टिळक यांनीं रानडे यांच्या सूचनेपैकीं पहिला भाग घेऊन नवी सूचना सभेपुढें आणिली व रा. रा. रानडे यांनीं आपली सूचना माघारी घेतली. पुढें अर्थात्च दोन तीन व्यक्तींखेरीज इतर सर्वांच्या अनुमतें रा. रा. टिळक यांची सूचना पसंत झाली.

अशा तऱ्हेचा खरा प्रकार असतां नाना तऱ्हेचे कुत्सित तरंग काढून आपल्या पक्षाचें समर्थन करण्याचें साहस आमच्या इंग्रजी बंधूंखेरीज बहुधा दुसऱ्या कोणाचेहि अंगीं आढळून येणार नाहीं. लागेल तेव्हां नेटिव्हांस चढवावें व त्याच मुखानें पुनः जरूर पडल्यास त्यांची निर्भत्सना करावी हेंहि कसब या धूर्त पत्रकारांपासूनच आम्हांस शिकलें पाहिजे. प्रांतिक सभेमध्यें सर्व जातींचे प्रतिनिधि आले नव्हते ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे, तथापि जितक्या जिल्ह्यांतून लोक येथें आले होते त्या सर्वांच्या मतें हा ठराव पास झाला असल्यामुळें त्याचें स्थानिक स्वरूप केवळ प्रतिकूळ वर्तमानपत्रकारांच्या बुद्धींत व लेखांत मात्र राहिलें आहे. खुद्द सरकारच्या संबंधानें जी पाहिलें तरी त्याचेंहि मत इंग्रजी पत्रकारांहून अत्यंत भिन्न आहे. टाईम्स पत्रकारांचें म्हणणें कांहीं असलें तरी सर रेमन्ड वेस्टसारख्या विद्वान्, न्यायी व शोधक गृहस्थाच्या म्हणण्यास योग्य मान मिळाल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. परंतु तीहि गोष्ट सोडली, तरी परवां महाराणी साहेबांच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ भरलेल्या दरबारांत दक्षिणेकडील सरदारांचे एजंट मि. व्हीटवर्थसाहेब यांनीं जें संभाषण केलें त्यावरून क्राफर्ड साहेबाबद्दल प्रतिकूल मत केवळ दक्षिणी ब्राह्मणांतच नव्हे तर त्यांच्या बरोबरीच्या सनदी नोकरांतहि असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. एजंटसाहेब म्हणाले कीं, "दहा बारा सनदी नोकरांनीं वीस पंचवीस वर्षें नोकरी करून लौकिक संपादावा व एकाच्या दुर्वर्तनानें त्यावर पाणी पडावें ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. हा काळिमा दवडण्यास आम्हांस (सनदी नोकरांस) शांतपणें इमानानें काम करून आणखी कांहीं दिवस वाट पाहिली पाहिजे. परंतु कसेंहि असलें तरी हल्लीं घडून आलेली स्थिति कोणासहि बरी वाटल्यावांचून राहणार नाहीं. गुप्त रोगानें खातेंच्या खातें बिघडून जाण्यापेक्षां उघड फजिती बरी. परंतु रोग समजून घेऊन तो निर्मूळ केलाच पाहिजे." मि. व्हीटवर्थसाहेब यांनीं जमलेल्या सरदारांस असें सांगितलें कीं, "मोठमोठे सरकारी कामगार अशा तऱ्हेनें ज्या वेळेस दुराचारी निघतील त्या वेळेस त्यांस ताळ्यावर आणण्याचा उपाय तुमच्या हातीं आहे. हाताखालच्या अम्मलदारांस भीतीनें असल्या गोष्टी उघडकीस आणतां येणार नाहींत हें खरें, तरी लोकांचे अग्रणी असे जे सरदार त्यांनीं ह्या गोष्टी मनावर घेऊन त्यांची योग्य तजवीज केली पाहिजे. हल्लींच्या प्रकरणावरून तुमच्या लक्षांत आलेंच असेल कीं असल्या

गोष्टी तुम्हीं सरकारच्या कानावर घातल्या म्हणजे पुरे. त्याचा बंदोबस्त तावडतोब होईलच होईल."

एजंटसाहेबांचे भर दरबारांतील वरील उद्गार ऐकून टाईम्सपत्रकाराच्या रडगाण्याची किंमत किती आहे याची वाचकांनींच कल्पना करावी. ज्याच्या दुर्वर्तनाबद्दल मुंबई इलाख्यांतील बहुतेक सिव्हिल सर्वंटांची खात्री झाली आहे व जी गोष्ट आज वीस पंचवीस वर्षें लोकांस ठाऊक आहे ती उघडकीस आणून त्याचा न्याय करण्याच्या कामीं मुंबई सरकारनें जें धैर्य दाखविलें तसलें धैर्य दुसरें कोणतेंहि क्वचितच आढळेल. खरें म्हटलें म्हणजे या धैर्याचें अनुकरण करण्यास जेव्हां सर्व इंग्रज तयार होतील तेव्हांच इंग्रजी राज्याचा पाया मजबूत होईल. पण हें सत्य टाईम्सच्या एडिटरच्या डोक्यांत कशानें शिरणार ! जात्यभिमानानें त्याचें डोकें इतकें फिरून गेलें आहे कीं, लॉर्ड रे सारख्या न्यायी व निःपक्षपाती अंमलदारापासून तों मामलेदारापर्यंत त्यांनीं आपली लेखणी सारखी सुरू ठेविली आहे. क्राफर्डसाहेबांस नौकरीवरून काढून टाकिलें तरी पेन्शन द्यावें ही गोष्ट यांस संमत आहे. पण चरकांत सांपडलेल्या मामलेदारांवर यांची इतकी करडी नजर आहे कीं त्यांस यांनीं कुचकामाचे ठरवून टाकलें आहे. 'चोर सुटतो व संन्याशी सुळीं जातो' अशी जी आमच्यांत म्हण आहे ती येथें अक्षरशः लागू पडते. वेस्टसाहेबांनीं मुंबई सरकारच्यातर्फे जें मिनिट लिहिलें आहे त्यांत क्राफर्डच्या अमलाखालीं जी अंदाधुंदी सुरू होती त्यांत मामलेदारांचें किती अंग होतें हें स्पष्ट केलें आहे. सर रेमन्ड वेस्ट यांचें असें मत आहे कीं, "मामलेदार यांची प्रवृत्ति जात्या दुराचरणाकडे नव्हती तथापि ताबेदारीच्या नात्यानें भिऊन त्यांस क्राफर्डसाहेबाचा जुलूम मुकाट्यानें सहन करून घ्यावा लागला." पण हें मत अर्थातच टाइम्ससारख्या क्राफर्डपक्षाच्या पत्रांस पसंत नाहीं; व त्यांनीं येथें व इंग्लंडांत या गरीब मामलेदारांविरुद्ध बरीच ओरड चालविली आहे. त्या ओरडीस कांहीं तरी मान दिला पाहिजे असा हल्लीं मुंबईसरकारचा ग्रह झाल्यासारखा दिसतो. पण आमची सरकारास एवढीच विनंति आहे कीं, ज्याप्रमाणें आजपर्यंत निश्चयानें, धैर्यानें व एकनिष्ठेनें त्यांनीं आपलें वर्तन ठेविलें त्याच पद्धतीचा पुढें अंगीकार करून लोकांच्या आभारास आपणास जास्त पात्र करून घ्यावें. प्रांतिकसभेपुढें क्राफर्डप्रकरणाच्या ठरावाबद्दल वादविवाद झाला त्यांत मामलेदाराचे अधिकार काढून घेण्याचा सरकारचा विचार असल्याचें निघालें होतें. एक दोघांनीं तर मामलेदार प्रकरणांचा निकाल झाल्याखेरीज सरकारचे आभार मानूं नयेत असेंहि सुचविलें होतें. पण सरकारचें आजपर्यंत वर्तन मनांत आणतां पुढें कांहीं झालें तरी झालेल्या वर्तनाबद्दल सरकारचे आभार मानणें योग्य आहे असें वाटल्यावरून या प्रकरणासंबंधीं ठराव सभेंत पास झाला आहे. हा जो लोकांनीं सरकारच्या वर्तनावर आपला भरंवसा दाखविला त्यास अनुकूल असेंच वर्तन पुढें

सरकारच्या हातून घडावें हें योग्य आहे. तेव्हां ह्या सर्व गोष्टींचा विचार करून केवळ एकतर्फी ओरड मिटविण्यासाठींच सरकार संन्याशांस सुळीं चढविणार नाहीं अशी आमची आशा आहे.

❖ ❖ ❖ ❖ ❖

* क्राफर्ड प्रकरणाचें खरें स्वरूप

मि. आमनी यांचा रिपोर्ट आणि हणमंतरावाची कबूल–जबानी या दोन लेखांवरून क्राफर्ड प्रकरणाचें खरें स्वरूप आतां बाहेर आलें आहे. हे दोन गुप्त लेख आहेत तेव्हां ते प्रसिद्ध करण्यांत स्टे. से. चा थोडा प्रमाद झाला ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. परंतु सार्वजनिक दृष्टीनें हे लेख प्रसिद्ध होणें जरूरच होतें. टाईम्ससारख्या जात्यभिमानी पत्रकारास किंवा त्याच्या कित्येक नेटिव व विशेषतः पारशी साक्षीदारांस हे लेख पसंत पडणार नाहींत. पण आमनी साहेबांनीं लिहिल्याप्रमाणें याच लोकांच्या समजुती व लेख दोन्हीहि नीतीस व सत्यास सोडून आहेत असें म्हणणें भाग पडतें. लांच देऊन काम करून घेणें अगर स्वार्थ साधणें हें जर अभिनंदनीय असेल तर आमचें कांहीं एक म्हणणें नाहीं. परंतु जर हें दुष्कर्म असेल तर परिस्फोटाखेरीज यास दुसरें वस्ताद औषधच सांपडणार नाहीं. आतां आमच्या दुर्दैवानें म्हणा अगर सरकारच्या दुर्लक्षतेमुळें म्हणा (पण अशी दुर्लक्षता होणें म्हणजे तरी एक दुर्दैवच समजलें पाहिजे.) क्राफर्डसाहेबांनीं सर्व महाराष्ट्रास किंबहुना इलाख्यासहि, ग्रासून टाकिलें होतें. कोणी कोणास हसावयास नको. पंतसचीव किंवा जंजिऱ्याचे नबाब हीं बडीं प्रकरणें एकीकडेच ठेविलीं तरी रा. ब. महादेव वासुदेव बर्वे, सी. आय्. ई. यांजपासून तों अनंतभट पाळंद्यापर्यंत आणि रा. ब. सांवत, भानगांवकर, साबाजीराव, वगैरे बड्या कामदारांपासून तों तहत् कमिशनरच्या ऑफिसांतील क्लार्कापर्यंत पारशी, ब्राह्मण, शेणवी, लिंगायत, मराठे, परभू, कुणबी, मुसलमान वगैरे सर्व जातींच्या व सर्व प्रकारच्या लोकांनीं हात साधेल तसा आपला फायदा करून घेतला आहे. दुसरीकडे गेल्या दोनचार वर्षांतल्या लांचाची यादी दिली आहे त्यावरून क्राफर्डसाहेबांच्या धंद्यास कशी तेजी होती हें उघड दिसून येईल. क्राफर्डसाहेबांचा बाजार ऊर्फ दरबार खुला होता इतकेच नव्हे तर, आंत जाण्यास निरनिराळ्या जातींच्या लोकांकरितां त्यास स्पायर्स, काजी, हणमंतराव, पोचाजी अशीं निरनिराळीं द्वारेंहि केलीं होतीं. इतकी सुलभ व्यवस्था झाल्यावर तिचा

---


* [केसरी–ता. २३ जुलै १८८९]

अव्हेर करण्याइतका माथेफिरू कोण मिळणार ? एखादा सांपडलाच तर त्याची व्यवस्था कशी होत असे हें प्रसिद्धच आहे. अशा स्थितींत क्राफर्डसाहेबांच्या दुर्व्यसनांत सर्व लोक गुंतले गेले याचें कांहीं आश्चर्य नाहीं. जोंपर्यंत राज्यकर्ते आमच्यावर विश्वास ठेवीत नाहींत व आमच्या म्हणण्यास मान देत नाहींत तोंपर्यंत असाच प्रकार व्हावयाचा. परंतु सरकारानें मनावर घेतलें असतांहि केवळ आपला हात गुंतला आहे म्हणून दुष्कर्माचा परिस्फोट करण्यास मागें ध्यावें इतकेंच नव्हे, तर मागें राहून नीतिमत्तेचा कोरडा डौल घालावा हें अगदीं अश्लाघ्य आहे. अशा तऱ्हेनें नसता डौल घालणाऱ्या लोकांस मि. आमनीसाहेबांचा लेख आवडणार नाहीं हें उघड आहे.

या प्रकरणासंबंधानें दुसरा असा प्रश्न आहे कीं, एका मोठ्या अंमलदारानें सर्व प्रांतच्या प्रांत बिघडून टाकावा याचें बीज तरी काय ? सर्व राष्ट्रांत एकहि मनुष्य असा निघूं नये काय, कीं जो कधींहि कुमार्गास प्रवृत्त होणार नाहीं ? आमच्या मतें याचें उत्तर अगदीं सोपें आहे. आम्ही हिंदु लोक स्वभावतःच गरीब असून त्यांत परराज्याखालीं पडलेले. तेव्हां आमचे सर्व बाह्य व्यवहार "राजा कालस्य कारणम्" या न्यायास अनुसरूनच व्हावयाचे. क्रांफर्डास लांच भरणारांपैकीं कित्येक लोक मनांत चडफडले असतील व या राक्षसाची कारकीर्द लवकर संपली तर बरें असें त्यांस वाटलें असेल, पण त्याचा उपयोग काय ? नेटिव पत्रांत हे प्रकरण येऊन रिपोर्टरच्या मार्फत तें सरकारच्या टेबलावरहि गेलें होतें. इतकेंच नव्हें तर, खुद्द क्राफर्डचीं स्वदरस्तुरचीं पत्रेंहि गव्हर्नरचे प्रायव्हेट सेक्रेटरीपर्यंत पोचलीं होतीं तरी पुनः कांहीं नाहीं तें नाहींच. आमनीसाहेबांनीं हार्टसाहेबांस पत्रांबद्दल विचारतांच त्यांनीं आपले कानावर हात ठेविले ! आणि इकडे बाजारांत तर अशी बातमी आहे कीं, सदर पत्रांचे पायींच हार्ट साहेबांस हा इलाखा पारखा झाला. असो ही बातमी कदाचित् खोटी असेल; परंतु त्याजवरून एकंदर लोकांचें सरकाराविषयीं कसें काय मत आहे तें दिसून येतें. हणमंतरावानेंहि आपल्या जबानींत ही गोष्ट स्पष्ट सांगितली आहे; तेव्हां इतउत्तर सरकारी नौकरींत जर सुधारणा करणें असेल तर सरकारनें आपलें वर्तन प्रथमतः सुधारलें पाहिजे. राज्यकारभारांत नेटिव लोकांस जो अधिकार आहे त्या दृष्टीनें पहातां आमच्या हातूत आमनी साहेब म्हणतात त्याप्रमाणें स्वतःच्या वर्तनास डाग न आणतां वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं गोडीगुलाबीनें रहावें यापलीकडे जारत कांहीं एक होणार नाहीं. विलायतेंत स्वराज्यांत व स्वतंत्रतेंत वाढलेल्या कित्येक गृहस्थांस हें चमत्कारिक वाटेल खरें, परंतु प्राप्तीपेक्षां दसपटीनें खर्च करणारा कर्जबाजारी मनुष्य परत चाकरीवर ठेवून तो लांच खातो हें समजण्यास जेथें इतकीं वर्षें लागलीं व इतका खर्च झाला तेथील स्थिति मनांत आणिली असतां त्यांस कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं. ओम्यानी साहेब म्हणतात त्याप्रमाणें राज्य-

कर्तें इंग्रज लोक आपल्या जातीच्या माणसास कधींहि मारणार नाहींत अशीच सामान्य लोकांची अजून समजूत आहे; आणि या क्राफर्ड प्रकरणानें ती नाहींशी होण्याचा संभव कितपत आहे तें दिसतेंच आहे; व जर सरकारनें आपल्या वचनावर पाणी सोडलें तर नव्या मंडळीसहि असेंच वाटेल यांत संशय नाहीं. कमिशनच्या निकालानें असा समज थोडाबहुत झालाच आहे, पण कमिशनापुढें सर्व हकीकत न आल्यामुळें त्यांना पळण्यास कांहीं मार्ग आहे. मुंबईसरकारास तर्शी कोणतीच सवड नाहीं. क्राफर्ड प्रकरण या थरास येण्यास बऱ्याच अंशीं सरकारचें दुर्लक्ष कारण झालें आहे व अजूनहि जर एखाद्या बडचा पार्लमेंटच्या मेंबराच्या भीतीनें सरकार आपला शब्द मोडून गैरशिस्त वर्तन करील तर यापुढें त्याजवर कोणीच विश्वास ठेवणार नाहीं, आणि हल्लींच्या सारखीं घाणेरडीं प्रकरणें पुनः सुरू होतील. तेव्हां सरतेशेवटीं सरकारास आमची अशी सूचना आहे कीं, सरकारी खातीं चोख रहावीं अशी त्यांची इच्छा असेल तर त्यांनींच या कामाचा प्रथम आम्हांस कित्ता घालून दिला पाहिजे. सत्याकरितांच—सत्य पाळणारे कोणत्याहि राष्ट्रांत थोडेच लोक असतात व आमच्याकडे तर ते फारच कमी आहेत हें कबूल केलें पाहिजे. परंतु याच कामाकरितां—येथील सरकारनें इतर देशांतील राज्यकर्त्यांपेक्षां जास्त चोख रहावयास पाहिजे. तसें झालें म्हणजे त्याबरोबर आपोआप काळहि फिरेल असें यंदाच्या चिन्हांवरून दिसत आहे.

या संबंधानें आणखी बरेंच लिहावयाचें आहे; पण स्थलसंकोचास्तव तूर्त येथेंच मुक्काम करणें भाग आहे.



* विश्वासघात

वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिसृताः ।
तांस्तु यः स्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः ॥

अखेरीस सरकारानें आठ मामलेदारांस बळी दिल्याचें वर्तमान गेल्या अंकीं वाचकांस कळविलेंच आहे. हें व ह्यांच्याच वाटेस लावून दिलेले दुसरे कांहीं मामलेदार खेरीज करून इतरांचा बचाव कसा करावा याचा विलायतेस व येथें विचार होऊन सरतेशेवटीं गेल्या गुरुवारीं सिमल्यास हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलापुढें एक कायद्याचा मसुदा आला आहे. या मसुद्याचा आशय असा आहे कीं, मुंबई सरकारनें मामलेदारांस 'तुम्हांस तुमच्या गुन्ह्याकरितां शिक्षा

---

* [केसरी—ता. २४ सपटंबर १८८९]

होणार नाहीं, तुमच्यावर खासगी दावे (दिवाणी वगैरे) होणार नाहींत, आणि तुमचें नौकरीसंबंधानें नुकसान होणार नाहीं ' असें जरी त्रिधावचन दिलें आहे, तरी आतां तें सर्व वचन पाळण्यास कायदेशीर हरकत असल्यामुळें आपखुषीनें लांच दिलेल्या मामलेदारांस नौकरीवरून दूर करण्याचा विलायत सरकारनें हुकूम दिला आहे. वचनभंगापासून मामलेदारांचें झालेलें नुकसान भरून देण्याचा सरकारचा विचार दिसतो. पण तें किती व काय याबद्दल कोणींहि उल्लेख केला नाहीं यावरून व हल्लींचें वचनभंगाचें ताजें उदाहरण डोळ्यापुढें असल्यामुळें सरकारच्या नुसत्या उद्देशावर कितपत भरंवसा ठेवावा याचा बराच विचार आहे. असो. हल्लीं जें बिल सरकारपुढें आहे त्यांत नौकरीवरून दूर केलेल्या व नौकरीवर राहूं दिलेल्या मिळून कोणत्याहि मामलेदारावर या प्रकरणीं फौजदारी किंवा दिवाणी फिर्याद चालणार नाहीं इतकाच मजकूर आहे. नोकरीवर ठेवावयाचें कोणास व काढावयाचें कोणास याचा निकाल सरकारी ठरावानें होणार. बिल कौन्सिलपुढें आलें तेव्हां गव्हर्नर जनरलसाहेबांनीं जें भाषण केलें त्यांत जाणून बुजून लांच दिलेल्या माणसास नौकरीवर ठेवण्यापेक्षां वचनभंगाचा दोष कमी आहे आणि मुंबई सरकारची जरी वचन अक्षरशः पाळण्याची इच्छा होती, तरी वरील कारणाकरितां विलायत सरकारानें त्यांच्या अभिप्रायाप्रमाणें केलें नाहीं असें सांगून, मुंबई सरकारच्या न्यायपिणाबद्दल व सरळपणाबद्दल त्याची तारीफ केली आहे !

अशी या बिलाची हकीकत आहे. यांत एक दोन कायद्याचे बिकट प्रश्न आहेत; परंतु त्यांचा येथें विचार न करतां वचनभंगाच्या घोर पातकनिवृत्यर्थ ज्या सबबी पुढें आणल्या आहेत त्यांचाच प्रथमतः विचार करूं. वचन मोडण्याकरितां असल्या सबबी सरकारास पुढें आणाव्या लागल्या हीच आधीं लाजिरवाणी गोष्ट होय; व त्यांतून त्या सबबीहि इतक्या पोरकट व क्षुल्लक असाव्या हें अत्यंत लाजिरवाणें होय. सन १७५७ सालीं लॉर्ड क्लाइव्ह यानें उमिचंदाशीं जें पाजीपणाचें वर्तन केलें त्यावर टीका करतांना लॉर्ड मेकॉलेसारख्या ग्रंथकारानेंहि असें स्पष्ट लिहिलें आहे कीं—" अगदीं कुटिल राजनीतीच्या दृष्टीनेंहि असल्या वर्तनाचा निंद्यपणा कमी होत नाहीं. त्यांतून एखाद्या व्यक्तीचाच प्रश्न असला तर गोष्ट निराळी, पण जेथें राजकर्त्यांच्या हातून असला प्रकार घडतो तेथें कोणत्याहि सबबीनें त्या अपराधाचें स्वरूप बदलत नाहीं. अन्यायानें व विश्वासघातानें ऊर्जित दशेस आलेलीं माणसें आढळतील, पण असल्या घोर दुर्गुणांनीं किंवा अपराधांनीं मरभराटीस आलेलें कोणतेंहि राज्य सांपडणार नाहीं. " मेकॉलेसाहेबांच्या या स्पष्टोक्तीचा व हल्लीं घडत असलेल्या प्रकाराचा विचार केला म्हणजे इंग्रजी राज्याच्या चिरस्थायीपणाबद्दल व लोकप्रियतेबद्दल मनांत सहज शंका व धास्ती उत्पन्न होते. स्वराज्यांत एखादवेळेस असा प्रकार खपून जाईल, पण परकीय राजकर्त्यांस असल्या भयंकर गुन्ह्यांच्या आरोपाचा देखील स्पर्श उपयोगी

नाहीं. परकीय राज्यांत राज्यकर्ते व प्रजा यांच्या स्थितींत स्वभावतःच महदंतर असून राज्यकर्त्यांच्या विरुद्ध दाद मिळण्याची प्रजेस मोठी पंचाईत असते. ही पंचाईत ज्याप्रमाणानें कमी असते त्याप्रमाणानेंच परकीय राज्याचा चिरस्थायीपणा जास्त असतो ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे; परंतु हा सिद्धांताहि लॉर्ड क्रास आज गुंडाळून ठेवण्यास तयार झाले आहेत; आणि तें कशाकरितां तर पार्लमेंटसभेंतील कांहीं फाजील चौकस माणसांचीं तोंडें मिटावीं म्हणून ! अथवा कदाचित् असेंहि असेल, कीं बड्या इंग्रज कामगाराविरुद्ध साक्ष देणारांनीं इतउत्तर चांगली खबरदारी घ्यावी. कसेंहि असो; लॉर्ड क्रास यांच्या हातून आज मोठी चूक होत आहे मोठा अन्याय, मोठा गुन्हा, होत आहे—याची आम्हांस बिलकूल शंका नाहीं. सेक्रेटरी ऑफ स्टेटसारख्या मोठ्या अधिकाऱ्यास पार्लमेंट सभेच्या एक दोन चौकस सभासदांच्या भीतिस्तव जर असला अन्यायाचा मार्ग स्वीकारण्याचा प्रसंग येतो, तर " कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं " अशी ज्याची शक्ति होती त्या क्राफर्डास भिऊन गरीब बिचाऱ्या मामलेदारांनीं लांच दिला यांत त्यांचा काय अपराध ? लॉर्ड क्रास यांचें असें म्हणणें आहे कीं, मुंबई सरकारानें दिलेलें वचन बेकायदेशीर आहे करितां तें पूर्णपणें पाळतां येत नाहीं. पण त्यांस आमचें असें विचारणें आहे कीं मग ते इतक्या दिवस कां झोंप घेत होते ? उमीचंदाचा उपयोग करून घेऊन अखेरीस ज्याप्रमाणें क्लाइव्हसाहेबानें त्याच्या हातावर तुरी दिल्या त्यांतलाच हा प्रकार नव्हे काय ? मामलेदारांस नौकरींवर ठेवण्यास कायद्याची हरकत आहे खरी, पण ते कायदे करणार कोण ? सरकारचना ? मग हा सर्व प्रकार आपणच दारास कडी लावून घेऊन " मला कोंडिलें, मला कोंडिलें" म्हणून ओरड करण्यासारखा नव्हे काय ? बरें ज्यांस आज सरकार कामावर ठेवणार आहे त्यांस तरी कोणत्या आधारावरून ठेवणार ? लॉर्ड लाम्सडौन म्हणतात कीं, आम्ही त्याकरितां सरकारी ठराव करूं. पण सरकारी ठरावानें कायद्याचें कलम कसें रद्द होणार ? कायदा करावयाचा—मग दहा पांच लोकच तरी कां वगळावे ? लाटसाहेब सांगतात कीं—असल्या आपखुषीनें लांच दिलेल्या लोकांस नौकरीवर ठेवण्यापेक्षां त्यांच्याशीं बेइमानपणा केला तरी चालेल म्हणून ! ठीक आहे; पण महाराणीसाहेबांच्या प्रतिनिधीनें बुद्धिपूर्वक दिलेल्या अभिवचनास असल्या बेपारी योग्यायोग्यतेच्या तराजूंत टाकण्यापूर्वी त्याच्या अखेर परिणामाकडे लॉर्डसाहेबांनीं नजर पुरविली आहे काय ? कदाचित् विलायतसरकारचा हुकूम बजावण्याच्या राजनिष्ठेंत किंवा सिमल्यावरील जात्यभिमानाच्या धुक्यांत त्यांची दृष्टि मंदावली असेल. करितां त्यांस विनयपूर्वक आमचें असें सुचविणें आहे कीं, हा त्यांच्या हातून मोठा प्रमाद, मोठा अन्याय होत आहे, व जो राज्याच्या कारभार हांकण्यास त्यांस पाठविलें आहे त्याच्या चिरस्थायीपणाच्या पायाचा एक भक्कम दगड ते लाथेनें ढकलून देत आहेत. १७२५ सालीं

विलायतेंत ह्यासारखाच लॉर्ड मॅक्लिसफील्ड यांचा खटला चालू असतां त्यांतील साक्षीदारांशीं पार्लमेंट सभेनें जें वर्तन केलें, व त्यांस नौकरीवर ठेवण्याकरितां आवडनिवड न करितां ज्याप्रमाणें कायदा केला, तसा येथें करण्यास कोणती हरकत आहे ? व लॉर्ड क्राससाहेबांनीं पार्लमेंट सभेपुढें हें उघडपणें कां मांडलें नाहीं ? मॅक्लिसफील्ड खटल्यांतील साक्षीदारांनीं सरकारी तिजोरींत ठेवलेले लोकांचे पैसे खाऊन लांच भरला होता, पण त्यांना देखील नौकरीवर ठेवण्यास पार्लमेंट सभेस कांहीं शंका वाटली नाहीं. हे साक्षीदार ज्या कायद्यानें नौकरीस नालायख झाले होते, त्याच कायद्यानें मामलेदारहि नालायख झाले आहेत. मग बिचाऱ्या मामलेदारांबद्दलच " बेइमानपणा बरा किंवा त्यांस सरकारी नौकरीवर ठेवणें बरें असला कोल्हेशाई प्रश्न कशाला ? बेइमानपणानें कधीं तरी कोणी उदयास आलें आहे काय ? मग सरकारास इतउत्तर आपल्या वचनावर कोणी " कवडीइतका देखील भरंवसा ठेऊं नये असेंच वाटत असेल तर गोष्ट निराळी. परंतु जोंपर्यंत सगळ्या इंग्रजी राष्ट्रास असें वाटत नाहीं व जोंपर्यंत सत्यनिष्ठा व प्रामाणिकपणा हे इंग्रजी राज्याचे आधारस्तंभ मानले जात आहेत तोंपर्यंत दिलेलीं वचनें कायदेशीर नाहींत ही सबब दांभिक आहे व वचनें पाळण्यापेक्षां मोडणेंच बरें हें म्हणणें पोरकट आहे असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं; व असल्या सबबीवर लॉर्ड क्रास किंवा हिंदुस्थानसरकार जर वचनभंगाचें घोर पातक करण्यास तयार होईल व इंग्रजी राष्ट्र त्यास तसें करूं देईल तर या राज्याचा उतरता काळ लवकर आला असें म्हणावें लागेल ! असल्या वेळीं राजनिष्ठ प्रजेनें स्पष्ट बोलून सरकारचे डोळे उघडले पाहिजेत व त्याप्रमाणें ठिकठिकाणचें लोक करतील अशी आमची उमेद आहे. हिंदुस्थानसरकारानें रा. ब. नुलकर यांच्या विनंतीवरून लोकमत काय आहे हें समजाण्याकरितां विलाचें दुसरें वाचन ता. ३ आक्टोबरपर्यंत मुद्दाम तहकूब ठेविलें आहे. त्या मुदतीच्या आंत प्रत्येक मोठ्या गांवांतून सरकारास " तुम्ही आपलीं वचनें कायदेशीर करून घेऊन अक्षरशः पाळा " अशा अर्ज्या किंवा तारा गेल्यास अजूनहि ईश्वर सत्तेनें सरकार डोळे उघडणार नाहींत असें नाहीं. निदान आम्हीं आपल्या धर्मास जागल्यासारखे होऊं.

असल्या अनीतीच्या फेऱ्यांत लॉर्ड रे सारखा एक तरी नीतिप्रिय अंमलदार आहे ही एक आनंदाची गोष्ट आहे. यांनीं मामलेदार लोकांस दिलेलीं वचनें अक्षरशः पाळावीं म्हणून होती तेवढी खटपट केली, पण " छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा " या न्यायानें यांच्या म्हणण्याचा लॉर्ड क्रास किंवा हिंदुस्थान सरकार याच्या विकारवश अंतःकरणावर कांहींएक परिणाम झाला नाहीं. आतां लॉर्ड रे स्वतःच सिमल्यास गेले आहेत तेव्हां समक्ष भेटीनें कांहीं बदल झाल्यास नकळे. पण तसें न झाल्यास आपल्या जागेची पर्वा न ठेवितां लॉर्ड रे साहेब इंग्रज सरकारच्या राज्याच्या न्यायीपणाचा

लौकिक कायम ठेवतील अशी अशा आहे. त्यांनीं जीं वचनें दिलीं आहेत तीं महाराणी सरकारच्या तर्फेनें दिलीं आहेत व तीं देण्यांत त्यांचा हेतु अतिशय स्तुत्य असून त्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. दुर्दैवानें त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं इंग्रजी राज्याच्या लोकप्रियतेचीं सर्व तत्त्वें गुंडाळून ठेवून, भीतीनें किंवा स्वपक्षीयांच्या अभिमानानें पुंडाई मांडली आहे. अशा प्रसंगीं आम्ही आपलें कर्तव्य करीतच आहों, पण लॉर्ड क्लाइव्ह यास वाटसन साहेबानें ज्याप्रमाणें मी खोट्या करारावर सही करीत नाहीं म्हणून साफ सांगितलें त्याच प्रमाणें या वेळीं आपण दिलेलीं वचनें आपणच आपल्या हातानें मोडणार नाहीं असें लॉर्ड रे साहेबांनीं निक्षून सांगितलें असतां बळी पडलेल्या मामलेदारांस व लोकांस कांहीं समाधान वाटेल इतकेंच नव्हे तर इंग्रजी राज्याच्या कीर्तीस जो कलंक लागणार आहे तोहि कांहीं अंशीं तरी खास कमी होईल !



लष्करी शिक्षणाची शाळा

नेकनामदार ड्यूक आफ् कॅनाट यांनीं गेल्या आठवड्यांत पुण्याहून जें डेप्युटेशन गेलें होतें त्याचा योग्य सन्मान करून लष्करी शिक्षणाची शाळा आपल्या नांवानें काढण्यास मोठ्या आनंदानें परवानगी दिली, व अशा शाळांची देशांत आवश्यकता असून आज नाहीं तर निदान कांहीं दिवसांनीं तरी सरकारास अशा शाळा काढण्यास परवानगी दिली पाहिजे असा आपला अभिप्रायहि स्पष्ट बोलून दाखविला. मुंबई इलाख्याचे लोकप्रिय सेनाधिपति राजीपुत्र ड्यूक आफ् कॅनाट यांचा सदरील अभिप्राय व परवानगी मिळाल्यामुळें या प्रश्नास बरेंच रूप येऊन हिंदुस्थान सरकारास ह्या गोष्टीचा नीट विचार करावा लागेल यांत संशय नाहीं. त्यांतूनहि पुण्याच्या सभेनें जें मागणें केलें आहे तें जर निरर्गल असतें तर गोष्ट निराळी, पण तें इतकें बेताचें आहे कीं, तें कबूल करण्यास हिंदुस्थान सरकारास कांहीं हरकत नाहीं असें मुंबई ग्याझेट पत्रकर्त्यांचेंहि मत आहे. अशा वेळीं या प्रश्नाची लोकामध्यें जितकी ज्यास्त चर्चा होईल तितकी चांगली, अशा समजुतीनें आज या विषयाचा थोडाबहुत विचार करण्याचें योजिलें आहे.

लष्करी शाळेसंबंधाचा विचार निघाला म्हणजे कांहीं लोकांचा पहिला प्रश्न असा निघतो कीं, परकीय प्रभूनें आपल्या प्रजेस लष्करी शिक्षण देणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या अपकर्षाचा पाया घालणें होय, व म्हणूनच लोकांनींहि अशा तऱ्हेची मागणी सरकारपाशीं करणें अगदीं अयोग्य होय, त्यापासून कांहीं फायदा न होतां आपण उगाच सरकारास भीति मात्र घालतों. पुण्याच्या सभेंत

---


* [केसरी–ता. १८ मार्च १८९०]

रा. गंगारामभाऊ म्हसके व ऑ. काजीसाहेब यांनीं जीं भाषणें केलीं त्यांतील मुख्य मुद्दा हाच होता. परंतु रा. ब. रानडे यांनीं सांगितल्याप्रमाणें हा समज चुकीचा आहे असें थोड्या विचारांतीं दिसून येईल. इंग्रजी राज्यांतील सर्व सेनेचें आधिपत्य व सर्व ऑफिसरांच्या जागा जर आम्हीं मागितल्या तर अशा आक्षेपास जागा होती. पण आमचें मागणें इतकें नेमस्त आहे कीं, त्यापासून इंग्रजी राज्यास कांहीं अपाय न होतां उलटी बळकटी येणार आहे, असा डयूक आफ़ कॅनाटसारख्या थोर कामगारांचाहि अभिप्राय आहे. इंग्रजी राज्य तरवारीच्या जोरावर चाललें आहे असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. त्यामुळें या विषयाचा सूक्ष्म विचार करण्यास पुष्कळांची प्रवृत्ति होत नाहीं व तशी प्रवृत्ति न झाल्यामुळें जे अनेक गैरसमज होतात त्यांतलाच वरील एक होय. इंग्रजांचें राज्य तरवारीच्या जोरावर चाललें आहे, पण त्या तरवारी कोणाच्या व त्यांपासून राज्याच्या चिरस्थायीपणास होणारी मदत किती ? याचा जरा बारीक विचार केला पाहिजे. हिंदुस्थानच्या एकंदर सैन्यापैकीं $\frac{2}{3}$ नेटिव व $\frac{1}{3}$ युरोपियन सैन्य आहे व नेटिव सैन्यावरील मेजरसुभेदारपर्यंत सर्व अधिकारीहि नेटिवच आहेत. यापेक्षां मोठ्या पगाराच्या अधिकारांच्या जागा युरोपियन लोकांच्या हातांत आहेत खऱ्या, पण हा प्रकार एकंदर सर्व खात्यांत सारखाच लागू आहे. आमचें गरीब विचारें शाळाखातें घ्या. तेथें देखील इन्स्पेक्टर डायरेक्टर व आजपर्यंत हायस्कूलचे हेडमास्तर, हे युरोपियनच आहेत. मुलकी खातें, न्यायखातें, रानखातें, इंजिनियरिंग खातें वगैरे ठिकाणींहि हाच नियम लागू आहे. तेव्हां लष्करी खात्यासंबंधानेंच त्याबद्दल विशेष बरें—वाईट वाटण्याची कांहीं जरूर नाहीं. वरिष्ठ हुद्देदारांच्या जागांपैकीं किती जागा नेटिवांस द्याव्या हा प्रश्न अगदीं निराळा आहे व त्याचा निकालाहि निराळ्या गोष्टीवरूनच केला पाहिजे. सध्यां लोकांचें सरकारापाशीं जें मागणें आहे तें अगदीं नियमित असून त्याचा जाग्याच्या प्रश्नाशीं कांहीं संबंध नाहीं. ज्या जागा हल्लीं नेटिव सैन्यांत नेटिवांसच मिळतात त्या एका अशिक्षित शिपायास न देतां लष्करी कॉलेजांत शिक्षण मिळून तयार झालेल्या प्रतिष्ठित घराण्यांतील लोकांस द्याव्या एवढीच कायती सरकारापाशीं आमची विनंति आहे; व ही विनंति अगदीं माफक असून त्यापासून राज्यास उलट अधिक मजबुती येईल हें थोड्या विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल. खुद्द मुंबई इलाख्यांत पायदळ, रिसाला, व तोफखाना मिळून जमादार, सुभेदार, मेजरसुभेदार वगैरे ५० रुपयांपासून ३०० पर्यंत एकंदर सुमारें ५५० जागा आहेत. ह्या जागा हल्लीं शिपायापासून वाढत गेलेल्या लोकांसच मिळतात. यांपैकीं $\frac{1}{3}$ जागा खानदानीच्या घराण्यांतील लोकांस द्याव्या असा सरकारचा ठराव आहे. पण लष्करी शिक्षण मिळण्याची कोठेंच चांगली सोय नसल्यामुळें आधीं थोडेच चांगल्या घराण्यांतील लोक लष्करांत शिरतात व तेथें नांवाजलेल्यां-

पैकीं कांहीं जणांस परत यावें लागतें. या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे राणीपुत्र डचूक आफ कॅनाटपेक्षांहि इंग्रजी राज्याच्या चिरस्थायीपणाची जारत काळजी बाळगणाऱ्या लोकांचा लष्करी शिक्षणाच्या शाळेवर जो पहिला आक्षेप त्यांत किती अर्थ आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. गवंडी व जुने मेस्त्री काढून त्या ठिकाणीं इंजिनियरिंग कॉलेजांत शिकलेले ओव्हरसिअर व इंजिनिअर घातल्यानें; अगर मराठी मामलेदारांच्या जागीं हळू हळू इंग्रजी शाळांतून तयार झालेले मामलेदार नेमल्यानें, अगर २७ च्या कायद्याचें मराठी भाषांतर वाचून वकील किंवा मुनसफ झालेल्या लोकांच्या जागीं इंग्रजी परीक्षा पास झालेले नवे वकील अगर मुनसफ आणिल्यानें इंग्रजी राज्यास जर कांहीं अपाय झाला नाहीं तर हल्लींच्या मेजरसुभेदारांच्या जागा हळू हळू मिलिटरी कॉलेजांत तयार झालेल्या लोकांस दिल्यानेंहि इंग्रजी अमलास धोका येणार नाहीं हें अगदीं निर्विवाद आहे. आतां कदाचित् कोणी असा प्रश्न करतील कीं, हल्लीं असलेल्या मेजरसुभेदार किंवा रिसालदार यांचे जागीं सुशिक्षित लोक आल्यानें त्यांची हांव जारत वाढून पुढें मागें ते वरिष्ठ अधिकाराच्या जागा मागणार नाहींत म्हणून कशावरून ? यावर आमचें एवढेंच उत्तर आहे कीं, हा प्रश्न केवळ लष्करी खात्यासंबंधानेंच नसून इतर सर्व खात्यासंबंधानें सारखाच लागू आहे व त्याचा निकाल १८५४ सालीं हिंदूलोकांस पाश्चिमात्य शिक्षण द्यावें कीं नाहीं याची भवति न भवति होऊन जो अखेर ठराव झाला त्यावेळींच झाला आहे. शिवाय हल्लींच्या मेजरसुभेदारांच्या मनांत अशा तऱ्हेची इच्छा उद्भवणार नाहीं, अशी तरी खात्री आहे काय ? विद्येच्या व शिक्षणाच्या प्रसारानें उद्भवणाऱ्या इच्छा व गरजा सरकारास हळू हळू भागविल्या पाहिजेत व त्यांतच इंग्रजी राज्याचें हित व चिरस्थायीपणा आहे हें तत्त्व इंग्लंड देशाचा परकीय देशाशीं जो व्यवहार आहे त्याचें बीज होय. ही गोष्ट मोठमोठ्या राजकार्यधुरंधर मुत्सद्यांनीं कबूल केली आहे. तोच न्याय या प्रकरणीं लाविला म्हणजे भित्र्या कुत्सित लोकांच्या कल्पना अगदीं निराधार आहेत असें कोणाच्याहि नजरेस येईल.

शिपायांस मेजर-सुभेदारीपर्यंत जी बढती मिळते ती काढून त्यांपैकीं कांहीं जागा खानदानीच्या घराण्यांतील लोकांस दिल्यानें शिपाई लोकांत थोडा-बहुत असंतोष उत्पन्न होईल असा एक दुसरा आक्षेप आहे; परंतु तोहि वरच्याप्रमाणेंच चुकीचा आहे. ज्या लोकांनीं पूर्वीच्या अमलांतून मोठमोठीं कामें करून आपल्या तरवारीच्या जोरावर स्वराज्यनिष्ठा गाजविली त्यांच्या वंशजांस असंतुष्ट ठेवून त्यांच्या वंशपरंपरागत आलेल्या दर्जाचा, अधिकाराचा, इतमामाचा, शौर्याचा व हुकमतीचा देशहिताच्या कामीं उपयोग न करून घेतल्यापासून देशाचें जें नुकसान होत आहे तें लक्षांत आणलें म्हणजे तर वरील आक्षेपांत दाखविलेला असंतोष अगदीं क्षुल्लक आहे असें कोणाच्याहि लक्षांत येईल. डचूक आफ कॅनाट

यांनीं सांगितल्याप्रमाणें खानदानीच्या घराण्यांतील लोकांचा लष्करांत जर प्रवेश होईल (आणि तो प्रवेश त्यांस ऑफिसरांच्या जागा दिल्याखेरीज कधींहि व्हावयाचा नाहीं) तर राज्याच्या मजबुतीस हें एक अधिकच साधन होईल, व अलीकडच तऱ्हेच्या दुसऱ्या कारणांमुळें मोंगलाच्या कारकीर्दीत अकबरासारख्या दूरदर्शी बादशहांनीं उदेपूर, जयपूर, जोधपूर वगैरे रजपूत घराण्यांतील सूर्य व चंद्रवंशी राजांस आपल्या सैन्यांत मोठमोठे अधिकार दिले होते व त्यांपासून त्यांचे राज्यास अपाय झाल्याचें कोठेंहि ऐकिवांत नाहीं. असेंच नव्हे तर अगदीं शेवटपर्यंत राजनिष्ठ राहून या घराण्यांच्या हातून मोंगल बादशहांस पुष्कळ वेळीं अत्युत्तम मदत झाली आहे. विश्वासानें विश्वास उत्पन्न होतो व वाढतो. असा विश्वास इंग्रज सरकारानें जेथें टाकिला आहे त्या त्या ठिकाणीं नेटिव्ह लोकांनीं तो पूर्णपणें राखिल्याचें आढळून येतें. तेव्हां अशाच तऱ्हेनें जुन्या कसास उतरलेल्या घराण्यांवर विश्वास टाकून त्यांस असंतुष्ट न ठेवितां सरकार त्यांच्या करामतीचा राज्याच्या संरक्षणाच्या कामीं जर उपयोग करून घेईल तर त्यापासून एकंदर देशाचें व राज्याचें अतिशय हित होणार आहे.



* सालगुदस्त

श्रीकृष्णानें कंसाच्या समेंत प्रवेश केला तेव्हां त्याचें स्वरूप निरनिराळ्या इसमांस निरनिराळ्या तऱ्हेचें भासलें असें पुराणांतरीं वर्णन आहे. एकच गोष्ट कालभेदानें, स्थितिभेदानें आणि देशभेदानें भिन्न भिन्न लोकांस भिन्न भिन्न तऱ्हेनें हितावह अगर नुकसानीची वाटूं लागते याचें वरील कथानक हें उत्कृष्ट उदाहरण आहे. कालाची गोष्टहि याचप्रमाणें आहे. या जगांत एकसमयावच्छेदेंकरून इतक्या गोष्टी घडत असतात, कीं त्या सर्वांचा परिणाम सर्व खंडांवर, सर्व राष्ट्रांवर किंबहुना सर्व प्राणिमात्रावर सारखाच घडत असतो असें नाहीं. जें वर्ष एखाद्यास सुखानें जातें त्याच वर्षांत दुसऱ्या एखाद्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो. ज्या वर्षांत व्यापाराची भरभराट होते त्याच वर्षांत एखादे वेळेस शेतकीस थोडाबहुत धक्का बसतो. सारांश, जो तो आपल्या दृष्टीनें वर्षफलाची परीक्षा करीत असतो व दृष्टिभेदामुळें फलभेदहि नजरेस येतो. पूर्वीच्याकालीं नूतन संवत्सरारंभीं भावी संवत्सराचें फल आगाऊ सांगण्याची वहिवाट असे. हल्लींच्या शास्त्रीय कालांत त्याच्या ऐवजीं गतसंवत्वर-फल सांगण्याची वहिवाट पडली आहे; तेव्हां या नव्या शिष्टसांप्रदायास अनुसरून

---

* [केसरी–ता. १२ जानेवारी १८९२]

हिंदूप्रजेच्या—आणि परवांच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांनीं सांगितल्याप्रमाणें हिंदू राष्ट्राच्या—दृष्टीनें गेल्या सालचा आढावा येथें देण्याचा आमचा विचार आहे. हा आढावा देतांना कांहीं ठळक खातीं घेऊन त्या त्या खात्यांची बाकी कोणाकडे किती निघत आहे हें स्पष्टपणें दाखविलें म्हणजे एकंदर आढाव्याचा वाचकांस सहज अदमास करतां येईल. पहिलें खातें अर्थातच

राजकीय

होय. रायव. आनंदाचार्लू यांनीं सांगितल्याप्रमाणें ज्या राजाची प्रजा म्हणून आम्ही आपणांस एकराष्ट्रबंधू समजतों त्या राज्यकर्त्यांमध्यें व आपणांमध्यें जो संबंध आहे तो गेल्या सालांत कितपत व कसा राहिला, वाढला अगर कमी झाला हें पाहणें आपलें पहिलें कर्तव्य आहे. हा संबंध हल्लीं आहे त्यापेक्षां कांहीं निराळ्या तऱ्हेचा होऊन त्यापासून लोकांस सुख व्हावें व त्यांचें एकराष्ट्रीयत्व वाढत जावें येवढ्याकरितां राष्ट्रीयसभेची संस्था स्थापन झाली आहे. दुसऱ्या बाजूनें राज्यकर्त्यांच्या हातांत हल्लीं जी सत्ता आहे, ते जो अधिकार व अंमल गाजवीत आहेत आणि पैशानें व सत्तेनें त्यांस जें महत्व प्राप्त झालें आहे तें कायम ठेऊन उत्तरोत्तर त्याची वृद्धि व्हावी असा उपक्रम अव्याहत चालू आहे. या दोन्ही पक्षांपैकीं ज्याची ज्या वर्षीं सरशी होईल त्यास तें वर्ष सुखाचें वाटेल. गेल्या सालाची हकीकत पहातां एकंदरींत हिंदु प्रजेस हें वर्ष हितावह गेलें असें आम्हांस वाटत नाहीं. अफगाण देशाच्या सरहद्दीवरील किल्ल्यांची बळकटी करून उत्तरोत्तर पुढें पाऊल टाकीत असणाऱ्या रशियास इंग्रज सरकार दरडावीत आहे. नवीनच जिंकलेल्या ब्रह्मदेशांत सुखशांततेची स्थापना होत चालली असून ब्रह्मी लोक आपला ' चोरटेपणा ' सोडून देत आहेत ! रशियाचे राजपुत्र या देशांत येऊन सफर करून गेले तरी हिंदुस्थानाच्या राजनिष्ठ प्रजेनें कोठें ढूं का चूं केलें नाहीं; यावरून या सालांत सरकारची सद्दी चांगली चालली हें पाहून कोणासहि संतोष वाटल्यावांचून राहणार नाहीं. इंग्रज सरकारची अशीच सद्दी वाढून हिंदुस्थानच्या उन्नतीस त्यांची सत्ता कारणीभूत होवो असें ईश्वरापाशीं लोकांचें मागणें आहे. परंतु सद्दीचा काल आला असतां कित्येक वेळीं घरच्या माणसांवरहि शिरजोरपणा चालविला जातो तसा कांहीं अंशीं आमच्या सरकारचा प्रकार गेल्या सालांत झाला आहे. राजा व प्रजा यांच्यामधील परस्पर संबंध पाहिला असतां या सालांत प्रजापक्षाची वाढ कांहीं अंशीं कुंठित झाल्यासारखी झाली आहे. या पक्षास त्याच्या एकंदर आजपर्यंतच्या इतिहासांत जो मोठा धक्का बसला तो गेल्या सालांतील होय. आमच्या हिंदुस्थानांत कर्ते पुरुष दिवसानुदिवस नाहींसे होत चालले आहेत. अशा स्थितींत ज्या अलौकिक धैर्याच्या उदार पुरुषानें देशाचा अगर जातीचा भेद मनांत न आणतां आमच्या भरभराटीसाठीं आपला देह झिजविण्याचा संकल्प केला होता व ज्याच्या एकं-

दर चारित्रावरून व हा संकल्प केल्यावर थोड्या कालांतच त्याच्या हातून जी कृति झाली तीवरून तो संकल्प फलद्रूप होण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं होतीं, त्या पुरुषावर घाला घालून मृत्यूनें त्यास इहलोकांतून ओढून नेलें ही आमच्या-सारख्या हताश लोकांस अत्यंत दुर्दैवाची गोष्ट होय ! सोनपतपानपत येथील एकच लढाई गमावल्यामुळें सर्व राष्ट्राचें जसें नुकसान झालें त्याच मानानें किंबहुना याहूनहि जास्त, ब्रॉडलासाहेबांच्या मृत्यूनें आमची व आमच्या देशाची स्थिति झाली आहे. हिंदुस्थानांतील मुत्सद्दी राजे सर टी. माधवराव व आमच्यांतील डॉक्टर राजेंद्रलाल, पंडित विद्यासागर व श्रीमद्दौरीशंकर यांसारखे विद्वान् व सुशील गृहस्थ याच सालांत आम्हांस सोडून गेले. देशाचे अगर प्रजापक्षाचे असले स्तंभ एकामागून एक खचूं लागले व त्यांच्या जागीं त्यांचें ओझें शिरावर घेऊन काम चालविण्यास अद्याप नवीन मंडळी तयार झालेली दिसत नाहीं; अशा स्थितींत " हिंदुस्थानांतील पाणीदार संस्थानिक नाहींसे होऊन त्यांच्या जागीं साधारण माणसें असावीं " अशी हिंदुस्थानसरकारची राज्यनीति असल्याबद्दलचे स्पष्ट उद्गार सर जॉन गोर्स्ट यांनीं पार्लमेंट सभेंत काढलेले याच सालांत आमच्या कानीं आले. सर जान गोर्स्ट यांस त्यांच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल थोडाबहुत वाक्दंड सोसावा लागला, परंतु ज्या प्रकरणाची चर्चा होत असतां त्यांच्या तोंडून हे उद्गार निघाले त्यांचा विचार केला म्हणजे अंडर सेक्रेटरी साहेबांच्या भाषणांत दर्पापेक्षां सत्याचाच अंश जास्त आहे असें आढळून येईल. मणिपूरची राज्यव्यवस्था इंग्रज सरकारानें हात घालण्यापूर्वी कांहीं गैर चालली नव्हती, निदान संस्थानांत हात घालण्यासारखी अगर जुबराजास कैद करण्यासारखी स्थिति खास आली नव्हती; परंतु राजकारणांत नीतिमत्तेची जी इयत्ता आहे त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारास आपल्या एका मित्रावर तुटून पडणें भाग पडलें आणि मणिपूरच्या राजकुलांतील दोन पुरुष फांसावर चढून त्यांच्या जीविताबरोबरच त्यांच्या संस्थानच्या स्वातंत्र्यतेचा नाश झाला ! मणिपूर येथील उंच झाडें अशा रीतीनें तोडलीं गेल्यावर हल्लीं एक लहानसें कलम त्याच्या जागीं लावलें आहे. याची वाढ अर्थात्च हल्लींच्या कालास व स्थितीस अनुकूल अशीच राखली जाईल. सरकारच्या दृष्टीनें ही गोष्ट कदाचित् हितावह असेल, परंतु प्रजेच्या दृष्टीनें आमच्या देशांतील कर्त्या पुरुषांवर सरकारानें येवढी करडी नजर ठेवणें आम्हांस योग्य दिसत नाहीं. स्वतःच्या मर्दुमकीवर मोठ्या अधिकारास व योग्यतेस चढण्याची संधी इंग्रज सरकारच्या राज्यकारभारांत सरकारानें आम्हांस ठेविली नाहीं व नेटिव्ह संस्थानांतहि जर हाच प्रकार होऊं लागला तर नेटिवांच्या अंगीं असलेल्या गुणांस उत्तेजन मिळण्यास कोठेंच स्थळ राहणार नाहीं. लष्करी शिक्षणाच्या शाळा घालण्याचें सरकारानें नाकबूल केलें; आणि संस्थानिकांकडून सरकार जी मदत घेत आहे तीहि

अशा रीतीनें कीं, तीपासून इंग्रजसरकारचें विनखर्चानें सैन्य वाढावें, परंतु संस्थानिकांस किंवा त्यांच्या राजकुलांतील भाऊबंदांस लष्करी शिक्षण, धंदा अगर उद्योग यांचा कांहींच लाभ होऊं नये; नाहीं म्हणावयास काश्मीरच्या महाराजांस थोडाबहुत अधिकार नुकताच देण्यांत आला येवंढीच काय ती दुःखांत सुख मानण्याजोगी गोष्ट गेल्या सालांत घडून आली. बाकी संस्थानांतूनचसें काय, परंतु खालसा मुलखांतूनहि सरकारचें वर्तन शिरजोरपणाचेंच झाल्याचें आढळून येतें. खुद्द हिंदुस्थान सरकारच्या राजधानींत एका देशी वर्तमानपत्रकाराच्या मुसक्या बांधून एखादा शास्त्रीय शोध करण्याकरतां ज्याप्रमाणें एखादा पशु बळी देतात त्याप्रमाणें पीनलकोडाच्या कलमांत राजद्रोहाची जी व्याख्या आहे ती कितपत व्यापक आहे हें ठरविण्यासाठीं या पत्रकाराची आहुती पडणार होती. परंतु अखेरीस समेट होऊन हें प्रकरण आपसांत मिटलें आणि ' बळी तो कानपिळी ' या न्यायानें न्यायाचें व सत्यतेचें सर्व माप सरकारानें आपल्याच पदरांत घेतलें. कलकत्ता हायकोर्टाचे चीफ जस्टिस यांनीं या प्रकरणीं निस्पृहपणानें जो न्याय दिला तो हिंदुस्थानच्या इतिहासांत लिहून ठेवण्यासारखा आहे. वंगवासीचा खटला आणि पोलिटिकल एजंटच्या ताब्यांतील वर्तमानपत्रें कोणत्या रीतीनें चालवावीं याबद्दल झालेले नियम हे लॉर्ड ल्यान्सडौन यांच्या राजनीतीचे उत्तम दाखले होत. लॉर्ड ल्यान्सडौन यांचा कित्ता मुंबई व मद्रास येथेंहि थोडाबहुत गिरविण्यांत आला. मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या सभेस वेबसाहेबांच्या नेमणुकीसंबंधें सरकारांतून आलेला जबाब, मुंबईसारख्या म्युनिसिपालिटीचा पाणउतारा आणि एकंदर म्युनिसिपालिट्यांसंबंधानें दक्षिणेंतील दोन्ही इलाख्यांत सरकारची वक्र दृष्टि,—या सर्व गोष्टी वरिष्ठ सरकारच्या राजनीतीस अनुसरूनच झाल्या आहेत असें म्हणावें लागतें. गेल्या सालांत कायदेकौन्सिलांतून बाहेर पडलेल्या कायद्यांकडे नजर दिली तरीहि हाच प्रकार आढळण्यांत येतो. पुण्याच्या प्रॉव्हिन्शियल कॉन्फरन्सनें ठराव केल्याप्रमाणें संमतिवयाचा कायदा पास करून सरकारानें कायद्यास अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही पक्षांच्या अभिप्रायास सारख्याच वाटण्याच्या अक्षता लावल्या व ' हम् करेसो कायदा ' अशी जी आमच्यामध्यें म्हण आहे तिची सत्यता लोकांच्या प्रत्ययास आणून दिली. गिरण्यांतील मजुरांनीं अमुक तास काम करावें वगैरे इयत्ता ठरविण्यासाठीं जो कायदा गेल्या सालीं पास झाला आहे तोहि याच प्रकारचा आहे. या कायद्याचें तत्त्व संमति कायद्याप्रमाणेंच अगदीं थेट विलायतेहून आलें होतें; परंतु तें कोठूनहि आलें असलें तरी त्यापासून आमचें झालेलें व होणारें नुकसान कमी होत नाहीं. मुंबईच्या कायदेकौन्सिलांतहि वाफेचीं यंत्रें चालविण्याचा कायदा पास झाला तेव्हां कांहीं अंशीं असाच प्रकार घडून आला. शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां म्हणून जें हल्लीं कमिशन बसलें आहे त्याचाहि परिणाम एकंदरींत राज-

सत्ता दृढ करण्याच्या कामींच घडून येणार ! शेतकऱ्यांबद्दल जर आमच्या सरकारास येवढी खरोखरच कळकळ आहे तर मद्रासइलाख्यांतील कांहीं प्रांतांत दुष्काळ आपलें उग्र स्वरूप प्रकट करीत असतां व मुंबई इलाख्याच्या कांहीं प्रांतांतून तो डोकावीत असतां जमिनीवरील साऱ्याचे अवघे सत्तावीसच रुपये वसूल होण्याचे रहावे काय ? शेतकऱ्यांचें कल्याण करण्याची सरकारची बुद्धि नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. तिजोरीस खार न लागतां व जमाबंदीचें नुकसान न होतां शेतकऱ्यांचें जें कल्याण होईल तें करण्यास सरकार तयार आहे; मग त्या कामीं सावकार बुडाले तरी कांहीं हरकत नाहीं. एकंदर देशाच्या दृष्टीनें पहातां सरकारचें हें वर्तन जुलुमांचें व अन्यायाचें आहे. कोणत्याहि देशांत राज्यकर्ते व शेतकरी यांच्या दरम्यान एखादा वर्ग असावा लागतो व तो वर्ग जेथें चांगल्या स्थितींत असेल तेथील राजसत्ता कांहीं मर्यादेंत राहूं शकते. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे शेतकऱ्यांच्या स्थितीची चौकशी करण्याकरितां हल्लीं जें कमिशन बसलें आहे त्यापासून लोकांचें कांहीं कल्याण होईल असें आम्हास वाटत नाहीं. पंजाब वगैरे प्रांतांतून शेतकऱ्यांचा कायदा सुरू नसतांहि विलक्षण तऱ्हेचा अन्याय व जुलूम चालू आहे. यावरून व दुष्काळ हजारों लोकांस मृत्युमुखीं देत असतां त्याची केनसाहेबांनीं परिस्फुटता केली म्हणून लॉर्ड वेन्लाकसाहेबांनीं त्यांस ज्या शिव्या दिल्या आहेत त्यांवरून सरकारची गरीब शेतकऱ्यांबद्दल खरोखर कितपत कळकळ आहे हें स्पष्ट दिसून येतें. तात्पर्य गेल्या सालांत राजकीय खात्यांत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्या सर्वांचें पर्यवसान विलायतेंतील कान्सरवेटिव्ह पक्षाचें धोरण कायम ठेवण्याकडे आहे. ब्रॉडलासाहेबांस, अगर सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं सांगितल्याप्रमाणें ग्लाडस्टनसाहेबांस भिऊन पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांतील मेंबरांची संख्या वाढविण्याचें एक बिल स्टेटसेक्रेटरी यांनीं आणलें व लॉर्ड ल्यान्सडौन यांनीं राष्ट्रीय सभेबद्दल दोन गोड शब्द तोंडांतून काढले येवढ्याच काय त्या दोन गोष्टी लोकांच्या हिताच्या सरकाराकडून करण्यांत आल्या. खुद्द लोकांनीं होऊन राष्ट्रीय सभा कायम ठेवण्याचा परवां ठराव केला ही त्यांच्या तर्फेची व त्यांच्या हिताची गेल्या सालांत त्यांनीं मोठीच गोष्ट केली असें म्हटलें पाहिजे. आतां

सामाजिक

खात्याचा हिशेब बघतां खऱ्या सुधारणेचें बीज जास्त रुजत चाललें आहे असें आढळून येईल. राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें सरकारी सत्ता व अधिकार आकुंचित करून तो लोकांकडे जास्त जाईल अशाकरतां सराकाराशीं आपणांस सामना केला पाहिजे त्याप्रमाणें सामाजिक बाबतींतहि हल्लींच्या व्यवस्थेस ज्या सुधारणा होणें इष्ट आहेत त्या घडवून आणण्याकरतां एकंदर जुन्या व नव्या लोकांशीं सामना करावा लागतो. परंतु या दोन प्रकरणांत मुख्य भेद असा आहे कीं, राजकीय प्रकरणीं

क्रियेचा सर्व भार सरकारावर टाकून आपणांस जसें स्वस्थ बसतां येतें तसें सामाजिक बाबतींत करतां येत नाहीं. ज्या समाजाची स्थिति सुधारण्याचा आपण विचार करीत आहों त्याच्या घटकावयवांपैकींच आपण एक असून आपणांस जर पुढारीपणा घेणें आहे तर सदर अधिकारास योग्य अशी हिम्मत आपल्या अंगीं असली पाहिजे व असली क्रिया आपल्या हातून घडली पाहिजे. हा भेद महत्त्वाचा आहे व तो उत्तरोत्तर लोकांच्या जास्त लक्षांत येत चालला आहे. पुनर्विवाहास उत्तेजनार्थ लांब लांब भाषणें करून अगर प्रसंग पडल्यास कन्यादानहि करून शेवटीं पंक्तिप्रसाद घेण्याचा प्रसंग आला म्हणजे पोटदुखीची सबब सांगून यःपलाय करणारे सुधारक उत्तरोत्तर लोकांच्या निंदेस पात्र होऊं लागले आहेत. लोकांची खरी उन्नति होण्यास शंकराचार्य, बुद्ध, तुकाराम यांसारखे अवतारी पुरुष झाल्याखेरीज गत्यंतर नाहीं, ही गोष्ट लोकांच्या मनांत जास्त जास्त येऊं लागली आहे. संमतिकायद्याच्या वेळीं आमच्या पुढारी म्हणविणारांनीं जो पोचटपणा दाखविला व आपली सामाजिक स्वतंत्रता सरकारच्या घरांत घालण्याबद्दल जी उत्सुकता प्रदर्शित केली, आणि त्यांच्या येवढ्या कळकळीस सरकारानें अखेरीस जो मान दिला, त्याजवरून आज २५ वर्षें हें काम ज्यांनीं हातांत घेतलें आहे त्यांजकडे तें तसेंच राहूं दिल्यास अगर त्यांच्या इच्छेप्रमाणें या बाबतींत पुढें व्यवस्था राहिल्यास काय नुकसान होईल हेंहि लोकांस कळून आलें आहे. अन्यजातीयांच्या हातचा चहा घेतला असतां तो कबूल करण्याचें ज्यांचें धैर्य होत नाहीं, परंतु त्याबद्दल सामाजिक परिषदेच्या वार्षिक रिपोर्टांत फुशारकीनें उल्लेख करणें ज्यांस प्रशस्त वाटतें त्यांच्या हातून सुधारणेचें अवजड काम कितपत पार पडेल हें आम्ही आजच्या आढाव्यांत नवीन सांगावयास पाहिजे असें नाहीं. संमतिकायदा केवळ जुलुमानें व अन्यायानें पास केला हें जरी अक्षरशः खरें आहे, तरी त्या कायद्याच्या वेळीं जी चोहोंकडे चळवळ झाली तीमुळें आमच्या पुढारी म्हणविणारांत कितपत पाणी आहे, त्यांच्या हातून कोणत्या गोष्टी होणें शक्य आहे, त्यांच्यावर आपण किती अवलंबून राहावें इत्यादि बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला आहे. या लोकांनीं गेल्या पांचपंचवीस वर्षांत ज्या संस्था उभ्या करण्याचा प्रयत्न केला आहे त्या निरुपयोगी आहेत इतकेंच नव्हे, तर प्रसंगविशेषीं स्वतःच्या दुर्बलतेवर पांघरूण घालण्यासाठीं परकीयांस आपल्या घरांत बोलावून त्यांच्या हातांत घरची व्यवस्था देण्यासहि या संस्था कारणीभूत होतील, याचा अनुभव आपणांस आलाच आहे. या सर्व अनुभवाचा पुढें कोणत्या तऱ्हेनें उपयोग करून घ्यावा, इतउत्तर सामाजिक सुधारणेस कोणती दिशा लावावी व खरे पुढारी कोणास म्हणावें, चांगले पुढारी आतां मिळत नसल्यास ते मिळेपर्यंत काय तजवीज करावी या सर्व गोष्टींचा विचार अजून घाटत आहे; व हल्लींचा क्रम असाच सुरू राहिल्यास त्याचा लवकरच निर्णय होईल. जातीच्या हक्कासंबंधानें मुंबईहायकोर्टानें केलेले एक दोन ठराव

आपणांस वरेच अनुकूल आहेत. त्याच पायावर 'धर्मसंस्थापने' करितां एखाद्या संस्थेची उभारणी केल्यास व तिला योग्य पुढारी मिळाल्यास ह्या कामीं बरेंच यश येण्याचा संभव आहे. शारदासदनासंबंधानें जो वाद उपस्थित झाला त्यावरून आणि रावबा. रानडे यांनीं डॉ. पेंटिकास्ट यांस जें उत्तर दिलें त्यावर जी चर्चा झाली त्यावरून अन्यधर्मांचीं तत्त्वें अगर मतें स्वीकरण्याकडे लोकांचा अद्याप कल झाला नाहीं असें दिसून आलें. हाच कल कायम ठेऊन व हल्लीं पुढारी म्हणविणारांनीं जुन्या संस्थांस जी दुर्बलता आणली आहे ती काढून टाकून सर्वांच्या अनुमतीनें व मदतीनें नवीन संस्था आमच्या मध्यें लवकरच उपस्थित झाली पाहिजे ती केव्हां होईल तो सुदिन. आज तिकडे लोकांची थोडीबहुत प्रवृत्ति होत चालली आहे येवढीच आनंदाची गोष्ट आहे. राष्ट्रीय सभेच्या पाठीमागून सूर ओढून त्या संस्थेप्रमाणें आपणांसहि महत्त्व व मान मिळावा अशाबद्दल जे प्रयत्न चालू होते त्यांवरहि परवांच्या सामाजिक परिषदेंत विरजण पडलें आहे. या संबंधाची सविस्तर हकिकत आजच दुसरीकडे दिली असल्यामुळें येथें त्यासंबंधानें कांहीं विशेष उल्लेख करण्याची जरूर नाहीं. गेल्या सालाच्या उदीम व्यापारांसंबंधानें एकंदर आढावा स्वतंत्र दिला आहे त्यावरून गेल्या सालाच्या व्यापाराची स्थिति कळून येईल. आतां फक्त एकाच खात्यासंबंधें हिशोब तपासणें राहिला आहे. तें

खुद्दखातें


होय. केसरी व केसरीकार यांस १८९१ सालाइतकें कठीण साल दुसरे कोणतेंच गेलें नसेल. सन १८८२ सालीं कै. माधवराव बर्वे यांच्याशीं ज्या वेळेस केसरीस सामना करण्याचा प्रसंग आला त्या वेळींहि इतक्या अडचणी त्याजवर आल्या नव्हत्या. एकवेळ बाहेरचे शत्रु पुरवतात परंतु घरांतला भेद पुरवत नाहीं. कालगतीनें या दोन्हीहि अवस्थांतून केसरीस व केसरीकारांस गेल्या सालीं जाणें भाग पडलें; परंतु ज्यांच्या अनुग्रहानें व आश्रयानें आजपर्यंत लोकसेवा करण्यास त्यानें मागेंपुढें पाहिलें नाहीं, त्यांच्याच मदतीनें तो या दोन्हीहि अडचणींतून पार पडून पुनः पहिल्याप्रमाणेंच एकनिष्ठपणानें व निस्पृहतेनें लोकांचीं सेवा करण्यास तयार आहे. एक पक्षीं आपलीं मतें पूर्णपणें प्रतिपादन करण्यास त्यास ज्या कांहीं अडचणी होत्या त्या नाहींशा होऊन भवभूतीनें म्हटल्याप्रमाणें:—

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम् जानन्ति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।

असें म्हणण्याची त्यास स्थिती आली ही मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे. ज्यास असली वृत्ति धरावयाची असते त्यास इतर कवींप्रमाणें राजाश्रयाची अगर राजानुचराश्रयाची अपेक्षा न धरतां त्यावर पाणी सोडावें लागतें हें भवभूतीच्या चरित्रावरूनच स्पष्ट होत आहे. केसरीकारांच्या वर्तनाबद्दल कांहीं स्वार्थपरायण व दुराग्रही मंडळीकडून वेळोवेळीं केसरीवर घोरपड आणण्याचे प्रयत्न होत असतात हें तो जाणून आहे व हें उसनें फेडण्याचीहि पाहिजे असल्यास त्याजपाशीं तयारी

आहे, परंतु इतक्या थरावर ही गोष्ट येऊं नये अशी त्याची इच्छा आहे. इतकें असूनाहि जर त्याच्या इच्छेविरुद्ध त्यास वर्तन करावें लागलें तर तें तो आपल्या नेहमींच्या रीतीप्रमाणेंच निस्पृहपणानें व निर्भिडतेनें करील हें आम्ही सांगावयास पाहिजे असें नाहीं. केसरीकारांस मनुष्यापेक्षां अगर संस्थेपेक्षां लोकहिताचीं म्हणून जीं कांहीं तत्त्वें आहेत तीं जास्त प्रिय आहेत. या तत्त्वांबद्दल आपली एकनिष्ठता कायम ठेवणें हें तो आपलें मुख्य कर्तव्य समजतो. हें कर्तव्य बजावीत असतां व्यक्तीची तो कांहीं पर्वा ठेवणार नाहीं. आतां हा राजनिष्ठेचा प्रकार कदाचित् आक्षर्य व तेलंगसाहेब ज्यांस मोठे समजतात त्यांस मान्य नसेल, परंतु त्यास केसरीकारांचा नाइलाज आहे. 'हितं मनोहारि च दुर्लभं वचः' ही जी संस्कृतांत म्हण आहे ती सर्वांशीं खरी आहे. आपण होऊन मुद्दाम कोणाच्या वाटेस जाण्याचें केसरीचें अदि नाहीं, परंतु जर कोणी त्यास अनुमत असलेल्या तत्वाविरुद्ध आचरण करील अगर आपलें लेखनपटुत्व दाखविण्याकरितां वल्गना करूं लागेल तर त्या सर्वांचा समाचार घेण्यास केसरी एकाकीहि कधीं मागें पुढें घेणार नाहीं.

असो. सरतेशेवटीं ज्यांच्या आश्रयानें आम्हास गेल्या वर्षीं लोकसेवा करतां आली त्यांचे आभार मानून व त्यांनीं आम्हास आजपर्यंत जो आश्रय दिला तो आमच्या पुढील वर्तनानें कायम ठेवण्याची त्यांस उमेद येवो अशी आशा बाळगून गेल्या सालाचा आढावा येथें पुरा करतों. या सालाची बाकी आमची लोकांकडे अगर लोकांची आमच्याकडे थकत असल्यास तिचें पुढील सालाकरतां नवें खातें घातलें जाईल.



* शेतकऱ्यांचा कायदा

हिंदुस्थानांतील एकुणीस-विसांश लोकांचा उदरनिर्वाह परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें जमिनीवर चालतो; पण त्या जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरी वर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे ह्याचा विचार केला म्हणजे आंगावर कांटा उभा रहातो. घरांत अठरा विस्वे दारिद्र्य ! कर्जाचा बोजा डोईवर इतका कीं घरदार गुरेंढोरें गहाण पडलीं तरी सालअखेर कशी मजल पोंचेल ह्याची पंचाईत ! सरकारदस्त तर दरवर्षास तारखेच्या तारखेस भरला पाहिजे, नाहीं तर जमिनीचा लिलांव होण्याची पाळी यावयाची. त्यांत अवर्षण, टोळधाड वगैरे अवांतर अरिष्टें अलीकडे वरचेवर कृपादृष्टि करूं लागल्यामुळें दोनचार वर्षांनीं यमस्वरूपी दुष्काळ दत्त म्हणून उभा आहेच ! वर्षांतून आठ महिने

* [ता. २ फेब्रुवारी १८९२]

उपासमार सोसून केवळ पुढच्या हंगामाच्या आशेवर कसें तरी जीवित कंठावें, व शेवटीं ऐनवेळीं पावसानें टाळा दिला म्हणजे सावकाराचें घर पहावें अशी बिचाऱ्या शेतकऱ्यांची स्थिति पाहून कोणास बरें कींव येणार नाहीं ? पूर्वी अशा प्रसंगीं सावकार लोक उदारपणानें शेतकऱ्यांस मदत करीत, व वेळीं राजेलोकहि सूट देत; पण अलीकडे तेहि मार्ग बंद झाले. शेतकऱ्यांचा कायदा झाल्यापासून सावकार कर्ज देईनातसे झाले, कारण आपले पैसे परत मिळतील असा त्यांना मुळींच भरंवसा नाहीं. सरकार तर बोलूनचालून व्यापारी, तेव्हां सुटीची गोष्टच नको. पाऊस असो वा नसो, पीक येवो अगर न येवो, शेतकरी व त्यांचीं मुलें-माणसें उपाशीं मरोत किंवा तुरुंगांत जावोत, सरकारदस्त नेमलेल्या तारखेच्या आंत कचेरींत भरलाच पाहिजे. यंदा सोलापूर जिल्ह्यांत दुष्काळ इतका आहे कीं सध्यांच लोक दोन पैशाला गाई-बैल विकूं लागले, तरी सरकार देणें थकलें काय तें तेवीस रुपयेच ! आणि ही स्थिति येण्याला कारण सावकार लोकांचा जुलूम अशी सरकारची पक्की समजूत झाली ! तेव्हां सावकारांच्या त्रासापासून शेतकऱ्यांचें रक्षण करण्याकरितां म्हणून सरकारानें शेतकऱ्यांचा कायदा केला; पण त्यापासून उपयोग कांहीं एक न होतां ज्यांच्या हिताकरितां तो करण्यांत आला त्यांचे हाल वाढतच चालले. सावकारांचा जाच कमी व्हावा म्हणून सरकारानें शेतपेढ्या काढल्या, व स्वतःच सावकारी करण्यास सुरुवात केली; तरी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत्या दिशेलाच आहे. इतकेंच नाहीं तर शेतकऱ्यांचें दारिद्र्य कमी करण्याकरितां जो कायदा केला तोच उलटा त्यांना घातक होतो अशी लोकांची ओरड आहे; तेव्हां एकंदर प्रकरणाची चौकशी करण्याकरितां सरकारनें कमिशन नेमलें. एखादी गोष्ट अगदीं नेटास लागली म्हणजे चौकशी करण्याकरितां कमिशन नेमून तूर्तातूर्त तरी लोकांचीं तोंडें बंद करणें हा एकुणिसाव्या शतकांत सर्वसंमत झालेला सुधारलेला उपाय आमच्या सरकारास चांगला अवगत आहेच. त्याप्रमाणें शेतकऱ्यांची खरी स्थिति समजून घेण्याकरितां म्हणून नुकतेंच नेमलेलें कमिशन गांवोगांव फिरून पुरावा गोळा करूं लागलें आहे हें ठीकच झालें. ह्या एवढ्या खटाटोपापासून अगदींच कांहीं निष्पन्न होणार नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं; तरी पण आजपर्यंत होऊन गेलेल्या शेंकडों कमिशनांचा इतिहास पहिला म्हणजे ह्या विषयाचा एकदांचा शेवट होईल अशी आशा करण्यास फारसें सबळ कारण दिसत नाहीं. कमिशनाचें काम चालू आहे म्हणून सध्यांच ह्यासंबंधानें आम्ही काहीं अभिप्राय देऊं इच्छित नाहीं, तथापि त्यापासून खरोखर फलप्राप्ति करून घेण्याची लोकांची इच्छा असेल—आणि तशी असलीच पाहिजे—तर आपल्याकडून होईल तितकें करून वस्तुस्थिति कमिशनरांच्या नजरेस आणणें प्रत्येक जिल्ह्यांतील, तालुक्यांतील व खेड्यांतील लोकांनीं आपलें कर्तव्य समजलें पाहिजे, एवढें येथें सांगणें

जरूर आहे. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचें मुख्य कारण सावकारांचा जुलूम नसून सरकाराचाच कडकपणा होय. पण ह्या गोष्टीकडे सरकारतर्फे नेमलेल्या कमिशनाचें दुर्लक्ष होण्याचा पुष्कळ संभव आहे, आणि सर्व दोषांचें खापर बिचाऱ्या सावकारांच्या डोक्यावर फोडून शेतकरी कायदारूपी रामबाण औषधाचा आणखी एकवार प्रयोग केल्यानें आपल्यावरची जबाबदारी टाळण्याची संधी सांपडल्यास सरकारास आनंदच होईल हें उघड आहे; सबब ह्या प्रसंगीं लोकांनीं आपल्याकडून कोणत्याहि प्रकारची कसूर होऊं देणें रास्त होणार नाहीं. असो, ह्या विषयावर कलकत्ता येथील स्टेट्स्मन पत्रांत फार विचारपूर्वक लेख आले आहेत ते कमिशनच्या नजरेखालीं जातीलच; पण लोकांनाहि त्यांची माहिती असणें अवश्य आहे; सबब त्यांतील मुख्य मुद्दे मात्र सारांशरूपानें आज देतों. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाबद्दल सावकार लोक जबाबदार नसून खरें कारण सरकाराचाच कडकपणा होय; इतकेंच नाहीं, तर सावकार लोकांपासून शेतकऱ्यांस पूर्वी जी पुष्कळ प्रकारची मदत मिळत असे तीहि कायदा झाल्यापासून बंद झाल्यामुळें त्यांचे अतिशयच हाल होऊं लागले आहेत, वगैरे गोष्टी स्टेट्स्मनकर्त्यांनीं सुरेख रीतीनें सिद्ध केल्या आहेत, व हल्लींची स्थिति सुधारण्यास खरा उपाय एकच आहे तोहि त्यांनीं सुचविला आहे.


गेल्या नोव्हेंबर महिन्यांत सरकारानें एक वट हुकूम प्रसिद्ध केला, त्यांत म्हटलें आहे कीं दक्षिणप्रांत इंग्रजसरकारच्या ताब्यांत आला त्या वेळेसच सर्व रयत कर्जानें बेजार होती व म्हणून प्रत्येक भावांत सावकाराची हमेशा जरूर पडत असे, परंतु हें विधान भ्रांतिमूलक आहे असें स्टेट्स्मनकर्त्यांचें म्हणणें आहे. सर्व खेड्यांमध्यें दिसावयाला कर्जाची मोठी रक्कम दिससे खरी; पण तें कर्ज खेड्याचें समाईक असे, शेतकऱ्यांचें खासगी नसे, व तें फेडण्याची जबाबदारीहि एकंदर गांवावर असे. प्रथमतः गांवच्या वसुलाच्या हमीवर सावकार लोक, पेशवे सरकारास म्हणून कर्ज देत; आणि तें फेडण्याच्या वेळेस गांवचा पाटील तें उत्पन्नांतून चुकतें करी. कर्ज फार वाढलें तर एखाद्या वर्षीं वसूल माफ करून फेड करून टाकीत; व चाप्लिनसाहेब म्हणतात कीं नेहमीं अशीच वहिवाट असे. थोडें असेल तर गांवकरी आपणच तें चुकवीत. एकंदरींत रयतेच्या पूर्वीच्या स्थितींत व इंग्रजी सुधारणा अमलांत आल्यानंतरच्या स्थितींत कोणत्याहि प्रकारचें साम्य नाहीं. एल्फिन्स्सनं, चाप्लिन, थाकरी, ग्रांटप्रभृतीनीं ह्यासंबंधानें सविस्तर लिहून ठेवलेले रिपोर्ट मुंबई सेक्रेटारियटच्या दप्तरांत केसरीच्या भक्ष्यस्थानीं पडत आहेत पण तिकडे कोणाचेंहि लक्ष जात नाहीं. १८७५ सालीं सावकाराच्या जुलुमास त्रासून त्यांचा सूड घेण्याकरितां शेतकाऱ्यांनीं दंगा केला होता, तेव्हां एक कमिशन नेमलें व त्या कमिशनानें एक भला जंगी रिपोर्ट प्रसिद्ध केला. पण त्यांत मुख्य कारण एकीकडेच ठेवून बारीकसारीक गोष्टीवरच जोर दिला

होता; व नंतर सरकारानें शेतकऱ्यांचा कायदा केला त्यांतहि तोच प्रकार हल्लींची इंग्रजी राज्यपद्धति ही स्थिति येण्यास किती अंशानें कारण झाली आहे ह्याचा कोणीच विचार केला नाहीं, आणि खरेंच, इंग्रजी कामदारांना हल्लींची व्यवस्था उत्तम वाटते, तेव्हां त्यांना तींत दोष दिसले नाहींत तर आश्चर्य नाहीं ! आणि म्हणूनच शेतकरी कायद्यासारखा अर्धवट कायदा झाला. त्यानें मुख्य कारणाचा प्रतिकार मुळींच झाला नाहीं; व शेतकऱ्यांचें दारिद्र्यहि जसेंचें तसेंच राहिलें. फार तर सावकारांचा तात्कालिक जुलूम वांचला असेल. त्या कायद्याप्रमाणें शेतकऱ्यांच्या स्थावर इस्टेटीवर सावकाराचा हक्क नाहीं पण गुरें आउतें वगैरे आवश्यक साधनें त्याला विकतां येतात. अर्थात् तीं नवीन खरेदी करण्यास कुणब्यास पुनः सावकाराचें तोंड पाहिलेंच पाहिजे व त्याकरितां घरदार, जमीन गहाण ठेवावी लागते. येणेंप्रमाणें पहिल्या खेपेस नाहीं तरी दुसऱ्या खेपेस तो सर्वस्वी मुकतो. कायद्यांत दुसरींहि बारीक-सारीक व्यंगें आहेत पण त्यांचा विचार येथें नको. सरकार धाराच मुख्यत्वेंकरून लोकांच्या दैन्यास कारण आहे, व म्हणून तो कायमचा ठरवून न टाकतां रयतेच्या ऐपतीप्रमाणें घ्यावा अशी मागील कमिशनानें भीत भीत सूचना केली होती. परंतु मुंबई सरकारास अर्थात्च ती न आवडून असें करणें म्हणजे आजपर्यंतच्या सुधारणा व्यर्थ दडवून पुनः पूर्वास्थिति आणणें होय, तेव्हां ती गोष्ट कदापि होणें नाहीं असें चोख उत्तर तिकडून मिळालें ! असो मुंबई सरकारानें डोळे झांक केली तरी हिंदुस्थान सरकारानें ह्या गोष्टीचा विचार करावा व एकाददुसऱ्या प्रांतांत तरी कमिशनानें सुचविलेल्या उपायाचा अनुभव घेऊन पाहावा अशी स्टेट्स्मनकर्त्यांची शिफारस आहे. व ती वावगी आहे असें कोण म्हणेल ?

शेतकरी कायद्यानें दक्षिणेंतील कुणब्याची अवस्था सुधारत न जातां अधिक अधिकच खडतर होत आहे, अशी आतां सर्वांची खात्री झाली आहे व ही स्थिति राहूं दिली तर ती इतर प्रांतांतहि फैलावून कांहीं तरी भयंकर अरिष्ट ओढवेल असें वाटतें; सबब तावडतोब उपाय योजणें शहाणपणाचें काम आहे. ह्या संबंधानें विचार करावयाचा तिघांचा ,शेतकरी सावकार आणि सरकार. कोणत्याहि व्यवस्थेनें ह्या तिघांचें हित होईल तर ती उत्तम; पण हल्लीं तिघांचेंहि नुकसान होत आहे. रयतेच्या पाठीस तर हाल लागलेच आहेत. ह्या सर्व अरिष्टाला कारण सावकार अशी पुष्कळांची समजूत असल्यामुळें त्याची कोणाला कींव येत नाहीं; पण ही चूक आहे. वस्तुतः सावकारावांचून रयतेचें चालावयाचेंच नाहीं. शेतकीस लागणारें भांडवल तो पुरवितो; पण कर्जदार बुडाला कीं तो बुडालाच इतकेंच नाहीं तर तें भांडवलहि पुष्कळदां त्याचें नसून त्यानें दुसऱ्या मोठ्या पेढीवरून आणलेलें असतें. शेतकरी एखादे वेळेस सुटून जातो, पण तो मात्र मध्येंच बुडतो. म्हणूनच सर रेमंड वेस्टसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें दिवाणी तुरुंगांत ह्या सावकारांचाच

विशेष भरणा आढळतो. बरें, सरकारचाहि फायदा होतो असें नाहीं. सार्वजनिक कामें पुष्कळ करावयाचीं असतात, पण वसुलाची रक्कम कायम. तेणेंकरून दुष्काळच्या वर्षीं सूट मदत म्हणून तोटा येतो व सुकाळीं मात्र कांहीं फायदा होत नाहीं. वसूल रुपयांनीं आल्यामुळें बट्टा पडतो तो निराळाच. एकंदरींत हल्लींच्या रीतीनें सर्वांचेंच नुकसान होतें. रयतेची नेहमीं हातातोंडाशींच गांठ असल्यामुळें जमिनींत सुधारणा करण्यास त्याला सामर्थ्य नाहीं व उत्तेजनहि मिळत नाहीं. दक्षिण प्रांतांत पिक तर इतकें अनिश्चित आहे कीं, तीन वर्षांत एकदां चांगलें पिक आलें म्हणजे भाग्य असें चांगल्या माहितगारांचें म्हणणें आहे. आम्ही म्हणतों त्याप्रमाणें सरकारदस्त पैशाच्या रूपानें न घेतां बताई किंवा उत्पन्नाच्या रूपानें घेतला म्हणजे ह्या व दुसऱ्या सर्व अडचणी दूर होतील व तसें करणें फारसें कठीणहि नाहीं. हल्लीं सरकारच्या आचरणानें रयत व सावकार ह्यांच्यामध्यें विनाकारण द्वैतभाव उत्पन्न झाला आहे, तसा तो राहण्याचें कारण नाहीं. सर विल्यम वेडरबर्नसाहेबांसारखी ह्या विषयाची दुसऱ्या कोणासहि माहिती नाहीं. व त्यांनीं हीच पद्धति उत्तम ठरविली आहे. ह्या पद्धतीनें दुष्काळच्या वर्षीं जेव्हां मुळींच पिक नसेल तेव्हां रयतेला कांहीं द्यावें लागणार नाहीं; व त्याचा वचपा अर्थात् सुबत्ता असेल त्यावर्षीं निघून सरकार व रयत दोघांसहि फायदा होईल. बताई वसूल करण्याची अडचण वाटेल तर प्रत्येक गांवांत सरकारानें जमीनदार म्हणून मनुष्य नेमावेत व त्यांस मक्ता देऊन जबाबदार धरावें. ते कुलीन व ऐपतदार असले म्हणजे झालें. येणेंप्रमाणें सर्वांचाहि फायदा आहे.

असो. स्टेट्स्मन पत्रकर्त्याचे वरील विचार प्रत्येकानें मनन करण्यासारखे आहेत हें निराळें सांगावयास नकोच. कमिशनचें तिकडे लक्ष जाईल अशी आम्ही आशा करितों.



* राजद्रोह !

एकदां एखाद्या मनुष्यास नाहक गिल्ला करण्याची संवय लागली म्हणजे ती कांहीं केल्यानें सुटत नाहीं. आजपर्यंत टाइम्स ऑफ इंडिया आदिकरून इंग्रजी वर्तमानपत्रकारांची आम्हां गरीब नेटिवांवर कायती वक्रदृष्टि असे. सरकारच्या वर्तनांत कोणीं कांहीं दोष काढला अगर अमक्या एखाद्या वर्तनाचा परिणाम सरकारास अगर देशास त्रासदायक होईल असें म्हटलें कीं, ही मंडळी डोळ्यांत तेल घालून राजद्रोहाची तप्त मुद्रा आम्हांस देण्यास तयार असत, व त्यांचे कित्येक जातभाईहि यांच्या पाठीमागून सूर ओढीत; परंतु ही जो आमच्या

* [केसरी–ता. ५ एप्रिल १८९२]

प्रतिपक्षाची आमच्यावर मधून मधून मेहेरबानी होत असे ती त्यांच्यापैकींच कोणी आमचा पक्ष घेऊन भांडूं लागल्यास त्याच्यावर होणार नाहीं, निदान आमच्यावर ज्याप्रमाणें सदैव वक्रदृष्टि असावयाचीच तशी तरी त्याजवर राहावयाची नाहीं असें आम्हांस वाटत होतें; परंतु सुमारें दीड महिन्यापूर्वी ह्यूमसाहेबांनीं काँग्रेसच्या प्रत्येक सभासदास जें एक छापील खासगी पत्र म्हणून पाठविलें होतें त्याच्यावर गेल्या आठवड्यांत मुंबईतील टाइम्स व ग्याझेट यांनीं जी झोड उडविली आहे ती पाहून आमचा गैरसमज दूर झाला; व मनुष्याचे हेतु कितीहि चांगले असले व त्याचा उपदेश कितीहि खरा व हितकर असला तरी सरकारच्या वर्तनाबद्दल नेटिवांच्या तर्फे एकहि वाईट शब्द काढलेला सहन न होण्याची या पत्रकारांस जी खोड लागली आहे ती कदापि दूर व्हावयाची नाहीं अशी आमची खातरी झाली. असो. ह्यूमसाहेबांच्या ज्या सरक्युलरावर या पत्रकारांनीं इतकी झोड उडविली आहे तें खरोखरच राजद्रोही आहे कीं काय हें पाहूं.

राजद्रोह या शब्दाची व्याख्या करणें जरा कठीण आहे व विशेषतः परकीय राजाच्या सत्तेखालीं या गुन्ह्याचें लक्षण बरेंच कडक होण्याचा संभव असल्यास विशेष पंचाईत पडते. कोणत्याहि देशांतील राज्यव्यवस्था सर्वांशीं निर्दोष नसावयाचीच व जर ती निर्दोष नसावयाची तर त्यांतील व्यंगें बाहेर काढून तीं सुधारण्याचाहि उद्योग कांहीं देशाहितेच्छु लोक नेहमीं करीत राहणारच. हे लोक राज्यकर्त्यांच्याच जातींचे असल्यास त्यांच्या हेतूसंबंधानें राज्यकर्त्यांचा गैरसमज होण्याचा संभव नसतो. ह्यूमसाहेबांस आमच्यापेक्षां जो विशेष फायदा आहे तो हाच. सन १८५७ च्या बंडाच्या प्रसंगीं सरकारच्यातर्फे यांनीं खटपट करून व सरकारच्या नोकरींत थेट सेक्रेटरीच्या कामापर्यंत कामें चालवून बहादुरी मिळविली आहे; तेव्हां ह्यूमसाहेब सरकारच्या गैरहिताची एखादी गोष्ट करतील हें ध्यानींमनींहि येण्याचा संभव नाहीं. त्यांची एखादे वेळीं गैरसमजूत होईल अगर फार झालें तर (कित्येकांच्या म्हणण्याप्रमाणें) बुद्धिभ्रंशहि होऊं शकेल; पण जाणुनबुजून सरकारच्या अहिताची त्यांच्या हातून गोष्ट घडेल असा संशय सुद्धां कोणाच्या मनांत यावयाचा नाहीं. टाइम्स व ग्याझेट पत्रकर्त्यांस ही गोष्ट पूर्ण माहीत आहे. तथापि एकदां आवेशाच्या भरांत मनुष्य बहकूं लागला म्हणजे तो कोणीकडे वाहवेल याचें त्यांसहि धोरण रहात नाहीं. ह्यूमसाहेबांचें सरक्युलर, त्यांनीं हिंदुस्थान सोडल्यानंतर त्यांच्या पाठीमागें प्रसिद्ध झालें यांतच कांहीं तरी गोम आहे आणि ह्यूमसाहेब वेडा तर खराच, परंतु त्याच्या वेडेपणांतहि कांहीं मतलब आहे असें या पत्रकारांचें म्हणणें आहे. आमच्या मतें ह्यूमसाहेबांवर केलेला हा आरोप अगदीं निराधार व मूर्खपणाचा आहे. ह्यूमसाहेबांनीं काढलेलें सरक्युलर फक्त राष्ट्रीयसभेच्या सभासदांकरतांच असून तें खाजगी समजून कोणीहि छापूं नये असें स्पष्ट लिहिलें होतें; परंतु आमच्यापैकींच कांहीं घरभेदी

मंडळींनीं आणि गांव आहे, तेथें म्हरवडा आहे या म्हणीप्रमाणें ही मंडळी सर्वत्र असावयाचीच—हें सरक्युलर व त्यावरील पत्रव्यवहार अलाहाबादच्या एका मॉर्निंगपोष्ट नामक इंग्रजी पत्रकर्त्यास दिला व त्यानें तो सर्व छापून प्रसिद्ध केला. या पत्रकारास हा पत्रव्यवहार ह्यूमसाहेब येथें असत तोंपर्यंत चोरून प्रसिद्ध करण्याची संधी सांपडली नाहीं म्हणून त्याचा दोष ह्यूमसाहेबावर लादावयाचा हा इंग्रजी न्याय आमच्या इंग्रजी बंधूसच शोभतों ! जो पत्रव्यवहार वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊं नये अशी ह्यूमसाहेबांची इच्छा होती व ते येथून गेल्यानंतर कांहीं खटपटी गृहस्थांनीं त्यांस न विचारतां केवळ लबाडीनें व दांडगाईनें जो प्रसिद्धीस आणला त्याची जबाबदारी ह्यूमसाहेबांच्या माथ्यावर ठेवावयाची ही अजब युक्ति आमच्या इंग्रजी बंधूखेरीज कोणासच सुचली नसती. असो; पण ही त्यांची युक्ती नवी आहे असें नाहीं. चोर आपला गुन्हा छापविण्यासाठींच लोकांवर कांहीं तरी मिथ्या आरोप करीत असतो. सध्यांचा प्रकारहि त्यांतलाच आहे. ज्या लोकांनीं हा पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे त्यांसच जर तो १०—१५ दिवस अगोदर सांपडता तर तो ह्यूमसाहेब येथें असतांच त्या लोकांनीं प्रसिद्ध केला असता; परंतु तसें करण्यास सवड मिळाला नाहीं; म्हणून ह्यूमसाहेबांच्यां पाठीमागें प्रसिद्ध करून पुनः ह्यूमसाहेबांचाच इरादा ह्याप्रमाणें होता अशी ओरड करण्यासहि मंडळी तयार आहेच. यांचें नांव इंग्रजी कावा व शहाणपण !

ह्यूमसाहेबांनीं जें सरक्युलर काढलें आहे तें राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी या नात्यानें नसून त्यांनीं आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर म्हणजे फक्त ए. ओ. ह्यूम अशी सही घालूनच काढलें आहे. कांग्रेसची संस्था आज ७—८ वर्षें कशी काय चालली आहे हें सर्वांसच माहीत आहे. ह्यूमसाहेब परकीय असूनहि आज आपला सर्व वेळ, बुद्धि व पैसा या कामीं खर्च करीत आहेत. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या जातींतील लोक त्यांस ' मूर्ख ' ' वेडेपीर ' इत्यादि वेशेषणें देत असतांहि केवळ नेटिवांच्या कल्याणाकरतांच ह्यूमसाहेबांनीं या कामाचा विडा उचलला आहे; परंतु आम्हांला त्यांचें काय होय ? आज हिमालयाच्या पायथ्यापासून तों केप-कॉमोरिनच्या टोंकापर्यंत विद्येनें, धनानें व अनुभवानें ह्यूमसाहेबांच्या तोडीचे आमच्यामध्यें किती तरी लोक निघतील ! पण ह्यूमसाहेबांप्रमाणें राष्ट्रहिताच्या कामीं झटून मेहनत करणारा आर्यमातेचा पूत तिन्ही इलाख्यांत सांपडूं नये काय? बायका, पोरें, सगेसोयरे सर्वांसच असतात; पण विलायतसारख्या स्वतंत्र व ऊर्जितदशेंत असलेल्या राष्ट्रांतून ज्याप्रमाणें ब्राडलासारखे महात्मे निघतात तसा इकडे एकहि निघूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? प्रजा उत्तरोत्तर भिकारी होत चालली ही गोष्ट अनुभवानें प्रत्येकास ठाऊक आहे. कित्येकांस तर एक वेळची देखील पोटभर भाकर मिळत नाहीं; परंतु प्रजेची ही दरिद्रावस्था प्रत्यक्ष आमच्या डोळ्यापुढें असतांहि आपण हातपाय हालवीत नाहीं, आपणांस त्यांची कींव येत

नाहीं व त्यांची स्थिति सुधारण्याकरतां स्वतःच्या पदरास चट्टा लावून घेण्याची आमची बुद्धि होत नाहीं ही शोचनीय गोष्ट आहे. ह्यूमसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं, " हा जो तुम्हीं निष्काळजीपणा व बेफिकिरीपणा चालविला आहे, याचें भयंकर परिणाम तुम्हांस केव्हां ना केव्हां तरी सोसावे लागतील. तुम्ही आपल्या डोळ्यांवर कातडें ओढून घ्याल, पण एकंदर प्रजा दारिद्र्याच्या व भुकेच्या भट्टींत पडून तावून निघाली म्हणजे त्यांस तुमच्या डोळ्यावरील कातडें दूर करण्यास एक क्षणभरहि वेळ लागणार नाहीं. तुम्हांस असें वाटत असेल कीं, या गरीब प्रजेच्या हातून काय होणार? परंतु हा तुमचा समज अगदीं चुकीचा आहे. क्षुधा व दारिद्र्य मनुष्यास काय करावयास लावील याचा नेम नाहीं. फ्रान्स देशांत राज्य-क्रांति होण्यापूर्वी अशीच शांतता दृष्टीस पडत होती; पण प्रसंग आला तेव्हां ती सर्व एका क्षणांत नाहींशी होऊन जिकडे तिकडे एकच कल्होळ होऊन गेला. सरकार अशा समयीं तुमचें संरक्षण करील असें जर तुम्हांस वाटत असेल तर तीहि चूक आहे. दारिद्र्यानें व क्षुधेनें गांजलेल्या लोकांपुढें सरकार व तुम्हीं या दोघांचाहि, टिकाव लागणार नाहीं. गरीब लोकांस पुढारी मिळणार नाहींत असें तुम्हांस वाटत असेल; पण वेळ आली म्हणजे पुढारीहि निपजतात हें तत्त्व लक्षांत ठेवा. ज्यांत सरकारचें हित आहे त्यांतच तुमचेंहि आहे. इंग्रजसरकारचें राज्य आहे तोंपर्यंतच तुमची बढती व मान्यता आहे. हें राज्य गेलें कीं, तुम्हांस कोणीहि विचारणार नाहीं व तुमची संपत्तीहि कोणी तुमच्या जवळ टिकू देणार नाहीं; करतां वेळींच जागे व्हा व सरकार झोंप घेत असलें तर त्यांसहि जागें करा. हिंदुस्थानांतील प्रजेची स्थिति सुधारल्याखेरीज तुमची अगर सरकारचीहि शाश्वती नाहीं. आज सर्व शांत दिसतें आहे एवढ्यावर जाऊं नका. तुहीं ज्या ठिकाणीं घोरत पडला आहां त्याच्या खालींच भयंकर कडा आहे व कड्याकडे पहावत नाहीं म्हणून जर तुम्ही भीतीनें अधिकाधिकच डोळ्यांवरून पांघरुण घ्याल तर त्यानें तुमचा तरणोपाय लागणार नाहीं. आपण मेल्यानें जग बुडालें असें होत नाहीं, म्हणून ही जी हिंदुस्थानच्या प्रजेस भयंकर स्थिति येत चालली आहे ती पूर्ण लक्षांत आणून तिचा प्रतिकार करण्यास तुम्हांस झटलें पाहिजे व त्यासाठीं द्रव्याची जी मदत लागेल ती तुम्ही उत्सुकतेनें व हौसेनें दिली पाहिजे. हिंदुस्थानांतील सरकारी अंमलदार इतके गाढ झोपीं गेले आहेत कीं, येथें आमची कोणी दाद घेत नाहीं, तथापि तेवढ्यानें निराश होऊन उपयोग नाहीं. प्रजेची हीच स्थिति कायम राहिली तर कठीण प्रसंग आहे व तो टाळण्याचा येथें नाहीं तर विलायतेस जाऊन तुमच्या हातून होईल तितका प्रयत्न करणें तुमचें कर्तव्य आहे. "

ह्यूमसाहेबांचे हे विचार किती स्पष्ट व कळकळीचे आहेत हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल, हिंदुस्थानची प्रजा दिवसानुदिवस अन्नास मोताद होत

चालली आहे ही गोष्ट खुद्द सरकारच्या रिपोर्टांतूनहि कबूल केली आहे; व शेतकऱ्यांसाठीं म्हणून जें हल्लीं कमिशन बसलें आहे त्याचा उद्देश लक्षांत आणला म्हणजे स्थिति फार भयंकर होत चालली आहे याबद्दल दुसरा पुरावा देण्याची जरूर रहात नाहीं. आतां ही स्थिति इतकी भयंकर झाली आहे कीं, काय कीं जेणेंकरून शेतकरी लोक बंड करण्यास प्रवृत्त होतील, हा ह्यूमसाहेबांच्या लेखांतील मुख्य मुद्दा आहे. ह्यूमसाहेबांच्या मतें हा काल जवळ आला आहे व राज्यव्यवस्थेंत सुधारणा करून प्रजेस अन्न मिळण्याची जर कांहीं आपण तजवीज केली नाहीं तर आम्ही आपल्या कर्तव्यास मुकलों असें होईल. आतां कित्येकांच्या मतें ह्यूमसाहेबांस वाटत असलेली ही भीति सर्वथैव निराधार असेल अगर कित्येकांच्या मतें ही वेळ ह्यूमसाहेब म्हणतात तितकी सन्निध येऊन ठेपली नसेल; परंतु यांपैकीं कोणताहि पक्ष घेतला तरी ह्यूमसाहेबांवर राजद्रोहाचा जो आरोप आमच्या इंग्रजी बंधूंनीं आणला आहे तो कसा सिद्ध होतो हें आम्हांस समजत नाहीं. शेतकरी लोक अन्नास मोताद होऊन कर्जांत बुडाले म्हणजे दंगे करून मारवाड्यांचीं नाकें कापण्यासहि प्रवृत्त होतात याचें छोटेखानी उदाहरण सुमारें बारा वर्षांपूर्वीं याच जिल्ह्यांत घडून आलें होतें, व मारवाड्यांचीं घरें लुटलीं गेल्यानंतर सरकारानें रिलीफ ॲक्ट काढून सावकाराचा नफा बुडवून शेतकऱ्यांची समजूत काढली, हें सर्वांस माहीतच आहे. इंग्रजी राज्याच्या अवाढव्य खर्चाखालीं व व्यवस्थेखालीं उत्तरोत्तर प्रजा अगदीं भिकारी होऊन असले प्रसंग सार्वत्रिक होणार नाहींत कशावरून ? आणि जर ते सार्वत्रिक होण्याचा संभव आहे तर तिकडे लोकांचें लक्ष फिरवून तो प्रसंग टाळण्याची जर संपन्न लोकांस कोणीं विनंति केली तर तो राजद्रोह झाला काय ? ह्यूमसाहेबांचें सरक्युलर सामान्य लोकांस उद्देशून लिहिलें नाहीं. इंग्रजी राज्यांत अगर इंग्रजांच्या मेहेरबानीनें ज्यांनीं द्रव्याचा संचय केला आहे त्यांस उद्देशून हें सरक्युलर काढलें आहे. या लोकांचीं विद्या, धन, हुषारी, अधिकार आणि पदव्या सर्व कांहीं इंग्रजी राज्याच्या शाश्वतीवर अवलंबून आहे; करतां इंग्रजी राज्याच्या शाश्वतीसाठीं सामान्य प्रजेपेक्षां यांसच झटून उद्योग व मेहनत केली पाहिजे; मेहनत दोन प्रकारची. शरीरद्वारां अगर द्रव्यद्वारां. पण या दोन्ही प्रकारची मेहनत या लोकांच्या हातून होत नाहीं ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. ही हेळसांड फार दिवस चालावयाची नाहीं. याबद्दल या लोकांची कोणी चांगली कानउघाडणी करावयांस पाहिजे होती; व भीतीनें या लोकांनीं डोळ्यांवरून जें गुरगुट्टून पांघरूण घेतलें आहे तें काढून त्यांस त्यांच्यापुढें असलेल्या भयंकर स्थितीचें कोणीं तरी दर्शन करून देणें जरूर होतें. वरील सरक्युलर काढण्यांत ह्यूमसाहेबांचा मुख्य उद्देश हाच होता; व यासाठीं तें सरक्युलर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध न करतां राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक सभासदास खाजगी रीतीनें पाठविण्याचें योजिलें होतें. यांत

ज्या लोकांस उद्देशून हें सरक्युलर लिहिलें आहे त्यांची भीति मोडण्यासाठीं अगर मत मोडण्यासाठीं अलंकारादि रीतीनें क्वचित् स्थळीं दहशतीचा, क्वचित् अतिशयोक्तीचा आणि क्वचित् मनधरणीचा उपाय योजावा लागला असेल. पण त्यामुळें जर हें सरक्युलर राजद्रोही ठरेल तर आपल्या कट्टया स्नेह्यासहि आमचें सरकार बंदींत टाकण्यास तयार आहे असें समजावें लागेल. असला परिणाम घडून यावा यापेक्षां हिंदुस्थानांतील राजद्रोहाचें स्वरूप खरोखर जर इतकें उग्र असेल तर तेंच बदललें पाहिजे असें आम्हास वाटतें. ह्यूमसाहेब कांहीं कोणास बंड करण्यास सांगत नाहींत अगर चिथावूनहि देत नाहींत. प्रजा दरिद्री होत चालली आहे त्याचा आम्हीं योग्य वेळीं प्रतिकार न केल्यास काय परिणाम होईल एवढेंच काय तें त्यांनीं स्पष्टरीतीनें सरकारास व संपन्न लोकांस कळविलें आहे; व ज्या लोकांस ही गोष्ट कळविली ते लोक स्वतः बंड करणारे नसून उलट इंग्रजी राज्य चिरस्थायी व्हावें हेंच त्यांच्या हिताचें आहे. अशा लोकांस जर आपल्या कर्तव्याचा कोणीं खगखगीत उपदेश केला तर तो मनुष्य पिनलकोडांतील राजद्रोहाच्या व्याख्येप्रमाणें ' लोकांत सरकाराबद्दल अप्रीति उत्पन्न करतो ' असें म्हणणें कधींहि वाजवी होणार नाहीं.

परंतु आमच्या लोकांची राजद्रोहाबद्दलची समजूत इतकी नाजूक झाली आहे कीं, ह्यूमसाहेबांच्या सरक्युलरावर एखाद्या इंग्रजी पत्रकारानें खरमरीत टीका केली नाहीं तोंच आम्हीं ' मी नाहीं, मी नाहीं,' असें म्हणण्यास तयार झालों आहों; अथवा इंग्रजी पत्रकारांनीं टीका करण्याची सुद्धां आम्हीं जरूर ठेवली नाहीं; ह्यूमसाहेबांचें सरक्युलर नजरेस पडल्याबरोबर हें प्रसिद्ध करणें मोठ्या धोक्याचें आहे असें अलाहाबादच्या कांग्रेस कमिटीनें ह्यूमसाहेबांस कळविलें व मुंबईच्या कमिटीनेंहि बहुतेक तोच मार्ग स्वीकारला; परंतु अखेरीस अलाहाबाद कमिटीनें ह्यूमसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणें या सरक्युलराच्या प्रती कॉंग्रेसच्या सभासदांस वांटल्या व मुंबईच्या कमिटीनें तेंहि करण्याचें नाकारलें. कित्येक शहाण्या लोकांनीं असा तर्क काढला कीं, ह्यूमसाहेबांचें आपणांस कांहीं वाटत नाहीं, परंतु निदान कॉंग्रेसच्या कामास धक्का येऊं नये एवढ्यासाठीं तरी हें सरक्युलर प्रसिद्ध होणें इष्ट नाहीं. केवढी ही राष्ट्रीयसभेची जबरदस्त काळजी ! जणूं काय तीस आज जें स्वरूप आलें आहे तें दूरदर्शी विचारांचें फल होय. आपला मित्रेपणा कसा झांकावा हें आम्ही फार चांगलें शिकलों आहों एवढेंच काय तें यावरून व्यक्त होतें. बाकी राष्ट्रहितांच्या कामीं झटून, कळकळीनें व स्वार्थाकडे लक्ष न देतां मेहनत करण्याचा मक्ता मात्र आम्हीं ह्यूमसाहेबांवर सोंपविला आहे. त्यानें खुशाल मेहनत करावी व एखाद्या वेळेस कडक सरक्युलर काढलें तर आम्हीं त्याचा भिऊन निषेध करावा असा त्यांचा आमचा श्रमविभाग झाला आहे ! अशानें कॉंग्रेस ह्यूमसाहेबांच्या मागें कशी चालेल याची आम्हांलाहि मोठी काळजीच वाटते.

* मोहाचे फुलांचा कायदा

सरकारचे मनांत एखादी गोष्ट कर्तव्य असली, म्हणजे त्यासाठीं सरकार अगर सरकारचे कामगार किती व कसे परिश्रम करीत असतात याचें उत्कृष्ट उदाहरण हल्लीं मुंबईच्या कायदेकौन्सिलापुढें मोहाचीं फुलें विकावयाचीं बंद करण्याबद्दल जें विल आलें आहे त्याजवरून आमचे वाचकांच्या नजरेस येईल. लोकांच्यातर्फे काम करणारे गृहस्थ आणि सरकारी ऑफिसर यांच्यामध्यें जो मोठा भेद आहे तो हाः—एक कधींकाळीं काम करण्यास प्रवृत्त होतात व दुसऱ्यांचा उद्योग सतत चालू असतो. आमच्या लौकिक संस्थांत जितका जिवटपणा यावयास पाहिजे तितका अजून आला नाहीं. झोंपेंतून जागें झाल्याप्रमाणें दहापांच वर्षांनीं अगर प्रसंगविशेषीं एखाद्या प्रकरणाबद्दल आम्ही थोडा वेळ गवगवा करतों, व त्यावेळेपुरतें सरकारहि आमच्या म्हणण्यास मान देतें; पण एकदां ही वेळ निघून गेली म्हणजे आम्ही थंडगार पडतों व तिकडे सरकारचा क्रम अव्याहत चालू राहतो. अशा रीतीनें अखेरीस आमच्यापेक्षां सरकारासच हातीं धरलेल्या कामांत जास्त यश आलें तर त्यांत नवल तें कोणतें ? इसापनीतींल ससा आणि कांसव यांच्या शर्यतीप्रमाणें असल्या बाबतींत सतत व दीर्घ उद्योग करणारासच नेहमीं यश यावयाचें !

मोहाचीं फुलें विकावयाचें बंद करून त्यायोगें अबकारी खात्याचें उत्पन्न वाढवावें ही कल्पना पहिल्यानें अबकारी खात्याचे अधिकाऱ्यांच्या डोक्यांत सहजच आली. या खात्याचे अधिकारी नेहमीं असा डौल घालतात कीं, या खात्याची योजना मद्यपाननिषेधार्थच झालेली आहे. परंतु पेशवाईंत ज्या खात्याचें उत्पन्न दहा हजार रुपये सुद्धां नव्हतें, त्याच खात्याची जमाबंदी हल्लीं त्याच्या शतपट वाढली आहे, यावरून त्या खात्यापासून लोकांचें खरोखर कितपत हित झालें आहे हें कोणाच्याहि नजरेस येईल. कोणतेंहि सरकारचें खातें घ्या, त्याची प्रवृत्ति प्रायः आपलें महत्त्व व अधिकार वाढविण्याकडेसच असावयाची. कोणत्याहि खात्यावरील मुख्य अधिकारी घेतला तरी तो आपलें खातें महत्त्वाचें असून त्यापासून सरकारास कांहींतरी वाढती प्राप्ति आहे, असें दाखविण्याचा प्रयत्न करितो. अबकारी खात्याची स्थितीहि याचप्रमाणें आहे. हें खातें उत्पन्न करण्यांत सरकारचे मूळ हेतु कांहींहि असोत; परंतु लौकरच इतर खात्यांप्रमाणें ह्या खात्यापासूनहि तिजोरींत कांहीं भर पडावी असें ह्या खात्यांतील अधिकाऱ्यांस व सरकारासहि वाटूं लागलें. सरकारी मद्यगृहाखेरीज दारू कोठेंहि गाळली जाऊं नये व सरकारी पिठ्यांमधून जी दारू विकली जाईल तिचाच सर्वत्रांनीं उपयोग केला

---

* [केसरी–ता. १९ एप्रिल १८९२]

पाहिजे, असे सक्तीचे नियम झाले. पुढें उत्पन्न वाढविण्याकरितां खात्याच्या अधिकाऱ्यांनीं अर्थातच नानातऱ्हेचे उपाय केले. कंत्राटदारांनीं अमुक दारू खपविलीच पाहिजे, न खपविल्यास त्याबद्दल त्यांस मजुरी मिळणार नाहीं, अशीहि व्यवस्था कांहीं ठिकाणीं अमलांत आणली; कोणी चोरून दारू गाळतो कीं काय हें पाहण्यासाठीं व सांपडल्यास त्यावर खटला करण्यासाठीं गुप्त पोलीस ठेविलें; आणि ताड, माड, शिंदी इत्यादि दारूचीं झाडें मोजून त्यांजवर कर बसवून सर्वत्र दारू करण्याचे मक्ते सरकारानें आपल्याच हातांत घेतले. इतकेंहि झालें तरी अबकारी खात्याची नजर व क्षुधा तृप्त झाली नाहीं. मोठमोठ्या उत्पन्नाच्या बाबी बहुतेक सर्व या खात्याच्या हातांत आल्यावर क्षुद्र बाबींकडे त्याचें लक्ष जाऊं लागलें. दारू उत्पन्न करण्याचे कोणकोणते पदार्थ आहेत याचा प्रत्येक जिल्ह्यांतून शोध करून त्यापासून दारू तयार करणें हें बंद करण्याची खटपट या खात्याकडून सुरू झाली, व कोठें कसलीहि दारूची भट्टी असो, ती सरकारच्या परवानगीखेरीज कोणीं चालविल्यास त्यास पकडून कायद्याप्रमाणें शिक्षाहि होऊं लागल्या. परंतु इतक्यानेंच अबकारी खात्याची इच्छा पूर्ण झाली नाहीं. उघड कोणी भट्टींत दारू गाळल्यास त्यास जरी कायद्यांत शिक्षा सांगितली आहे तरी अशा रीतीनें शिक्षा होण्याची वाट बघण्यापेक्षां लोकांस दारू गाळण्याची संधीच सांपडूं नये, अशी तजवीज झाल्यास बरें, असा कित्येक ऑफिसरांचा समज झाला व त्या अन्वयें १८८२ सालीं मोहाच्या फुलांचा विक्रय अगर सांठा करणारास कायद्यानें शिक्षा व्हावी अशा अर्थाचें एक बिल मुंबई सरकारच्या कायदेकौन्सिलापुढें आलें !

या सालीं कायदेकौन्सिलचें नॉन ऑफिशियल कमिशनर बरेच निर्भीड व स्वतंत्र असल्यामुळें सदर बिलाची त्यांचे हातून सरकारच्या मर्जीप्रमाणें संभावना झाली नाहीं. कै. रा. सा. मंडलीक यांनीं बिलाच्या पहिल्याच वाचनाचे वेळीं विरुद्ध भाषण करून सदर बिलापासून लोकांस पुष्कळ गैरसोय व त्रास होणार आहे असें प्रतिपादन केलें. कोळी, कातकरी, वगैरे गरीब लोक मोहाच्या फुलांवर आपला कांहीं दिवस निर्वाह चालवितात, तेव्हां मोहाच्या फुलांचा विक्रय व सांठा बंद केल्यानें या गरीब लोकांवर मोठा जुलूम होईल असें कौन्सिलांतील बहुतेक सर्व नॉन ऑफिशियल मेंबरांचें मत पडलें. त्याच वेळीं दुसरा असाहि आक्षेप निघाला होता कीं, अबकारी खात्यास फार तर परवानगीखेरीज दारू गाळणें कायद्यानें बंद करा, एवढेंच म्हणतां येईल; पण तशी परवानगी न मागतां ज्या पदार्थांपासून दारू तयार करतात तेहि पदार्थ कोणीं संग्रहीं ठेवूं नये असें जर सदर खात्याचें अगर सरकारचें म्हणणें असेल तर मोहाच्या फुलांप्रमाणेंच गूळ, दारू, तांदूळ इत्यादिकांचीहि विक्री आणि संग्रह बंद केलीं पाहिजेत. मोहाच्या फुलांप्रमाणेंच गुळाचीहि दारू तयार होते, व लोकांस चोरून


दारू गाळण्याची संवयच लागली असल्यास मोहाचीं फुलें नाहींत तर उद्यां तें गुळाची दारू तयार करतील. सारांश, मोहाच्या फुलांचा विक्रय व संग्रह बंद करण्यापासून कोणत्याहि प्रकारें इष्टसिद्धि व्हावयाची नाहीं; इतकेंच नव्हे तर, अबकारी खात्याचे सोयीसाठीं ज्या पदार्थांपासून दारू तयार होते ते पदार्थ संग्रहीं ठेवण्याचें बंद ठेवणें तत्त्वदृष्टया चुकीचें व अन्यायाचें आहे. सरकारचे पोलीस आपलें काम मोठ्या दक्षतेनें करीत असतां जर लोकांची चोरून दारू गाळण्याकडे प्रवृत्ति होते तर त्यांत अबकारी खात्याचाच कांहीं तरी दोष आहे; व दारूची किंमत कमी करून जर दारू वांटण्याच्या कामीं सरकारी नियमांत कांहीं सुधारणा होईल तर चोरून दारू गाळण्याचें काम करून कोणीहि आपला जीव फुकट धोक्यांत घालणार नाहीं.

त्यावेळच्या नॉनऑफिशियल मेंबरांची वरील विचारसरणी मुंबईसरकारास पसंत पडली नाहीं, व मुंबईच्या कौन्सिलांत सरकारी मेंबरांचेंच बहुमत होऊन १८८२ सालीं हा कायदा पास झाला. परंतु मुंबईस पास झालेल्या कायद्यास हिंदुस्थान सरकारची संमति यावी लागते ती या प्रसंगीं हिंदुस्थानसरकारानें न दिल्यामुळें कायदा अखेरीस अमलांत आला नाहीं. हिंदुस्थानसरकारचें म्हणणें बहुतेक नॉनऑफिशियल मेंबरांच्या म्हणण्याप्रमाणेंच होतें. मोहाच्या फुलांचा खाण्याच्या पदार्थांत कितपत उपयोग होतो हें चौकशीअंतीं ठरवून व मोहाच्या फुलांची चोरून दारू गाळणें दुसऱ्या कोणत्याहि उपायांनीं बंद करणें अवश्य ठरेल तर मग या कायद्यासंबंधें विचार करतां येईल असें हिंदुस्थानसरकारानें ठरविलें. शिवाय हिंदुस्थानसरकाराकडून आणखी असेंहि कळविण्यांत आलें कीं, ठाणें व कुलाबा या दोन जिल्ह्यांतच जर मोहाच्या फुलांची गुप्त रीतीनें दारू करण्याचा प्रघात सुरू असेल तर कायदाहि या दोन जिल्ह्यांपुरताच असला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणीं असा प्रकार नाहीं त्या ठिकाणीं या कायद्याचा अंमल करण्याचा मुंबई सरकाराचा विचार असावा असें सदर बिलावरून दिसतें; तेव्हां हींहि चूकच आहे. हिंदुस्थानसरकाराकडून असा जबाब मिळाल्यावर १८८३ सालीं मुंबईसरकारानें सरकारी ऑफिसरांची एक कमिटी नेमून तिच्या मार्फत असा रिपोर्ट आणविला कीं, मोहाच्या फुलांचा खाण्याचे कामीं फारसा उपयोग नसून त्यांचा विक्रय व संग्रह करण्याची हवी त्यास परवानगी असल्यामुळें चोरून दारू गाळण्यास लोकांना चांगली संधि सांपडते, व या संधीचा पुष्कळ लोक फायदा घेत असून हें बंद करणें जरूर आहे. या कमिटीच्या रिपोर्टावरून मुंबई सरकारानें पुनः १८८४ सालीं असा कायदा करण्याबद्दल हिंदुस्थानसरकारची परवानगी मागितली. पण त्याहि सालीं हिंदुस्थानसरकारानें परवानगी दिली नाहीं; व या कायद्याखेरीज दुसऱ्या रीतीनें तजवीज झाल्यास पहावें असें मुंबईसरकारास कळविलें. १८८४ सालापासून तों आजपर्यंत ८ वर्षें मुंबईसरकार दबा धरून बसलें होतें, पण आज पुनः वेळ बरी आहे असें मनांत आणून ह्या कायद्याचा

मसुदा सरकारतर्फे अबकारीखात्याचे माजी मुख्य अधिकारी ऑन. सर चार्लस प्रिचर्ड यांनीं कायदेकौन्सिलापुढें आणला आहे. मसुद्याचा उद्देश मागलिप्रमाणेंच फुलांचा संग्रह व विक्रय बंद करण्याचा असून मागच्यापेक्षां सुधारणा कायती फक्त कायद्याच्या व्याप्तींतच केली आहे; म्हणजे ८४ सालच्या मसुद्याप्रमाणें हल्लींच्या मसुद्यांतील नियम ठाणें व कुलाबा या दोन जिल्ह्यांसच लागू करण्याचा विचार आहे.

ही या कायद्याची हकीकत झाली. आतां दोन वेळ हिंदुस्थानसरकारानें नामंजूर केलेला मसुदा पुनः मुंबईच्या कायदेकौन्सिलापुढें आणण्यास प्रिचर्डसाहेबांनीं कांहीं योग्य कारणें दाखविलीं आहेत कीं काय याचा विचार करूं. बिलाच्या व्याप्ती-संबंधानें हिंदुस्थानसरकारचें म्हणणें हल्लींच्या मसुद्यांत कबूलच केलें आहे, तेव्हां त्याबद्दल आतां कांहीं लिहिण्याची जरूरी नाहीं. मोहाच्या फुलांचा खाण्याच्या पदार्थांत उपयोग होतो कीं नाहीं, याबद्दल प्रिचर्डसाहेबांनीं ८३ सालीं नेमलेल्या कमिटीचे रिपोर्टाचाच आधार घेतला आहे. सदर कमिटीचें असें म्हणणें आहे कीं, मोहाच्या फुलांचा प्रत्यक्ष खाण्याकरितां कोणी उपयोग करीत नसून वर्षांतून कांहीं महिने भाजीसाठीं अगर चटणीसाठीं मात्र गरीब लोक हीं फुलें वापरतात; परंतु या कमिटीच्या रिपोर्टानंतर शेतकी वगैरे खात्यांतून जे रिपोर्ट प्रसिद्ध झाले आहेत त्यांत कोळी, कातकरी वगैरे लोक वर्षांतून कित्येक महिने मोहाच्या फुलां-वरच निर्वाह करतात असें साफ लिहिलें आहे; तेव्हां कमिटीचा रिपोर्ट खरा मानावा किंवा कमिटीच्या पूर्वी व कमिटीच्यानंतर सरकारी ऑफिसरांनीं जे रिपोर्ट केले आहेत ते खरे मानावे, हा एक मोठाच प्रश्न आहे. १८८३ सालच्या कमि-टीच्या म्हणण्यास हिंदुस्थानसरकारानें कांहीं मान दिला नाहीं हेंहि या प्रकरणीं लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रिचर्डसाहेबांचा पहिला मुद्दा अशा रीतीनें पोकळ ठरल्या-वर त्यांच्या दुसऱ्या मुद्यांतहि कांहीं अर्थ राहत नाहीं. साहेबबहादुरांचें असें म्हणणें आहे कीं, ठाणें जिल्ह्यांत प्रतिवर्षीं सुमारें ४० हजार मण मोहाचीं फुलें उत्पन्न होतात व सुमारें ३० हजार मण सुरत; नागपूर वगैरे प्रांतांतून येतात. मिळून एकंदर सुमारें ७० हजार मण मोहाच्या फुलांचा ठाणें जिल्ह्यांत खप आहे. पैकीं सन १८८९।९० सालीं सरकारी भट्टींत दारू गाळण्याचे कामीं फक्त २५०० मण फुलांचा मात्र उपयोग करण्यांत आला. बाकी सुमारें ६७।६८ हजार मण फुलांचा चोरून दारू गाळण्याच्या कामीं उपयोग होतो ! परंतु प्रिचर्डसाहेबांनीं हें जें आमच्या समजुतीनें बिनतोड अनुमान काढलें आहे हें सर्वथैव चुकीचें आहे. सरकारी भट्टींत जीं फुलें येत नाहींत तीं सर्व खाजगी भट्टींत जातात, हें अनुमान आमच्या समजुतीनें साहसाचें आहे. ठाणें जिल्ह्याची लोकसंख्या सुमारें ९ लक्ष असून पैकीं कोळी, वारली, कातकरी वगैरे लोकांचीच अडीच लाख संख्या आहे. ह्या अडीच लाखांपैकीं दोन लाख किंवा निदान दीड

लाख लोक ८३ सालच्या कमिटीच्या म्हणण्याप्रमाणें वर्षांतून तीन महिने मोहाच्या फुलांची भाजी करतात असें मानलें तरीहि दरवर्षास सुमारें ५०।६० हजार मण मोहाचीं फुलें त्यांस लागतील असें निव्वळ त्रैराशिकानें सिद्ध करून देतां येईल. ५०।६० हजार मण मोहाच्या फुलांची अशा रीतीनें वाट लागल्यावर बाकी दारू गाळण्यास फारच थोडीं फुलें शिल्लक राहतात, व तींहीं फुलें गुरें खात नाहींत असें समजून शिलकेंत धरलीं आहेत. मनुष्यें व गुरें ह्या दोघांसहि फुलें खाण्यास लागतात, असें धरलें तर दारूच्या कामाकडे उपयोग करण्यासाठीं फारशीं फुलें शिल्लक राहणार नाहींत. प्रिचर्डसाहेबांनीं रचलेला प्रचंड व्यूह अशा रीतीनें खोटा ठरला म्हणजे मग अर्थातच हें बिल तिसऱ्यानें कौन्सिलापुढें आणण्यास मोहाच्या फुलांच्या मोहाखेरीज दुसरें कांहींच कारण संभवत नाहीं. ठाणें व कुलाबा हे दोन्ही जिल्हे ताडाच्या लागवडीनें पहिल्यापासून इतर जिल्ह्यांपेक्षां विशेष दारूबाज आहेत. पण तेथील लोकांस अबकारी खात्याचा विशेष जाच नसला तर ते गैरकायदा दारू गाळून आपणांस शिक्षेस पात्र करून घेणार नाहींत. अबकारी गुन्हे ठाणें जिल्ह्यांत विशेष घडतात ह्याचें कारणहि हेंच आहे. खुद्द प्रिचर्डसाहेब यांनीं आपल्या भाषणांत असें कबूल केलें आहे कीं, सन १८८८ सालीं सरकारी दारूचा भाव जास्त चढल्याबरोबर इतर प्रांतांतून ठाणें जिल्ह्यांत मोहाचीं फुलें जास्त येऊं लागलीं. गेल्या सालच्या रिपोर्टावरून हें मान उत्तरोत्तर कमी होत आहे असें दिसतें. तेव्हां अबकारी खात्याचा जुल्म कमी होईल तर सरकारची मोहाच्या फुलांबद्दल जी थोडीबहुत तक्रार आहे तीहि लौकरच नाहींशी होईल. हल्लींच्या कायद्यांतच गुप्तरीतीनें दारू गाळावयास जी शिक्षा आहे तेवढी बस्स आहे. गुप्तरीतीनें मोहाची दारू गाळणारे लोक सरकारास सांपडत नाहींत, म्हणून दोन लाख लोकांच्या अन्नाची माती करणें कोणत्याहि सुधारलेल्या सरकारास शोभत नाहीं. सन १८८२ सालीं ह्याच मुद्यावर नॉनऑफिशियल मेंबरांनीं या बिलाविरुद्ध आपलें मत दिलें होतें. तोच मार्ग आमचे हल्लींचे सभासद स्वीकारतील व जें बिल दोनदां हिंदुस्थानसरकारानें नामंजूर केलें त्यास सरकारानें दुसरीं कांहीं सबळ कारणें दाखविल्याखेरीज ते आपली मंजुरी देणार नाहींत अशी आम्ही इच्छा करतों.



* इंडिया-कौन्सिल-बिल

सन १८५८ सालीं हिंदुस्थानचा राज्यकारभार कंपनीकडून राणीसरकरकडे ेल्यानंतर लौकरच ज्या कांहीं राज्यव्यवस्था करण्यांत आल्या त्यांपैकींच काय-देकौसिलाची रचना ही एक होय. हिंदुस्थानांत कायदे करण्यासाठीं राज्यकर्ते व राज्यांतील वजनदार लोक यांची एक मंडळी असावी असें वाटून पार्लमेंट सभेनें सन १८६१ सालीं हिंदुस्थानचीं कौन्सिलें कशीं असावींत याबद्दल एक कायदा पास केला. सन १८६१ सालापासून आजपर्यंत हाच कायदा अमलांत आहे व त्याअन्वयें हल्लींच्या हिंदुस्थासरकारच्या कौन्सिलांत ऑफिशियल मेंबरांखेरीज ६ पासून १२ व मुंबई मद्रास येथील कौसिलांत ४ पासून ८ पर्यंत नॉन ऑफिशियल मेंबर निवडण्याचा सरकारास अधिकार आहे, व या अधिकाराप्रमाणेंच वेळोवेळीं कायदेकौन्सिलांतील मेंबरांच्या सरकारांतून नेमणुका होतात. असल्या सरकारानें नेमलेल्या सभासदांपासून आपणांस कितपत फायदा होतो हें गेल्या ३० वर्षांत लोकांच्या पूर्ण अनुभवास आलें आहे. आधीं कायदे करण्यापलीकडे या कौन्सिलास कांहींच अधिकार नसल्यामुळें राज्यव्यवस्थेंतील इतर मोठमोठ्या गोष्टींबद्दल या कौन्सिलांतून एक चकार शब्द देखील निघत नाहीं. नवीन एखादा कर बसवावयाचा असल्यास जमाखर्चाचा खर्डा या कौन्सिलापुढें आणावा असा नियम आहे; परंतु त्याचीहि अंमलबजावणी फारशी होत नसून तसला प्रसंग आल्यास त्यावेळीं सभासदांकडूनहि जमाखर्चासंबंधें मार्मिक चर्चा आजपर्यंत झाल्याचें क्वचितच आढळून येईल. या सर्व कारणांमुळें आमचे कायदेकौन्सिलांतील सभासद म्हणजे 'होस हो' म्हणणारे सरकारच्या वतीचे मेंबर अशीच सर्वत्र समजूत झालेली आंहे. कित्येक प्रसंगीं कांहीं पाणीदार गृहस्थांच्या सरकारांतून नेमणुका होतात. तथापि एकंदरींत असल्या गृहस्थांची संख्या थोडी आणि त्यांसहि आपल्या नेमणुका सरकारांतूनच झाल्या असल्यामुळें जितक्या निर्भीड रीतीनें बोलावयास पाहिजे, तितक्या निर्भीड रीतीनें बोलतां येत नाहीं. सारांश, कायदे-कौन्सिलांत हल्लींच्या पद्धतीप्रमाणें सरकारांकडून जरी कधीं कधीं चांगलीं माणसें नेमलीं जातात तरी कायदेकौन्सिलाचा अधिकार नियामित असल्यामुळें त्यांत ऑफिशियल सभासदांचींच संख्या जास्त आणि जे लोक नेमतात ते सरकारानेंच नेमले असून त्यांच्या पुनः नेमणुक करण्याचा अधिकार सरकारचाच असल्यामुळें ह्या कौन्सिलांपासून लोकांचीं मतें अगर अभिप्राय कायदेकौन्सिलांत जितके स्पष्ट व्हावे अगर अमलांत यावे तितक्या रीतीनें ते व्यक्त होत नाहींत अगर अमलांत

---

* [ता. २६ एप्रिल १८९२]

येत नाहींत. कायदेकौन्सिलांतील सभासद म्हणजे लोकांत त्यांस एक गोठा "होयबा'च समजतात !

ही कायदेकौन्सिलाची रचना सुधारून जे लोक कर भरतात त्यांचा कायदे करण्याच्या कामींहि सल्ला घेण्याची तजवीज झाली पाहिजे, अशी आज कित्येक वर्षें खटपट सुरू आहे. इंग्रज सरकार तरवारीच्या अगर सद्दीच्या जोरावर जरी राज्य करीत असलें तरी त्यांच्या राज्यपद्धतीस लोकांचें अनुकूल्य थोडेंबहुत तरी असणें जरूर आहे. कर देणारे लोकांस खर्चाची चौकशी करण्याचा अधिकार सर्व स्वतंत्र राष्ट्रांतून असतो व तो असलाच पाहिजे. कित्येक ठिकाणीं तो प्रातिनिधिक राज्यसत्तेनें उदयास आला असतो व कित्येक ठिकाणीं त्याचा तितका निकाल झालेला नाहीं. तथापि एकंदरींत हें तत्त्व सामान्यतः सर्वत्रांस कबूल आहे; परंतु हिंदुस्थानांत या तत्त्वाचा कितपत अंमल करावा याबद्दल बराच मतभेद आहे. अधिकारी पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानचें राज्य तरवारीचे जोरावरच चालविलें पाहिजे; लोकांचें मत घेऊन चालावयाचें नाहीं. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें अगदीं याच्याविरुद्ध असून गेल्या पांच सात वर्षांत राष्ट्रीय सभेनें या पक्षास बरीच चळळटी आणली आहे. हिंदुस्थानचे माजी व्हॉइराय लॉर्ड डफरिन यांनीं हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांत सुधारणा करणें अवश्य आहे असें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस कळविलें होतें. लॉर्ड डफरिन यांचे मतें लोकनियुक्त सभासद कौन्सिलांत घेणें इष्ट व अवश्यक आहे असें होतें; परंतु लॉर्ड डफरिन यांनीं सुचवलेली व्यवस्था विलायत सरकारास पसंत न पडून हें प्रकरण तसेंच भिजत पडलें होतें. अखेरीस गेल्या दोन तीन सालीं अलाहाबाद, मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणीं राष्ट्रिय सभेच्या ज्या मोठ्या बैठकी झाल्या व त्यांत जे ठराव झाले त्यांमुळें आणि ते ठराव घेऊन पार्लमेंट सभेंत त्यांची चर्चा करण्याचें ब्रॉडलासाहेबांसारख्यांनीं अभिवचन देऊन पत्करल्यामुळें हिंदुस्थानांतील कायदेकौन्सिलें सुधारण्याचे कायद्याचा मसुदा सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांस अखेरीस पार्लमेंट सभेपुढें आणावा लागला. पहिला मसुदा १८९० सालीं पार्लमेंटसभेपुढें आला होता; पण त्यावेळीं तो पास न होऊन अखेरीस ब्रॉडलासाहेब मयत झाल्यावर तो मंजूर होण्याची वेळ आली ! या मसुद्यासंबंधें पार्लमेंटच्या सभासदांचीं समजूत घालण्यासाठीं राष्ट्रीयसभेच्या विलायतेंतील कमिटीकडून बरीच खटपट झाली; परंतु तिचा कांहीं विशेष परिणाम घडून आला असें दिसत नाहीं.

हल्लींच्या कायद्यांत विशेष महत्त्वाच्या अशा तीन सुधारणा आहेत. १ कलकत्ता व मुंबई आणि मद्रास इत्यादि.प्रांतिक कौन्सिलांपुढें दर वर्षाचें जमाखर्चाचें अंदाजपत्रक मांडावयाचें; २ राज्यव्यवस्थेंतील महत्त्वाच्या गोष्टींसंबंधें सरकारास प्रश्न विचारण्याचा अगर त्याजवळ माहिती मागण्याचा सभासदांस अधिकार द्यावयाचा; आणि सभासदांची संख्या वाढवावयाची. हिंदुस्थान सरकारच्या

कायदेकौन्सिलांत ६ पासून १२ सभासद नेमतात तेथें १० ते १६ सभासद नेमण्याचा अधिकार द्यावयाचा आणि मद्रास व मुंबई कौन्सिलांत प्रत्येकीं ४ पासून ८ सभासद नेमतात ते ८ पासून २० पर्यंत नेमवयाचे. बिलांत या नेमणुका कोणत्या तऱ्हेनें करावयाच्या त्याचा स्पष्ट उल्लेख नसून त्याबद्दल नियम ठरविण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारास दिला आहे. असा मोघम अधिकार दिल्यानें हिंदुस्थानसरकार लोकनियुक्त सभासद नेमणार नाहीं म्हणून याच बिलांत लोकनियुक्त सभासद नेमण्याबद्दल स्पष्ट शब्द असले पाहिजेत अशी प्रतिसूचना मि. स्वॉन यांनीं आणली होती. परंतु हिंदुस्थानचे अं. सेक्रेटरी मि. कर्झन यांनीं सभेस असें कळविलें कीं बिलाचा उद्देश स्वॉन साहेब म्हणतात तसाच असून लोकानियुक्त सभासद कसे निवडावे याची व्यवस्था मात्र हिंदुस्थानसरकाराकडे सोंपविली आहे. लॉर्ड किंबरले यांनीं या बिलावर मागें अशाच तऱ्हेचें भाषण केलें होते, व लॉर्ड किंबरले यांचेंच मत सरकारास ग्राह्य आहे असें मि. कर्झन यांनीं मॅक्लीनसाहेबांस स्पष्ट सांगितलें. सरकारच्या वतीनें पार्लमेंटसभेपुढें बिल आणणारे हिंदुस्थानचे अं. सेक्रेटरी मि. कर्झन यांचाच असा अभिप्राय पडला, तेव्हां मॅक्लिन व इतर हिंदुस्थानचा द्वेष करणारी मंडळी यांचें सभेंत कांहीं एक वजन पडलें नाहीं. मॅक्लिनसाहेबांनीं बाबुलोक कुचकामाचे आहेत; पन्नास पिढ्या परचक्राएवजीं काढल्यामुळें ते हतवीर्य झाले आहेत; इत्यादि मनःपूत जल्पना करून सभेंत बिलाविरुद्ध प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला, परंतु मि. कर्झन यांच्या भाषणानें व ग्लॅडस्टन साहेबांच्या भाषणानें पार्लमेंट सभेवर त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. मि. स्वॉन यांच्या मनांत आपल्या प्रतिसूचनेवर अनुकूल व प्रतिकूल मतें घेऊन हिंदुस्थानचे स्नेही कोण व द्वेषी कोण याचा निर्णय लावावयाचा होता. अखेरपर्यंत मतें घेण्याबद्दल त्यांचा आग्रह होतो; परंतु ग्लाडस्टन साहेबांच्या भाषणानें त्यांना आपला आग्रह सोडून द्यावा लागला. ग्लाडस्टन साहेबांचें समग्र भाषण आज आम्ही दुसरीकडे दिलेंच आहे. त्यावरून इंग्लंडांतील पूज्य, अनुभविक व प्रसिद्ध मुत्सद्याचें या विषयासंबंधें काय मत आहे तें स्पष्टपणें कळून येईल. हिंदुस्थानांतील कायदेकौन्सिलांत सुधारणा होऊन उत्तरोत्तर लोकांनीं निवडलेले सभासद, अर्थात् लोकांच्या खऱ्या कळकळीचे प्रतिनिधी, या कौन्सिलांत यावेत अशी ग्लॅडस्टन साहेबाची पूर्ण इच्छा आहे; परंतु आयर्लंडाचें काम ज्याप्रमाणें त्यांनीं हातीं धरलें आहे त्याप्रमाणें हिंदुस्थानचें काम पत्करणें त्यांस तूर्त सोईचें अगर इष्ट वाटत नसल्यामुळें बिलांत निवडणुकीसंबंधें स्पष्ट उल्लेख असण्याबद्दल त्यांनीं आग्रह धरला नाहीं. इंग्लंडांतील एवढ्या मोठ्या मुत्सद्यानें सत्यापेक्षां स्वपक्षाच्या सोईकडे विशेष लक्ष द्यावें हें आमचें दुर्दैवच समजलें पाहिजे! ब्रॉडलासाहेब जिवंत असते तर त्यांनीं अशी लटपट होऊं दिली नसती. खुद्द ग्लॅडस्टन साहेबांच्या पक्षानेंच ब्रॉडलॉ जिवंत असतां लिबरल पक्षांतील लोक

निवणुकीचें तत्त्व बिलांत घालण्यास आपलें स्पष्ट मत देतील असें प्रसिद्ध केलें होतें; परंतु आतां तो सर्व प्रकार बदलून गेला. आपल्या पक्षाची स्थिती व सोय मनांत आणतां ग्लॅडस्टन साहेबांस पार्लमेंट सभेंत मतें घेणें इष्ट वाटेना. तेव्हां अर्थातच त्यांनीं कर्झन साहेबांचेंच म्हणणें गृहीत धरून बिलांत स्पष्ट शब्द नसले तरी दोन्ही पक्षांचा उद्देश एकच आहे व प्रतिसूचना बिलाच्या स्पष्टीकरणार्थ आहे, विरोधार्थ नाहीं, असें प्रतिपादन करून वेळ मारून नेली ! बिलांत स्पष्ट शब्द असते तरीहि हिंदुस्थानसरकारानें त्यास वाटाण्याच्या अक्षता लावल्या असत्या, मग नुसत्या भाषणांची काय कथा; हें ग्लॅडस्टन साहेबांच्या लक्षांत आलें नसेल असें नाहीं. पण बिलांत अशा तऱ्हेचे स्पष्ट शब्द घालण्यास पार्लमेंट सभेंत बहुमत मिळण्याचा संभव नसल्यामुळें हिंदुस्थानच्या एवढ्याशा कामाकरितां लिबरलपक्षाचा पराजय करून घेणें त्यांना इष्ट वाटलें नाहीं, व सरतेशेवटीं बिल आहे तसेंच दुसऱ्या खेपेसहि पास झालें. आतां कदाचित् पुढाल्या निवडणुकींत लिबरलपक्षाची सरशी झाल्यास या बिलांत कांहीं सुधारणा होण्याची अशा आहे. निदान मॉर्ले्नसाहेब म्हणतात त्याप्रमाणें लॉर्ड रिपन, स्टेट सेक्रेटरी, व लॉर्ड री गव्हर्नर जनरल झाल्यास कौन्सिलदारांच्या निवडणुकीचे नियम तरी सरळ व लोकांच्या हिताचे होतील; परंतु अशी अशा करीत बसणें म्हणजे हातचें गमावून पळत्याची वाट पाहण्यासारखें आहे. ज्या कामाकरितां आज कित्येक वर्षें आपण श्रम करीत आहों, ज्याकरितां आज राष्ट्रीयसभेनें इतका उद्योग व पैसा खर्चिला तें काम जावें तसें सिद्धीस गेलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. पार्लमेंट सभेकडून आमच्या तक्रारी व दुःखें कशीं व किती निवारण होतील याचाहि या बिलाच्या हकीकतविरून थोडाबहुत अदमास करतां येईल. सध्यां मिळाला तेवढाच लांभ समजून पुढील उद्योगास लागलें पाहिजे.

❀ ❀ ❀

* ह्यूम आणि कांग्रेस

ह्यूमसाहेबांचें सरक्युर निघाल्यापासून काँग्रेस पक्षाची कशी काय स्थिति होते याची सर्वांसच काळजी पडल्यासारखी झाली आहे. हें सरक्युलर खाजगी रीतीनें वांटण्याकरितां काढिलें असतांहि त्यामुळें आमच्या कित्येक काँग्रेस कमिट्यांची कशी गाळण झाली हें सर्वांस माहीतच आहे. सरक्युलर उघडपणें प्रसिद्ध होण्यापूर्वीच जर ही स्थिति तर इंग्रजी वर्तमानपत्रकारांनीं याची उघडपणें प्रसिद्धि केल्यावर कित्येकांची काय अवस्था झाली असेल याचा विचार करण्याचीहि जरूर

* [केसरी—ता. २४ मे १८९२]

नाहीं. मुंबई अलाहाबाद व मद्रास वगैरे कमिट्यांकडून याचा उघड निषेध करण्यांत आला, व कांहीं लोक राजद्रोहाच्या भीतीनें खस्थ बसले, परंतु हा भित्रेपणा आमच्या सुदैवानें सर्वत्र फैलावला नाहीं. ह्यूमसाहेबांनीं वर्णिलेली स्थिति खरी आहे, किंबहुना अक्षरशः खरी आहे, असें जरी पुष्कळांस वाटत होतें, तरी आपले विचार स्पष्टपणें व खणखणीत रीतीनें बोलून दाखविण्याचें इंग्रज लोकांत जें धैर्य आहे तें आमच्यांत नसल्यामुळें ह्यूमसाहेबांचे विचार कितीहि खरे असले तरी त्यांची भाषा कितपत कायदेशीर आहे, या विवंचनेंतच आम्ही गुरफटून पडलों, व आमच्यापैकीं कांहींजणांनीं तर धडघडीत इंग्रजी वर्तमानपत्रकर्त्यांची बाजू स्वीकारली. आमच्यामध्यें अशा रीतीनें जरी उघड मतभेद झाला होता, तरी एकंदरींत नेटिव वर्तमानपत्रकारांनीं हळू हळू ह्यूमसाहेबांचींच बाजू धरून त्यांचे सरक्युलरास आपली पूर्ण अनुमती दर्शविली, व काँग्रेसच्या पक्षांत फूट पडण्याचा जो संभव होता तो बराच नाहींसा केला. अशा वेळीं ब्रिटिश कमिटीचें जर आम्हांस चांगलें पाठबळ मिळालें असतें तर हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेच्या पक्षास बरीच हिंमत आली असती; परंतु खुद्द ब्रिटिश कमिटींतहि मतभेद होऊन डिग्बी व वेडर्बर्न खेरीज करून बहुतेकांनीं ह्यूमसाहेबांचें सरक्युलर ब्रिटिश कमिटीस नापसंत आहे असें जेव्हां प्रसिद्ध केलें तेव्हां आमचेकडील कांहीं शंकेखोर लोकांस पुनः थोडीशी संधी सांपडली व या मतभेदापासून काँग्रेसच्या कामास कांहीं धक्का येईल कीं काय अशा कित्येकांनीं कुत्सित शंकाहि काढल्या होत्या. अशा स्थितींत अलाहाबादेस यंदांच्या काँग्रेस सभेचें काम झपाट्यानें चाललेलें ऐकून पुष्कळ लोकांस समाधान वाटेल यांत शंका नाहीं. राजद्रोही सरक्युलराचे लेखक ह्यूमसाहेब यांस अद्यापि काँग्रेसचे सेक्रेटरी राहूं देतील कीं, काय? असे कुटिल प्रश्न कित्येक विघ्नसंतोषी लोक विचारीत आहेत; परंतु सदर प्रश्न करणारांची हौस फिटण्याचा निदान आमचेकडे तरी कांहीं संभव नाहीं, इतके त्यांस आम्हीं खात्रीनें कळवितों. काँग्रेससभेची उपयुक्तता आणि ह्यूमसाहेबांनीं सदर सभेसाठीं आजपर्यंत केलेले अविश्रांत व निरपेक्ष श्रम हीं लोकांच्या मनांत इतकीं बिंबून गेलीं आहेत कीं, ह्यूमसाहेब जें म्हणतील त्यास मंडळी रुकार देण्यास तयार आहे. मग ह्यूमसाहेब आमच्या देशाच्या सद्यःस्थितीचें हुबेहुब चित्र काढून तें आम्हांस व आमच्या राजकर्त्यांस दाखवून दोघांसहि आपआपल्या कर्तव्याविषयीं जागृत करण्याचा उद्योग करीत असतां आम्ही त्यांस अर्घ्य वाटेंतच सोडून देऊं ही गोष्ट आमच्या हातून कदापिहि घडणार नाहीं.

असो, आमचेकडील ही स्थिति कायम राहील याबद्दल आम्हांस तिलप्राय शंका नाहीं; परंतु जेथें आपणांस आपलीं गाऱ्हाणीं सांगावयाचीं आहेत तेथें या विषयाबद्दल लोकांचा कसा काय ग्रह होत चालला आहे तें आपणांस पाहिलें पाहिजे. ब्रिटिश कमिटीचा व मॅक्लिन साहेबांचा अभिप्राय मागें आम्हीं दिलाच

आहे. हल्लीं ह्यूमसाहेबांनीं विलायतेस गेल्यावर मॅक्लिनसाहेबांस जें उत्तर लिहिलें तें व हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन विद्येचे कैवारी प्रो. मॅक्समुल्लरसाहेब ह्यांनींहि अशाच एका प्रसंगीं लिहिलेलें पत्र हीं दोन्हीहि प्रसिद्ध झालीं आहेत. त्यावरून केवळ मॅक्लिनसाहेबांचे प्रलापांसच इंग्लंडांतील लोक भुलून जातील असें वाटत नाहीं. ह्यूमसाहेबांनीं आपल्या दोन्ही सरक्युलरांतील उतारे देऊन सदर सरक्युलरें काढण्यांत आपला उद्देश काय होता तो स्पष्टपणें कळविला आहे. त्यांनीं असें साफ लिहिलें आहे कीं, "१८५७ सालीं जे प्रकार झाले ते मीं प्रत्यक्ष पाहिले आहेत व पुनः तसला प्रसंग पाहण्याची माझी इच्छा नाहीं. हिंदुस्थान देशांत मीं एकंदर ४३ वर्षें काढिलीं व इतक्या कालांत हिंदुस्थानांतील अधिकारांचीं लहानमोठीं सर्व कामें मी केली असून खेरीज गेल्या ११ वर्षांत हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतील नेटिव लोकांशीं माझा अत्यंत संबंध असल्यामुळें हिंदुस्थानच्या खऱ्या स्थितीचें ज्ञान माझ्याप्रमाणें कोणासहि असण्याचा संभव नाहीं. अशा स्थितींत माझे विचार लोकांस कळविणें हें माझें कर्तव्य आहे, व मी तें कर्तव्य बजावीत असतां विनाकारण मला शिव्या देण्यांत कांहीं हांशील नाहीं. अन्नान्नगत, दारिद्र्य, असंतोष आणि दुष्काळ यांनीं हिंदुस्थानांतील लोक इतके गांजून गेले आहेत कीं, त्यांच्या योग्य म्हणण्याचा जर सरकारानें विचार केला नाहीं तर हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यावर लवकरच मोठा प्रसंग येऊन गुजरेल. ब्राईट साहेबांनीं मागें अशाच तऱ्हेची इशारत दिली होती; पण हल्लींचा प्रसंग ब्राईटसाहेबांनीं सांगितल्यापेक्षांहि कठिणतर झाला आहे. हिंदुस्थानच्या गाऱ्हाण्यांकडे दुर्लक्ष करणें म्हणजे हा प्रसंग आपणावर ओढून घेण्यासारखें आहे." राष्ट्रीयसभेच्या जनकाच्या ह्या उद्गारांचा हा परिणाम विलायतेंतील लोकांच्या मनावर झाल्याखेरीज राहणार नाहीं. कॉंग्रेसमध्यें राणीच्या नांवानें जरी त्रिवार जयघोष चालला तरी ती सभा राजद्रोही असून ह्यूमसारख्या गृहस्थास इंग्रजी राज्यापेक्षां कडक अमलांत गोळी घालून मारलें असतें किंवा फांशीं दिलें असतें असें जें मॅक्लिनसाहेब पार्लमेंट सभेंत बोलले होतें, त्यास ह्यूमसाहेबांनीं वरील उत्तर दिलें आहे. मॅक्लिनसाहेबांचा नाटकी आवेश व उद्धटपणा ह्यूमसाहेबांच्या उत्तरानें अधीकच व्यक्त होतात; तथापि प्रो० मॅक्समुल्लर यांनीं आपल्या लहानशा पत्रांतच मॅक्लिनसाहेबांची जी संभावना केली आहे ती फारच समर्पक आहे. मॅक्लिनसाहेबांनीं पार्लमेंट सभेंमध्यें बंगाली बाबूंची जी नालस्ती केली होती त्याकरितां साहेब मजकुराचा निषेध करावा म्हणून लंडन येथें एक सभा भरली होती. त्या सभेचे अध्यक्ष होण्याकरितां प्रो० मॅक्समुल्लर यांस विनंती केल्यावरून मॅक्समुल्लरसाहेबांनीं आपणास अध्यक्ष होण्यास सवड नाहीं याबद्दल आपणास दिलगिरी वाटते असें कळविलें; व सदर पत्रांतच मॅक्लिनसाहेबांबद्दल व कॉंग्रेसबद्दल मॅक्समुल्लर असें म्हणतात कीं, "त्यांचे प्रलापांस उत्तर देण्याचे भरीस आपण पडूं

नयें. असल्या मशकांची गुणगुण बंगाली लोकांनीं लक्षांत आणूं नये, हेंच चांगलें. दारूगोळा खर्च करण्याइतकीसुद्धां कांहीं जिवांची किंमत नसते; कारण असल्या खटाटोपानें किंवा प्रमाणानें अगर पुराव्यानें त्यांचा जीव जात नाहीं." सध्यांच्या कौन्सिल बिलाबद्दल मॅक्समय्युल्लरसाहेब असें म्हणतात कीं, राष्ट्रीयसभेच्या मागण्या थोड्या अंशानें तरी यामुळें कबूल केल्यासारख्या आहेत, व याचा नीट तऱ्हेनें उपयोग करून घेण्याकडे हिंदुस्थानांतील लोकांस आतां झटलें पाहिजे. प्रो. मॅक्समय्युल्लरसाहेबांचे वरील उद्गार वांचून राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक हितचिंतकास आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. अँग्लोइंडियन पत्रें व मॅक्लिनसाहेब आपल्यास कितीहि शिव्या देत असले तरी कान्सरव्हेटिव्ह व लिबरल या दोन्ही पक्षांच्या संमतीनें आपलें पाऊल थोडेंबहुत तरी पुढें पडत आहे. ग्लाडस्टनसारखे मुत्सद्दी व मॅक्समय्युल्लरसारखे विद्वान् लोक यांचे अभिप्राय आपल्यास अनुकूल आहेत, ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. आम्हीं आपला क्रम आहे तसाच सुरू ठेविला तर लौकरच याहिपेक्षां आपणांस जास्त यश येण्याचा संभव आहे. राजकीय गोष्टी घाईनें कधींहि तडीस जात नसतात, हें सर्वांस ठाऊकच आहे. तथापि कधीं कधीं विरुद्ध पक्षाची तयारी पाहून अर्जुनाची क्षणभर जशी गाळण झाली होती तशी प्रत्येक मनुष्याची होण्याचा संभव असतो; परंतु ही विकृति क्षणिक असते, करितां त्यापासून भावी स्थितीचें कोणतेंहि अनुमान बांधणें मोठें साहसाचें आहे. कॉंग्रेसपक्षांतील फुटाफुटीबद्दल ज्या कल्पना व अनुमाने कांहीं कुत्सित लोक करीत आहेत तीं असल्याच प्रकारचीं आहेत, हें एकंदर हकिगतीवरून आतां कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. मॅक्समय्युल्लर म्हणतात त्याप्रमाणें आमच्यांतहि 'काव्ळ्याच्या शापानें गुरें मरत नाहींत' अशी जी म्हण आहे ती प्रकृत प्रकरणीं अक्षरशः लागूं पडते.

❀ ❀ ❀

* ऑनरेबल दादाभाई नवरोजी एम्. पी. !

उद्यमेन हि कार्याणि सिध्यन्ति न मनोरथैः ॥
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ॥

मि. दादाभाई नवरोजी हे आज कित्येक वर्षें पार्लमेंट सभेंत सभासद होऊन जाण्याची खटपट करीत आहेत, हें सर्वांस माहीत आहे. परंतु त्यांस या कामीं यश येईल कीं नाहीं याची पुष्कळांस शंका होती, ती गेल्या आठवड्यांतील आलेल्या तारेवरून दूर होऊन सेंट्रल फिन्सबरी येथील मत देणाऱ्या

---

* [ता. १२ जुलै सन १८९२]

लोकांनीं उदार मनानें हिंदुस्थानांतील काळ्या माणसास आपला प्रतिनिधी निवडून दिला ही आनंदाची बातमी आज सर्व हिंदुस्थानभर पसरून जिकडे तिकडे दादाभाईंच्या व सेंट्रल फिन्सबरी येथील लिबरल मत देणारांच्या नांवानें जयघोष सुरू आहे. ज्या काळे माणसांस हिंदुस्थानांतील गोऱ्यांची चौकशी करण्याचा देखील धड अधिकार नाहीं, त्यांपैकींच एकास विलायतेंतील राज्यसूत्रें ज्यांच्या हातांत आहेत त्यांनीं स्वसंतोषानें आपला प्रतिनिधी निवडून महाराणी साहेबांच्या अफाट राज्यांतील कारस्थानाची वाटाघाट करण्यास योग्य ठरवावें हें इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही राष्ट्रांस अत्यंत भूषणास्पद आहे. हिंदुस्थानांतील कामगारांच्या जागा देण्याचें कामीं जातीचा, धर्माचा अगर वर्णाचा भेद आम्हीं लक्षांत आणणार नाहीं, व जो कोणी असा भेद करील तो आमच्या अवकृपेस पात्र होईल असें आमच्या दयाळू राणीसाहेबांनीं सन १८५८ सालीं हिंदुस्थानचें राज्य ताब्यांत घेतेवेळींच आम्हांस आश्वासन दिलें आहे; परंतु सदर आश्वासन हिंदुस्थानांतील राणीसरकारच्या अधिकाऱ्यांकडून कितपत पाळलें जात आहे, हें ज्यांस ठाऊक असेल व त्यावर ज्यानें यत्किंचितहि विचार केला असेल त्यास तर दादाभाईंच्या विजयाची बातमी ऐकून अत्यंत आश्चर्य वाटेल यांत शंका नाहीं. मनुष्यमात्राच्या अंतःकरणांत स्वभावतः खिळून गेलेले असे जे कांहीं ग्रह असतात त्यांपैकींच स्ववर्णाभिमान हा एक होय. व त्यांतूनहि प्रजा व राज्यकर्ते भिन्नभिन्नवर्णांचे असले म्हणजे मग तर हा स्वभावसिद्ध ग्रह पूर्णपणें उदयास आलेला दृष्टीस पडतो. असल्या ग्रहापासून काय परिणाम होतात व ते मोडून टाकण्यास कोणत्या साधनांची अपेक्षा आहे वगैरे गोष्टींची माहिती व उदाहरणें युरोपांतील राष्ट्रांच्या इतिहासांतून पुष्कळ सांपडतील. परंतु आमच्याकडील इतिहास जरी घेतला तरी त्यांतहि स्ववर्णाभिमानाच्या चांगल्यावाईट परिणामाचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. इंग्लंडचे मुख्य प्रधान यांनीं दादाभाईंबद्दल "काळा माणूस" म्हणून इंग्लंडांतील मत देणारांस जेव्हां इशारत दिली तेव्हां आमचेकडील बऱ्याच मंडळींस विस्मय व खेद वाटला; व सुधारलेल्या एकोणिसाव्या शतकांतहि इंग्लंडांतील मुख्य प्रधानाच्या डोक्यांत जर अशा तऱ्हेचे वर्णभेदाचे विचार येतात, तर हिंदुलोकांस राणीसाहेबांनीं अभिवचन दिल्याप्रमाणें हक्क मिळण्याची कधींच आशा करावयास नको असें त्यांस वाटूं लागलें. परंतु गेल्या आठवड्यांतील सुवार्ता ऐकून ह्या लोकांच्याहि मनांत आशेचा अंकुर उद्भवेल अशी आमची खात्री आहे. इंग्रज लोकांतहि मनानें सर्वच लोक काळे असतात असें नाहीं, असें सेंट्रल फिन्सबरी येथील मत देणाऱ्या लोकांनीं आम्हांसच काय पण सर्व जगांतील लोकांस आपल्या वर्तनानें जाहीर केलें आहे; व या कृत्याबद्दल हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या इतिहासांत त्यांची चिरकाल कीर्ति राहील यांत कांहीं शंका नाहीं. अशा रीतीनें मनाचा मोठेपणा दाखविणारे लोक

ज्या राज्यांत असतात तेंच चिरस्थायी होऊं शकतें व अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे सेंट्रल फिन्सबरी येथील लोकांनीं आपला, आपल्या दिलाचा थोरपणा दाखवून हिंदुस्थानांतील २८००,००,०००, प्रजेवर अनुग्रह केला इतकेंच नव्हे, तर आपल्या औदार्यानें, दूरदृष्टीनें व शहाणपणानें इंग्रजी राज्याच्या इमारतीचा पाया अधिक भक्कम केला असें म्हटलें पाहिजे.

याप्रमाणें सेंट्रल फिन्सबरी येथील मत देणारे लोक जरी सर्वांशीं आमच्या प्रशंसेस व कृतज्ञतेस पात्र आहेत तरी आ. दादाभाई नवरोजी यांनीं ह्या कामीं जो निश्चय व जें धैर्य दाखविलें त्याचीहि तितकीच तारीफ केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

दादाभाई यांचें थोडेंसें चरित्र दुसरीकडे दिलें आहे त्यावरून या सत्पुरुषाच्या हातून आजपर्यंत देशकल्याणाचीं कोणकोणतीं कामें झालीं हें कोणास अद्याप कळावयाचें राहिलें असल्यास कळून येईल. परंतु अशा रीतीनें दादाभाईंबद्दल कांहीं एक माहिती नसलेला मनुष्य विरळाच सांपडेल. विद्यालयांत, व्यापारांत, मुंबईच्या म्युनिसिपालिटींत आणि कायदेकौन्सिलांत वगैरे ठिकठिकाणीं लोकोपयोगाचीं जीं त्यांनीं कामें केलीं, तीं अलीकडील चळवळीची ज्यास थोडबिहुतहि माहिती असेल त्याचे कानीं पडलींच असतील. दादाभाई एल्फिन्स्टन विद्यालयांत शिकून तेथेंच गणिताचे प्रोफेसर झाले, तेव्हांपासून तों आजपर्यंत त्यांचा ज्यांच्या ज्यांच्यापाशीं संबंध आला त्यांच्या तोंडून या वृद्ध पुरुषाच्या सत्यनिष्ठेची, सौजन्याची, ज्ञानाची, निश्चयाची आणि औदार्याची प्रशंसाच एकसारखी ऐकूं येत आहे, व हिंदुस्थानांतील अठ्ठावीस कोट प्रजेपैकीं वयानें, अनुभवानें, मनानें, आणि नीतिमत्तेनें या देशाच्या वतीनें पार्लमेंट सभेंत धाडण्यास एकच गृहस्थ निवडण्याचा आम्हांस अधिकार असता तर सर्वानुमतें त्या जागीं दादाभाई यांचीच निवडणूक झाली असती असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. दादाभाई यांनीं पार्शी ज्ञातींत जन्म घेतला आहे खरा, तथापि सेंट्रल फिन्सबरी येथील लोकांनीं त्यांस ज्याप्रमाणें इंग्रज समजूनच आपले मुखत्यार नेमलें, त्याचप्रमाणें किंबहुना त्याहून अधिक हिंदुस्थानांतील सर्व लोक दादाभाईंस आपलाच समजून निवडून देण्यास तयार झाले असते. सेंट्रल फिन्सबरी येथें दादाभाईंस जो जय मिळाला त्यामुळें त्यांच्याबद्दलची आमची पूज्यबुद्धि कांहीं अधिक झाली आहे असें नाहीं, अगर तत्पूर्वी कमी होती असेंहि नाहीं. त्यांनीं आजपर्यंत जीं लोकहिताचीं कामें केलीं आहेत त्यामुळें व त्यांच्या साधे स्वभावामुळें ते आबालवृद्धांस पूर्वीच प्रिय झाले आहेत, व त्यांचा देशाभिमान, विद्वत्ता आणि अनुभव याबद्दल सर्वांची कधींच खात्री होऊन चुकली आहे. तथापि दादाभाई यांनीं आमच्याकरितां जो हा नवीन हक्क संपादन करून घेतला आहे त्याबद्दल त्यांची तारीफ केल्यावांचून रहावत नाहीं. सेंट्रल फिन्सबरी

येथील मत देणारे लोक थोर व उदारमनाचे आहेत हें उघडच आहे. तरी एकाहातानें ज्याप्रमाणें टाळी वाजत नाहीं, त्याप्रमाणेंच दादाभाईंच्या निश्चयाची व धैर्याची कसोंटी नसती तर सेंट्रल फिन्सबरी येथील मत देणारे लोकांच्या औदार्याचीहि आपल्यास परीक्षा करितां आली नसती. इंग्लंडांतील मत देणाऱ्या लोकांकडून आपली निवडणूक करून घेण्याचें काम कांहीं लहानसहान नाहीं. खुद्द दादाभाई यांसहि पहिल्या खेपेस अपयशच पत्करावें लागलें व पुढेंहि अनेक अडचणी आल्या, तथापिः—


विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः प्रारब्ध मुत्तमजना न परित्यजंति ॥

या न्यायानें अडचणीस, संकटास अगर दबकोंवणीस न जुमानतां दादाभाई यांनीं आपला उद्योग सुरू ठेविला व ईश्वरकृपेनें त्यांच्या निश्चयानुरूप त्यांस यशहि मिळालें. काळे मनुष्यानें गोरे लोकांकडून अशा रीतीनें आपणांस निवडून घेणें म्हणजे प्राचीन काळीं विश्वामित्रानें ज्याप्रमाणें तपश्चर्या करून ब्राह्मणत्व संपादन केलें तशांतलाच प्रकार होय. ह्या तपश्चर्येस ज्याप्रमाणें देवांनीं विघ्नें आणिलीं होतीं तशींच कान्सरव्हेटिव्ह व लिबरल पक्षांच्या देवतांनीं दादाभाईंच्या मार्गांत अनेक अडचणी उत्पन्न केल्या होत्या; परंतु सुदैवानें तीं सर्व विघ्नें दूर झालीं व लिबरल पक्षांतील मत देणारे लोक व देवता प्रसन्न होऊन आज सहा वर्षें दादाभाई यांनीं जी तपश्चर्या एकसारखी चालू ठेविली आहे तिचें फल त्यांस प्राप्त झालें! ईश्वर करो आणि या तपःसिद्धीचें फल घेण्यास दादाभाई आणखी पुष्कळ वर्षें वांचोत, एवढीच आमची इच्छा आहे!

आतां कित्येक अशी शंका काढतील कीं, आयर्लंडाचे ऐंशी सभासद पार्लमेंट सभेंत असतांहि जर आयर्लंडास हवे ते हक्क अद्याप मिळत नाहींत तर एकटे दादाभाई पार्लमेंटसभेंत गेल्यानें त्यापासून आमचा कितपतसा फायदा होणार आहे? आमच्या मतें ही शंका अगदीं निर्मूल चुकीची आणि अविचाराची आहे. इंग्लंडांतील पार्लमेंटसभेचे सभासद सगळेच हिंदु होऊन इंग्रजी राज्याचा सर्व कारभार कधीं तरी त्यांच्या हातीं मिळेल असें मानणें हें वेडेपणाचें लक्षण होय. हल्लीं ज्या ज्या कांहीं राजकीय सुधारणा घडवून आणण्याची खटपट चालली आहे त्या याहून सर्व भिन्न तऱ्हेच्या आहेत. आपण महाराणीसाहेबांची प्रजा असून आपला देश राणीसाहेबांच्या अफाट राज्यांतील एक भाग आहे व आपले सुखदुःखाचा संबंध इंग्रजीबादशाहीशीं बेमालूम जोडला गेला आहे ह्या गोष्टी आपणांस गृहीत घेऊन चाललें पाहिजे. इंग्लंड़ांतील मत देणारे लोक कितीहि उदार झाले तरी ते आपले सर्वच अगर बरेचसे प्रतिनिधी हिंदु लोकांपैकीं निवडणार नाहींत हें निर्विवाद आहे. तथापि आमच्या मागण्या जर बेताबाताच्याच असतील तर हिंदुस्थानांत नाहीं तरी इंग्लंडांत खटपट करून आमची इच्छा पूर्ण होण्यास मार्ग आहे इतकें सेंट्रल फिन्सबरी येथील लोकांनीं आम्हांस प्रत्यक्ष

सिद्ध करून दाखविलें आहे. उदाहरणार्थ, आपण हिंदुस्थानांतील कायदे कौन्सिलाच्या सुधारंणेचाच प्रश्न घेऊं. या प्रश्नाची वाटाघाट व निकाल पार्लमेंट सभेकडूनच व्हावयाचा, व त्या कामीं इंग्लंडांतील मत देणाऱ्या लोकांचें मन आमच्या वर्तनिें फिरलें असल्यास त्यांच्या मुखत्यारांकडून पार्लमेंटसभेंत आमची विनंति मान्य होण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं. सारांश, इतउत्तर आपणांस कोणतेहि राजकीय हक्क संपादन करून घ्यावयाचे असतील तर त्यासाठीं इंग्लंडांतील मत देणाऱ्या लोकांचीच प्रथमतः आम्हीं समजूत घालून दिली पाहिजे. ही समजूत घालणें शक्य आहे कीं नाहीं व शक्य असल्यास कोणत्या तऱ्हेनें घालावी याजबद्दल राजकीय–सुधारणेच्छु लोकांत हल्लीं बरीच भवतिनभवति सुरू आहे. राष्ट्रीयसभेची विलायतेंत एजन्सी स्थापन होऊन आज दोनतीन वर्षें झालीं, व खुद्द राष्ट्रीयसभेची बैठकहि लवकरच विलायतेस होण्याचा रंग आहे तेव्हां हा जो आपण उद्योग करणार यास कितपत यश येईल याचा अदमास करण्यास दादाभाईंचा जय हें एक चांगलें मोठें साधन झालें आहे. विलायतेंतील कांहीं मत देणाऱ्या लोकांस घटकाभर स्ववर्णाभिमान एकीकडे ठेवण्यास लावून त्यांच्या औदार्याचा प्रवाह जर अठ्ठावीस कोट मूक प्रजेकडे वळवितां येतो, तर त्याच लोकांसाठीं याहूनहि कमी महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या हातून आपणांस करून घेतां येतील याबद्दल संशय घेण्यास आतां जागा राहिली नाहीं. कोणत.इ हक्क आम्हीं मागितल्याबरोबर अगर केवळ आमच्या इच्छामात्रें करून आपणांस मिळेल असें मात्र कोणीं समजूं नये. इंग्लंडांतील बहुतेक लोक हिंदुस्थानाविषयीं बेफिकीर असतात, परंतु हिंदुस्थानांतील इंग्रजी कामगारांच्या मनांतून जो दुराग्रह भरला असतो तो विलायतेंतील लोकांत आढळून येत नाहीं. बेफिकीरी दीर्घोद्योगानें काढून टाकितां येईल, पण ज्ञानपूर्वक मनास जे दुराग्रह जडले असतात ते दूर करणें अशक्य आहे. हिंदुस्थानांतील दुराग्रही इंग्रज लोकांकडून आम्हांस सहसा न्याय मिळगार नाहीं हें उघड आहे, परंतु इंग्रजी राज्याची रचनाच अंशीं कांहीं चमत्कारिक आहे कीं, सर्व विधायकसत्तेची किल्ली ज्यांचे हातांत आहे त्यांचीं मनें असल्या दुराग्रहांपासून प्रायः अलित असतात. निदान हिंदुस्थानासंबंधें तरी असा प्रकार असण्यास हरकत नाहीं. ज्या कांहीं गोष्टी इंग्रजी राज्याचीं कायमचीं अंगें म्हणून समजल्या जातात त्यांत कोणताहि फेरफार करण्याची विनंती केल्यास ती सिद्धीस जाण्याची कांहीं आशा नाहीं हें आम्हीं वर लिहिलेंच आहे. तथापि या गोष्टीखेरीज आमच्या कल्याणाच्या अद्याप पुष्कळ गोष्टी घडून यावयाच्या आहेत. तिकडे जर आपण लक्ष दिलें आणि दादाभाई ज्याप्रमाणें ब्रिटिश लोकांचें डोकें धरून तपःश्चर्या करीत बसले होते, त्याचप्रमाणें आम्हीं आपला उद्योग व ओरड सतत जागृत ठेविली, तर दादाभाईंचे ज्याप्रमाणें मनोरथ अखेरीस पूर्ण झाले त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या प्रत्येक देशहितेच्छूचे हेतुहि सिद्धीस जाण्यास निदान

इंग्लंडांतील लोकांकडून तरी कांहीं हरकत येणार नाहीं. दादाभाई यांस सेंट्रल फिन्सबरी येथें जो जय मिळाला त्यापासून जर आम्हीं कांहीं बोध घेण्यासारखा असला तर हाच होय. इमानें इतबारें उद्योग करण्यास तयार व्हा आणि आपलें कितीहि नुकसान झालें तरी आपले इष्ट हेतु सिद्धीस नेल्याखेरीज स्वस्थ बसावयाचें नाहींच असा मनाचा धडा करा म्हणजे आज नाहीं तरी उद्यां तुमची इच्छा पुरविण्यास इंग्लंडांतील लोकांकडून कांहीं आळस होणार नाहीं. आ० दादाभाई नवरोजी एम्. पी. यांनीं व सेंट्रल फिन्सबरी येथील मत देणारे लोकांनीं ही गोष्ट तुमच्या उघड प्रत्ययास आणून दिली आहे. इतउत्तरहि तुम्ही झोंपच घेत बसाल तर मात्र प्रारंभीं लिहिलेल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें राजकीय हक्क आयतेच तुमच्या तोंडांत येऊन पडणार नाहींत, हें उघड आहे.



* सरकारी जुलमाचा नवीन मासला !

' कोणत्याहि मोठ्या चळवळीच्या उत्कर्षाला तिच्या उत्पादकापेक्षां तिचे शत्रूच अधिक अंशानें कारण होतात ' ही म्हण अक्षरशः खरी आहे. राष्ट्रीयसभेच्या शत्रूनीं चोहोंकडून तिजवर प्रहार करण्याचा क्रम सतत चालू ठेविला नसता तर तिजविषयीं लोकांना जी इतकी कळकळ वाटूं लागली आहे ती खचित वाटली नसती. राष्ट्रीयसभेपासून आपला बहुत फायदा आहे, व आपल्या देशाची दैना दूर करण्याला जे प्रयत्न अवश्य आहेत तेच ती करीत आहे, अशी साधारण लोकांची खात्री झाली हेंच तिच्या लोकप्रियतेस मुख्य कारण आहे ही गोष्ट खरी; तथापि अँग्लोइंडियन पत्रकारांनीं व मोठमोठ्या इंग्रजी अधिकाऱ्यांनीं कोणत्याहि प्रकारें तिचा पाडाव करण्याकरितां जी एकसारखी खटपट चालविली आहे ती पाहून लोकांचें तिजविषयीं अधिकच प्रेम वाढलें असावें यांत शंका नाहीं. ज्या अर्थीं आपल्या हितशत्रूंना राष्ट्रीयसभेची इतकी भीति वाटते त्याअर्थीं खरोखरच तिजपासून आपला अगणित फायदा होणार असला पाहिजे. तेव्हां कशाहि अडचणी आल्या तरी तिचें रक्षण करणें अत्यंत आवश्यक आहे, अशी सामान्य जनाची समजूत झाल्यास नवल नाहीं. खुद्द भगवंतालाहि विरोधभक्ति अतिप्रिय झालेली पुराणांतरीं आढळून येते; मग शत्रुत्वाच्या नात्यानें कां होईना पण राष्ट्रीय सभेविषयीं लोकांच्या मनांतील पूज्यबुद्धि वृद्धिंगत करण्याला ज्यांनीं मदत केली त्या आकलंड–कालव्हिनप्रभृति अम्मलदारांचे, टाइम्ससारख्या पत्रकारांचे, सय्यद अहमदसारख्या लांगूलचालनपटु नेटिवांचे,

* [केसरी–ता. १९ जुलै १८९२]

म्याक्लिनसारख्या हिंदुस्थानच्या पैशावर पुष्ट होऊन खाल्ल्या घरचे वांसे मोजणाऱ्या एम्. पींचे हिंदुस्थान देशावर अतोनात उपकार झाले आहेत असेंच म्हटलें पाहिजे. असल्या लोकांनीं जर आम्हांस वेळोवेळीं जागें केलें नसतें तर इतर संस्थांप्रमाणें राष्ट्रीयसभाहि कदाचित् मागें पडून आमच्या आरंभशूरत्वाचा डंका आणखी एकदां सर्व जगभर वाजला असता; परंतु

" ज्वलति चलितेन्धनोग्निर्विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते "

या न्यायानें या निंदकांनीं मनांत नसतां आमची देशभक्ति जागृत ठेवली; ह्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोंत. परंतु सरकारनेंहि असल्या क्षुद्रबुद्धींच्या प्रलापांस मान देऊन राष्ट्रीय सभेसारख्या राजा व प्रजा ह्या दोघांचेंहि हित करणाऱ्या अत्युपयुक्त संस्थेविषयीं अनुदारबुद्धि बाळगावी इतकेंच नाहीं तर एकीकडे गोड गोड थापा देऊन व आंतून जेणेंकरून तिला व्यत्यय येईल असे अप्रत्यक्ष उपाय योजावे हें आमच्या मतें ब्रिटिश लोकांच्या राजनीतीस, त्यांच्या सौजन्यास व आजपर्यंत गाजत आलेल्या स्वातंत्र्यप्रियतेस शोभत नाहीं. प्रथमतः नेटिव्ह कामगारांनीं राजकीय बाबतींत कोणत्याहि प्रकारचा पुढारीपणा घेऊं नये. कारण तेणेंकरून त्यांच्या सरकारी अधिकारास व्यत्यय येईल, असा नियम केला. इंग्लंडांत सरकारी नोकरांचें सर्व प्रकारच्या राजकीय बाबतींत अंग असतें, तसेंच हिंदुस्थानांत जे इंग्रजी कामगार आहेत तेहि आपला पगार वाढविण्याकरितां सभा स्थापन करून सरकाराविरुद्ध नेहमीं ओरड करीत असतात; तरी त्यांच्या सरकारी नोकर या नात्याला कोणत्याहि प्रकारचा बाध येत नाहीं; पण तोच एखादा नेटिव्ह राष्ट्रीयसभेचा फंड गोळा करण्याला किंवा सभासद होऊन जाण्याला, निरुपयोगी ठरतो. राष्ट्रीय सभेला बहुतेक पाठबळ सुशिक्षित वर्गाचें व त्यांमध्यें रौप्यशृंखलेनें बद्ध झालेल्यांचाच भरणा विशेष; ह्यामुळें राष्ट्रीयसभेला मनुष्यांची मोठी वाण पडते. तरी पण एवढ्यावरच सरकारचें समाधान झालें असतें तर आम्हीं फारशी काळजी केली नसती. पण केवळ आपल्या नोकरांचीच मुस्कुटबंदी करून सरकारची तृप्ती होते कोठें ! सरकारी नोकरांच्या मदतीखेरीजहि सभेचें काम चालूं शकतें. हें पाहिल्याबरोबर सरकारानें आपले हातपाय लांबविण्यास हळू हळू सुरुवात केली. प्रथमतः पेन्शनर लोकांवर धाड आली; परतु तेथें कांहीं उपाय चालेना तेव्हां सरकारी वकिलांस नोकरांच्या वर्गांत घुसडण्याचा प्रयत्न सुरू झाला. तो साधला असता तर इतर वकिलांना, मुक्त्यारांना व क्रमाक्रमानें म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांच्या मेंबरांनाहि त्याच वर्गांत ओढून हस्तपादबद्ध करण्यास कठिण पडलें नसतें ! परंतु आमच्या सुदैवानें आणि ह्यूम साहेबांच्या समयोचित खटपटीनें तोहि प्रयत्न फसला. आतां खासगी धाकदपटशानें काय काम होईल तें होईल; परंतु उघडपणें सरकारी वकिलादिकांस राष्ट्रीय सभेस जाण्यास हरकत नाहीं असें लॉर्ड हारीस

साहेबांनींहि कबूल केलें आहे; परंतु एकीकडे निराशा झाली स्हणून नेटिवद्वेष्टे अँग्लाधिकारी स्वस्थ बसणार थोडेच ! त्यांनीं दुसऱ्या बाजूस सुरुंग पाडण्यास सुरुवात केलीं. विद्यामान नोकरांप्रमाणें सरकारी भावी नोकरीविषयीं महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या उमेदवारांनींहि राजकीय भानगडींत पाडतां कामा नये असा स्पष्ट नियम नाहीं, तरी लोकांची समजूत करून टाकण्याला त्यांनीं उपक्रम केला आहे. तेव्हां वेळींच ह्या गोष्टीची शाहानिशा न केल्यास हें सापाचें पिल्लुं शेवटीं बऱ्याच लोकांना प्राणघातक होईल, अशी भीति आहे. ह्या प्रकारचें एक उदाहरण नुक्तेंच वायव्य प्रांतांत घडून आलें; परंतु केन साहेबांनीं तावडतोब पालमाल ग्याझीट पत्रांत एक खरमरीत पत्र प्रसिद्ध करून ती गोष्ट उघडकीस आणली आणि खुद्द पार्लमेंटांत अंडर सेक्रेटरींच्या तोंडून तिजविषयीं निर्णय करून घेतला यामुळें अंशतः तरी पुढें होणारा अनिष्ट परिणाम टळेल असें वाटतें.

औधबिहारीलाल नांवाचे गृहस्थ अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे बी. ए. असून केन साहेबानें स्थापलेल्या तेथील मद्यपाननिषेधक सभेचे चिटणीस आहेत. पूर्वी राष्ट्रीय सभेसंबंधानेंहि कांहीं महिने त्यांनीं खटपट केली होती. पुढें डेप्युटी कलेक्टरचे जागेबद्दल त्यांनीं अर्ज केला व बरोबर पुष्कळ शिफारस पत्रेंहि पाठविलीं; त्यावरून बोर्ड ऑफ् रेविन्यूनें त्यांची त्या जाग्यावर नेमणूक केली. परंतु रीड नांवाच्या बोर्डाच्या वरिष्ठ सभासदास ही गोष्ट न आवडून त्यानें औधबिहारीलाल यांस खासगी रीतीनें आपली भेट घेण्यास बोलाविलें. प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें लाल मजकुरांस साहेब बहादुरांची भेट घेतां आली नाहीं. तेव्हां त्यांनीं पत्रद्वारां सदर्हु गृहस्थास विचारलें कीं, " तुम्ही कांहीं दिवस राष्ट्रीयसभेचें काम करीत होतां, आणि पंजाब वगैरे प्रांतांतून तिजसंबंधानें व्याख्याने देत फिरत होतां, तसेंच मद्यपाननिषेधक सभेशींहि तुमचा संबंध आहे असें मला खात्रीपूर्वक समजलें आहे. तर हें खरें कीं काय ? व ज्यांनीं तुमची शिफारस केली त्यांना ही गोष्ट माहीत होती काय ? कळवावें. औधबिहारीलाल ह्यांनीं होय म्हणतांच त्यांना परत जबाब मिळाला कीं, सरकारानें तुमची नेमणूक रद्द केली आहे. कां केली ह्यांचें कारण जरी साहेब बहादुरांस द्यावेंसें वाटलें नाहीं तरी औधबिहारीलाल ह्यांचा कांहीं काळपर्यंत कॉंग्रेस सभेशीं असलेला संबंध हेंच त्यांच्या नालायकीचें खरें कारण होय, ही गोष्ट वरील पत्रव्यवहारावरून उघड दिसते. हा खटाटोप लेफ्टनेंट गव्हर्नर सर ऑकलंड कॉलव्हिन यांच्या अनुमतीवांचून रीड साहेबांनीं आपल्या मतानेंच केला असावा हें संभवत नाहीं. येणें प्रमाणें राष्ट्रीय सभेचा विटाळ झाल्याबद्दल सरकारी नोकरीस नालायक ठरविण्याची कल्पना इतर प्रांतांतील अम्मलदारांस आजपर्यंत आलेली नसावी; एरव्हीं, नामदार तेलंगप्रभृति मंडळीस सरकारानें मोठमोठ्या जागा दिल्या नसल्या किंवा हे लोक राष्ट्रीयसभेचे धुरीण असल्यामुळेंच त्यांना नोकरींत अडं-

कवून टाकण्याची शक्कल निघाली असेल असेंहि संभवतें. तथापि असल्या सबबीवर लायक मनुष्यांस सरकारी नोकरी उघडपणें नाकारल्याचें औधविहारीलाल ह्यांचें पहिलेंच उदाहरण प्रसिद्ध झालें आहे एवढें मात्र खरें. असला अन्याय करण्याबद्दल कॉलव्हिन साहेबांना व त्यांच्या हस्तकांना वेळींच योग्य समजूत मिळणें जरूर आहे.

उलटपक्षीं वरील प्रकार घडून आल्याबद्दल आमच्यामतें केवळ सरकारी अधिकाऱ्यांसच दोष देतां येत नाहीं. औधविहारीलालसारख्या विद्याविभूषित गृहस्थांस सरकारी नोकरीखेरीज दुसरीकडे त्राणच नव्हतें काय ? दिवसाची रात्र करून संपादन केलेल्या ज्ञानाचा आपलें स्वातंत्र्य कायम ठेवूनहि हव्या त्या रीतीनें विनियोग करतां आला असता, त्याला बेमुर्वत अम्मलदारापुढें यःकश्चित् नोकरीकरितां तोंड वेंगाडण्याबांचून अडलें नव्हतें. दुसऱ्याच्या दारीं भिक्षा मागावयाची मग त्यानें हांकलून दिल्यास कां कुरकुरावें हें आम्हांस समजत नाहीं परंतु सरकारी चाकरी हा स्वोदरभरणाचा अगदीं कनिष्ट मार्ग आहे हें आमच्या सुशिक्षित लोकांस कळून आल्याबांचून असल्या अयाचित वृत्तीनें रहाण्याचें त्यांना धैर्य होण्याची आशा नाहीं.

* * * * *

* राज्यकारभारांतील उधळेगिरीचा खर्च

प्रजेची भरभराट सुखाभिवृद्धि आणि सुसंपन्नता हीं राज्यकारभारांतील खर्चावर पुष्कळ अवलंबून असतात याबद्दल कोणासहि संशय येणार नाहीं. राजा व प्रजा भिन्न देशाची व भिन्न वर्णाची असली म्हणजे बहुतकरून काटकसर किंवा आवश्यकता व प्रत्यक्ष फायदा अशा प्रकारच्या बाबी राज्यकारभारांतील जमाखर्चांत आढळावयाच्या नाहींत. त्यांतून स्वहित आणि लौकिकाची वेपर्वा असली म्हणजे मग तर काय विचारावयासच नको; काय काय सावळे गोंधळ हिशेबी फडणीस घालतील याचा कांहीं नेम लागावयाचा नाहीं. आमच्या देशांतील राज्यकारभार इंग्रजांकडे असून इतर सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें प्रजेला फारसें नव्हे तर मुळींच राज्यकारभारांत घेतलेलें नाहीं,—थोडेंबहुत घेतल्यासारखें केलें आहे. पण तें केवळ नाटकी थाटाचें त्यांत तथ्यांश फार नाहीं—यामुळें खर्चाच्या बाबतींत विलक्षण प्रकारचा उधळेपणा चालला आहे. त्याची मजल अखेर कोठवर जाऊन पोंचेल याचा अंदाज कांहीं करवत नाहीं. तथापि कानउघाडणी करावी आणि वस्तुस्थिती कशी आहे याजबद्दल वालंबाल खात्री व्हावी म्हणून आमच्या सर-

* [केसरी—ता. २ आगष्ट १८९२]

कारानें चालविलेल्या उधळेगिरीची थोडीशी माहिती देण्याचा येथें प्रयत्न केला आहे. कारण हिंदुस्थानची पांचपंचवीस वर्षांखालीं जी स्थिति होती ती आज नाहीं. प्रजा, जमीन आणि व्यापारउदीम हीं अगदीं निःसत्व झालीं आहेत. पूर्वीसारखा त्राण कांहींच व कोठेंहि उरला नाहीं; आणि अशा प्रसंगांत सुद्धां पूर्वापार चालत आलेल्या दिवाळखोरी खर्चाचें तोंड सुरू ठेविलें म्हणजे अखेर परिणाम काय भयंकर होईल याची भीति राजाला व प्रजेला सारखीच वाटणें जरूर आहे. सालोसाल नानातऱ्हेनें देशांतील संपत्तीची कोणाला स्पष्ट न समजे व प्रत्यक्ष न दिसे अशी एकसारखी लूट चालली आहे. सरकारच्या कारभाराला दिवसेंदिवस विराट् स्वरूपच येत आहे आणि त्या मानानें मोबदला कांहीं मिळत नाहीं. शरीरांतून सारखें रक्तशोषण चालू ठेवावें आणि रक्तसंचयाच्या कांहीं तजवीजी करूं नयेत म्हणजे जो परिणाम व्हावयाचा तोच आमच्या राष्ट्राचा होणार याबद्दल आतां किमपिहि शंका उरली नाहीं. म्हणून सरकारानें मेहेरबानीनें अजून तरी आपले डोळे उघडावेत आणि वस्तुस्थिति कशी आहे याचा थोडा तरी विचार करावा. आदा काय आणि खर्च किती यांचें अनुमान बांधण्याला उशीर लागल्यानें अखेर बोजवारा कसा उडतो हें कांहीं कोणाला शिकवावयाला नको. उधळेगिरीच्या खर्चामुळें प्रजा त्रस्त झाली आहे आणि सरकार संकटांत असतें म्हणून काटकसर आणि व्यवस्थितपणा सरकारानें थोडासा तरी शिकला पाहिजे. तो शिकण्यापूर्वी चालू असलेल्या खर्चांत कशी उधळेगिरी चालली आहे, याचें दिग्दर्शन अवश्य केलें पाहिजे.

उधळेगिरीची पहिली बाब म्हणजे हुंडणावळ. विलायतेस सोन्याचें नाणें आहे व हिंदुस्थानांत रुप्याचें. इंग्लंडांत हिंदुस्थानच्या कारभारासाठीं जे कामगार आहेत किंवा हिंदुस्थानांत नौकरी करून जे तेथें हरि हरि करीत बसले आहेत असे पेन्शनदार, सरकारास कर्जाऊ रकमा देणारे सावकार व सरकारच्या हमीवर इकडे ज्यांनीं उद्योग सुरू केले ते रेल्वेवगैरेचे कारखानदार यांना इकडील नाणें तिकडे पटवून द्यावयाचें असतें. तें नाणें पटवितांना हुंडणावळ पडते, या दोन्ही नाण्यांच्या भावाची सारखी चलबिचल चालल्यामुळें हुंडणावळीचा भाव निश्चित असा कांहींच राहीना. युरोपांतलि इतर राष्ट्रांनीं आपापल्या नाण्यांत कमीजास्त फेरफार केला कीं, हुंडणावळीचा भाव विलायतेस कमीजास्त होतो; आणि त्यामुळें आम्हांला जास्तकमी खर्च सोसणें भाग पडतें. गेल्या वीस वर्षांत साठ कोटि रुपये हिंदुस्थानच्या तिजोरींतून हुंडणावळ खात्यावर खर्ची पडले. म्हणजे कांहीं एक मोबदला न मिळतां आमच्या खजिन्यांतलि एवढी रक्कम फुकट बुडाली.

खावयाच्या पदार्थांवर जास्ती कर बसवा, उद्योगाच्या मेहेनतींतून पैसे उकळा, कंगाल शेतकऱ्यांस उपासमार करीत बसवून जमीनधारा वसूल करा, अफू, गांजा, दारू, माजूम असलीं नीच व निंद्य व्यसनें पाठीस चिकटवून

त्यांच्या पैशावर धाड आणा, अशा प्रसारानें जमविलेल्या पैशाचा हा फारच सुंदर सदुपयोग म्हणावयाचा ! दरसाल सरासरीनें तीन कोटि रुपये व्यर्थ अगदीं बुडींत खर्चावयाचे म्हणजे केवढा अन्याय ? तीन कोटि रुपये म्हणजे कांहीं लहानसहान रक्कम नव्हे. ती वसूल करतांना प्रजेला पुष्कळ दुःख द्यावें लागतें आणि त्याचा विनियोग हुंडणावळीसारख्या फुकट, पाण्यांत रक्कम जाणाऱ्या बाबतींत होतो याला काय म्हणावें ? सरकार कायदा करील तसें होईल. सालोसाल इतकें नुकसान होतें याचा कांहीं तरी विचार केला पाहिजे असें सरकारच्या मनांत येईल तर ही हुंडणावळ कधींच अज्जी बंद पडली असती. पण मुख्य अडचण कायती एवढीच कीं असा विचार करावा कोणीं ? त्याची काळजी करण्यावांचून अडलें आहे काय ? गरीब, मुकी, अनाथ, भावडी बिचारी प्रजा सरकारच्या स्वाधीन रकम करते. हिंदुस्थान सरकार विलायतेस पैसे पाठवितात आणि फडणीस हुंडणावळ खात्याला खर्च लिहितात; कोणी विचारणार ना पुसणार ! अनाथ अज्ञान्याची इस्टेट सांपडली व विचारणार कोणी नाहीं म्हटलें कीं, लागतील तशीं अवदानें झोडावींत अशी जनरूढीच आहे. प्रजेच्या बारीकसारीक अन्याय-अपराधांची चौकशी करून दंड वगैरे शिक्षा ठोठावणारे शास्ते व न्यायप्रचुर सरकार, आपण होऊन असा अंदाधुंदी व बेकैद रीतीनें पैसा उधळूं लागले तर त्यांना जाब विचारणारी प्रजा इंग्लंड वगैरे देशांप्रमाणें हिंदुस्थानांत नाहीं म्हणून स्वस्थ रहात असेल तर मग कांहीं बोलणें नाहीं. प्रजेनें कर द्यावयाचा तो दिला म्हणजे मग त्याचा विनियोग कसा होतो याची त्यांना चौकशी कशाला हवी, असें तर सरकाराला वाटत नसेलना ? आणि वाटत असेल तर सरकार आपणास सुधारलेलें व शहाणें म्हणवितें हा केवळ ढोंगीपणा आहे असें म्हटलें पाहिजे. आणि वाटत नसेल तर त्यांनीं सुरू केलेली ही उधळेगिरी कां जास्त चालू ठेवावी हें कळत नाहीं. उधळेगिरीची पहिली गोष्ट जी हुंडणावळ तिचें मूळ होमचार्जेस होय. होमचार्जेस म्हणजे हिंदुस्थानच्या राज्यकारभाराबद्दल विलायतेस खर्च. यंदाच्या सालाला(१८९२-९३) विलायतेस १ कोटी ७० लाख पौंड म्हणजे पंधरा रुपये पौंडाप्रमाणें २५ कोटि ५० लाख रुपये विलायतेस हिंदुस्थानच्या राज्यकारभार खर्चाकरितां तूर्त पाठविले आहेत. आणखी तीनचार कोटि पाठवावे लागतील असा अंदाज आहे. एवढी ही रक्कम विलायतेस कोणकोणत्या बाबतींत खर्च होते हें पाहिलें म्हणजे परघरपर लछमीनारायण करण्यांत आमचें सरकार किती पटाईत आहे याची तेव्हांच खात्री होईल. होमचार्जेसची रक्कम रोकड न पाठवितां हुंड्या (बिलें) करून पाठवावयाची आणि तिकडे फडणीस त्या वाटेल तेव्हां हिंदुस्थानाशीं व्यापार करणाऱ्या पेढीवर पटवितात; यामुळें निर्गत व्यापाराला जंगी उत्तेजन मिळून नुकसान

त्याचा विचार आपण तूर्त बाजूला ठेवूं, व आतां फक्त विलायतेस हिंदुच्या रकमेंतून चालणारे खर्च कोणकोणते याचा विचार करूं.

१ स्टेट सेक्रेटरीसाहेब व त्यांच्या कारकून शिपायांचा वगैरे एकूण खर्च दोन लक्ष वीस हजार नऊशें सहा पौंड.

२. जाण्यायेण्याचा खर्च. शिवाय कांहीं एक काम न करणाऱ्या विलायतेंतील ज्या खाऊ नोकरांचा पगारः—

१ मुलकी फलोंरजेचे	कामदार	२६९९६१ पौंड.
२ लष्करी फलोंरजेचे	कामदार	२६७१०१ पौंड.

३. ११ लाख १८ हजार ७८७ पौंड खर्चून बांधलेल्या लष्कराची ने-आण करणारे जहाजांचा सालीना खर्च २७७०७२ पौंड. शिवाय इतर जहाजांतून ॥७ त्याचा अकार ५१२१ पौंड.

४. वरील लष्करी कामदाराखेरीज सोल्जर पैदा करणें, त्यांस उमेदवारी करवीत शिकविणें याबद्दल सालीना पांच लाख पौंड. या रकमेंत आणखी एक मौज आहे. एखाद्या शिपायानें दुसरीकडे कुठें लढाई मारून सालीना बक्षीस मिळविलें आणि त्यास हिंदुस्थानच्या लष्करांत नौकरी लागली तर त्या बक्षिसाची रक्कम हिंदुस्थानांतून घेण्यांत येते यांत विशेष कांहीं नाहीं; पण हिंदुस्थानाकरितां म्हणून राखून ठेविलेल्या विलायतेंतील लष्करी पलटणीस ग्रेटब्रिटनसाठीं कोठें लढावयास जाण्याचा प्रसंग आला तर तो खर्च हिंदुस्थानावर लादण्यांत येतो. हिंदुस्थानचें लष्कर आपण नेतों, तर त्याचा खर्च आपण द्यावा हें इंग्लंडास न्यायाचें वाटत नाहीं !

५. सरकार नौकरी केलेल्या पेन्शनरांची नेमणूक दरसाल ३५०८४०७ पौंड या पेनशनी देण्यांत जो सढळ हात आहे तो कांहीं पुसूं नये. क्राफर्ड वगैरे लोकांच्या गोष्टी सोडल्या तरी मद्रास सरकाराला इरिगेशनकरितां लागणाऱ्या सामानाची खरेदी करण्यास हंगामी नौकर लाविले त्या लोकांस १४७४२ पौंड ग्रयाज्युइटीखातर देण्यांत आले. मजुरापासून बड्या अधिकाऱ्यापर्यंत सर्वांना पेन्शन द्यावयाचें आणि हिंदुस्थानांतल्या पेशनदाराला इंग्लंडांत पुनः अधिकारी नेमून पगार चालू ठेवावयाचा, आणि तो तेथें नालायक ठरला तर त्याच्या नुकसानीबद्दल जास्त पेन्शन हिंदुस्थानांतून देववावयाचें असे सांवळे गोंधळ अनंत आहेत.

६. हिंदुस्थानाजवळील समुद्रांत वावरणाऱ्या विलायत सरकारच्या जहाजांचा खर्च ४४२३७ पौंड सालिना आहे !

७. चीन, इराण आणि जेद्दा येथें विलायत सरकारतर्फे इंग्रजांचे वकील आहेत. त्यांचा खर्च पौंड २५३६६ सालिना आहे !

याशिवाय सटरफटर खातीं आहेत. इंग्लंडच्या ताब्यांत दुसऱ्या वसाहती आहेत पण त्यांसंबंधानें होत असलेला विलायती खर्च त्या वसाहतींच्या इंग्लंड तो खर्च सोशितें. पण हिंदुस्थानाची तशी गोष्ट नाहीं. वरील म्हणजे कांहीं एक संबंध नसतां हिंदुस्थानावर नाहक खर्चाचा बोजा ण्यांत येतो हें दिसून येईल. जिब्राल्टर, माल्टा, केपकालनी, नेटल, मॉरिशस, सिलोन, हांगकांग, क्यानडा, बरमुडा व वेस्टइंडीज वगैरे ठिकाणीं साडेचोवीस हजार लष्कर ठेविलें आहे आणि त्याचा खर्च हिंदुस्थानांतून चालला याला म्हणावें ? दुसऱ्याच्या संरक्षणार्थ हिंदुस्थानच्या खर्चांतून लष्कर ठेवावयाचा दुसऱ्या राज्यांतल्या प्रतिनिधींनीं आपला निर्वाह हिंदुस्थानावर करावा हा फायदा इंग्लंडला, हा न्याय कोठला ? ही जमाखर्चाची पद्धत कोणत्या णीसानें लाऊन दिली ? असा प्रकार हिंदुस्थानची प्रजा अज्ञानी आहे म्हणून चालावयाचा काय ? किंवा हिंदुस्थान सात्विक म्हणून त्याचें सत्व हरण करण्याचें इंग्लंडानें योजिलें ? अथवा याचकवृत्तीनें उदरनिर्वाह करणाऱ्या कंगाल भिकाऱ्यासारखी श्रीमान् इंग्लंडची नीच मनोवृत्ती आहे हें कांहीं कळत नाहीं!

या ढोबळ बाबतींत इंग्लंडसारख्या धनाढ्य व नीतिमान आणि सत्यप्रिय देशाचा हलकट कंजुषपणा चांगला व्यक्त झाला म्हणावयास हरकत नाहीं. अगदीं क्षुल्लक बाबतींतहि कसा प्रकार आहे तो दिसण्यासाठीं थोडेंसें विवेचन करणें जरूर आहे.

१ विलायतेस इंजिनेर तयार करण्यासाठीं एक कॉलेज स्थापिलें आहे. त्याचा खर्च हिंदुस्थानांतून सालिना आठ हजार पौंड येतो. त्या शाळेंत गुरु सत्तावीस जण आहेत. त्यांना मदिराप्राशन करण्याची इच्छा झाली तरी ती हिंदुस्थानच्या रकमेंतून पूर्ण झाली पाहिजे अशी व्यवस्था आहे. या शाळेंत तयार झालेले विद्यार्थी इंग्लंडांतहि नोकरी धरितात पण खर्च मात्र एक कवडीभर सोसणें इंग्लंडच्या जिवावर येतें.

२ इलिंग येथें वेड्याचें एक इस्पितळ आहे. त्याचा खर्च सालिना पांचहजार पौंड हिंदुस्थानावर लादतात. आंतले कैदी सारे इंग्लन्डचेच. हिंदुस्थानचे लोक व सरकार वेडे हें दाखविण्याकरितां तर हा खर्च हिंदुस्थान सोशीत नसेलना ?

३ एखाद्या राजपुत्राला हिंदुस्थान पहाण्याची इच्छा झाली तर त्याच्या जाण्यायेण्याचा खर्च हिंदुस्थानावर लादला पाहिजे.

४ शास्त्रीय, विद्याविषयक आणि प्राचीन विद्या यांच्या उत्तेजनार्थ ३५१४ पौंड एक वर्षीं खर्ची पडले आहेत.

५ पोकळ वेगडी किताब हिंदुस्थान सरकारामार्फत मिळतात तर त्याच्या बिल्ल्याचा वगैरे खर्च सुद्धां इंग्लंडास करवत नाहीं.

६ विलायतेस इकडील कारागिराचें कौशल्य पाहण्याची कोणा वड्या गृहस्थास इच्छा झाली तर त्याचा खर्च हिंदुस्थान सरकार करण्याला तयार आहेच. म्हणजे सारांश इंग्लंडांत हिंदुस्थानच्या पैशाची सारखी उधळेगिरी चालली आहे. दरसाल आणि तीहि वाढत्या प्रमाणावर हिंदुस्थानसरकारास कर्ज हवें लागलें कीं, तें विलायतेस काढावयाचें. त्या कर्जाचें व्याज सावकाराच्या घरीं नेऊन पोचविणाऱ्याला चार लाख रुपये आमचें सरकार देतें. असे प्रकार किती म्हणून सांगावेत ? दुसऱ्याचा अपहार करावयाचा झाला म्हणून काय त्यात सुद्धां सारासार विचार करावयाचा नाहीं ?

बरें इतक्या उधळेगिरीचा कारभार ठेविला तो ठेविला पण उत्पन्न पाहून तरी ठेवावयाचा ? आमच्या सरकाराला हल्लीं अडीचशें तीनशें कोटि रुपये कर्ज आहे, त्या कर्जाखातर ६।७ कोटि व्याज द्यावें लागतें आणि अशा स्थितींतहि खर्चाची ही अवस्था ? पुढें काय आपलें दिवाळें वाजवून घ्यावें असे सरकारानें योजिलें आहे कीं काय तें कळत नाहीं ?

असो; आज इंग्लंडांतल्या खर्चांत कशी उधळेगिरी मांडिली हें दाखविलें. पुढील खेपेस हिंदुस्थानांतल्या राज्यकारभारांतली बेबंदशाही खर्चाची पद्धत दाखवावयाची आहे.

* * * * *

* इंग्रजी राज्यांत आम्हांस फायदा काय झाला ?

आपण वर्षभर केलेल्या कारभारांत किंवा उद्योगांत फायदा किती झाला, आपल्या कोणत्या श्रमाचें कसें चीज होत आहे आणि कोठें, कसें व किती लक्ष पोंचविल्यानें आहे याजपेक्षां जास्त किफायत होण्याचा संभव आहे, हें बारकाईनें पाहण्याची जी व्यापाऱ्यांची रीत आहे, तीच सर्वत्र अवश्यक आहे. आदा, खर्च, नफा तोटा बरेंवाईट इत्यादिकांची नीट चौकशी न केली तर त्यापासून कधींहि कल्याण व्हावयाचें नाहीं व आजवर झालेंहि नाहीं. ओढघस्ताचा प्रपंच, दिवाळखोराचा व्यापार आणि फसगत झाली म्हणून पस्तावणाऱ्याचें आयुष्य इत्यादिकांचा आपण नीट विचार करूं लागलों म्हणजे आपल्या ध्यानांत पहिली गोष्ट अशी येते कीं, त्यांनीं आपल्या व्यवहाराचा मुळींच विचार केला नाहीं ! व्यापारी बुडतात ते केवळ फायदानुकसानीचा वेळेवार विचार नसतो आणि जमाखर्चाची नीटशी व्यवस्था नाहीं यामुळेंच. राजकीय बाबतींतील प्रकाहि असाच आहे. म्हणजे आपल्याला मिळालें आहे काय, मिळालें त्यांत नको

*[केसरी–ता. ९ आगष्ट १८९२]

असें कोणतें आणि आवश्यक असून अद्याप मिळावयाचें कोणतें उरलें आहे याचा वारंवार विचार झाला पाहिजे. आणि विचार झाल्यावर तें मिळविण्याबद्दल रास्त व न्याय्य प्रयत्न झाला पाहिजे. असें होईल तरच राजकीय बाबतींत दिवसेंदिवस आमचें पाऊल पुढें पडत जाण्याचा संभव आहे. आमच्या देशाला सध्यां नवा मनु मिळाला यामुळें सर्व प्रकार नव्या वळणाचे सुरू झाले आहेत व नव्या वळणाचे प्रकार सुरू झाले म्हणून हक्काच्या नव्या नव्या बाबी आणि ते संपादण्याचे नवे नवे प्रकारहि अमलांत आणावे लागत आहेत. त्याजबद्दल जर कोणी मागील कालच्या वर्तणुकीचा किंवा स्थितीचा दाखला देऊन आमच्या प्रयत्नाचा प्रतिकार करील तर आमच्या मतें तो खचित दोषी होईल. असो; साधारण मनुष्यालासुद्धां जर खुद्द सरकारला बरोबरीच्या माणसाप्रमाणें आपल्या मनांतली शंका किंवा आपणांस वाटत असलेल्या रास्त गोष्टीबद्दलची मागणी करितां येते व प्रसंगाविशेषीं जाबहि घेतां येतो, तर पाश्चिमात्य शिक्षणाच्या योगानें व तद्द्वारां परिचित झालेल्या अनेक इतर प्रकारांमुळें आम्हीं राजकीय हक्कांची मागणी केली, राजकीय व्यवस्थेचा विचार करूं लागलों व राजकीय सुखाभिलाषाकडे आमच्या मनाची साहजिक प्रवृत्ति होऊं लागली तर त्यांत विशेषसें नवल नाहीं. सारांश सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येकाच्या डोक्यांत राजकीय विचार घोळूं लागतील व राजकीय सुधारणेप्रीत्यर्थ प्रयत्न करण्याची त्याला हांव सुटेल तर त्यांत कांहींच गैर नाहीं. आम्हांला राज्यकारभारांत घ्या, आमची सल्लामसलत ऐका, तुमच्यांतले हे दोष काढा, अमुकांचा संग्रह करा, अमका कर हवा आणि तमका नको, येथें तुम्ही चुकतां, तिकडे तुमचें लक्ष पोंचत नाहीं इत्यादि गोष्टी उघडपणें सरकारास सांगण्याचा आमचा हक्क आहे. हें तत्त्व आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांस कबूल आहे व त्याप्रमाणें प्रजेचें म्हणणें ऐकावयास मिळण्याचीं त्यांनीं आपण होऊन प्रजेस साधनें दिलीं आहेत. वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य आणि उच्च शिक्षणाच्या सोयी यांचा मुख्य हेतू हाच आहे. " आमचें राज्य सुरक्षित व सुयंत्रित चालावें म्हणून हिंदुस्थानच्या लोकांस अज्ञानी ठेवणें आमचें शील नव्हे. " असें ते उघड आणि भरदरबारांत बोलून दाखवितात. " अगदीं लहानपणापासून इंग्रजी स्वातंत्र्याचा खुराक आम्ही चारतों; प्रजेच्या अनुमतीशिवाय कर बसवितां येत नाहीं असें नित्यशः पढवितों, राजाचे अधिकार संपुष्टांत आणून ठेविलेल्या आम्हां लोकांच्या इतिहासाचीं त्यांजकडून पारायणें करवितों; तर आपल्या देशाच्या राज्यकारभारांत आमची मदत घ्या, आमच्या सल्ल्यानें आमच्यावर राज्यकारभार चालवा, असें प्रजेनें म्हटलें तर त्यांत गैर काय ? " असा ध्वनि सरकारी अधिकाऱ्यांच्याहि तोंडून निघतो ! म्हणूनच राज्यकारभाराकडे लक्षपूर्वक पाहणें, त्यांतील दोषांची चर्चा करणें, त्यासंबंधाचे जास्त हक्क संपादणें, संपादण्याचा प्रयत्न करणें, यांत आमच्या राज्यकर्त्यांस कांहीं गैर वाटत नाहीं

एवढेंच नव्हे, तर त्यापासून त्यांना उलटा जास्त आनंद होण्याचा संभव आहे. कारण आमच्या बऱ्याकरितांच ते राज्यकारभार करीत आहेत व आम्हांला आमचा राज्यकारभार चालवितां आला कीं, आम्हांवर तो सोपवून या दगदगींतून आपण मोकळें होऊं असेंहि ते वारंवार म्हणून दाखवीत आहेत. असो; आज हा इतक्या पाल्हाळ लावण्याचें कारण असें कीं, राजकीय विषयाची चर्चा राजकीय दोषांचें आविष्करणं किंवा राजकीय हक्कांची संपादणी इत्यादि बाबतींत प्रजेनें जी चळवळ चालविली आहे ती सरकारास आवडावयाची नाहीं; व त्यामुळें आपणांवर ते डोळे वटारतील इत्यादि प्रकारच्या शंका जर अद्याप कोणाच्या मनांत असल्या तर त्या दूर व्हाव्या.

आतां पहिल्यानें इंग्रजी राज्यापासून आम्हांस फायदा कोणता झाला त्याचें थोडेंसें विवेचन करूं. इंग्रजी राज्यांत हिंदुस्थानास जे अनंत फायदे झाले आहेत, ते व तसे, इंग्रजांखेरीज इतरांच्या हातून कालत्रयींहि झाले नसते. झालेल्या फायद्यावर दृष्टि देऊनच तृप्त असणें हें कृतज्ञतेचें लक्षण आहे, जास्तीची हांव उपयोगाची नाहीं वगैरे प्रकारचें ब्रह्मज्ञान पढविण्यांत अगदीं पटाईत असे पुष्कळ लोक आहेत. परंतु नीट विचार केला म्हणजे फायद्याबरोबरच माणुसकीला अवश्य असे अनेक गुण राज्यांत आम्हीं गमावून घेतों, असें आढळून येईल, असें कित्येकांचें म्हणणें आहे. फार तर काय, पण या इंग्रजी राज्यांत आमचें अस्तित्व कायम राहील कीं नाहीं अशीहि कैकांस धास्ती पडली आहे. जो तो आपल्या पक्षाचें समर्थन करण्यासाठीं लेखन व वाक्चातुर्य एकसारखें खर्चीत सुटतो. अशा स्थितींत साधारण नवख्या होतकरूला इंग्रजी राज्यांत खरोखरीच आमचा फायदा होत आहे कीं नुकसान चाललें आहे, अशी शंका उत्पन्न होऊन तो भांबावण्याचा संभव आहे. यास्तव या प्रश्नाचें थोडेंसें विस्तारपूर्वक विवेचन आणि तेंहि अशा वेळीं कीं, जेव्हां राजकीय चळवळीला नियंत्रित व्यवस्थापूर्वकचीं साधनें अनुकूल होत चाललीं आहेत; तेव्हां करणें अत्यावश्यक आहे. इंग्रजी राज्यांत आम्हांस झालेलें फायदे म्हटलें म्हणजे:— १ शांतता, २ कायद्याची सर्वत्र व्यवस्था, ३ अपराधांचा बंदोबस्त, ४ सार्वजनिक आरोग्य, ५ व्यापारसंमृद्धि, ६ शेतकीसुधारणा, ७ खनिज व उद्भिज संपत्तीची अभिवृद्धि, ८ विद्यादानाच्या अनुपम सोयी, ९ स्वराज्य कारभाऱ्यांची प्राप्ति, १० लेखनस्वातंत्र्य, ११ यंत्रादि सुखसामुग्रीचा परिचय आणि १२ स्वातंत्र्याची अभिरुची हे होत. या इतक्या फायद्याच्या बाबी पाहिल्या म्हणजे याच्यापुढें नुकसानीच्या गोष्टी कितीहि असल्या तरी त्या तुच्छच असें वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्याप्रमाणें पदार्थमात्र शुद्धावस्थेंत क्वचित् सांपडावयाचे त्याचप्रमाणें या फायद्याच्या गोष्टींविषयींहि झालें आहे तें कसें हें पुढील विवेचनावरून ध्यानांत येईल.

* सोन्यारुप्याचें नाणें

पूर्वीं विलायतेंतील सोन्याच्या एक पौंडास हिंदुस्थानांतील रुप्याचे दहा रुपये द्यावे लागत असत, म्हणजे विलायतेंत एक पौंडाचा माल खरेदी करण्यास इकडून दहा रुपये पाठवावे लागत. हल्लीं दहाच्या ठिकाणीं चढतां चढतां सोळा रुपये पाठविण्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे, व हा हुंडीचा भाव आणखी किती चढत जाणार ह्याचें कोणासहि अद्याप पुरें अनुमान होत नाहीं. एक रुपया म्हणजे पूर्वी दोन शिलिंग दोन पेन्स धरीत असत; त्याचे आतां एक शिलिंग दोन पेन्स धरूं लागले आहेत. आमच्या सनदी नोकरांस सरकारास जे पेन्शन द्यावे लागतें तें विलायतच्या पौंडांत द्यावें लागतें. विलायतेंत सरकारनें जें पूर्वीं कर्ज काढलें आहे तेंही पौंडांत काढलें असल्यामुळें त्याचें व्याजही अमुक पौंड असें भरावें लागतें व विलायतेंत दुसऱ्या ज्या खर्चाच्या बाबी आहेत त्या सर्वांसंबंधें हिच व्यवस्था आहे. एकाद्या कलेक्टराचीं मुलें विलायतेस विद्याभ्यासास असलीं तर त्यांस पूर्वीं जितके पौंड पाठवावे लागत तितकेच आतांहि पाठवावे लागतात; पण पौंडाचा भाव दहा रुपये होता तेव्हां कलेक्टरास आपल्या पगारांतील जितके रुपये विलायतेस धाडावे लागत त्याच्यापेक्षां हल्लीं दीडपट जास्त रुपये विलायतेस पाठवावे लागतात तेव्हां मुलांचा खर्च भागतो. आतां कलेक्टर साहेबांस पूर्वीं जो पगार मिळत होता त्यापेक्षां हुंडीच्या भावाप्रमाणें त्यांचा पगार वाढला नाहीं म्हणून हुंडीच्या भावांत फेरबदल झाल्यानें हिंदुस्थानांतील बहुतेक मोठ्या कामगारांचे अतिशय नुकसान होत आहे, व त्यांचें असें म्हणणें आहे कीं त्यांच्याबरोबर हिंदुस्थानांतल्या रयतेचेंहि त्याप्रमाणें नुकसान होतें. उदाहरणार्थ, विलायती कपडा पूर्वीं दोन रुपयांस पडत होता तोच रयतेस आतां तीन रुपयांस पडावयास जाईल. ह्याच्या उलट कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, विलायती कपडा महाग झाल्यानें देशी कपड्यास उत्तेजन येईल व विलायतेस आम्हीं जे गहूं पाठवितों त्याच्यावर हुंडणावळीच्या भावानें शेंकडा पन्नास टक्के आम्हांस उलट फायदाच होईल. एका पक्षाचें म्हणणें सरकारानें कांहीं तरी व्यवस्था करून ह्या हुंडणावळीच्या भावांत चलबिचल होऊं देऊं नये; व एकतर सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत करावें अगर पौंड व रुपये यांचें कांहीं तरी नक्की प्रमाण कायद्यानें ठरवून टाकावें. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें आहे कीं, ह्या कामांत सरकारानें प्रमाण ठरविण्याच्या भरीस न पडतां विलायतेंत पौंडाच्या रूपानें जी रक्कम सरकारास पाठवावी लागते ती होईल तितकी सरकारनें कमी करावी म्हणजे

---

* [केसरी–ता. ३० आगष्ट १८९२]

आपोआप ह्या प्रश्नाचा निकाल लागेल. ह्या दोन्ही पक्षांच्या वतीनें इंग्रजी वर्तमानपत्रांतून हल्लीं मोठा वाद सुरू आहे. सरकारानें ह्या प्रकरणीं कांहीं तरी व्यवस्था करावी अशा अर्थाचे अर्ज विशेषतः युरोपिअन लोकांकडून सरकारकडे जात आहेत व या प्रकरणीं खटपट करण्यासाठीं त्यांची एक करन्सी असोशिएशन नांवाची मंडळी स्थापन झाली आहे. या असोशिएशनमार्फत कलकत्ता, मुंबई, व मद्रास येथें सभा भरून कांहीं नेटिव व्यापारीही असोशिएशनच्या मतास अनुकूल झाले आहेत व त्यांचे अर्ज सरकाराकडे जात आहेत. सारांश, हुंडणावळीचा भाव अतिशयितच वाढल्यामुळें युरोपिअन लोकांत बरीच चळवळ झाली आहे व त्यांच्या नित्यक्रमाप्रमाणें ह्याहि बाबतींत जुटीनें उद्योग करण्यास त्यांनीं सुरुवात केली आहे. अशा प्रसंगीं ह्या प्रश्नाचें स्वरूप थोडेंबहुत तरी महाराष्ट्र वाचकांच्या नजरेस यावें ह्या हेतूनें आम्हीं ह्या विषयाची आज विशेष चर्चा करण्याचें योजिलें आहे. या चर्चेचे दोन भाग आहेत. पहिला—शास्त्रीय; व दुसरा—व्यावहारिक. पैसा व नाणें म्हणजे काय, त्याच्या किंमतींत फेरफार कसे होतात, व ती किंमत कशानें ठरली जाते इत्यादि गोष्टींचें विवरण पहिल्या भागांत येतें; व हल्लींची स्थिति येण्यास कारणें काय झालीं, तीं दूर करणें शक्य आहे कीं नाहीं, असल्यास कोणत्या उपायांची योजना केली पाहिजे वगैरे गोष्टींचा विचार दुसऱ्या भागांत येतो. हल्लीं इंग्रजी वर्तमानपत्रांतून वगैरे जी चर्चा चालली आहे ती प्रायः दुसऱ्या भागाविषयींच आहे. कारण, इंग्रजी अर्थशास्त्राच्या ग्रंथांतून पहिल्या भागाचें यथास्थित विवेचन केलेलें असतें व बहुतकरून सर्वांस अवगत असतें. आमच्याकडे तसा प्रकार नाहीं म्हणून पहिल्या भागाबद्दल थोडीशी माहिती आधीं देऊन नंतर दुसऱ्या भागाकडे वळूं.

पैशाचें खरें स्वरूप

लोक समजतात त्याहून बऱ्याच अंशीं निराळें आहे. पैसा हा शब्द सामान्यतः द्रव्य व नाणें या दोन्ही अर्थीं वापरतात, यामुळें या विषयाचें विवेचन करतांना नेहमींच थोडीशी संदिग्धता रहाते. ती न रहावी म्हणून आम्ही पैसा या शब्दाऐवजीं नाणें या शब्दाचाच उपयोग करणार आहों. नाणें म्हणजे स्वतःसिद्ध संपत्ति असा कित्येकांचा समज आहे; परंतु अर्थशास्त्रदृष्ट्या तो चुकीचा आहे. या शास्त्राप्रमाणें नाणें हें देवघेवीचें एक साधन आहे असें समजतात. राष्ट्राची संपत्ती त्यांतील उत्पन्नावर अवलंबून असते. पुष्कळ नाणें असल्यानें कोणताहि देश श्रीमंत होत नाहीं अगर भिकारी होत नाहीं. एखाद्या मनुष्याजवळ पुष्कळ रुपये असले म्हणजे आम्ही त्यास श्रीमान मानतों हें खरें आहे; परंतु एखाद्या इसमाजवळ पुष्कळ रुपये असणें व एखाद्या राष्ट्राजवळ पुष्कळ रुपये होणें ह्यांत फारच अंतर आहे. इतर वस्तूंप्रमाणें रुपयासही किंमत आहे. रुपयाची किंमत कायम राहून म्हणजे रुपयास जितके पायली

धान्य मिळतें तितके पायली मिळत असून जर कोणा एका गृहस्थाजवळ दहाचे वीस रुपये झाले तर तो पहिल्यापेक्षां दुप्पट श्रीमान् झाला हें म्हणणें खरें आहे; परंतु रुपयाची किंमत उतरत जाऊन म्हणजे रुपयास चार पायली धान्य मिळत होतें तेथें दोन पायली मिळावयास लागून जर कोणाजवळ दहाचे वीस रुपये झाले तर त्याचा ह्यापासून कांहीं एक फायदा होत नाहीं. लंकेंतील सोन्याच्या विटांची जी आपण गोष्ट ऐकतों ती या अर्थशास्त्राच्या सिद्धांताचाच एक दाखला होय. न्हाव्यास एक हजामत केल्याबद्दल सोन्याच्या चार विटा मिळाल्या तेव्हां त्यास पराकाष्ठेचा आनंद झाला होता; परंतु बाजारांत गेल्यावर चार विटांस मिळणारें धान्य चार पैशांस मिळत असलेल्या धान्यापेक्षां जास्त नाहीं, असें जेव्हां त्यास आढळून आलें तेव्हां त्याचा भ्रम दूर झाला; सारांश, इतर जिनसांस ज्याप्रमाणें कमजास्त भाव आहे, ते ज्याप्रमाणें महाग अगर स्वस्त होतात त्याचप्रमाणें नाण्यासही किंमत असून नाणेंही स्वस्त झालें म्हणजे मजुरास दहा रुपये मिळावयाचे त्या ठिकाणीं वीस मिळतात व पोटास त्यास पूर्वी चार लागत असले तर आठ लागतात. एकंदरींत नाणें स्वस्त झाल्यानें कोणासहि सुखाचा अधिक अंश प्राप्त होत नाहीं. परंतु अशारीतीनें नाणें स्वस्त झालें म्हणजे ज्या लोकांचे पगार कायमचे ठरलेले असतात अगर नाणें महाग असतां ज्या लोकांनीं कर्ज काढलें असतें त्यांचें अनुक्रमें नुकसान व फायदा असतो. उदाहरणार्थ, आपण असें समजूं कीं, रुपयास चार पायली धान्य मिळत होतें तेव्हां अनें बचे पांचशें रुपये कर्ज काढले आहेत. कांहीं वर्षांनीं नाणें स्वस्त झाल्यामुळें एक रुपयास दोन पायली धान्य मिळूं लागलें. या वेळीं अनें बस पांचशें रुपये दिले तर बचें निम्मे कर्ज अनें बुडविल्यासारखें होईल. इकडे ज्यांचा पगार कायमचाच रहातो त्यांच्या कुटुंबाचा पूर्वी दोनशें रुपयांत जर निर्वाह होत असला तर नाणें स्वस्त झालें असतां तितक्याच माणसांचा निर्वाह होण्यास दोनशांच्या ठिकाणीं चारशें रुपये लागतील. नाण्याच्या किंमतींत फेरफार झाल्यानें म्हणजे नाणें स्वस्त किंवा महाग झाल्यानें इतर देशांबरोबर आपल्या देशाचा जो व्यापार चालला असतो त्यासही याच मानानें कमजास्ती धक्का बसतो. तेव्हां नाण्याची किंमत सदोदित सारखी राहील अशी तजवीज ठेवली पाहिजे, व तशी तजवीज ठेवण्यास,

नाण्याची किंमत,

कोणत्या गोष्टीवर अवलंबून असते ह्याचाही विचार झाला पाहिजे. पैसा ऊर्फ नाणें हें देवघेवीचें एक साधन आहे हें वर सांगितलेंच आहे. सर्व जगांत व्यापाराची जी घडामोड चाललेली आहे ती सर्व देवघेवीच्या स्वरूपाची आहे, आम्हीं आपले गहूं नेऊन विलायतेस विकतों व तेथून लोखंड खरेदी करून इकडे आणतों. चिनी लोक आपला चहा नेऊन विलायतेस विकतात व त्याच्या मोब-

दला सर्वच माल विलायतेंतून त्यांस न मिळाल्यास हिंदुस्थानच्या अफूची त्यांत भरती पडून अखेरीस व्यापाराचें देवघेवीचें खातें पुरें होतें. देवघेवीचें खातें अशा रीतीनें पुरें न झालें तरच मात्र एका देशांतून नाणें दुसऱ्या देशांत पाठवावें लागतें. परंतु त्याबद्दल मागाहून विचार करूं. सध्या देवघेवीचा व्यवहार नीटपणें चालण्यास नाण्याची आवश्यकता आहे. इतकेंच दाखविण्याचा आमचा हेतू आहे. देवघेव झपाट्यानें चालवावयाची असेल तर दर वेळीं देवघेव होणारा माल प्रत्यक्ष समोरासमोर आणून ' ददामि प्रतिगृह्णामि ' केल्याखेरीज देवघेव चालण्याची कांहीं तरी युक्ति काढली पाहिजे. उदाहरणार्थ, आम्हीं आपले गहूं मुंबईच्या एका व्यापाऱ्यास विकले तर त्यास गहूं दिल्याबद्दलची त्यापासून कांहीं तरी खूण घेऊन ती खूण ज्यास पटेल त्यापासून आम्हांस लागत असलेला माल पुनः आम्हीं घेतला म्हणजे तिन्ही इसमांस एके ठिकाणीं जमण्याची आवश्यकता नाहीं. त्यांतून आम्ही गहूं देऊन जी खूण घेणार ती जर सर्वच लोकांस पसंत होण्यासारखी असली तर मग आमचा देवघेवीचा व्यवहार फारच स्वल्प होईल. मीं अमक्यास गहूं विकल्याची खूण माझेजवळ आहे व ती सर्वांस पसंत पडण्यासारखी आहे; तेव्हां मला आतां कोणताही जिन्नस पाहिजे असल्यास त्या जिनसांच्या मालकास मी ही खूण दाखवीन व ती खूण सर्वत्रांस कबूल असल्यामुळें तो ती मजपासून घेऊन मला लागत असलेलां जिन्नस देईल, व पुढें जर त्यास दुसऱ्या एखाद्या जिनसाची जरूर लागली तर त्याच खुणेचा उपयोग करून तो ती संपादन करील. अशा रीतीनें देवघेवीची कांहीं तरी खूण असली म्हणजे व्यापार सुलभ होऊन वृद्धिंगत होतो; मात्र ही खूण सर्वांस पसंत होण्यासारखी, बनावट न करतां येण्याजोगी, फुकट न मिळणारी थोडक्यांत वापरतां येण्यासारखी आणि ज्याच्या किंमतींत चलबिचल होणारी नाहीं अशी असली पाहिजे.

ही खूण नाणें होय;

नाण्याच्या अंगीं वर निर्दिष्ट केलेले सर्व गुण असले पाहिजेत. गाडीस ज्याप्रमाणें ओंगण घातलें असतां गाडीचा वेग वाढतो त्याचप्रमाणें वर लिहिलेले सर्व गुणांनीं संपन्न असें जेथें नाणें चालत आहे तेथील व्यापार सुरळीत व अबाधित चालतो. नाणें म्हणजे कांहीं एकाविशिष्ट धातूचेंच असलें पाहिजे अशी सामान्य समजूत आहे; परंतु अर्थशास्त्रदृष्ट्या त्याची आवश्यकता नाहीं. एखाद्या राज्यांत सर्व नाणीं कागदाचीं अगर चामड्याचींच असूं शकतील, त्या राज्याबाहेर त्यांस किंमत येणार नाहीं, परंतु राज्यांतल्या राज्यांत नोटांप्रमाणें सर्वच देवघेवीच्या खुणा ऊर्फ नाणीं कागदाचीं असल्यास हरकत नाहीं. हे कागद बनावट करणारास मोठी शिक्षा ठेवली पाहिजे, कारण बनावट केलेले कागद बनावट केलेल्या नाण्यापेक्षां उमगून काढणें फार

कठिण आहे; आणि बनावट नाणें करणारास जो खर्च येतो त्या मानानें बनावट कागद करणारांस कांहींच येत नाहीं. कागदाचीं नाणीं प्रचारांत येण्यास लोकांचा सरकारवंरहि मोठा विश्वास पाहिजे. कारण कागदाचे तुकडे छापून काढण्यास सरकारास फारसा खर्च अगर त्रास नसतो व पैशाची जरूर पडली म्हणजे एखादें गरजू सरकार कागदी नाण्याचा सुकाळ करून सोडावयाचें ! परंतु हेंच नाणें जर धातूचें असेल तर तेवढी धातू विकत घेण्यास सामर्थ्य नसल्यामुळें त्याच सरकारास कागदी नाण्याप्रमाणें धातूच्या नाण्याच्या पुरवठ्यांत फेरबदल करतां येत नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत आणूनच नाणें कोणत्या तरी धातूचें असावें असा सामान्य नियम झालेला दिसतो. गहूं उत्पन्न करण्यास ज्याप्रमाणें कांहीं श्रम लागतात त्याचप्रमाणें सोनें रुपें उत्पन्न करण्यासहि श्रमाची जरूर आहे. या श्रमाच्या मानानें सोन्याची व गव्हांची देवघेव होईल. म्हणजे सोनें रुपें यांस धातू म्हणून कांहीं किंमत आहे व ती सोनें, रुपें उत्पन्न करण्यास लागणाऱ्या श्रमावर अवलंबून आहे. उद्यां स्वल्पायासानें जर पुष्कळ सोनें रुपें मिळूं लागलें तर सोन्यारुप्याची ही स्वभावसिद्ध किंमत कमी होईल, व गहूं उत्पन्न करण्यास लागणारे श्रम जर पूर्वीप्रमाणेंच कायम राहिले तर पहिल्या इतके गहूं मिळविण्यास अधिक सोनें अगर रुपें द्यावें लागेल. या परिणामास सोनें स्वस्त झालें अशी म्हणण्याची वहिवाट आहे. सोन्यारुप्याचा व्यवहारांत कोणत्या वावर्तांत उपयोग होतो ह्याहि गोष्टीचा येथें विचार करणें जरूर आहे. कारण कोणत्याहि पदार्थाची किंमत केवळ तो उत्पन्न करण्यास लागणाऱ्या श्रमावर नसून त्या पदार्थाची लोकांस ज्याप्रमाणें जरूरी असते त्यावरहि अवलंबून असते. सोन्यारुप्याचा मुख्य उपयोग नाण्याकडे आहे व एकंदर जगांत कोट्यानकोटी रुपये किंमतीचें सोनें रुपें नाण्याच्या कामीं वापरतात. आतां यांपैकीं दोन चार देशांस रुपें धातूचीं नाणीं वापरण्याचें ऐवजीं कागदांचीं नाणीं वापरावीं असें वाटलें व आपले विचार त्यांनीं अमलांत आणले,तर एकंदर जगांत सोन्यारुप्याचा नाण्याच्या कामीं जितका उपयोग व्हावयाचा तितका होणार नाहीं. अर्थात् सोनें रुपें जास्ती व उपयोग कमी असें झाल्यानें सोनें रूपें स्वस्त होईल व ज्या देशांतून सोन्यारुप्याचीं नाणीं वापरलीं जात असतील त्यांत सदर नाण्याची किंमत कमजास्त होईल. सारांश, सोनेंरुपें स्वस्त अगर महाग होणें तें उत्पन्न करण्यास लागणाऱ्या श्रमांवर आणि सदर धातूचा लोकांस जो उपयोग होतो त्यावर अवलंबून आहे. थोड्या श्रमानें पुष्कळ सोनें मिळूं लागल्यास तें स्वस्त होईल आणि जगांत आहे तेवढेंच सोनें कायम राहून त्याची कोणास जरूर न राहिल्यास तेंही स्वस्त भावानें विकून टाकावें लागेल. सोन्यारुप्याचा आम्हीं नाण्याच्या कामीं उपयोग करतों हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां सोन्यारुप्याच्या किंमतींत फरक झाला म्हणजे त्याच्या नाण्यांतहि फरक झालाच पाहिजे.

तात्पर्य, नाण्याची किंमत प्रत्येक नाण्यांत असलेल्या धातूच्या किंमतीवर मुख्यत्वेंकरुन अवलंबून असते. ही धातू स्वस्त झाली म्हणजे नाणें स्वस्त होतें व ती महाग झाली म्हणजे नाणेंहि महाग होतें. नाणें व धातू ह्यांच्या किंमतींत नाणें पाडण्यास जो खर्च लागतो तितकें अंतर राहूं शकतें. ह्यापेक्षां जास्ती अंतर ठेवण्याची एखाद्या सरकारानें खटपट केल्यास सरकारी नाण्यासारखींच इतर लोकहि नाणीं पाडूं लागतात. हीं नाणीं खोटीं म्हणजे हलक्या धातूचा नव्हत तर सरकार ज्या धातूचीं ज्या वजनाचीं नाणीं पाडतें त्याच धातूचीं व त्याच वजनाचीं इतर लोक फायदा होतो म्हणून नाणीं पाडण्यास प्रवृत्त होतात. ह्यासाठीं नाण्याच्या व धातूच्या किंमतींत नाणें पाडण्यास लागणाऱ्या खर्चापेक्षां कायद्यानें जास्त फरक ठेवणें सोईवार होत नाहीं अशा रीतीनें नाण्याची कायद्यानें किंमत ठरवणें शक्य नाहीं असें नाहीं; परंतु मग मोहाच्या फुलाच्या कायद्याप्रमाणें कोणीं अमुक तोळ्यावर सोनें रुपें जवळ बाळगूं नये अशा प्रकारचे सक्तीचे कायदे करावयास लागून लोकांवर मोठा जुलूम होईल. तेव्हां अशा तऱ्हेनें नाण्याच्या किंमतीचा कायद्यानें निर्बंध करण्याच्या भरीस कोणतेंच सरकार पडत नाहीं. नाण्याच्या किंमतीसंबंधानें विचार करतांना दुसरी एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, ज्या धातूचें नाणें केलें असेल तिची किंमत सदोदित कायम रहाण्यासाठीं त्या धातूच्या खपाइतकेंच तिचें वार्षिक उत्पन्न पाहिजे. देशाचा व्यापार वाढत चालला म्हणजे त्या मानानें नाणेंहि जास्त जास्त लागतें. व नोटा, हुंडया, आणि चेक ह्यांनीं जर त्याची भरती केली नाहीं तर वाढत्या व्यापाराच्या मानानें ज्या धातूचें नाणें असेल त्या धातूचें उत्पन्नहि वाढलें पाहिजे. व्यापाराची वाढ व प्रतिवर्षीं नाण्यांत होत असलेली झीज भरून काढण्यास जेव्हां नाण्यांतील धातूचें वार्षिक उत्पन्न पुरें पडेल तेव्हांच नाण्याची किंमत सदैव सारखी राहील, असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. पृथ्वीवरील सर्व देशांत नाण्याच्या कामीं जर एकाच धातूचा उपयोग करीत असते तर धातूच्या उत्पन्नांत कमजास्त झाल्यामुळें नाण्याच्या किंमतींत जो कमजास्तपणा यावयाचा तो सर्वांना सारखाच आला असता व नाण्याची किंमत कमजास्त झाल्यानें जें नफानुकसान व्हावयाचें तें सर्व देशांत सर्वांचें सारखेंच झालें असतें. परंतु सर्व देशांत नाण्याच्या कामीं एकाच धातूचा उपयोग करीत नाहींत. कांहींत सोनें, कांहींत रुपें, व कांहींत सोनें आणि रुपें ह्याप्रमाणें निरनिराळ्या धातूंचा नाण्याच्या कामीं उपयोग होतो व अशा निरनिराळ्या धातूंचा उपयोग केल्यानें निरनिराळ्या देशांतील नाण्याची किंमतहि सारखी बदलली न जातां कमीअधिक मानानें बदलूंन व्यापारांत घोटाळा होतो. तो कसा व कां ह्याचें विवेचन पुढील खेपेस करूं.

* सोन्यारुप्याचें नाणें

नंबर २

नाण्याच्या किंमतींत फरक होण्यास कारणें काय व तसा फरक झाल्यानें व्यवहारांत कोणचे परिणाम घडून येतात त्याचें गेल्या अंकांत विवेचन केलेंच आहे. गहूं, तांदूळ, वगैरे जिन्नस ज्याप्रमाणें स्वस्त अगर महाग होतात तोच न्याय ज्या धातूंचें नाणें केलें असतें त्यास लागू आहे. परंतु ही धातू-अर्थात् त्या धातूचें नाणें—स्वस्त झालें म्हणजे नाणेंच स्वस्त झालें, असें न म्हणतां एकंदर पदार्थमात्रांची किंमत वाढली असें म्हणणें लोकांस सोईचें व समजुतीचें पडतें, सर्व पदार्थांची किंमत नाण्यांत करतात आणि नाणेंच स्वस्त झालें ऊर्फ पुष्कळ झालें म्हणजे सर्व पदार्थांऐवजीं किंमतीच्या रूपानें त्या त्या पदार्थांचे मालकास पुष्कळ पुष्कळ नाणें मिळूं लागतें. कोणत्याहि पदार्थास पुष्कळ नाणें द्यावें लागलें म्हणजे तो पदार्थ महाग झाला, असें म्हणण्याचा प्रघात आहे. नाणें स्वस्त झालें म्हणजे सर्वच पदार्थांस पुष्कळ नाणें द्यावें लागतें. नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें, सर्वच पदार्थ एकदम महाग होतात. नाणें स्वस्त झालें किंवा पदार्थ महाग झाला हें पाहणें असेल तर त्यास एकच उपाय आहे. सर्वच पदार्थ उत्पन्नाच्या कमताईमुळें कधींच एकदम महाग होऊं शकत नाहींत. यंदाच्या वर्षीं गहूं महाग झाले तर पुढल्या वर्षीं तांदूळ महाग होतात; परंतु इतर पदार्थांची किंमत आहे तशीच रहाते. पण गहूं, तांदूळ, कापड, लोखंड, कापूस वगैरे सर्वच पदार्थ एकदम महाग झाले म्हणजे नाण्याच्या किंमतींत कांहीं फेरफार झाला आहे असें अनुमान काढण्यास कांहीं हरकत नाहीं. या ठिकाणीं दुसरी अशीहि गोष्ट सांगितली पाहिजे कीं, नुस्तें नाणें स्वस्त झालें म्हणजे तेवढ्यानेंच कोणताहि देश श्रीमंत अगर सुखी होत नाहीं. 'पैसा अगर सोनें कोणी खात नाहीं अगर चावीत नाहीं,' अशी जी आपल्या लोकांत एक म्हण आहे तिची सत्यता या ठिकाणीं पूर्णपणें दिसून येते. खरी श्रीमंती अगर सुख, उपभोगास लागणाऱ्या वस्तूंच्या समृद्धीवर अवलंबून आहे. एखाद्या खेडेगांवांत पाटलाची हजामत करून पावशेर दाणे घेऊन जाणारा न्हावी लंकेतील राक्षसेंद्राची हजामत करून मिळविलेल्या सोन्याच्या चार विटांनीं बाजारांत पावशेर धान्य खरेदी करणाऱ्या न्हाव्यापेक्षां कमी सुखी आहे, असें कधींहि म्हणतां येणार नाहीं. नाणें ही देवघेवीची खूण आहे असें जें मागें आम्हीं लिहिलें आहे तेंहि ह्या सिद्धांतावरून अधिक व्यक्त होतें. देवघेवीच्या खुणा अधिक किंवा कमी

---

* [केसरी—ता. ६ सप्टेंबर १८९२]

—स्वस्त अगर महाग—झाल्या म्हणजे ह्या खुणा अगर नाणीं दरवेळीं अधिक अगर कमी वापरावीं लागतात एवढाच कायतो खरा फरक होतो. देशाची अगर व्यापाराची समृद्धी अगर ऱ्हास ह्याचें त्यापासून कांहीं अनुमान निघत नाहीं. हें अनुमान सुखोपभोगाच्या वस्तू देशामध्यें ज्या मानानें कमी अधिक उत्पन्न होतात त्यावर बसाविलें पाहिजे.

सर्व देशांत एकच धातूचें नाणें असल्यास नाण्याच्या किंमतींत कमजास्त फेरफार झाल्यानें होणारा नफा अगर नुकसान सर्वांस सारखेंच सोसावें लागेल, असेंही गेल्या खेपेस आम्हीं लिहिलें होतें. ह्यावरून प्रथमतःच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, एकाच धातूचें सर्वत्र नाणें कां करूं नये ? यास उत्तर एवढेंच आहे कीं, सोन्याचें नाणें सर्वत्र करूं म्हटलें तर या कामास पुरे इतकें सोनें जगांत मिळण्याचा संभव नाहीं. सोनें सोडून देऊन त्या ठिकाणीं रुप्याचीच योजना करावयाचें म्हणलें तर पृथ्वीवरील जीं कांहीं स्वतंत्र व बलाढ्य राष्ट्रें आहेत त्यांस ही गोष्ट पसंत नाहीं. या राष्ट्रांपैकीं इंग्लंड व जर्मनी हीं प्रमुख होत. इंग्लंडदेशाचा व्यापार आज कित्येक वर्षें वाढत असल्यामुळें तेथील सरकारनें सोन्याचें नाणें सुरू करून आज बराच काल झाला आहे. ज्या देशाचा व्यापार पुष्कळ असतो व जेथें देवघेव बरीच चालत असते तेथें रुप्यापेक्षां सोन्याचेंच नाणें ज्यास्त सोईवार पडतें. कोट्यावधि रुपयांचा व्यापार करणाऱ्या लोकांस दहा रुपये बाळगणें, देणें घेणें, व त्यांचा जमाखर्च ठेवणें ह्यापेक्षां त्याच्या ऐवजीं तो सर्व व्यवहार सोन्याच्या एका लहानशा तुकड्यानें चालविणें विशेष सोईस्कर होतें. या सोई लक्षांत आणूनच विलायत सरकारनें सोन्याचें नाणें प्रचारांत आणलें; व विलायतसरकारचें उदाहरण पाहून जर्मनीनेंहि सन १८७०।७१ सालीं तोच कित्ता गिरविण्याचा निश्चय केला. हल्लीं पुष्कळ खर्च करून जर्मन सरकारनें सोन्याचें नाणें आपल्या देशांत सुरू केलें आहे. तेव्हां इतका त्रास व खर्च सोसून जी गोष्ट जर्मनीनें नुकतीच अमलांत आणली ती इतर राष्ट्रांच्या ओरडीमुळें सोडून देण्यास जर्मनी तयार नाहीं. जर्मनी आणि इंग्लंड हीं दोन्हीहि राष्ट्रें अशा रीतीनें सोन्याचें नाणें असावें यांच पक्षास अनुकूल आहेत. हल्लीं सोन्यारुप्याच्या नाण्यासंबंधें वादविवाद करून कांहीं तरी नियम कायम करण्यासाठीं सर्वराष्ट्रीय मुखत्यारांच्या ज्या सभा होत असतात त्यांत इंग्लंड व जर्मनी ह्यांनीं आपला सोन्याच्या नाण्याचा आग्रह सोडावा अशाबद्दल बरीच वाटाघाट होत असते; व एकंदर हल्लीं चालू असलेल्या चळवळींतील मुख्य मुद्दा बऱ्याच अंशीं याच गोष्टीस अनुलक्षून आहे. असो; सर्व देशांतून एकाच धातूंचें नाणें असणें जरी अर्थशास्त्रदृष्ट्या सोयीचें व फायदेशीर आहे तरी सर्व देशास पुरें इतकें सोनें नसल्यामुळें आणि रुप्याचें नाणें एकदोन प्रबळ राष्ट्रांस पसंत नसल्यामुळें हा पक्ष तूर्त आपणास सोडून दिला पाहिजे.

एका धातूचे नाण्याऐवजीं दोन धातूंचीं नाणीं करावीं लागलीं म्हणजे दोन्ही धातूंच्या उत्पन्नाच्या कमी अधिक प्रमाणानें सदर धातूंच्या किंमतींत ज़े भिन्न भिन्न फेरफार होतात, त्यामुळें व्यवहारांत व व्यापारांत निराळ्याच तऱ्हेच्या गैरसोई उत्पन्न होतात. त्या कशा व त्या टाळण्यास कोणते उपाय केले पाहिजेत हें सांगण्यापूर्वी दोन धातूंचा नाण्याच्या कामीं कसा उपयोग होतो ह्याची थोडीशी माहिती देणें अवश्य आहे. आपल्या हिंदुस्थानांत रुपें व तांबें अशा दोन धातूंचीं नाणीं प्रचारांत आहेत; परंतु तेवढ्यावरून नाण्याच्या कामीं आम्ही दोन धातू वापरतों असें जर कोणी समजेल तर ही मोठीच चूक होईल. हिंदुस्थानांत खरें नाणें रुप्याचेंच आहे. कोणाहि मनुष्यास कितीहि रक्कम द्यावयाची असली तरी ती रुप्याच्या नाण्यांनींच देतात व दिली पाहिजे, असा आपल्या देशांत नियम आहे. तांब्याचें नाण्याचा आम्हीं उपयोग करतों खरा, परंतु तो उपयोग खुर्दा अगर मोड़ या रूपानें होत असल्यामुळें, त्यास नाण्याचें पूर्ण स्वरूप येत नाहीं. ज्या धातूच्या नाण्यानें कांहीं नियमित रकमेपलीकडे व्यवहार करतां येत नाहीं ती धातू स्वस्त अगर महाग झाल्यानें एकंदर राष्ट्राच्या नाण्याच्या किंमतींत कांहीं फेरबदल होत नाहीं. उदाहरणार्थ, आपण हिंदुस्थानांत चालत असलेले रुपये व पैसे हींच नाणीं घेऊं. हिंदुस्थानचें खरें नाणें रुपया होय. सर्व देवघेव व व्यवहार रुपयांत होतात. सर्व किंमती रुपया प्रमाण धरून आकारतात आणि इतर सर्व धातूंची किंमताहि रुपयांनींच केली जाते. रुपें जर स्वस्त झालें तर रुपयाचें स्वस्त नाणें होईल आणि सर्व पदार्थांच्या किंमती वाढतील. रुपें महाग झालें तर रुपये आटून त्याच्या लगडी करून भराभर त्या इतर देशांत पाठविल्या जातील आणि अशा रीतीनें हिंदुस्थानांतील नाणें कमी झालें म्हणजे पूर्वी एखाद्या पदार्थांस जितके नाणें आपणांस द्यावयास सांपडत होतें, तितकें मग सांपडणार नाहीं. अर्थात् तो पदार्थ कमी नाण्यास मिळूं लागेल म्हणजे रुपें महाग झालें असतां इतर पदार्थ स्वस्त होतात, असें व्यावहारिक भाषेंत म्हणणें भाग पडतें; कारण कोणताहि पदार्थ कमी नाण्यास मिळूं लागला म्हणजे तोच स्वस्त झाला, असें म्हणण्याची आपल्यांत वहिवाट आहे. रुपें स्वस्त अगर महाग झाल्यानें लोक रुपये जास्त पाडवितात अगर आटवितात, असें वर सांगितलें आहे; पण हा व्यवहार चालू होण्यास नाणें पाडण्यास जो खर्च लागतो अगर जी मजुरी द्यावी लागते, त्यापेक्षां चांदीच्या भावांत कमजास्त फरक झाला पाहिजे. खर्चाइतकाच किंमतींत फरक असेल तर जरूरीपेक्षां चांदीचें नाणें अगर नाण्याची चांदी करण्याच्या कोणी भानगडींत पडणार नाहीं; परंतु हाच फरक कमजास्त झाला म्हणजे रुपयांची चांदी अगर चांदीचे रुपये भराभर होऊन अखेरीस चांदीच्या व रुपयांच्या किंमतीचें पुनः समीकरण होतें. ज्या धातूंचें जेथें नाणें असेल तेथें त्या धातू-संबंधें असाच प्रकार होत असतो, व धातूंच्या किंमतींत कोणताहि फरक झाला तर त्या मानानें

नाणें पाडणें अगर आटणें चालू राहून पुनः पूर्ववत् धातू व नाणें यांच्या किंमतींचें प्रमाण कायम रहातें परंतु जरी नाणें व धातू ह्यांच्या किंमतीचें अन्योन्य प्रमाण अशा रीतीनें कायम राहिलें तरी एकंदर धातू स्वस्त अगर महाग झाली म्हणजे त्या मानानें नाणेंहि स्वस्त व महाग होतें; आणि नाण्याच्या व इतर पदार्थांच्या किंमतीची तुलना करतां धातू व नाणें स्वस्त म्हणजे इतर सर्व पदार्थ महाग आणि धातू व नाणें महाग म्हणजे इतर सर्व पदार्थ स्वस्त, असें म्हणावें लागतें. मोगलाईंत अगदीं दूरदूरच्या खेडेगांवांतून एक पैशास एक मनुष्याच्या पोटास लागेल इतकें धान्य मिळत असे अशी जी आम्हीं आख्यायिका ऐकतों ती स्थिति कांहीं अंशीं धान्याच्या स्वस्ताईनें व कांहीं अंशीं नाण्याच्या महर्गतेमुळें झाली असावी, असें कित्येक अर्थशास्त्रकारांचें मत आहे. आगगाडी वगैरे धान्य वाहून नेण्याच्या सोई आतांप्रमाणें पूर्वीच्या काळांत जारी नसल्यामुळें ज्या प्रांताचें धान्य त्या प्रांतांत रहात असे व सुवत्तेच्या वेळीं धान्याचा पुरवठा विपुल असल्यामुळें तें स्वस्त होई. परंतु ह्याच्यावरोवर दुसरी अशीहि गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, हल्लीं नाण्याचा जितका प्रसार झाला आहे तितका त्या काळीं झाला नव्हता त्यामुळें पैसा व नाणें दुर्मिळ होतें. अशा रीतीनें नाणें दुर्मिळ असल्यामुळें अर्थातच थोड्या नाण्यास पुष्कळ धान्य येई अगर एका पैशांत एका माणसाचें चांगलें पोट भरे.

रुपया व चांदी यांच्या किंमतींत फेरफार झाल्यामुळें वर जे परिणाम होतात म्हणून सांगितलें आहे ते तांब्याच्या पैशास मात्र पूर्णपणें लागूं पडत नाहींत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हिंदुस्थान सरकारचा असा कायदा आहे कीं, एक रुपयापेक्षां ज्यास्त किंमतीचा व्यवहार कर्तव्य असल्यास त्या किंमतीबद्दल तांब्याचे पैसे कोणीं कोणास दिल्यास ते घेणें अगर न घेणें हें त्याच्या खुषीवर आहे. हिंदुस्थानसरकारच्या कायद्यानें एका रुपयापेक्षां ज्यास्त किंमतीबद्दल तांब्याचे पैसे कोणीं घेतलेच पाहिजेत अशी कोणावर सक्ति करतां येणार नाहीं. रुपयाचे लहान लहान विभाग रुप्याच्याच नाण्याचे केले तर तीं नाणीं अतिशयच लहान होऊन वापरण्यास, बाळगण्यास व ओळखण्यास फारच गैरसोईचीं होतील. एवढ्याच कारणाकरितां तांब्याचें नाणें सरकारानें सुरू केलें आहे. पदार्थाची किंमत एक रुपयापेक्षां जास्त असली तर ती रुपयांतच आकारली जाते व ती दिली पाहिजे. रुपयापेक्षां कमी असेल तर ती तांब्याच्या नाण्यांत आकारली जाते, पण अशा स्थळीं तांब्याच्या नाण्याची किंमत तांब्यांत असलेल्या नाण्यावरून न होतां रुप्याच्या रुपयाचा अमुक एक भाग अशा समजुतीनें त्याचा उपयोग करितात. एक रुपयास जितकें तांबें येईल त्यांत चौसष्टापेक्षां पुष्कळ जास्त पैसे पाडतां येतील. परंतु तांबें व तांब्याचें नाणें यांच्या किंमतींत हें जें अंतर आहे याचा फायदा घेऊन कोणी तांब्याचे पैसे करूं म्हणेल तर त्यापा-

सून त्यास विशेष किफायत व्हावयाची नाहीं. कारण, एक तर चौसष्ट पैसे तयार करावे तेव्हां हा नफा सांपडणार आणि खेरीज, रुपये ज्याप्रमाणें हवे तितके, हवे त्या ठिकाणीं आणि हवेतसे वापरतां येतात तशी तांब्याच्या नाण्याची स्थिति नसल्यामुळें, एक रुपयाचा खुर्दा एके ठिकाणीं खपला तर दुसऱ्या रुपयाचा खुर्दा खपविण्यास दुसरे ठिकाणीं गेलें पाहिजे. इतकी गैरसोय व अडचण सोसूनहि पुष्कळ नफा मिळायचा असता तर गोष्ट निराळी, परंतु तसा प्रकार नसल्यामुळें, तांब्याच्या नाण्यांत जितकी धातू असते त्यापेक्षां जरी त्या नाण्याची जास्त किंमत धरली आहे तरी त्यापासून सदर नाणें बनावट करण्याची कोणास बुद्धि होत नाहीं. हिंदुस्थानांत मुख्य नाणें रुप्याचें आहे, हें वर सांगितलेंच आहे. रुप्याची किंमत कायद्यानें कृत्रिम ठरविली तर चांदीच्या किंमतीपेक्षां ती ज्या मानानें कमी अधिक असेल त्या मानानें चांदीचे रुपये अगर रुपयाची चांदी करण्यास लोक प्रवृत्त होतील. परंतु तांब्याचें नाणें नियमित कारणाकरितां आणि नियमित रकमेपर्यंतच चालेल असा सरकारचा कायदा असल्यामुळें, वरील सिद्धांत तांब्याच्या नाण्यास लागू पडत नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सारांश, देशांत जें मुख्य नाणें असतें त्याची किंमत कायद्यानें अगर अन्य उपायानें कायम करणें गैरसोईचें व गैरफायद्याचें आहे; पण खुर्द्याच्या नाण्यास हा सिद्धांत लागू पडत नाहीं. हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें तांब्याचें नाणें वापरतात त्याचप्रमाणें विलायतेंत रुप्याचें नाणें खुर्द्याच्याऐवजीं उपयोगांत आणतात. व येथें एक रुपयापेक्षां जास्त किंमतीऐवजीं तांब्याचें नाणें ज्याप्रमाणें चालणार नाहीं असा कायदा आहे त्याचप्रमाणें विलायतेंतहि दोन पौंडापेक्षां जास्त किंमतीबद्दल शिलिंग वापरूं नयेत असा सरकारचा ठराव आहे. त्यामुळें फक्त एक रुपयाच्या आंतील व्यवहारासच हिंदुस्थानांत तांब्याच्या नाण्याची व दोन पौंडांच्या आंतील व्यवहारास इंग्लंडांत रुप्याच्या नाण्याची (शिलिंगाची) जरूर पडते, परंतु त्यामुळें इंग्लंडांत सोन्यारुप्याचें आणि हिंदुस्थानांत तांब्यारुप्याचें नाणें चालू आहे, असें अर्थशास्त्रद्या म्हणतां येत नाहीं. दोन धातूंचीं नाणीं चालू असण्याचें मुख्य लक्षण असें आहे कीं, दोन्ही धातूंच्या नाण्यांचा सारख्याच योग्यतेनें म्हणजे सर्वत्र ठिकाणीं आणि कितीहि मोठी रक्कम देणें घेणें असलें तरी, उपयोग करतां आला पाहिजे. हें लक्षण हिंदुस्थानच्या अगर विलायतच्या नाण्यास लागू पडत नाहीं. करतां विलायतेंत सोन्याचें व हिंदुस्थानांत रुप्याचें नाणें आहे असेंच म्हणण्याचा परिपाठ आहे. दोन धातूंचीं नाणीं एकदम प्रचारांत आणलीं असतां काय अडचणी येतात व त्या कशा दूर होतात हें आज सांगण्याचा आमचा इरादा होता; परंतु दुसऱ्या कांहीं जरूरीच्या गोष्टींचा खुलासा करण्यांतच जागा अडल्यामुळें त्या विषयाचा आतां पुढल्या खेपेस विचार करूं.

* सोन्यारुप्याचें नाणें

नंबर ३

मागें खुर्द्यांच्या नाण्यास तांबें वगैरे इतर धातूचा कोणत्या तऱ्हेनें उपयोग करतात हें सांगितलेंच आहे. त्यावरून दोन धातूंचें नाणें म्हणजे काय याचा थोडाबहुत तरी बोध झालाच असेल. आज त्याबद्दल जास्त विचार करणें आहे. गेल्या खेपेस जें विवेचन केलें आहे त्यावरून मुख्य नाणें रुप्याचें, आणि खुर्द्याचें नाणें तांब्याचें अगर विलायतेंत आहे त्याप्रमाणें, मुख्य नाणें सोन्याचें आणि खुर्द्याचें नाणें तांब्या-रुप्यांचें (पेन्स, शिलिंग, वगैरे) असलें तर त्यास अर्थ-शास्त्रांत " दोन धातूंचीं नाणीं सदर देशांत प्रचारांत आहेत, " असें म्हणत नाहींत एवढें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. दोन धातूंचीं नाणीं प्रचारांत असण्यास दोन्हीहि मुख्य नाणीं पाहिजेत. उदाहरणार्थ, विलायतेंत हल्लीं पौंड म्हणून जें मुख्य नाणें आहे तें सोन्याचेंच आहे. शिलिंग रुप्याचे असतात पण आमचेकडील पैशाप्रमाणें शिलिंगाची किंमत शिलिंगांतील चांदीवर न होतां पौंडाचा विसावा भाग या मानानें मोजली जाते. व चाळीस शिलिंगांपेक्षां जर कोणास जास्त रक्कम द्यावयाची असेल तर ती पौंडांतच दिली पाहिजे, असा तेथील सरकारचा ठराव आहे. आतां तेथील सरकारास सोन्याचें व रुप्याचें अशीं दोन्ही नाणीं सारखींच सुरू ठेवावयाची असतील, तर रक्कम कितीहि मोठी असली तरी तिची भरती पौंडांत किंवा शिलिंगांत केली तरी चालेल, असा त्या सरकारानें ठराव केला पाहिजे; व हा ठराव करतेवेळींच एक पौंड म्हणजे अमुक एक शिलिंग (मग देवघेवीची रक्कम कितीहि मोठी असली तरी चालेल) असें कायमचें प्रमाण सरकारानें ठरविलें पाहिजे. विलायत सरकारानें असा ठराव केला आणि देवघेव ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें पौंडांत अगर शिलिंगांत सर्वत्र होऊं लागली म्हणजे अर्थशास्त्रदृष्ट्या विलायतेंत सोन्याचें व रुप्याचें अशीं दोन्ही नाणीं चालतात असें म्हणतां येईल. हिंदुस्थानांत हल्लीं सोन्याचें नाणें मुळींच प्रचारांत नाहीं. मोहोर, होन, वगैरे कांहीं जुनीं सोन्याचीं नाणीं आढळतात, परंतु त्यांची किंमत सदर नाण्यांत असलेल्या सोन्याच्या वजनावर रुपयांत करितात, नाण्याप्रमाणें करीत नाहींत. उदाहरणार्थ, आज एका मोहोरेस १५ रुपये आले तर सोनें महाग झालें असतां त्याच मोहोरेचे उद्यां जास्त रुपये येतील. यावरून हिंदुस्थानांत मुख्य नाणें रुप्याचें, आणि इतर सर्व पदार्थांचा ज्याप्रमाणें रुपयांत भाव होतो त्याचप्रमाणें सोनें हा पदार्थ समजून त्याचाहि रुपयांत भाव

---

* [ता. २० सप्टेंबर १८९२]

करितात असें दिसून येईल. सारांश, हिंदुस्थानांत सोन्याचें आणि रुप्याचें अशीं दोन्ही नाणीं प्रचारांत आहेत अशी स्थिती येण्यास सोन्याच्या व रुप्याच्या नाण्यांत एक मोहोरेस अमुक रुपयेप्रमाणें प्रमाण ठरवून; लाखों रुपयांचे व्यवहार अगर देवघेव रुपयांनीं अगर मोहोरांनीं करण्याची सर्वत्रांस सारखी मोकळीक ठेविली पाहिजे. पांचपन्नास रुपयेपर्यंत अगर दहापांच मोहोरांपर्यंत रुपयांनीं व पुढें सर्व मोहोरांनीं देवघेव केली पाहिजे असा नियम केला, तर सोन्याचेंच नाणें मुख्य आहे असें समजावें लागेल. तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करतां सोन्याचें व रुप्याचें अशीं दोन्ही नाणीं प्रचारांत आहेत असें म्हणण्यास (१) सोन्यारुप्याचें कांहीं तरी नियमित प्रमाण ठरविलें पाहिजे; आणि (२) मोठमोठ्या रकमांचा भरणाहि सोन्याच्या अगर रुप्याच्या नाण्यांनीं ज्यास वाटेल तसा करितां आला पाहिजे. ह्या दोन्हीहि शर्ती अगर नियम जेथें अमलांत आहेत तेथें दोन धातूंचीं नाणीं चालतात असें म्हणतात. सन १८७४ सालापर्यंत फ्रान्स, बेलजम, स्वित्झर्लंड, इटलि वगैरे देशांतून या दोन्ही नियमांस अनुसरून सोन्याचीं व रुप्याचीं अशीं दोन्ही धातूंचीं नाणीं चालत असत म्हणजे कोणी मनुष्य सोनें घेऊन टांकसाळेंत गेला तर एक औस सोन्यास १५॥ औंस रुपें अथवा सरासरीनें एक पौंडास १०। रुपये या मानानें त्यास सोन्याचीं अगर रुप्याचीं पाहिजे तीं नाणीं टांकसाळेंतून देण्यांत येत. जोंपर्यंत फ्रेंच सरकारच्या टांकसाळेंतून एक तोळा सोन्यास १५॥ तोळे रुपें असें नियमित प्रमाणानें मोबदला मिळत असे, तोंपर्यंत सोन्यारुप्याच्या भावांत फारसा फरक झाला नाहीं. पण सन १८७२ सालीं जर्मन सरकारानें आपल्या देशांतील रुप्याचें नाणें अजिबात काढून टाकलें त्यामुळें रुपें बरेंच स्वस्त झालें आणि सन १८७४ सालीं फ्रेंच सरकारानें एक तोळा सोन्यास १५॥ तोळे रुपें याप्रमाणें सरकारी टांकसाळेंतून मोबदला देण्याची रीत बंद केली. या दोन्ही कारणांनीं रुप्याचा भाव कायम ठेवण्यास पूर्वीं जीं कारणें होतीं तीं न राहिल्यामुळें सोनें व रुपें ह्यांच्यामधील परस्पर प्रमाण बिघडत जाऊन सोनें महाग झालें व रुपें स्वस्त झालें. म्हणजे पूर्वीं एक तोळा सोन्यास जितके रुपये पडत होते त्यापेक्षां आतां जास्त पडूं लागले.

असो; सोनें आणि रुपें ह्या दोन्हीं धातूंचीं नाणीं प्रचारांत आणण्यास या दोन्ही धातूंमधील कांहीं तरी नियमित प्रमाण ठरविलें पाहिजे, हें वर सांगितलेंच आहे. हें नियमित प्रमाण कसें ठरवावयाचें व तें कायम कसें रहातें याबद्दलहि येथें थोडीशी माहिती सांगितली पाहिजे. उदाहरणार्थ, आपण हिंदुस्थान देश घेऊं. या देशांत जर सोन्याचें व रुप्याचें अशीं दोन्हीहि नाणीं सरकारास सुरू करावयाचीं असतील तर एक तोळा सोनें म्हणजे पंधरा, सोळा, सतरा अगर वीस तोळे रुपें असा कांहीं तरी निर्बंध केला पाहिजे. हा निर्बंध त्यावेळीं बाजारांत जो सोन्यारुप्याचा भाव असेल त्यास धरून करितात. आजच्या स्थितींत जर

असा निर्बंध करणें असेल तर एक तोळा सोन्यास २० तोळे रुपें असें प्रमाण ठरवावें लागेल. आपण असें समजूं कीं, हें प्रमाण ठरवून हिंदुस्थान सरकारानें सोनें व रुपें या दोन्ही धातूंचीं नाणीं हिंदुस्थानांत सुरू केलीं. परंतु एक तोळा सोन्यास वीस तोळे रुपें हा जरी सरकारी भाव कायम धरला तरी व्यापारांत सोनें अगर रुपें महाग अगर स्वस्त होणें, हें केवळ सरकारी भावावरच अवलंबून नसतें. यंदाच्या सालीं सोन्याच्या खाणींतून फारसें उत्पन्न निघालें नाहीं व रुप्याच्या खाणींतून उत्पन्न बरेंच निघालें म्हणजे सोन्यारुप्याच्या भावांत, इतर पदार्थांच्या भावांत त्या त्या पदार्थांच्या पिकाप्रमाणें जसे फरक पडतात तसा थोडाबहुत फरक पडलाच पाहिजे. हा फरक पडला असतां त्याचा सरकारी भावावर व नाण्यावर काय परिणाम होतो हें पाहिलें पाहिजे; परंतु त्यापूर्वी दुसरी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे, ती ही कीं, नाण्यामध्यें जें सोनेंरुपें गुंतून रहातें तें भावांत चलबिचल होण्यास कारणीभूत होत नाहीं. नाण्यांत जें सोनें, रुपें जातें त्याचा उपयोग नाण्यापलीकडे कांहीं होत नाहीं; म्हणजे नाण्यापलीकडे त्याची कांहीं किंमत नाहीं. किंबहुना नाण्याची स्वतः किंमत करतां येत नसून त्यावरून फक्त इतर पदार्थांची किंमत केली जाते, अशी नाण्याची अर्थशास्त्रांत व्याख्या देण्याची वहिवाट आहे. कापसाचा, रेशमाचा, गव्हांचा रुपयांत भाव होईल पण रुपयाचा दुसऱ्या कशांत भाव होत नाहीं. रुपयास कमी जास्ती गहूं मिळतील पण त्यामुळें रुपयांचा भाव अमुक अशी म्हणण्याची वहिवाट नाहीं. सर्व किंमतींचें माप रुपया प्रमाण धरून होतें. रुपयाचें माप दुसऱ्या कशानें होत नाहीं. सारांश, नाण्यांत गुंतलेलें सोनें, रुपें या दोन्ही धातूंचा बाजारांत पदार्थ अगर माल या नात्यानें भाव ठरविण्यास उपयोग होत नाहीं; म्हणजे सोनें अगर रुपें स्वस्त अगर महाग होणें हें सोन्यारुप्याच्या लगडी जास्त अगर कमी होणें यावर अवलंबून आहे. नाण्यांत गुंतलेल्या सोन्याच्या जर लगडी करितां येतील तर त्यामुळें सोन्याच्या भावांत फरक पडेल; परंतु तेंच सोनें जोंपर्यंत नाण्यांत गुंतलेलें राहील तोंपर्यंत तें इतर व्यवहारांस निरुपयोगी आहे. उदाहरणार्थ, आपण असें समजूं कीं, बाजारांत एक हजार शेर सोनें आहे व एकंदर नाणें मोहोरांचेंच असून देशांत पन्नास हजार मोहोरा आहेत. या दोहोंचा म्हणजे सोन्याचा आणि मोहोरांचा एकमेकांवर कसा परिणाम घडतो, हें लक्षांत येण्यासाठीं तूर्त देशांत मोहोरांखेरीज दुसरें कोणतेंहि नाणें नाहीं व सोन्याखेरीज दुसरा कोणताहि पदार्थ नाहीं; असें आपण समजूं. एक हजार शेर सोन्यापैकीं ५०० शेर सोन्याच्या मोहोरा पाडिल्या म्हणजे मोहोरांची संख्या देशांत पुष्कळ होऊन सोन्याच्या लगडी कमी होतील अर्थात् लोकांजवळ मोहोरा पुष्कळ व सोनें कमी झाल्यानें एक शेर सोन्यास पुष्कळ पुष्कळ मोहोरा द्याव्या लागतील. म्हणजे मोहोरांनीं भाव करावयाचा असल्यास सोनें महाग झालें असें म्हणावें

लागेल. त्याचप्रमाणें ५० हजार मोहोरांपैकीं १० हजार मोहोरांचें जर आटवून सोनें केलें तर देशांत ४० हजार—पूर्वीपेक्षां कमी—मोहोरा आणि हजारापेक्षां जास्त शेर सोनें होईल. आतां एकमेकांचा भाव एकमेकांत आकारावयाचा म्हटलें म्हणजे सोन्याच्या लगडी पुष्कळ झाल्या आणि नाणें कमी झालें. अर्थात् एक शेरास जितकें नाणें अगर मोहोरा पूर्वी लोकांजवळ द्यावयास होत्या तितक्या आतां राहिल्या नाहींत. त्यामुळें एक शेर सोन्यास कमी मोहोरा मिळूं लागतात म्हणजे सोनें स्वस्त होतें. सोनें नाण्याच्या रूपानें असलें आणि तेंच धातूच्या अगर लगडीच्या रूपानें असलें तर या दोन स्थितींत त्यामध्यें हा जो महत्त्वाचा भेद आहे तो या विषयाचें विवेचन करतेवेळीं नीट लक्षांत ठेविला पाहिजे. सौकर्यासाठीं एकास सोनें—नाणें, रुपें—नाणें आणि दुसऱ्यास सोनें—धातू, रुपें—धातू अगर नुसतें सोनें, रुपें, चांदी असें म्हणण्याचा शास्त्रीय ग्रंथांतून परिपाठ आहे.

आतां सोनें आणि रुपें या दोन्ही धातूंचीं नाणीं एक तोळा सोन्यास वीस तोळे रुपें या कायम प्रमाणानें प्रचारांत असतां त्या प्रमाणाचा सोनें आणि रुपें या दोन धातूंच्या परस्पर किंमतीवर कसा परिणाम घडतो तें पाहूं. देशांत दोन्ही धातूंचीं नाणीं सारखींच प्रचारांत असल्यामुळें लाखों शेर सोनें आणि रुपें नाण्यांत गुंतलेलें असतें व बाकी राहिलेलें बाजारांत दागिन्यासाठीं वगैरे धातूच्या रूपानें विक्रीस शिल्लक रहातें. सोन्यारुप्याचा इतका मोठा भाग नाण्यांत गुंतून गेला आहे कीं, एकाद्या वर्षीं पुष्कळ पाऊस पडल्यानें सामुद्राचें पाणी ज्याप्रमाणें वाढत नाहीं त्याप्रमाणें दहापांच वर्षें सोन्याच्या खाणींतून कमी सोनें उत्पन्न झालें अगर जास्त रुपें निघालें; तरी त्यामुळें एकंदर जगांतील सोन्यारुप्याच्या पुरवठ्यांत फारसा फरक होत नाहीं; परंतु एकंदर पुरवठ्यांत जरी फारसा फरक झाला नाहीं तरी सोनें कोणकोणत्या उपयोगास किती किती लावावें ह्याचा त्यामुळें निर्णय होतो. देशांतील लोकसंख्या कायम असली तरी देशाच्या स्थितीनुरूप ज्याप्रमाणें एखाद्या देशांत शेतकी जास्ती व दुसऱ्या देशांत उद्योगधंदा करणारें जास्ती असा भेद असतो त्याप्रमाणेंच सोन्यारुप्याचा वर लिहिलेला भेद होय. एक तोळा सोन्यास वीस तोळे रुपें या प्रमाणानें हिंदुस्थानांत रुपये मोहोरा अशीं दोन्हीहि नाणीं सुरू आहेत, असें आपण वर कल्पिलेंच आहे.

आतां आपण असें समजूं कीं, एखाद्या सालीं सोन्याचें वार्षिक उत्पन्न कमी होऊन रुप्याचें वार्षिक उत्पन्न जास्त झालें, म्हणजे अर्थातच एक तोळा सोन्यास वीस तोळे रुप्यापेक्षां जास्त चांदी मिळूं लागेल. समजा कीं, एक तोळा सोन्यास २१ तोळे चांदी मिळूं लागली; तर त्याचा नाण्यांत गुंतलेल्या सोन्यारुप्यावर काय परिणाम होतो तो पहा. बाजारांत २१ तोळे चांदी द्यावी तेव्हां एक तोळा सोनें मिळतें, व टांकसाळेंत २० तोळे चांदी देऊन एक तोळा सोनें मिळतें. तेव्हां ज्यास आपली चांदी मोडून सोनें घ्यावयाचें असेल तो टांक-

साळेंत जाऊन घेईल. आतां चांदीचे रुपये आणि सोन्याच्या मोहोरा अशीं नाणीं आपण कल्पिलीं आहेत. तेव्हां एक तोळा सोन्यास एकवीस तोळे चांदी असा भाव झाला म्हणजे ज्याला ज्याला सोनें खरेदी करावयाचें असेल तो टांकसाळेंत जाऊन खरेदी करील आणि त्या मोहोरा आटवून त्याचा सोनेंधातू या नात्यानें उपयोग करील. एक तोळ्याची एक मोहोर आणि एक तोळ्याचा एक रुपया असें मानलें तर वीस रुपयांस एक मोहोर ऊर्फ एक तोळा सोनें टांकसाळेंत हवे त्यास मिळत असतां बाजारांत एकवीस रुपये देऊन एक तोळा सोनें कोण खरेदी करणार ? तात्पर्य, सरकारी भाव १:२० कायम असतां जर बाजारांत १:२१ असा होईल तर नाण्यांत गुंतलेल्या सोन्यापैकीं कांहीं भाग भराभर खरेदी करून लोक आटवतील आणि याप्रमाणें नाण्यांत अडलेला सोन्याचा कांहीं भाग मोकळा होऊन त्याची सोनेंधातू झाली म्हणजे सोनें त्या-वर्षीं कमी झाल्यामुळें जी महर्गता झाली होती ती नाहींशी होईल. आणि पुनः १:२० हें प्रमाण कायम राहील. दोन धातूंचीं नाणीं सर्व जगभर जर कांहीं एका ठरीव प्रमाणानें चालू रहातील तर अशा रीतीनें प्रतिवर्षीं सोन्या-रुप्याच्या परस्पर किंमतींत जो कांहीं फेर पडतो तो सहज दूर करतां येतो; व त्यामुळें दोन्ही धातूंची परस्पर किंमत व्यवहारांत कायम राहण्यास चांगली मदत होते. एखाद्या वर्षीं सोनेंधातू कमी उत्पन्न झाली, तर रुप्याच्या नाण्यांत सोन्याची किंमत वाढते म्हणजे एक तोळा सोनें मिळण्यास जास्त रुप्याचीं नाणीं द्यावीं लागतात; पण इकडे सरकारी टांकसाळेंत सोन्यारुप्याचें प्रमाण कायमच असतें. म्हणून लागलींच नाण्यांत गुंतलेलें सोनें कमी रुपयांस खरेदी करून लोक तें आटवून त्याच्या लगडी बनवितात आणि पुनः सोन्याच्या लगडी जास्त झाल्यामुळें पूर्वी जो भावांत थोडाबहुत फरक झालेला असतो तो नाहींसा होतो, एकाद्या वर्षीं सोनें जास्त व रुपें कमी झालें तरीहि हाच न्याय व सोनें व रुपें दोन्हीहि जास्त झालीं तरी तोच. पैकीं सोनें रुपें दोन्हीहि जास्त झालीं असतां काय परिणाम होतो हें लक्षांत येण्यास पहिल्या निबंधांत सांगितलेल्या कांहीं गोष्टी येथें पुन्हां सांगितल्या पाहिजेत. सोनें, चांदी वगैरे धातू जास्त उत्पन्न झाल्यास व देशांत एकंदर नाणें पूर्वी इतकेंच असलें तर कांहीं काल-पर्यंत सोनें, चांदी वगैरे धातू पूर्वी मिळत होत्या तितक्याच नाण्यास जास्त जास्त मिळूं लागतात; परंतु एक तोळा वजन भरणाऱ्या सोन्याच्या मोहोरेस, एक तोळ्यापेक्षां जास्त सोनें मिळणें ही स्थिति फार दिवस कधींहि रहावयाची नाहीं. कारण सरकारी टांकसाळेंत जाऊन सोन्याच्या हव्या तेव्हां मोहोरा पाडून आणण्याची मोकळीक असते, तेव्हां एक मोहोरेस तोळ्याहून जास्त सोनें देण्या-पेक्षां आधीं त्याची मोहोर पाडण्यांतच जास्त नफा आहे, हें लोकांस तावडतोब कळून येतें; आणि अशी स्थिति आली म्हणजे लोक भराभर सोनें रुपें टांकसा-

ळेंत नेऊन त्याचीं नाणीं करवितात; तीं इतकीं कीं पुनः सोनें-धातू आणि सोनें-नाणें यांचें प्रमाण पहिल्याप्रमाणें होतें. आतां सोन्याचीं नाणीं पुष्कळ झाल्यामुळें मागें सांगितल्याप्रमाणें कोणताहि पदार्थ खरेदी करण्यास पुष्कळ पुष्कळ नाणीं द्यावीं लागतील. म्हणजे व्यवहारांतील इतर सर्व पदार्थांच्या किंमती वाढतील, पण त्यामुळें सोनें-नाणें आणि सोनें-धातू यांमधील परस्पर किंमतींत कांहीं फेरफार होत नाहीं. सारांश, सोनें आणि रुपें या दोन्ही धातूंचीं नाणीं कोणत्या तरी कायम प्रमाणानें प्रचारांत असलीं म्हणजे सोन्यारुप्याच्या परस्पर किंमतींत अगर भावाच्या प्रमाणांत अल्पस्वल्प होत असलेले फेरफार नाहींसे होण्यास एक मोठेंच साधन असतें; व त्यामुळें सोनें आणि रुपें ह्यांचे 'परस्पर' भाव कायम रहातात. परस्पर असें म्हणण्याचें कारण असें कीं, सोनें आणि चांदी दोन्हीहि जास्त उत्पन्न झाल्यामुळें सोन्याचीं आणि रुप्याचीं अशीं दोन्हीहि नाणीं जास्त पाडलीं जातील व त्यामुळें कदाचित् सर्व पदार्थांच्या किंमती वाढतील अगर अन्यपक्षीं कमी होतील. परंतु हल्लीं सोनें आणि रुपें यांच्यामध्यें आपसांत जसें भांडण लागलें आहे, तसा प्रकार होण्याची मात्र मग धास्ती नसते. याकरितां अशा रीतीनें सोनें आणि रुपें ह्या दोन्ही धातूंचीं नाणीं सर्व देशांत चालू व्हावीं म्हणजे सोन्याच्या आणि रुप्याच्या नाण्याच्या परस्पर भावांत हल्लीं जी चलबिचल होत असते ती होणार नाहीं, असें अर्थशास्त्रवेत्त्यांचें म्हणणें आहे. पण या शास्त्रयांच्या म्हणण्यास निरनिराळ्या राष्ट्रांच्या सरकारांकडून अद्याप जसा मान मिळावा तसा मिळत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे! व्यापाराच्या समृद्धीमुळें विलायतेंत सोन्याचें नाणें सर्वांच्या अगोदर जें सुरू झालें आहे तें अद्याप तसेंच कायम आहे; पण एका इंग्लंडांतच सोन्याचें नाणें सुरू होतें तोंपर्यंत सोन्यारुप्याच्या भावांत फारसा फरक झाला नाहीं. सन १८७२ सालीं जर्मन लोकांनीं फ्रेंच लोकांस पादाक्रांत करून जी मोठी खंडणी मिळविली त्यामुळें जर्मनीनेंहि रुप्याचें नाणें टाकून देऊन आपल्या देशांत सोन्याचें मुख्य नाणें करण्याचा ठराव केला. त्यामुळें जर्मनीसारख्या मोठ्या राष्ट्राच्या व्यवहारास लागणाऱ्या कोट्यावधि रुप्याच्या नाण्याची चांदी बनूं लागली. व त्या ऐवजीं जर्मनीस सोनें लागूं लागल्यामुळें त्याचप्रमाणानें सोन्याचा भावहि वाढूं लागला. जगांतील सोन्याचें उत्पन्न कांहीं त्या मानानें वाढलें नाहीं. तेव्हां अर्थातच, सोन्यास तेजी आणि रुप्यास कोणी विचारीना अशी स्थिति आली. फ्रान्स देशांत सोनें रुपें टांकसाळींत कायम भावानें मिळत असे; पण वरील कारणामुळें फ्रेंच सरकारासहि ती पद्धत बंद करावी लागली. फ्रेंच टांकसाळेंत नियमित भावानें सोनें रुपें मिळण्याचें बंद झाल्याबरोबर व्यापाऱ्यांचा अगदींच धीर सुटला आणि रुपें स्वस्त व सोनें महाग होण्यास जी सुरुवात झाली होती तोच क्रम उत्तरोत्तर बळावत चालला. कांहीं दिवस प्रतिवर्षीं अमेरिका नाण्याकरितां

म्हणून, रुपें खरेदी करीत असें; त्यामुळें रुपें जितकें स्वस्त व्हावें तितकें झालें नाहीं. पण ही आशाहि उत्तरोत्तर कमी होत चालली. आणि इकडे जर्मनीच्या पाठोपाठ डेन्मार्क, स्वीडन, नार्वे, हालंड, वगैरे देशांनींहि सोन्याचीं नाणीं सुरू केलींच होतीं; तेव्हां युरोप आणि अमेरिका या दोन खंडांत सोन्यास गिऱ्हाइक फार, आणि रुपें तर नाण्यांतून मोकळें झालें होतें. या दोन्ही कारणांमुळें सोन्या-रुप्याच्या परस्पर किंमतींत सोन्याचें पारडें वर चढलें आणि रुप्याचें खालीं बसलें. म्हणजे पूर्वी या दोन खंडांत एका सोन्याच्या नाण्यास जितके रुपें मिळत असे त्यापेक्षां आतां तें जास्त मिळूं लागलें आहे. सोनें मुबलक नसल्यामुळें सोन्याचीं नाणींहि पाहिजे तितकीं मिळत नाहींत ही गोष्ट खरी आहे, पण सोन्यारुप्याच्या परस्पर संबंधावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं. तूर्त रुपें आणि सोनें यांच्या किंमतींत आपसांत काय फेरफार झाला एवढेंच आपणांस पहाणें आहे; व तो फरक वर दिलाच आहे.

आतां हिंदुस्थानासारख्या केवळ रुप्याचेंच नाणें वापरणाऱ्या देशावर त्याचा काय परिणाम घडतो तें पाहूं. युरोपांतील राष्ट्रांनीं आपापल्या नाण्यांत फेरफार केल्यामुळें ही जी चलबिचल झाली त्यामुळें आमच्या रुपयाची किंमत आमच्या येथें जरी आहे तितकीच आहे म्हणजे रुपयास धान्य, कापूस वगैरे निर्वाहास ,लागणारे पदार्थ जरी पूर्वीप्रमाणेंच येथें मिळत आहेत, तरी एक रुपयास पूर्वीपेक्षां येथें सोनें कमी मिळूं लागलें आहे; आणि त्याच रुपयाची पौंडांत किंमत कमी झाली आहे. म्हणजे हिंदुस्थानांत सोनें महाग झालें आणि विलायतेंत १० पौंड भरण्यास जेथें पूर्वी शंभर रुपये पाठवावे लागत तेथें आतां १६० लागूं लागले आहेत ही स्थिति युरोपांतील राष्ट्रांनीं सोनें आणि रुपें या दोन्ही धातूंचीं नाणीं पूर्वीप्रमाणें प्रचारांत आणण्याचें कबूल केलें तर तावडतोब सुधारेल. पण इंग्लंडांतील लोक व सरकार या गोष्टीस कबूल नाहींत; आणि जर्मनीनें नुक्तेंच सोन्याचें नाणें सुरू केलें असल्यामुळें, पुन्हा खर्च सोसून रुप्याचें नाणें हातीं घेण्यास ती तयार नाहीं. तेव्हां इतर राष्ट्रांनीं आपली व्यवस्था पाहिली पाहिजे. ती कशी पहावी व कोणत्या रीतीनें अमलांत आणावी हाच हल्लींचा मोठा वादाचा प्रश्न आहे. अर्थशास्त्रदृष्ट्या सर्व जगभर एकाच धातूचें नाणें असलें तर फारच चांगलें; पण सर्व राष्ट्रांस पुरण्याइतकें सोनें नाहीं व सर्वांस रुपें पसंत पडत नाहीं तेव्हां तो प्रश्न सोडूनच द्यावा लागतो. दुसऱ्यापक्षीं सोनें आणि रुपें यांचा कायमचा भाव ठरवून सर्व राष्ट्रांनीं दोन्हीही धातूंचीं नाणीं सुरू केलीं तरीहि चालेल; पण तसें करण्यास जर्मनी आणि इंग्लंड—इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं इतका निकट संबंध असतांहि तयार नाहीं. तेव्हां आतां करावें काय असा ज्यांस नेहमीं विलायतेंत अगर युरोपांत पैसे पाठवावे लागतात अशा लोकांस मोठा विचार पडला आहे. हे लोक कोणचे, त्यांचें

सोन्यारुप्याच्या भावांतील चलबिचलीमुळें किती नुकसान झालें आहे, हिंदुस्थानांतील रयतेचें त्यांत कांहीं नफानुकसान आहे कीं काय, वगैरे मुद्दे प्रस्तुत वादांत मोठ्या महत्त्वाचे आहेत त्यांचा विचार पुढील खेपेपासून करण्यास सुरुवात करूं. नाणें म्हणजे काय, नाणें आणि धातू यांच्यामधील परस्पर संबंध कोणता, एक धातूचें नाणें झालें असतां काय होईल, आणि दोन धातूंचीं नाणीं झालीं असतां काय होईल, व नाण्याच्या कमजास्त पुरवठ्यानें पदार्थमात्राच्या किंमतीवर कसे फेरफार होतात याबद्दल जरूरीपुरती माहिती आजपर्यंतच्या निबंधांतून आलीच आहे; करितां आतां या विषयाच्या दुसऱ्या भागाकडे वळण्यास कांहीं हरकत नाहीं.

❖ ❖ ❖ ❖ ❖

* सोन्यारुप्याचें नाणें

नंबर ४

गेल्या तीन निबंधांत ह्या विषयाचें जें थोडें बहुत शास्त्रीय विवेचन केलें आहे, त्यावरून सोन्याची किंमत (रुप्याच्या रुपयांच्या भावानें) चढण्यास काय कारणें झालीं आहेत, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. तथापि पुनः आणखी एकवार सोन्यारुप्याच्या भावांत जी हल्लीं चलबिचल झाली आहे तिचें खरें कारण कळविणें जरूर आहे. सोनें आणि रुपें ही दोन्ही अगर यांपैकीं कोणतीहि एखादी धातु जास्त उत्पन्न झाल्यास ती सवंग होईल हें साहजिक आहे; परंतु सोन्यारुप्याच्या वार्षिक उत्पन्नाचे एकंदर जे आंकडे बाहेर आले आहेत त्यावरून दरवर्षीं खाणींतून सोनें, रुपें सवंग होण्याइतकें जास्त बाहेर निघत आहे असें दिसत नाहीं. अमेरिका व आस्त्रेलिया या दोन देशांत सोन्यारुप्याच्या खाणींचा शोध लागल्यापासून सोन्यारुप्याचें वार्षिक उत्पन्न वाढत चाललें आहे, परंतु ही वाढ जगामधील एकंदर जें सोनें रुपें आहे त्याशीं ताडून पहातां इतकी अल्प आहे कीं, हल्लीं सोनें महाग आणि रुपें स्वस्त अथवा सोन्यारुप्याच्या परस्पर भावांत झालेली चलबिचल ही दरसाल वाढत्या उत्पन्नाचा परिणाम आहे, असें कोणीहि म्हणत नाहीं.सोन्यारुप्याचा परस्पर भाव कायम राखण्यास दोन्हीहि धातू ज्याप्रमाणानें दरसाल उत्पन्न व्हाव्या तें प्रमाण फारसें कमजास्त झालेलें नाहीं; करितां हल्लीं सदर धातूच्या भावांत झालेला फेरफार युरोपांतील कांहीं राष्ट्रांनीं रुप्याचें नाणें सोडून सोन्याचें नाणें पाडलें ह्यामुळेंच झाला असें म्हणावें

---

* [केसरी–ता. २७ सप्टेंबर १८९२]

लागतें. इतर पदार्थांप्रमाणेंच सोन्यारुप्याची किंमत, सदर धातू खाणींतून बाहेर कांढण्यास जो श्रम व खर्च लागतो, त्यावर अवलंबून आहे; पण सदर किंमतींत फेरफार होण्यास ह्याहिपेक्षां सबळ आणि जवळचें कारण म्हटलें म्हणजे सदर धातूचा नाण्याच्या कामीं होत असलेला कमजास्त उपयोग हें होय. एक तोळा सोन्यास १५ अगर १६ तोळे रुपें हा भाव गेल्या शें दीडशें वर्षें प्रचारांत होता; ह्यावरून हाच भाव सोन्यारुप्याचा अगदीं जगाच्या आरंभापासून असावा अशी कित्येकांची समजूत आहे. परंतु ही समजूत चुकीची आहे. इंग्लंडांत सोन्याचें नाणें होण्याच्या पुष्कळ पूर्वी सोन्यारुप्याच्या भावाचें प्रमाण १:१० असें होतें. त्यावेळीं हिंदुस्थानांत सोनें पुष्कळ होतें व ईस्ट इंडिया कंपनीनें व्यापाराच्या वगैरे मिषानें इतकें सोनें इंग्लंडांत नेलें कीं, इंग्लंडांत सोनें पुष्कळ होऊन १८ व्या शतकांत सोन्याचें नाणें पाडण्यांत आलें.

इंग्लंड देशांत सोन्याचें नाणें सुरू झाल्यावर सोन्यास महर्गता व रुप्यास स्वस्तता आली, व सोन्यारुप्याचें प्रमाण १:१५ अगर १६ असें जें पूर्वी होतें तें तेव्हांपासून अगदीं परवांपर्यंत, म्हणजे जर्मनीनें फ्रान्स देशापासून कोट्यावधि रुपये खंडणी घेऊन सोन्याचें नांणें पाडण्याची सुरुवात करीपर्यंत, तसेंच कायम होतें. जर्मनींत आणि युरोपांतील इतर राष्ट्रांत सोन्याचें नाणें सुरू झाल्याबरोबर एक तोळा सोन्यास पूर्वीपेक्षांहि जास्त रुपें द्यावें लागूं लागलें; आणि १:१५ असा जो भाव होता, तो होतां होतां १:२३ असा आतां झाला आहे. ही भावाची चलबिचल फक्त ह्या दोन धातूंमधलीच आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. म्हणजे सोन्याचा भाव रुप्याच्या नाण्यांत केला तर सोनें महाग झालें, आणि रुप्याचा भाव सोन्याच्या नाण्यांत केला तर रुपें स्वस्त झालें असें म्हणावें लागतें. ज्या देशांत ज्या धातूचें नाणें मुख्य आहे त्या त्या प्रमाणें व्यवहारांत बोलण्याची पद्धत आहे. इंग्लंडांत पौंड अगर सोन्याचें नाणें मुख्य; करितां जो तो पौंड कायम आहे अशा समजुतीवर नेहमीं बोलत असतो. त्याच्या दृष्टीनें रुपें सवंग होऊन पौंडास पूर्वी जितकें रुपें मिळत होतें त्याच्यापेक्षां आतां जास्त मिळतें. हिंदुस्थानांत आम्ही रुप्याचें नाणें अगर रुपये वापरतों, व तेंच आमचें मुख्य नाणें आहे. करितां आमच्या दृष्टीनें सोनें महाग होत चाललें आहे, अगर १ तोळा सोनें खरेदी करण्यास पूर्वीपेक्षां आतां जास्त रुपये लागतात. परंतु हा परिणाम आमच्याकडे रुपें अगर रुपये जास्त झाल्यामुळें नव्हे, तर सोन्यारुप्याच्या भावांत चलबिचल झाल्यामुळें झाला आहे. वास्तविक पहातां रुपें जगांत साधारण मानानें आहे तितकेंच असून दहापांच राष्ट्रांनीं रुप्याचें नाणें काढून टाकून त्याच्याबदली सोन्याचें नाणें केल्यामुळें या दोन धातूंपैकीं एकासच जी तेजी आली आहे तिचा हा परिणाम होय. एक रुपयास दहा पंधरा वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत जितके गहूं अगर तांदूळ मिळत असत तितकेच हल्लींहि मिळतात. एखाद-

दुसऱ्या शेराचा फरक असेल, पण एक तोळा सोन्यास ज्याप्रमाणें आतां पूर्वीपेक्षां दीडपट रुपये द्यावे लागतात तसे एक खंडी गव्हांस दीडपट रुपये अजून द्यावे लागत नाहींत. निदान गेल्या १०।१५ वर्षांत तरी असा कांहीं एक फरक झालेला नाहीं. यावरून हिंदुस्थानांत रुपें अगर रुपये जास्त न होतां फक्त सोनेंच महाग झालें आहे असें म्हणावें लागतें. रुपें अगर रुपये जास्त झाले असते तर पहिल्या निबंधांत सांगितल्याप्रमाणें सर्व पदार्थांच्या किंमती त्याप्रमाणानेंच वाढल्या असत्या; परंतु तशा किंमती वाढल्या नसल्यामुळें हिंदुस्थान देशांत रुपयाचा भाव आहे तोच आहे व फक्त सोन्याची किंमत रुपयांत वाढली आहे, असें बहुतेक विचारी लोकांचें अनुमान आहे. यामुळें फक्त हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत चालणारे सर्व व्यवहार (एक सोन्याच्या खरेदीखेरीज) पूर्वीप्रमाणेंच चालू आहेत. पण ज्या देशांत सोन्याचें नाणें आहे अशा परदेशाशीं जेव्हां आमचा संबंध येतो तेव्हां पूर्वीपेक्षां त्या देशच्या नाण्याऐवजीं आम्हांस जास्त रुपये भरावे लागतात. यासच हुंडणावळीचा भाव चढला आहे असें म्हणतात; व सोन्यारुप्याच्या भावांत झालेल्या फेरफारापासून हिंदुस्थानचें नुकसान होत आहे म्हणून जी ओरड आहे ती एवढ्याचकरितां होय.

हुंडावळीचा भाव चढल्यामुळें अगर उतरल्यामुळें अशा रीतीनें ज्यांचें नुकसान होतें त्याचे सामान्यतः तीन वर्ग करतां येतील;—(१) सरकार (२) सरकारी युरोपिअन कामदार (३) परदेशाशीं व्यापार करणारे लोक. या तिन्ही वर्गांचा परदेशाशीं संबंध असल्यामुळें सोन्यारुप्याच्या भावांत फेरबदल झाल्यानें दर खेपेस त्यांचें थोडेंबहुत तरी नुकसान होतेंच. हिंदुस्थानांतील रयतेचें त्यामुळें कांहीं नुकसानहि झालेलें नाहीं. हुंडणावळीचा भाव चढला अगर उतरला तरी रयत कधीं कागाळी करीत नाहीं. काय चळवळ आहे ती वर सांगितलेल्या तीन वर्गांचीच आहे. सबब त्यांचाच येथें विचार केला पाहिजे.

हिंदुस्थान सरकारास प्रतिवर्षीं कोट्यावधि रुपये विलायतेस पाठवावे लागतात. हिंदुस्थानांत रेल्वेकरितां, सरकारी ऑफिसरांकरितां, लष्कराकरितां वगैरे लागणारें सर्व सामान विलायतेहून येतें; विलायतेंत येथून पेन्शन घेऊन जे साहेब लोक जातात तेहि विलायतेंतच रहातात, व त्यांचीं पेन्शनेंहि त्यांस तेथेंच भरावीं लागतात हीं पेन्शनें सनदी नोकरांच्या सनदेप्रमाणें पौंडांत द्यावीं असा करार आहे. विलायतच्या मालाची किंमतहि विलायतचे व्यापारी पौंडांतच आकारतात; व विलायतेंत हिंदुस्थान सरकारानें जें कर्ज काढलें आहे त्याचें व्याजाहि पौंडांतच द्यावें, हे सर्व खर्च भागण्याकरितां प्रतिवर्षीं सुमारें १॥ कोट पौंड विलायतेस पाठवावे लागतात. त्याची हुंडणावळहि त्याचप्रमाणें द्यावी लागते. सन १८७१ पासून सन १८९१ पर्यंत वीस सालांत हिंदुस्थान सरकारास विलायतेस २८२ कोट रुपये पाठवावे लागले व त्याबद्दल ६६ कोटी निव्वळ हुंडणावळ भरावी लागली.

हुंडणावळचिें मान प्रतिवर्षी चढतच आहे, व त्यामुळें हिंदुस्थानच्या तिजोरीची स्थिति अनिश्चित झाली आहे. गेल्या वीस वर्षांत हा हुंडणावळीचा खर्च भरून निघण्याइतकें सरकारचें उत्पन्नहि वाढलें असल्यामुळें जमाखर्चाची तोंडमिळवणी हिंदुस्थानचे फडणीसास कशी ना कशी तरी करितां आली, पण ही स्थिति अशीच राहील याचा कांहीं नियम नाहीं. सोनें महाग झाल्यानें हिंदुस्थानचा फायदा आहे अस प्रतिपादन करणाऱ्या लोकांचें म्हणणें असें आहे कीं, ज्याअर्थीं, सोनें महाग झाल्याबरोबर, त्या मानानें सरकारी साऱ्याचें उत्पन्नहि वाढलें त्याअर्थीं, हिंदुस्थानांतील रयतेचें कांहीं नुकसान झालें असें म्हणतां येत नाहीं; व हें म्हणणें खरें असेल तर वाढत्या उत्पन्नांतून जास्त लागणारी हुंडणावळ भरण्यापलीकडे सरकारालाहि जास्त हात घालण्याची कांहीं एक जरूर नाहीं. सोनें महाग झाल्यामुळें युरोपांत एका पौंडास पुष्कळ रुपये मिळूं लागले आहेत, त्यामुळें पूर्वी हिंदुस्थानच्या मालाची जितके पौंड किंमत होती तितकीच आतां राहिली, असें मानलें तरी त्याच्याऐवजीं रुपये मिळावयाचे ते जास्त मिळूं लागले आहेत. उदाहणार्थ, आपण दहा खंडी माल विलायतेस पाठविला त्याचे पूर्वी वीस पौंड येत होते, व आतांहि तितकेच येतात असें मानलें तरी, पूर्वीच्या वीस पौंडांची २०० रुपये व हल्लींच्या २० पौंडांची ३०० रुपये अशी किंमत येते. पूर्वीपेक्षां त्याच मालाबद्दल आपणांस दीडपट रुपये जास्त पडूं लागले आहेत. व त्यामुळें हिंदुस्थानच्या रयतेचा फायदाच होत आहे असें तिकडील लोकांचें म्हणणें आहे. परंतु हा सर्व कोटिक्रम किंमती पूर्वीप्रमाणेंच कायम आहेत या समजुतीवरच आहे. वस्तुतः पहातां सोन्यास गिऱ्हाईक फार झाल्यामुळें त्याची किंमत वाढली आहे व अशा महाग झालेल्या धातूचें नाणें ज्या देशांत असतें अगर देशामधल्या मुख्य नाण्याची धातू जेव्हां महाग होते तेव्हां त्या देशांतील सर्व पदार्थांच्या किंमती एकदम वाढतात, हें मागें सांगितलेंच आहे. या न्यायानें सोनें ज्या प्रमाणानें महाग झालें त्या प्रमाणानें पदार्थांच्या किंमतीहि उतरल्या पाहिजेत, व तसा कांहीं प्रकार इंग्लंडांत झालाहि आहे. विलायतेंत याप्रमाणें किंमती उतरल्यामुळें एका पौंडास जरी पुष्कळ रुपये येत असले तरी आमच्या मालाची किंमतच पूर्वीपेक्षां कमी पौंड होत असल्यामुळें, पुन्हा आम्हांस त्या मालाबद्दल पूर्वीइतकेच रुपये मिळतात. सामान्यतः दोन देशांमध्यें जो व्यापार चालतो तो देवघेवीच्या स्वरूपाचा असतो; म्हणजे एका देशांतून दुसऱ्या देशांत जो माल जातो त्याऐवजीं दुसऱ्या देशांतून त्या देशांत तितक्या किंमतीचा माल यावा लागतो, कारण असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. त्यास अनुसरून मालाच्या देवघेवीच्या व्यापारांत हुंडणावळीच्या तेजीबद्दल आमचें कांहीं नफानुकसान होत नाहीं असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण तूर्त त्याचा विचार करण्याची

जरूर नाहीं. हिंदुस्थानसरकारास विलायतेस जी रक्कम पाठवावी लागते त्यांतील बराच भाग देवघेवीसाठीं नसतो. तेव्हां ह्या रकमेवर हिंदुस्थानसरकारास जी हुंडणावळ भरावी लागते ती निव्वळ बुडीत असेंच म्हटलें पाहिजे. आतां हा बुडीत खर्च कोणत्या उपायानें कमी करतां येईल व तो कमी करतांना रयतेवर विनाकारण ओझें पडेल कीं काय एवढाच काय तो प्रश्न राहिला. हिंदुस्थान सरकारचें हुंडणावळीच्या चलबिचलीनें नुकसान होत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु त्याचें नुकसान भरून काढण्याकरितां अगर विलायतेंत जाऊन बसलेल्या आफिसरांस पूर्वीइतकेंच पौंड पेन्शन मिळण्याकरितां हिंदुस्थानांतील गरीब रयतेवर कराचा जास्त बोजा लादणें कधींहि रास्त किंवा कायदेशीर होणार नाहीं.

दुसरा वर्ग सरकारी युरोपिअन कामगारांचा होय. या कामगारांचीं मुलें विलायतेस ठेवलेलीं असतात. मुलांबरोबर त्यांच्या बायकाहि कित्येक वेळीं तिकडेसच असतात; खेरीज हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत युरोपिअन कामगारांस व्यवहारास व चैनीसाठीं जे पदार्थ लागतात त्यांपैकीं बहुतेक विलायतेंतच तयार होतात व त्यांची किंमतहि पौंडांतच आकारली जाते. हे सर्व खर्च पौंडांतच होत असल्यामुळें त्या कामगारांस आपल्या पगारापैकीं कांहीं नियमित पौंड दरसाल विलायतेस पाठवावे लागतात; परंतु हल्लीं हुंडणावळीचा भाव वाढल्यामुळें जेथें पगाराचा निम्मे भाग विलायतेस पाठवावा लागत असे तेथें आतां तीनचतुर्थांश भाग विलायतेस पाठवावा लागतो. या कारणानें मोठ्या युरोपियन कामगारांनीं हुंडणावळीच्या भावाबद्दल बराच गवगवा केला आहे. विलायतेंत पदार्थांच्या किंमती उतरल्यामुळें निर्वाहास पूर्वीपेक्षां कदाचित् कमी पैसे लागत असतील; पण मुलांच्या विद्याभ्यासाचा खर्च वगैरे कायमचाच असल्यामुळें या कामगारांचें एकंदरींत नुकसान होतें हें कबूल केलें पाहिजे. वर लिहिल्याप्रमाणें प्रश्न एवढाच कीं, आपल्याच पोटास चिमटा घेऊन हें नुकसान भरून देण्याचा हिंदुस्थानच्या रयतेनें मक्ता घेतला आहे कीं काय ? इंग्लंड देश आपला सोन्याचें नाणें चालविण्याचा जर आग्रह सोडून देईल तर सोन्यारुप्याचें परस्पर मान पूर्वीप्रमाणें होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. पण हिंदुस्थानाकरितां इंग्लंडनें आपलें चालू असलेलें नाणें कां सोडून द्यावें असें तेथील मुत्सद्दी व वर्तमानपत्रकार प्रसिद्धपणें बोलून दाखवितात ! हिंदुस्थानाकरितां इंग्लंड देशांतील लोक सोन्याचें नाणें सोडून रुप्याचें नाणें हातांत घेण्यास जर तयार नाहींत तर हिंदुस्थानच्या रयतेनें मोठमोठ्या युरोपिअन कामगारांच्या बायकापोरांची विलायतेंत पूर्वीप्रमाणेंच चैन सुरू रहावी म्हणून आपल्यावर करांचें ओझें कां लादून घ्यावें, हें आम्हांस समजत नाहीं. इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन्ही देशांचा हिताहिताचा इतका निकट संबंध असतां जर विलायतेंतील लोक सोन्या-

रुप्याचा भाव कायम करण्यास कांहींच मदत करीत नाहींत तर आम्हीं तरी युरोपिअन कामगार व व्यापारी यांकरितां एवढी कळकळ कशास दाखवावी ?

हिंदुस्थानांतले सर्व व्यवहार पूर्वींप्रमाणेंच सुरळीत चालले आहेत, परराष्ट्रांशीं चालू असणाऱ्या व्यवहारांत मात्र फरक पडला आहे; व नुकसान होत आहे तें एकमेकांनीं एकमेकांच्या साहायानेच दूर केलें पाहिजे. असें होत नसेल तर हिंदुस्थान सरकारानें विलायतेंत होणारा खर्च होईल तितका कमी करावा एवढाच काय तो रयतेच्या दृष्टीनें योग्य व फायदेशीर उपाय आहे.

तिसरा वर्ग परदेशांशीं व्यापार करणाऱ्या लोकांचा. हा व्यापार प्रायः देवघेवीचाच असल्यानें मालाची किंमत रुपयांत करा अगर पौंडांत करा, जितका माल द्यावा तितका घ्यावा असा क्रम सुरू असतो; परंतु आज एक उद्यां दुसरा अशी सोन्यारुप्याच्या भावाची रोज चलबिचल होऊं लागली तर मात्र व्यापारांस कांहीं शाश्वति रहात नाहीं. एका पौंडास वीस रुपये कां होईनात पण ते कायमचे ठरले पाहिजेत, नाहीं तर आज एका पौंडास २० रुपयेप्रमाणें माल खरेदी करावा आणि उद्यां पौंडास १५ रुपयेप्रमाणें त्याची किंमत मिळावी अशी स्थिति होते. सोन्यारुप्याचे भावांत हल्लीं जी चलबिचल झाली आहे ती आणखी एक पांचपंचवीस वर्षें ह्याचप्रमाणें रोज चढती उतरती राहील असें नाहीं. केव्हांना केव्हां तरी हा भाव कायम झाला पाहिजे; पण तो तसा कायम होईपर्यंत परदेशाशीं व्यापार करणाऱ्या लोकांस थोडीबहुत गैरसोय सोसावी लागेलच. ह्यापेक्षां हल्लीं कांहीं विशेष गैरसोय आहे कीं काय हें पाहणें आहे. युरोपिअन व्यापाऱ्यांचें असें म्हणणें आहे कीं, विलायतचा माल व पैसे हिंदुस्थानांत आल्याखेरीज हिंदुस्थानचा तरणोपाय नाहीं; पण हुंडणावळीच्या चलबिचलीमुळें विलायती पैसा व माल पूर्वींप्रमाणें इकडे पाठविण्यास लोक धजावत नाहींत. यावर कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, विलायती मालावर हुंडणावळीची ही आयतीच जकात बसल्यामुळें देशी मालाचा जर त्यामुळें जास्त खप होत असला तर बितका हिंदुस्थानास फायदाच झाला म्हणावयाचा.

अशा रीतीनें तिन्ही वर्गांचें निरनिराळ्या प्रकारें नुकसान होत आहे. हें नुकसान भरून काढण्यासाठीं निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळे उपाय सुचविले आहेत. ते उपाय कोणते व त्यांपासून रयतेचा फायदा होईल कीं काय वगैरे प्रश्नांचा निकाल पुढील खेपेस करूं.

❖ ❖ ❖

* सोन्यारुप्याचें नाणें

नंबर ५

गेल्या खेपेस हुंडणावळीच्या भावांत फेरफार झाल्यानें ज्या लोकांचें मुख्यतः नुकसान होतें त्यांच्यासंबंधानें थोडी माहिती सांगितली. आज ही स्थिति सुधारण्याकरितां जे उपाय कित्येकांनीं सुचविले आहेत त्यांचा विचार करून सोन्यारुप्याच्या नाण्यावरील लेख संपवावयाचा असा हेतु आहे. रुप्याची किंमत उतरण्याचें मुख्य कारण युरोपांतील राष्ट्रांनीं रुप्याचें नाणें काढून टाकलें हें होय, असें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां खरोखर पाहतां याच राष्ट्रांनीं रुप्याचें नाणें कांहीं अंशीं तरी पुन्हां सुरू केल्याखेरीज अगर चिनासारख्या दुसऱ्या कोणत्या तरी देशानें रुप्याचें नाणें हातीं धरण्याचें मनांत आणिल्याखेरीज रुप्याचा भाव (सोन्याच्या नाण्यानें आकार केला असतां) चढणार नाहीं हें उघड आहे. परंतु इंग्लंड, जर्मनी वगैरे देश हिंदुस्थानासारख्या केवळ रुप्याचेंच नाणें वापरणाऱ्या देशास या कामीं लागेल तितकी मदत करण्यास तयार नाहींत. तेव्हां आतां फक्त हिंदुस्थानचा हिंदुस्थानानेंच रुप्याचा भाव वाढण्यासाठीं काय होईल ती तजवीज केली पाहिजे. इंडियन करन्सी असोसिएशन नामक कलकत्त्यास स्थापन झालेल्या एका सभेनें असें सुचविलें आहे कीं, हिंदुस्थानसरकारनें टांकसाळेंत प्रतिवर्षीं जास्त रुपये पाडण्याचें बंद करून अगर चांदीचें नाणें करण्यास हल्लीं टाकसाळेंत घेतात त्यापेक्षां जास्त फी घेऊन रुपयाची किंमत वाढवावी म्हणजे हिंदुस्थानचा इतर देशांशीं जो व्यापार आहे त्यास रुप्याच्या भावांत झालेल्या चलबिचलीमुळें कांहीं धक्का बसणार नाहीं. रुपयाच्या व पौंडाच्या किंमतींत कांहीं तरी नियमित प्रमाण ठरवावें असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. यापैकीं करन्सी असोसिएशनच्या सूचनेचा विचार पहिल्यानें केला म्हणजे त्यांतच दुसऱ्या सूचनेचाहि थोडाबहुत अंतर्भाव होतो यामुळें सदर सभेच्या सूचनेचा प्रथमतः विचार करूं.

सरकारनें टांकसाळेंत नवीन रुपये पाडण्याचें बंद केलें म्हणजे लोकांमध्यें पहिल्या पहिल्यानें अगदीं गडबड उडून जाईल; व सोन्याचा भाव जर हल्लीं उतरला असला तर त्याहून कांहीं दिवसपर्यंत तो जास्त उतरेल. पण हा परिणाम चिरकालीन नसल्यामुळें आपण तूर्त तो जमेस न धरतांच वरील गोष्टीचे काय परिणाम होतात तें पाहूं. सरकारानें नवे रुपये पाडण्याचें बंद केलें म्हणजे देशांत हल्लीं असलेल्या रुपयांवरच सर्व देवघेव चालविली पाहिजे. देशाचा

---

* [केसरी—ता. ४ आक्टोबर सन १८९२]

व्यापार कांहीं थोड्याबहुत प्रमाणानें दरवर्षीं वाढत आहे, तेव्हां तो चालण्यास देशांतलि नाण्याची संख्याहि त्याच प्रमाणानें वाढली पाहिजे. आतां नवें नाणें पाडण्याचें बंद झालें म्हणजे प्रतिवर्षीं वाढत्या व्यापारास अवश्य लागणारी नाण्याची वाढ आणि एकंदर नाण्याची वार्षिक झीज भरून काढण्याकरितां दरवर्षीं लागणारें नाणें यांच्या बेरजेइतकी, नाण्याची दरसाल तूट येत जाईल. नाणें दरसाल कमी कमी आणि व्यापार वाढता म्हणजे अर्थातच नाण्याची किंमत वाढली पाहिजे. अर्थात् एक रुपयास, रुपयांत जितकी शुद्ध चांदी असते त्यापेक्षां जास्त चांदी मिळेल. हा परिणाम घडून येण्यास कांहीं वर्षें लागतील हें खरें आहे, तथापि तो केव्हांना केव्हां तरी घडून येणारच. सर्व हिंदुस्थानांत मिळून एकंदर एक अब्ज सत्तर कोट पौंड किंमतीचें रुप्याचें नाणें हल्लीं प्रचारांत आहे, व दरवर्षीं सुमारें आठ कोट पौंड किंमतीचें रुप्याचें नाणें पाडावें लागतें. हें नाणें पाडण्याचें बंद झालें म्हणजे अर्थातच प्रतिवर्षीं सुमारें एकचोविसांश अगर एकपंचविसांश इतका रुप्याचा भाव चढत जाईल. म्हणजे अजमासे रुपयाची किंमत पाऊण आणा चढेल असें आपण समजूं. पहिल्या वर्षीं पाऊण आणा, दुसऱ्या वर्षीं दडि आणा, तिसऱ्या वर्षीं सव्वादोन आणे, याप्रमाणें रुपयाची किंमत वाढत चालली म्हणजे अर्थातच बारा रुपयास अकरा रुपये भार शुद्ध चांदी मिळावी त्या ठिकाणीं बारा रुपयांस पंधरा रुपयेभार, वीस रुपयेभार शुद्ध चांदी मिळूं लागेल. अकरा रुपयेभार शुद्ध चांदीचे बारा रुपये पाडावे असा टांकसाळींत नियम आहे. या मानानें पाहिलें म्हणजे बाजारांत १२ रुपयांस १५ अगर वीस रुपयेभार चांदी मिळूं लागली म्हणजे १२ खोटे रुपये करणारास ३ अगर ८ रुपयेभार चांदीचा नफा होईल. पुनः रुपया खोटा म्हणजे हिणकस नव्हे, तर सरकारी रुपयांत जितकी शुद्ध चांदी असेल तितकीच या खोट्या रुपयांत घातली जाईल. अशा तऱ्हेचे खोटे रुपये ओळखणेंहि बरेंच कठीण आहे. रुपयाची किंमत कृत्रिम रीतीनें वाढविली तर कायद्याची कितीहि सक्ति असली तरी अशा रीतीनें थोडेंबहुत तरी खोटें नाणें होणारच. मिठावर जकात वाढविली म्हणजे ज्याप्रमाणें खारे मातीचा लोक उपयोग करितात, अगर परमुलखांतून मीठ चोरून आणतात, त्याचप्रमाणें रुपयाची किंमत कृत्रिम रीतीनें वाढविली असतां, खोटें नाणें पाडण्याचा धंदा सुरू होण्याचा संभव आहे. मग सरकारानें पांच शेरांवर मोहाचीं फुलें कोणीं आपणाजवळ बाळगूं नये असा ज्याप्रमाणें हल्लीं कायदा करण्याचा विचार केला आहे त्याचप्रमाणें दर डोईस १० तोळे रुपें यापेक्षां आपणापाशीं कोणी जास्त रुपें ठेऊं नये असा कायदा करून रुप्याचें खोटें नाणें होण्याचें बंद केल्यास नकळे. आपण सध्यां असेंहि समजूं कीं, सरकारास याप्रमाणें सक्त कायदे करून रुप्याचें खोटें नाणें पाडण्याचें बंद करितां येईल; अगर इतकेंहि असून कांहीं खोटीं नाणीं

झालीं तर करन्सी असोसिएशनचे अध्यक्ष म्याकेसाहेब म्हणतात त्याप्रमाणें थोडीं-बहुत खोटीं नाणीं झालीं तरी त्यांपासून देशाचें फारसें नुकसान होणार नाहीं; कारण त्या खोट्या नाण्यांत खऱ्या नाण्याइतकीच चांदी असणार. परंतु असें मानलें तरी रुपयाचीच किंमत याप्रमाणें कृत्रिम ठरविली तर, त्यापासून इंग्रजी व्यापाऱ्यांचा अगर कामगारांचा जितका नफा होईल त्यापेक्षां रयतेचें जास्त नुकसान होणार आहे. गेल्या औद्योगिक परिषदेंत क्याप्टन बोक्कार्क यांनीं याच मुद्यावर करन्सी असोसिएशननें सुचविलेली व्यवस्था आपणास नापसंत आहे असें प्रतिपादन केलें होतें; व त्यास अनुसरूनच येथें आम्हीं सदर प्रश्नाचें विवेचन केलें आहे.

हिंदुस्थानदेशास प्रतिवर्षी व्याज, पेन्शन, व्यापार वगैरे बाबी मिळून, इंग्लंडांत अठरा वीस कोटी रुपये पाठवावे लागतात. रुपयाची किंमत चढली म्हणजे हे रुपये पाठविण्यास हुंडणावळीचा जो खर्च लागतो तो आपणांस पडणार नाहीं हें खरें आहे; परंतु फक्त परदेशाशीं व्यापार करणाऱ्यांची अगर संबंध ठेवणारांची ह्यांत जितकी सोय आहे त्यापेक्षां हिंदुस्थानांत राहणाऱ्या रयतेचें जास्त नुकसान होणार आहे. आपण असें समजूं कीं, हिंदुस्थान सरकारची एकंदर वार्षिक जमा ८० कोट रुपये आहे. हे ऐशीं कोट रुपये हिंदुस्थानसरकारच्या रयतेस रुप्याच्या नाण्यांत भरावे लागतात. रुपयाची किंमत वाढली म्हणजे आम्ही जरी ८० कोटच रुपये भरले तरी तितके रुपये भरण्यास आम्हांस जास्त माल विकला पाहिजे. रुपयाची किंमत दोन आणे वाढली असें मानलें तर पूर्वी ज्या मालास नऊ रुपये येत होते, त्याच मालास आतां आठ रुपये येतील; म्हणजे शेताचा सारा कायमच राहिला असें मानलें तर एखाद्या शेतकऱ्यास आठ रुपये सारा भरण्यास जितकें धान्य विकावें लागत असे त्यापेक्षां रुपयाची किंमत २ आणे कृत्रिम वाढली तर एकअष्टमांश धान्य जास्त विकावें लागेल. बहुतेक शेतकरी लोक सावकाराच्या कर्जांत आहेत हें निर्विवाद आहे. रुपयाची किंमत वाढली म्हणजे हल्लीं सावकाराचें रयतेस जें कर्ज आहे तें परत देतांना वरच्याप्रमाणेंच स्थिति व्हावयाची; म्हणजे एखाद्या कुळानें सावकाराकडून ऐशीं रुपये काढले असले तर, जरी त्यानें ऐशींच्या ऐशीं नग परत केले तरी रुपयाची किंमत वाढली असल्यामुळें खरोखर त्यास नव्वद रुपयाचें कर्ज फेडण्यास जितकें धान्य विकावें लागलें असतें, तितकें आतां ऐशीं रुपये कर्ज फेडण्यास विकावें लागेल. हिंदुस्थानांतील शेंकडा ८० पेक्षां जास्त लोक शेतकीवर निर्वाह करणारे—अर्थात् थोडेबहुत तरी सावकाराच्या कर्जांत डुबलेले—आहेत; म्हणजे एकंदर प्रजा ३० कोट आहे असें मानलें तर वीस कोट प्रजेस किमान पक्ष दर माणशीं वीस रुपये कर्ज धरलें तरी ४ अब्ज रुपये कर्ज होतें. खेरीज प्रतिवर्षी सरकारास ८० कोट रुपये कर द्यावा लागतो. ते सर्व रुपये

रुपयाची किंमत कृत्रिम रीतीनें वाढविल्यास रयतेस दर रुपयास २।३ आणे-प्रमाणें जास्त भाव पडून भरावे लागणार, आणि ते कशासाठीं ? तर विलायतेंत २० कोटी रुपये सरकारास हुंडणावळीवांचून भरतां यावे व कांहीं मोठ्या युरोपियन कामगारांचें व व्यापाऱ्यांचें नुकसान व व्हावें म्हणून ! बरें; चढत्या रुपयांत ८० कोट रुपये वसूल आला म्हणजे सरकारास २० कोट रुपये विलायतेस पाठविण्याकरितां जी पांचसहा कोट रुपये हुंडणावळ लागते ती बंद होईल; म्हणून सरकार तितकी रक्कम रयतेस साऱ्यांत सूट देईल काय ? हल्लीं ऐशीं कोट रुपये उत्पन्न असून सरकार हुंडणावळीसह आपला खर्च त्यांत भागवीत आहे. हा हुंडणावळीचा खर्च वांचवावा म्हणून रयतेकडून ऐशीं कोटींच्या ठिकाणीं मोजतांना ८० परंतु किंमतीनें ९० कोट रुपये सरकार घेणार; व पूर्वी पडत असलेली हुंडणावळहि तोंडांत टाकणार. तेव्हां हुंडणावळ टाळण्यासाठीं प्रत्यक्ष नाहीं तर अप्रत्यक्ष रीतीनें १० कोट रुपये कराचा जास्त बोजा वाढविणार असेंच होत नाहीं काय ? ज्या युरोपियन कामगारांचीं मुलेंमाणसें विलायतेंत असतील त्यांची या व्यवस्थेनें खाशी सोय होईल; पण ज्या शेतकऱ्यांचीं मुलेंमाणसें हिंदुस्थानांतच आहेत, त्यांना सरकारी सारा भरण्यासाठीं शेताच्या उत्पन्नापैकीं पूर्वीपेक्षां उत्पन्नाचा कांहीं भाग जास्त विकावा लागेल, याची वाट काय ? यापेक्षां उघड उघड रीतीनें हुंडणावळीचे पैसे खर्च झालेले बरे. हिंदुस्थानांतल्या रयतेपासून जास्त कर मिळण्याचा आतां फारसा संभव नाहीं ही गोष्ट पुष्कळ लोकांस कबूल आहे. अशा रयतेवर, कांहीं युरोपियन कामगारांचा व व्यापाऱ्यांचा फायदा व्हावा म्हणून, नाहक कराचें ओझें चढविण्यांत अर्थ कोणता ? वास्तविक पहातां सोन्यारुप्याच्या भावांत हल्लीं जो फरक झाला आहे तो ज्या कारणामुळें झाला आहे तीं कारणें काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याखेरीज दुसरी कोणतीहि तजवीज योजिली तरी एकाचें बुचाडून दुसऱ्याची धन करण्यापलीकडे त्यापासून जास्त कांहीं निष्पन्न होणार नाहीं. सोन्यारुप्याच्या भावाचें परस्पर प्रमाण कायम करावें असें कित्येकांचें म्हणणें आहे हें मागें सांगितलेंच आहे. पण त्यापासूनहि कांहीं विशेष फायदा होईलसें दिसत नाहीं. कारण एक तोळा सोन्यास १५ तोळे रुपें अगर १५ तोळे रुप्यास १ तोळा सोनें असा हिंदुस्थानसरकारानें भाव ठरविला तर तो इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, आस्ट्रिया, अमेरिका इत्यादि देशांत कबूल होईलच असा भरंवसा नाहीं. असा भाव ठरविणें म्हणजे दोन धातूंचीं नाणीं सुरू करण्यासारखेंच आहे; व दोन धातूंचीं नाणीं सुरू करण्यास इंग्लंड व जर्मनी कबूल नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. आतां फक्त हिंदुस्थानसरकारानेंच हा भाव ठरविला व त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय केला तर हल्लीं २५ रुपये तोळाप्रमाणें खरेदी होऊन जें सोनें विलायतेस जात आहे तेंच १५-१६ रुपयांस एक

तोळा याप्रमाणें सरकारास द्यावें लागेल. सारांश, सोन्यारूप्यांमधील प्रमाण इतर राष्ट्रांनीं कबूल केलें नाहीं तर हिंदुस्थानच्या हिंदुस्थानांत तसें प्रमाण ठरविल्यापासून आमचा कांहीं एक फायदा न होतां उलट त्यापासून सरकारचें व आपलें नुकसान होणार आहे. असली कृत्रिम व्यवस्था कधींहि फार दिवस टिकावयाची नाहीं; व सरकारानें आग्रहच धरल्यास त्यामुळें प्रतिवर्षीं कोट्यावधि रुपयांचें आमचें नुकसान होईल. रुपयाची किंमत वाढविण्याच्या दुसऱ्या ज्या कांहीं तजवीजी सुचविल्या आहेत त्याहि बहुतकरून अशाच तऱ्हेच्या आहेत, करितां त्यांचें निराळें परीक्षण करण्याची जरूर नाहीं. रुप्याचा भाव (सोन्याच्या नाण्यानें आकारला म्हणजे) उतरला आहे व त्यामुळें पूर्वी जें कर्ज आम्हीं सोन्याच्या नाण्यांत हिंदुस्थानाबाहेर काढलें होतें तें देण्यास अगर त्यावरील व्याज भरण्यास हल्लीं आम्हांस पूर्वीपेक्षां जास्त रुपये भरावे लागतात, हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें सोन्यारुप्यांच्या भावांत दररोज सारखी चलविचल होत असल्यामुळें परदेशांशीं चालत असलेल्या व्यापाराची कांहीं शाश्वती रहात नाहीं. पण या दोन अडचणी काढून टाकण्यासाठीं जे उपाय योजावयाचे त्यामुळें रयतेवरील कराचें ओझें वाढलें, तर सरकार व कांहीं व्यापारी यांच्या डोक्यावरील भार कमी करून तो गरीब रयतेवर लादला एवढेंच काय तें निष्पन्न होईल. सोन्यारुप्याच्या भावांत चलविचल झाल्यानें आमचें जें नुकसान व्हावयाचें तें टळत नाहीं. मग रयतेवर ओझें लादण्यापेक्षां सदर ओझें घेण्यास जे समर्थ आहेत त्यांवरच तें पडत असल्यास काय वाईट ?

आमच्या मतें या प्रश्नाचा शास्त्रोक्त निकाल लागण्यास निरनिराळ्या राष्ट्रांनीं एकत्र जमूनच सोनें आणि रुपें यांचे परस्पर भाव कायम केले पाहिजेत. जगाचा अर्धा व्यापार इंग्लंड देशाच्या ताब्यांत आहे, तेव्हां इंग्लंडसारख्या देशांनीं जर ही गोष्ट मनावर घेतली तर (फ्रान्स व अमेरिका आधींच कबूल आहेत) ती सिद्धीस जाण्यास कांहींच अडचण पडणार नाहीं. इंग्लिश पार्लमेंटचें मन वळवून त्यांची समजूत कशी काढावी एवढीच काय ती अडचण आहे; व हिंदुस्थानसरकार व इंग्रज व्यापारी यांनीं मनावर घेतलें तर, आज नाहींतरी कालांतरानें तरी, इंग्लंड देशांतील लोकांस या कामीं हिंदुस्थानास मदत करावी असें वाटेल. आतां इंग्लंड देशांतील लोक अगर सरकार जोंपर्यंत आमचें कांहींच ऐकत नाहीं तोंपर्यंत आम्हीं काय करावें असा एक प्रश्न निघतो. त्यास उत्तर एवढेंच कीं, होतां होईल तितकें करून पुढील सर्व व्यवहार व करार रुप्याच्या नाण्यांत करावे व साधेल तितकें करून परदेशाशीं होईल तितका कमीच संबंध आणावा. युरोपिअन लोकांचीं पेन्शनें पौंडांत देण्याचा हिंदुस्थानसरकार हल्लीं करार करतें पण तो इतउत्तर बंद केला पाहिजे. सरकारास लागणारा माल मिळेल तेवढा हिंदुस्थानांतच खरेदी करावा आणि नवें कर्ज लागल्यास तेंहि हिंदुस्थानांतच काढावें.

अशा रीतीनें कांहीं वर्षें क्रम चालविला आणि खर्चाची काटकसर केली म्हणजे हुंडणावळीच्या चलबिचलीनें हल्लीं होत असलेलें सरकारचें नुकसान भरून येईल, व पुढें कांहीं कालानें सर्व राष्ट्रांचें ऐकमत्य झाल्यास सोन्यारुप्याचे परस्पर भाव पूर्वींप्रमाणें होतील. इंग्लंड व हिंदुस्थान यांचा इतका निकट संबंध असतां, इंग्लंड देश जर सोन्यारुप्याचा भाव पूर्ववत् करण्यास हिंदुस्थानास मदत करीत नाहीं तर निदान इंग्रज लोकांची समजूत पडेपर्यंत तरी हिंदुस्थानसरकारास आपला आपणच कांहीं मार्ग काढला पाहिजे हें खरें आहे परंतु असा मार्ग काढतेवेळेस केवळ इंग्रजी व्यापारी व इंग्रजी कामगार यांच्याच हिताकडे लक्ष देऊन रयतेच्या नुकसानीची कोणतीहि गोष्ट सरकारास करणें वाजवी होणार नाहीं. करन्सी असोसिएशनच्या सूचना पुष्कळ विचारी नेटिव लोकांस ज्या मान्य झाल्या नाहींत त्यांतील मुख्य कारणहि हेंच होय. हुंडणावळीच्या भावांत चलविचल झाल्यामुळें कांहीं विवक्षित वर्गांचें नुकसान होत आहे, व त्या वर्गांतील लोक वजनदार व अधिकारसंपन्न असल्यामुळें त्यांनीं आपल्या हिताकरितांच हल्लींची चळवळ सुरू केली आहे. या चळवळीस निदान अजाणतेपणानें तरी आम्हीं आपली मान्यता देण्यास तयार होऊं नये, एवढाच या विषयाचें विवेचन करण्यांत आमचा हेतु होता. केसरीसारख्या मराठी वर्तमानपत्रांतून या विषयाची जास्त फोड होणें शक्य नाहीं. सोन्याच्यारुप्याच्या नाण्यांत फेरफार करण्याबद्दल ज्या ज्या कांहीं सूचना येतील त्या त्यांपासून रयतेचा किती फायदा आहे हें पहिल्यानें पाहिलें पाहिजे, इतकेंच जर या विषयावर विवेचन करणारांनीं लक्षांत ठेविलें व नंतर अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणें या विषयाचा विचार केला तर मग त्यांच्या हातून सहसा चूक होणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

* * *

* यंदाची प्रांतिकसभा

या सालीं प्रांतिकसभा नेहमींप्रमाणें मे महिन्यांत न भरतां नवंबरपर्यंत लांबली यामुळें कित्येकांची गैरसोय झाली असेल व होईल हें उघड आहे; पण येत्या नवंबर महिन्यांत प्रांतिक सभेचें काम जशा रीतीनें पार पडावयास पाहिजे तशा रीतीनें तें पडलें म्हणजे झालेल्या उशीराबद्दल कोणासहि वाईट वाटणार नाहीं. मुंबई व गुजराथ या दोन प्रांतांतील लोकांस सोईवार पडावें म्हणून प्रांतिकसभेची तारीख मुद्दाम नवंबरपर्यंत लांबविण्यांत आली होती. त्याप्रमाणें यंदा दोन्ही ठिकाणचे मुक्त्यार प्रांतिकसभेस अधिक येतील अशी आमची उमेद आहे.

---

* [केसरी—ता. ११ आक्टोबर १८९२]

यंदा सभेचें अध्यक्षस्थानहि ऑ० फेरोजशहा मेथा यांस द्यावें अशी पुष्कळांची सूचना होती व त्याप्रमाणें त्यांनींहि बहुतेक कबूल केल्यासारखें आहे. मि० फेरोजशहा मेथा, मि० वाच्छा वगैरे मुंबईची मंडळी प्रांतिक सभेस हजर असल्यानें दरवर्षापेक्षां सभेस विशेष महत्त्व येईल हें आम्हीं सांगावयास नको.

परंतु याहिपेक्षां विशेष महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे सभेपुढें येणारे विषय ही होय. हिंदुस्थानांतील कायदेकौन्सिलें सुधारण्याचा ॲक्ट पार्लमेंट सभेंत नुकताच पास झाला असून त्याची अम्मलबजावणी कशी करावी याबद्दल स्थानिक व हिंदुस्थानसरकारांत चर्चा सुरू आहे, व दोन चार महिन्यांत कांहीं तरी नियम ठरून ते अमलांत येतील असा सुमार आहे. हल्लीं आपलीं जीं कायदेकौन्सिलें आहेत तीं पार्लमेंट सभेंत सन १८६१ सालीं पास झालेल्या ॲक्टाअन्वयें चालू आहेत. यांत सुधारणा करण्याबद्दल निदान गेल्या वीस पंचवीस वर्षें सारखी ओरड चालली आहे, तेव्हां कोठें यंदा पार्लमेंट पुनः जागें होऊन सन १८६१ चा ॲक्ट सुधारण्यांत आला. या ॲक्टाप्रमाणें आणखी निदान १०।१५ वर्षें अम्मल झाल्याखेरीज कायदेकौन्सिलांत जास्त सुधारणा होण्याची फारशी आशा नाहीं. करितां हल्लींच्या ॲक्टाप्रमाणें कायदेकौन्सिलांची रचना कोणत्या तऱ्हेची असावी याबद्दल आपल्या प्रांताचें मत प्रांतिक सरकारास कळविणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. बंगाल, मुंबई, मद्रास वगैरे ठिकाणची कायदेकौन्सिलाची रचना त्या त्या प्रांतांतील स्थितीच्या मानानें थोडीबहुत निरनिराळी होणारच व याकरितां हा विषय प्रत्येक प्रांतांतील प्रांतिकसभेनेंच हातीं घेतला पाहिजे. यंदाच्या राष्ट्रीयसभेंत हा विषय घ्यावा अशी सूचना आहे; परंतु राष्ट्रीयसभेनें जरी हा विषय हातीं घेतला तरी या थोरल्या सभेंत प्रत्येक सोई अगर गैरसोई यांचा खुलासेवार विचार होणें शक्य नाहीं. त्या त्या प्रांतानेंच आपआपले विचार कायम ठरवून मग जरूर पडतील तितके ते राष्ट्रीयसभेपुढें आणिले पाहिजेत. सारांश, राष्ट्रीय सभेंत जरी हा विषय निघावयाचा असला तरी त्याबद्दल सर्व वाटाघाट व चर्चा मुख्यत्वें प्रांतिक सभेंतच झाली पाहिजे. व ती चर्चा सर्व ठिकाणच्या मुक्त्यारांनीं आपआपल्या जिल्ह्यांतील अगर शहरांतील लोकांचा अभिप्राय समजून घेऊन विचारपूर्वक व आस्थेनें केली पाहिजे. सरकारच्या मनांतून नवीन व्यवस्था लवकरच सुरू करावयाची आहे; पण नवीन ॲक्टाप्रमाणें नियम व रुळी, त्यांनीं अजून प्रसिद्ध केल्या नाहींत. बंगालसरकारनें सुचविलेली व्यवस्था म्हणून एक लेख कलकत्ता येथील 'इंग्लिशमन' वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला होता पण तो सर्वांशीं विश्वसनीय आहे कीं नाहीं याबद्दल शंका आहे. मुंबई, मद्रास या दोन ठिकाणीं काय नियम होणार हें अशा रीतीनेंहि अद्याप बाहेर पडलें नाहीं; तेव्हां या दोन्ही सरकारच्या मनोदयाबद्दल आज कांहींच सांगतां येत नाहीं. सरकारांतून कोणत्या तरी तऱ्हेचे नियम प्रसिद्ध झाले असते

म्हणजे ते बरेवाईट म्हणण्यास सोईचे झाले असते; परंतु तशा प्रकारें जोंपर्यंत नियम प्रसिद्ध झाले नाहींत, तोंपर्यंत आपण होऊनच आपणांस योग्य वाटेल ती व्यवस्था सरकारास सुचविली पाहिजे. ती व्यवस्था कोणती व कशा प्रकारची असावी, ह्याबद्दल आमचे विचार आज खालीं दाखल केले आहेत, त्यांची निरनिराळ्या ठिकाणच्या मुक्त्यारांनीं आपआपल्या मंडळींत चर्चा करून त्याबद्दल ठिकठिकाणचे अभिप्राय प्रांतिकसभेंत कळविण्याकरितां अवश्य यावें, अशी आमची त्यांस विनंती आहे. कायदेकौन्सिलें कशा तऱ्हेनें सुधारलीं पाहिजेत, याबद्दल आपले विचार सरकारास कळविण्याची जर ही संधी दवडली तर पुन्हां १०।१५ वर्षें अशी संधी येणार नाहीं; सबब यंदाच्या प्रांतिक सभेंतच निरनिराळ्या जिल्ह्यांतील मुख्त्यारांनीं हजर राहून हें काम शेवटास नेलें पाहिजे.

हल्लींच्या मुंबईच्या कायदेकौन्सिलाची रचना सन १८६१ सालच्या पार्लमेंटच्या ॲक्टाअन्वयें झाली आहे, हें मागें सांगितलेंच आहे. या ॲक्टाप्रमाणें मुंबईचे गव्हर्नर, दोघे कौन्सिलर, कमांडर-इन-चीफ, आणि ॲडव्होकेट जनरल मिळून पांच ऑफीसर कायदेकौन्सिलाचे कायमचे सभासद असतात व नव्या ॲक्टाप्रमाणें हे सभासद आहेत तसेच राहतील. या पांच सभासदांखेरीज ४ पासून ८ नवे सभासद सरकार जुन्या ॲक्टाप्रमाणें आजपर्यंत नेमीत असे. म्हणजे एकंदर कौन्सिलांत सरकारी ५ आणि सरकारानें नेमिलेले ४।५ मिळून एकंदर ९।१० सभासद असत. सन १८६१ च्या कायद्यांत दुसरा आणखी एक असा नियम आहे कीं, सरकारानें नेमलेल्या सभासदांपैकीं निदान निम्मे तरी सभासद सरकारचे कामगार नसावे. याप्रमाणें म्हटलें म्हणजे हल्लींच्या कायदेकौन्सिलांत गव्हर्नर आदिकरून पांच मुख्याधिकारी सरकारानें निवडलेल्या चार पांच इसमांपैकीं एखादादुसरा सरकारी कामगार इतकें हे सरकारी नोकर असावयाचेच. बाकी तीन किंवा चार सभासदच स्वतंत्र असणार; परंतु तेहि सरकारानेंच निवडलेले असल्यामुळें सर्वच प्रसंगीं निर्भीड, विद्वान् व लोकहिताबद्दल दक्ष असतात असें नाहीं.

नव्या ॲक्टाप्रमाणें वरील व्यवस्थेंत जो फेरफार केला आहे तो इतकाच कीं (१) सरकारानें ज्या सभासदांची नेमणूक करावयाची त्यांची संख्या जुन्या कायद्यांत ४ पासून ८ पर्यंत ठरविली होती ती आतां १२ पासून २० पावेतों वाढाविली आहे; (२) या नेमणुकी सरकारानें पाहिजे तर आपण होऊन कराव्या अगर लोकांनीं निवडून दिलेले लोक सरकारानें पसंत करून त्यांस नेमावे. लोकांनीं किती निवडावे व सरकारानें किती नेमावे याबद्दल कायद्यांत खुलासा नाहीं; तथापि हा कायदा पास होते वेळीं पार्लमेंट सभेंत ग्ल्याडस्टन वगैरे मुत्सद्यांनीं जीं भाषणें केलीं आहेत त्यांवरून एकंदर १२ पासून २० पर्यंत सभासद लोकांनीं निवडलेले कौन्सिलांत घेण्याचें ठरलें असावें असें दिसतें. नेम-

लेल्या सभासदांपैकीं निदान निम्मे तरी सभासद सरकारी कामगार असूं नयेत असा जो पूर्वीच कायद्यांत नियम होता, तो हल्लींच्या कायद्यानें कायम राहिला आहे. सारांश, नव्या कायद्याप्रमाणें गव्हर्नर, २ कौन्सिलर, कमान्डर-इन-चीफ आणि ॲडव्होकेट जनरल हे पांच अधिकारी खेरीज करून फार झाले तर आणखी २० पर्यंत दुसरे सभासद नेमण्याचा सरकारास अधिकार आहे. या विसांपैकीं निदान निम्मे तरी सभासद सरकारी नौकर असतां कामा नये. निम्मे-हून म्हणजे १० हून जास्त लोक सरकारी नौकरीबाहेरील असले तरी चालेल, पण निम्मेपेक्षां कमी असून चालणार नाहीं. सगळे वीसहि सभासद सरकारानें नेमले तर एकंदरींत कायदे कौन्सिलांत पराकाष्ठा २५ सभासद होतात. जुन्या अगर नव्या कायद्यांत कायदे कौन्सिलाच्या रचनेबद्दल अगर सभासदांच्या संख्येबद्दल यापेक्षां जास्त निर्बंध नाहीं; करितां आपण जी व्यवस्था सुचवावयाची ती हे निर्बंध लक्षांत ठेवून सुचविली कीं, त्यांत कोणत्याच प्रकारचा बेकायदेशीरपणा येणार नाहीं, कायदेकौन्सिलाची नवी व्यवस्था सुचवितेवेळीं दुसरी अशीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, कौन्सिलांत सरकारच्या वतीचे (मग ते नोकर असोत वा नसोत) निदान निम्मे तरी सभासद असण्याची ज्या व्यवस्थेनें तजवीज होणार नाहीं, ती व्यवस्था सरकार कदापीहि पसंत करणार नाहीं.

या सर्व गोष्टी लक्षांत आणतां आम्हांस असें वाटतें कीं, नव्या ॲक्टाप्रमाणें मुंबई कौन्सिलाचे गव्हर्नर आदिकरून पांच अधिकारी धरून एकंदर २४ सभासद असण्यास कांहीं हरकत नाहीं. पराकाष्ठेची यत्ता २५ आहे, पण ही संख्या विभागास सोईवार नाहीं, करितां त्यापेक्षां एक कमी म्हणजे चौवीसच सभासद कौन्सिलांत असावे असें आम्हीं म्हणतों. एकंदर सभासद २४ पैकीं १२ सरकारच्या वतीचे व १२ लोकांनी निवडलेले असावे. १२ सरकारच्या वतीचे असले म्हणजे बारा जणांचीं बारा मतें आणि अध्यक्षांचें एक मत असें करून प्रसंगविशेषीं जरूर पडल्यास सरकारास आपल्या वतीनें बहुमत करितां येईल. सरकारच्या वतीच्या बारा सभासदांपैकीं, गव्हर्नर, दोघे कौन्सिलर, कमांडर इन-चीफ आणि ॲडव्होकेट जनरल हे पांच वजा जातां बाकीच्या सातांची नेमणूक सरकारानें करावी. हे सात सभासद नेमतांना लोकांच्या निवडणुकींत जर कांहीं चूक झाली असेल तर ती सरकारानें सुधारून घ्यावी. उदाहरणार्थ, जर लोकांनीं निवडलेल्या सभासदांत कोणी मुसलमान नसेल तर तो सरकारानें सातांत नेमावा. त्याचप्रमाणें नेटिव्ह संस्थानिक व जहागिदार वगैरे ज्या लोकांचा आमच्या प्रांताशीं निकट संबंध आहे, परंतु ज्यांस मत देण्याचा अधिकार नाहीं, अशा लोकांच्या वतीनें एकाद्या गृहस्थाची नेमणूकहि या सातांतच सरकारानें करून घ्यावी. सारांश, ज्या ज्या जातीचे गृहस्थ लोकांच्या निवडणुकींत

यावयास पाहिजे असून येणार नाहींत, ते ते गृहस्थ व ज्यांस इंग्रज सरकारची साक्षात् प्रजा नसल्यामुळें कायदेकौन्सिलाचे सभासद निवडून देण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं, त्यांच्या वतीनें जे गृहस्थ निवडून देणें अवश्य असेल ते (सरदार संस्थानिक वगैरे) या सातांतच सरकारानें नेमून द्यावे. बारा सभासद निवडण्याच्या कामीं चुका होतील त्या सुधारण्यास सात सभासद निवडण्याचा अधिकार वस्स आहे.

आतां लोकांनीं निवडून द्यावयाचे बारा सभासद कसे निवडावे हा प्रश्न बराच विकट आहे. जिल्ह्याला एकेकच सभासद निवडून द्यावा असें म्हटलें तर इलाख्यांत जिल्हे पंचवीसांवर आणि सभासद अवघे बारा, तेव्हां त्यांचा कांहींच मेळ बसत नाहीं. निरानिराळ्या जातींनीं एक एक सभासद नेमून द्यावा असें म्हटलें तर जातींची संख्याहि १२ पेक्षां जास्त आहे; व जातवार सभासद निवडण्याची पद्धतहि १९ व्या शतकांत कोणास मान्य होणार नाहीं. नुसत्या म्युनिसिपालिट्यांचे व लोकलबोर्डाचे सभासद यांनींच कायदेकौन्सिलाचे मेंबर निवडून द्यावे असें म्हटलें, तर निवडणुकीचा अधिकार सदर म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डांत असलेल्या सरकारानें नेमलेल्या निम्मे सभासदांसहि द्यावा लागतो. लोकलबोर्डांतून व म्युनिसिपालिट्यांतून लोकांनीं निवडलेले जेवढे सभासद असतील तितक्यांसच कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार द्यावयाचा म्हटलें तर तिकडूनहि अडचणच पडते; कारण एखाद्या खेडेगांवांतील म्युनिसिपालिटीच्या सभासदांपेक्षां कायदेकौन्सिलांत कोण सभासद नेमावे याचा निर्णय मोठमोठ्या शहरांतील व्यापारी, इनामदार, जमीनदार, सावकार, मोठे पेन्शनर व विद्वान् गृहस्थ यांस चांगला करतां येईल. आपल्या म्युनिसिपालिट्यांची हल्लीं काय स्थिति आहे हें प्रायः सर्वांस ठाऊकच आहे. म्युनिसिपालिट्यांतून जे आम्ही लोक निवडून देतों त्यांनीं आमच्याकरितां कौन्सिलांतील सभासद निवडून द्यावे म्हणून देत नाहीं. म्युनिसिपालिटींतील काम व कायदेकौन्सिलांतील काम हीं दोन्हींहि निरनिराळीं आहेत व एका कामास जो मनुष्य योग्य असेल तो दुसऱ्या कामास म्हणजे सर्वांशीं योग्य ठरेलच असें नाहीं. खुद्द विलायतेंतील पार्लमेंट सभेचे सभासद निवडण्याचा हक्क केवळ लोकलबोर्डाच्या मेंबरांसच नसतो; व तोच न्याय येथेंहि लागू केला पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार करितां सन १८८९ सालीं राष्ट्रीय सभा मुंबईस भरली होती त्यावेळीं मुंबई इलाख्याच्या वतीनें कायदेकौन्सिलाची जी व्यवस्था त्या सभेंत सुचविण्यांत आली, तशाच प्रकारची कांहीं व्यवस्था हल्लींहि आपण योजिली पाहिजे असें आम्हांस वाटतें.

मुंबई इलाख्यांत सामान्यतः सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक असे चार भेद केले असतां चालतील. किंबहुना भिन्न भिन्न भाषा बोलणारे हे चार प्रकारचे लोक, अगर लहान लहान राष्ट्रें मिळूनच आमचा एक इलाखा झाला आहे

असें म्हणण्यास हरकत नाहीं. या चारहि लोकांच्या वतीनें कायदेकौन्सिलांत सभासद आलेच पाहिजेत इतकेंच नव्हे, तर या चौघांप्रमाणेंच मुंबई शहर व बेट हाहि एक पांचवा भाग कल्पिला पाहिजे. एका मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीचें उत्पन्न पन्नास लाख आहे व मुंबई खेरीज करून एकंदर सर्व इलाख्यांतील म्युनिसिपालिट्यांचें उत्पन्न ४० लाखहि भरण्याची मारामार आहे. मुंबईचा व्यापारहि त्याच मानानें विस्तृत व अवाढव्य आहे. करितां कायदेकौन्सिलांत सभासद निवडून द्यावयाचे ते (१) मुंबई शहर व बेट (२) सिंध (३) गुजराथ (४) महाराष्ट्र (५) कर्नाटक असे इलाख्याचे पांच भाग कल्पून त्यांतील प्रत्येक भागास लोकसंख्येच्या व व्यापाराच्या वगैरे महत्त्वाच्या मानानें कांहीं नियमित सभासद निवडून देण्याचा अधिकार असला पाहिजे. ठाणें, रत्नागिरी व कुलाबा या तीन कोंकणांतील जिल्ह्यांपैकीं ठाणें गुजराथेंत अगर उत्तर भागांत आणि कुलाबा व रत्नागिरी दक्षिण भागांत मोडतात; परंतु निवडणुकीच्या कामाकरितां ह्या तिन्ही जिल्ह्यांचा महाराष्ट्रांतच समावेश करणें आमच्या मतें विशेष सोईचें व योग्य दिसतें. ठाणें, रत्नागिरी व कुलाबा या तिन्ही जिल्ह्यांचा महाराष्ट्रांत समावेश केला असतां महाराष्ट्राची लोकसंख्या सिंध, गुजराथ वगैरे प्रांतांच्या दिढी दुपटी जवळ जवळ येते. लोकसंख्येचें हें प्रमाण व मुंबईचा व्यापार आणि संपत्ती लक्षांत आणतां लोकांनीं जे बारा सभासद निवडावयाचे त्यांची वांटणी मुंबई ३ सिंध २ गुजराथ २ महाराष्ट्र ३ व कर्नाटक २ याप्रमाणें केली तर सर्वांचे हक्क सारखे पाळल्याप्रमाणें होईल.

मुंबईच्या तीन सभासदांपैकीं एक, चेम्बर ऑफ कॉमर्स आणि गिरणीवाले व्यापाऱ्यांची सभा वगैरे व्यापारी मंडळींनीं निवडून द्यावा; एक म्युनिसिपालिटीनें निवडून द्यावा; आणि एक युनिव्हर्सिटीनें निवडून द्यावा. अशा रीतीनें व्यवस्था झाली म्हणजे मुंबईच्या तिन्ही प्रमुख संस्थांच्या वतीनें कायदेकौन्सिलांत सभासद निवडले जाऊन मुंबईसरकारास कोणतीहि तक्रार करण्यास सवड राहणार नाहीं. मुंबईसच काय, परंतु इतर ठिकाणींहि जास्त सभासद निवडून देण्याची सवड असती तर बरें झालें असतें हें खरें आहे. सगळ्या इलाख्याभर १२ सभासदांची वांटणी करणें म्हणजे तीन तीन चार चार जिल्हे एके ठिकाणीं करून त्यांस एक सभासद निवडून देण्याचा अधिकार द्यावा लागतो. विलायतच्या मानानें पाहिलें तर यापेक्षां किती तरी जास्त सभासद लोकांच्या वतीनें कायदेकौन्सिलांत असले पाहिजेत, परंतु तसा योग आला नाहीं तोंपर्यंत जो अधिकार सरकारनें आपणांस दिला आहे तितक्यांतच व्यवस्था लावली पाहिजे. एकंदर मुंबई इलाख्यांतून १२ सभासद निवडावयाचे; पैकीं एक चतुर्थांश निवडणुकीचा अधिकार मुंबई शहरास दिला असतां तो त्या शहरच्या मानानें कमी होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

मुंबई शहरांतील लोकांनीं तीन सभासद निवडून दिले म्हणजे बाकी राहिलेल्या नवांची वांटणी सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कानडा या चार प्रांतांत कशी करावी हें मागें सांगितलेंच आहे. महाराष्ट्र खेरीज करून प्रत्येक प्रांताच्या वांटणीस दोन दोन सभासद येतात; पैकीं एक सभासद त्या त्या प्रांतांतील जिल्ह्याच्या ठिकाणच्या व इतर मोठमोठ्या व्यापारी, सावकार, इनामदार पेन्शनर वगैरे लोकांनीं मिळून निवडून द्यावा. उदाहरणार्थ, वीस हजारांपैकीं ज्या शहरांतील म्युनिसिपालिटीचें उत्पन्न जास्त आहे, तीं शहरें व जिल्ह्याचें एकादें ठिकाण वरील सदरांत येत नसल्यास तें मिळून सर्व मोठ्या शहरांतील म्युनिसिपालिट्यांचे सभासद आणि शंभर रुपयांच्यावर सारा अगर इन्कमटॅक्स देणारे गृहस्थ, दरमहा १०० रुपयांपेक्षां जास्त रुपये मिळविणारे असे पेन्शनर, फर्स्ट क्लास सरदार, ऑनररी मॅजिस्ट्रेट, ग्रॅज्युएटस् वगैरे सर्वांनीं मिळून त्या त्या प्रांताकरितां एक सभासद निवडून द्यावा. हा सभासद आपल्या प्रांतांतील मोठमोठ्या शहरांतील लोकांचें मत कायदेकौन्सिलांत प्रतिपादन करील व त्यांच्या वतीनें भांडेल. परंतु प्रांतांतील मोठमोठ्या शहरांची जशी या रीतीनें व्यवस्था झाली, तशी तालुक्यांतील व खेडेगांवांतील लोकांच्या वतीनेंहि व्यवस्था झाली पाहिजे. कारण कायदेकौन्सिलांत जे विषय निघतील अगर जे क़ायदे होतील, ते शहरांतील व खेडेगांवांतील रहिवाशांस सारख्याच रीतीनें लागू साधून वयाचे आहेत. कित्येक प्रसंगीं तर कायदा बनविण्यांत अहोरात्र व सर्व खेडेगांवांतील लोकांचें जास्त बरें वाईटाच्यांनीं अगोदर आपल्या मनांत विचारविणें लोकाप्रमाणेंच खेडेगांवांतील लोकांसच्या हजार पांचशें लोकांच्या राष्ट्रसभेनें अधिकार दिला पाहिजे. प्रत्येक प्रांतास लागलेंच कबूल होईल असें नाहीं; तर म्हणजे एक सभासद मोठमोठ्या शहरांतील लव काय पण प्रत्येक खेड्यांतूनहि निवडून देतील. सर्व खेड्यांतील लोकांस व मागण्याला कांहीं वजन येणार ड्डून देण्याचा अधिकार असला तर पांच फांतहि श्रमविभाग अत्यंत आवश्यक सभासद निवडून देण्याचें काम फारच बोजा कमी होतो, त्या चळवळीचा निवडण्याचा अधिकार मिळेपर्यंत खरें राष्ट्रीय स्वरूप येतें, असें अनेक लहान लहान म्युनिसिपालिट्यांचे नेनाला यश यावें असें जर लोकांना खरोखर इनामदार व ग्रॅज्युएटस् वगैरे यावर गांवोगांव व खेड्यांतूनहि प्रयत्न सुरू प्रांतांतून अशा रीतीनें दोन द्रीयपरिषदेपेक्षांहि प्रांतिकसभेला आम्ही जास्ती (ठाणें, रत्नागिरी व कुलाबा प्रांतिकसभेप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यांतून व गांवांतूनहि एक सभासद मोठमोठ्या शहकरच काळ येईल अशी आम्ही उमेद बाळगतों. मिळून महाराष्ट्रांत तीन सभूर्वी प्रत्येक प्रांतांत, त्यापूर्वी प्रत्येक जिल्ह्यांत व सुचविलें आहे. ालें पाहिजे. ह्या नैसर्गिक क्रमानें ज्या दिवशीं

यंदाच्या प्रांतिकसभेंत, तेव्हांच आम्ही राजकीय हक्क भोगण्यास खरोखर निवडण्याची व्यवस्था आमचें म्हणणें ऐकेल, हें प्रत्येक देशाहितचिंतकानें लक्षांत केली आहे. निरनिरा
ठरेल तो कायमचा सुचण्यास कारण पुणें येथें भरणारी पांचवी प्रांतिकसभा सुरू होऊन प्रतिभा भरूं लागून चार वर्षें झालीं तरी तिजविषयीं लोकांना प्रांतिकसभेची कळकळ अजून वाटत नाहीं व त्यामुळें तिचें कामहि व्हावें तसें होत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. पण अशी स्थिति पुढें चालूं देणें श्रेयस्कर आहे काय ? व नसेल तर तिचा प्रतिकार कसा करावा, ह्याविषयीं मात्र कोणी फारसा विचार करतांना आढळून येत नाहीं. सामाजिक, औद्योगिक वगैरे कोणत्याहि प्रकारची सुधारणा असो, ती करूं लागलें असतां आपलें राजकीय पारतंत्र्य ठिकठिकाणीं कसें नडतें, याचा सर्वांस अनुभव आहेच. त्या अडचणी दूर करण्याकरितां राष्ट्रीयपरिषद, प्रांतिकसभा इत्यादिकांच्या द्वारें राजकीय चळवळ सतत चालू ठेवली पाहिजे; ती चालू राहण्यास लोकांचें एतद्विषयक अज्ञान दूर झालें पाहिजे व तें दूर करण्यास ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं मुकल्यार नेमून, वेळोवेळीं जाहीर सभा करून, व्याख्यानें देऊन, आणि वर्तमानपत्रांतून व पुस्तकरूपानें लेख लिहून; लोकमत जागृत केलें पाहिजे. हें जोपर्यंत होत नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीय सभेच्या फंडाला पैसे मिळत नाहींत, किंवा प्रांतिकसभेस मुक्त्यार येत नाहींत अशी कुरकुर राहाणार; पण तीवद्दल कांहीं विशेष व्यक्तींस किंवा जनसमाजास नांवें ठेवण्यापूर्वी, त्यासंबंधाचा आपणावर कसा व किती दोष येतो व तो टाळण्यास आपण मनःपूर्वक झटतों काय, ह्याचा ठिकाठिकाणच्या पुढारी लोकांनीं विचार केला पाहिजे. तात्पर्य, हा आरोप काढून टाकण्याकरितां गांवोगांवीं जाहीरसभा भरवून प्रांतिकसभेकरितां योग्य मुक्त्यारांची निवडणूक करणें व पुढें येणाऱ्या विषयांसंबंधानें लोकमत तयार करणें हें तिजसंबंधानें लोकांचें पहिलें कर्तव्य आहे. गुदस्तांच्या प्रांतिकसभेच्या पुढील व्यवस्थेसंबंधानें कांहीं नियम करण्यांत आले होते, त्यांपैकीं पहिल्या नियमाअन्वयें सभेस येणारे मुक्त्यार प्रत्येक जिल्ह्यांतील जाहीरपणें निवडलेले असले पाहिजेत हें सर्वांस महशूर असेलच. अर्थात् हे मुक्त्यार जितके चांगले व पुष्कळ येतील तितकें सभेला अधीक महत्त्व येणार आहे. आजपर्यंतच्या सभांना मुंबई, गुजराथ, सिंध व इकडे दक्षिणभाग वगैरे ठिकाणचे मुक्त्यार फारसे येत नसत. यंदा तरी ती स्थिती राहणें प्रशस्त नाहीं, ह्यासंबंधानें यंदाच्या प्रांतिकसभेंत वाटाघाट होऊन कांहींतरी कायमची व्यवस्था होणें इष्ट आहे. तेव्हां कोणास कांहीं सूचना करणें असल्यास त्या त्यांनीं अगोदर कळविण्याची मेहेरबानी करावी. येथें इतकें सांगणें वस्स आहे कीं, ही व्यवस्था ठरवितांना फक्त चार गोष्टींचा विचार करावा लागेल. (१) सभेची रचना (२) खर्च (३) ठिकाण आणि (४) कायमची व्यवस्थापक मंडळी.

ह्या चारहि गोष्टींचा थोडाबहुत निकाल गुदस्तांच्या नियमांनीं झाल्यासारखाच आहे; पण त्यांचा अधिक विचार करून अमलांत आणण्याची तजवीज करणें यंदाच्या प्रांतिकसभेकडे आहे. यंदांच्या सभेपुढें नेहमींप्रमाणें अनेक ठराव येतील; परंतु त्या सर्वांपेक्षां ह्या विषयाला आम्ही जास्ती महत्त्व देतों. कारण त्याजवर खुद्द सभेचें जीवित्व अवलंबून आहे, म्हणूनच ह्या मुद्यासंबंधानें इतका विस्तार केला. आतां बाकीच्या विषयांकडे वळूं.

यंदाची प्रांतिकसभा बहुतकरून नवंबरच्या ७ व्या व ८ व्या तारखेस भरेल. त्याच्या आदल्या दिवशीं म्हणजे रविवारीं सर्व मुक्त्यारांची प्राथमिक सभा भरून अध्यक्षांची नेमणूक व सबजेक्ट कमिटीची योजना येवढें काम होईल. अध्यक्षस्थान मुंबईचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर व सहाव्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष ऑ० फेरोजशहा मेहरवानजी मेथा यांनीं स्वीकारण्याचें कबूल केलें असल्यामुळें प्रारंभींचें त्यांचें भाषण नेहमींप्रमाणें पोक्त व सुरस होईल ह्यांत शंका नाहींच. सभेपुढें येणाऱ्या विषयांत कायदेकौन्सिल संबंधाच्या ठरावाला अग्रस्थान दिलें पाहिजे, हें आम्हीं मागील खेपेस सांगितलेंच व सभेमार्फत निवडणुकीची जी व्यवस्था सुचविली जावी तिची साधारण दिशाहि दाखविली आहे. तेव्हां ह्या महत्त्वाच्या विषयाचा विचार करण्यांत बहुतेक दुसरा दिवस आटपल्यास नवल नाहीं. वेळ राहिल्यास दुसऱ्या दिवशीं व शेवटल्या दिवशीं बाकीचे विषय सभेपुढें येतील. सिव्हिलसर्व्हिस संबंधानें पांचसहा महिन्यांपूर्वी निघालेल्या हिंदुस्थान सरकारच्या ठरावांत जी नवीन व्यवस्था करण्यांत आली आहे, तिजसंबंधानें लोकमत सरकारास कळविणें इष्ट आहे. सन १८७० त नेटिवांना मोठ्या पगाराच्या जागांपैकीं एकपंचमांश जागा द्याव्या, असा पार्लमेंटनें कायदा केला, पण हिंदुस्थान सरकारानेंच तो धाब्यावर बसविला. पुढें बराच गवगवा झाला तेव्हां चौकशी करण्याकरितां पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमलें ! कमिशनच्या सूचना लोकांना कांहीं अनुकूल व कांहीं प्रतिकूल होत्या; पण त्या जरी सर्व अमलांत आल्या असत्या, तरी आम्हांस पुष्कळ सवलत मिळाली असती. परंतु सरकारानें प्रतिकूल सूचना तेवढ्या घेऊन अनुकूल टाकून दिल्या असल्यामुळें ' तेलहि गेलें व तूपहि गेलें ' अशी आतां आमची स्थिति झाली आहे ! पूर्वीच्या स्टॅटयुटरी सर्व्हिसचा विशेष हक्क होता, तोहि गेला व नवीन प्राव्हिन्शिअल सर्व्हिसपासून कांहींच फायदा नाहीं. तेव्हां सदरहू ठराव फिरवून निदान कमिशनच्या सूचना तरी अमलांत आणाव्या असें सरकारास कळविणें अवश्य आहे. प्राव्हिन्शिअल सर्व्हिसमध्यें नेमणुका व्हावयाच्या त्या जाहीर परीक्षेनें व्हाव्या. केवळ वशिल्यानें होऊं नयेत. तसेंच इंजिनिअरिंग, टेलिग्राफ वगैरे खात्यांतील नेमणुकांसंबंधानें अलीकडे जे नवीन नियम करण्यांत आले आहेत, तेहि फार अन्यायाचे आहेत. ते फिरवावे व सिव्हिलसर्व्हंटांखेरीज इतर खात्यांतील नोकरांना दोनतृतियांशाचा

नियम लागू करूं नये असें सरकारास सुचवावयाचें आहे. या विषयासंबंधानें वर्तमानपत्रांतून पुष्कळ चर्चा झाली असल्यामुळें येथें आणखी कांहीं लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

तिसरा विषय उच्चप्रतीच्या शिक्षणणासंबंधाचा. अलीकडे शिक्षणांतून होईल तितकें करून आपलें अंग काढून घेण्याचा सरकारचा प्रयत्न दिसतो. इकडे हलक्या प्रतीच्या शिक्षणास मदत देण्याकरितां म्हणून युनिव्हर्सिटीची ग्रँट बंद करावयाची व दुसरीकडे हलक्या प्रतीच्या सर्व शाळांचा बोजा म्युनिसिपालिट्यांवर टाकावयाचा आणि सरकार मोकळें तें मोकळेंच! असल्या लपंडावामुळें आश्रय नसल्यामुळें उच्च शिक्षण बुडतें. म्युनिसिपालिट्यांकडून नीट व्यवस्था चालत नसल्यामुळें कनिष्ठ शिक्षणाची दुर्दशा होते, व त्या शाळांचा बोजा अंगांवर पडल्यामुळें ओतूरसारख्या लहानसहान म्युनिसिपालिट्यांचें दिवाळें वाजतें. येणेंप्रमाणें चोहोंकडून होत असलेलें लोकांचें नुकसान सरकारच्या नजरेस आणून देणें प्रांतिकसभेचें कर्तव्य आहे; सबब उच्च शिक्षणाची मदत कमी करूं नये, व कनिष्ठ शाळांची व्यवस्था म्युनिसिपालिट्यांकडून काढून घेऊन खर्चापैकीं कांहीं ठरीव रक्कम मात्र त्यांजपासून घ्यावी अशा दोन सूचना कराव्यायाच्या आहेत. हल्लीं सरकार ठरीव रक्कम देतें व बाकीचा शाळांचा खर्च म्युनिसिपालिट्यांच्या अंगावर पडतो, व हा खर्च वर्षास वाढत असल्यामुळें म्युनिसिपालिट्यांवरचा बोजा वाढतो. तेव्हां हा जास्ती बोजा गरीब म्युनिसिपालिट्यांवर लादण्यापेक्षां सरकारानें सोसावा हें उचित आहे. पांचवा विषय नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या शेतकी कमिशनच्या रिपोर्टांत केलेल्या सूचनांचा विचार करणें होय. हल्लींची वसूलपद्धती फार कडक असल्यामुळें लोकांवर अतिशय जुलूम होतो; सबब दुष्काळांत सूट वगैरे देण्याची सवलत असावी अशी कमिशनाची मुख्य सूचना आहे, व ती सर्वांशीं रास्त आहे; परंतु मुंबईसरकाराला पसंत नाहीं. तेव्हां त्या सूचनेचा अवश्य विचार झाला पाहिजे; असें प्रांतिकसभेनें आपलें मत कळविणें जरूर आहे.

साहवा विषय अबकारी व तिच्या पोटांतील लोकमताविरुद्ध मुंबई कायदेकौन्सिलांत दपट्टून दिलेलें मोहाचें बिल. हें बिल हिंदुस्थानसरकाराकडे मंजूरीकरितां गेलें आहे, तीं देऊं नये अशी सरकारास विनंति करावयाची. ह्यांशिवाय गेल्याप्रांतिकसभेंत जे ठराव पास झाले, त्यांचा अर्थातच एका कंठाळीठरावांत समावेश होईल. मिठावरील कराच्या कायद्यांत दुरुस्ती करावी अशी गेल्या प्रांतिकसभेंनें सूचना केली होती; तिला मान देऊन मुंबईसरकारानें ह्या वर्षाच्या आरंभीं एक कायदा पास केला; त्याबद्दल सरकारचे आभार मानले पाहिजेत. तसेंच जंगल खातें कलेक्टराच्या देखरेखीखालीं देण्यासंबंधानें जे नवीन नियम करण्यांत आले आहेत त्याबद्दलहि सभेनें आपला संतोष प्रदर्शित करणें

उचित आहे. ह्याशिवाय खेड्यांतील आरोग्य वगैरे आणखी कांहीं विषय कित्येकांनीं सुचविले आहेत; परंतु ते विषय सध्या लोकांपुढें नसल्यामुळें व त्यांविषयीं बराच मतभेदहि असल्यामुळें यंदाच पुढें आणणें रास्त दिसत नाहीं. तथापि सांगितलेल्या विषयांखेरीज आणखीं कोणीं कांहीं सूचना केल्यास व त्यांना बरेच लोक अनुकूल असल्यास त्यांचा अवश्य विचार केला जाईल. खुद्द सभेच्या संबंधानें काय व्यवस्था करावी ह्याविषयींहि एखाद दुसरा ठराव येईल, पण त्यासंबंधानें आज कांहीं लिहितां येत नाहीं. येणेंप्रमाणें येत्या प्रांतिकसभेपुढें कोणकोणत्या गोष्टींचा विचार होईल, ह्याचें साधारणपणें निरूपण केलें आहे. असें करण्यांत आमचा उद्देश इतकाच कीं, सभेच्या अगोदर लोकांमध्यें त्यांजविषयीं यथास्थित चर्चा झाली म्हणजे सभेचें काम तितकें सुलभ होईल व तेथें पसार होणाऱ्या ठरावांना अगोदरच लोकांची संमति मिळाल्यानें अधिक जोर व महत्त्व येईल. वस्तुतः वर्षांतून एकदां भरणाऱ्या व दोन दिवसांत काम उरकणाऱ्या राष्ट्रीय किंवा प्रांतिकसभांचें काम अगोदर तयार झालेल्या लोकमताला ठरावांचें रूप देऊन योग्य रीतीनें तें सरकारापुढें मांडणें एवढेंच आहे. त्या विषयांची साधकबाधक चर्चा येथें करणें योग्य नाहीं व शक्यहि नाहीं. राष्ट्रीय व प्रांतिकसभेपुढें येणारे विषय अगोदर कित्येक महिने जाहीर करावे असें पुष्कळांचें मत आहे तें एवढ्याकरितांच, व सध्यांच्या स्थितींत सर्वांशीं तसें करणें जरी शक्य नसलें तरी होतां होईतों या प्रशस्त मार्गाचें अवलंबन करणें इष्ट आहे. निदान प्रांतिक सभेसंबंधानें जरी हा प्रघात पडला तरी देखील लोकांना राजकीय शिक्षण देण्याच्या कामीं त्याचा पुष्कळ उपयोग होणार आहे.

* * *

* कायदेकौन्सिलाची सुधारणा.

यंदाच्या प्रांतिकसभेंत ज्या विषयांची चर्चा होणार आहे, त्यांपैकीं कायदेकौन्सिलाची सुधारणा हा मुख्य विषय होय असें सभेच्या सेक्रेटरींकडून जाहीर झालेंच आहे. या विषयास सध्यां इतकें महत्त्व येण्याचें कारण काय व सामान्यतः कायदेकौन्सिलें सुधारण्याचे नवीन नियम कोणत्या प्रकारचे असावे याचें दिग्दर्शन गेल्या दोन अंकांत आम्हीं केलेंच आहे. आज त्यासंबंधानें जे कांहीं आक्षेप आहेत त्यांचा विचार कर्तव्य आहे. बंगाल्यांत सरकारानें सुचविलेल्या नियमांचा

---

* [केसरी--ता. १ नोव्हेंबर १८९२]

गोषवारा प्रसिद्ध झाल्यामुळें बंगालप्रांतिकसभेनें ज़े नियम सुचविले आहेत, ते बऱ्याच अंशीं सरकारचें धोरण लक्षांत ठेवून सुचविले आहेत. आमच्याकडे सरकारानें कोणते नियम पसंत केले आहेत ते अद्याप बाहेर पडले नसल्यामुळें, सरकारची इच्छा काय आहे व ती आम्हांस कितपत मान्य करतां येईल याबद्दल आज कांहींच लिहितां येत नाहीं; करतां आम्हीं गेल्या अंकांत जी व्यवस्था सुचविली होती तिच्यावर जे आक्षेप आहेत अगर दुसऱ्या ज्या कांहीं एकदोन व्यवस्था सुचविण्यांत आल्या आहेत, त्यांचा येथें विचार करूं.

कोणत्याहि व्यवस्थेचा विचार करण्यापूर्वी प्रथमतः पार्लमेंटसभेंत पास झालेल्या नवीन ॲक्टाप्रमाणें आपणांस काय अधिकार प्राप्त झाले आहेत हें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे. आपले हातपाय पुष्कळ लांब असतील, परंतु सरकारानें आपणांस जें हांतरूण देण्याचें योजिलें आहे तेवढ्यांतच 'आपली सर्व व्यवस्था आपणांस लाविली पाहिजे. नवीन ॲक्टाप्रमाणें मुंबई कायदेकौन्सिलांत फार झालें तर इतउत्तर पंचवीस सभासद नेमतां येतील; यांपैकीं गव्हरनर आदीकरून ५ अधिकारी वजा जातां बाकी वीस रहातात. हे वीसहि सभासद लोकांनीं निवडून देण्याचा अधिकार सरकारच्या मर्जीस येईल तर लोकांस देण्याचा त्यांस अधिकार आहे. परंतु ही गोष्ट जरी अशा रीतीनें सरकारच्या मर्जीवर सर्वांशीं अवलंबून आहे, तरी त्या मर्जीचा आजपर्यंतचा कल मनांत आणला म्हणजे आपणांस पार्लमेंटसभेनें केलेल्या नवीन कायद्याप्रमाणें काय मिळेल व काय मिळणार नाहीं याचा तेव्हांच अदमास करतां येईल. पंचवीस ही संख्या विभागास ठीक नाहीं; करतां एकंदर कायदेकौंसिलाचे सभासद आपण चोवीस धरले तर, त्यांपैकीं फार झालें तर बारा म्हणजे निम्म्यांपेक्षां जास्त सभासद निवडण्याचा अधिकार लोकांस मिळेल असें आजपर्यंतच्या अनुभवावरून व विशेषतः म्युनिसिपाल कामिट्या व लोकलबोर्ड यांचे जे कायदे झाले आहेत त्यांवरून आम्हांस वाटत नाहीं. एकंदर मुंबई इलाख्यांतील पंचवीस सव्वीस जिल्ह्यांनीं फक्त बाराच कामिशनर निवडून द्यावयाचे, म्हणजे दर जिल्ह्यास एकसुद्धां वांटणीस येत नाहीं, हा दोष प्रस्तुतच्या कायद्याचा आहे व त्याबद्दल आज येथें विचार करण्याची आवश्यकता नाहीं. बारांपेक्षां जास्त सभासद निवडण्याचा अधिकार हल्लींच्या कायद्यानें आपणांस मिळत नाहीं. लोकांनीं निवडलेल्या सभासदांची संख्या सरकारास पाहिजे तर बारांपेक्षांहि कमी करतां येईल; परंतु ती बारापेक्षां जास्त होण्याचा संभव नाहीं. करितां फार झालें तर बारा सभासदांची वांटणी इलाख्यांत कशी करावी एवढाच कायतो प्रश्न शिल्लक रहातो. ही संख्या असावी त्यापेक्षां कमी असल्यामुळें जे दोष येणार ते सर्व प्रकारच्या व्यवस्थांत सारखेंच आढळून यावयाचे. करितां ते वर्ज्य करून सभासदांची वांटणी कशी करावी याबद्दल ज्या कांहीं सूचना आल्या आहेत त्यांच्या योग्यायोग्यतेचा विचार केला पाहिजे.

सभासदांची वांटणी इलाख्यांत कोणत्या रीतीनें करावी याबद्दलचें आमचें मत आम्हीं मागें कळविलेंच आहे. याखेरीज दुसऱ्या एकदोन व्यवस्था कित्येक गृहस्थांकडून सुचविण्यांत आल्या आहेत. एकंदरींत सर्व सूचनांचा विचार करतां, लोकांनीं निवडून द्यावयाच्या सभासदांची वांटणी करण्याचे तीन प्रकार शक्य आहेत असें नजरेस येतें. कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड यांस ज्याअर्थीं सरकारनें आपले मेंबर निवडण्याचा अधिकार दिला आहे, त्याअर्थीं त्यांसच हा नवा कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार द्यावा. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, एकंदर इलाख्यांतून बारा सभासद निवडून द्यावयाचे, ते निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील लोकांचें पृथक् पृथक् वर्गीकरण करून, त्या त्या वर्गांतील लोकांनीं निवडून द्यावे हें बरें. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांनीं एकदोन, विद्वान् लोकांनीं एकादा, व्यापाऱ्यांनीं एकदोन, सरदार व जहागिरदार यांनीं एक सभासद येणेंप्रमाणें. तिसरा प्रकार म्हटला म्हणजे, आम्हीं मागें सुचविल्याप्रमाणें मुंबई शहर, सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक असे इलाख्याचे पांच भाग करून प्रत्येकीं निदान दोन दोन सभासद तरी निवडण्याचा अधिकार असावा. या तिन्ही व्यवस्थांचा आपण अनुक्रमें विचार करूं.

कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार फक्त म्युनिसिपालकमेटी व लोकलबोर्ड यांच्या मेंबरांसच असावा, असें कोणीहि विचारी मनुष्य कबूल करील असें आम्हांस वाटत नाहीं. कमेटींतील व बोर्डांतील मेंबरांस हा अधिकार द्यावयाचा असें ठरविलें, तर तो सदर बोर्डांतील व कमेटींतील सरकारानें नेमलेल्या मेंबरासहि आनायासेंच प्राप्त होतो; व तसें झालें म्हणजे कायदेकौन्सिलातील सभासद निवडणाऱ्या लोकांपैकीं निम्मे लोक सरकारनें नेमलेले अर्थात् सरकारच्या तर्फेचे होतील; आतां म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांतील लोकनियुक्त मेंबरांसच कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार आहे असें ठरविलें, तर वरील आक्षेप नाहींसा होतो हें खरें आहे, तथापि या व्यवस्थेवर दुसरे जे आक्षेप आहेत त्यांचें एवढ्यानें निराकरण होत नाहीं. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांत कामें करण्यासाठीं जे मेंबर लोक निवडून देतात, ते म्हणजे सर्वच पहिल्या प्रतीच्या योग्यतेचे असतात असें नाहीं. पुष्कळ ठिकाणीं असाहि अनुभव आहे कीं, गांवांतील चांगले चांगले लोक कमेटींत जाऊं इच्छित नाहींत. कामिट्या व बोर्डें या दोन्हीं संस्था कांहीं नियमित कारणांकारितां व कामाकारितां आहेत. तीं कामें करण्यास जे मनुष्य लायक अततील, तेच कायदेकौन्सिलांतील काम करण्यासहि लायक होतील असें नेहमीं म्हणतां येणार नाहीं. मुंबईसारख्या मोठ्या म्युनिसिपालिट्यांची स्थिति वेगळी आणि कलेक्टर अगर असिस्टंट कलेक्टर यांच्या ताब्यांत असणाऱ्या म्युनिसिपालिट्यांची स्थिति वेगळी.

खेरीज म्युनिसिपालिट्यांतील सभासद ज्या वर्गांतील लोकांकडून निवडले जातात, त्या वर्गांत सर्व प्रकारचे उदीम, धंदे अगर हुन्नर येतात असें नाहीं; सबब केवळ म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांतील मेंबरांसच कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार दिला तर इलाख्यांतील, जिल्ह्यांतील अगर शहरांतील ज्या ज्या गृहस्थांचें अगर संस्थांचें कायदेकौन्सिलाचे सभासद निवडण्याच्या कामीं मत घेणें जरूर आहे, त्या त्या गृहस्थांचें अगर संस्थांचें मत कधींहि पूर्ण अगर चांगल्या रीतीनें सरकारास कळविण्याचा संभव राहणार नाहीं. सारांश, म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें आणि कायदेकौन्सिलें यांच्या कामांत जितका फरक आहे, त्याच मानानें त्यांच्या सभासदांतहि असला पाहिजे. व कमिट्या, बोर्डें यांच्या मेंबरांसच कायदेकौन्सिलाचे सभासद निवडण्याचा अधिकार दिला, तर तो अधिकार फारच नियंत्रित होऊन त्याची बजावणीहि चांगली होईल अशी खात्री देतां येत नाहीं. बंगाली सरकारनें अगर बंगालच्या प्रांतिकसभेनें ज्या सूचना केल्या आहेत, त्यांतहि याच कारणाकरितां कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार म्युनिसिपल व लोकलबोर्डांच्या मेंबरांखेरीज इतर लोकांस दिला आहे; व तोच न्याय आपणांसहि येथें स्वीकारला पाहिजे.

कायदेकौन्सिलांचे सभासद निवडण्याची दुसरी व्यवस्था, उदीमवार अगर धंदेवार होय. या व्यवस्थेंत आणि आम्हीं मागें सुचविलेल्या व्यवस्थेंत (कायदेकौन्सिलांत पाहिजे तितके सभासद निवडण्याचा आम्हास अधिकार असता तर) परिणामीं फारसें अंतर पडण्याचा संभव नाहीं; परंतु सभासदांची संख्या जोंपर्यंत नियमित आहे तोंपर्यंत सर्व मुंबईइलाख्यांतील व्यापारी, सर्व मुंबईइलाख्यांतील शेतकरी अगर विद्वान् लोक, यांचा एकेक वर्ग करून प्रत्येक वर्गास एकाद दुसरा सभासद नेमण्याचा अधिकार देणें सोयीचें होईल असें आम्हांस वाटत नाहीं. मुंबईइलाख्यांतील मोठमोठे जमिनदार अगर शेतकरी लोक हे भिन्न भिन्न भाषा बोलणारे व भिन्न भिन्न प्रांतात राहणारे असल्यामुळें, त्या सर्वांमध्यें या प्रकारचें ऐकात्म्य असावें तसें अद्याप उत्पन्न झालें नाहीं, इतकेंच नव्हे, तर सिंध अगर गुजराथ या प्रांतांतून जे गृहस्थ पुढारी असतील त्यांची कर्नाटकांत ओळखहि असण्याची कित्येकवेळां पंचाईत पडेल. सर्व इलाख्यांतील म्युनिसिपालिट्यांचा एक वर्ग केला तरीहि हीच अडचण उत्पन्न होईल. गुजराथ, सिंध व महाराष्ट्र यांतील म्युनिसिपालिट्यांमध्यें दळणवळण इतकें अल्प असतें कीं, महाराष्ट्रांतील एकादी म्युनिसिपालिटी सरकारानें बंद केली, तर गुजराथी पत्रांतून त्याचा उल्लेखहि येत नसतो व गुजराथेंत तसा कांहीं प्रकार झाला तर महाराष्ट्रीयांसहि त्याची फारशी माहिती नसते. याकरतां मुंबई इलाख्यांतील सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रत्येक प्रांतास निदान दोन दोन तरी सभासद निवडण्याचा अधिकार देऊन, मग त्यांत धंदेवार व जातवार होतील तसे व तितके

पोटभेद करावे हें आम्हांस बरें दिसतें. या व्यवस्थेनें जे चार प्रांत मिळून मुंबई इलाखा झाला आहे, त्या चारहि प्रांतांस कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार मिळून, सदर अधिकाराच्या प्राप्तीनें सर्व लोकांस जें शिक्षण मिळावयाचें अगर कायदेकौन्सिलांतील कामाबद्दल जी आस्था वाटावयाची, ती चारहि प्रांतांतील लोकांस सारखीच वाटूं लागेल. सारांश, कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याचा अधिकार आपणांस आहे हें थोड्याबहुत अंशानें सर्व ठिकाणच्या लोकांस कळणें जर इष्ट असेल तर इलाख्यांतील एक्या उदीम धंद्याचे अगर व्यवसायाचे लोक एकत्र करून, त्यांस एकेकच सभासद निवडण्याचा अधिकार दिल्यानें तो हेतु चांगलासा सिद्धीस जाईल असें आम्हांस वाटत नाहीं. सभासदांची संख्या जर पुष्कळ असती तर पहिल्यानें व्यापारी, शेतकरी असे वर्ग करून नंतर प्रत्येकाचे पुनः गुजराथी, मराठी, कानडी, सिंधी असे पोटभेद करतां आले असते; पण तसें करणें हल्लीं शक्य नसल्यामुळें जो कांहीं अधिकार मिळणार आहे, तो आधीं प्रांतवार वांटून मग त्याचे शक्य असतील तेवढे पोटभेद करावे हें आम्हांस जास्त प्रशस्त वाटतें. मुंबईसारख्या ठिकाणीं—कीं जेथें पारशी, मुसलमान, हिंदु, शीख, जैन, इंग्रज वगैरे जाती समान व्यवसायानें बद्ध झालेल्या आढळतात, तेथें धंदेवारीनें अगर व्यवसायाप्रमाणें कायदेकौन्सिलांतील सभासद निवडणाराचें वर्गीकरण केलें असतां, कांहीं एक अडचण न पडतां उलट अधिक सोईवार होईल. परंतु हाच मार्ग प्रांतोप्रांतीं अगर जिल्ह्यांतून लागूं पडेल, असें आम्हांस वाटत नाहीं.

या ठिकाणीं प्रांताप्रांताचे निरनिराळे वर्ग करून प्रत्येक प्रांतास निदान दोन दोन सभासद निवडण्याचा तरी अधिकार द्यावा, ही व्यवस्था आम्हांस बरी दिसते. प्रत्येक प्रांतास दोहोंपेक्षां जास्त सभासद निवडण्याचा अधिकार असता तर व्यापारी, शेतकरी, शिकलेले वगैरे गृहस्थांस प्रत्येकीं एकेक सभासद निवडण्याची सवड झाली असती. परंतु प्रत्येक प्रांतांतून दोनच सभासद निवडावयाचे, तर त्या प्रांतांतील मुख्य मुख्य शहरांचा एक वर्ग व इतर ठिकाणच्या समजुतदार व वजनदार लोकांचा एक वर्ग असे दोनच वर्ग करण्याची तूर्त सवड आहे. प्रत्येक प्रांतांतील मोठमोठ्या म्युनिसिपालिट्यांचीं कायदेकौन्सिलांत जर कांहीं कामें असतील तर सदर प्रांतांतील शहरांतून जो सभासद निवडला जाईल, त्याचे हातून तीं करवितां येईल; आणि जमीनदार व शेतकरी लोकांकरितां जर कांहीं बोलावयाचें असेल तर तें काम त्या प्रांतांतून जो दुसरा सभासद निवडला जाईल त्याचे हातून होईल. अशा रीतीनें म्युनिसिपालिट्या, जिल्ह्यांतील जमीनदार व शेतकरी या सर्व लोकांच्या हक्कांचें संरक्षण होणें जितकें शक्य आहे, तितकें या व्यवस्थेनें करतां येऊन प्रत्येक प्रांतांतील मोठ्या शहरांच्या अगर जिल्ह्यांच्या, कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याच्या धामधुमीचा व चळवळीचा थोडाबहु-

हुत तरी भाग वांटणीस येईल. लोकांनीं निवडून द्यावयाच्या सभासदांची संख्या जरी थोडी असली, तरी मुंबई इलाख्यांतील प्रत्येक जिल्ह्यास या नवीन अधिकाराचा थोडा तरी अंश मिळून, लोकांत त्याबद्दल चळवळ सुरू असणें अत्यंत जरूरीचें व महत्त्वाचें आहे.

❖ ❖ ❖

* हें सारा वाढविणें कीं जुल्मूम ?

इंग्रज सरकारच्या राज्याचा जो एक मोठा गुण अगर दुर्गुण आहे तो हा कीं, या राज्यांत सर्व व्यवस्था पद्धतवार व कायद्यानें होत असतात. नेटिव अमलाखालीं पूर्वी आम्हांस सर्वदांच अन्याय भोगावा लागत होता असें नाहीं. सरासरीच्या मानानें पाहिलें असतां, पेशवाईंत अगर मोंगलाईंत न्यायान्यायाची वांटणी हल्लींचप्रमाणें होत असे, असें मानण्यास बरींच प्रमाणें आहेत. पण मोंगलाईचें जें एकदां नांव बद्दू झालें आहे त्यामुळें या गोष्टीकडे लोकांचें फारसें लक्ष जात नाहीं. मोंगलाईपेक्षांहि भयंकर अन्याय व जुल्मूम इंग्रेजी राज्यांत कित्येक वेळां होत नाहींत अगर झाले नाहींत असें म्हणतां येणार नाहीं. परंतु दोहोंमध्यें—मोगलाईंत आणि इंग्रजींत—जो मोठा फरक आहे तो हा कीं, पाहिल्यांत न्याय देणें अगर जुलूम करणें केवळ अंमलदाराच्या खुषीवर असतें आणि दुसऱ्यांत तीच गोष्ट घडवून आणण्यांत कायद्याची थोडीबहुत मदत घ्यावी लागते. मोंगलाईंतील एखाद्या हिंदु संस्थानिकास दत्तक देण्यास अधिकार असूं नये असें जर बादशहास वाटलें असतें, तर त्याप्रमाणें लागलाच दसरांतून हुकुमच सुटला असता; व कोणीं उलट प्रश्न केल्यास "खावंदसाहेबांच्या मर्जीनुरूप व्यवस्था होत आहे" असा त्यास जबाब मिळाला असता. परंतु हीच व्यवस्था इंग्रेजी अमलांत घडवून आणण्यास थोडेंबहुत तरी कायद्याचें ज्ञान जरूर असून सनदांचें अर्थ फिरवावे लागतात ! इंग्रजसरकार परम दयाळू आहे, न्यायी-आहे, उदार आहे आणि प्रामाणिक आहे हें खरें आहे; पण हे सर्व गुण कायद्याच्या मापानें आपणांस मोजून घेतले पाहिजेत. अमुक कायदा अगर अमुक रूल आपणांस विरुद्ध असला तर आमच्या राज्यकर्त्यांकडून प्रथमतःच त्याची विल्हेवाट करण्यांत येते; आणि अशा रीतीनें एकदां रस्ता खुला झाला म्हणजे इतर कामगारांस तोच कित्ता गिरवण्यास सोपें पडतें.

हे विचार आज सुचण्याचें कारण नुकतेंच कांहीं ठिकाणीं अनन्वित सारा चढाविल्याचीं जीं कांहीं उदाहरणें ऐकूं येतात तें होय. ज्यावेळीं जमिनीवरील

* [केसरी—ता. ८ नोव्हेंबर १८९२]

सर्व बाबी एकवट करून त्याच्या ऐवजीं जो कांहीं नियमित सारा घेण्याचा सरकारानें ठराव केला, त्यावेळीं पहिल्या पहिल्यानें लोकांस किती बरें आनंद झाला असेल! त्यांच्या मतें जुन्या रिवाजाप्रमाणें एकदां जमिनीची पहाणी होऊन गेली म्हणजे ती निदान कांहीं पिढ्या तरी टिकावयाची. इंग्रजसरकार तीस वर्षांनीं पुनः पहाणी करील हें त्यांस ठाऊक नव्हतें असें नाहीं; पण त्यांपैकीं एकासहि स्वप्नांतसुद्धां असें वाटलें नसेल ही फेरपहाणी इतकी कडक व त्रासदायक होईल. कोठें कोणीं विहीर वगैरे खोदल्यास अगर पाट काढला असल्यास फेर पहाणींत त्याचा सारा वाढेल तर कोणासहि वाईट वाटणार नाहीं. परंतु निव्वळ वरकस अगर डोंगराळ जमिनीचा सारा या पहाणींत दोन दोनशें पट जारत वाढतो त्यास काय म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. आमच्या सरकारानें मोजणीचें एक स्वतंत्र खातें केलें असल्यामुळें, त्या खात्यास दरसाल कांहीं तरी काम उपस्थित करून सरकारचा फायदा करून दिला पाहिजे. आतां त्यांच्या या कृत्यास सरकारांतून मनाई यावयाची, परंतु खुद्द सरकारचे तिजोरींतच पैशाची टंचाई असल्यामुळें सरकार कांहीं इकडे लक्ष देत नाहीं. जमिनीचा सारा वाढाविणें हा एक उत्पन्न वाढविण्याचा मार्ग आहे; व जोंपर्यंत जास्त सारा रयतेकडून निघत आहे तोंपर्यंत सरकार आपण होऊन कांहीं एक करण्यास प्रवृत्त होणार नाहीं. जमिनीच्या मालकास केवळ जमीन वाहणाराकडून जास्त कोणताहि हक्क प्राप्त होत नाहीं व सर्व जमिनीची खरोखर मालकी खुद्द सरकाराकडेसच आहे, हें तत्त्व जमीनमहसुलाच्या कायद्यांत अगदीं गुपचुप व बेमालूम नमूद केलें आहे. त्यामुळें सरकार मागेल तेवढा सारा देऊन पाहिजे तर जमीन वापरावी नाहीं तर सोडून द्यावी, अशी आमच्या शेतकऱ्यांची स्थिति झाली आहे. ही स्थिति बरी का वाईट याचा तूर्त आपणांस विचार कर्तव्य नाहीं. परंतु फेरतपासणींत सारा जेव्हां दोनशें पटीहून जास्त वाढतो, तेव्हां ही शेती करणाऱ्या लोकांनीं तक्रार करूं नये हें म्हणणें केवळ अन्यायाचें आहे. एखादा इनामदार अगर दुमालदार जर आपल्या कुळावर अशा तऱ्हेनें सक्ती करूं लागला; तर त्याचा निषेध करण्यास आमचें सरकारच पहिल्यानें पुढें सरसावेल अशी आमची खात्री आहे. परंतु स्वतःवर प्रसंग आला म्हणजे "पुराणांतील वांगी पुराणांत" या न्यायानें न्यायास अगर नीतीस रजा देऊन आमचें सरकार गरीब शेतकऱ्यांवर जुलूम करण्यास प्रवृत्त होतें.

हल्लीं रत्नागिरी जिल्ह्यांत जो प्रकार चालला आहे तो याहूनाहि फार विलक्षण आहे. एखाद्या शेताचा सारा दाहाचा पंधरा रुपये झाला तर तें ओझें शेतकऱ्यावरच पडतें. जर त्यास पंधरा रुपये झाला तर त्यास पंधरा रुपये देण्याची शक्ती असेल तर तो तें शेत करील अगर सोडून देईल. परंतु शेतकरी व सरकार यांचे दरम्यान जेव्हां एखादा जमिनदार दुमालदार असतो तेव्हां सारा वाढल्यामुळें जें नुकसान व्हावयाचें तें प्रथमतः या जमिनदारासच सोसावें लागतें. पुढें

तें नुकसान कुळाकडून त्यास भरून येतें, परंतु त्यास बराच खर्च व त्रास पडत असल्यामुळें एकंदरींत सदर जमीनदारास थोडाबहुत त्रास तरी सोसावा लागतो; परंतु रत्नागिरी जिल्ह्यांतील जमीनदारांची ऊर्फ खोतांची स्थिती याहून फार भिन्न आहे. खोत या शब्दाचा मूळ अर्थ कांहींहि असो, त्यास सन १८८० च्या कायद्याप्रमाणें सरकार व रयत यांच्या दरम्यानचा जमीनदार म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. या कायद्याप्रमाणें गांवचा सर्व वसूल खोतानें करावयाचा असून तो सरकारांत जमा करण्याची जबाबदारी फक्त त्याचेवरच राहते. सन १८८० सालीं खोतांचे हक्क नियमित अगर आकुंचित करण्यांत येऊन कुळांकडून खोतांस अमुक एक रकमेपेक्षां जास्त मक्ता मिळूं तये असे सरकारमार्फत नियम करण्यांत आले. म्हणजे खोतानें कुळांकडून जी कांहीं रक्कम घ्यावयाची तिची यत्ता ठरविण्यांत आली. ह्या रकमेपेक्षां जास्त रक्कम केव्हांहि खोतास सरकारांत भरावी लागेल असें त्यावेळीं कोणाच्या स्वप्नींहि नव्हतें. व म्हणूनच त्याबद्दल सदर कायद्यांत कांहीं निर्बंध झालेला नाहीं; परंतु रयत व सरकार यांच्यामधील सर्व जमीनदार काढून टाकून सर्व कारभार एकतंत्र करण्याची जी इंग्रजी कामगारांची हौस आहे त्यामुळें म्हणा, अगर दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा; कायद्यांतील चुकीचा फायदा घेण्याचें सदर सरकारी कामगारांच्या मनांत आलें. खोतीॲक्ट रद्द करण्याचें या कामगारांच्या हातीं नाहीं; आणि खोत तर नकोत तेव्हां त्यांनीं अशी युक्ती काढली कीं, एकंदर गांवचा सारा वाढवावा आणि खोतीचे मक्ते आहेत तसे कायम ठेवावे ! म्हणजे खोतानें गांवच्या साऱ्याबद्दल दहा रुपये सरकारांत भरावे आणि कुळाकडून पांचांपेक्षां जास्त वसूल करण्याचा त्यास अधिकार असूं नये. अर्थात् बाकी राहिलेले पांच रुपये आपलें खोतीचें नांव राहण्याकरितां पाहिजे तर त्यांनीं आपले खिशांतून भरावे नाहींपेक्षां खोती सोडून द्यावी. बरें, त्यानें खोती सोडून दिली आणि सरकार त्याचे जागीं आलें तर मग कुळाचे मक्ते कायम रहातात काय ? नाहीं; तर सरकार अशा स्थितींत दाहीच्या दाही रुपये वसूल करून घेतें, खोतमध्यें असेंपर्यंत मात्र हा न्याय लागू करावयाचा नाहीं. तेव्हां हें काय सारा वाढविणें कीं जुलूम असा जो आम्हीं प्रश्न केला आहे, त्याचें यावरून वाचकांच्या थोडें बहुत तरी स्वरूप लक्षांत येईल. हा विषय यंदाच्या प्रांतिक सभेपुढें येणारच आहे. करितां त्यासंबंधीं आजच येथें जास्त लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

❁ ❁ ❁

* बंगाल्यांतील ज्यूरीवर गदा

बंगालचे हल्लींचे लेप्टनेंट गव्हर्नर सर चार्लस इलियट यांनीं आपला अधिकार बंगाल्यांत गाजविण्याचा क्रम जारीनें सुरू केला आहे, असें तिकडील पत्रांवरून दिसून येतें. लॉर्ड रिपनसारख्या उदार बुद्धीच्या अधिकाऱ्यानें हिंदु लोकांस जे अधिकार दिले ते चुकीनें आणि गैरसमजुतीनें दिले असें मानणाऱ्या लोकांचा सिमल्यापासून महाबळेश्वर आणि उटकमंडपर्यंत भरणा झाला आहे, असें जरा सूक्ष्म दृष्टीनें हल्लींच्या स्थितीचा विचार केला असतां कोणाच्याहि लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. हे अधिकारी यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांनीं नेटिवास जे अधिकार दिले असतील ते काढून घेऊन पुन्हां नेटिवांची ओरड कायम ठेवण्यास कारणीभूत होतात व त्यामुळें एकप्रकारें राज्यकर्ते व प्रजा यांमधील हक्कासंबंधीं तंटा पुन्हां पुन्हां मूळपदावर येऊन ठेपतो हें सरकारास कांहीं अंशीं फायदेशीरच आहे; परंतु असले कोत्या समजुतीचे आणि शिरजोर अधिकारी एकंदरींत पहातां प्रजेचें, राजाचें व राज्याचें सारखेंच नुकसान करतात असें अनुभवानें सिद्ध झालें आहे. सर चार्लस इलीयट यांनीं म्युनिसिपाल कमेट्यांतील लोकांनीं निवडलेले प्रेसिडेन्ट व व्हॉइस प्रेसिडेन्ट यांस कामावरून नुकतेंच काढून टाकण्याचा अधिकार सरकारास असावा असें सुचविलें होतें; हल्लीं मोठमोठ्या गुन्ह्यांची ज्यूरर नेमून जी चौकशी होते त्यामुळें मोठमोठे गुन्हेगार पुष्कळदां सुटून जातात असें भासवून मोठमोठ्या खटल्यांत ज्यूरी तसावी अशाबद्दलहि एक सरकारी ठराव अलीकडे केला आहे. सर चार्लस इलियट यांनीं गुन्हेगारास यथायोग्य शिक्षा होण्याबद्दल या बाबतींत जी मोठी कळकळ दाखविली आहे तिचा शतांश अगर सहस्रांश कळकळ युरोपियन गुन्हेगार व युरोपियन ज्यूरिबद्दल जर हेच साहेब दाखवितील तर नेटिवांवर व स्वदेशबांधवांवर त्यांचे आतोनात उपकार होतील. वास्तविक पाहतां हिंदुपेट्रिअट वर्तमानपत्रांत जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून असें दिसून येतें कीं, नेटिव ज्यूररांवर सर चार्लस इलियट यांनीं पक्षपाताचा जो हा आरोप ध्वनित केला आहे (कारण सरकारी ठरावांत तसें कांहीं म्हटलेलें नाहीं) तो अगदीं निराधार आहे. शेंकडा ७५ अगर ८० खटल्यांत ज्यूरीचें व जज्जाचें एकमत पडलेलें आहे, त्यावरून निदान या खटल्यांत तरी ज्यूरर लोक यांनीं पक्षपात केला असें म्हणतां येणार नाहीं. बाकी राहिलेले खटले म्हणजे ज्यांत जज्ज व ज्यूरी यांचा मतभेद पडतो त्यांपैकीं जे हायकोर्टाकडे गेले होते त्यांतील जवळ जवळ निम्म्यांत ज्यूरीप्रमाणें व निम्म्यांत जज्जाप्रमाणें हायकोर्टानें ठराव केला आहे. ही स्थिती लक्षांत आणली

---

* [केसरी–ता. १५ नोव्हेंबर १८९२]

म्हणजे सर चार्लस इलियट यांचा आग्रही स्वभाव अगर नेटिवांबद्दल त्यांच्या मनांत असलेलें अतिप्रेम हेंच वरील ठराव करण्यास कारण झालें असावें असें उघड होतें. गुन्हेगाराची चवकशी त्याच्या जातीच्या व बरोबरीच्या लोकांकडून झाली पाहिजे हा हक्क प्रजेस मिळण्यास इंग्लिश लोकांस किती श्रम पडले हें सर चार्लस इलियट यांस कळत नसेल असें नाहीं; व जें तत्त्व इंग्लंडांत उपयुक्त ठरून पसंत ठरलें तेंच तत्त्व इकडे कां लागू पडूं नये याचाहि त्यांनीं कांहीं खुलासा केला नाहीं; अगर आधार दाखविले नाहींत. आतां इंग्लंडांत ज्याप्रमाणें राजाशीं झोंबी करून लोकांनीं आपले हक्क मिळविले तशा रीतीनें राजाचा व राजपुरुषांचा उपमर्द करण्यास आम्ही गरीब हिंदु तयार नाहीं एवढ्याच कारणाकरितां आमच्यावर हा जुलूम होत असल्यास नकळे! राणीसरकारच्या जाहीरनाम्यावरून निदान खुद्द राणीसरकारची तरी अशी इच्छा नाहीं हें उघड दिसतें. हाताखालील अधिकाऱ्यांस जर राणीसरकारची आज्ञा मान्य नसेल तर त्यांनीं वेळींच उघडपणें आपलें वर्तन कळविलें असतां त्यांची कांहीं तरी दाद मागून घेतां येईल. सर चार्लस इलियटासारख्या शिरजोर व माथेफिरू अधिकाऱ्यांनीं; रिपनसारख्या दयाळू, उदार व सुज्ञ मुत्सद्यांनीं लाऊन वाढवलेला वृक्ष, एकाएकीं तोडून टाकण्यास प्रवृत्त व्हावें व अधिकाराच्या जोरावर त्यांस तसें करतां यावें हें सुराज्याचें लक्षण नव्हे. वास्तविक म्हटलें तर फौजदारी खटल्यांत ज्यूरीकडून निकाल करण्याचा अधिकार लॉर्ड रिपनसाहेबांनीं जो आम्हांस दिला तो अपूर्व होता असें नाहीं. गांवपंचांनीं आपआपसांतले दिवाणी व फौजदारी कज्जे तोडण्याची वहिवाट इंग्रजी राज्यापूर्वीच नव्हे तर अनादि कालापासून हिंदू लोकांत चालत आली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुसलमानी अंमलांत तो अधिकार अंशतः काजीकडे गेला तरी पण मोठमोठीं शहरें खेरीज करून पूर्वींचीच पद्धति कायम राहिली असें म्हटलें तरी चालेल. कुंपिणीचा अंमल सुरू झाल्यापासून मात्र कडक इंग्रजी कायदा व करडे गोरे अंमलदार ह्यांच्या सपाट्यापुढें पूर्वींच्या गरीब बिचाऱ्या पंचायतींची दाणादाण झाली व पूर्वींची ज्यूरीपद्धति विलयास गेली. तेव्हां हा आमच्यापासून बुचाडून घेतलेला अधिकारच लॉर्ड रिपनसाहेबांनीं थोडाबहुत आम्हांस परत केला होता; पण तोहि सर चार्लस इलियटासारख्या उदारधीस खपेना. काळ्या माणसांनीं नेहमीं चिखलांत लोळावें, खाविंदचरणाची नेहमीं सेवा करून मिळेल तो तुकडा खावा व आकाशांतील बापानें आपल्या उद्धारार्थ पाठविलेल्या गोऱ्या देवमाणसांचे सदोदित हित चिंतित असावें अशी ज्यांची समजूत, अशा इलियटसाहेबांसारख्या नबाबी अधिकाऱ्यांना आपल्या बरोबरीनें नेटिव्ह ज्यूरर इन्साफाचें काम करतात व पुष्कळदां इंग्रजी मॅजिस्ट्रेट चूक ठरून काळ्या ज्यूरींचेच निकाल बरोबर ठरतात हें पाहून हेवा वाटणें साहजिकच आहे. तथापि

ज्यूरीसारखा अधिकार एकदम काढून घेतल्यानें केवढा लोकक्षोभ होईल ह्याचा त्यांनीं विचार केला नसावा. नोव्हेंबरच्या पहिलीपासून बंगाल प्रांतांत ज्यूरीचा अधिकार बहुतेक रद्द केल्यासारखा केला आहे व आसाम प्रांतांतहि तसेंच करण्याचा विचार घाटत आहे. हळुहळु इतर प्रांतांतहि ही गदा येणार नाहीं असें अलीकडील सरकारी राज्यनीतीचें धोरण पाहिलें तर म्हणवत नाहीं. तेव्हां लोकांनीं एव्हांपासूनच सावध असावें हें बरें.

❁ ❁ ❁

* आठवी राष्ट्रीय सभा

येत्यां डिसेंबर महिन्यांत अलाहाबाद येथें जी राष्ट्रीय सभा भरणार आहे ती आठवी होय; व यंदाच्या वर्षीं तिचें महत्त्वहि कांहीं निराळ्या प्रकारचें आहे. ह्यूम साहेब येथें नसतां यंदाच्या राष्ट्रीय सभेचें ओझें कोणीं डोक्यावर घ्यावें या प्रश्नाचा गेल्या सालीं नागपूर येथें जेव्हां निकाल झाला तेव्हां सर्वांची भिस्त पंडित अयोध्यानाथ यांजवर होती, परंतु आमच्या दुर्दैवानें नागपूरची राष्ट्रीय सभा संपून पुरा महिनाहि लोटला नाहीं तोंच पंडितजींस काळानें ओढून नेलें ! ह्यूमसाहेब यंदाच्या सालीं यावयाचे नाहींत असा निश्चय झालाच होता व पंडितजीहि एकाएकीं निघून गेले. अशा प्रसंगीं यंदांची राष्ट्रीय सभा निर्विघ्नपणें कशी भरते ह्याचीच पाहिल्यानें मारामार होती; परंतु अलाहाबाद येथील कांहीं सत्गृहस्थांनीं राष्ट्रीयसभा व पंडित अयोध्यानाथ यांजवरील आपलें प्रेम व्यक्त करण्याकरितां क्षणभर दुःख एकीकडे ठेऊन कंबरा बांधल्या आणि मोठ्या हिमतीनें पंडितजींच्या मार्गेंहि अलाहाबादेस पुनः एकवार राष्ट्रीयसभा भराविण्याचें अंगावर घेतलें. इकडे मि. डब्ल्यु. सी. बॅनरजी यांनीं राष्ट्रीयसभेच्या जाईन्ट सेक्रेटरीच्या कामाचा चार्ज घेतला आणि पुनः पूर्ववत् व्यवस्था चालूं लागेल अशी आशा उत्पन्न झाली. व त्याप्रमाणें आजपर्यंत कामहि चाललें आहे, तिकडच्या प्रांतांतून काँग्रेसकरितां ठिकठिकाणीं सभा भरून वर्गणी गोळा होत आहे व एकंदरींत दरसालच्या राष्ट्रीयसभेसारखाच यंदाहि बेत राहील याबद्दल आतां काहीं शंका उरली नाहीं. ह्यूमसाहेब हजर नाहींत, पंडित अयोध्यानाथ परलोकवासी झाले व त्यांच्या जागीं ज्यांची नेमणूक झाली होती ते मि.डब्ल्यू. सी. बॅनरजी जीहि आजारी पडून विलायतेस गेले आहेत; इतकें झालें तरी राष्ट्रीयसभा सालाबादप्रमाणेंच नियमानें,व्यवस्थेनें व उत्साहानें भरविण्यांत येत आहे, यावरून ही व्यक्तीची संस्था नव्हे तर सर्व देशाची संस्था आहे व त्याबद्दल खरोखरच आपणास कांहीं कळकळ

---

* [केसरी ता. २२ नोव्हेंबर १८९२]

वाटूं लागली आहे हें उघड होतें. आठव्या राष्ट्रीयसभेस एवढीच गोष्ट जरी आमच्या प्रतिपक्षांच्या नजरेस आणून देतां आली तरीहि या सभेस जाणारांनीं आपलें कर्तव्य बजाविलें असें आम्ही समजूं. परंतु याहिपेक्षां विशेष महत्त्वाच्या व जबाबदारीच्या प्रश्नाचा ज्याअर्थी या सभेंत उलगडा होणार आहे त्या अर्थी पूर्वीच्या सर्व सभांपेक्षां यंदाच्या सभेस जास्त महत्त्व देण्यांत आम्हास कोणतीच हरकत दिसत नाहीं.

ह्यूमसाहेब येथें नसतां राष्ट्रीयसभा यंदा भरविल्यानेंच केवळ काम भागतें असें नाहीं; तर ही संस्था चिरायु होऊन सदोदित रहाण्यास काय उपाय योजावे याचाहि यंदांच आपणांस विचार केला पाहिजे. यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानीं मि० दादाभाई नवरोजी हिंदुस्थानचे नूतन एम्. पी. यांस नेमण्याचा विचार आहे. तेव्हां त्यांच्या अनुभवाचा, व ज्ञानाचा या बाबतींत आपणांस फायदा करून घेतां येईल; परंतु कदाचित् पार्लमेंट सभा जानेवारींतच भरणार असल्यामुळें अगर अन्य कांहीं कारणामुळें मि० दादाभाई नवरोजी यांस इकडे येण्यास न सांपडलें तथापि राष्ट्रीयसभा पुढें कशी चालवावी या प्रश्नाचा आपणांस यंदाच्या सालीं निर्णय करणें अवश्य आहे. राष्ट्रीयसभा कोणत्याना कोणत्या तरी रूपानें सतत चालू रहावी याबद्दल बहुधा सर्वांचें एक मत आहे. पण खर्चाचें ओझें प्रतिवर्षीं सोसण्यास अद्याप लोकांकडून जितकी तयारी असावी तितकी दिसून येत नाहीं. देशांत दारिद्र्य व अज्ञान फार असल्यामुळें त्याचा हा परिणाम असेल, बुद्धिपुरस्सर अनास्थेचा नव्हे हें आम्हीहि कबूल करितों; परंतु कोणत्याहि कारणानें कां होईना प्रतिवर्षी एवढा खर्च करण्याचें जर आपणांस सामर्थ्य नाहीं व राष्ट्रीयसभा चिरायु व्हावी अशी इच्छा आहे तर आपल्या शक्तीनुरूपच आपले हेतु सिद्धीस जाण्याचें कांहीं साधन आपणास शोधून काढलें पाहिजे. गुदस्तांच हा प्रश्न निघाला होता, परंतु दुसऱ्या कांहीं महत्त्वाच्या प्रश्नामुळें तो तसाच ठेवावा लागला व फक्त पुढील सालची (यंदाची) सभा भरवावयाची कीं नाहीं एवढाच त्यावेळीं विचार होऊन निर्णय करण्यांत आला. यंदा त्यापेक्षां एक पाऊल पुढें टाकणें जरूर आहे. व तें कोणत्या तऱ्हेनें टाकावें याचा निर्णय करणें हें मोठ्या जबाबदारीचें व जोखमाचें काम आहे. करितां या सभेस जाणाऱ्या मुक्त्यारांनीं एव्हांपासूनच त्याबद्दल आपापल्या प्रांतांत चर्चा सुरू ठेऊन या गोष्टीचा कांहींसा तरी निश्चय करून ठेवल्यास बरें पडेल.

तिसरा महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे विलायतेंतील एजन्सीचा होय. मि० डिग्बी ह्यांनीं कॉंग्रेसच्या सेक्रेटरीच्या जाग्याचा राजीनामा दिला आहे व सध्या तें काम सर डब्ल्यु वेडरबर्न व मि० ह्यूम ह्यांनीं केवळ परोपकार बुद्धीनें अंगावर घेतलें आहे. पण ही व्यवस्था किती दिवस टिकणार ? आमच्या करितां काम करण्यास योग्य वेतन देऊन जर हुषार मंडळी आम्हांस ठेवतां येत नाहीं तर

आम्ही आपले हक्काकरितां कितीसे नेटानें भांडण्यास तयार आहों, हें विलायतें-तलि कुणब्यासहि कळून येण्यासारखें आहे. राष्ट्रीयसभेसारख्या विलायतेंत पुष्कळ संस्था आहेत पण अशा रीतीनें पैशाची उणीव तेथें कोणत्याहि संस्थेस पडत असेल अंसें वाटत नाहीं. विलायतच्या एजन्सीवरोवरच पुढच्यावर्षीं विलायतेस कॉंग्रेस भरवावयाची असल्यास काय तजवीज करावयाची असा प्रश्न निघतो. कलकत्त्यास केनसाहेव यांनीं, विलायतेस कॉंग्रेस भरली तर खर्चाची तेथल्या तेथेंच तजवीज होईल असें वोलून दाखविलें होतें, पण विलायतेंतील लोक आपला आदरसत्कार करतील म्हणून आगवोटीचेहि पैसे जवळ न घेतां मुंवईस पी आणि ओ कंपनीच्या अगर मेसर्स थामस कुक आणि सन्सच्या ऑफिसांत जाऊन ' भवान् भिक्षां ददातु ' म्हणून दत्त करीत उभें राहणें शहाणपणास व सभ्यपणास उचित नाहीं. आपणांस सन १८९३ च्या मे महिन्यांत विलायतेस जर कॉंग्रेस भरवावयाची असेल तर त्या-वद्दल कांहीं तरी व्यवस्था आठव्या राष्ट्रीय सभेंतच निरानिराळ्या प्रांतांतील लोकांच्या मतें योजून ठेविली पाहिजे. " सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः " या न्यायानें पहिली तजवीज पैशाची, नंतर मुक्त्यारांची आणि नंतर येथें जाऊन काय करावयाचें आणि काय वोलावयाचें याची सारांश, या वावतींत सर्वच व्यवस्था अद्याप करावयाची राहिली आहे. किंवहुना अद्याप त्याचा फारसा विचार झालाच नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

या महत्त्वाच्या गोष्टींचा विचार यंदाच्या सालीं आपणांस अवश्य कर्तव्य आहे. इतकेंच नव्हे तर या सालांत हिंदुस्थानच्या हिंदुस्थानांत जे कांहीं महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत त्यांचाहि यंदांच विचार व्हावयास पाहिजे आहे. पहिला प्रश्न कायदेकौन्सिलाचा होय. यंदां पार्लमेंट सभेनें कायदेकौन्सिलें सुधारण्यावद्दल जो कायदा पास केला तो वऱ्याच अंशीं राष्ट्रीय सभेच्या चळ-वळीचें श्रेय होय. हा कायदा कोणत्या रीतीनें अमलांत आणावा यावद्दल हिंदु-स्थान सरकारास राष्ट्रीय सभेनें आपलें मत कळविणें जरूर आहे. पब्लिक सर्विसचा विषयहि याचप्रमाणें महत्त्वाचा आहे. वंगाल्यांत इलियट साहेवांनीं मांडलेल्या जुलमाचाहि राष्ट्रीय सभेंत थोडाबहुत विचार होईलच. शिवाय हुंडणावळीच्या भावांत वारंवार जी चलविचल होत आहे ती टाळण्यास देशांतील नाण्यांत कांहीं फरक केला पाहिजे कीं काय हाहि प्रश्न कदाचित् राष्ट्रीयसभेस ध्यावा लागेल. हे सर्व विषय सारख्याच योग्यतेचे व महत्त्वाचे आहेत. व वर ज्या तीनचार गोष्टी सांगितल्या त्या आणि हे विषय या सर्वांचें महात्म्य लक्षांत आणलें म्हणजे एक-दरींत यंदाच्या राष्ट्रीय सभेस जाणाऱ्या मुक्त्यारांनीं दरसालपेक्षां यंदा जास्त हुशारी चौकसपणा आणि देशहिताची कळकळ दाखविणें जरूर आहे, असें दिसून येईल. इतक्या गोष्टी एकसमयावच्छेदें करून पूर्वीच्या कोणत्याहि सभेपुढें आल्या होत्या असें आम्हांस वाटत नाहीं. करितां यंदाची सभा म्हटली म्हणजे

आमच्या खरोखर परीक्षेचीच वेळ आहे असें आम्हीं समजतों. व ईश्वराच्या कृपेनें ह्याहि परीक्षेंतून आम्हीं पार पडूं अशी आम्हांस उमेद आहे.

❖ ❖ ❖

* सोन्यारुप्याची लढाई

यंदाच्या राष्ट्रीयसभेमध्यें दोन चार प्रश्नांचा विचार होणें अत्यावश्यक आहे; त्यांपैकीं हिंदुस्थानांतील नाण्यासबंधाचा एक आहे. हा प्रश्न अगदीं नवा आहे असें नाहीं; बरेंच वर्षांपूर्वी त्याजविषयीं इंग्लंडांत व येथें चर्चा सुरू होती. तथापि कित्येक कारणांमुळें यंदा त्याला विशेष महत्व आलें आहे. व खुद्द सरकारालाही त्याचा विचार करणें भाग पडून लवकरच त्यासंबंधानें कांहीं तरी कायदा वगैरे होईल असा आतां रंग दिसूं लागला आहे. हा प्रश्न उद्भवण्याला मुख्य कारण सोन्यारुप्याच्या किंमतींत उत्तरोत्तर वाढत जाणारें अंतर होय. सुमारें वीस पंचवीस वर्षांपूर्वी झालेली फ्रेंच व जर्मन लोकांची लढाई आटपल्यापासून हें अंतर पडण्यास आरंभ झाला; परंतु आजपर्यंत त्याजपासून म्हणण्यासारखें नुकसान होत नव्हतें. दहा रुपयांचा पौंड म्हणजे एका रुपयाचे दोन शिलिंग हें सोन्यारुप्याचें प्रमाण जें एकदां ठरलें होतें तें १८७१ सालापासून तसेंच रहाणें अगदीं अशक्य झालें. सोन्याच्या मानानें रुप्याचा भाव उतरत चालल्याबरोबर हिंदुस्थान व इंग्लंडासारखे सोन्याचें नाणें वापरणारे देश ह्यांजमधील देवघेवीच्या व्यवहारांत घोटाळा होऊं लागला. ज्यांना ज्यांना इंग्लंडास पैसे पाठविण्याची जरूर पडते त्यांना वर्षास हुंडणवळीकरितां फाजील रक्कम भरावी लागूं लागली व तेणेंकरून त्यांचें फार नुकसान होऊं लागलें. हिंदुस्थानसरकारास 'होम चार्जेस' म्हणून दर वर्षीं तीन साडेतीन कोट रुपये पाठवावे लागतात; व ही रक्कम पौंडांत ठरली असल्यामुळें तितके पौंड इंग्लंडास पाठविण्याकरितां सरकारास पूर्वीपेक्षां जास्ती रुपये लागूं लागले; व फाजील खर्च भरून काढण्याकरितां अर्थातच मिठाच्या करासारखा त्रासदायक करांचा बोजा वाढविणें सरकारास भाग पडलें. हिंदुस्थानांतील लोक कंगाल होत चालले आहेत व इतःपर अधिक कर सोसण्याचें त्यांच्या अंगांत सामर्थ्य उरलें नाहीं हें सरकारासहि माहीत आहे व कित्येक वेळां त्यांनीं ती गोष्ट उघडपणें कबूलहि केली आहे. असें असून निरुपायास्तव त्यांना कराचें ओझें वाढवावें लागतें. ह्याला कारण अर्थात् ही हुंडणावळ होय. तसेंच युरोपियन कामदारांना इंग्लंडास पैसे पाठवावे लागतात त्यांचेंहि ह्या हुंडणावळीमुळें नुकसान होतें त्यामुळें.

* [ता. २९ नोव्हेंबर १८९२]

आपला पगार वाढविण्याविषयीं त्यांनीं दोनतीन वर्षांपासून सरकारच्या पाठीमागें दुमणें लाविलें आहे; व त्यांचा वशिला थेट स्टेटसेक्रेटरीपर्यंत पोंचत असल्यानें पुढें मागें त्यांचें मागणें थोड्याबहुत अंशानें तरी कबूल होईल अशी भीति वांटण्यास आतां कारणें दिसूं लागलीं आहेत. सध्यांच खोऱ्यांनीं पगार ओढणाऱ्या ह्या गोऱ्या जावयांचे खिसे भरतां भरतां विचाऱ्या हिंदुस्थानवासी प्रजेचे नाकीं नव आले आहेत तेव्हां त्यांचे आणखी पगार वाढविणें म्हणजे कराच्या ओझ्यानें आधींच भारावलेल्या हिंदुस्थानांतील लोकांस पुरते जमीनदोस्त करणें होय. येथील लोक सरकार बसवील तो कर निमूटपणें सोसण्यास तयार असतात खरे, पण त्यांच्या ऐपतीस कांहीं तरी सीमा आहे. ऊंस गोड लागला म्हणून मुळासकट खाणें कधींहि रास्त होणार नाहीं. सबब गोऱ्या नोकरांचे पगार वाढविण्यासारखें धडधडीत अन्यायाचें कृत्य सरकार उघडपणें करण्यास धजावेल असें वाटत नाहीं. हें समजूनच त्यांनीं आतां सोन्याचें नाणें सुरू करावें अशी आतां शक्कल काढली आहे. सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत सुरू करावें ही सूचना कांहीं नवी नाहीं, तरी ती ज्या रूपानें आज पुढें आली आहे त्यावरून ती करणारांचे खरे उद्देश व्यक्त होत नसल्यामुळें पुष्कळ लोक फसण्याचा संभव आहे व त्याप्रमाणें प्रथम कित्येक लोकांना ती पसंताहि पडली. इंडियन करन्सी असोसिएशननें केलेली ही सूचना दिसण्यांत फायदेशीर दिसत होती खरी, पण वादविवादांतीं ती अत्यंत अहितकारक आहे, इतकेंच नाहीं तर पूर्वीच्या पगार वाढविण्याच्या मागणीपेक्षां ही अधिक अप्पलपोटेपणाची आहे असें आतां कळून आलें आहे. सोन्याचें नाणें काय किंवा सोन्याच्या भारानें रुपयांची किंमत ठरविणें काय ह्या दोन्ही प्रकारांनीं हिंदुस्थानाचें फार नुकसान होणार ही गोष्ट उंटावरून शेळ्या हांकणाऱ्या इंग्लंडांतील स्टेट सेक्रेटरीच्या लक्षांत सध्यां आली आहे किंवा पुढें येईल असें वाटत नाहीं, व हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचें तर तिजकडे दुर्लक्ष करण्यांत हितच आहे. अर्थात् लोकांनीं आपण होऊन ओरड केल्याखेरीज सध्यांच्या वादांत त्यांची दाद लागेल असें दिसत नाहीं. इंग्लंडचे प्रस्तुतचे हाय चान्सेलर लॉर्ड हर्शेल ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ह्या प्रश्नाचा निकाल करण्याकरितां हल्लीं जी कमिटी बसली आहे तींतील सर्व सभासद इंग्रज व अभिप्राय देणारेहि सर्व इंग्रजच; तेव्हां हिंदुस्थानांतील लोकांच्या नफानुकसानाचा त्यांच्या कडून कितपत विचार होईल हें उघड दिसतेंच आहे. ह्या लोकांपैकीं बरेच पूर्वीपासून सोन्याचें नाणें हवें म्हणणारे आहेत, व बाकीच्यांचें केवळ इंग्लंडच्या हिताहिताकडे लक्ष आहे. तेव्हां इंग्लंडच्या व्यापारास धक्का न लागतां येथील युरोपियन नोकरांचा व व्यापाऱ्यांचा फायदा होईल अशी एखादी शक्कल निघाल्यास ती अमलांत येईल यांत शंका नाहीं. मग तिच्या योगानें येथील प्रजेस कितीहि नुकसान सोसावें लागत असलें

तरी चालेल. ह्यावरून प्रस्तुत नाण्याचा प्रश्न किती महत्त्वाचा आहे व त्याविषयीं तावडतोब लोकांनीं आपलें मत प्रदर्शित न केल्यास किती हानि होण्याचा संभव आहे हें लक्षांत येईल.

सदर्हू प्रश्न फार वादग्रस्त व बिकट आहे खरा, परंतु केवळ हिंदुस्थानासंबंधानेंच निर्णय करण्याकरितां फार खोल जाण्याची जरूर नाहीं. मुख्य मुख्य मुद्दे आजपर्यंतच्या वादविवादांत स्पष्ट झालेच आहेत, व तेवढ्यांकडेच लक्ष दिलें तरी प्रत्येक समजदार मनुष्यास ह्यासंबंधानें स्वमत देतां येणार आहे. दुर्दैवानें असल्या महत्त्वाच्या पण गहन विषयांत डोकें घालून धैर्यानें आपली बाजू लोकांपुढें मांडण्यापुरती इच्छा किंवा शक्ति आमच्यापैकीं फारच थोड्यांच्या आंगीं आढळते. त्यामुळें सध्यांच्या वादांत युरोपियनांपैकीं अनेक पक्षांचे लोक आपआपली बाजू प्रतिपादित असतां आम्ही अगदीं मौन धरून असलों आहों ही गोष्ट आम्हांतील विद्वान् पुढाऱ्यांस जितकी लाजिरवाणी आहे तितकीच ती पुढें लोकांच्या भावी नुकसानास कारण होणार आहे हें वेळींच त्यांनीं लक्षांत आणावयास पाहिजे. सरकारानें कायदा केल्यानंतर मागून त्यांच्या नांवानें खडे फोडीत बसण्यापेक्षां अगोदरच आपली बाजू त्याजपुढें मांडावी, हा उत्तम पक्ष होय. सबब येत्या कॉंग्रेसपूर्वी या विषयाचा लोकांमध्यें नीट खल होऊन तेथें ह्या संबंधानें एकादा स्पष्ट ठराव होईल अशी आम्हांस आशा आहे.

कांहीं आठवड्यांपूर्वी ह्याविषयाची वाचकांस आम्हीं साधारणपणें ओळख करून दिलीच असल्यामुळें पुनः त्याच मुद्यांची येथें द्विरुक्ति करण्याची जरूर नाहीं. आमच्या मागील लेखांवरून सोन्यारुप्याच्या नाण्यांचा परस्पर संबंध, त्यांच्या किंमतींत अंतर पाडणारीं कारणें, त्यांचा व्यापाराशीं संबंध व हुंडणावळीमुळें होणारें नफा नुकसान वगैरे गोष्टी स्पष्ट झाल्याच आहेत, तेव्हां सोन्याचें नाणें येथें सुरू केल्यानें आमचा कोणत्याहि रीतीचा फायदा नाहीं, पण उलट नुकसान आहे हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. हा विषय मराठी वाचकांना अगदीं नवीन असल्यामुळें त्या वेळेस आम्हांला अंमळ सविस्तर विवेचन करावें लागलें; परंतु हल्लीं सरकारापुढें सोन्याच्या नाण्यासंबंधानें जी सूचना आहे तिची परीक्षा करण्यास इतकें खोल जाण्याची जरूर नाहीं. दोनचार मुद्याच्या गोष्टी ध्यानांत ठेवल्या म्हणजे पुरे. ती सूचना अशी आहे कीं, हिंदुस्थानांत हल्लीं जो रुपया चालतो तसाच चालू ठेवावा, पण त्याची पौंडानें कायमची किंमत ठरवून टाकावी. अर्थात् सोन्यारुप्याच्या किंमतीचें प्रमाण ठरवून टाकावें. तेणेंकरून पौंड रुपयांची अदलाबदल करतांना जी कमी जास्ती हुंडणावळ पडते ती टळेल, व व्यापाराला स्थैर्य येऊन अधिक फायदा होईल असें मॅकेप्रभृति करन्सी असोसिएशनच्या पुरस्कर्त्यांनीं मत प्रतिपादन केलें आहे. पण अशा रीतीनें नाण्याची किंमत ठरवून टाकणें एक तर अर्थशास्त्राच्या सामान्य

नियमाविरुद्ध आहे, व दुसरें इंग्लंडचा व आपल्या देशाचा संबंध चमत्कारिक असल्यामुळें रुप्याचा दर त्याच्या खऱ्या किंमतीपेक्षां कायद्यानें जास्ती ठरविल्यास हिंदुस्थान देशाचें नुकसान होणार आहे. ही दुसरी गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. सबब एक दोन उदाहरणांनीं ती स्पष्ट करण्याचा विचार आहे. आजपर्यंत रुपयाची किंमत दोन शिलिंग होती पण अलीकडे रुपें फार स्वस्त झाल्यामुळें म्हणा कीं सोनें महाग झाल्यामुळें म्हणा ती उतरत उतरत एक शिलिंग अडीच पेन्सांपर्यंत पोंचली आहे म्हणजे पूर्वीच्या हिशोबानें रुपयाचे पौंडाच्या भावानें हल्लीं साडेनऊ आणे येतात. इतःपर रुपयास दोन शिलिंग मिळणें तर दुरापास्तच आहे, परंतु हल्लींचाच भाव कायम राहूं देणें किंवा आणखी उतरूं देणें हें व्यापाऱ्यांना व इतर सोन्यारुप्याचा व्यवहार करणाऱ्या लोकांना फार हानिकारक आहे. तेव्हां मॅकेप्रभृतींनीं अशी तडजोड सुचविली आहे कीं, रुपयाची पूर्वीची किंमत २४ पेन्स व हल्लींची १४॥ पेन्स ह्यांच्या मधलीच कोणती तरी म्हणजे १८ किंवा २० पेन्स ठरवावी व रुप्याचा भाव कसाहि कमी जास्त असला तरी रुपया नेहमीं २० पेन्सांसच विकावा असा कायदा करावा, म्हणजे चार पांच पेन्सांनीं रुपयाची कृत्रिम किंमत वाढवावी. अर्थात् टांकसाळींत रुपें पाठवून फुकट रुपये पाडवून आणण्याची हल्लीं जी सर्वांना मोकळीक आहे ती काढून घ्यावी लागेल. नाहीं तर १४ पेन्सांचें रुपें घेऊन त्याचा २० पेन्सांचा रुपया करणें हा एक व्यापारच सुरू होईल. आतां घटकाभर अशी कल्पना करा कीं, ह्या सद्गृहस्थांच्या म्हणण्याप्रमाणें सरकारानें वरच्यासारखा कायदा केला, तर त्यापासून निरनिराळ्या लोकांचा कसकसा नफा तोटा होईल तें पाहूं.

सरकारी नोकरांचा तेणेंकरून फायदा होईल हें तर सांगावयाला नकोच, कारण तसें नसतें तर हीं युक्ति त्यांच्या डोक्यांतून कधींहि बाहेर पडली नसती-नांवाला त्यांचा दरमहा पगार तितकाच राहिला, तरी त्या पगारांतील प्रत्येक रुपयाची किंमत वाढविणें म्हणजे पगारच वाढविण्यासारखें आहे. चौदा पेन्स किंमतीचे दरमहा १००० रुपये, मिळविणाऱ्या असिस्टंट कलेक्टरास तेच हजार रुपये रुपयांची किंमत २० पेन्स केल्यास, १४२५ रुपयांच्या जागीं होतील. म्हणजे सव्वाचारशें रुपये किंवा शेंकडा ४३ टक्के त्याचा पगारच वाढला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्यावरून रुपयाची किंमत ठरवून घेण्याकरितां युरोपियन कामदार लोक इतकी कां खटपट करीत आहेत हें लक्षांत येईल.

आतां हा अप्रत्यक्ष रीतीनें वाढलेला पगार भरून काढावयाचा कसा ? अर्थात् रयतेच्या पैशांतून व तोहि अप्रत्यक्ष रीतीनेंच. सरकारापासून रुपये घेणाऱ्या नोकरांचा जसा फायदा झाला तितक्याच अंशानें सरकारला पैसा देणाऱ्या शेतकरी लोकांचें नुकसान आहे ही गोष्ट कोणालाहि समजण्यासारखी आहे. समजा, एक शेतकरी १०० रुपये म्हणजे १४०० पेन्स सारा भरतो. हा कायम

झाल्यानंतरहि त्याला १०० रुपयेच द्यावे लागतील हें खरें, पण त्या शंभरांची किंमत २००० पेन्स म्हणजे पूर्वीच्या मानानें १४३ रुपये आहे. अर्थात् पूर्वीपेक्षां ४३ रुपये सारा त्याला जास्ती द्यावा लागेल. ही फाजील रक्कम तो आणतो कोठून ? अर्थात् जास्ती धान्य विकून. म्हणजे सारा वारण्याकरितां पूर्वी जेथें त्याला १०० रुपयांचें धान्य विकावें लागे तेथें आतां त्याला १४३ रुपयांचें विकावें लागतें. पूर्वी जर तो गव्हाच्या पंचवीस गोण्या विकून सारा भरी तर आतां त्याला पसतीस विकल्या पाहिजेत. तात्पर्य, रुपयामागें वाढलेले जे सहा पेन्स ते भरून काढण्याकरितां त्याला दहा गोण्या जास्त द्याव्या लागल्या. अशा रीतीनें प्रत्येक शेतकऱ्याच्या डोक्यावरील अप्रत्यक्ष कराचा बोजा ४३ टक्क्यांनीं वाढतो. आधींच दारिद्र्यानें गांजलेल्या शेतकऱ्यानें हा फाजील कर कसा सोसावा ह्याचा सरकारानें विचार केला आहे काय ?

पण एवढ्यानेंच त्याचें दुःख संपतें तरी पुरवतें. मागील लेखांत आम्ही विस्तृत रीतीनें सिद्ध केलें आहे कीं, नाण्याची किंमत वाढली कीं इतर जिनसांचा भाव उतरलाच पाहिजे कारण तीं दोन्ही परस्पर सापेक्ष आहेत. रुपयाची किंमत दीडपट झाली कीं त्यानें विकत घ्यावयाच्या धान्याची किंमत दोन तृतीयांश होणार हें उघड आहे. तेव्हां कायद्यानें रुपयाची किंमत वाढविणें म्हणजे शेतकऱ्यांपाशीं असलेल्या सर्व धान्याचा बाजार भाव एकदम उतरून तितकें त्यांचें नुकसान करण्यासारखेंच आहे. पूर्वी एका गोणीला चार रुपये म्हणजे ५६ पेन्स मिळत तर आतां त्याच गोणीला पावणेतीन रुपयेच मिळतील. सारांश, रुपयाची कृत्रिम किंमत वाढविल्यानें शेतकऱ्यांना कर अधिक द्यावा, इतकेंच नाहीं, तर त्याची प्राप्तीहि कमी होईल. इकडे सरकार देणें वाढलें व तिकडे प्राप्ति कमी झाली अशा स्थितींत त्या बिचाऱ्यानें मुलामाणसांचें पोषण करून काळ कसा कंठावा ह्याचा कोणींच विचार केल्याचें दिसत नाहीं.

गरीब बिचारा शेतकरी अशिक्षित व मुखदुर्बळ तेव्हां त्याला आपलीं गाऱ्हाणीं सरकारापुढें मांडतां येत नाहींत. लोकांचे पुढारी म्हणविणारे विद्वान् महा विद्वान् पंडित आहेत त्यांना शुष्कवादांत कालक्षेप करण्याची हौस वाटते. पण प्रस्तुत नाण्यासंबंधाच्या प्रश्नासारख्या बिकट विषयावर परिश्रम करून लोकांची बाजू सरकारापुढें मांडण्याची बुद्धि होत नाहीं. तेव्हां सरकाराला खरी स्थिति कळावी कशी ? व लोकांच्या उरावर ही जी मोठी धोंड पडूं पहात आहे तिचें निराकरण व्हावें कसें ? गोऱ्या नोकरांचें नुकसान होऊं लागलें म्हणून त्यांनीं चळवळ सुरू केली, अर्जावर अर्ज धाडले, व खुद्द पार्लमेंटापर्यंत दाद लावली. शेवटीं स्टेट सेक्रेटरीला ह्या प्रश्नाचा विचार करणें भाग पडून एक कमिटी नेमली. पण आम्हीं आपले स्वस्थ ते स्वस्थच. नाणें आणि हुंडणावळ हें काय गौडबंगाल आहे म्हणून तोंडांत बोटें घालून मजा पहात बसलों आहोंत. सोन्याचें नाणें

किंवा सोन्याच्या भावानें रुपये येथें एकदां सुरू झाले म्हणजे आमचे डोळे उघडतील खरे, पण मग पश्चादूबुद्धि ब्राह्मणाप्रमाणें गेल्याचा वृथा शोक करीत बसण्यापलीकडे आमच्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. म्हणावयाला येथील औद्योगिकपरिषदेनें ह्या विषयासंबंधानें स्टेट सेक्रेटरीकडे एक अर्ज पाठविला आहे. पण एवढा अपवाद वगळला तर चोहोंकडे अंधार व सामसूम. असो; वेळच्यावेळीं आपल्या हक्काला जपण्याची विद्या आम्हांला अजून शिकावयाची आहे; तो काळ केव्हां येईल तो येवो.

❁ ❁ ❁

हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें लागेल काय ?

गेल्या मार्च महिन्यांत राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी मि. ह्यूम यांनीं जीं दोन सर्क्युलरें प्रसिद्ध केलीं होतीं त्यांत ' हल्लीं शेतकऱ्यांची जी स्थिति आहे तशीच कायम राहिल्यास लवकरच ते बंड करण्यास उद्युक्त होतील व एकदां जागोजाग अशा रीतीनें दंगेधोपे होऊं लागले म्हणजे त्यांत सरकार, जमिनदार, शिकलेले गृहस्थ वगैरे कांहीं एक भेदाभेद न होतां सर्वजण सारखेंच बळी पडतील ' असा इशारा व भाकीत करून त्याबद्दल कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं व सरकारनें वेळींच योग्य उपाय करण्यास प्रवृत्त व्हावें अशी त्यांस विनंति केली होती. ह्यूम साहेबांचें हें सर्क्युलर खासगी होतें तरी कांहीं धूर्त व उपद्यापी इंग्रजी वर्तमानपत्रकारांनीं तें प्रसिद्ध करून खुद्द राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी, लोकांस बंड करण्यास प्रवृत्त करतात असा त्यांजवर आरोप आणला होता; व म्याक्लीन-सारख्या त्या वेळच्या पार्लमेंटांतील सभासदांनीं तर ह्यूम साहेबांस फांशी द्यावें अगर गोळी घालून मारावें असेंहि भरसभेंत बोलून दाखविलें होतें ! ह्यूम साहेबांचें हें कडकडीत सर्क्युलर आणि त्यावरील इंग्रजी वर्तमानपत्रकारांचे प्रतिकूल अभिप्राय हे जेव्हां प्रथमतः आमच्या मंडळींच्या नजरेस आले तेव्हां त्यांचीहि पांचावर धारण बसली. अलाहाबाद कमेटीनें सदर सर्क्युलराचा उघड निषेध करून त्याबद्दल आपलें प्रतिकूल मत प्रदर्शित केलें व तिचे मागोमाग मुंबई व मद्रास येथील कमिट्यांनींहि तोच मार्ग स्वीकारला. खुद्द विलायतेच्या कमिटींतहि ह्यूमसाहेबांस जितकें पाठबळ मिळेल असें वाटत होतें तितकें मिळालें नाहीं. हें राजद्रोही सर्क्युलर आपणांस पसंत नाहीं असें कित्येकांनीं

---

* [केसरी—ता. ६ डिसेंबर १८९२]

मत दिलें व कांहीं थोडेजण मात्र ह्यूमसाहेबांस पाठबळ देण्यास तयार झाले. सारांश, या सर्क्युलरानें कॉंग्रेसच्या संस्थेंतहि कांहीं धक्का पोंचतो कीं काय अशी सर्वत्रांस क्षणभर भीति वाटली होती; परंतु लवकरच सुदैवानें तो विषय व तें सर्क्युलर लोकांच्या नजरेपुढचें नाहींसें झालें. सरकारनें त्याबद्दल कांहीं एक विचारपूस केली नाहीं इतकेंच नव्हे, तर खुद्द इंग्लंडचे माजी प्रधान लॉर्ड सॉलिसबरी यांच्याहि तोंडांतून आयर्लंडाबद्दल अशाच तऱ्हेचे उद्गार बाहेर पडले, आणि दोनचार महिन्यांतच पुनः जिकडे तिकडे सामसूम झालें. मात्र आमच्या लोकांनीं ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं जो भेकडपणा दाखविला तेवढाच पुढेंमागें राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत कायम राहिलेला दृष्टीस येणार आहे.

आज या गोष्टीस आठ महिने होऊन गेले आणि यंदाची राष्ट्रीय सभा भरण्याची[1] वेळहि जवळ येऊन ठेपली आहे. अशा प्रसंगीं या विषयाचें पुनः स्मरण होण्याचें कारण असें कीं, मुंबई येथील राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी मि० दिनशा एदलजी वाछा यांनीं ह्यूम साहेबांचें सर्क्यूलर साधार व सप्रमाण होतें असें दाखविण्यासाठीं सेक्रेटरी ऑफ स्टेटपासून कलेक्टरापर्यंत निरनिराळ्या सरकारी कामदारांचें वेळोवेळीं रिपोर्टांतून त्या त्या प्रसंगीं विलायतेंत टाइम्स, स्पेक्टेटर वगैरे वर्तमानपत्रांतून आलेले लेख आणि कांहीं नान-ऑफिशियल लोकांचीं मतें मिळून सर्व एकत्र करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं आहेत. ह्यूम साहेबांचें सर्क्यूलर निघालें तेव्हां मुंबई कमिटीनें त्यावर जो अभिप्राय दिला त्यावरून सदर सर्क्यूलराचें इतक्या चांगल्या रीतीनें मुंबईंतील गृहस्थांकडूनच समर्थन होईल असें वाटत नव्हतें; परंतु मि. वाछा यांनीं बाजू संभाळून अगदीं योग्य वेळीं यंदाची राष्ट्रीय सभा होण्याच्या सुमारासच आपला हा लेख प्रसिद्ध केला व राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरींनीं काढिलेलें खाजगी सर्क्युलर अगदीं यथार्थ व सप्रमाण आहे असें सरकारी कागदपत्रांवरून सिद्ध करून दिलें, याबद्दल आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतों. यंदाच्या वर्षीं राष्ट्रीय सभेच्या संबंधानें महत्त्वाच्या म्हणून ज्या कांहीं दहापांच गोष्टी घडल्या त्यांपैकीं सदर सर्क्यूलरही एक असून त्याचें पुष्टीकरणार्थ आपल्याजवळ कोणता पुरावा आहे, हें प्रत्येक मुक्त्यारास अलाहाबादेस जाण्यापूर्वीं माहित करून घेणें अवश्य होतें. तेव्हां मि. वाछा यांनीं ही माहिती अगदीं योग्य वेळेवर प्रसिद्ध केली असें म्हटलें पाहिजे. ह्यूम साहेबांचें सर्क्यूलर तुम्हांस कसें काय वाटतें असा एखाद्या मुक्त्यारानें दुसऱ्यास प्रश्न केल्यास आतां कोणासहि तोंड खालीं घालून भेकडपणा दाखविण्याची जरूर नाहीं.

हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांची स्थिति उत्तरोत्तर किती व कशी वाईट होत चालली आहे याचें अनुमान देशांत असलेल्या शांततेवरून अगर विलायतेस प्रतिवर्षीं कोट्यवधि रुपयांचा जो माल जातो त्यावरून जर कोणी करूं म्हणेल तर

तें अगदीं चुकीचें आहे. देशांत लढाया, दंगेधोपे वगैरे पूर्वीप्रमाणें आतां होत नाहींत, पेंढार नाहींसें झालें, ठगी निर्मूल झाली, व चोरट्यांचा उपद्रव कमी झाला या गोष्टी अगदीं निर्विवाद आहेत. त्याचप्रमाणें देशांत सडका, आग-गाड्या वगैरे होऊन इकडचा माल तिकडे जाऊं लागला, व सर्वत्र धान्याचा एकच भाव झाला, हेंहि खरें, पण त्याचबरोबर शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्या-साठीं व त्यांस सावकारांच्या कर्जांतून मुक्त करण्यासाठीं कोणकोणते उपाय योजावे, ह्याची चौकशी करण्यास सरकारांतून कमिशन नेमलें जाऊन त्याचा रिपोर्टहि प्रसिद्ध झाला आहे, ही गोष्ट आपणांस लक्षांत ठेविली पाहिजे.

अमेरिका आणि हिंदुस्थान या दोन देशांची स्थिति अगदीं भिन्न आहे. नव्या खंडांत जमीन मुबलक व माणसें थोडीं, अशी स्थिति असल्यामुळें कोणासहि लागेल तितकें अर्थार्जन करण्यास पूर्ण साधनें आहेत. जामिनीची म्हणून तूट नाहीं, मनुष्य करील तितकी मेहनत थोडी, असा तिकडे प्रकार आहे; आणि जमीनहि अगदीं नव्या दमाची म्हणजे पूर्वीं कधींहि न वाहिलेली असल्यामुळें अमेरिकेंतील लोक मोठ्या झपाट्यानें द्रव्यार्जन करीत आहेत; परंतु आमचेकडे म्हणजे ज्या देशांत आर्य लोकांची वसाहत होऊन आज कमींत कमी पांचसहा हजार वर्षें झालीं, तेथला प्रकार अमेरिकेहून अर्थातच अत्यंत भिन्न आहे; व विशेषेंकरून इंग्रजी राज्यांतील सुखशांततेखालीं तर हा भेद अधिकाधिकच बळा-वत चालला आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक चांगली जमीन आज हजारों वर्षांच्या लागवडीनें निरस व निसत्व होत चालला आहे. राब, कवळठा, शेण, वगैरे खताचे पदार्थ उत्तरेत्तर जंगलाच्या त्रासानें आणि गायरानांच्या अभावानें दुर्मिळ होत चालले आहेत. देशांतील लोकांनीं परदेशगमन करावें तर तशी त्यांस संवय नाहीं व सोयहि नाहीं; आणि इंग्रजसरकारच्या शांत अमलाखालीं लोक-संख्या उत्तरोत्तर झपाट्यानें वाढत चालली आहे. व्यापारधंद्यांत कांहीं माणसें गुंतून राहिलीं असतीं, पण त्यांतील किफायतीचा बहुतेक भाग परदेशस्थ लोकांनीं उचलल्यामुळें तिकडूनहि कांहीं तरणोपाय राहिला नाहीं. जवळ सांचवलेली पुंजी होती नव्हती ती सर्व संपून गेली; आणि दुष्काळाचें साल आलें असतां महिना पंधरा दिवस तरी गेल्या सालाचे दाणे पुरतील असे शेतकरी शेंकडा पांच सांप-डणें कठीण आहे. इंग्रजसरकारच्या अमलांतील शांतता अगदीं तारीफ करण्या-सारखी अवर्णनीय खरी; परंतु ती शांतता विकत घेण्याकरितां आम्हांस आपल्या भाकरीपैकीं अर्धी भाकर मोठमोठ्या इंग्रजी कामगारांच्या अगर गोऱ्या शिपा-यांच्या भरीस घालून अर्काटच्या वेढ्यांत ज्याप्रमाणें तांदूळ सोल्जरांस आणि पेज नेटिवशिपायांस खाऊन रहाण्याचा प्रसंग आला होता तसा अर्धपोटीं अगर एका जेवणानें दिवस काढण्याचा हिंदुस्थानच्या कोट्यवधि प्रजेवर प्रसंग येऊन ठेपला आहे ! सन १८९१ सालीं जी खानेसुमारी झाली त्यावरून असें आढळून येतें

कीं, लोकसंख्येचें मान सरासरीनें दर चौरस मैलास २० या प्रमाणानें सर्व हिंदुस्थानभर १८८१ पासून १८९१ पर्यंतच्या दहा सालांत वाढलें आहे; परंतु लागवडीची जमीन त्या मानानें वाढली नाहीं. तिकडे राज्याचा खर्च उत्तरोत्तर एकसारखा वाढत चालला आहे; अर्थात् त्याच मानानें रयतेवरचें कराचें ओझेंहि वाढत चाललें आहे हें सरकारी रिपोर्टावरून प्रत्यक्ष होत आहे. वाढती लोकसंख्या, बुडता व्यापार, सरकारचा अवाढव्य होत असलेला खर्च, आणि उत्तरोत्तर निसत्व होत चाललेली जमीन, यामुळें हिंदुस्थानची इंग्रजी राज्याखालीं काय स्थिति होईल याची कोणाहि विचारी मनुष्यास सहज भीति पडेल. हिंदुस्थानांतून प्रतिवर्षीं जास्त जास्त माल परदेशास जाऊं लागला तर त्यांत समाधान मानण्याचें कांहीं एक कारण नाहीं. या मालाच्या मोबदला माल आम्हांस येत असता तर गोष्ट निराळी, परंतु कोट्यावधि रुपयांच्या मालाबद्दल युरोपियन लोकांची व सोल्जरांची नोकरी, हाच जेथें आम्हांस मोबदला मिळतो, तेथें सदर नोकरीचा व त्यापासून निष्पन्न होणाऱ्या शांततेचा उपभोग घेण्यासाठीं आम्ही आपल्या खुषीनें अगर जुलमानें आमच्या पुढील वाढलेल्या ताटांतील भाकरीचा जास्त जास्त भाग विलायतेस रवाना करतों, असेंच म्हटलें पाहिजे. ही उपासमार आम्ही आणखी किती दिवस काढणार याचें भाकीत करणें मोठें कठीण आहे. शेतकऱ्याची स्थिति सुधारण्याचे उपाय सुचविण्यासाठीं जें कमिशन नेमलें होतें, त्या कमिशनानें शेतकऱ्यांच्या कायद्यांत कांहीं फेरफार करावे व सावकारास फाजील व्याज मिळूं देऊं नये अशा कांहीं सूचना केल्या आहेत; परंतु हे वरकर्णी उपाय काय कामाचे. खुद्द कमिशनर लोकांनींहि या उपायांस तूर्तातूर्तचे उपाय असें म्हटलें आहे, व फार झालें तर आजचें मरण उद्यांवर टाकण्यापलीकडे त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं. साऱ्या राष्ट्रांस व विशेषेंकरून शेतकरी लोकांस जो किडा लागला आहे त्याचें निराकरण असल्या उपायांनीं कसें होणार ? शेतकीची निष्कृष्टावस्था म्हणजे आमच्यासारख्यांस साऱ्या राष्ट्राचीच निकृष्टावस्था होय. आम्ही इंग्रज सरकारच्या चातुर्यास, वैभवास आणि कर्तबगारीस, दुवा देऊन त्यांचे गुण गाऊं व त्यांचेंच राज्य चिरकाल हिंदुस्थानावर राहो अशी इच्छा बाळगूं, पण दुपारची वेळ कठीण आहे. राष्ट्रांतील लोकांस पुरें इतकें धान्य देशांतल्या देशांत उत्पन्न होण्याची पंचाईत पडूं लागली व इतर उद्योगधंदे करून त्यांत उत्पन्न झालेला माल परदेशीं नेऊन त्याचा मोबदला त्या देशांतून इकडे धान्य आणण्याची सोयहि नाहींशी झाली म्हणजे वेळ कठीण आहे. राष्ट्रांतील हजारों अथवा कोट्यावधि शेतकरी केवळ इंग्रज सरकारचें राज्य सुखशांततेचें आहे म्हणून दुष्काळ आल्याबरोबरच सुखानें मरण्यास तयार होतील असें नाहीं. अथवा निरुपयोगी झालेल्या घोड्याप्रमाणें सरकारचे हातूनहि त्यांस गोळी घालून संसारया-

तनेंतून मुक्त करण्याचें घारिष्ट व्हावयाचें नाहीं. मग हे लोक करणार काय ? एकदां हें भिकार देशावर अनावर सुटलें म्हणजे मग लक्षावधि बागनेटांनींहि त्यांचा प्रतिकार होणें अशक्य आहे. जिकडे तिकडे एकच कल्होळ होईल आणि या झंझावातापुढें लहान मोठीं सर्व झाडें हयूमसाहेबांनीं आपल्या सर्क्युलरांत लिहिल्याप्रमाणें जमीनदोस्त होतील ! आमच्या सरकारास रशियाचें भय नसेल, नेटिव राजांपैकीं कोणीही आपलें डोकें वर उचलण्याजोगा राहिला नाहीं व इंग्रजी शिक्षणानें जी नवी मंडळी तयार होत आहे तीहि इंग्रजी राज्याचें मनापासून चिरस्थायित्व इच्छिणारी आहे; परंतु या सर्व गोष्टी अनुकूल असल्या तरी प्रति-वर्षास वाढत जाणाऱ्या शेतकरी लोकांची पुढें काय स्थिति होणार या भयंकर प्रश्नाचा त्यानें कांहीं निकाल लागत नाहीं. हिंदुस्थानसरकारास किंबहुना इंग्रजी अमलास जीं कांहीं भारीं संकटें आहेत त्यांपैकीं हें पाहिल्या नंबरचें होय. वायव्य प्रांतांच्या सरहद्दीवरील किल्ले कितीहि मजबूत केले, युरोपियन लष्कर कितीहि तयार ठेविलें, अगर लष्करी रेल्वे कितीहि वाढाविल्या, तरी त्याचा हें संकट टाळण्यास यत्किंचितहि उपयोग होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. राजा अगर राज्यव्यवस्था कितीहि सुरळीत असली तरी उपासानें मरणाऱ्या प्रजेस आपले संकटांचें सर्व कारण या सदर व्यवस्थेंतच आहे, असें वाटणें अगदीं स्वाभावि-कच आहे; आणि वस्तुतः पहातां इंग्रजी राज्यपद्धतीनें व त्यांतील सुखशांततेनेंच ही स्थिति आमच्या देशास कांहीं अंशीं आली आहे, हें निर्विवाद आहे, मग त्याचा वेळींच प्रतिकार करण्याचें टाकून हयूम साहेबांनीं अमुक एक सर्क्युलर काढलें म्हणून त्यांस शिव्या दे, अगर शेतकी कमिशनानें मुंबई इलाख्यांतील सारा घेण्याच्या पद्धतींत फेरफार करावा असें सुचविलें म्हणून त्याच्यावर तोंड सोड हें शहाणपण कोठलें ?

आतां वर लिहिलेली स्थिति यथार्थ आहे कीं,नाहीं असा कोणीं प्रश्न केल्यास तो अगदींच गैरशिस्त आहे असें म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानच्या रयतेची खरी स्थिति काय आहे याची पूर्ण माहिती अगर अनुभव पुष्कळांस आला नसेल व त्यास वरील हकीकत ऐकून अगर वाचून थोडाबहुत विस्मय वाटणेंहि अगदीं साहाजिक आहे. मि. वाछा यांनीं सरकारी रिपोर्टांवरून वगैरे जी माहिती गोळा केली आहे ती अशा गृहस्थांचें समाधान करण्यास फार उपयोगी आहे. मि. हयूम अगर दुसरे कोणीहि गृहस्थ शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल ओरड करूं लागले म्हणून त्यांस दोष देत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. डोळ्यावर कातडें ओढल्यानें ही स्थिति सुधारावयाची नाहीं अगर त्यांत कांहीं फेरबदलहि व्हावयाचा नाहीं. खरोखर वस्तुस्थिति काय आहे हें समजून घेण्याची इच्छा प्रत्येकानें धरली पाहिजे. मि. हयूम यांनीं ज्या गोष्टी आपणांपुढें मांडल्या आहेत त्याच ह्यापूर्वी अनेक प्रसंगीं सरकारच्या बड्या बड्या कामगारांनीं व इतर गृह-

स्थांनीं आपल्या लेखांत स्पष्ट लिहिल्या आहेत. हे सर्व उतारे एकत्र करून आजपर्यंत कोणीं प्रसिद्ध केले नव्हते ते मि. वाछा यांनीं आतां लोकांपुढें मांडले आहेत. यांतील कांहींकांचा सारांश पुढील खेपेस देऊन हा लेख संपवूं.

❖ ❖ ❖

*हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें लागेल काय ?

गेल्या खेपेस मि. वाछा यांच्या निबंधांतील थोडासा सारांश दिला होता. त्यावरून एकंदर हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिति उत्तरोत्तर कसकशी निकृष्ट होत चालली आहे हें लक्षांत येईल. रा. ब. रानडे यांनीं कांहीं महिन्यापूर्वी डेक्कन कॉलेज ग्यादरिंगपुढें जो निबंध वाचला होता, त्यांतहि सामान्यतः हिंदुस्थान देशासंबंधानें अशाच तऱ्हेचे उद्गार आहेत. सदरील निबंध शेतकऱ्यांस विशेष अनुलक्षून नसल्यामुळें त्यांत शेतकऱ्यांच्या स्थितीचें जितकें सविस्तर वर्णन यावें तितकें आलें नाहीं हें खरें आहे; तथापि हिंदुस्थानची व इतर देशांची तुलना करून इतर देशांस हितकारक होणारे अर्थशास्त्राचे नियम आपल्या देशास कां लागू करूं नयेत, याबद्दल रावबहादुरांनीं जीं कारणें दाखविलीं आहेत, तीं हिंदुस्थान देशांतील शेंकडा ८०—९० लोकांचा शेतकी हाच धंदा असल्यामुळें, शेतकऱ्यांस व एकंदर देशांतील लोकांस सारखींच लागू पडतात. व्यापारधंदा बुडाला, अथवा बुडत चालला आहे, लोकसंख्येचें मान प्रतिवर्षीं वाढत चाल-ल्यामुळें नांगराखालील जमिनीचें उत्पन्न लोकांस पुरेनासें होऊं लागलें, बाहेर पडावें तर अमेरिका,आस्ट्रेलिया व आफ्रिका वगैरे देश आपापले दरवाजे लावून घेऊं लागले, देशांतल्या देशांत नवीन वसाहती करण्याचें धाडस व साधनें दोन्ही नाहींशीं होत चाललीं, नवीन उद्योगधंदे काढावे तर पैसा नाहीं, आणि ज्या पावसावर सर्व देशाचा भरंवसा, तोहि अशाश्वत व अनियमित रीतीनें पडणार; तेव्हां चोहोंकडूनच आमचा काळ विपरीत आला आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. यांतून आम्हीं कसें पार पडूं, आमची पुढें कशी काय वाट होईल व आमच्या पोराबाळांस सुखानें पोटभर भाकर मिळण्यासाठीं आम्हीं आज काय तजवीजी केल्या पाहिजेत, हा प्रत्येक देशाहितचिंतकानें नीट विचार करण्या-जोगा व महत्त्वाचा प्रश्न आहे. व आमच्या पुढाऱ्यांचें लक्षहि बरेंच या विषया-कडे लागून त्याचीं फळें जरी अद्याप दिसत नसलीं तरी तीं लवकरच दृष्टीस

* [केसरी—ता. १३ डिसेंबर १८९२].

पडूं लागतील अशी आशा वाटूं लागली आहे. परंतु ह्या प्रश्नाचा निकाल लावणें एकट्या प्रजेच्याच हातांत अगर हिताचे आहे असें नाहीं. कोणतेंहि राष्ट्र सुखी असणें हें तेथील लोकांस जितकें इष्ट आहे, तितकेंच त्या राष्ट्रांतील राज्यकर्ते लोकांसहि आहे. प्रजा जर सुखी असेल तरच राज्याचा कारभार नीट चालून राजसत्तेस चिरस्थाइत्व व बळकटी येण्याचा संभव असतो. तशी बळकटी इंग्रजी राज्यास आहे कीं काय, नसल्यास ती आणण्याचे कोणते उपाय करावे, हे प्रश्न राज्यकर्त्यांनीं सदैव लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. प्रजेची आबादानी तेंच आपलें बळ, असें आमच्या दयाळू महाराणी साहेबांनीं आपल्या सत्तावन सालच्या जाहीरनाम्यांत प्रसिद्ध केलें आहे; परंतु दुःखाची गोष्ट इतकीच कीं, प्रतिवर्षीं हिंदुस्थानच्या स्थितिबद्दल रिपोर्ट नियमानें प्रसिद्ध होत असतांहि, राणीसरकारची प्रजा खरोखरच आबादानींत आहे कीं काय, याचा जितका विचार करावयास पाहिजे, तितका अद्याप कोणीही करीत नाहीं.इतकेंच नव्हे,तर कोणीं याबद्दल आपला प्रतिकूल अभिप्राय दिला तर हिंदुस्थानावर चरत असणारे मोठमोठे अधिकारी लागलेच त्यावर तुटून पडतात! अशा वेळीं मि.वाछा यांनीं एका ठिकाणीं प्रसिद्ध केलेल्या मोठ्या कामगारांच्या अभिप्रायांपैकीं कांहीं अभिप्राय येथें दाखल करतों,म्हणजे मि. ह्यूमसाहेब यांनीं आपल्या सर्क्युलरांतून जी स्थिति वर्णिली आहे ती बरीच अतिशयोक्तीची व काल्पनिक आहे असा जर आमच्यापैकींहि कित्येकांचा भ्रम असला तर तो दूर होईल.

ह्यूमसाहेबांनीं जे उद्गार काढले आहेत व जी भीति दर्शविली आहे, तशाच तऱ्हेचे विलायतेंतील स्पेक्टेटरनामक पत्रांत १८८३ सालीं प्रसिद्ध झाले होते. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्यास जर कांहीं भय असलें तर तें शेतकऱ्यांच्या अधिकाधिक निकृष्ट होत जाणाऱ्या स्थितिपासूनच आहे, असें या पत्रकारानें म्हटलें आहे. एक सालीं पर्जन्य पडला नाहीं अगर कमी पडला, तर लाखों लोक अन्नावांचून मरतात अशी स्थिति आली आहे, असें सरकारचें बडे बडे कामगारहि कबूल करतात. तर अशा स्थितींत एवढा अवाढव्य राज्यकारभार कसा चालणार असा सदर पत्रकारानें प्रश्न केला आहे. त्याच सालीं हिंदुस्थानचे माजी स्टेट सेक्रेटरी ड्यूक ऑफ आरगाईल यांनीं फेब्रुवारीच्या नायटीन्थ सेंचरीनामक मासिक पुस्तकांत जो एक लेख प्रसिद्ध केला आहे, त्यांतहि अशाच प्रकारची स्थिति वर्णन केली आहे. ड्यूकसाहेब असें लिहितात कीं, फक्त बंगाल प्रांतांत १८८२ अखेर दहा सालांत लोकसंख्या सत्तेचाळीस लाख वाढली आहे; म्हणजे सगळ्या स्कॉटलंड देशाच्या लोकसंख्येपेक्षां ही वाढ दहा लाखानें जास्त आहे ! लोकसंख्येचें मान अशा रीतीनें वाढत गेल्यावर आधींच निःसत्व झालेल्या जमिनीवर किती लोकांचा निर्वाह लागणार ? हिंदुस्थानांतील शेतकरी लोक गळ्याइतके सावकाराच्या कर्जांत बुडा-

लेले असतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. लढाया बंद झाल्या, महामारीसारख्या भयंकर रोगांच्या सांथी कमी कमी होत चालल्या म्हणजे लोकसंख्येचें मान असेंच वाढत जाऊन अखेरीस राष्ट्रास दारिद्र्य व दुर्दशा यावयाची. दुसऱ्या राष्ट्रांतून भिकार नाहीं असें नाहीं; पण हिंदुस्थानाइतकें कायमचें व बहुतेक सर्व देशभर पसरलेलें दारिद्र्य दुसऱ्या कोठें क्वचितच सांपडेल. मि. ब्लंट व कस्ट यांनींहि आपलें मत अशाच तऱ्हेचें दिलें आहे. कस्ट साहेबांनीं तर स्पष्ट असें लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांस आहेत तसेच दरिद्री ठेवून प्रतिवर्षीं इंग्रजी कामगार त्या देशांतून आपल्या सुखाकरितां अधिकाधिक पैसे काढूं पहातील व तेथील लोकांस राज्यकारभारांत हात घालं देणार नाहींत तर हल्लीं ज्याप्रमाणें आयर्लंडची स्थिति झाली आहे, तशीच हिंदुस्थानचीहि होऊन परिणामीं इंग्रजी राज्यावर मोठें भयंकर संकट येईल. सर जेम्स केर्ड यांनींहि आपल्या रिपोर्टांत सोनथळ व दक्षण या प्रांतांतील शेतकऱ्यांच्या बंडाचा उल्लेख करून अखेरीस ही अडचण अथवा संकट नुसता सारा कमी करण्यानेंच कायमचें दूर व्हावयाचें नाहीं, त्यास दुसऱ्या कांहीं उपायांची योजना केली पाहिजे असें स्पष्ट लिहिलें आहे. मि. कॉटन यांनीं आपल्या "न्यू इंडिया" नामक पुस्तकांतहि अशाच तऱ्हेचा मजकूर घातला आहे. रयतेस अन्न मिळण्याची पंचाईत झाली असतां तिकडे दुर्लक्ष करून सरकार नवे नवे कायदे करण्याच्या भरीस पडतें ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे असें या साहेबांचें म्हणणें आहे. सन १८८० सालीं लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या स्टेट्समननामक पत्रांत "गोविंदगुरू" चा लेख याहूनहि कडक आहे. रम्पा आणि दक्षणेंतील शेतकऱ्यांनीं बंडें अगर दंगे केले ते कांहींच नव्हेत. हें भावी संकटांचें पूर्वचिन्ह आहे. हिंदुस्थानांतील शेतकरी लोक जर असेच दरिद्री राहून अन्नास मोताद होतील आणि कराचें ओझें प्रतिवर्षीं नेहमींप्रमाणेंच वाढत जाईल तर त्यापासून हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यावर लवकरच एखादें मोठें भयंकर संकट गुदरेल, असें या साहेबांनीं स्पष्ट व निर्धास्तपणें लिहिलें आहे. सरकारी ऑफिसर असल्या गोष्टींत उघडपणें बोलत नाहींत, यास अनुलक्षून एका बड्या इंग्रजी कामगारानें सन १८८० सालीं मि. राबर्ट नार्टन यांस असें पत्र लिहिलें होतें कीं, हिंदुस्थानांत खरें बोलणें म्हणजे मोठें पातक आहे; मीं जर माझें कान, तोंड आणि डोळे दाबून धरिले तर मलाहि मोठमोठ्या मानाच्या व हुद्याच्या जागा मिळाल्या असत्या. कॉंग्रेसचे सेक्रेटरी मि. ह्यूम हे पूर्वीं शेतकी खात्याचे हिंदुस्थान सरकाराजवळ मुख्य सेक्रेटरी होते. सन १८८० सालीं ह्यूम साहेबांनीं ती जागा सोडल्यावर ती कमी करण्यांत आली. त्यावेळीं म्हणजे चार वर्षांपूर्वीं हल्लींप्रमाणेंच शेतकरी लोकांच्या स्थितीबद्दल ह्यूमसाहेबांनीं आपले विचार स्टेट्समन पत्रकर्त्यांस कळविले आहेत. परंतु ह्यूमसाहेबांचे

हे पूर्वीचे उद्गार सोडून दिले, तरी मि० मॅकेन्झी, मि० आर्व्हिंग, मि० कोनेल आणि सर लुईस मॅलेट यांचे लेखहि अगदीं सदरप्रमाणेंच आहेत. सर लुइस मॅलेट हे असें म्हणतात कीं, हिंदुस्थान देशास हा जो मोठा रोग जडला आहे तो वरकरणी उपायांनीं बरा व्हावयाचा नाहीं. यापासून राज्यास मोठा धोका बसण्याचा संभव आहे व रोगाचें कारण, शोधून काढून तो निर्मूल केल्याखेरीज ही भीति कधींहि नाहींशी होणार नाहीं. सन १८८८ सालच्या आक्टोबर माहिन्याचे चोवीसावे तारखेस हिंदुस्थानसरकारचा जो ठराव प्रसिद्ध झाला आहे, त्यांतहि शेतकऱ्यांच्या स्थितीचें अशाच तऱ्हेचें वर्णन केलें आहे. बंगाल्यांतील शेतकरी दोनदां जेवावयास मिळालें म्हणजे आपणांस कृतकृत्य समजतात व बहारप्रांतांतील शेंकडा चाळीस शेतकऱ्यांस अन्नहि पुरें पोटभर मिळत नाहीं असें या ठरावांत लिहिलें आहे. मुंबई इलाख्यासंबंधानें लिहितांना दक्षिणेंतील एकतृतीयांश मुलुखभर दुष्काळाची भीति असते व रत्नागिरीकडे घांटाजवळील शेंकडा नव्वद लोकांस आंबे, फणस अगर भाजीपाला याखेरीज कांहीं महिने दुसरें कांहीं खावयास मिळत नाहीं असें म्हटलें आहे. मद्रासेंत कांहीं कांहीं जिल्ह्यांतून अशाच प्रकारची उपासमार चालते असें तेथील कलेक्टरांनीं कळविलें आहे. व इलाख्यांतील इतर जिल्ह्यांतूनहि दरवर्षांचें उत्पन्न त्या वर्षास जेमतेम पुरतें असें त्या त्या जिल्ह्यांतील कामगारांचें म्हणणें आहे. सारांश, सर्व हिंदुस्थानभर शेतकऱ्यांचे खाण्यापिण्याचे हालच आहेत असें म्हटलें तरी चालेल. सुवत्ता असली म्हणजे सरासरी मोठ्या माराकुटीनें या वर्षाचें पीक त्या वर्षास पुरेसें होतें. एखादे वर्षीं पावसानें डोळे वटारले म्हणजे लागलीच निम्मे किंवा तृतीयांश लोक दुष्काळाच्या सपाट्यांत सांपडून त्यांपैकीं बरेच परलोकाच्या मार्गास लागतात. ही स्थिति ह्यूमसाहेबांनीं आज नव्यानेंच लोकांच्या नजरेस आणिली आहे असें नाहीं. वर दिलेल्या उताऱ्यांवरून सरकारच्या कांहीं मोठमोठ्या व विचारी कामगारांच्या लक्षांत ही स्थिति पूर्वीच येऊन चुकली आहे व त्या त्या वेळीं ह्यूमसाहेबांप्रमाणेंच त्यांनीं हिंदुस्थानच्या सर्व हितचिंतकांस आपल्या बुद्धीप्रमाणें व मताप्रमाणें योग्य इशारत दिली आहे असें दिसून येईल. सन १८८२ चे नवंबरांत खुद्द लंडन टाइम्स पत्रांतहि ह्याच आशयाचा लेख प्रसिद्ध झाला होता !

ही स्थिति व तिचे भयंकर परिणाम टाळण्यास कांहीं उपाय आहेत काय ? असा राष्ट्रीयसभेनें व विशेषतः तिच्या सेक्रेटरीनें लोकांस व सरकारास वेळींच प्रश्न करणें अगदीं स्वाभाविक आहे. देशाची व विशेषतः त्यांतील शेतकऱ्यांची स्थिति खरोखर शोचनीय होत चालली आहे. हें सरकारच्या दप्तरांतल्या लेखांवरूनच सिद्ध होतें. आतां सरकार आपण होऊनच जर या प्रश्नाची तजवीज लावण्यास नाखूष असेल, तर लोकांनीं सरकारास जागें करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. सरकार, मध्यम स्थितींतलि लोक आणि शेतकरी असे राष्ट्रांतील लोकांचे

जर तीन वर्ग केले तर शेतकऱ्यांची स्थिति सुधारणें हें जितकें सरकारच्या हिताचें आहे, त्याच मानानें मध्यम प्रतींतील लोकांसाहि तें फायदेशीर व आवश्यक आहे. दक्षिणेंतील शेतकऱ्यांच्या दंग्यांत जे प्रकार घडून आले, त्यांवरून अशा तऱ्हेचीं शेतकऱ्यांचीं बंडें उद्भवलीं म्हणजे मध्यम प्रतीचे लोकच पहिल्यानें बळी पडतात असें दिसून येतें. शेतकऱ्यांची हल्लींची दरिद्रावस्था अशीच कायम राहिली तर पुढेंहि ह्याच प्रकारें दंगेधोपे खास उत्पन्न होतील. दुष्काळांत लाखों लोक आज मुकाट्यानें उपासमार होऊन प्राणास मुकतात; पण इंग्रजी राज्यपद्धतीचें लोकांना जसंजसें ज्ञान उत्पन्न होत जाईल तसतशीं दारिद्र्याचीं कारणें काढून टाकण्याकडे त्यांच्या मनाची जास्त प्रवृत्ति होत जाईल; व त्यामुळें अखेरीस सर्वत्र शेतकरी लोकांचे दंगे सुरू होतील. मि. ब्लंट यांचें मतहि असेंच आहे. शेतकरी लोक जोंपर्यंत अज्ञान आहेत अगर सज्ञान असून सुखी आहेत तोंपर्यंत कांहीं एक भीति नाहीं; पण दारिद्र्य व ज्ञान हीं एकत्र झालीं म्हणजे लागलीच त्यांची चकमक झडून त्यापासून ठिणगी पडते, असें या साहेबांनीं म्हटलें आहे. हें त्यांचें म्हणणें अगदीं यथार्थ आहे व सरकारानें नाहीं तर मध्यम स्थितींतील लोकांनीं तरी शेतकऱ्यांची ही स्थिति सुधारण्याचे योग्य उपाय वेळींच अवश्यमेव केले पाहिजेत. या कामीं कोणाची भीड मुरवत धरून उपयोगीं नाहीं. दिवस कठीण येत चालले आहेत, आणि रोग उत्तरोत्तर वळावत आहे; आतां कोणी कांहींहि म्हणो, खरी स्थिति जगापुढें मांडून तिचा प्रतिकार करण्यास झटणें हें प्रत्येक देशहितचिंतकाचें कर्तव्य आहे. ह्यूम साहेबांनीं या कामांत जो कित्ता घालून दिला तोच आपणांस गिरविला पाहिजे. मग बडेबडे नीतिनिपुण कामगार अगर त्यांचे तरफदार इंग्रजी वर्तमानपत्रकार आम्हांस शिव्या देवोत वा वंदोत. आम्ही जर या वेळेस मौन धरूं तर शेतकऱ्यांस उत्तरोत्तर जी विपन्नावस्था येत चालली आहे, तिनें त्रासून ते एखाद्या अवचित प्रसंगीं दंगा अगर बंड करण्यास खरोखरच प्रवृत्त होतील यांत शंका नाहीं. मि. ह्यूम यांच्या लेखानें जर कोणाची खात्री झाली नसेल, तर मि. वाछा यांनीं दिलेले आधार व प्रमाणें वाचून त्यांनीं आपल्या संशयाची निवृत्ति करून घ्यावी, अशी त्यांस आमची सूचना आहे. ह्यूम साहेबांस नुसता दोष देत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. इंग्रजी राज्यावर जर पुढें मागें कांहीं संकट येणार असलें तर उत्तरेकडून अगर वायव्येकडून येणार नाहीं. असलीं संकटें कितीहि आलीं तरी तीं निवारण करण्याइतकें आमच्या सरकारचें सामर्थ्य आहे. पण सर्व देशांतील प्रजाच अन्नास महाग होऊन दंगा करण्यास प्रवृत्त झाली म्हणजे मात्र वेळ कठीण येणार आहे. ती आल्यावर मग कांहीं इलाज चालणार नाहीं, करितां आतांच सावध व्हावें हें बरें.

❖ ❖ ❖

* शेतकऱ्यांच्या कमिशनानें काय केलें ?

मागील दोन अंकांत हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची सामान्य स्थिति किती निकृष्ट आहे व ती सरकारानें अगर लोकांनीं लवकर सुधारली नसतां काय काय परिणाम होतील याचें थोडेंसें दिग्दर्शन केलें होतें; व ह्यूम साहेबांचें सरक्युलर वस्तुस्थितीस अनुसरून सप्रमाण लिहिलें होतें असेंहि दाखविलें. आज त्याच विषयाचा दुसऱ्या बाजूनें विचार करणार आहों. दक्षिणेंतील शेतकरी लोक अगदीं मुकेबंगाल होऊन सन १८७९ सालापूर्वी त्यांनीं सावकारांचीं व मारवाड्यांचीं कांहीं ठिकाणीं घरें लुटलीं, कांहीं ठिकाणीं दस्तऐवज जाळले व कांहीं ठिकाणीं नाकें कापलीं हें वाचकांस स्मरत असेलच ! इतक्या निकरावर गोष्ट येऊन ठेपली तेव्हां सरकार जागें झालें, व शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचें आतां मात्र खरोखरच कांहीं उपाय केले पाहिजेत असें त्यांच्या मनानें घेतलें. परंतु मनुष्यस्वभावाचा असा कांहीं दुर्गुण आहे कीं, ज्याला त्याला आपणाखेरीज इतर सर्व जग बिघडलें आहे असें वाटत असतें. पृथ्वीवर राहणाऱ्या मनुष्यास आपण पृथ्वीबरोबर फिरत आहों हें भान न राहून सूर्य व तारे—जे मनुष्यापेक्षांच काय पण पृथ्वीपेक्षांही शेंकडोंपट मोठे आहेत ते आपल्या क्षुद्र पृथ्वीसभोंवतीं दररोज घिरट्या घालीत आहेत असा जो भ्रम होतो त्याचें कारणहि हेंच. त्यास मी स्थिर, मी शहाणा व लोक चंचल व गाढव असें वाटत असतें. आपलें सरकार हें पूर्वीच्या सरकाराप्रमाणें एका इसमानें अगर व्यक्तीनें निदर्शित करितां येत नाहीं, तथापि व्यक्तिमात्रामध्यें जे दुर्गुण असावयाचे ते सर्व हल्लींच्या 'सरकार' या संस्थेंत पूर्णपणें आढळून येतात. सरकारच्या राज्यपद्धतीमुळें, त्यांच्या सारासारा घेण्याच्या रीतीमुळें, अगर अप्रतिबंध व्यापार सुरू केल्यामुळें हिंदुस्थानांतील रयतेचें आपल्या हातून कांहीं नुकसान होत आहे, ही कल्पना देखील सरकारच्या डोक्यांत शिरत नाहीं. हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदुस्थानवासी रयतेच्या सुखाकरितां करण्याचा यांनीं केवळ परोपकार बुद्धीनें मक्ता घेतला आहे, असें लहान मोठे सरकारचे सर्व अधिकारी आपल्या कृतींत, लेखांत व भाषणांत व्यक्त करीत असतात. अशा रीतीनें केवळ परोपकारासाठीं अवतीर्ण झालेल्या राज्यकर्यांस शेतकऱ्यांच्या निकृष्ट स्थितचिें मूळ कारण सावकार होत असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. सुपें वगैरे तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं जेव्हां बंड केलें, तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांचा अगदीं पाहिल्यानें हाच समज झाला, व होप साहेबांनीं सावकाराच्या कर्जातून रयतेस मुक्त करून त्यांचा उद्धार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांतून त्या वेळीं एक नवीन अस्त्र बाहेर काढिलें.

---

* [केसरी—ता. २० डिसेंबर १८९२]

ब्रम्हास्त्र निष्फळ होईल असें त्याच वेळीं पुष्कळांनीं भाकीत केलें होतें; परंतु " पृथ्वी फिरतेच आहे " या ग्यालिलिओच्या म्हणण्याकडे ज्याप्रमाणें त्याच्या छल करणाऱ्यांनीं दुर्लक्ष केलें होतें, त्याप्रमाणेंच सरकारानेंहि इतर सर्व लोकांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांस कर्जबाजारीपणांतून सोडविण्यासाठीं कायदे-कौन्सिलाच्या टांकसाळींतून एक नवा कोरा कायदा सन १८७९ सालीं बाहेर काढला. व तो पास झाल्याबरोबर त्याचा अम्मलहि दक्षिणेंतील चार जिल्ह्यांत तावडतोब सुरू झाला. आज या गोष्टीस हळू हळू चवदा वर्षें होत आलीं; इतक्या मुदतींत या ॲक्टानें शेतकऱ्यांचें कांहीं कल्याण झालें आहे कीं काय ? त्यांच्या डोक्यावरील कर्जाचें ओझें किती सें उतरलें, वगैरे गोष्टींचा तपास करण्या-साठीं कमिशन नेमण्याची पाळी येऊन कमिशननानें आपला रिपोर्टहि प्रसिद्ध केला आहे. त्या रिपोर्टावरून दक्षिणेंतील शेतकऱ्यांच्या स्थितींत गेल्या चवदा वर्षांत काय काय फरक झाला, याची थोडीशी हकीकत आज आम्हीं येथें देत आहों.

शेतकऱ्यांच्या स्थिति संबंधानें मुख्यत्वेंकरून महत्वाचा मुद्दा म्हटला म्हणजे त्यांचा कर्जबाजारीपणा हा होय. सावकाराच्या त्रासानें गांजून ज्या लोकांनीं सन १८७८।७९ सालीं बंड केलें, ते लोक फिरून बंड करण्यास अद्याप प्रवृत्त झाले नाहींत ही गोष्ट खरी आहे. सावकार व शेतकरी यांच्यामध्यें जो वैवनांव झाला होता तो कांहीं अंशीं शेतकऱ्यांच्या कायद्यामुळें कमी झाला आहे. कुळाची जमीन विकणें, त्याचेपासून आवाचेसव्वा चक्रवाढ व्याज घेणें, त्याचे बैल, हत्यारें, नांगर वगैरे जिनसांवर एकदम जप्ती नेणें, पन्नास रुपये देऊन शंभरांचें खत करून घेणें इत्यादि कांहीं प्रकार शेत-कऱ्याच्या कायद्यानें बंद झाले आहेत व ते बंद करणें केव्हांहि जरूर होतें. एवढ्याच कारणाकरितां सावकारांचीं नाकें कापण्यास जर शेतकरी तयार झाले असले तर तीं कारणें आतां राहिलीं नाहींत; परंतु शेतकरी लोक खरोखर अन्नास मोताद झाल्यामुळें कोणावर तरी सूड उगवावा असें मनांत येऊन जर त्यांनीं सावकारांचा छळ केला असेल तर तसा प्रकार मात्र पुनः न घडून येण्याची या ॲक्टानें कांहीं तजवीज झाली आहे असें दिसत नाहीं. सावकारच आपल्या विपन्नावस्थेचें कारण आहे अशी समजूत झाल्यामुळें सन १८७८ सालीं शेत-कऱ्यांनीं डोळ्यापुढें दिसणाऱ्या सावकारांचा छळ केला हें त्यांच्या दृष्टीनें अगदीं साहाजिक झालें. शेतकऱ्यांच्या कायद्यानें सावकारावर जें लोक अपयश घालीत असत तें आतां दूर केलें आहे. यापुढें शेतकरी लोक जर पूर्वीप्रमाणेंच दरिद्री राहिले, तर त्यांस आपल्या दारिद्र्याचें कारण शोधण्यास सावकार सोडून दुसऱ्या दिशेकडे बघावें लागेल, आणि उपासमारीनें आणि दारिद्र्यानें गांजून गेलेले शेतकरी अशा रीतीनें आपल्या दारिद्र्याचें कारण शोधूं लागलें म्हणजे त्यांची धाड अमक्यावर

पडेल आणि अमक्यावर पडणार नाहीं, असें कोणास कधींहि निश्चयात्मक सांगतां येणार नाहीं. सन १८७९ च्या कायद्यानें सावकारांचें बरेंच नुकसान झालें असलें तरी पुन्हां अशी कुणबाऊ धाड आली असतां तिच्या भक्ष्यस्थानीं ते पडणार नाहींत अशी या ॲक्टानें जी तरतूद झाली आहे, त्याबद्दल सरकाराचें त्यानें आभार मानले पाहिजेत. अशी वावटळ जर पुनः कधीं उद्भवली तर त्याचें कारण निदान दक्षिणेंत तरी सावकार लोक नाहींत इतकें या ॲक्टामुळें खात्रीनें म्हणतां येईल. आतां अशी वावटळ पुनः उद्भवण्याचा संभव आहे कीं, काय याचा थोडासा विचार करूं.

शेतकरी लोक दंगा करण्यास प्रवृत्त होण्याचें मुख्य कारण दारिद्र्य होय. कुटुंब वाढलें, दुसरा व्यापारधंदा नाहींसा झाला, जमिनीस कस नसल्यामुळें ती नीरस होत चालली, आणि पाऊसहि वेळच्यावेळीं पडत नाहींसा झाला ! अशा स्थितींत कोणत्याहि राष्ट्रांतील शेतकरी दारिद्र्यांत आणि कर्जांत बुडालेले असावयाचें, करितां शेतकरी ॲक्टानें ही स्थिति सुधारली आहे काय ? गेल्या चवदा वर्षांत शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचें ओझें कांहीं कमी झालें आहे काय ? हे प्रश्न ह्या चवकशीच्या कामीं अत्यंत महत्त्वाचे आहेत. कमिशनर लोकांनींहि हेच प्रश्न पाहिल्यानें काढले होते; परंतु त्याचें उत्तर जितक्या खुलासेवार द्यावयास पाहिजे होतें तितकें त्यांनीं दिलें नाहीं. आपल्या रिपोर्टाच्या दहाव्या पारिग्राफांत ते असें म्हणतात कीं, या प्रश्नाचें उत्तर देण्यास जशा तऱ्हेची माहिती पाहिजे तशा तऱ्हेची माहिती आम्हांस मिळाली नाहीं. परंतु नुसत्या ॲक्टामुळें शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचें कारण कधींहि समूळ नाहींसें होणार नाहीं हें उघड आहे. यावरून कमिशनाचें या बाबतींत काय मत आहे हें आम्हीं आणखी स्पष्ट केलें पाहिजे असें नाहीं. कमिशनानें जी गोष्ट भीत भीत लिहिली आहे तीच मुंबईसरकारनें आपल्या एका ठरावांत मोकळ्या मनानें स्वच्छ कबूल केली आहे. त्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं, सावकार लोक आतां आपलें कर्ज बहुतेक ॲक्टांतील कलमाप्रमाणेंच देऊं लागतील; आणि लवकरच चारहि जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या कर्जाचें मान पुनः पूर्वीप्रमाणें होईल. रावब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर हे आपल्या मिनिटांत ठरावांतील हें व्याक्य घेऊन त्यावर असें लिहितात कीं, सरकारचें हें म्हणणें मीं केलेल्या चवकशीवरून अक्षरशः खरें आहे असें माझें मत आहे; सावकाराचें कर्ज पूर्वीप्रमाणेंच राहील इतकेंच नव्हे, तर सदर कर्जासाठीं पूर्वीं शेतकऱ्याची जमीन गहाण पडत नव्हती तीहि आतां आणखी गहाण पडेल. सारांश, चवदा वर्षें ॲक्टाचा अंमल झाल्यामुळें शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचें ओझें कमी व्हावयाचें तें एकीकडेच राहून उलट कर्ज आहे तें आहे आणि जमिनीहि गहाण पडल्या अशी सध्यां स्थिति झाली आहे. ही स्थिति नजरेस आल्यावर ॲक्टाचे उपयुक्ततेबद्दल कमिशनरांस शंका यावी हें अगदीं

साहजिक आहे. आपल्या रिपोर्टाच्या शेवटीं ते असें म्हणतात कीं, "आसल्या कायद्यानें शेतकऱ्यांस कर्ज करण्याचे प्रसंग कमी येतील अगर त्यांच्या दारिद्र्याचीं कारणें दूर होतील हें संभवत नाहीं. हीं कारणें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारचीं असून तीं दूर करण्यास शेतकऱ्यांची सामाजिक, राजकीय व घरची स्थिति सुधारली पाहिजे. ती सुधारेल तेव्हांच या प्रश्नाचा अखेरचा निकाल लागेल." कमिशनानें हा कायदा इतर जिल्ह्यांतूनहि जरूर पडल्यास लागू करण्याची शिफारस केली आहे; परंतु नुसत्या ॲक्टानें कांहीं व्हावयाचें नाहीं, शेतकऱ्यांची स्थिति खरोखर सुधारण्यास ॲक्टाखेरीज दुसरे कांहीं उपाय योजले पाहिजेत असा त्याजबरोबर शेरा दिला आहे. यावरून मोठ्या आग्रहानें, उमेदीनें आणि परोपकार बुद्धीनें सरकारानें सन १८७९ सालीं जो कायदा पास केला, त्याचा सरकारनें नेमलेल्या कमिशनच्या दृष्टीनेंच किती उपयोग झाला आहे हें कळून येईल. ह्या ॲक्टाचा अंमल करण्यासाठीं जे स्पेशल जज्ज वगैरे मुद्दाम नवे कामगार नेमले आहेत, त्यांचा दरसाल खर्च कमींत कमी ५७।५८ हजार रुपये आहे. म्हणजे गेल्या चवदा वर्षांत सुमारें ८० लाख रुपये शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठीं दक्षिणेंतील चार जिल्ह्यांत सरकारानें खर्च केले; परंतु मारुतीच्या शेंपटाप्रमाणें शेतकऱ्याचें कर्ज पुनः आहे तितकेंच आहे. फायदा इतकाच कीं, जमीन पूर्वी गहाण पडत नव्हती, ती आतां गहाण द्यावी लागते आणि सावकार जुलूम करितो असें बोलण्याची सोय नाहीं!

ही स्थिति सुधारण्यास कांहीं उपाय आहेत काय व असल्यास ते कोणते? हा प्रश्न यापुढें सहजच उत्पन्न होतो. कमिशनानें कांहीं उपाय सुचविले आहेत, त्यांचा विचार पुढील खेपेस करूं.

❖ ❖ ❖

* शेतकऱ्यांच्या कमिशनानें सुचविलेले उपाय.

मागील अंकीं लिहिल्याप्रमाणें दक्षिणेंतील शेतकऱ्यांची स्थिति उत्तरोत्तर निकृष्ट होत चालली आहे असें खुद्द कमिशनाच्या रिपोर्टावरूनच दिसतें. शेतकरी ॲक्ट लागू केल्यापासून गेल्या पंधरा वर्षांत दक्षिणेंतल्या चार जिल्ह्यांच्या शेतकऱ्यांचें कर्ज कमी झालें नाहीं इतकेंच नव्हे तर कर्जासाठीं जमिनी पूर्वी गहाण पडत नव्हत्या त्या आतां गहाण पडूं लागल्या आहेत असा कमिशनरचा सामान्यतः अभिप्राय आहे. हा खरा धरून शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे काय उपाय करावे याबद्दल रिपोर्टाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांत कमिशनरांनीं

* [केसरी—ता. २७ डिसेंबर १८९२]

सूचना केल्या आहेत. दुसरा भाग बहुतेक शेतकरी ॲक्टासंबंधाचाच आणि या ॲक्टांतील बहुतेक कलमांचा विचार करून त्यांपैकीं कोणतीं कलमें इतर जिल्ह्यांतिल शेतकऱ्यांस लागू करावीं याबद्दल कामिशनानें आपला अभिप्राय दिला आहे. प्रतिवादीस हजर ठेवल्याखेरीज त्याच्यावर हुकूमनामा देऊं नये; शेतकऱ्यावर फिर्याद करणें असल्यास ती तो रहात असेल त्या तालुक्यांतच व्हावी; खत होण्याच्या पूर्वीचा व्यवहार तपासण्याचा कोर्टास अधिकार असावा; दामदुपटीपेक्षां व्याज वाढूं देऊं नये व चक्रवाढ व्याज देववूं नये; मुदतीपूर्वी गहाण सोडविण्याचा हक्क असावा; कुणब्यास सावकारापासून गहाणाचा हिशोब मागतां यावा; सावकाराचे पैसे हप्तेबंदीनें देण्याची सवड असावी; हातच्या कर्जाचा हुकूमनामा असल्यास शेतकऱ्यास कैदेंत टाकूं नये; तारण गहाण असल्याखेरीज शेतकऱ्याची जमीन विकूं नये; पण कोर्टास वाटेल तर कांहीं वर्षेंपर्यंत सावकाराकडे ती लागणीस द्यावी; शेतकऱ्यास आपणास नादार ठरवून घेण्याची सवड असावी इत्यादि शेतकरी ॲक्टांतील कलमें सर्वत्र लागूं करण्याबद्दल कामिशननें आपलें मत दिलें आहे त्याजप्रमाणें व्हिलेज मुनसफ अगर कनसिलिएटर नेमण्याचा निराळा कायदा करून कनसिलिएटरांस पक्षकारांचे जबाब घेण्याचा अधिकार द्यावा व आपसांतील ठराव अयोग्य वाटल्यास त्यांस ते नाकारतां यावे. कर्ज वसूल करण्याची मुदत सहा वर्षें असावी; सावकारानें एखाद्या अडाणी कुळापासून कांहीं रोखा लिहून घेतला असल्यास तो फिरवून घेण्याचा अगर रद्द करण्याचा त्यास कराराचा ॲक्ट दुरुस्त करून अधिकार द्यावा व अशा ठिकाणीं पुराव्याचा सर्व बोजा सावकारावर टाकावा इत्यादि सामान्य कायद्यांत सुधारणा व्हाव्या असेंहि त्यांनीं सुचविलें होतें. या सर्व सूचना सामान्य असून सर्व शेतकऱ्यांस जरूर असेल तेथें लागू कराव्या असें कामिशनानें सुचविलें आहे.

परंतु कायद्यामध्यें हे फेरफार केले तरी त्यामुळें शेतकऱ्यांची स्थिति कायमची सुधारेल असें कामिशनरांस वाटत नाहीं. अज्ञान, उधळेपणा अगर इस्टेटीची दरपिढीस होत असलेली वांटणी यांमुळें जर शेतकरी लोक उत्तरोत्तर दरिद्री होत चालले, तर त्यांची स्थिति कायद्यांत कितीहि फेरफार केले असतां सुधारावयाची नाहीं, हे दुर्गुण प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारानेंच नाहींसे होतील तेव्हां होतील. परंतु प्राथमिक शिक्षण देणें किंवा न देणें हें ज्या अर्थीं सरकारचें कर्तव्य आहे, त्याअर्थीं आमच्या मतें सरकारास या बाबतींत केवळ निर्दोषी म्हणतां येईल असें दिसत नाहीं. शेतकऱ्यांस लिहितां वाचतां येऊन त्यांस आपल्या खऱ्या स्थितीचें ज्ञान व्हावें; त्यांजजवळ जे कांहीं पैसा दोन पैसे शिल्लक रहात असतील ते व्यवस्थेनें राखून ठेवण्याची त्यांस सोय असावी, आणि जमिनीचे हातहातभर तुकडे होऊन कोणासहि आपल्या हिश्शाची योग्य किंमत मिळूं नये अशी स्थिति तरी निदान न येण्याबद्दल कायद्यांत कांहीं तरी तजवीज ठेवावी हें सरकारचें कर्तव्य आहे व

आपर्यंत त्याच्या हातून पूर्णपणें होत नाहीं तोंपर्यंत शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेबद्दलची जबाबदारी थोडी बहुत तरी सरकारच्या अंगावर पडेल. दोनतीन पिढ्या झाल्या म्हणजे एका घराचीं दहा घरें होऊन ज्या जमिनीवर पूर्वी एका कुटुंबाचा चांगल्या रीतीनें निर्वाह होत असे, ती जमीन दहा कुटुंबांस पुरेनाशी होईल हें उघड आहे; परंतु देशांत लोकसंख्या वाढल्यामुळें जमिनीचें उत्पन्न जर पुरेनासें होईल तर देशांत उद्योगधंद्याची वृद्धि करून अगर दाट वस्तींतील लोक कमी वस्ती असलेल्या प्रदेशांत नेऊन त्यांच्या पोटाची सोय लावून देणें हें शहाण्या व सुधारलेल्या सरकारच्या कामांपैकींच एक काम आहे. देशांतील सर्व लोक उपजीविकेचीं नवीन साधनें शोधून काढण्यास असमर्थ असतात. तीं कामें देशांतील पुढारी लोक अगर ज्ञाति आणि सरकार यांनींच केलीं पाहिजेत. इतर राष्ट्रांतून ज्याप्रमाणें हिमतीचे पुढारी लोक असतात तसे आमच्याकडे नाहींसे होत चालले आहेत, यामुळें या प्रश्नाचा निकाल लावण्याचा सर्व बोजा बहुतेक सरकारावरच पडतो. म्हणून देशांतील लोकसंख्या वाढली तर त्यांस खावयास कसें मिळेल याचा विचार इंग्रजसरकारच्या मुत्सद्यांनींच केला पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारानें शेतकरी लोक कितीहि सज्ञान झाले तरी त्यांस मार्ग दाखविण्याचें काम नेहमीं सरकारनेंच केलें पाहिजे. एकदा मार्ग दाखवून दिला म्हणजे मग फारशी अडचण नाहीं. असो.

हीं शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचीं सामान्य कारणें तूर्त एके बाजूस ठेविलीं, तरी अनिश्चित पर्जन्यवृष्टि आणि दुष्काळ यांमुळें शेतकऱ्यांचे जे हाल होतात त्यांजबद्दल जरी कोणी जबाबदार नाहीं तरी एकंदरींत शेतकऱ्यांची स्थिति सुधारून दुष्काळाच्या सालींहि त्यांस फारसा त्रास न पडण्याची काय तजवीज करावी याचाहि सरकारांतून विचार झाला पाहिजे. व या गोष्टीचा कमिशनानें आपल्या तिसऱ्या भागांत विचार केला आहे. दक्षिणेंतील शेतकरी लोकांस सामान्यतः तीन वर्षांतून एकादें साल चांगलें जातें असें ठरवून कमिशनानें त्यांचें संकट निवारण्याचे तीन चार उपाय सुचविले आहेत. जमिनीवर सारा उत्पन्नाच्या मानानें भारी बसवला आहे कीं काय याबद्दल कमिशनानें आपला अभिप्राय दिला नाहीं व तो देण्याची त्याची इच्छा होती असेंहि दिसत नाहीं. त्यांचा कटाक्ष मुख्यत्वेंकरून सारा वसूल करण्याच्या पद्धतीवर आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं, शेतकऱ्यांस दरवर्षी जें कर्ज काढावें लागतें तें सारा भारी असल्यामुळें नव्हे तर भलत्याच वेळीं त्यांजपासून सारा घेतल्यामुळें होय. चांगलें वाईट साल पाहून सारा कमजास्त ठरवण्याची पद्धत मुंबईसरकारानें मागेंच सोडून देऊन तीस वर्षांपर्यंत कायमचे धारे बसविले आहेत. हे धारे बसवितांना बरे वाईट पिकाची सरासरी काढून त्याप्रमाणें सारा कायम करतात असें सरकाराच्या ऑफिसरांचें म्हणणें आहे. हें म्हणणें जरी आपण खरें घेऊन चाललों तरी या

सरासरीचा शेतकऱ्यांस कांहीं विशेष फायदा होत असेल असें दिसत नाहीं. सरासरीचे मानानें जीं प्रमाणें ठरविलीं असतात तीं हिशोबास कितीहि सोईवार असलीं तरी नदींत सरासरीनें गुडघाभर पाणी आहे असल्या बोलण्यावर विश्वास ठेऊन जसा एखादा मनुष्य डोहांत बुडावयाचा त्याप्रमाणेंच आमच्या शेतकऱ्यांची स्थिति झाली आहे. सरकारी कागदोपत्रांत दहापांच वर्षांचे हिशोब पाहून कारकून लोक सरासरी ठरवितात; परंतु शेतकऱ्यांस इतकी समजूत नसते. ज्या वर्षीं पीक चांगलें येईल त्यावर्षीं चैन करावी पुढील वर्ष पुढें पहाताहेत असेंच त्यांस वाटत असतें, यामुळें अवर्षणाच्या, महागाईच्या अगर दुष्काळाच्या सालीं त्यांजवळ कांहीं शिल्लक राहिलेली नसते. अशा सालीं पूर्वीप्रमाणें सरकारी सारा देण्यास अर्थातच त्यांस सावकाराकडे जावें लागतें आणि एकदां त्यानें सावकाराचें घर पाहिलें म्हणजे त्याचे हातून त्यांची सुटका होणें कठीण पडतें. इनामगांवांतील कुळें सभोंवतालच्या खालसा गांवांतील कुळापेक्षां कमी कर्जबाजारी असतात, याचें कारण त्यांस दुष्काळच्या सालीं सूट अगर मुदत मिळते हेंच होय. असें कमिशनाचें म्हणणें आहे. सारांश, ज्याप्रमाणें इनामदार आपल्या कुळाकडून सोईसोईनें सारा वसूल करून घेतात, त्याचप्रमाणें सरकारानें आपल्या कुळाशीं वर्तन ठेविलें पाहिजे. मारवाड्याचे पैसे काढण्यापेक्षां सरकारचे पैसे काढणें कुळास अधिक सोईचें होईल. प्रत्येक सालीं साऱ्याची सूटच दिली पाहिजे असें नाहीं. यंदां सारा देण्याची सवड नसल्यास तो पुढील दोन सालांत वसूल करावा अशी व्यवस्था ठेविली म्हणजे तिजोरीचें नुकसान न होतां शेतकऱ्यांस सवड सांपडेल. निदान त्या सालांतल्या सालांत तरी हत्प्यांच्या तारखा शेतकऱ्याच्या सोईच्या नेमणें अशक्य नाहीं. या तजविजी अगदीं स्वल्प आहेत; परंतु त्यामुळें त्यांचें महत्त्व कमी होत नाहीं. हल्लीं मुंबईसरकारचे कलेक्टरांस जे वटहुकूम आहेत त्यांत कलेक्टराच्या मर्जीस येईल त्याचप्रमाणें सारा देण्याची वेळ बदलण्याचा अगर या वर्षाचा सारा पुढील वर्षीं घेण्याचा अगर दुष्काळामुळें थोडाबहुत कमी करण्याचा त्यास अधिकार आहे. परंतु हा अधिकार कलेक्टर, यांनीं जशा तऱ्हेनें चालवावा तशा तऱ्हेनें ते चालवीत नाहींत असें कमिशनाचें म्हणणें आहे. ज्या प्रांतांत सामान्यतः तीन सालांतून एक साल वाईट जातें तेथें सारा वसूल करण्याची पद्धत थोडीबहुत तरी सवलतीची व ढिलाईची असली पाहिजे. कित्येक वेळां व विशेषतः दुष्काळाच्या सालीं साऱ्याची थोडीबहुत सूटहि अवश्य द्यावी असें कमिशनानें सुचविलें आहे. ही सूचना मुंबईसरकारास पसंत न पडून सदर सरकारचे सेक्रेटरी मि. लीवार्नर यांनीं कमिशनरांवर बरीच कडक टीका केली होती; परंतु तिचा कांहीं एक परिणाम न होतां कमिशनची सूचना कायम झाली आहे, ती अमलांत केव्हां येईल बी येवो !

कमिशनची दुसरी सूचना अशी आहे कीं, शेतकऱ्यांच्या जमिनी गहाणानें अगर खरेदीनें ज्यांच्या ज्यांच्या ताब्यांत जातात त्यांचीं नांवें कलेक्टराच्या खात्यास अगर दुसरे कोठें तरी दाखल असावीं. हल्लींच्या व्यवस्थेमुळें शेतकऱ्यांच्या हातून जमीन कोणाच्या ताब्यांत जाते, ते लोक जमिनीची योग्य काळजी घेतात कीं नाहीं याचा नीट खुलासा होत नाहीं. कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, कुळांपेक्षां सावकाराच्याच हातांत जमिनी असल्या तर सावकार जमिनींत पैसे घालून ती चांगल्या रंगारूपास आणील व त्यामुळें त्याचा व शेतकऱ्याचा असा दोघांचाहि फायदा होईल. याच्याविरुद्ध, दुसऱ्या पक्षाचें असें मत आहे कीं मारवाडी, गुजर वगैरे सावकार लोक जमीन सुधारण्याची कांहीं एक परवा न बाळगतां शेतकऱ्याकडून जितके पैसे निघतील तितके काढून घेण्यास तयार असतात व त्यामुळें जमीन आणि शेतकरी हीं दोन्ही उत्तरोत्तर कंगाल होत जातात. या दोहोंपैकीं खरा पक्ष कोणता याचा निर्णय करणें सध्यांच्या स्थितींत कठीण आहे. जमिनीच्या खऱ्याखुऱ्या मालकांचीं नांवें खात्यास दाखल करण्याची सोय व आवश्यकता असली म्हणजे या प्रश्नाचें तावडतोब उत्तर देतां येईल. इतर प्रांतांतून अशा प्रकारची व्यवस्था करण्याबद्दल सूचना आली आहे; व तीच दक्षिणेंतील प्रांतांत अमलांत आणावी असें कमिशनचें म्हणणें आहे; त्याप्रमाणें व्यवस्था झाली तर जमीन शेतकऱ्याच्या ताब्यांत गेल्यानें एकंदर रयतेचा व देशाचा फायदा आहे कीं नाहीं याचा निर्णय करण्यास चांगलें साधन होईल. सध्यांच्या प्रश्नाबद्दल कोणत्याच रीतीनें निश्चयात्मक लिहितां येत नाहीं.

❖ ❖ ❖

* कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ !

हल्लींच्या कायदेकौन्सिलांतील सभासद कितीहि विद्वान्, बहुश्रुत, वजनदार व वयोवृद्ध असले तरी एकदां कौन्सिलांत शिरल्यावर ते लोकांच्या मताकडे व हिताकडे किती व कसें दुर्लक्ष करितात ह्याचें ताजें उदाहरण, मोहाच्या फुलांचा कायदा मुंबईसरकारच्या कायदेकौन्सिलांत पास झाला त्यावेळीं लोकांच्या नजरेस आलेंच आहे. ज्यांस लोकांत मान आहे असेच सभासद बहुधा सरकाराकडून कायदेकौन्सिलांत निवडण्यांत येतात; परंतु राजदरबारीं ज्यांस मान आहे त्यांस लोकांकडूनहि मान मिळत असल्यामुळें प्रसंगविशेषीं निव्वळ अधिकाऱ्याच्या इच्छेकडे दुर्लक्ष करून लोकमताचें मंडन करणारे गृहस्थच या व्यवस्थेनें कौन्सिलांत जातात असें नाहीं. हे विद्वान् अगर वजनदार नसतात असें आम्ही म्हणत

* [केसरी—ता. १० जानेवारी सन १८९३]

नाहीं. पण हे कोणत्याहि तऱ्हेनें लोकांस आपण जबाबदार आहों असें मानीत नसल्यामुळें इसापनीतींतील 'अरण्य व लाकुडतोड्या' या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें हे 'दांडे' जेव्हां सरकारच्या कुऱ्हाडींत जाऊन बसतात तेव्हां त्यांचा उपयोग लागलीच स्ववंशछेदनाकडे करण्यांत येतो. ही स्थिति व्यक्तिमात्राच्या दृष्टीनें कितीहि हितावह असली तरी एकंदर राष्ट्रास ती अत्यंत नाशकारक आहे हें कोणीहि कबूल करील. लोकांनीं निवडलेले प्रतिनिधी कायदेकौन्सिलांतून असावे म्हणून राष्ट्रीयसभा गेल्या आठ वर्षें जो कंठशोष करीत आहे तो ह्याचकरितां होय. विद्वत्ता, सौजन्य, धनसंपत्ति, आणि संभावितपणा हीं कोणत्याहि पुरुषास भूषणास्पद आहेत व त्याकरितां त्या त्या मानानें त्याची तारीफ करणेंहि वाजवी आहे; परंतु विद्वान्, बोलका व अधिकारसंपन्न एकादा गृहस्थ असला तर तेवढ्यावरूनच लोकांनीं त्याला आपला पुढारी ठरविला असतां तोंडघशीं पडण्याचा कसा संभव आहे ह्याचें आणखीं एक उदाहरण नजरेस झाल्यामुळें त्यासंबंधानें आज आम्ही येथें स्पष्टपणें आपले विचार कळवीत आहों. विद्या आणि सौजन्य यांनीं मनुष्याचें मन जरी संस्कृत झालें तरी मोठमोठीं कामें निर्भीडपणें करण्याची हिम्मत व धैर्य केवळ या गुणांनीं कोणाच्याहि अंगीं येत नाहीं. पुष्कळ विद्या शिकून कित्येक लोक ज्याप्रमाणें अगदीं व्यवहारशून्य अथवा पढतमूर्ख रहातात, त्याचप्रमाणें वाग्विद्येंत कुशल असे गृहस्थ राष्ट्राचा अगर लोकांचा पुढार घेण्यास कांहीं प्रसंगीं अगदीं नालायक असतात. महाराष्ट्र शूद्र कवीच्या म्हणण्याप्रमाणें हीं कामें कोणाच्याहि हातून पार पडण्यास त्याच्या अंगांत जातीचा कांहीं तरी गुण लागतो. तो असेल तर त्यांत विद्या आणि सौजन्य यांची भर पडून दुधांत साखर घातल्याप्रमाणें तो योग अधिक श्रेयस्कर होतो; पण नैसर्गिक ओज अंगीं नसतां केवळ वाग्विद्येच्या बलावर जर कोणी पराक्रम करूं म्हणेल, तर पंचतंत्रांतील सिंहिणीच्या दुधावर वाढलेल्या कोल्ह्याप्रमाणें त्याची कृती होऊन लोकांकडून त्यांसः—

शूरोऽसि कृतविद्योऽसि दर्शनीयोऽसि पुत्रक ।
यस्मिन्कुले समुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते ॥

असें म्हणून घेण्याची पाळी येते. आमचे विद्वान् लोक अद्याप प्रायः सरकारी नोकरीची आशा धरून तेंच आपल्या आयुष्याचें इतिकर्तव्य असें समजतात व कांहीं लोकहि अशा गृहस्थांस पुढारीपणाचा मान देण्यास तयार असतात; परंतु ही लोकांची चूक आहे व ही स्थिति सुधारल्याखेरीज व हे तोतये पुढारी पदभ्रष्ट झाल्याखेरीज लोकांचें पाऊल खरोखर पुढें कधीं पडावयाचें नाहीं असें आम्हीं अनेक वेळां प्रतिपादन केलें आहे व त्याबद्दल आम्हांस आमच्या कित्येक मित्रमंडळींनींहि दूषणें दिलीं आहेत; तथापि जोंपर्यंत आमचा समज पालटला नाहीं अगर तो गैर आहे अशी आमची कोणीं खात्री करून दिली नाहीं इतकेंच नव्हे,

तर ती समजून दृढ होण्यास नवीं नवीं कारणें व उदाहरणें घडून येतात, तोंपर्यंत आमच्या समजाप्रमाणें आम्हांस जें सत्य भासतें तेंच स्पष्टपणें लोकांपुढें मांडणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजतों, व याच बुद्धीनें आजचा हा लेख लिहिला आहे.

आज ज्या कुऱ्हाडीच्या दांड्यासंबंधानें लिहिणें आहे ते आमचेकडील प्रसिद्ध विद्वान् ऑनरेबल न्यायमूर्ति मि. तेलंग हे होत. या गृहस्थांच्या अंगीं इतर कोणतेहि गुण असले तरी निर्भीडपणें स्वमत प्रतिपादन करण्याचें धैर्य अगर त्याप्रमाणें वर्तन ठेवण्याची अगर त्यासाठीं झीज सोसण्याची यांची हिम्मत होत नाहीं असें आमचें सामान्यतः मत आहे व त्याचा मागें एका प्रसंगीं थोडाबहुत उल्लेख करण्यांत आला होता. ऑनरे० तेलंग हे आमच्यांतील अत्यंत सुशिक्षितांपैकीं एक असून अधिकारानें व मानानें हे नेटिवांत श्रेष्ठ पदवीस चढलेले आहेत; ही गोष्ट नाकबूल करणें म्हणजे सूर्याचा प्रकाश आपणास दिसत नाहीं म्हणण्यासारखें आहे. नेटिव लोकांचा बुद्धिवृक्ष इंग्रजी बागवानाच्या हातांत पडल्यामुळें तो किती गोजिरवाणा होतो ह्याचें ऑनरे० तेलंग हें मूर्तिमंत उदाहरण आहे; परंतु आरामवाटिकेंत आढमूढ वाढून, आकाशास हात घालणाऱ्या वृक्षांची योजना न करितां बागवान ज्याप्रमाणें ' हस्तग्राह्यस्तवकनमित ' बालमंदार वृक्षांचीच योजना करितो त्याप्रमाणें इंग्रजी बागवानाकडून जे विद्वद्वृक्ष तयार होतात ते कलमी झाडाच्या कोटींतीलच असावे अशाबद्दल नीट खबरदारी ठेविली जाते; इतकेंच नव्हे, तर या बागांतून कादंबरींत वर्णन केल्याप्रमाणें गगनचुंबित एकहि शाल्मलीवृक्ष राहूं नये अशा तऱ्हेची होईल तितकी व्यवस्था ठेवली असते; यामुळें लोकमताचें धिटाईनें मंडन करण्यांत अगर स्वहितनिरपेक्ष लोकांसाठीं भांडण्यांत विद्येचें फल आहे असें आम्हीं अद्याप समजूं लागलों नाहीं. मि० तेलंग हे मोठे न्यायनिपुण व कुशल बॅरिस्टर आहेत; कोणत्याहि पक्षाचीं साधकबाधक प्रमाणें अगदीं तराजूंत घातल्याप्रमाणें तोलण्याच्या कामीं त्यांचा हातखंडा आहे व त्यांच्या लेखांत व भाषणांत दोन्ही बाजू अशा तऱ्हेनें मांडल्या असतात कीं, लेखकाचा अगर वक्त्याचा कल कोणीकडे आहे हें नीट लक्षांत येण्यास बरीच धूर्तता लागते. आसाहेबांनीं या इलाख्यांतील ज्यूरीसंबंधानें सरकाराकडे जो आपला अभिप्राय पाठविला आहे तो याच मासल्याचा होय. बाहेरगांवच्या ज्यूरीचा आपणास अनुभव नाहीं असें प्रथमतःच मोठ्या मोकळे मनानें यांनीं कबूल केलें आहे; तथापि खालून आलेल्या अधिकाऱ्यांच्या मताचा विचार करितां यांचे बंधू मि० फॅरन् प्रमाणेंच बेळगांव, अहमदाबाद व सुरत येथें खुनाचे खटले ज्यूरीकडे देऊं नयेत असें यांनीं सुचविलें आहे. स्वतःचा अनुभव नसतां केवळ खालील कोर्टाकडून आलेल्या कागदांवरून दिलेला अभिप्राय विनचूक असेल असें सकृद्दर्शनीं कोणासहि वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्या दृष्टीनें ह्या प्रश्नाचा विचार

करावा लागतो ती दृष्टीच ऑनरेबल तेलंग यांस अद्याप आली नसल्यामुळें अगर तिचा उपयोग करण्याचा त्यांचा हेतु नसल्यामुळें आमच्या हायकोर्टांत असलेल्या नेटिव जज्जांचे हातूनच आम्हांस थोड्याबहुत अंशानें प्राप्त झालेल्या ज्यूरीच्या हक्कावर पुढेंमागें कुऱ्हाडीचा घांव पडतो कीं काय अशी आम्हांसं भीति वाटूं लागली आहे. ज्यूरीचा अधिकार यत्किंचितहि कमी करण्यास सरकारानें प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांत कांहीं आधार सांपडत नाहीं असें विलायतेंतील टाइम्स, डेली न्यूज, ट्रुथ इत्यादि प्रसिद्ध वर्तमानपत्रांचें मत आहे. मि० तेलंग यांजपुढें जे कागदपत्र होते तेच हायकोर्टाचे सर न्यायाधीश सर चार्लस सार्जन्ट यांच्या पुढेंहि होते; पण चमत्कार पहा कीं, एकदां दिलेला ज्यूरीचा अधिकार काढून घेणें अगर कमी करणें सर्वांशीं अयोग्य आहे, असें सर चार्लस सार्जेंट प्रतिपादन करितात आणि मि. तेलंग हे त्याच कागदपत्रांवरून बेळगांव, अहमदाबाद, सुरत, येथील ज्यूरीकडे खुनाचे खटले पाठवूं नये असें मत देतात ! कागदपत्र तेच, पुराव्याची निवडानिवड करण्याची शक्तिहि तीच आणि अधिकारहि बहुतेक सारखाच; मग या दोघां न्यायमूर्तींच्या मनांत इतका फेर कां ? याचें कारण उघड आहे. ज्यूरीचा अधिकार जो लोकांस दिला आहे तो केवळ न्यायाचा तराजू चांगला चालावा म्हणून नव्हे, तर हा एक विशिष्ट प्रकारचा राजकीय हक्क असून राजकीय कारणाकरितां तो लोकांस दिला आहे व त्याच दृष्टीनें त्याचा आतां विचार केला पाहिजे, ही गोष्ट चीफ जस्टिस यांनीं पक्की ध्यानांत ठेवली आणि हें ऐतिहासिक तत्त्व विसरून जाऊन 'अमुक जज्ज असें म्हणतो अमुक तसें म्हणतो,' मला तर यासंबंधानें कांहींच माहीत नाहीं, तेव्हां मी त्यांच्या विरुद्ध कसा जाऊं ?' अशा लौकिक दृष्टीनें दोन्ही बाजूंचा विचार करून तेलंगसाहेबांनीं आपलें मत दिलें. " तर्कोऽप्रतिष्टः श्रुतयो विभिन्नाः " असा महाभारतांत एक श्लोक आहे त्याची या प्रसंगीं आम्हांस आठवण होते. तर्कानेंच कोणचीहि गोष्ट ठरवावयाची म्हणजे ती हवी तिकडे ओढतां येईल; परंतु ज्या दृष्टीनें त्याचा विचार व्हावयास पाहिजे त्या दृष्टीनें त्याचा विचार झाला म्हणजे कोणत्याच प्रकारची अडचण अगर संशय रहात नाहीं. देशांतील कायदे कोणत्याहि प्रकारचे असोत; पण त्या कायद्यांप्रमाणें अमुक एक इसम गुन्हेगार आहे हें ठरविण्याचा अधिकार त्याच्या बरोबरीच्या अगर सजातीय लोकांकडेसच असला पाहिजे. हें तत्त्व इंग्रजी राज्यव्यवस्थेंत 'मॅग्नाचार्टा' झाल्या दिवसापासून सर्वांस ग्राह्य आहे. इलबर्ट बिलाचे वेळीं युरोपियन लोकांनीं जी पुंडाई चालविली होती ती कांहीं अंशीं याच तत्त्वाच्या आधारावर—मग तो भ्रममूलक कां असेना—माजविली होती. युरोपियन गुन्हेगार असतां युरोपियन ज्यूरर लोक त्यांस किती वेळां दोषमुक्त ठरवितात ह्याचा विचार तेलंगसाहेबांनीं मनांत देखील आणला आहे असें दिसत नाहीं. त्यांस जर बाहेर गांवच्या ज्यूरीची

माहिती नव्हती, तर त्यांनीं एक तर या कामीं अजीबात मत द्यावयाचें नव्हतें अगर चीफ जस्टिस यांनीं ज्याप्रमाणें राजकीय दृष्ट्या या प्रश्नाचा विचार करून मत दिलें त्याप्रमाणें सार्वजनिक हिताकडे दृष्टि देऊन यांनींहि आपलें मत द्यावयास पाहिजे होतें; पण राजा रामपालसिंग यांनीं गेल्या काँग्रेससभेंत म्हटल्याप्रमाणें युरोपियन लोकांस आपापलीं मतें स्पष्टपणें बोलून दाखविण्याचें जें धैर्य आहे तें नेटिवांस कोठून असणार? हें असें आहे, तें तसें आहे, हा काय म्हणेल, तो काय म्हणतो, युक्ति कोणीकडे आहे, दुसरे युरोपियन लोक काय बोलतात इत्यादि अनेक गोष्टींचा विचार मनांत येऊन यांच्या सर्व विद्वत्तेचें व बुद्धीचें फल 'तथापि आणि परंतु' या रूपानें उदयास येतें आणि त्यामुळें या लेखाच्या शिरोभागीं लिहिल्याप्रमाणें कुऱ्हाडीच्या दांड्याप्रमाणें आपल्या गोतास च्च हे काळ होतात. ऑनरे० मि० नूलकर हे सार्वजनिकसभेचे मागें चेअरमन होते. याचें आम्हांस स्मरण देऊन यांनीं मोहाचा कायदा पास होते वेळीं केलेल्या भाषणांतील उतारा हिंदुस्थानसरकारानें सार्वजनिक सभेच्या व प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या अर्जास नुक्तेंच जें उत्तर पाठविलें त्यांत घेतला आहे. विद्वन्मुकुटशिरोमणि ऑनरेबल न्यायमूर्ति तेलंग ह्यांचा ज्यूरीच्या पद्धतीवरील हल्लींचा अभिप्राय अशाच रीतीनें पुढेंमागें एखादे वेळेस आमच्या बोकांडीं बसावयाचा आहे. आमच्या हायकोर्टांत हल्लीं आनरे० तेलंग हे एकच नेटिव जज्ज आहेत, हेच मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर आहेत, ग्रंथकार आहेत, लेखक आहेत, वक्ते आहेत, लोकांचे पुढारी म्हणून म्हणवून घेतात तेव्हां अशा सद्गृहस्थांनीं पुढें आलेल्या कागदपत्रावरून दिलेल्या निकालास महत्त्व देऊन सरकारानें आमचे राजकीय हक्क बुडविण्याची संधी घेतल्यास त्यांत दोष कोणाचा? अथवा आश्चर्य तरी कसलें? अशा प्रकारचे कुऱ्हाडीचे दांडे अद्याप आमच्या मध्यें आहेत व त्यांच्या गुळगुळीतपणास व चिवटपणास भुलून अद्यापहि सरकारच्या कुऱ्हाडींत सरकार मागेल तेव्हां त्यांस मोठ्या बहुमानानें देण्यास आम्ही नेहमीं तयार असतों व त्यांतच भूषण मानून घेतों हेंच आमचें मोठें दुर्दैव समजलें पाहिजे. हुशार अगर विद्वान् सरकारी कामगार आणि खरा लोकांचा पुढारी यांमधील भेद नीटसा आम्हांस कळावयास लागेल तो सुदीन! आजच्या काळीं कलमी झाडांचीच सर्वत्र चहा आहे!!

❁ ❁ ❁

* आमच्यावर जुल्म कसा होतो ?

या देशाचीं राज्यसूत्रें जेव्हां प्रथम इंग्रजसरकारचे हातांत पडलीं, तेव्हां टोपी-वाल्याची टापटीप, हुशारी आणि चातुर्य पाहून बहुतेक सर्व लोक चकित झाले.. यांचें लष्कर, यांची जमावंदीची पद्धत, आगबोट, आगगाडी, तारायंत्र, सडका, रस्ते, पूल, शाळा इत्यादि प्रकारांनीं कांहीं दिवसपर्यंत लोकांस अगदीं गांगरून टाकलें होतें. दंगेधोपे नाहींसे होऊन ज्यास त्यास सुखशांततेचा पूर्ण अनुभव मिळूं लागला. पोराबाळांस मुलुखगिरी करून पैसा मिळविण्याचे श्रम पडतनासे झाले. काशीचें पत्र पुण्यास दोन पैशांत पांच सहा दिवसांनीं येऊन निर्विघ्नपणें पोंचूं लागलें; पेंढाराचा बंदोबस्त झाला; ठगी निर्मूल झाली आणि पेशवाईंत नानाफडणविसांसहि जेथें सालीना तिनशें रुपये मिळण्याची मारामार, त्याच ठिकाणीं आतां दरमहा दोनशेंचारशें रुपये मामलेदार, मुनसफांस मिळूं लागले. अर्थातच कांहीं कालपर्यंत ईश्वरानें दयाळू होऊन आमच्यावर राज्य करण्याकरितां हे कोणी तरी दैवशाली पुरुष पाठविले आहेत, असा सर्वांचा समज झाला. गरीबगुरिबांस तर कुंपणीसरकारचें यंत्र कोणकिडे आहे त्याचा थांगच लागेना. जें कांहीं पहावें तें सर्व कांहीं विलक्षण ! तेव्हां हें आहे तरी काय ? हाच भ्रम कित्येक दिवस लोकांस पडला होता. व इंग्रजांच्या राज्यांत आंधळ्यानें काठीस सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत जावें असें लोक म्हणूं लागले; परंतु दारूचा अम्मल ज्याप्रमाणें फार वेळ टिकत नाहीं, त्याचप्रमाणें राज्यक्रांतीपासून उत्पन्न झालेला हा भ्रमहि उत्तरोत्तर दूर होत चालला. आंधळ्यानें काठीस सोनें बांधून जावें खरें; पण सोनेंच उत्तरोत्तर दुर्मिळ होत चाललें ही गोष्ट दिवसानु-दिवस लोकांच्या जास्त लक्षांत येऊं लागली. सुखशांतता झाल्यामुळें लोकसंख्या वाढली, उद्योगधंदे परकीयांच्या हातांत पडले, आणि ज्या राज्यपद्धतीचें आम्ही कौतुक करीत होतों, त्या पद्धतीनें आम्हांस कालसर्पाप्रमाणें चोहोंकडून ग्रासून टाकलें आहे असें वाटूं लागलें. डोळ्यावरील धूर जरासा कमी झाला व हें गौड-बंगाल आहे तरी काय ? अशी चौकशी सुरू झाली. कोणाच्या मतें परकीयांनीं मोठमोठ्या जागा आपल्या हातांत ठेऊन हिंदुस्थानची संपत्ती लुटण्यास सुरुवात केली आहे; व कित्येक आमचे व्यापारधंदे परकीयांच्या हातांत पडल्यामुळें आप-णांस ही स्थिति आली आहे असें म्हणूं लागले आहेत; कित्येकांच्या मतें आमच्या नाशास आमची सामाजिक स्थिति हीच सर्वांशीं कारण आहे. सारांश, इंग्रजी अमलानें आमची दृष्टि जी अगदीं दिपून गेली होती, ती आतां सुधारत जाऊन आमच्यावर जुल्म कसा होतो व आमचें नुकसान कशानें होतें हें शोध-

---

* [केसरी—ता. २४ जानेवारी १८९३]

ण्यास आम्ही लागलों आहों. अशा वेळीं सर वुईल्यम वेडरबर्नसारख्या आनुभविक गृहस्थानें इंग्रजी राज्यापासून आमच्यावर कोणकोणते परिणाम झाले याची जी थोडीशी हकीगत दिली आहे ती सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखी असल्यामुळें, त्याचा थोडासा सारांश येथें देण्याचा आमचा विचार आहे. आनरे० मि० दादाभाई नवरोजी यांनीं पार्लमेंटसभेचे मेंबर झाल्या दिवसापासून हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितीबद्दल विलायतेंत एक दोन ठिकाणीं भाषणें केलीं व एक दोन लेख लिहिले आहेत. आनरे. दादाभाई यांची राजनिष्ठा विलायतेस कसास लागून खुद्द विलायतच्याच लोकांनीं त्यांस आपले प्रतिनिधी निवडून दिले असल्यामुळें ते मुद्दाम जाणूनबुजून हिंदुस्थानसरकारास विनाकारण नांवें ठेवतील ही शंकाहि व्यावयास नको. यामुळें आनरे. दादाभाई यांचे लेख व भाषणें यांचा विलायतच्या लोकांच्या मनावर लवकरच कांहीं तरी चांगला परिणाम होईल अशी उमेद आहे. त्यांतून सर वेडरबर्नसारख्या उदार गृहस्थांनीं दादाभाई यांस मदत केल्यावर मग तर विचारावयासच नको. सर वेडरबर्न यांनीं हल्लीं जो निबंध लिहिला आहे तो याच कामाकरितां होय. इंग्रजी अम्मल कितीहि सुधारलेला असला तरी हल्लींच्या व्यवस्थेनें हिंदुस्थानच्या लोकांचें अतिशय नुकसान होत आहे, असें मि. दादाभाई यांनीं एका लेखांत प्रतिपादन केलें होतें. सर वेडरबर्न यांनीं तोच लेख हातीं धरून इंग्रजी राज्यव्यवस्थेनें लोकांचें किती व कसें नुकसान होत आहे हें स्वानुभवावरून फार चांगल्या रीतीनें व्यक्त केलें आहे. वेडरबर्नसाहेबांचे वडील हिंदुस्थानांत सनदी नोकर होते व त्यांचे बंधूहि हिंदुस्थानसरकारच्या नोकरींतच सन १८५७ सालीं प्राणास मुकले. तेव्हां हिंदुस्थानसरकारच्या नोकरीचा पहिल्यानें आपणास पुष्कळ अभिमान होता असें त्यांनीं म्हटलें आहे. पण उत्तरोत्तर खरी स्थिति डोळ्यानें पाहिल्यावर हा समज दूर होत चालला व इंग्रजी राज्यव्यवस्थेनें प्रजेचें पुष्कळ अनहित होत आहे अशी बऱ्याच वर्षांनीं आपली खात्री झाली असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. सर वेडरबर्न यांचा आमचेकडील लोकांस चांगलाच अनुभव आहे, तेव्हां ते म्हणतात तें खरें कीं खोटें याचा निर्णय करण्यासाठीं वर दिलेल्या गोष्टीहि आमचेकडील लोकांस सांगण्याची आवश्यकता नाहीं. सर वेडरबर्न यांनीं आमच्याकडे असिस्टंट कलेक्टरच्या जागेपासून तों कौन्सिलरच्या जागेपर्यंत सर्व मोठमोठीं कामें केलीं आहेत व लोकांच्या हिताकडे त्यांचें इतकें लक्ष असे कीं, इकडील लोकांत त्यांची साधारण शेतकऱ्यासहि चांगली माहिती झाली आहे. मुंबईच्या राष्ट्रीयसभेचे तर ते अध्यक्षच होते. तेव्हां राजा व प्रजा या दोघांचीहि सारखी माहिती असणारा यांच्यासारखा दुसरा साक्षीदार आम्हांस मिळणें कठीण आहे.

आतां हल्लींच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें हे काय म्हणतात तें पाहूं. यांनीं आपल्या निबंधांत प्रथमतः इंग्रजांच्या पूर्वी चालू असलेल्या राज्यपद्धतीचें थोडें वर्णन

दिलें आहे. मोंगलाईंत अगर पेशवाईंत हल्लींप्रमाणें चोहोंकडून रयतेस त्रास सोसावा लागत नव्हता. प्रत्येक गांवांतील लोक आपआपलीं शेतेंभातें, गायरानें, तळीं, नद्या, रस्ते वगैरेंची व्यवस्था ठेवीत. गांवच्या एकंदर उत्पन्नापैकीं कांहीं नियमित भाग राजास कर म्हणून द्यावा लागत असे. पण हा भाग एकदा दिला म्हणजे बाकी सर्व व्यवस्था गांवकरी लोकांच्याच हातांत रहात असे. प्रत्येक गांवांत तेथील गांवकऱ्यांच्या मगदुराप्रमाणें सोनार, सुतार, लोहार, कोष्टी यांचे धंदेहि चालत असत. सरकारी कामगार परगण्यांतील अगर इलाख्यांतील मुख्य गांवींच कायते आसावयाचे; पण इंग्रजी राज्यांत ही सर्व व्यवस्था बदलून जाऊन या 'ग्रामसंस्था' त्यांचें स्वातंत्र्य व त्यांपासून लोकांस होणारें सुख हीं उत्तरोत्तर लयास चाललीं आहेत. सर वुइल्यम वेडरबर्न यांचें मुख्यत्वेंकरून असें म्हणणें आहे कीं, इंग्रजी राज्यकर्त्यांनीं या ग्रामसंस्था मोडून टाकून सर्व कारभार आपल्या अधिकाऱ्यांच्या हातांत दिले हीच मोठी चूक केली; व यापासूनच लोकांवर जुलूम होत आहे. हल्लींच्या सुधारलेल्या सरकारास पाहिजे तशी व्यवस्था ग्रामसंस्थांकडून पाहिल्यानेंच झाली नसती; पण सरकारचें मनांत असतें तर सदर संस्था सुधारून त्यांचेच हातून हें काम हळूहळू सरकारास घेतां आलें असतें. तसें सरकारानें न करितां सर्व अधिकार चालविण्यासाठीं निरनिराळीं खातीं करून ते त्यांच्या हातांत दिले. ही गोष्ट राज्यकर्त्यांस व रयतेस अत्यंत अहितकारक आहे. उदाहरणार्थ, पहिल्यानें जमाबंदीचें खातें घेऊं. इंग्रजी राज्याच्या अमदानींत या खात्याची व्यवस्था कलेक्टराकडेसच असे; त्यामुळें प्रत्येक प्रांतास योग्य अशी व्यवस्थाच त्याचे हातून होत असे. धारवाड जिल्ह्यांतील काळी जमीन, रत्नागिरी जिल्ह्यांतील खडकावरील शेतें, आणि सिंधु नदीच्या कांठीं नदीच्या पुरानें पिकणारीं मळींचीं शेतें या सर्वांस जमाबंदीचे कोणतेहि नियम सारखे लागू पडावयाचे नाहींत. प्रत्येक जिल्ह्यांतील लोकांची व जमिनीची स्थिति लक्षांत आणूनच त्या त्या जिल्ह्याकरितां निरनिराळे नियम करावयास पाहिजेत. अव्वल इंग्रजींत अशी व्यवस्था होती; पण पुढें मोजणीखातें निराळें निघाल्यापासून तो सर्व प्रकार नाहींसा झाला; आणि जमिनीची प्रतबंदी आणि सारा ठरून तीस तीस वर्षांनीं सारे वाढविण्याची पद्धत सुरू झाली. एकदां कोणतेंहि खातें उत्पन्न झालें म्हणजे मग अर्थातच त्या खात्यांतील अधिकाऱ्यांस आपापल्या खात्याचा अभिमान चढतो व लोकांच्या नफानुकसानाकडे न पाहतां ते आपलें खातें कसें भरभराटींत येईल ह्यांच्या उद्योगास लागतात. सर्व्हे खात्याची हीच दशा झाली. पहिल्यानें निरनिराळ्या जिल्ह्यांतील लोकांस ज्या सवलती मिळत असत त्या सर्व नाहींशा झाल्या. पीक बरें येवो, वाईट येवो; प्रतबंदी होऊन ठरलेला कायमचा धारा प्रतिवर्षीं सक्तीनें वसूल करण्यांत येऊं लागला आणि लवकरच शेतकरी लोक पूर्वी सुखी होते ते

दरिद्रावस्थेस येऊन पोंचले. पुणे प्रांतांत तर विचाऱ्या लोकांनीं बंडच केलें. हा एवढा अनर्थ सर्व्हे खात्याचा होय. जमिनीची मोजणी करून नकाशे काढण्यापुरताच या खात्याचा अधिकार असता तर त्यापासून चांगला फायदा होता; पण सरासरीनें ठरविलेले धारे आणि प्रति तीस तीस वर्षीं दुपटीनें, तिपटीनें अगर सातपटीनें ते वाढविण्याची धास्ती, यानें शेतकीचा अगदीं चुराडा होऊन गेला आहे.

लोकांवर जुलूम होण्यास हेंच एक खातें आहे असें नाहीं. जंगल, मीठ, अबकारी, कालवा, देवी, रेजिस्ट्रेशन, शाळा, पोलीस आणि गांवसफाई यांनीं चोहोंकडून रयतेस भंडावून सोडलें आहे. तोळाभर मीठ अगर खारी माती काढीन म्हटलें तर सरकारचा शिपाई उभा आहेच! शेताबाहेर जरा गुरूं गेलेंच कीं जंगलचे अधिकाऱ्यांकडे खेपा घालून दंड भरून त्याची सुटका करून घ्यावी लागते. दारूचीं दुकानें त्यांच्या घरांत व बाजारांत बसविलीं जातात. इंग्रजसरकारच्या सर्व सत्तेचा मूर्तिमंत अवतार जो पोलिसचा शिपाई तो यमदूतासारखा त्यांच्या डोळ्यासमोर नेहमीं नाचत असतो. अशा स्थितींत कोणत्याहि राजाच्या रयतेस कधीं तरी सुख होईल कीं काय याचा लोकांनींच अजमास करावा, अशी सर वेडरबर्न यांची विलायतच्या लोकांस सूचना आहे. पूर्वीच्या राज्यांतून हे सर्व अधिकार रयतेकडे असत. जंगलांची, ताडामाडांची, गायरानांची, रामोशांची (पोलिसांची), मिठाची व आरोग्यसंरक्षणाची सर्व व्यवस्था जेथल्या तेथें आपआपल्या सवडीप्रमाणें व गरजेप्रमाणें जे ते लोक ठेवीत असत; पण आतां ती सर्व व्यवस्था इंग्रज सरकारनें बदलून टाकून लोकांस मीठ देण्याचा, झाडें राखण्याचा; व दारू पाजण्याचा आपणाकडे मक्ता घेतला आहे! आणि हा मक्ता चालवितेवेळीं सरकार आपल्या तिजोरीकडे कायतें लक्ष पुरवितें. यामुळें चोहोंकडून लोकांवर मोठा जुलूम होत आहे. व त्यांस हें सरकार नको व त्याचीं हीं खातींहि नकोत असें वाटूं लागलें आहे. गरीब बिचारा कुणबी, ज्यास पूर्वी आपल्या गांवांत हवें तें करण्याची मोकळीक होती, त्यांसच आतां घराबाहेर पाऊल पडलें म्हणजे मी कोणत्या खात्याच्या तडाक्यांत सांपडतों अशी धास्ती वाटूं लागली आहे. ही स्थिति फार दिवस कधींहि टिकावयाची नाहीं. निरनिराळ्या खात्याचे मुख्य अधिकारी व त्यांच्या हाताखालील छोट्या अधिकाऱ्यांच्या पलटणी यांस आपले विचार रुचावयाचे नाहींत असें सर वेडरबर्नसाहेब यांनीं स्पष्ट लिहिलें आहे; पण सदर अधिकाऱ्यांच्या हितापेक्षां रयतेचें हित ज्या पद्धतीनें होईल तीच पद्धत सरकारास स्वीकारली पाहिजे. हल्लीं सुशिक्षित नेटिव लोकांच्या इंग्रजी राज्यपद्धतीबद्दल ज्या कांहीं तक्रारी आहेत, त्यांतील मूळ बीज हेंच होय. एखाद्या आधाशी राजाप्रमाणें लोकांचें सर्व स्वातंत्र्य व अधिकार सरकारचीं निरनिराळीं खातीं पूर्णपणें बळकावून बसलीं आहेत. या राक्षसी खात्यांच्या जुलुमांतून रयतेची सुटका होईल अशी योजना करणें हें विला-

यतींतील लोकांचें पाहिलें कर्तव्य आहे. रयतेच्या पैशावर ज्यांचा सुखानें चरितार्थ चालतो असे सदर खात्यांतील अम्मलदार आपआपल्या खात्यांचा जुलूम कबूल करणार नाहींत इतकेंच नव्हें, तर उलट आपलें खातें व आपल्या जागा रयतेच्या सुखासाठींच निर्माण झाल्या आहेत असें भासविण्याचा प्रयत्न करितील; पण तिकडे लक्ष न देतां ऑनरे० दादाभाईंसारखे रयतेचे खरे हितकर्ते व मुखत्यार काय म्हणतात याचा विचार करून त्याप्रमाणें विलायतच्या लोकांनीं वर्तन ठेवावें अशी वेडरबर्नसाहेबांची त्यांस शिफारस आहे. सर वेडरबर्न यांचें म्हणणें अतिशयोक्तीचें व भ्रमिष्टासारखें आहे, असा आमच्याकडील इंग्रजी पत्रकारांनीं त्यांजवर आक्षेप केला आहे; परंतु शेतकी ॲक्टाच्या कमिशनानें मुंबईइलाख्यांतील साऱ्याच्या पद्धतीविषयीं दिलेलें मत, आणि गुदस्तां प्रसिद्ध झालेला जंगलखात्याबद्दलचा मुंबईसरकारचा ठराव पुनः एकवार वाचला असतां त्या खात्याबद्दल सर वेडरबर्न यांनीं जें म्हटलें आहे तें अक्षरशः यथार्थ आहे अशी कोणाचीहि खात्री होईल.

सरकारी खात्यांचा हा असह्य जुलूम टाळण्याकरितां सर वेडरबर्न यांनीं तीन उपाय सुचविले आहेत. पहिला, कायदेकौन्सिलाची सुधारणा करणें हा होय. सर वेडरबर्न यांचें असें म्हणणें आहे कीं, सरकारच्या खात्यांचा जुलूम अगर अम्मल यथास्थित चालावा म्हणून कायदेकौन्सिलाकडून दरवर्षीं पुष्कळ कायदे पास करून घेण्यांत येतात. कोणत्यातरी खात्यांतील ऑफिसरांस जास्त अधिकार देण्याकरितां सदर खात्याची अम्मलबजावणी जास्त व्हावी म्हणून, अगर त्या खात्याचें उत्पन्न वाढावें म्हणून सरकारास पुष्कळ नवे नवे कायदे करावे लागतात. आजपर्यंत पास झालेल्या कायद्यांपैकीं निम्मेपेक्षां जास्त किंबहुना पाऊण हिस्सा कायदे अशा प्रकारचे आहेत. मिठाचा कायदा, जंगलाचा कायदा, मोहाच्या फुलांचा कायदा, गांवआरोग्यरक्षणाचा कायदा, पोलीसचा कायदा, देवी काढण्याचा कायदा, व या सर्व कायद्यांची दुरुस्ती करण्यासाठीं वेळोवेळीं पसार झालेले कांहीं इतर कायदे हे पाहिले म्हणजे सर वेडरबर्न यांच्या म्हणण्याचा सत्यता प्रत्ययास येते. कायदेकौन्सिलांत लोकांचे खरेखुरे प्रतिनिधी असतील तर लोकांचे हक्क व स्वातंत्र्य बुडविण्यासाठीं निरनिराळ्या खात्यांस अधिकार देण्याकारतां असले कायदे, कायदेकौन्सिलांतून पास व्हावयाचे नाहींत; व मग सदर खात्यांचा जुलूम अर्थातच कमी होईल. ग्रामसंस्थेची रचना सुधारून सदर संस्था पुनः उदयास आणाव्या, हा दुसरा उपाय होय. स्थानिक स्वराज्याच्या व्यवस्थेंत म्युनिसिपालिट्या व बोर्डें यांजकडे किरकोळ अधिकार देण्यांत आले होते. तींच व्यवस्था जंगल, अबकारी वगैरे खात्यासंबंधानें करून लोकांवर होणारा जुलूम कमी केला पाहिजे. जंगलासंबंधीं जी कांहीं व्यवस्था करणें इष्ट असेल, तींच ग्रामसंस्थेच्या मार्फत झाली म्हणजे लोकांस सोईवार पडून ते खुषी

राहतील. तिसरा उपाय, कलेक्टरांस अव्वल, इंग्रजींत जसें स्वातंत्र्य होतें, त्याप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यापुतें त्यांस आतांहि स्वातंत्र्य देऊन लोकनियुक्त ग्राम-संस्था, कामट्या, बोर्डें व कायदेकौन्सिलें यांच्या अनुमतानें व सल्ल्यानें काम करण्यास त्यास मोकळीक व समजुत दिली पाहिजे. या तिन्ही गोष्टी अमलांत आल्यावर हिंदुस्थानचे लोक इंग्रजी राज्यास सेदैव खुषी राहून इंग्रजी राज्याचें नेहमीं अभिष्ट चिंतन करतील असें सर वेडरबर्नसाहेबांचें म्हणणें आहे. कोण-त्याहि सुशिक्षित हिंदूस विचारा, कीं तो रशियापेक्षां इंग्रजराज्यकर्तेच बरें असें साफ सांगेल, आतां इंग्रजीराज्यकर्त्यांनीं आपण होऊन जर रयतेवर होत अस-लेला जुलूम दूर करण्याचे उपाय योजले नाहींत, तर हा दोष सर्वांशीं त्यांच्या-कडेसच आहे. रयतेस सुखानें नांदवा म्हणजे रशियावरोबर भांडण्यास तुम्हांस ते मनोभावें करून मदत करतील व इंग्रजीराज्यास कोणाहि परकीय राजाची भीति बाळगण्याचें कारण राहणार नाहीं. सर वेडरबर्न यांनीं केलेला हा उपदेश विला-यतच्या लोकांनीं नीट मनन करावा अशी आमचीहि त्यांस विनंती आहे.

❁ ❁ ❁

* ज्यूरीप्रकरण

श्रुताध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ।
राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रे च ये सभाः ॥

या याज्ञवल्क्यवचनारून सभासदांच्या मार्फत न्याय देण्याची पद्धत आमच्या हिंदुस्थानांत प्राचीनकाळीं अमलांत होती असें सिद्ध होतें. कोणच्याहि व्यवहा-राचा निर्णय करतांना हुशार, प्रामाणिक आणि निःपक्षपाती, तीन, पांच अगर सात सभासद, अगर पंच निवडून त्यांच्या सल्ल्यानें राजानें निकाल करावा हा धर्मशास्त्राचा परंपरागत आलेला नियम आहे. प्रत्येक ज्ञातींत पंचांची अगर महाजनांची जी योजना होत असते, ती याच नियमास अनुसरून होय मुसल-मानी राज्य झाल्यानंतर हिंदुधर्मशास्त्रास कोर्टांतून जरी मिळावा तितका मान मिळत नव्हता, तरी लोकांनीं आपल्या जुन्या पद्धती कायम ठेऊन आपापसां-तील तंट्याचा निकाल आपापल्या जातींत पंचामार्फत करून घेण्याची वहिवाट कायम ठेविली होती. पांचामुखीं परमेश्वर अशी म्हण अद्यापहि प्रचारांत आहे. यावरून ज्यूरीची पद्धत इंग्रजसरकारानें आमच्या देशांत अपूर्व चालू केली. ज्यूरीनें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें खोटें ठरतें. ज्यूरी अगर पंच यांचें स्वरूप एकच आहे. हल्लींच्या पद्धतप्रिमाणें ज्यूरीस कायद्याच्या कलमानें थोडेंसें व्यव-

[केसरी ता. ३१ जानेवारी १८९३]

स्थित रूप आलें आहे इतकेंच; बाकी वस्तुतः ही पद्धत प्राचीन असून तिचा या देशांत अंमलहि चालू होता हें निर्विवाद आहे. गेल्या राष्ट्रीयसभेपुढें बाबू गुरुप्रसादसेन यांनीं ज्यूरीच्या ठरावावर जें भाषण केलें, त्यांत या प्रश्नाचा नीट खुलासा केला आहे.

आतां इंग्रजांनीं पहिल्यानें इकडे ज्यूरीचीं पद्धत कशी सुरू केली तें पाहूं. खुद्द इंग्लंडांत ही पद्धत फार दिवसांपासून सुरू आहे; व ती तेथील लोकांनीं मोठ्या प्रयासांनीं संपादिली आहे. आपण दोषी अगर निर्दोषी याचा निकाल आपल्या बरोबरीच्या जातभाईंकडूनच करून घेणें हा आपला हक्क आहे, असें प्रत्येक इंग्रज मनुष्य समजतो व या हक्कास जर कोणी प्रतिबंध करूं लागला तर त्यास मोठा त्वेष येऊन तो प्रतिबंध करणाराचा चांगला समाचार घेतल्याखेरीज राहणार नाहीं. कोणच्याहि जातीच्या पांच शहाण्या लोकांनीं न्याय केला तर आम्हांस कबूल होईल; पण इंग्रजांची तऱ्हा याहून विलक्षण आहे. त्यांस आपल्याच जातीचे पंच लागत असतात! व इलबर्ट बिलाच्या वेळीं त्यांनीं जें अकांडतांडव केलें तें स्वजातीय न्यायाधीश आणि असावेत म्हणूनच. पंच स्वजातीय असले व खटला विशेषेंकरून नेटिव इंग्रजांमधील असला म्हणजे ही न्यायमूर्ति आपला शहाणपणा व निःपक्षपातीपणा कसा व्यक्त करते हें सर्वांस महशूरच आहे; याबद्दल येथें निराळें सांगणें नको. प्रस्तुतच्या विषयास त्याची फारशी जरूरी नाहीं; करतां ज्यूरीची पद्धत हिंदु लोकांकरितां पहिल्यानें इकडे कशी प्रचारांत आणली या मुख्य मुद्याकडे वळूं.

सन १८६२ सालीं ही पद्धत फौजदारी काम चालविण्याच्या कायद्यानें इकडे चालू करण्यांत आली; परंतु त्यावेळीं सर्व ठिकाणीं सर्व गुन्ह्यांचा पंचमार्फत निकाल देण्याचें न ठरवितां फक्त मुख्य मुख्य ठिकाणीं कांहीं गुन्ह्यांची चवकशी मात्र जज्जांनीं ज्यूरर अगर असेसर नेमून करावी असें ठरविण्यांत आलें. इंग्रज सरकारनें मेहेरबान होऊन आपल्या समजाप्रमाणें आम्हांस जो हा अपूर्व हक्क दिला, तोहि अशा तऱ्हेनें अगदीं अपुरा होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांतून युरोपियन लोकांस आपल्या जातीचे ज्यूरर असावेत असें मागण्याचा ज्याप्रमाणें हक्क आहे, याप्रमाणें नेटिव्हांस हक्क दिला नव्हता. नेटिव्हांचा न्याय करण्यास कोणत्याहि जातीचे ज्यूरर असले तरी चालतात; युरोपियन लोकांस मात्र त्यांच्या जातीचे एकंदर ज्यूरर पैकीं निदान निम्मे तरी ज्यूरर असावेत असा आग्रह धरतां येतो. असो. नेटिवांस हा जो या सालीं अधिकार दिला तो त्यांनीं आजपर्यंत कसा बजावला व तो कमी करण्यास, काढून घेण्यास, अगर वाढविण्यासं, कांहीं कारण झालें आहे कीं नाहीं याचा हल्लीं वाद आहे; तेव्हां त्या वादांत सरकारच्या वतीनें काय काय प्रमाणें पुढें आलीं आहेत त्यांचा प्रथमतः विचार करूं.

सरकारनें आपली बाजू बळकट करण्यासाठीं एक मोठा लांबलचक खलिता तयार करून तो सेक्रेटरी ऑफ स्टेट यांजकडे पाठविला आहे व त्यांत आपल्या तर्फेचीं सर्व प्रमाणें दाखल केलीं आहेत. हा खलिता पाहिला म्हणजे सरकारची सर्व बाजू लक्षांत येते व त्यांत दिलेल्या कारणांपेक्षां सरकारचें सध्यांचें जुलमी वर्तन बरोबर आहे असें दाखविण्यास दुसरें कारण क्वचितच सांपडेल. सरकारानें प्रथमतः बंगाल्यांत पोलिसखात्याची चौकशी सुरू केली व त्या चौकशींत ज्यूरी वाईट आहेत असें ठरवून आमच्या हक्कावर ही गदा आणली ही गोष्ट आतां प्रसिद्ध झाली आहे. गुन्हेगार सुटतात ते पोलिसच्या कसुरीनें कीं ज्यूरीच्या पक्षपातानें याची आमच्या मतें ह्यापेक्षां जास्त चांगली चौकशी व्हावयास पाहिजे होती; परंतु लॉर्ड लॅंडसडाऊन व सर चार्लस इलियट यांच्यासारख्या अरेरावी व कोत्या दृष्टीच्या अम्मलदारांस इतक्या खोल पाण्यांत शिरण्याची मुळींच जरूर वाटली नाहीं. ज्यूरीची पद्धत वाईट आहे असा ध्वनि निघाला न निघाला तोंच या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्याचा फायदा घेऊन स्थानिक स्वराज्याचे नेटिव्हांस जे हक्क मिळाले होते, त्यांपैकीं एक महत्त्वाचा हक्क परत घेण्यास सुरुवात केली. हें कृत्य करतेवेळीं यावद्दल कांहीं गवगवा होईल असें यांच्या स्वप्नींहि नव्हतें; परंतु हा अधिकाराचा अम्मल लवकरच दूर झाला. विलायतेंतील पत्रांनींहि सर चार्लस इलियट व लॉर्ड लॅंडसडाऊन यांची कृति अप्रयोजक व मूर्खपणाची आहे असें ठरविलें; तेव्हां केलेल्या कृत्याचें कसें तरी मंडण करावें म्हणून हा खलिता बाहेर काढला आहे. गव्हरनरसाहेबांस सुचलेली ही पश्चाद्बुद्धि अगर कारणें कितपत सयुक्तिक असतील हें सांगावयास नकोच. विलायतेंतील मोठमोठ्या वर्तमानपत्रकारांनीं ह्या खलित्यांतील कारणें अपुरीं व निर्बल आहेत असें स्पष्ट लिहिलें आहे. नेटिव्ह लोकांचा ज्यूरीचा अधिकार कमी करण्याचें पहिलें कारण असें आहे कीं, खुनाचे गुन्हे नेटिव्ह ज्यूररच्या हातून जशा तऱ्हेनें निकालास लागावे तशा तऱ्हेनें निकालास लागत नाहींत. मनुष्याचा जीव घ्यावयाचा म्हणजे नेटिव्हास मोठी भयंकर गोष्ट वाटते व ज्या गुन्ह्यास फांशीची शिक्षा आहे, त्यांत आरोपीस दोषी ठरविण्यास ते प्रवृत्त होत नाहींत. गव्हर्नरसाहेबांची ही युक्ति वस्तुस्थितीस किती अनुसरून आहे हें त्यांनीं आपल्या खलित्यांत स्पष्ट करून दाखविलें असतें तर बरें झालें असतें. ज्यूरीनें सर्व जिल्ह्यांतून खुनाची चौकशी होते असें नाहीं. हिंदुस्थानच्या बहुतेक जिल्ह्यांत मॅजिस्ट्रेट व सेशनजज्ज हेच गुन्ह्याची चौकशी करतात. तेव्हां पहिला मुद्दा असा निघतो कीं, खुनाचे शेंकडा किती खटले मॅजिस्ट्रेटाच्या हातून सुटतात व किती खटले ज्यूरीच्या हातून सुटतात. सरकारी खलित्यांत ह्याचें जें प्रमाण दिलें आहे त्यावरून मॅजिस्ट्रेटापेक्षां ज्यूरर लोक आरोपीस अधिक वेळां सोडून देतात असें होतें; पण एवढ्यावरून ज्यूरीची पद्धत वाईट आहे, हें म्हणणें अगदीं अडाणीपणाचें आहे. ज्यूरीची पद्धत बरी अगर वाईट

ठरविण्यासाठीं तिची मॅजिस्ट्रेटांच्या कामाशीं तुलना करणें रास्त नाहीं. मॅजिस्ट्रेट मनःपूत न्याय करतात. एखादा मॅजिस्ट्रेट तऱ्हेवाईक असतो; एखाद्याचें डोकें बिघडलेलें असतें; एखादा भारीच संशयखोर असतो; व एखाद्यास तर कारणीभूतांचीं भुतें दृष्टीस पडतात. तेव्हां अशा व्यक्तींच्या हातून आपला न्याय करून घेण्यापेक्षां आपल्याच ज्ञातीचे व धर्माचे दहापांच शहाणे मिळून जो न्याय करतील तो बरा असें कोणासहि वाटणें साहजिक आहे. ज्यूरीच्या पद्धतीचें मूलतत्त्व हेंच आहे. एका शहाण्यापेक्षां पांच शहाणे चांगले हें तत्त्व एकदां मान्य केलें म्हणजे मग पांच शहाण्यांनीं शेंकडा ७५ लोक दोषी ठरविले व एक शहाणा शेंकडा ९० लोक दोषी ठरवितो ही कोटी अगदीं अप्रयोजक ठरते. पांच शहाण्यांचा न्याय जर चांगला, तर मग एक शहाण्याचा न्याय सामान्य रीतीनें वाईट असेंच म्हणावें लागतें. करितां मॅजिस्ट्रेट लोक ज्यूरीपेक्षां शेंकडा ज्यास्त आरोपींस जर दोषी ठरवीत असले तर ही मॅजिस्ट्रेटांची चूक आहे, ज्यूरीची नव्हे, असेंच अनुमान केलें पाहिजे. हिंदुस्थासरकार आपले मॅजिस्ट्रेट शहाणेसुते आहेत असें पहिल्यानें गृहित धरून मग या न्यायमूर्तींच्या शहाणपणाच्या मापानें ज्यूरी किती शहाणी ठरते ह्याचें अनुमान करतें; पण ह्या मॅजिस्ट्रेटास शहाणपणाची सनद कोणीं आणि कशासाठीं दिली व ते करतील तोच सोळा आणे न्याय असें कां मानावें यास खलियांत कांहीं कारण दिलें नाहीं. पांचामुखीं परमेश्वर हें आमचें तत्त्व आहे, व हें तत्त्व गृहित धरून मॅजिस्ट्रेट शहाणे किंवा मूर्ख हें आम्ही तपासणार. जगांत सत्य अमक्यासच सांपडलें आहे, असा कोणीं अभिमान धरूं नये. त्यांतूनहि नित्य व्यवहारांत ज्या गोष्टी घडतात त्यांचा विचार करून त्यांतील सार काढणें हें काम एका मॅजिस्ट्रेटापेक्षां व्यवहारचतुर पांच लोकांकडून अधिक चांगलें होण्याचा संभव आहे. प्रजेस न्याय द्यावयाचा तो त्यांच्या समजुतीप्रमाणें योग्य मिळाला पाहिजे यांतच त्यांचा संतोष असतो, हें राजकीय तत्त्वहि असल्या प्रसंगीं लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रजाजनांत हुशार, अनुभवशीर व व्यवहारज्ञ लोक जेथें जेथें मिळण्याचा संभव आहे, तेथें तेथें ते करतील तोच न्याय, व मॅजिस्ट्रेटचें मत निराळें असल्यास तो व्यक्तीचा तऱ्हेवाईकपणा असेंच समजलें पाहिजे. खेरीज पुरावा कमी अगर संदिग्ध असल्यास त्या पुराव्यावरून एका निरपराधी मनुष्यास शिक्षा होण्यापेक्षां नव्याण्णव गन्हेगार सुटले तरीहि चालेल, असें जें इंग्रजी फौजदारी कायद्याचें तत्त्व आहे, तेंहि येथें लागू केलें पाहिजे. खुनासारख्या गुन्ह्यांच्या खटल्यांत जरूर तेवढा पुरावा गोळा करण्याचें काम पोलिसाचें आहे. पोलिसानें आपल्या कामांत हयगय केली व पुरावा कमी भरला तर त्याचा दोष ज्यूरीकडे नाहीं. लटपटित पुराव्यावर आरोपीस दोषी ठरविण्याचें साहस मॅजिस्ट्रेटाकडून होईल; ज्यूरीकडून व्हावयाचें नाहीं हें उघड आहे; परंतु असलें साहस ज्यूरीचे हातून होत नाहीं. म्हणून ज्यूरीस दोषी ठरविण्यापेक्षां हा त्याचा गुण समजून

मॅजिस्ट्रेटास त्याबद्दल दोषी ठरविणें हें अधिक न्यायाचें व समंजसपणाचें होईल. इंग्लंडांत ज्यूरीची पद्धत सर्व गुन्ह्यांस सर्व ठिकाणीं सारखीच लागू आहे. तेथील ज्यूरीनें केलेले निकाल हिंदुस्थानसरकारनें लिहिल्याप्रमाणें नुसत्या एकलकोंड्या मॅजिस्ट्रेटानें दिलेल्या निकालाशीं जर ताडून पाहिले, तर काय निष्पन्न होईल याचा हिंदुस्थानसरकारानें बिलकुल विचार केला नाहीं. खुद्द विलायतेंतील प्रसिद्ध वर्तमानपत्रकर्ते असें म्हणतात कीं, इंग्रजी ज्यूरीचे निकालांत जर ही कसोटी लावली तर विलायतेंतल्या ज्यूरीहि नालायक ठरतील. हें जर खरें असेल तर हिंदुस्थानांतील ज्यूरीचीच मॅजिस्ट्रेटाशीं तुलना करण्याचें साहस केवळ कोणी विचारतासवरता नाहीं म्हणूनच हिंदुस्थानसरकारचे हातून घडलें असावें असें म्हणावें लागतें. मॅजिस्ट्रेटच्या निकालांची आणि ज्यूरीच्या निकालांची तुलना करणें म्हणजे लोकांच्या डोळ्यांत निव्वळ धूळ टाकणें होय. ज्यूरीची पद्धत नुसत्या मॅजिस्ट्रेटच्या पद्धतीपेक्षां अनेक कारणांनीं अधिक सोयीची, ग्राह्य व लोकप्रिय झालेली आहे. हीं सर्व कारणें बाजूस ठेवून निव्वळ मॅजिस्ट्रेटाप्रमाणें ज्यूरी आरोपी लोकांस दोषी ठरवीत नाहीं म्हणून ज्यूरीच्या हक्कावर गदा आणणें हें हिंदुस्थानांतल्या बादशाही अम्मलदारांखेरीज कोणाच्याहि डोक्यांत येणार नाहीं. या देशांत ज्यूरीची पद्धत चांगली चालते कीं नाहीं याची खरोखरच परीक्षा करावयाची असल्यास ज्यूरीची व मॅजिस्ट्रेटची तुलना न करितां ज्यूरी-ज्यूरीची—आमच्या देशांतील ज्यूरींची व इतर देशांतील ज्यूरींची—तुलना केली पाहिजे. मॅजिस्ट्रेटापेक्षां ज्यूरी बरी अथवा एकापेक्षां पांच बरे हें कायद्याचें ठाम तत्त्व आहे. तें फिरवावयाचा प्रयत्न जुलमी राजाखेरीज इतर कोणाच्यानेंहि व्हावयाचा नाहीं. आमच्या देशांतील ज्यूरी खटल्यांचे निकाल चांगले करिते कीं वाईट करिते, याची वास्तविक परीक्षा करणें असेल तर इंग्लंडांत अमेरिकेंत काय प्रकार होतो तो पहा. इंग्लंडांत ज्यूरीपुढें जे खुनाचे खटले येतात त्यांपैकीं शेंकडा पन्नास खटले सोडून दिले जातात, हें गुरुप्रसादसेन यांनीं राष्ट्रीयसभेंतील आपल्या भाषणांत स्पष्ट सांगितलें आहे. यापेक्षां जास्त खटले आमच्या ज्यूरी कधींहि सोडून देत नाहींत. तेव्हां त्यांस विनाकारण दोषी ठरविणें म्हणजे एक तर गरीब विचाऱ्या हिंदुस्थानांतील प्रजेस हवें तसें वागाविणें, अगर त्यांच्यावर हवा तसा अम्मल करण्यासारखें आहे. विलायतेंत असला पोकळ कोटिक्रम अगर तुलना कोणीहि ऐकावयाचे नाहींत इतकेंच नव्हे, तर असल्या वेड्यावांकड्या कोट्या लढवून ज्यूरीचा हक्क कमी करावा असें जर कोणी प्रतिपादन करील, तर तो आपणांस लोकांच्या उपहासास, तिरस्कारास व अवहेलनेस पात्र करून घेईल. एकदां दिलेले हक्क अशा तऱ्हेनें परत घेण्याचा प्रयत्न करणें म्हणजे निव्वळ दांडगाईचें काम आहे व अशा तऱ्हेनें बड्या कामागाराच्या मनांत येईल तेव्हां जर लोकांस दिलेले हक्क काढून घेतां आले तर राज-

कीय उन्नतीची शाश्वती न राहतां राजाकडून मिळालेले हक्क केव्हां परत घेतले जातील याचा नियम न राहून लोक नेहमीं अस्वस्थ व नाराजी असतील. हिंदुस्थानचे लोक अशा स्थितींत असावे कीं नाहीं याचा विचार आमच्यापेक्षां राज्यकर्त्यांसच जास्त केला पाहिजे व तो केलेल्या कृतीचें मंडन करण्याच्या भरांत हिंदुस्थानसरकाराकडून न झाला तरी विलायतसरकाराकडून होईल अशी आमची उमेद आहे. हिंदुस्थानसरकारच्या खलित्यांत दुसरे जे मुद्दे आहेत त्यांचा विचार पुढें करूं.

* * *

* ज्यूरीप्रकरण

गेल्या खेपेस या प्रकरणांपैकीं एका मुद्याचा विचार केला होता. ज्यूरीची पद्धत एकट्या न्यायाधीशाच्या पद्धतीपेक्षां सोईची, हितावह व ग्राह्य आहे; म्हणून दोघांची तुलना करून ज्यूरीचे गुणदोष ठरविणें योग्य नाहीं असें मागें सांगितलेंच आहे. या प्रश्नाचा खरोखर विचार म्हटला म्हणजे राजकीय हक्क या नात्यानें झाला पाहिजे, व कोणाहि इंग्रज गृहस्थास याहून अन्य तऱ्हेनें या प्रश्नाचा निकाल करणें आवडणार नाहीं. हिंदुस्थानसरकारास असा विचार करितां येत नव्हता असें नाहीं; पण निजलेल्यास जागें कोण करणार असें म्हणतात त्याप्रमाणें सरकारनें मुद्दाम होऊन जेव्हां या मुद्याकडे डोळेझांक केली आहे तेव्हां त्यांच्या नजरेस ही गोष्ट कशी येणार ? ज्यूरीच्या प्रकरणांत खरा मुद्दा एके बाजूस ठेवून भलभलत्याच मुद्यांवर हायकोर्टांतील जजांचे अभिप्राय आणवून सरकारानें विनाकारण पुंडाई चालविली आहे ही गोष्ट आम्हांस विलायतेंतील लोकांच्या लक्षांत आणून दिली पाहिजे. न्याय न्याय म्हणजे कांहीं देवदत्त वस्तू नाहीं. न्यायाधीशानें केलेला न्याय मनुष्यच करितात व ज्यूरीच्या हातून झालेला न्यायहि मनुष्याकडूनच होतो, तेव्हां कोणताहि न्याय करण्यास एकापेक्षां पांच जाणते गृहस्थ चांगलें हें कोणीहि कबूल करील. सरकारास तें दिसलें नाहीं अगर सरकाराकडून आलेल्या प्रश्नांस उत्तरें देतांना नामदार तेलंगासारख्या जजांनीं ह्याचा विचार केला नाहीं म्हणून आपणांस स्वस्थ बसतां कामा नये. वादाचा जो खरा मुद्दा असेल तो प्रतिपक्षानें लपवून ठेविला तरी आपण होऊन तो पुढें आणणें हें आपलें कर्तव्य आहे.

आतां सरकारी खलित्यांतील दुसऱ्या मुद्यासंबंधानें विचार करूं. ज्यूरीची पद्धत सुरू केल्यामुळें ज्यूरर लोक आरोपीविरुद्ध पुरावा असूनहि कधीं कधीं धर्मभोळेपणानें, कधीं कधीं जात्याभिमानानें व कधीं कधीं आरोपीस पुढें होणाऱ्या

---

* [केसरी—ता. ७ फेब्रुवारी १८९३]

कडक शिक्षेस भिऊन गुन्हेगार लोकांस सोडून देतात, व त्यामुळें फौजदारी कायद्याची अम्मलबजावणी नीट होत नाहीं असें सरकारचें म्हणणें आहे. गुजराथ वगैरे प्रांतांतून कोणत्याहि जिवाची हत्या न करण्याकडे लोकांची स्वाभाविकच प्रवृत्ति असल्यामुळें फांशीची शिक्षा देण्यास ज्यूरर लोक कचरतात व व अशा खटल्यांत प्रायः आरोपीस सोडून देतात, असेंहि कित्येक जजांचें व सरकाराचें म्हणणें आहे. हें म्हणणें कितपत खरें आहे याचीच प्रथमतः शंका आहे; पण हें खरें आहे असेंहि घेऊन चाललें तरी त्यांत ज्यूरर लोकांच्या दोषापेक्षां सरकारी कायद्याचा दोष अधिक आहे, असें म्हणावें लागतें. विलायतेंतहि माजी जान ब्राईटसारखे कांहीं लोक फांशीची निर्दय शिक्षा कायद्यांत अजीबात नसावी असें म्हणणारे आहेत. जिवास जीव घेणें हा शिक्षेचा अगदीं रानटी, खुनशी आणि निर्दय मार्ग आहे. राष्ट्राराष्ट्रांतील तंटे लढाई न करितां पंचमार्फत अगर कोर्टमार्फत निकालास लावावे येथपर्यंत ज्या लोकांच्या भूतदयेची आणि नीतिमत्तेची मजल आली आहे, त्यांनीं पशूप्रमाणें एखाद्यानें खून केला असतां त्याचा उलट खून करावा हें आम्हांस अगदीं स्वभावाविरुद्ध भासतें. इंग्रजलोक भूतदयेच्या बाबतींत हिंदु लोकांपेक्षां कित्येक शतकें मागें आहेत ही गोष्ट कोणाहि विचारी मनुष्यास कबूल केली पाहिजे. या लोकांच्या रानटी कायद्याचा अंमल करण्यास एकादा जैन अगर श्रावक ज्यूरर धजावला नाहीं तर त्यांत दोष कोणाचा बरें, ज्या लोकांत भूतदयेच्या तत्त्वाचा इतका प्रसार झाला आहे कीं, कीड–मुंगीचीसुद्धां जे हत्या करीत नाहींत त्यांच्यांत खुनी लोक तरी किती सांपडणार? एकादा सांपडलाच तर त्यास फांशीपेक्षां जन्मठेपीची शिक्षा देण्यास कोणती हरकत आहे? इंग्रज लोकांपेक्षां आम्ही कांहीं बाबतींत अधिक सुधारलेले आहों हें म्हणणें कित्येकांस अपूर्व वाटेल; पण विचारांतीं आम्हीं लिहिलेला सिद्धांतच खरा आहे असें नजरेस येईल. आमच्या अंगांत नुक्त्याच सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांत जी धमक आहे ती हिंदुस्थानच्या हवेमुळें फार दिवस राहिली नसेल; पण अहिंसा, इंद्रियदमन, सुरापाननिषेध इत्यादि बाबतींत पशुवत् आचरण करण्याचें आम्हीं सोडून दिलें आहे. ह्याचा आम्हीं जितका अभिमान ठेवावा तितका थोडाच. या गोष्टी आमच्यापासून उलट आमच्या राज्यकर्त्यांनीं घेण्याजोग्या आहेत; सबब हिंसेस भिऊन आरोपीस फांशी न देतां काळेपाण्यावर पाठवावा असे जर कोणी ज्यूरर म्हणेल, तर त्याकरितां त्याचा ज्यूरर होण्याचा अधिकार काढून घ्यावा हें म्हणणें अगदीं वेडगळपणाचें आहे. त्यांतूनहि अशा रीतीचीं पुष्कळ उदाहरणें घडत असतीं तर गोष्ट निराळी. एखाद्या प्रांतांत एखाद्या ठिकाणीं कांहीं लोक अशा तऱ्हेचे आहेत, म्हणून हिंदुस्थानांतल्या सर्व लोकांचा ज्यूरीचा हक्क काढून घेण्यास अगर बराच कमी करण्यास सरकारनें प्रवृत्त व्हावें ही निव्वळ दांडगाई आहे.

जात्यभिमानानें कांहीं ज्यूरर लोक स्वजातीय अपराध्यांस सोडून देतात व ब्राह्मण अपराधी असतां हा प्रकार विशेष आढळून येतो असें जें सरकारी खलित्यांत लिहिलें आहे तेंहि याच मासल्याचें होय. हें म्हणणें अगदीं निर्मूल व खोडसाळपणाचें आहे, असें बंगल्यांतील लोकांनीं विलायतसरकारास जो अर्ज पाठविला आहे, त्यांत सप्रमाण सिद्ध केलें आहे. ब्राह्मण ज्यूररनीं ब्राह्मण अपराध्याची खुनाकरितां चवकशी करण्याचें प्रसंग फारच थोडे येतात; परंतु जे कांहीं थोडेबहुत प्रसंग आले आहेत, त्यांत सरकारानें निर्दिष्ट केल्याप्रमाणें एकहि उदाहरण घडून आलेलें नाहीं. उलट ब्राह्मण ज्यूररांनीं ब्राह्मणांस अपराधी ठरविलें असतांहि हायकोर्टाकडून त्याची सुटका झाली अशीं उदाहरणें सांपडतात. तेव्हां सरकारानें आपल्या खलित्यांत जाणूनबुजून खरे मुद्दे सोडून देऊन भ्रमोत्पादक, निराधार, निर्मूल आणि खोट्या गोष्टी लिहून आपल्या पक्षाचे समर्थन केलें आहे असें उघड होतें. हिंदुस्थानांतील ज्यूरीची विलायतच्या ज्यूरीशीं तुलना केली तर आमच्या ज्यूरीचे निकाल अयोग्य ठरवितां येत नाहींत. जात्याभिमानानें पुराव्याकडे न बघतां आम्ही आरोपीस दोषी अगर दोषमुक्त ठरवींत नाहीं. भूतदयेनें आरोपीस मुक्त करणारे लोकहि सर्वत्र आहेत असें नाहीं, मग हा आम्हांस पूर्वी दिलेला राजकीय हक्क काढून घेण्यास काय कारण आहे ? सरकारचा अगर कांहीं बड्या सरकारी कामगारांचा अभिमान, दुराग्रह आणि कोती बुद्धि याखेरीज दुसरें कोणतेंच कारण संभवत नाहीं. विलायतेंतील मोठमोठ्या पत्रकारांनींहि आपलें मत असेंच दिलें आहे.

बरें; सरकारास फौजदारी कायद्याची चांगली अम्मलबजावणी होऊन रयतेस न्याय मिळावा अशी खरोखरच इच्छा आहे असें म्हणावें तर युरोपियन ज्यूरर लोक युरोपियन अपराध्यांचा कोणत्या तऱ्हेनें न्याय करतात इकडें सरकारानें लक्ष द्यावयास नको होतें काय? नेटिव्ह ज्यूररांत कांहीं दोष नसतील असें आम्ही म्हणत नाहीं; पण त्यांच्यापेक्षां युरोपियन ज्यूरर शतपट वाईट असतांहि तिकडे सरकारची अद्याप नजरहि जात नाहीं हें आश्चर्य नव्हे काय? हे युरोपियन ज्यूरर कित्येक वेळां जो न्याय करतात तो ऐकून अंगावर शहारा येतो; पण हे सर्व भयंकर प्रकार आमच्या न्यायाळू व ममताळू सरकारास खपतात. आणि एखाद्या नेटिव्ह ज्यूररानें कधीं कोठें फाशीपेक्षां काळ्यापाण्याची शिक्षा बरी असें म्हटलें असल्यास तें मात्र यांस खपत नाहीं, ह्याचें अम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. अपराध्यांस योग्य शिक्षा होऊन प्रजेचें चांगलें संरक्षण व्हावें अशी काळजी वाळगणारानें माकडांप्रमाणें अगर अस्वलाप्रमाणें गौरवालकाकडून आमचे खून करविण्याच्या सवलती ठेवल्या हें त्यांस, त्यांच्या कायद्यास, त्यांच्या ब्रीदास आणि त्यांच्या सुधारलेल्या राज्यपद्धतीस लांछनास्पद नव्हे काय? लॉर्ड लॅंडसडाऊन व सर चार्लस इलियट यांच्या अंगांत जर कांहीं धमक असेल तर हल्लींचा नसता

'अव्यापारेषु व्यापार' सोडून देऊन त्यांनीं युरोपियन ज्यरी व यूरोपियन अपराधी यांच्या कृत्यांचा तपास करून आपल्या जातभाईंची परवा न धरतां त्यांत सुधारणा करण्यास झटावें अशी आमची त्यांस विनंती आहे. हल्लीं त्यांनीं जो बखेडा माजाविला आहे तो अगदींच अश्लाघ्य होय. हिंदुस्थानांत ज्यूरीची पद्धत सर्वत्र सारखी नाहीं. कांहीं ठिकाणीं खुनाचे खटले ज्यूरीकडे देण्यांत येतात, व कांहीं ठिकाणीं देण्यांत येत नाहींत; तेव्हां सर्वत्र एकच पद्धत सुरू ठेवण्याच्या हेतूनें कित्येक ठिकाणच्या ज्यूरीचे हक्क कमी करावे लागले अशीहि एक कोटी आहे; पण इतर कारणांप्रमाणेंच ही कोटीहि अगदीं अप्रयोजक आहे. सर्वत्र सारखेपणा आणावयाचा असल्यास पुढें गेलेल्याच्या पायावर धोंडा घालण्यापेक्षां मागच्यास मदत देऊन पुढें ढकलावा हें बरें; परंतु हिंदुस्थानसरकारास जर पिछेहाट करण्याचीच कोटी कबूल असेल तर निदान सर्व ठिकाणीं तरी ती लागू करावी. इंग्लंडसारख्या मोठ्या राष्ट्राचीं राज्यसूत्रें चालविणाऱ्या मुत्सद्यासही पांच सहा हजार रुपये पगार मिळत नाहीं. मग व्हाइसरायांसच वीस हजार कशाला? बंगाल्यांत लेफ्टेनंट गव्हरनरनें काम भागतें, पुण्यास मागें कमिशनरानें भागत असे, मग तोच न्याय आतां सर्वत्र कां लागू करूं नये? हिंदुस्थानांत निरनिराळ्या जाती व प्रांत कमजास्त मानानें सुधारलेले आहेत हें तत्त्व सरकारासाहि कबूल आहे; मग प्रत्येक प्रांतांतून ज्यूरीची पद्धत कमी अधिक मानानें सुरू असली म्हणून काय झालें? सारांश, कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी सरकारचें वर्तन अगदीं आग्रही, दांडगाईचें व हेकेखोरपणाचें आहे असें त्यांच्याच लेखावरून दिसून येतें. हिंदुस्थानांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हा मदांधपणा मोडून टाकणें हें इंग्रजी राज्याच्या प्रत्येक हितचिंतकाचें काम आहे. लॉर्ड लॅंडसडाऊन हे लॉर्ड लिटन यांच्या लागलेच पाठीमागून आले नाहींत, हें इंग्रजीराज्याचें मोठें दैवच समजलें पाहिजे. नाहींतर या दोन कोत्या दृष्टीच्या आग्रही मुत्सद्यांनीं आम्हां प्रजेस कोठवर त्रासवून सोडलें असतें हें सांगतां येत नाहीं. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं आपला हुकूम रद्द केल्यास लॉर्ड लॅंडसडाऊन हे आपल्या जागेचा राजिनामाहि देण्यास तयार आहेत असें म्हणतात, पण सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं त्यांस भिऊं नये, असल्या व्हॉइसरायास जागा सोडून जावें लागलें तर त्यानें इंग्रजी राज्याची लोकप्रियता अधिकच होईल, यांत आम्हांस बिलकूल शंका दिसत नाहीं. तेव्हां सेक्रेटरी ऑफ स्टेट काय करितात इकडे आतां सर्वांचे डोळे लागले आहेत.

❁ ❁ ❁

* पुण्यांतील पहिली चिमणी

सुमारें शंभर वर्षांपूर्वी आमच्या शहराचा दक्षिणेंतच काय, पण साऱ्या हिंदुस्थानभर मोठा नांवलौकिक होता. त्या कालीं वरिश्री, वैभव, देशाभिमान आणि धर्माभिमान इत्यादि गोष्टी या शहरांत जितक्या जागृत होत्या तितक्या हिंदुस्थानच्या दुसऱ्या कोणत्याहि भागांत नव्हत्या; त्यामुळें व्यापार आणि संपत्ति हींहि येथेंच वास करावयास आलीं होतीं. गेल्या पांचपन्नास वर्षांत मुंबई शहर किती वाढलें आहे व किती श्रीमंत झालें आहे याची ज्यास प्रत्यक्ष किंवा कर्णपरंपरेनें माहिती असेल, त्यास पुणेंशहरचें पूर्वी वैभव काय असावें याची कांहीं कल्पना करितां येईल. पुण्याचें हें वैभव अर्थातच पेशवाई बरोबर लयास गेलें, आणि कांहीं दिवसपर्यंत येथें घरमोडीचा व्यापार उत्तम समजला जात होता; परंतु ओहोटीसहि कांहीं मर्यादा असते, व ती मर्यादा संपली म्हणजे पुनः चक्रनेमिक्रमानें मनुष्याची अगर देशाची स्थिती सुधारण्यास सुरुवात होते. सध्यां पुणेशहरांस ही नवीन स्थिति प्राप्त होण्याचा समय आला आहे, किंवा अगदीं येऊन ठेपला आहे असें म्हटलें तरी चालेल. कै. माधवरावजी कुंटे हे असें म्हणत असत कीं, पुण्याच्या आसपास जेव्हां शेंकडों चिमण्या उभ्या राहतील तेव्हांच पुण्यास पूर्वीचें वैभव आतां प्राप्त होईल. माधवरावजी कुंटे यांस त्यांच्या हयातींत त्यांच्या मनोदयानुरूप उभारलेल्या फारशा चिमण्या दृष्टीस पडल्या नाहींत. कागदाची गिरणी त्यावेळीं स्थापन झाली होती व ती येथील लोकांच्याच उद्योगाचें फल होतें; पण ती गिरणी येथून बरीच लांब असल्यानें पुणेशहरास लागून असलेल्या मैदानांतून जो देखावा नजरेस यावा असा माधवरावजींचा मानस होता, तो परिपूर्ण झालेला त्यांच्या दृष्टीस पडला नाहीं. तें काम आमचे शहरांतील प्रसिद्ध व्यापारी हिंदुमल बालमुकुंद व त्यांचे स्नेही आणि इतर भागीदार यांचे हातून व्हावयाचें होतें. आज कित्येक वर्षें येथें लुगडीं, धोतरें, पागोटीं आणि विशेषेंकरून रेशमी खण, पितांबर, आदिकरून साधे आणि जरीचे कपडे तयार होऊं लागले आहेत. जरतारीचा माल तर बहुतेक पुणे येथेंच तयार होतो असें म्हटलें तरी चालेल. कै. शेट बालमुकुंद हिंदुमल यांचा व्यापार बहुतेक रेशमी जरतारीच्या कापडाचाच होता, व दोन तीनदां या कापडाचें त्यांनीं प्रदर्शन करून ड्यूक ऑफ कॅनॉट, लॉर्ड रे वगैरे अधिकाऱ्यांकडून वाहवा मिळविली होती शेट बालमुकुंद हिंदुमल यांच्या मनांत या सर्व व्यापारास नवें वळण देऊन यांत्रिकशक्तीच्या योगानें तो जितका वाढवेल तितका वाढवावा अशी इच्छा बरेच दिवस होती व शेट शिवलाल मोतीलाल यांच्या सहायानें त्यांनीं रेशमी

---

* [केसरी ता. २८ फेब्रुवारी १८९३]

कपडे तयार करण्याची खासगी गिरणी काढण्याचा विचार केला होता; पण त्यांचे स्नेही रांवसो० रामनारायण व रावसा० माधवराव नामजोशी इत्यादि मंडळींच्या सूचनेवरून त्यांनीं तो बेत रहित करून शेअर काढून भागीदारीनें गिरणी काढण्याचें कबूल केलें; तथापि या गिरणीची मूळ कल्पना हिंदुमल यांनींच काढली असल्यामुळें व भांडवलांतहि त्यांचा बराच भाग होता· यामुळें ते व शेट शिवलाल मोतीलाल हे अर्थातच या गिरणीचे सेक्रेटरी व खजिनदार झाले. शेट हिंदुमल बालमुकुंद हे ह्या गिरणीचें काम पुरें झालेलें पाहण्यास हयात राहिले नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे ? काल सर जमशेटजी जिजीभाई यांच्या हातून गिरणी उघडण्याचा जो समारंभ झाला तो पहावयास ते असते तर त्यांस आपण कृतकृत्य झालों असें खचित वाटलें असतें. अशा तऱ्हेचा समारंभ पूर्वी पुण्यास कधींहि झाला नव्हता. गिरण्यासारखीं कामें मुंबईतील श्रीमंत भाट्ये अगर पार्शी लोकांनींच करावीं अशी आजपर्यंत समज होती; पण गुदस्ता नागपूर येथें व यंदा पुण्यास ज्या गिरण्या सुरू झाल्या त्यांच्या योगानें हीं कामें मध्यम स्थितींतील लोकांस आपलें थोडें थोडें भांडवल एकत्र करून करितां येण्याजोगीं आहेत असें आतां निर्विवाद सिद्ध झालें आहे. या कामीं शेट हिंदुमल बालमुकुंद, शेट शिवलाल मोतीलाल यांचें साहाय्य तर खरेंच; पण रा. रा. रामनारायण अमरचंद व आमचे स्नेही रा० रा० माधवराव बल्लाळ नामजोशी यांनीं जर अविश्रांत खटपट केली नसती तर स्टेशनाजवळ आगगाडीच्या बंबांतल्या धुराखेरीज दुसरा कोणताहि धूर आज नजरेस पडला नसता. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे रा० रा० महादेव बल्लाळ नामजोशी यांनीं आपलें लक्ष इतर व्यवसायांतून काढून औद्योगिक विषयाकडे लाविलें हें एक सुचिन्ह समजलें पाहिजे. व या नवीन व्यवसायांत त्यांस उत्तरोत्तर अधिक यश येवो असें आम्ही इच्छितों.

मध्यम स्थितींतील लोकांनीं आपलें अल्पस्वल्प भांडवल एकत्र करून सात आठ लाखांचा कारखाना उभा करणें किती कठीण आहे ह्याची कल्पना पुष्कळ लोकांस चांगलीशी असेल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. प्रथमतः कोणत्याहि कारखान्याच्या साध्यतेबद्दल लोकांस भरंवसा वाटून त्यांनीं आपल्या शक्त्यनुरूप भाग घेण्यास समर्थ झालें पाहिजे. शेट हिंदुमल बालमुकुंद यांचा मुळचाच जरसारीचा मोठा व्यापार असल्यामुळें व शेट शिंवलाल यांच्या मदतीनें ही अडचण बरीच दूर झाली आणि पुणें, सोलापूर, बेळगांव, नेटिव्ह संस्थानें वगैरे ठिकठिकाणच्या लोकांनीं या नव्या कारखान्याचे मोठ्या खुषीनें शेअर घेतले. प्रत्येक शेअर ५०० रुपयांचा या मानानें साडेबारा हजार शेअर काढले होते. एकंदर भांडवल सव्वासहा लाख रुपयांचें होतें. पैकीं आतां फक्त शेंसव्वाशेंच शेअर शिल्लक आहेत असें समजतें. हे शेअरहि आतां लवकरच खपून जातील असा अदमास आहे. गिरणीचे शेअर अशारीतीनें मिळाल्यानंतर पुढील कामास सुरुवात

झाली. कांहीं दिवसपर्यंत गिरणी बाहेर काढावी कीं काय ह्याचा विचार चालला होता. व सुमारें दीड वर्ष हल्लीं ज्या जाग्यावर गिरणी उभी आहे ती जागा मिळविण्याच्या खटपटींत गेलें. पुण्यासारख्या शहरांत जागा मिळविण्यास इतके दिवस लागले याचें कोणास कदाचित् आश्चर्य वाटेल. पण उजवे हातास स्टेशन आणि डावे हातास नदी अशी दुसरी जागा शहरांत नाहीं हें लक्षांत आणलें म्हणजे हल्लींचचि जागा मिळविण्याची डायरेक्टरांनीं खटपट केली ती अगदीं योग्य व दूरवर दृष्टि देऊन केली होती असेंच म्हणावें लागेल. स्टेशनपासून अगर पाण्यापासून दूर जागा घेऊन मग पस्ताव्यांत पडण्यापेक्षां पहिल्यानेंच कांहीं महिने उशीर झालेला पत्करला. जागा ताब्यांत आल्यापासून बाकी सर्व काम म्हणजे इमारत बांधणें, मशिनरी, यंत्रें वगैरे आणाविणें, बसविणें आणि सुरू करणें हें सर्व सतरा महिन्यांत झालें व गिरणी उभी करण्यास लागलेला खरोखर काल हाच धरला पाहिजे. एवढ्या कालांत बारा हजार चात्या व एकशें पंचाहत्तर सुताचे माग कंपनीनें उभे केले यावरून त्यांची काम करण्याची उत्सुकता व हौस स्पष्ट दिसून येते. रेशमाचे ७५ माग व दररोज ६०- पौंड रेशीम तयार होण्याजोगीं दुसरीं यंत्रेंहि मागविली आहेत व तीं लवकरच उभीं करून सुरू करण्यांत येतील सर्व यंत्रें अगदीं नवीन पद्धतीनें तयार केलेली असून त्यांत हल्लीं जे नवीन शोध निघाले आहेत त्या सर्वांचा समावेश केलेला आहे; त्यामुळें दुसऱ्या कोणत्याहि गिरणीपेक्षां या गिरणींत तितक्याच श्रमानें अधिक माल काढतां येईल. मुंबईस ज्या कापसाच्या गिरण्या आहेत, त्यांपैकीं बऱ्याच जुन्या तऱ्हेच्या असून त्यांतून निघणारा मालहि प्रायः एकदोन प्रकारचाच असतो. पुण्यांतील गिरणीच्या व्यवस्थापकांनीं जीं यंत्रें आणविलीं आहेत तीं याहून भिन्न तऱ्हेचीं आहेत. त्यांचा असा विचार आहे कीं, नुसता जाडा कपडा काढून मग तो चिनांत अगर जपानांत पाठविण्यापेक्षां आपल्या देशांत खपणारे धोतरजोडे, लुगडीं वगैरे जिन्नस येथल्या येथें तयार करण्याची तजवीज करावी म्हणजे माल शिल्लक न राहतां लोकांची सोय होऊन गिरणीच्या भागिदारांचाहि फायदा होईल. एखाद्यानें कोणताहि नवा धंदा काढला असतां दुसरे शेंकडों लोक त्याचें अनुकरण करून तोच धंदा करावयास लागतात अशी आपल्या लोकांची पद्धत आहे व गिरणीच्या धंद्यांतहि तोच प्रकार नजरेस येतो. मुंबईच्या गिरण्यांतून आजपर्यंत जें कापड निघत असे तें सर्व हलक्या प्रतीचें असून त्याचा खप चीन, जपान, इराण वगैरे देशांत होत असे; पण आतां जपानांतं नव्या गिरण्या सुरू झाल्या आहेत व लवकरच सदर देशांशीं असलेला आमचा व्यापार कमी होईल अशी धास्ती वाटूं लागली आहे. चीन आणि जपान यांतील व्यापार जपान अगर चीननच्याच लोकांनीं बळकावला म्हणजे मुंबईच्या जाड्या कापडाच्या कांहीं गिरण्या एकतर अजिंक्यात बंद केल्या पाहिजेत अथवा त्यांत कांहीं सुधारणा करून गिरणींतून निघालेला माल देशांत-

ल्यादेशांतच खपेल अशी कांहीं तजवीज केली पाहिजे. आम्हांस लागत असलेले कापड म्यान्चेस्टर येथें तयार व्हावें व चिनी जपानी लोकांस लागत असलेलें कापड आम्ही मुंबईस तयार करावें असला 'खो खो, चा व्यापार कधींहि शाश्वत रहावयाचा नाहीं. हिंदुस्थानांतील कापसाचें जर हल्लींच्या यंत्रानें बारीक सूत निघत नसेल तर यंत्रें सुधारून अगर परदेशचा कापूस आणून आम्हास पाहिजे तसा कपडा काढण्याची आस्ही कांहीं तरी तजवीज केली पाहिजे. पुण्यांतील या नव्या गिरणीच्या व्यवस्थापकांनीं या सर्व अडचणी लक्षांत आणून एव्हांपासूनच त्यांची तरतूद लावली आहे. विलायतेहून जो रेशमी कपडा येतो त्याचें रेशीम इकडूनच जातें नुस्ता कपडा पाहिला तर तो येथेंहि तयार होतो; पण विलायती कपड्यास जो तजेला व सफाई असते, ती आमच्या पितांबरांत कधींच येत नाहीं. यासाठीं गिरणीच्या व्यवस्थापकांनीं सफाईदार व तरतऱ्हेचा रेशमी कपडा निघण्यास जी यंत्रसामुग्री लागते ती सर्व मुद्दाम आणविली आहे. रेशमाच्या हल्लीं हिंदुस्थानांत दोनच गिरण्या आहेत. एक कलकत्त्यास व दुसरी मुंबईस. पैकीं कलकत्त्याच्या गिरणींतील बहुतेक माल ब्रह्मदेशांत खपतो व तोहि सर्व तयार करण्यास त्या गिरणींतील यंत्रें पुरीं पडत नाहींत. मुंबईच्या गिरणींत साड्या, पितांबर, वगैरे जिनसा तयार होतात; पण तेथेंहि अजून आम्हांस पाहिजे तसा निघत नाहीं. त्यांतूनहि जरीकांठीं खण, पितांबर वगैरे तर अद्याप कोठेंच निघूं लागले नाहींत. हा सर्व माल पुण्याच्या गिरणींत तयार करण्याचा व्यवस्थापकांचा विचार आहे व यासाठीं लागणारीं सर्व साधनें व यंत्रसामुग्री त्यांनीं मुद्दाम आणविली आहे. व्यवस्थापकांच्या मनोदयाप्रमाणें खण, पितांबर, लुगडीं, कद, साधे अगर करवती अगर रुईफुलीकांठी धोतरजोडे वगैरे जिनसा जर येथें तयार होऊं लागल्या तर मग आमच्या गिरणीस मुंबईच्या गिरण्यांचें बिलकूल भय बाळगावयास नको; व चीन व जपान या देशांशीं आमचा व्यापार अजीबात बंद झाला तरीहि त्यापासून या गिरणीस कांहीं धोका यावयाचा नाहीं. व्यवस्थापकांचे हेतु तडीस नेण्यास गिरणीच्या भागिदारांचीहि त्यांस पूर्ण मदत पाहिजे व ती सदर भागिदारांकडून मोठ्या संतोषानें त्यांस देण्यांत येईल अशी आमची आशा आहे. सारांश सेक्रेटरी, खजिनदार आणि व्यवस्थापक यांनीं आजपर्यंत जें काम केलें तें दूरवर नजर देऊन व भागिदारांचें हित लक्षांत बाळगून केलें अशी कालच्या अपूर्व समारंभास जे हजर होते व ज्यांनीं गिरणीची इमारत व यंत्रें डोळ्यांनीं पाहिलीं आहेत त्यांची खात्री होईल. भागिदारांनीं आजपर्यंत दिलेल्या पैशाचें चीज झालें आहे व ह्यापुढें जास्त चीज करून घेणें सर्वांशीं त्यांचेच हातांत आहे.

❋ ❋ ❋

* गव्हर्नर साहेबांचें उत्तर

पूर्वी ठरल्याप्रमाणें गेल्या बुधवारीं संध्याकाळीं पुणें म्युनिसिपाटीचें एक व पुणें सार्वजनिकसभा आणि नाशिक, खानदेश, नगर, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांतील लोकांचें मिळून एक अशीं डेप्युटेशनें गव्हर्नरसाहेबांस कौन्सिलहालांत भेटण्यासाठीं गेलीं होतीं. डेप्युटेशनांतील लोकांनीं मुळींच बोलावयाचें नाहीं असें पूर्वीं ठरलें असल्यामुळें लॉर्ड हारिससाहेबांचें व्याख्यान ऐकण्यापलीकडे तेथें दुसरें कांहीं काम नव्हतें. गव्हर्नरसाहेबांनीं मंडळीचा पुष्कळ आदरसत्कार केला व जातेवेळीं प्रत्येकाची विचारपूस केली. या अघळपघळ शिष्टाचारामुळें गेलेल्या मंडळीचा बराच राग शांत होऊन लोकांच्या अर्जास गव्हर्नरसाहेबांनीं दिलेल्या उत्तरांत नन्नाचा पाडा वाचल्याबद्दलच्या दुःखाचाहि क्षणभर त्यांस विसर पडला असेल यांत संशय नाहीं. तें उत्तर कोणत्या वळणावर जाईल याचें आम्हांस पूर्वीच भाकित झालें होतें; परंतु आतां बाहेर आलेल्या हारिससाहेबांच्या कोटि-क्रमांत बरेंच नवीनत्व आहे असें कबूल केलें पाहिजे. निदान इतकें गचाळ व पांचट उत्तर गव्हर्नर देतील असें तरी आम्हांस वाटलें नव्हतें. लॉर्ड हारिसच्या प्रत्येक मुद्याचें खंडण करण्याला आज आम्हांस अवकाश नाहीं; व तसें कर-ण्याची फारशी जरूरहि नाहीं; कारण या विलक्षण कोटिक्रमाचा पोकळपणा नुसत्या वाचनानेंच प्रत्येकाच्या ध्यानांत येण्यासारखा आहे. लोकांच्या अर्जास उत्तर म्हणून एक ठरावाहि मुंबईसरकारानें प्रसिद्ध केला आहे. त्यांतील व लॉर्ड हारिसच्या भाषणांतील तात्पर्य एकच असल्यामुळें त्याचा येथें निराळा विचार करावयास नको. सबब त्या भाषणांतील मुख्य मुख्य मुद्दे येथें दिल्यानेंच एकं-दर उत्तराचा झोंक कळून येईल.

मध्यभागांतील लोकांचा सरकार द्वेष करतें म्हणूनच त्या प्रांतास वगळलें हा आक्षेप सर्वथैव चुकीचा आहे असें गव्हर्नरसाहेबांनीं प्रथम आश्वासन दिलें. तसेंच निवडणुकीच्या तत्त्वाविरुद्ध मी नाहीं असेंहि त्यांनीं निक्षून सांगितलें; पण आपल्या कोरड्या आश्वासनावर लोक विश्वास ठेवणार नाहींत असा संशय येऊनच कीं काय त्यांनीं पुरावाहि दिला, तो फारच मजेदार आहे. वीस बावीस वर्षांपूर्वीं इंग्लंडांतील म्युनिसिपालिट्यांत लॉर्ड हारिस काम करीत होते. सबब हिंदुस्थानांतील म्युनिसिपालिट्यांविषयींहि त्यांना कळकळ असला पाहिजे ही गोष्ट कोणत्या तर्कशास्त्रानें सिद्ध होते हें आम्हांस कळत नाहीं; तसेंच गव्हर्न-रसाहेब वर्षांतून आठ महिने पुणें, महाबळेश्वर येथें राहतात, सबब तेथील लोकांविषयीं अतिशय प्रेमबुद्धि ह्यांच्या अंतःकरणांत वागत असली पाहिजे हा

---

* [केसरी–ता. २३ मे १८९३

कोटिक्रमहि विलक्षण आहे. या न्यायानें २५—३० वर्षें हिंदुस्थानांत काढणाऱ्या इंग्रजी अम्मलदारांचा आमच्याविषयीं अतोनात प्रेमभाव आहे असेंहि सिद्ध होईल. परंतु ती गोष्ट प्रत्यक्ष प्रमाणाविरुद्ध आहे; उलट चिरकाल वास अति-परिचयानें होणाऱ्या अवज्ञेलाच कारण होत असेल असेंहि मानण्यास जागा आहे. गव्हर्नरसाहेबांच्या उत्तराचें एकंदर तात्पर्य हें होतें कीं, निवडून द्यावयाच्या आठ सभासदांचा लोक ज्या प्रकारचा विभाग करण्यास सांगत आहेत तो सरकाराला पसंत नाहीं. मुंबईशहर, सिंधप्रांत, उत्तरभाग, दक्षिणभाग व मध्यभाग अशी स्थलवरत्वें सभासदांची संख्या वांटून द्यावी म्हणजे मुंबई शहरांतील म्युनिसिपालिटीस, युनिव्हर्सिटी व चेंबर ऑफ कॉमर्स या तीन सभांस तीन व बाकीचे पांच सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांतील म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांना वाटून द्यावे असें लोकांचें मागणें होतें, परंतु हें प्रांतभेदानें विभाग करण्यांचें तत्त्व सरकारास कबूल नाहीं. सबब सरकारानें रोजगार धंद्या-प्रमाणें सभासद वांटून दिले आहेत. शेतकी, शिक्षण; व्यापार व म्युनिसिपा-लिट्या वगैरे असे चार वर्ग करून प्रत्येकाच्या महत्त्वानुसार त्याला सभासद दिले आहेत. म्हणजे शिक्षणाला एक, व्यापारी लोकांना दोन, शेतकरी वर्गाला दोन, व म्युनिसिपालिट्यांना तीन अशी आठ लोकनियुक्त सभासदांची विल्हे-वाट लावली आहे. मद्रास, बंगाल, वायव्यप्रांत वगैरे इतर ठिकाणच्या अधि-काऱ्यांनीं स्थलविभागाचें तत्त्व अंगिकारलें असून मुंबईसरकारालाच तें नापसंत होऊन ही चित्रविचित्र धंदेवांटणी स्वीकारणें बरें वाटलें हें चमत्कारिक तर खरेंच तथापि तें बरोबर आहे असेंच सभ्यां घेऊन चालूं. सरकारानें केलेला व्यवसाय-विभाग व एकेकाला वांटून दिलेली सभासदांची संख्या यथायोग्य आहे असें गव्हर्नरसाहेबांच्या मर्जीस्तव क्षणभर कबूल केलें तरी प्रस्तुत नियमांत त्याची कितपत अंमलबजावणी झाली आहे हा प्रश्न येतोच; व त्यासंबंधानें लॉर्ड हारि-सनीं जी उडवाउडवी केली आहे ती पाहून त्यांचें मनच त्यांना खात असावें असें म्हणतां येतें. युनिव्हर्सिटीला दिलेली जागा शिक्षणाप्रीत्यर्थ गेली व मुंबई कॉरपोरेशन भागांतील म्युनिसिपालिटीला व दक्षिणभागांतील लोकलबोर्डें यांना दिलेले तीन सभासद स्थानिक मंडळ्यांचे मुखत्यार झाले; येणेंप्रमाणें दोन वर्गांची तर वाट लागली; बाकी राहिले शेतकरी व व्यापारी. मुंबई व कराची येथील व्यापारी मंडळ्यांना दोन जागा दिल्या. तेव्हां व्यापारी वर्गाचीहि कुरकुर नसावी असें हारिससाहेबांचें म्हणणें आहे. मुंबईतील पीसगुड्स असोसिएशन, मिल ओनर्स असोसिएशन वगैरे एतद्देशीय व्यापाऱ्यांना वगळण्याचें त्यांनीं असें कारण सांगितलें कीं, त्या मंडळ्या एकेक विशिष्ट धंदा करणाऱ्या लोकांच्याच आहेत व त्यांना निवडणुकीचा अधिकार दिल्यास सोनार, शिंपी, गिरणीवाले, मजूर वगैरे दुसऱ्या लोकांनाहि तो द्यावा लागेल, सबब तो सर्वसाधारण चेंबर ऑफ कॉमर्सलाच

फक्त दिला आहे. चेंबरचे बहुतेक सभासद केवळ दलाली करणारे असल्यामुळें त्यांना वस्तुतः व्यापारी म्हणतां येईल कीं नाहीं याचीच शंका आहे; तेव्हां विशिष्ट धंदेवाल्यांना जागा द्यावयाची नाहीं म्हणून मुळींच व्यापार न करणाऱ्या चेंबरला दिली हें लॉर्ड हारिसचें म्हणणें कितपत सयुक्तिक आहे याचा वाचकांनींच विचार करावा. कराची चेंबरला आणखी एक जागा देण्याचें गव्हर्नरांनीं जें कारण सांगितलें तें तर फारच मजेदार आहे. या इलाख्यांत मुंबई, कराची व एडन हीं मुख्य तीन बंदरें आहेत व त्यांच्या योगानेंच मुंबईइलाख्याला इतकें महत्त्व आलें आहे. तेव्हां या बंदरांपैकीं दोहोंना म्हणजे मुंबई व कराची शहरांना दोन जागा देणें रास्त आहे; व कराचीच्या अभ्युदयाला तेथील चेंबरच कारण झाली असल्यामुळें ती सभा ह्या मानास पात्र आहे. या कोटिक्रमासंबंधानें आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, मुंबई कराचीप्रमाणें एडनासहि एक सभासद द्यावयाचा होता म्हणजे सरकारच्या आचार विचार उच्चारांत अधिक ऐक्य दिसून आलें असतें. आतां राहिला शेतकरी वर्ग. त्यानें दक्षिण सरदारांस व सिंध जमिनदारांस दिलेल्या दोन जागांवर समाधान मानून घ्यावें असें लॉर्ड हारिससाहेबाचें मत आहे. सरदार व सिंधी जमिनदार हे दोघेहि जमिनीचे मालक आहेत, तेव्हां त्यांनीं निवडलेला सभासद शेतकरी वर्गाचा मुखत्यार मानण्यास कांहीं चिंता नाहीं हा हारिससाहेबांचा कोटिक्रमहि त्यांच्या एकंदर भाषणास साजण्यासारखा आहे. मात्र नामधारी सरदारांस शेतकऱ्यांचे मुखत्यार म्हणण्यापेक्षां प्रत्येक भागांतील कमिशनरासच त्या भागाचा मुखत्यार म्हणून कौन्सिलांत नेमलें असतें तर हा निवडणुकीचा सर्व खटाटोपच वांचला असता ही गोष्ट सरकारच्या कशी लक्षांत आली नाहीं कोण जाणें. किंवा त्यापेक्षांहि सोपा उपाय म्हटला म्हणजे गव्हर्नर साहेबांनाच सर्व इलाख्याच्या वतीनें मुखत्यार सभासद समजून एकंदर आठहि जागांचा संक्षेप केला असता तरीहि वरील कोटिक्रमाप्रमाणें न्याय्य झालें असतें! येणेंप्रमाणें सभासदांच्या वांटणीविषयीं पांडित्य केल्यानंतर साहेब बहादूर मध्य भागाकडे वळले. आमच्याजवळ आणखी जागा असत्या तर त्यांतील एक तुम्हांला दिली असती हें ठरीव उत्तर झाल्यानंतर त्यांनीं आमची समजूतहि घालण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले कीं, सरकारानें तुम्हांला निवडणुकीचा अधिकार दिला नाहीं म्हणून विषाद मानण्याचें कारण नाहीं. कारण सरदार तर्फे जाणारा सभासद तुमचाहि मुखत्यार होऊं शकेल. तो नको असेल तर खानब० दोराबजी पदमजी यांस आम्हीं नुकतेंच नेमलें आहे त्यांना तुम्ही आपले मुखत्यार माना. शिवाय दक्षिण उत्तरभागाकडून जे मुखत्यार जातील तेहि तुमचे मुखत्यार होणार नाहींत असें नाहीं! साहेब मजकूर येथेंच थांबले म्हणून बरें झालें; नाहींतर मुंबईतील तीन सभासद व सिंध प्रांतांतील दोन हेहि मध्य-

भागाचेच मुखत्यार आहेत असेंहि सांगण्यास त्यांनीं कमी केलें नसतें. इतर प्रांतांतील एकेकच मुखत्यार आहे; पण साहेबबहादुरांच्या या अजब कोटिक्रमाप्रमाणें मध्यभागाला आठ मुखत्यार झाले हें येथील लोकांचें केवढें भाग्य होय! खरोखर एवढी मेहेरबानी दाखविणाऱ्या लॉर्ड हारिससाहेबांचे उतराई होण्याऐवजीं आम्हीं सभा केल्या, सरकारची निंदा केली व अर्जांचीं भेंडुळीं त्यांच्याकडे पाठविलीं, तेव्हां आमच्यासारखे कृतघ्न व दोषैकदृक् लोक जगांत कोठेंहि नसतील! आमच्या मतें लोकांची थट्टा करण्याकरितांच हारिससाहेबांनीं हा कोटिक्रम बाहेर काढला असेल. कौन्सिलांत प्रश्न विचारणें हेंच सभासदांचें मुख्य काम असें त्यांनीं सांगितलें. खरोखर त्यांची अशी समजूत असल्यास इतके सभासद निवडण्याची यातायात करण्यापेक्षां प्रत्येक जिल्हानिहाय एकेक फोनोग्राफचें यंत्र कौन्सिलांत पाठवून द्यावें अशी व्यवस्था केली असती तरी वावगें झालें नसतें. कारण प्रश्न विचारण्याचें काम सदर्हू यंत्रानेंहि सहज झालें असतें. असो; जेथें सर्वच भुसभुशीत वाळू तेथें जितकें चेपावें तितका तितका पाय खोल जाणार; सबब लॉर्ड हारिससाहेबांच्या मासलेवाईक उत्तराची अधिक विचक्षणा करण्याचें काम आम्ही वाचकांवरच सोंपवितों.

❁ ❁ ❁

* फार दिवस घडत असलेला वचनभंग

ऑनरे. मि. पाल यांच्या सूचनेवरून पार्लमेंटसभेंत हिंदुस्थानच्या सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा विलायत व हिंदुस्थान या दोन देशांत व्हावी, अशा अर्थाचा ठराव झाल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें आहे. हा ठराव होतेंवेळीं पार्लमेंट सभेंत जो वादविवाद झाला त्याची समग्र हकीगत गेल्या आठवड्याच्या टपालानें हिंदुस्थानांत आली आहे, त्यावरून या ठरावाविरुद्ध हिंदुस्थानच्या सेक्रेटरीच्या तर्फे काय काय अडचणी दाखविण्यांत आल्या त्याचा थोडासा खुलासा होतो. ठराव सभेनें पास करावा या अर्थाचीं भाषणें मि. पाल, मि. दादाभाई नवरोजी व सर डब्ल्यु. वेडरबर्न यांनीं केलीं; व सर जॉर्ज चेस्ने, मि. रसेल व मि. अलेन आणि कर्जन यांनीं आपलें प्रतिकूल मत सभेंत प्रतिपादन केलें. अखेरीस ठरावास अनुकूल ८४ मतें मिळून मि. पाल यांची सूचना पास झाली. ठरावास अनुकूल व प्रतिकूल सर्व भाषणें देण्याची येथें सवड नसल्यामुळें त्यांतील मुख्य मुख्य मुद्यांचाच येथें विचार करतों. या विषयासंबंधानें आमचेकडेहि अद्याप जितकी हाल-

---

* [केसरी ता. २७ जून १८९३]

चाल व्हावयास पाहिजे तितकी झालेली दृष्टीस पडत नाहीं, तेव्हां प्रसंगवशात् तत्संबंधीं आमच्या कर्तव्याबद्दलहि दोन शब्द सांगणें जरूर आहे.

सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा फक्त विलायतेंतच कां घेतात याचीं कारणें हिंदुस्थानांतील लोकांस सांगत बसण्याची आतां विशेष जरूर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. अगदीं कंपनी सरकाराकडे राज्यकारभार होता तेव्हांपासून तों आजपर्यंत जे जाहिरनामे प्रसिद्ध झाले अगर कंपनीस ज्या सनदा दिल्या अथवा ॲक्ट पास केले त्या सर्वांत हिंदुस्थानांतील अम्मलदारीच्या जागा वर्णभेद व धर्मभेद मनांत न आणतां राणीच्या प्रजाजनांपैकीं सर्वांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें दिल्या जातील असें आम्हांस अनेक वेळां अभिवचन मिळालेलें आहे. प्रश्न काय तो योग्यतेचा. आम्ही योग्य झालों कीं आम्हांस गव्हर्नर—जनरलहि नेमण्यास हरकत नाहीं अशी आमच्या दयाळू राणी सरकारची समजूत आहे, व ती त्यांनीं वारंवार आपल्या आज्ञापत्रांत नमूद केली आहे. राणी-सरकारची अशी समजूत असून मोठमोठ्या अम्मलदारीच्या जागा अद्यापपर्यंत आपणांस कां मिळूं नये, अगर मिळाल्या नाहींत याचें कारण शोधूं गेलें तर सर्व दोष हिंदुस्थानच्या द्रव्यावर वाढलेल्या आंग्लोइंडियन कामगारांकडे येतो असें साफ म्हणावें लागतें. पार्लमेंटसभेंत बारीकसारीक गोष्टींचा निर्बंध न होतां कांहीं मोठमोठ्या ढळक गोष्टी व तत्त्वें मात्र कायद्यांत घालतात; परंतु त्या कायद्याची अमलबजावणी करण्याचें काम सर्वथैव हिंदुस्थानसरकारच्या हातांत असल्यामुळें, पार्लमेंट सभेचे हुकूम सदर सरकारच्या मार्फत आमच्या हातांत पडेपर्यंत त्यांचें कांहीं विचित्र ओंगळ रूपांतर झाल्याखेरीज प्रायः रहात नाहीं. जो तो आपल्या पोळीवरील तुपाकडे प्रथमतः पहात असतो हें खरें आहे; व याच न्यायानें हिंदुस्थानसरकारचें वर्तन फार झालें तर स्वार्थासाठीं आहे एवढें म्हणतां येईल; परंतु त्यामुळें पार्लमेंट सभेचा हूकूम तोडल्याचा दोष त्यांच्या माथीं येत नाहीं असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. बादशहानें हूकूम करावा व सुभेदारानें तो दाबून ठेवावा असा प्रकार मोंगलाईत घडत असे अशी बोलवा आहे; तोच न्याय व्हाइसराय यांनीं स्वीकारून हल्लींच्या बाबतींत लागू केला असावा अशा अर्थाचें ऑनरे. दादाभाई यांचें जें म्हणणें आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे; व त्यास योग्य उपाय म्हटला म्हणजे हिंदुस्थानसरकारची ही आपमतलबी चूक पुनः पुनः विलायतेंतील लोकांच्या नजरेस आणणें हाच होय. असल्याच प्रयत्नांनीं आज हाऊस ऑफ कॉमन्समध्यें १६० पैकीं ८४ मतें तरी आपणांस मिळालीं, व हाच क्रम पुढें चालू राहिल्यास आपल्यास या कामीं लवकरच यश येईल असा अदमास दिसतो. करितां ठिकठिकाणच्या लोकांनीं वेळेवर जागें होऊन मि. पाल, मि. दादाभाई नवरोजी, सर डब्ल्यु. वेडरबर्न वगैरे हिंदुस्थानासाठीं खटपट करणाऱ्या गृहस्थांस इकडून जितकी मदत होईल तितकी अवश्य

केली पाहिजे. आज पार्लमेंटांत आपल्या वतीचे पुष्कळ लोक नाहींत हें खरें आहे; परंतु ती संख्या वाढविणें हें आमच्या उद्योगावर व श्रमावर अवलंबून आहे. खुद्द हिंदुस्थानसरकाराकडून या प्रश्नाचा आम्हांस अनुकूल निकाल लागणें दुरापस्त आहे. निजलेल्यास कोणी जोगें करील; पण जाग्यास कोण जागें करणार? करितां सध्यांच्या प्रसंगीं पार्लमेंटसभेनें केलेला ठराव हिंदुस्थानच्या हिताचा व न्याय्य आहे अशा अर्थाचे आभारप्रदर्शक अर्ज निरानिराळ्या ठिकाणाहून विलायतेस गेले पाहिजेत, व ठिकठिकाणच्या लोकांकडून तसे अर्ज लवकरच जातील अशी आमची उमेद आहे. हा प्रश्न आजकालचा नसून इतकें झालें तरी त्याचा आजच आपल्यासारखा निकाल होतो अशी खात्री देतां येत नाहीं हें खरें आहे; परंतु अशा सबबीवर उद्योग सोडून स्वस्थ बसणें म्हणजे बहुतेक " सवै मुक्तोऽथवा पशुः " या वर्गांत आपली आपणच गणना करून घेण्यासारखें आहे.


पार्लमेंटसभेचा कायदा व ठराव झाला असतांहि, हिंदुस्थानसरकार सिव्हिल सर्विसची परीक्षा हिंदुस्थानांत व विलायतेंत मिळून दोन्हीं ठिकाणीं कां घेत नाहीं, याबद्दल हिंदुस्थानसरकारचीं जीं कारणें आहेत तीं फारच तऱ्हेवाईक आहेत. पण हिंदुस्थानसरकारच्या पोटांतील खरें कारण काय आहे तें तेहि सांगत नाहींत व आम्हीहि सांगूं इच्छित नाहीं; पण एकादे वेळीं लॉर्ड लिटनसारखा स्पष्टवक्ता गव्हर्नर जनरल असला म्हणजे त्याच्या पिशवींतून मात्र हें काळें मांजर चट्दिशीं बाहेर पडतें! हिंदुस्थान देश जो जिंकला आहे तो हिंदुस्थानच्या फायद्याकरितां नाहीं; तर राज्यकर्त्यांचा व्यापार वाढावा व त्यांच्या पोराबाळांची तरदूद व्हावी एवढ्याकरितांच होय; असें एका मोठ्या इंग्रजी अंमलदारानें बोलून दाखविलें होतें. हें बोलणें न्यायाचें नाहीं खरें; पण त्यांत स्पष्टपणा तरी विशेष आहे असें कबूल करावें लागेल. पार्लमेंटसभेची जर याप्रमाणें इच्छा असती तर आम्हांस बोलण्यास जागाच राहिली नव्हती. जो जिंकील तो मिळवील. आम्ही जिंकूं तेव्हां आम्ही मिळवूं एवढेंच त्याचें उत्तर आहे; परंतु असें उत्तर देण्याचा प्रसंग आमच्यावर येऊं नये व तसें उत्तर देण्यास आम्हीं सहसा प्रवृत्त होऊं नये अशी पार्लमेंटसभेची इच्छा आहे, व ही इच्छा केवळ वरपांगी आहे असें परवांच्या ठरावावरून तरी कोणास म्हणतां येणार नाहीं. पार्लमेंटसभेची अशी इच्छा असल्यामुळें हिंदुस्थानसरकारास दोन ठिकाणीं सिव्हिल सार्व्हिसची परीक्षा न घेण्याबद्दल जीं कारणें दाखवावीं लागतात तीं ' हम करेसो कायदा ' यापेक्षां फार निराळ्या स्वरूपाची असतात, व त्या सर्वांत हिंदुस्थानसरकारच्या कामगारांच्या कुशाग्रबुद्धीची बरीच झाक आढळून येते. हिंदुस्थानांत बहुतेक खालच्या प्रतीच्या जागा नेटिव्ह लोकांच्याच हातांत आहेत असें सांगण्यानें आतां कांहीं उपयोग होत नाहीं हें हिंदुस्थानसरकारच्या तर्फेनें भांडणाऱ्या लोकांच्या लक्षांत येऊन चुकलें आहे. तेव्हां त्यांनीं आतां नवीं नवीं कारणें

शोधून काढून आपल्या पक्षास बळकटी आणण्याचा प्रयत्न चालविला आहे. पार्लमेंटसभेच्या कायद्याप्रमाणें हिंदुस्थान व इंग्लंड या दोन देशांत सिव्हिल सार्व्हिसची परीक्षा घेण्यांत ज्या हरकती आहेत त्यांपैकीं मुख्य हरकत जातिभेदाची होय असें मि. चेसनी, मि. रसेल, वगैरे गृहस्थांनीं पार्लमेंट सभेंत बोलून दाखविलें. या लोकांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानचा हल्लीं जो राज्यकारभार चालत आहे तो सुमार एक हजार युरोपिअन अंमलदारांच्या मार्फत चालला आहे व राणी-सरकारचें राज्य सुयंत्रित चालण्यास हल्लींच्या अंमलदारांप्रमाणें काम करणारे इसम हिंदुस्थानांत सांपडणें कठीण आहे. एकदां हिंदुस्थानांत सिव्हिल सार्व्हिसची परीक्षा होऊं लागली म्हणजे त्या परीक्षेंत पास होणारे पुष्कळ बाबूलोक निघतील; पण अम्मलदारीचें काम करण्यास जे गुण अवश्य लागतात त्यांचा असल्या गृहस्थांच्या अंगीं पूर्ण अभाव असल्यामुळें हिंदुस्थानांत परीक्षा झाली तर प्रायः बाबूलोकांचाच जिकडे तिकडे अम्मल होईल आणि रजपूत, मराठे, शीख वगैरे शूर लोकांस बाबूचें हें वैभव सहन न होऊन ते इंग्रजीराज्यास नाखूष होतील. हिंदुस्थानसरकारच्या घुरस्कर्त्यांची ही कोटी आज नवी निघाली आहे असें नाहीं. पब्लिक सर्व्हिस कामिशननें त्याचा उल्लेख केला आहे व सदर कामिशनच्या पूर्वीहि पुष्कळांनीं अशाच तऱ्हेचें प्रतिपादन केलें होतें. बाबूलोकांस मराठी अम्मलदार आवडणार नाहींत; शीखांस बाबू पसंत पडावयाचे नाहींत; आणि मराठी लोक मुसलमान अम्मलदारांचें ऐकावयाचें नाहींत, म्हणून सर्वांवर विलायतेंतून पास होऊन आलेल्या इंग्रजी पोरांनींच अंमल करावा हें म्हणणें कितपत यथार्थ अगर न्याय्य आहे हें आम्ही सांगावयास पाहिजे असें नाहीं. मि. पाल यांस अशा तऱ्हेचे आपल्या सूचनेवर आक्षेप येतील हें माहीत होतें, व एवढ्यासाठींच त्यांनीं आपल्या भाषणांत पहिल्यानें असें सांगितलें होतें कीं, सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत बाबूच फार येण्याची जर सरकारास भीति वाटत असेल तर त्याबद्दल कांहीं नियम करून उमेदवारांची प्रांतांप्रमाणें वांटणी करितां येईल; परंतु तेवढ्यासाठीं हिंदुस्थानांत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षाच घेऊं नये असें म्हणणें अगदीं गैरशिस्त आहे. मि. पाल ह्यांनीं अशा रीतीनें पहिल्यानेंच या आक्षेपाचें निरसन केल्यामुळें चेसने व रसेल यांच्या बोलण्याचा सभेवर कांहीं परिणाम झाला नाहीं. हिंदुस्थान हें एक मोठें खंडच आहे व त्यांत निरनिराळ्या जातींचे पुष्कळ लोक आहेत हें निर्विवाद आहे; पण त्यामुळें हिंदुस्थानांतील कोणत्याहि जातीस अगर लोकांस वरिष्ठ प्रतीच्या अम्मलदारीच्या जागा देण्यास सरकारनें होईल तितक्या अडचणी घालाव्या हें अन्यायाचें व एका अर्थानें राजद्रोहीपणाचें आहे असें म्हटलें तरी चालेल. पार्लमेंटसभेचा कायदा व ठराव आणि राणीचा जाहीरनामा ह्यांत जर कोणत्याहि प्रकारची आडकाठी ठेवली नाहीं तर बाबू, रजपूत, शीख व मराठे या सर्वांसच

फांटा देण्याची कल्पना हिंदुस्थानसरकारच्या आपमतलबी व स्वार्थसाधु ऑफिसरांखेरीज कोणासहि सुचली नसती. ह्या ह्यांच्या स्वार्थसाधुपणामुळेंच पार्लमेंटसभेनें केलेले हुकूम अद्याप अमलांत आणले नाहींत असें दादाभाई नवरोजी यांनीं पार्लमेंटसभेंत स्पष्ट बोलून दाखविलें आहे. रसेलसाहेबांच्या मुख्य आक्षेपांची याप्रमाणें वासलत लागल्यावर दुसरे जे चार पांच लहानसहान आक्षेप होते त्यांचीहि त्याचप्रमाणें वाट लागली. पब्लिक सर्व्हिस कमिशननें असें म्हटलें होतें कीं, हिंदुस्थानांत सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस उमेदवार तयार करतील इतक्या योग्यतेच्या शाळा अगर संस्था अद्याप निघाल्या नाहींत, व त्याकरितां तूर्त हिंदुस्थानांत परीक्षा घेऊन कांहींएक उपयोग व्हावयाचा नाहीं. तसेंच परीक्षा हिंदुस्थानांत घेण्याचें ठरविलें तर घोकंपट्टीस मात्र जास्त उत्तेजन येईल असेंहि कमिशननें सुचविलें होतें. या दोन्ही आक्षेपांस मि. पाल यांनीं असें उत्तर दिलें कीं, उमेदवार तयार करण्याच्या संस्था, परीक्षा हिंदुस्थानांत घेण्यास सुरवात केल्याशिवाय निघावयाच्या नाहींत हें उघड आहे; तेव्हां अशा संस्था झाल्या नाहींत म्हणून हिंदुस्थानांत परीक्षा घेत नाहीं असें म्हणणें चुकीचें आहे. बरें, यदाकदाचित् असल्या संस्था झाल्या नाहींत तर त्यापासून हिंदुस्थानसरकारचें कांहींएक नुकसान न होतां उमेदवारांसच त्याबद्दलचा त्रास सोसावा लागेल. उमेदवार तयार करण्याचीं साधनें हिंदुस्थानांत नसलीं तर हा लोकांचा दोष आहे; परंतु त्याकरितां सरकारानें आपण होऊन अन्याय करणें अगर हिंदुस्थानच्या लोकांस न्याय्य व वाजवी सवडी न देणें अगदीं गैरशिस्त आहे. घोकंपट्टीचा जो सरकारनें एवढा बाऊ केला आहे, तोहि अगदीं निरर्थक आहे. कोणता उमेदवार चांगला व कोणता वाईट हें निवडण्यासाठींच परीक्षा हें एक साधन आहे व केवळ बुकें घोकून उमेदवार परीक्षा पास होणार नाहींत अशा तऱ्हेची कांहीं योजना करणें हें वस्तुतः परीक्षकांचें काम आहे; व हें काम जर त्यांस नीट करतां येत नसलें तर त्याचा भुर्दंड हिंदुस्थानच्या लोकांनीं कां भरावा ? युरोपियन व नेटिव्ह यांस एकच परीक्षा लागू आहे. तेव्हां बुकें घोकून जितका हिंदु उमेदवार पास होण्याचा संभव आहे, तितका युरोपियन उमेदवार होण्याचाहि आहे, व त्यासाठीं इंग्लंडांत परीक्षा घेण्याचें जर बंद करीत नाहींत, तर तीच परीक्षा हिंदुस्थानांत घेण्यांत कोणता प्रत्यवाय आहे ? चवथा आक्षेप तोंडी परीक्षेचा होय. हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही देशांत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घेतल्यानें हिंदु उमेदवारांची तोंडी परीक्षा घेण्यास मोठी पंचाईत पडेल व तोंडी परीक्षेखेरीज उमेदवारांचें खरें स्वरूप कळत नाहीं असें सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षकांचें म्हणणें आहे. करतां ही परीक्षा हिंदुस्थानांत होऊं नये असें पब्लिक सर्व्हिस कमिशनानें म्हटलें आहे. तोंडी परीक्षेस एवढें महत्त्व कशासाठीं आलें हें आम्हांस समजत नाहीं.

आमच्याकडच्या युनिव्हर्सिटींतून तोंडी परीक्षा अजीबात बंद करण्याचा क्रम सुरू आहे, व तो गैरशिस्त आहे असेंहि कोणीं प्रतिपादन केलेलें आम्हांस आठवत नाहीं. उमेदवार चणचणीत दिसतो का मेषपात्र आहे; तो गोरा आहे का काळा आहे; उंच आहे का ठेंगणा आहे इत्यादि गुणांची पारख करण्याकरितां तोंडी परीक्षा ठेवली नसते व सदर परीक्षेंत असल्या गुणांबद्दल परीक्षक मुळींच चवकशी करीत नाहींत हें सर्वत्र प्रसिद्ध आहे. तोंडी परीक्षेंत प्रायः नेमलेल्या बुकांतील आणि नेमलेल्या विषयांतीलच उमेदवारास प्रश्न विचारतात आणि फारच झालें तर उमेदवाराच्या समयसूचकतेपेक्षां त्यांत दुसऱ्या कोणत्याहि गुणाची परीक्षा होत नाहीं. पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या या आक्षेपाची अशा तऱ्हेनें व्यवस्था लावल्यावर सदर कमिशनच्या शेवटच्या आक्षेपाचें मि. पाल यांनीं उत्तर देऊन आपलें भाषण घुरें केलें. पब्लिक सर्व्हिस कमिशनचें असें म्हणणें होतें कीं, हिंदुस्थानांतील अंमलदारीच्या जागा ज्यांस द्यावयाच्या, त्यांचें शिक्षण व विचार इंग्रजी धर्तीचे पाहिजेत व त्यांस इंग्रजी राज्यकारभाराची, इंग्रजी इतिहासाची आणि इंग्रजी लौकिक संस्थांचीहि चांगली माहिती असली पाहिजे. हे गुण अंगीं येण्यास उमेदवाराचें शिक्षण विलायतेंतच झालें पाहिजे, असें कमिशननें सुचविलें होतें; पण हाहि आक्षेप अगदीं निरर्थक आहे. कारण मि. पाल यांनीं आपल्या सूचनेंतच, हिंदुस्थानांत परीक्षा होऊन तेथें जे पास होतील त्यांस पुढें तीन वर्षेंपर्यंत विलायतेंत आणून ठेवावें असें सुचविलें होतें. त्यामुळें अखेरीस या उमेदवारांस इंग्रजी लौकिकसंस्थांचें ज्ञान असणार नाहीं असा आक्षेप येण्यासहि जागा नव्हती. मि. रसेल यांनीं सरकारतर्फे आपल्याकडून हा ठराव सभेनें पास करूं नये म्हणून बरींच खटपट केली; परंतु त्यांनीं दाखविलेलीं कारणें अशा रीतीनें खोडून निघाल्यामुळें हा ठराव अखेरीस सभेंत बहुमतानें पास झाला, व हल्लीं तो हिंदुस्थानसरकाराकडे विलायतेहून अभिप्रायार्थ आला आहे. यासंबंधानें आपण आतां काय केलें पाहिजे हें पुढील खेपेस सांगूं.

❁ ❁ ❁



* चांदी, रुपये आणि पौंड

आज बरेच दिवस घाटत असलेल्या नाण्याच्या प्रकरणाचा अखेर निकाल, गेल्या आठवड्यांत एका बैठकीस एका क्षणामध्यें लावून घेतला. या प्रकरणाचा कोणत्याहि तऱ्हेनें निकाल लागला असता तरी जेव्हां अखेर निकाल द्यावयाचा त्यावेळीं तो एकदमच द्यावयास पाहिजे होता हें खरें आहे; पण हिंदुस्थानसरकारनें जी घाई केली तितकी करण्याची जरूरी नव्हती. हर्शेल कमिटीचा रिपोर्ट आणखी दोनचार दिवस प्रसिद्ध झाला नसता तर त्यामुळें बाजारांत कांहीं विशेष चळवळ झाली असती असें नाहीं. तेव्हां निदान कायदेकौन्सिलाचें नॉन–आफिशियल सभासद सिमल्यास येण्याची तरी सरकारनें वाट पहावयाची होती; परंतु शुभश्च शीघ्रं या म्हणीला अनुसरून सरकारच्या मनाप्रमाणें व्यवस्था करून घेऊन आमचे फडणीस, व्हाइसरॉय वगैरे अधिकारी मोकळे झाले. आतां त्यांनीं केलेल्या कृत्याचा आमच्यावर बरा वाईट कोणता परिणाम होतो याचा विचार करण्याचेंच कायतें आमच्या हातीं राहिलें आहे. व्हाइसरायसाहेबांनीं आपल्या भाषणांत, आमचें थोडेंसें शांतवन करण्याचा प्रयत्न केला आहे; पण या मानभावी रडण्यांत विशेषसा कांहीं अर्थ दिसत नाहीं. सोन्यारुप्याचा भाव पूर्ववत् कायम होण्यास सोनें व रुपें या दोन्ही धातूंचा नाण्याच्या कामीं सगळ्या राष्ट्रांनीं उपयोग करणें हेंच मुख्य साधन होय, असें सर डेव्हिड बारबर यांणीं आपल्या मिनिटांत कबूल केलें आहे; व विलायतेंतील सरकार जर ग्रेटब्रिटनमधील नाण्यांत फेरफार करण्यास तयार असतें तर हा उपाय योजण्यास दुसरी कोणतीच अडचण आली नसती. विलायतसरकार आपलें नाणें बदलण्यास तयार नाहीं; विलायतेंतील लोकांस सोनें पाहिजे, रुप्याचें नांव काढल्याबरोबर त्यांचे कपाळास आंठ्या पडतात. तेव्हां हिंदुस्थानसरकारास अर्थातच आपल्या खजिन्यांतील तूट गरीब हिंदुलोकांच्या डोक्यावर हवें तसें ओझें बसवून भरून काढण्यास हर्शेल कमिटीनें मुखत्यारी दिली याबद्दल कांहीं आश्चर्य नाहीं. सोन्यारुप्याच्या भावांत अंतर पडल्यामुळें हिंदुस्थानच्या प्रजेचें एकंदरींत नुकसान झालें नाहीं ही गोष्ट हर्शेल कमिटीस मान्य आहे. नुकसान कायतें हिंदुस्थानसरकारचें आणि इंग्रजी अम्मलदारांचें. यांच्या करितां सर्व हिंदुस्थानांतील लोकांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कराचा बोजा कां लादावा हें कोणाहि निःपक्षपाती मनुष्यास समजण्याची मुष्कील आहे. विलायतेंतील नांवें बदलण्याची गोष्ट सुद्धां काढण्यास कोणी धजत नाहीं आणि हिंदुस्थानांत सरकारची तिजोरी भरावी, आणि युरोपियन अम्मलदारांस आपल्या पोराबाळांस मुबलक पैसे विलायतेंत पाठवितां यावे म्हणून एका क्षणांत

* [केसरी–ता. ४ जुलै १८९३]

आमच्या नाण्याची हवी ती व्यवस्था सरकारास लावतां येठे, याचें कारण काय हें आम्ही सांगावयास पाहिजे असें नाहीं. नाण्याच्या पद्धतीसारखा महत्त्वाचा प्रश्न इतक्या स्वल्प आयासानें दुसऱ्या कोणत्याही सरकारास सोडवितां आला नसता. कसेंहि असो !

हिंदुस्थानसरकारनें नाण्याची हल्लीं जी व्यवस्था केली आहे तिच आतां कांहीं दिवस तरी कायम रहावयाची असल्यामुळें त्यापासून होणाऱ्या नफानुकसानीचा आपणांस विचार केला पाहिजे. रुपें स्वस्त व सोनें महाग झाल्यामुळें एका पौन्डास दहा रुपये पडावयाचे तेंथें पंधरा सोळा रुपये कसे पडूं लागले व त्यामुळें विलायतसरकारच्या खर्चास येथून जी रक्कम धाडावी लागते ती धाडण्यास, व त्याचप्रमाणें युरोपियन अधिकारी आपल्या मोठमोठ्या पगारांतून ज्या रकमा आपल्या बायकामुलांस इंग्लडांत धाडतात त्या धाडण्यास, हुंडणावळीचा खर्च अतोनात कसा वाढत गेला यावद्दल मागें एकदां आम्हीं माहिती दिलीच आहे. हल्लीं जो हुंडणावळीचा भाव वाढला आहे तो हिंदुस्थानांत रुपें फार झाल्यानें नव्हे तर सोनें महाग झाल्यानेंच वाढला हें सर डेव्हिड बारबर यांनीं आपण होऊनच कबूल केलें आहे. हर्शेल कामिटीनें एके ठिकाणीं हिंदुस्थानांत हरएक जिनसांची किंमत अलीकडे थोडी बहुत वाढली आहे, यावरून तेथें फार रुपये झाले असावे असें अनुमान काढलें आहे खरें; पण त्यावर कामिटीचा विशेष कटाक्ष नसून सर डेव्हिड बारबर यांनीं म्हटल्या प्रमाणें हुंडणावळीची जी हल्लीं आपत आली आहे त्यापासून हिंदुस्थानच्या प्रजेचें फारसें नुकसान होत नाहीं, परंतु सरकार व बडे कामगार यांची मात्र तारांबळ उडून गेली आहे हेंच या कामिटींचें मुख्यत्वें करून म्हणणें आहे. कामिटीचा रिपोर्ट वाचला म्हणजे असें आढळून येतें कीं, कामिटी स्वतः होऊन अमुक एक मार्ग उत्तम असें म्हणत नाहीं. किंबहुना हल्लींच्या स्थितींत कोणता उपाय योजावा हें निश्चयानें सांगणें कठीण आहे असेंच कामिटीचें मत दिसतें आणि कामिटीस हवें तें मत देण्याची मोकळीक असती म्हणजे त्यांनीं असाच अभिप्राय दिला असता परंतु सेक्रेटरी आफ स्टेट यांनीं कामिटीस जो कौल लावला होता तो असा कांहीं खुबीदार होता कीं, त्याचें उत्तर देणें भागच पडलें. " हिंदुस्थानसरकार अमुक एक व्यवस्था सुचवीत आहे तर ती आम्हीं मान्य करावी कीं काय " असा स्टेट सेक्रेटरी यांनीं कामिटीस प्रश्न केला होता. कामिटीचें उत्तर अर्थात्च पुढें लिहिल्याप्रमाणें आलें. " प्रसंग कठीण आहे. हिंदुस्थानसरकारास आपली जबाबदारी माहीतच आहे. तेव्हां त्यांनीं केलेली सूचना अमान्य करावी असें आम्ही म्हणूं शकत नाहीं." हर्शेल कामिटीचा खरोखर अभिप्राय काय असावा याचें यावरून अनुमान करतां येईल व कामिटींतील मेंबरांचें एकमत होण्यास बरीच मारामार पडली होती म्हणून जी मागें बातमी आली होती त्यावरून वरील अभिप्रायाचा जास्त खुलासा होतो. अशा तऱ्हेच्या अभिप्रायावर हिंदुस्थानसरकारनें एकदम आमच्या नाण्याची पद्धत

बदलून टाकावी हें मोठेंच साहस होय, पण आमचें सरकार केवळ पडत्या फळाच्या आज्ञेची वाट पहात होतें करतां ती मिळाल्याबरोबर त्यांनीं आपली व आपल्या बड्या बड्या कामगारांची काळजी दूर करण्यास क्षणभरहि विलंब लावला नाहीं' मग इकडे आमचें काय पाहिजे तें होवो.

हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें केल्यास सोन्याचा भाव अतिशय चढून आम्हांस नाणें पाडण्यास पुरे इतकें सोनें मिळण्याची पंचाईत पडेल यामुळें, व एकंदर व्यवहारांत दहापंधरा रुपयांच्या एका सोन्याच्या नाण्यापेक्षां थोड्या किंमतीच्या रुप्याच्याच नाण्याची विशेष जरूर लागते म्हणून हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें करणें अशक्य आहे म्हणून सर डेव्हिड बारबर यांनीं स्पष्ट बोलून दाखविलें आहे. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें जर अशा रीतीनें करतां येत नाहीं तर करावें तरी काय या प्रश्नाचा सरकारनें हल्लीं निकाल केला आहे. सोन्याचें नाणें न वापरतां फक्त सोन्याचा दर तेवढा वापरावा अशी सरकारनें युक्ती योजली आहे; म्हणजे आमच्या हातांत रुपया देऊन त्याचा भाव मात्र पौंडानें करावयाचा. आजपर्यंत रुपयाची किंमत आंतील चांदीवर अवलंबून असे. एक रुपया म्हणजे १८० ग्रेन; पैकीं १६५ ग्रेन शुद्ध चांदी आणि १५ ग्रेन किंवा एकद्वादशांश हीण. तेव्हां एक रुपया आणि १६५ ग्रेन शुद्ध चांदी यांची किंमत सारखीच असे. चांदीपेक्षां रुपयाची किंमत वाढल्यास लोक लगेच चांदी घेऊन टांकसाळेंत जात आणि रुपये पाडून आणीत त्यामुळें पुन्हां रुपयाची व चांदीची किंमत सारखीच होई; तसेंच रुपयाची किंमत १६५ ग्रेन चांदीपेक्षां कमी झाल्यास कांहीं दिवस नवे रुपये पाडण्याचें काम बंद पडे आणि पुनः रुपयाची किंमत पूर्ववत् होई. सारांश, नाणें पाडण्याचा खर्च वगैरे हिशोबांत धरला नाहींतर एक रुपाया म्हणजे १६५ ग्रेन शुद्ध चांदी या मानानें चांदी व रुपाया यांच्या किंमतीचा नेहमीं मेळ असे. १६५ ग्रेन चांदीस एक रुपया म्हणजे त्रैराशिकानें शंभर रुपये भार अथवा अठराहजार ग्रेन शुद्ध चांदीची सुमारें १०९ रुपये किंमत होते. या मानानेंच बाजारांत शंभर रुपये भार गटाच्या चांदीचा भाव नेहमीं १०७।१०८ आजपर्यंत होता; पण आतां हें सर्व मान बदलून गेलें आहे. शंभर रुपये भार चांदी आतां ७५ रुपयांस मिळूं लागली आहे व सोन्याचा भावहि रुपया दोन रुपयांनीं उतरला आहे. हा फरक कशानें झाला व हल्लीं सरकारनें जो हा कायदा केला आहे तो असाच राहिल्यास पुढें सोन्यारुप्याचें काय होईल याचें थोडेंसें विवेचन करूं, म्हणजे एकंदर या व्यवस्थेपासून आपलें अखेरीस नफानुकसान काय होणार आहे हेंहि समजण्यास सोपें पडेल.

हिंदुस्थानसरकारनें आतां असा कायदा केला आहे कीं, रुपयाची किंमत रुपयांत असलेल्या चांदीवर करूं नये, तर सदर्हू किंमत काय धरावयाची याचा सरकार वेळोवेळीं निर्णय करील. ही किंमत या पुढें सोन्याच्या दरानें

करावयाची व त्यास विलायतचें नाणें भावासाठीं घ्यावयाचें. विलायतेंत एक पौंड म्हणजे २४० पेन्स होतात. आमच्या पंधरा रुपयांत दोनशें चाळीस पेन्स करावयाचें असें सरकारनें ठरविलें आहे. अर्थात् एक रुपया म्हणजे $\frac{२४०}{१५}$ अंश बरोबर १६ पेन्स होतात. कांहीं दिवसांनीं रुपयाची किंमत १८ पेन्सपर्यंत वाढवावी अशी सरकारची इच्छा आहे. रुपयाची १८ पेन्स किंमत झाली म्हणजे एक पौंडास १३$\frac{१}{३}$ किंवा तीन पौंडाचे ४० रुपये होतात. सोळा पेन्सच्या दरानें तीन पौंडांचे पंचेचाळीस रुपये होतात. आज जो भाव ठरविला आहे त्याप्रमाणें विलायतेंत तीन पौंड पाठविण्यास ४५ रुपये पडतील; परंतु हिंदुस्थानसरकारनें रुपयाचा भाव चढविला म्हणजे ४० रुपयांत आपणांस ३ पौंड विलायतेस पाठवितां येतील. ४० आणि ४५ यांच्या दरम्यान तीन पौंडांस किती रुपये पडतील हें सरकार वेळोवेळीं ठरवील त्या भावावर अवलंबून राहील. रुपयाचा हा जो सरकारनें भाव ठरविला आहे तो केवळ अधिकाराच्या जोरावर ठरविला आहे. रुपयांत १६५ ग्रेन चांदी असते म्हणून वर सांगितलेंच आहे. १६५ ग्रेन शुद्ध चांदीची बाजारांत १६ पेन्स किंमत होत नाहीं. परंतु सरकारच्या हुकुमानें ज्याप्रमाणें एका कागदाच्या तुकड्यास आम्ही दहा रुपये समजतों व दुसऱ्या कागदाच्या तुकड्यास हजार देतों त्याचप्रमाणें १६५ ग्रेन शुद्ध चांदीच्या पत्र्यावर राणीचा मुखवटा व नांव असल्यावर त्याची किंमत १६ पेन्स धरावयाची. आतां नव्या नोटा काढणें वगैरे ज्याप्रमाणें सरकारच्या मर्जीवर असतें तसाच प्रकार रुपयाचा करावयास पाहिजे हें उघड आहे. १६५ ग्रेन चांदीच्या रुपयास १६५ ग्रेन चांदीपेक्षां सामान्यतः बाजारांत कधींहि जास्त किंमत येणार नाहीं हें सरकारास माहीत आहे व म्हणूनच त्यांनीं अशी योजना केली आहे कीं, आजपर्यंत टांकसाळेंत ज्याप्रमाणें हवें त्यास रुपयाची चांदी अगर चांदीचे रुपये करून मिळत असत, त्याप्रमाणें यापुढें मिळावयाची नाहीं. चांदीच्या पत्र्यावर राणीचा मुखवटा आणि अक्षरें वठविण्याचा अधिकार सरकारचा आहे. हा छाप वठल्याखेरीज चांदीचा रुपया होऊं शकत नाहीं. तेव्हां सरकारानें असें मनांत आणलें आहे कीं, टांकसाळेंत चांदीचे रुपये करून देण्याचें जर ओढून धरलें तर बाजारांत चांदी कितीहि असली तरी रुपये कमी पडतील आणि रुपयांची कमतरता झाली म्हणजे चांदीचा भाव कोणताहि असला तरी रुपयाचा भाव वाढेल, कोणताहि जिन्नस कमी पिकला म्हणजे त्याचा भाव वाढतो त्याचप्रमाणें लोकांचे व्यवहार आहेत तसेच राहून रुपयांची संख्या जर कमी पडली तर रुपयाचा भाव चढलाच पाहिजे, अशा रीतीनें रुपया महाग करून त्याची किंमत १६५ ग्रेन चांदीच्या बरोबर न ठेवतां हळूहळू १८ पेन्सपर्यंत वाढवीत नेण्याचा सरकारचा विचार आहे. यासाठीं टांकसाळेंत पूर्वीप्रमाणें हवें त्यास चांदीचे रुपये करून मिळणार नाहींत असा सरकारचा हुकूम झाला

आहे. कोणास नवे रुपये पाहिजे असल्यास त्यानें १५ रुपयांस १ पौंड या मानानें टांकसाळेंत सोनें नेऊन द्यावें. सारांश, सोनें देऊन नवे रुपये मिळतील चांदी देऊन मिळणार नाहींत असें हल्लींच्या कायद्यांचें स्वरूप आहे. परंतू ज्याप्रमाणें सोनें टांकसांळेंत नेलें असतां ७·५३३४४ इतक्या ग्रेन शुद्ध सोन्यास एक रुपया याप्रमाणें रुपये देण्याचें सरकारनें ठरविलें आहे, त्याप्रमाणें पंधरा रुपये घेऊन सोन्याचा एक पौंड देण्यास मात्र सरकार आपणांस बांधून घेत नाहीं. आम्हीं एक पौंड नेला तर पंधरा रुपये चटदिशीं आम्हांस तिजोरींतून मिळतील. पण पंधरा रुपये तिजोरींत नेले तर त्याचाएक पौंड मात्र आम्हांस मिळावयाचा नाहीं. हा प्रकार पुष्कळांस ठकबाजीचा वाटेल यांत संशय नाहीं; परंतु त्यास सरकारचा नाइलाज आहे. सरकारास सोन्याचा सांठा करून पुढें सोन्याचें नाणें करावयाचें आहे तेव्हां कोणत्या तरी तऱ्हेनें सोन्याचा संचय केला पाहिजे. हें उघड आहे.

रुपयाची आणि चांदीची जी हल्लीं सरकारनें फारखत केली आहे त्यामुळें सोन्यारुप्याच्या भावावर विलक्षण परिणाम होऊं लागला आहे. विलायतेंत पौंड म्हणून जें सोन्याचें नाणें आहे तें शुद्ध सोन्याचें नसून त्यांत $\frac{1}{12}$ हीण असतें. एक औंस म्हणजे ४८० ग्रेन. यांत ३ पौंड १७ शिलिंग साडेदहा पेन्स किंवा १६० औंस सोन्याचेबरोबर ६२३ पौंड पडतात. यांपैकीं $\frac{11}{12}$ औंस शुद्ध सोनें म्हणजे ४८० ग्रेनपैकीं ४४० ग्रेन शुद्ध सोनें असतें. विलायतेंत सोन्याचे हवे त्यास पौंड पाडून देतात. करितां सोन्याच्या व पौंडाच्या किंमतीमधील समीकरणास कधींहि धक्का बसत नाहीं. एक औंस हिणकस सोनें अथवा ४४० ग्रेन शुद्ध सोनें यांची किंमत नेहमीं ३ पौंड, १७ शिलिंग १०॥ पेन्स म्हणजे ९३४॥ पे. असावयाची. या मानानें १८० ग्रेन अथवा मुंबईच्या तोळाभर शुद्ध सोन्यास ३८२ $\frac{3}{4}$ पेन्स बसते, ही किंमत आतां कायमची झाली. मुंबईचें एक तोळा शुद्ध सोनें म्हणजे ३८२ $\frac{3}{4}$ पेन्स. रुपया १६ पेन्सांचा सरकारनें ठरविला तर एक तोळा सोन्यास जवळ जवळ २४ रुपये पडतील १८ पेन्सांचा ठरविला तर २१। किंवा २१॥ रुपये पडतील. अठरा पेन्सांपेक्षां सरकारानें रुपयाची किंमत वाढवूं नये असें ठरलें आहे. तेव्हां तोळाभर शुद्ध सोन्याची (शंभर नंबरी) किंमत २१ रुपयांच्याखालीं किंवा २४ रुपयांच्यावर जाण्याची भीति राहिली नाहीं; परंतु चांदीचा प्रकार तसा नाहीं. रुपये पाडण्यास प्रतिवर्षीं ६।७ लाख रुपयांची चांदी लागत असे व ती सर्व परदेशांतून हिंदुस्थानांत येई. त्या चांदीस आतां गिऱ्हाईक नाहीं. रुपयाच्या आणि चांदीच्या किंमतीच्या मानानें आतां संबंध उरला नाहीं. कारण, रुपयांची किंमत आतां पेन्सांत ऊर्फ पौंडांत ठरली. रुपया म्हणजे पौंडाचा पंधरावा भाग, मग त्यांत चांदी कितीहि असो.

पेन्स शब्दानें पेन्स नाणें असें समजावयाचें नाहीं तर पौंडाचा २४० वा हिस्सा असें समजून किंमत करण्याचें मुख्य माप पौंड घ्यावयाचें. हिंदुस्थानांत सरकारी टांकसाळेंतून चांदी घेऊन रुपये देण्याचें काम बंद केल्यामुळें चांदी बाजारांत पडून राहील. चांदीचीं भांडीं अगर दागिने करण्याकडे हळूहळू जास्त उपयोग होईल हें खरें; पण तिचा मुख्य उपयोग रुपये पाडण्यांतच असे. एक मण चांदी दागिन्याकडे गेली तर सात मण चांदी रुपये पाडण्याकडे जाई. हर्शेल कमिटीचें असें अनुमान आहे कीं, जगांत एकंदर जी चांदी उत्पन्न होते त्यापैकीं $\frac{1}{4}$ म्हणजे सुमारें ७ कोटी रुपयांची चांदी हिंदुस्थानांत रुपये पाडण्यास प्रतिवर्षीं लागत असे. ही चांदी आतां बाजारांत पडून राहणार. आतांच कोट रुपयांची चांदी हिंदुस्थानांत येण्याकरितां वाट चालत आहे; ती मुंबई बंदरांत येऊन इतक्यांत दाखल झाली असेल किंवा होईल. परंतु नवीन कायद्याप्रमाणें टांकसाळेंत तिचा प्रवेश होऊं शकत नाहीं. एवढी चांदी करावयाची काय ? जुन्या कायद्याच्या विश्वासावर ही चांदी आम्हीं आणली या सबबीवर मुंबईच्या ब्यांका सरकारजवळ नुकसान भरून मागत आहेत; पण ब्यांकांचें नुकसान जर सरकारनें भरून द्यावयाचें, तर आमच्या घरच्या चांदीच्या भांड्यांची जी किंमत कमी झाली तीहि सरकारनें कां भरून देऊं नये हें आम्हांस समजत नाहीं. मग सर्व व्यवस्था ज्याप्रमाणें गोरे कामगार व अधिकारी यांच्या हिताकरितां झाली आहे, त्याप्रमाणें येथेंहि झाल्यास नकळे ! असो. ही चांदी यद्यपि सरकारानें घेतली असें मानलें, तरी एकंदरींत चांदीचें मोठें थोरलें गिऱ्हाईक कमी झालें तें झालेंच. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानें आमच्याप्रमाणेंच प्रतिवर्षीं पुष्कळ चांदी खरेदी करीत असत तीहि खरेदी त्यांनीं बंद केली तर मग चांदीस गिऱ्हाईकच उरलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल, व खाणींतून काढण्यास चांदीस जितका खर्च लागतो तेवढ्यावरच मुदलामुदल अगर थोडासा तोटा सोसूनहि चांदी व्यापाऱ्यास काढून टाकावी लागेल. जगांत जेवढी चांदी उत्पन्न होत असे त्यापैकीं निम्मेपेक्षां जास्त चांदी हिंदुस्थान व अमेरिका या दोन देशांत खपत होती. यांपैकीं एक खप तर नाहींसा झालाच व दुसरा नाहींसा होण्याचा रंग आहे. तेव्हां उत्तरोत्तर चांदी स्वस्त झाली पाहिजे ती इतकी कीं, चांदीच्या खाणी चालविणारांस फायदा न होतां त्या बंद करणें भाग पडेल. एकऔंस किंवा ४८० ग्रेन शुद्ध चांदीस ३२ पेन्स इतका भाव हल्लींच उतरला आहे; पण तो यापेक्षांहि कदाचित् खालीं जाईल. हल्लींच्या भावानें शंभर रुपये भार म्हणजे १८,००० ग्रेन अगर ३७॥ औंस शुद्ध चांदीस सुमारें ७७ रुपये पडतील. ही किंमत रुपया म्हणजे १६ पेन्स धरून केली आहे; पण रुपयाचा भाव जर १८ पेन्स झाला तर याहूनाहि किंमत कमी होईल. तात्पर्य, चांदीची किंमत किती कमी होईल हें खात्रीनें सांगवत नाहीं. खाणींतून चांदी काढण्याचें परवडत नाहींसें

झाल्यास चांदीच्या खाणीच अखेरीस अजी बंद होतील, आणि मग कदाचित् चांदीची किंमत चढेल. एका रुपयांत $\frac{१}{२}$ हीण असतें असें वर सांगितलेंच आहे. त्या मानानें ७५ रुपयांत ६८।॥ रुपये भार शुद्ध चांदी निघणार. तेव्हां ७५ रुपयांस १०० रुपयेभार चांदी मिळूं लागली याचा खरोखरीच अर्थ राणीच्या मुखवट्याचा छाप मारलेले ६८।६९ रुपये भार चांदीस १०० रुपये भार बिनछापी चांदी मिळणार. रुपयाची किंमत सरकारच्या कायद्यानें इतकी वाढली जाणार आहे. अशा रीतीनें रुपयाची किंमत सरकारच्या कृत्रिम कायद्यानें चढली म्हणजे खोटे रुपये करण्याची कोणासहि बुद्धि होईल हें उघड आहे; कारण, या कामांत त्यास शेंकडा तिसांपेक्षांहि जास्त नफा पडण्याचा संभव आहे. डेव्हिड बारबर यांचें असें म्हणणें आहे कीं, फ्रान्स देशांत अशा तऱ्हेचें नाणें आहे तरी तेथें कोणी खोटें नाणें करीत नाहीं तेव्हां तसाच हिंदुस्थानांत प्रकार कां होऊं नये ? परंतु फ्रान्स तो फ्रान्स व हिंदुस्थान तें हिंदुस्थान, हें बारबर साहेबांस कोठें माहीत आहे ? बारबारसाहेब दुसरें असें म्हणतात कीं, कांहीं थोडेसें रुपये खोटे (एकशें पांसष्ट ग्रेन चांदी असून, टांकसाळेबाहेर बनावलेले) झाल्यास त्यांत विशेष नुकसान नाहीं व पुष्कळसे खोटे करण्यास यंत्रसामुग्री लागते, म्हणून तसें करण्याचा कोणीं प्रयत्न केल्यास तो उघडकीस येईल. परंतु हिंदुस्थानच्या टांकसाळेनें पाडलेले रुपये इराण, चीन, सयाम वगैरे ठिकाणीं हल्लीं जे वापरतात ते हिंदुस्थानांत रुपयाची किंमत वाढली म्हणजे परदेशांतून इकडे परत येतील. व त्याबरोबरच वर दर्शविल्याप्रमाणें नवीन तयार केलेले खोटे रुपयेहि इकडे येणार नाहींत कशावरून ? फ्रान्सच्या सभोंवार जसे सुधारलेले देश आहेत तसे हिंदुस्थानच्या सभोंवार नाहींत.

सोनें, चांदी आणि रुपाया यांच्या किंमतींत हल्लींच्या कायद्यानें कसा काय फरक पडेल हें सांगितलें. आतां इतर व्यवहारांत व देवघेवींत या कायद्यानें कसें काय नफानुकसान होईल तें पाहूं. देवघेवीच्या सोयीसाठीं नाण्यांचा उपयोग करतात हें सर्वत्रांस माहीत आहे. कांहीं कारणामुळें देशांत नाणें पुष्कळ झालें तर हरएक जिनसेस पुष्कळ पुष्कळ नाणें देण्यास जो तो समर्थ होतो, म्हणजे पदार्थांची किंमत वाढते असा अर्थशास्त्रज्ञांचा सिद्धांत आहे. नाणें कोणत्याहि कारणामुळें कमी पडलें तर जिन्नस पूर्वीप्रमाणेंच आणि नाणें कमी झाल्यामुळें पूर्वी इतक्याच जिनसांस कमी नाणें येतें अगर जिनसाची नाण्यांत किंमत कमी होते अगर कमी नाण्यास पुष्कळ जिन्नस मिळूं लागतो.

आतां हिंदुस्थानसरकारचा हल्लींच्या कायद्यानें रुपया दुर्मीळ करण्याचा विचार आहे हें वर सांगितलेंच आहे. आमचें मुख्य नाणें रुपया हें होय. व्यापार जसजसा वाढतो तसतसें नाणेंहि जास्त लागत जातें. हिंदुस्थानचा व्यापार जास्त जास्त वाढत असल्यामुळें प्रतिवर्षीं सुमारें सात कोट चांदीचे नवे रुपये पाडावे

लागत; परंतु आतां नवीन कायद्याप्रमाणें नवे रुपये पाडण्याचें मात्र बंद होणार व व्यापार आहे तसाच वाढत राहणार. वाढता व्यापार आणि नाण्यांची तूट म्हणजे अर्थातच सर्व जिनसांच्या किंमती उतरणार अगर शेतांतील धान्याचे जेथें पूर्वी दहा रुपये येत होते तेथें आठ येऊं लागणार. शेतकऱ्यास सारा पूर्वी इतकाच द्यावयाचा, परंतु त्याच्या धान्याची किंमत मात्र नव्या कायद्यानें कमी रुपये होणार. धान्य विकून उत्पन्न कमी व सरकार देणें पूर्वीसारखेंच म्हणजे अर्थातच या नवीन कायद्यानें शेतकऱ्यांवर हा एक नवीन करच बसला असें समजलें पाहिजे. साऱ्यासाठीं शेतकरी लोक बहुतेक सावकारांचें कर्ज काढीत असतात. व हंगामी धान्य विकून पुढें ते कर्ज फेडतात, पण आतां रुपयाच दुर्मीळ अगर महाग झाल्यावर सावकारास तरी तो पूर्वी इतका मुबलक कोठून मिळणार ? सावकाराच्या हातांत कमी रुपये खेळूं लागले म्हणजे मग अर्थातच त्याच्या व्याजाचा दर वाढणार आणि तें व्याज शेतकऱ्यांच्या बोकांडीं बसणार. तिजोरींत पैसे मागण्यास जावे तर ते सोनें दिल्याखेरीज मिळावयाचें नाहींत आणि सोन्याचा तर शेतकऱ्यापाशीं अभावच. रुप्याचे दागीने विकावयास काढावे तर त्याची आठ आणेहि किंमत हातीं यावयाची नाहीं. अशा स्थितींत शेतकऱ्यांचें किती नुकसान होईल व या नव्या कायद्यानें त्यास किती ताप होईल याचा वाचकांनींच विचार करावा. आणि हा कशाकरितां तर बड्याबड्या कामगारांस आपल्या पोराबाळांस विलायतेस पैसे पाठविण्याचीं सोय व्हावी म्हणून. यापेक्षां एकादा प्रत्यक्ष करच सरकारानें बसविला असता तरीहि बरें झालें असतें !

आतां व्यापारावर या नव्या कायद्याचा कसा काय परिणाम होतो तो पाहूं. हिंदुस्थानच्या व्यापारापैकीं $\frac{1}{3}$ व्यापार चीन, जपान, इराण वगैरे रुप्याचें नाणें वापरणाऱ्या देशांशीं आहे. रुपया म्हणजे १६ पेन्स अथवा पौंडाचा पंधरावा हिस्सा असें प्रमाण कायद्यानें ठरविण्यानें इंग्लंडच्या व्यापाराची सोय झाली; परंतु चीनच्या व्यापाराची वाट काय ? आम्हीं आपलें कापड चीन देशांत नेऊन विकलें तर त्यास पूर्वी चीनदेशचे लोक जी किंमत देत होते त्यापेक्षां आतां जास्त किंमत देणार नाहींत हें उघड आहे. पण चीनदेशांतून जें चांदीचें चिनी नाणें आम्ही इकडे आणूं त्याचें पूर्वीच्या इतके रुपये आतां आपणांस मिळावयाचे नाहींत. कारण हें चिनी नाणें चांदीच्या भावानें जाणार आणि चांदी अगदीं स्वस्त झालेली तेव्हां चीनच्या व्यापारांत पूर्वीपेक्षां आतां शेंकडा २५।३० टक्के बूड येणार. इकडे कापडाच्या गिरणींत खर्च कमी करावा तर तेंहि अशक्य. कारण रुपयाचा भाव वाढला म्हणून मजूर एकदम चार आण्यांचे तीन आणे थोडेच घेणार आहेत. तेव्हां हिंदुस्थानचा माल खपतो तो पूर्वीपेक्षां एक तर महाग विकला पाहिजे किंवा नुकसान करून घेतलें पाहिजे. महाग विकला तर खप कमी होणार अथवा तो माल चिनी लोक आपल्या देशांतच उत्पन्न कर-

ण्याची खटपट करणार. सारांश, कोणीकडून घेतलें तरी एकंदरींत हिंदुस्थानचा चीनशीं जो व्यापार आहे त्यास या कायद्यानें बराच धक्का बसणार. आतांच चीन देशावरील हुंड्या कोणीच घेत नाहींसें झालें आहे व हाच प्रकार थोड्या बहूत अंशानें तरी पुढें चालू राहणार. हर्शेल कमिटीच्या लक्षांत ही गोष्ट आली नाहीं असें नाहीं; पण चीनसारखा प्राचीनदेश नवे पदार्थ देशांतल्यादेशांत उत्पन्न करण्याची खटपट करील असें वाटत नाहीं अशी सदर कमिटीनें आमची समजूत काढली आहे. चीनचा व्यापार बहुतेक काळ्या व्यापाऱ्यांच्याच हातांत आहे, तेव्हां हर्शेल कमिटीनें या प्रश्नाचा विचार केला नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सरकार, गोरे कामगार आणि गोरे व्यापारी यांच्या करितां हा सर्व खटाटोप आहे मग काळ्यांची कांहींहि वाट होवो !

सरतेशेवटीं नेटीव्ह संस्थानावर या कायद्याचा काय परिणाम होणार आहे याचा विचार करून हा बराच लांबलेला लेख आटपूं. हैद्राबाद, ग्वालेर, बडोदें वगैरे सर्व संस्थानांतून निरनिराळीं रुप्याचीं नाणीं सुरू आहेत. या सर्वांचें वजन सारखें नसतें. व त्यांतील रुपेंहि सारख्या कसाचें नसतें खेरीज नेटीव्ह संस्थानांतील बहुतेक नाणीं ओबडधोबड असल्यामुळें तीं (चांदीचें मान कायम ठेवून) नवीं करण्यासहि फारशी पंचाईत पडत नाहीं. जोंपर्यंत इंग्रजसरकारच्या ऊर्फ सुर्ती रुपयाची किंमत चांदीच्या भावावर अवलंबून होती, तोंपर्यंत नेटीव्ह संस्थानांतील रुपये आणि सुर्ती रुपये यांची देवघेव होण्यास फारशी पंचाईत पडत नसे. अलमगिरी किंवा बाबाशाई रुपयांत शुद्ध चांदी किती आणि सुर्ती रुपयांत शुद्ध चांदी किती हें पाहिलें म्हणजे बट्ट्याचा भाव तेव्हांच ठरवितां येईल. क्वचित् बाजारांत रुपये कमजास्त झाल्यानें कमजास्त बट्टा पडेल; पण हा फरक म्हणण्यासारखा होत नसे. आतां सुर्ती रुपया आणि चांदी यांचा कांहींच मेळ उरला नाहीं. रुपया म्हणजे १६ पेन्स. मग १६५ ग्रेन चांदी दहा पेन्सांस मिळावयास लागली तरी हरकत नाहीं; परंतु हा कायदा नेटीव्ह संस्थानांतील रुपयास लागू झालेला नाहीं करितां त्या रुपयांची किंमत चांदीच्या भावाप्रमाणेंच होणार. नेटीव्ह संस्थानिकांनीं हिंदुस्थानसरकारच्या सारखा कायदा करावा तर सर्वतोवरी नाण्याच्या किंमतीकरितां त्यांस हिंदुस्थानसरकारच्या तोंडाकडे पहावें लागणार. हिंदुस्थानसरकारनें रुपयाचा भाव १७ पेन्स केला कीं, ह्यांनीं सतरा पेन्स करावयाचा; साडेसतरा पेन्स केला कीं यांनीं साडेसतरा पेन्स करावयाचे. बरें इतकें करूनहि सुर्ती रुपयाप्रमाणें संस्थानांतील रुपये मोजमापांत पाडलेले नसल्यामुळें ते बनावट करण्याचाहि जास्त संभव आहे. तेव्हां नेटव्हिसंस्थानिकांस एक तर आपली सर्व टांकसाळ इंग्रजसरकारच्या स्वाधीन केली पाहिजे, अगर आपला ओबडधोबड रुपया कायम ठेवून बट्ट्याचा भाव वाढेल तितका वाढूं दिला पाहिजे. यांपैकीं दुसरा प्रकारच

अंमलांत येईल आणि तसें झालें म्हणजे बाबाशाई, अलमशाई वगैरे संस्थानां-तील रुपयाची किंमत चांदीच्या भावाप्रमाणें होणार आणि आमच्या रुपयाची किंमत सोळा पेन्स राहणार. सरकारानें मुंबईच्या व्यांकांचें नुकसान जर भरून दिलें तर याच कायद्यामुळें नेटीव्ह संस्थानिकांचें जें नुकसान होईल तें त्यांनीं कां भरून देऊं नये, हें आम्हांस समजत नाहीं.

नवीन नाण्याच्या कायद्याचें काय काय परिणाम होतील याचें थोडक्यांत निदर्शन करण्यासहि इतकी जागा अडवावी लागली. देशांत रुपयाची टंचाई, शेतक-ऱ्यांची बूड, चीनच्या व्यापारावर गदा, लोकांनीं सांठविलेल्या सोन्यारुप्याची किंमत एकदम कमी होणें, संस्थानिकांचें नुकसान, खोटें नाणें होण्याचा संभव, असे या कायद्यापासून अनेक अनर्थ होणार आहेत. खेरीज आजपर्यंत रुप्याची आणि रुप्याच्या नाण्याची किंमत जी बदलत असे तीहि अजिबात बदलणार नाहीं असें नाहीं. फेर इतकाच कीं, रुपयाची किंमत आतां सोळाच्याखालीं आणि अठरापेन्सांच्यावर जाणार नाहीं. मध्यंतरीं सरकारास वाटेल ती किंमत सरका-रानें ठरवावी हें राहिलेंच आहे. रुपया म्हणजे बहुधा नोटीसारखा झाला असें म्हणण्यास आतां कोणतीहि हरकत नाहीं. नोट कागदाच्या तुकड्यावर असते, हा चांदीच्या पत्र्यावर असतो. चांदीचा तुकडा कागदाच्या तुकड्यापेक्षां बरा पण नोटेच्या नुसत्या कागदाच्या तुकड्याची किंमत त्यावर लिहिलेल्या अक्षरां-प्रमाणें जशी दहा अगर पांच रुपये होऊं शकत नाहीं तद्वतच ज्या चांदीच्या वाटोळ्या पत्र्यावर एक रुपया अशीं अक्षरें छापलीं असतात त्या पत्र्यांतील चांदीची आतां एक रुपया किंमत व्हावयाची नाहीं. असलें कृत्रिम नाणें करून शेतकऱ्यांचें व नेटिव्ह व्यापाऱ्यांचें म्हणजे आपल्या बहुतेक सर्व प्रजेचें नुकसान करण्यास कोणत्याहि दुसऱ्या देशांतील सरकार तयार झालें असतें असें आम्हांस वाटत नाहीं. विलायतच्या नाण्यासंबंधानें अशी सूचना पार्लमेंट सभेंत करण्याची कोणाचीहि छाती होणार नाहीं, पण आमच्याकडे सर्व काम मोठमोठ्या पगाराचे युरोपियन अम्मलदार व सरकार यांच्या धोरणानें चालावयाचें, त्यांचा ज्यांत नफा तो कायदा आणि ती व्यवस्था अमलांत यावयाची, बाकीच्या लोकांचें कांहींहि होवो. सरकारनें हा कायदा जाणूनबुजून केला आहे हें सर डेव्हिड बार-बर व व्हाइसराय यांच्या भाषणांत व्यक्तच झालें आहे. हिंदुस्थानच्या शेतकरी लोकांस व व्यापाऱ्यांस इतकें ओझें झेंपतें कीं नाहीं, हें पाहून पुढील व्यवस्था होणार आहे.

❖ ❖ ❖

* फार दिवस होत असलेला वचनभंग

गेल्या खेपेस चांदीनें व रुपयानें सर्व जागा अडवली गेल्यामुळें हा विषय एक आठवडा तहकूब ठेवावा लागला होता. आज तो पुन्हां घेऊन त्या संबंधानें लोकांचें काय कर्तव्य आहे तें थोडक्यांत सांगावें व त्याप्रमाणें ठिकठिकाणच्या लोकांनीं करण्याची तजवीज ठेवावी अशी त्यांस विनंति करून हा लेख संपवावा असा विचार आहे.

मागें आम्हीं सांगितलेंच आहे कीं, हा वचनभंग फार दिवस घडत आहे. कंपनी बहादरांचें जेव्हां राज्य होतें तेव्हांहि सदर कुंपणीस राणीसरकाराकडून जी सनद मिळाळी त्यांत जातिभेद व वर्णभेद मनांत न आणतां हिंदुस्थानांतील अम्मलदारीच्या जागा केवळ लायकी पाहून दिल्या जातील असें सन १८३३ सालीं आम्हांस अभिवचन दिलेलें आहे व ह्या सालानंतर एक दोन वेळां सदर अभिवचनाची पुनरावृत्तीहि झाली आहे; पण ' यजमानाचें जातें आणि कोठवळ्याचें पोट दुखतें ' या म्हणीप्रमाणें या अभिवचनाचा फायदा मात्र हिंस्थानसकार व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं आमच्या पदरांत अद्याप पडूं दिला नाहीं. खुद्द राणीसरकारची इच्छा व हेतु अशा तऱ्हेनें प्रजाजनास न लाभूं देण्याबद्दल व्हाइसरॉय व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांसारख्या बड्या कामदारांकडून प्रयत्न व्हावे हें इंग्रजी राज्यपद्धतीस मोठेंच भूषणास्पद आहे; परंतु हा सर्व उद्योग आमच्या बड्या बड्या अम्मलदारांनीं पोटासाठीं केला आहे हें लक्षांत आणलें म्हणजे राणीसरकारच्या अगर पार्लमेंटच्या दयार्द्र दृष्टीच्या आड हे ढग कां येतात याचा थोडासा खुलासा होतो. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांत झाल्यापासून जे परिणाम होणार आहेत ते कांहीं लहानसान नाहींत. हल्लीं हिंदुस्थानचा खरा राज्यकारभार बहुतेक बड्या बड्या गोऱ्या अम्मलदारांच्या हातींच आहे असें म्हटलें पाहिजे. बहुतेक सर्व कच्चें काम नेटीव्ह कामगार व कारकून यांच्याकडून केलें जातें हें खरें; पण या नेटिव्ह कामगारांस व कारकुनांस वरिष्ठ अम्मलदाराच्या हुकुमाची अम्मलबजावणी करण्यापलीकडे कांहीं-एक काम नसतें. नेटिव्ह कामगार म्हटले म्हणजे त्यांच्या नांवापाठीमागें बहुतेक सब, डेप्युटी, अगर असिस्टंट अशीं टोपणें जोडलेलीं असावयाचीं. नाहीं म्हणावयास हेड हा शब्द मास्तरांस व कान्स्टेबलांस मात्र लावला जातो ! परंतु तेथेंहि त्यांच्या हाताखालच्या लोकांचे हेड असा अर्थ उद्दिष्ट आहे. सारांश, नेटिव्ह अम्मलदार कितीहि वाढला तरी त्याचा हुद्दा पहिल्याप्रतीच्या तावेदारापलीकडे जाऊं शकत नाहीं. अन्न शिजवावयाचें आम्हीं आणि खायचें

---

* [केसरी–ता. ११ जुलै १८९३]

युरोपिअनांनीं, अशी जी अर्काटच्या वेढ्याच्या वेळीं स्थिति होती ती हल्लीं कायम आहे. हिंदुस्थानदेशाचें राज्य परकीय लोकांच्या हातीं असल्यामुळें त्यांना आपल्या राज्याच्या संरक्षणार्थ वरिष्ठ कामगारांत युरोपिअन लोकांचा बराच भरणा ठेविला पाहिजे असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. खेरीज आपल्या मुलाबाळांच्या पोटाची जर तरतूद होत नाहीं, तर हिंदुस्थानासारखें राज्य कमवावें तरी कशाला ? अशा तऱ्हेचे विचारहि इंग्रजकामगारांच्या मनांतून घोळत असतात. भातखाऊ बाबूनें अगर ब्राह्मणानें जर कलेक्टर व्हावयाचें तर साहेबांच्या पोरांनीं काय करावें ? परंतु राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें हा विचार जितका योग्य आहे तितकाच आमच्या दृष्टीनें "आम्ही जिंकलों गेलों म्हणून सदैव असेच दैन्यावस्थेंत राहणार काय? व तरवारीच्या धारेखेरीज आम्हांस आमचें डोकें वर काढण्यास कोणताहि उपाय असूं नये काय ?" असे आमच्या मनांत विचार उद्भवणेंहि अगदीं साहाजिक आहे. हिंदुस्थानच्या फौजेंत दोन नेटिव्ह शिपायांस एक युरोपिअन शिपाई अशी वांटणी केली आहे. तशीच वरिष्ठ प्रतीच्या अम्मलदारीच्या जाग्यांत कां असूं नये? बाबूलोक अम्मलदारीच्या अगर हुकमतीच्या जागा चालविण्यास अयोग्य आहेत, असें कित्येकांचें म्हणणें आहे; पण बाबूखेरीज ज्या ज्या जातींनीं हिंदुस्थानच्या इतिहासांत नांव केलें आहे, त्या त्या जातींस जर हा अधिकार आजपर्यंत मिळाला असता तर हल्लीं बाबूंवर जो आक्षेप करतात तो कांहीं तरी सयुक्तिक आहे असें म्हणण्यास जागा होती. तसा प्रकार जोंपर्यंत घडून येत नाहीं व जोंपर्यंत शीख, मराठे, बाबू सर्व अम्मलदारीच्या जागा चालविण्यास नालायक समजले जातात, तोंपर्यंत बाबूच्या नामर्दपणाची सबब म्हणजे प्रस्तुतच्या युरोपियन अम्मलदारांच्या आपमतलबीपणाचा कावा असेंच म्हटलें पाहिजे. पार्लमेंटसभेस' अगर राणीसरकारास हा कावा पसंत नाहीं असें आतां अगदीं उघड झालें आहे. ज्या मुत्सद्यांनीं लोकलसेल्फ गव्हरमेंटचा आपणांस अधिकार दिला, ज्यांनीं कायदेकौन्सिलांत हिंदु लोकांच्या वतीचे सभासद असावे म्हणून ठरविलें, त्यांचीच राज्यपद्धत आपणांस मान्य असून हिंदुस्थानांतील अम्मलदारीच्या जागा लायकीप्रमाणें मिळण्यास कोणत्याहि प्रकारची अडचण असूं नये असें त्यांचें मत होतें व आहे. हें मत व हा हुकूम अमलांत आणण्याचा आतां किती जरी प्रयत्न झाला तरी तो अखेर सिद्धीस जाईल असें वाटत नाहीं. पार्लमेंटसभेनें एकदोनदां हिंदुस्थानसरकारची गोष्ट ऐकली. हिंदुलोकांस विलायतेस येऊन परीक्षा देण्याचें कठीण पडतें म्हणून स्टॅट्युटरी सिव्हिल सर्व्हिस व पब्लिक सर्व्हिसच्या शिफारशीवरून प्राव्हिन्शिअल सर्व्हिस यांची सुरुवात झाली, पण या दोन्हीहि प्रकारच्या तजविजींनें पार्लमेंटसभेचे मूळ हेतु जितके सिद्धीस जावे तितके गेले नाहींत असें सदर सभेस वाटूं लागलें आहे. पॉलसाहेबांचा ठराव हिंदुस्थानसरकारकडे पाठवितांना सेक्रेटरी

ऑफ स्टेट यांनीं असें लिहिलें आहे कीं, "या प्रश्नाचा विचार करून सदर ठराव अमलांत आणण्यासाठीं काय तजवीजी केल्या पाहिजेत तें आम्हांस कळवावें. नुस्तें नाहीं म्हणून उपयोगीं नाहीं" यावरून हल्लीचे सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड किंबरले यांच्या मनांतून मि. पाल यांचा ठराव थोड्याबहुत अंशानें तरी अमलांत यावा असें आहे असें दिसतें. लॉर्ड किंबरले यांनीं हिंदुस्थानसरकारला पाठविलेला हा खलिता त्यांच्या कौन्सिलांतील सभासदांपैकीं पुष्कळांस मान्य नाहीं असें जें प्रसिद्ध झालें आहे, त्यावरूनहि हेंच अनुमान निघतें. सारांश हल्लीं ज्या पक्षाच्या हातांत विलायतचीं राज्यसूत्रें आहेत, त्या पक्षाचा हेतु तरी मि. पॉल यांचाठराव थोड्याबहुत अंशानें अमलांत यावा असा आहे. करितां आमचेकडून जर यावेळीं कांहीं मेहनत होईल तर या फार दिवस पडलेल्या प्रश्नाचा थोडाबहुत तरी आमच्यातर्फे निकाल लागण्याची वेळ आतां अगदीं जवळ आली आहे. पायोनिअरसारख्या वर्तमानपत्रकर्त्यांनीं व आंग्लोइंडियन कामगारांनीं किती जरी बडबड केली तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं अशी पार्लमेंटच्या पुष्कळ मेंबरांची खात्री झाली आहे. खुद्द पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या रिपोर्टांत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांत घेऊं नये अशाबद्दल जीं आठ कारणें दिलीं आहेत तीं अगदीं अप्रयोजक असून सदर कमिशनचा निकाल अखेरचा न समजतां या प्रश्नाची पुनः नीट व्यवस्था लावावी असें पार्लमेंट सभेस वाटूं लागलें आहे. ब्रिटिश कमिटीकडून या कामीं खटपट चालू आहे व मि. दादाभाई नवरोजी, सर डब्ल्यू वेडरबर्न, मि० पाल यांनींहि ही गोष्ट तडीस लावण्याचा संकल्प केला आहे. अशा वेळीं आम्ही जर स्वस्थ बसलों तर पुढें कधींहि असला हक्क संपादण्याची वेळ येईल असें आम्हांस वाटत नाहीं.

या सर्व कारणांकरितां ठिकठिकाणच्या लोकांनीं वेळींच जागें होऊन पार्लमेंट सभेस, या प्रसंगीं होतील तितक्या सह्या घेऊन अर्ज धाडण्यास आळस करूं नये, अशी आमची त्यांस सूचना आहे. अर्ज तपशीलवार करण्याची कांहींएक जरूर नाहीं. पार्लमेंट सभेनें अथवा राणीसरकारानें इतके दिवस दिलेलीं वचनें हिंदुस्थानसरकारानें पूर्ण केलीं नाहींत यावरून हल्लींच्या ठरावाची अम्मलबजावणी केवळ त्यांच्याकडे सोंपविली असतां ती चांगली होणार नाहीं अशी भीति वाटते. करितां खुद्द पार्लमेंटसभेनें मि. पाल यांच्या ठरावाची अम्मलबजावणी कशी काय झाली याची चौकशी करून तें काम आपल्या हातांत घ्यावें व आम्हांस फार दिवस जो न्याय मिळाला नाहीं तो आम्हांस दिल्याचें श्रेय घ्यावें, इतकाच मजकूर अर्जांत असला तरी बस्स आहे. मुंबई, पुणें, कलकत्ता, मद्रास वगैरे मुख्य मुख्य शहरांतून जे अर्ज जातील त्यांत पाहिजे तर जास्त गोष्टी घालतां येतील; परंतु एकंदरींत ह्या विषयाचा उहापोह अगर विचार अर्जांत करण्याची जरूर नाहीं. ते काम मि०

चेडरव्हर्न, मि० दादाभाई, मि० पाल वगैरे करीत आहेत व तें कसें करावें हें त्यांस पक्कें माहीत आहे. ते करतात ती गोष्ट आम्हांस मान्य आहे इतकेंच नव्हे तर ती अमलांत आल्याखेरीज आम्हांस न्याय मिळाला असें आम्ही कधींहि समजावयाचे नाहीं हींच गोष्ट मुख्यतः आमच्या अर्जांतून पार्लमेंटास कळवावयाची आहे, व ती थोडक्यांत आणि स्पष्टपणें जितकी अर्जांत नमूद करितां येईल तितकी केलेली असावी. पार्लमेंटसभेंत अर्ज कोणत्या तऱ्हेनें करावे याबद्दल मागें एकदां केसरींत खुलासा आलाच आहे, अर्ज बिन खोडलेले व लेखी—इंग्रजींत—असावे आणि त्यावरील सह्याहि इंग्रजींत नसल्यास ज्या सह्या इंग्रजींत नसतील त्यांचें त्याखालीं पत्त्यासह भाषांतर इंग्रजींत केलेलें असावें असा त्या नियमांचा आशय आहे, हे नियम पुन्हा छापून तयार आहेत व त्याच्या प्रती येथील सार्वजनिकसभेस लिहिलें असतां मिळतील. पार्लमेंटसभेस अर्ज करणें तो एकाखालीं एक कागद जोडून वावडीप्रमाणें तयार करावा लागतो हेंहि पुष्कळांस माहीत असेलच. असले हजारों अथवा लाखों अर्ज ज्यावेळेस पार्लमेंट सभेचे टेबलावर जाऊन पडतील तेव्हां हिंदुस्थानसरकारच्या आजपर्यंत घडत आलेल्या वर्तनाचा थोडाबहुत तरी प्रतिकार होण्याचा संभव आहे. अर्ज पाठविण्यासंबंधानें अगर तो तयार करण्याच्या संबंधानें जी माहिती लागेल ती येथल्या सार्वजनिकसभेकडून मिळेल.

❖ ❖ ❖

* मुंबई इलाख्याचें बजेट

गेल्या कौन्सिलच्या बैठकीस मुंबई इलाख्याचें बजेट कौन्सिलपुढें वादाविवादास आणलें होतें व त्यावर पहिल्यानेंच कायदेकौन्सिलांत वादविवाद झाला. इतउत्तर दरवर्षी हें बजेट कायदेकौन्सिलांत येणार आहे; करितां त्यासंबंधानें थोडीशी माहिती सांगून त्यांत कोणत्या कोणत्या सुधारणा होणें इष्ट आहे, त्यावर नेटिव्ह मेंबरांनीं जे आक्षेप घ्यावयाचे ते कोणत्या प्रकारचे असावे, याचा थोडासा खुलासा करणें जरूर आहे.

इलाखानिहाय जमाखर्चाची जी हल्लीं पद्धत सुरू आहे ती बरीच वेडीवांकडी व घोंटाळ्याची असल्यामुळें बजेटांतील आंकडे समजण्यास प्रथमतः बरीच पंचाईत पडते. इलाख्याचे हिशोब यापेक्षां दुसऱ्या एखाद्या चांगल्या व्यवस्थित रीतीनें ठेवतां येतील कीं नाहीं हा प्रश्न आमच्या मतें बराच महत्त्वाचा असून त्याचा कांहीं तरी लवकर निकाल होणें इष्ट आहे. इलाख्याचें उत्पन्न काय, कोणत्या खात्यांत उत्पन्न अगर खर्च कोणत्या

* [केसरी—ता. ८ आगष्ट १८९३]

प्रमाणानें वाढले आहेत, कोठें काटकसर करण्यास जागा आहे, कोठें खर्च फाजील झाला आहे इत्यादि गोष्टी इलाख्याच्या बजेटांत जितक्या सोप्या रीतीनें दाखवितां येतील, तितक्या सोप्या रीतीनें त्या दाखविल्या पाहिजेत; परंतु हल्लीं जी हिशेबाची पद्धत अमलांत आहे त्या पद्धतीनें वरील हेतु सिद्धीस जाणें शक्य नाहीं. मुंबई इलाख्याचें बजेट म्हणजे मुंबईसरकार आणि हिंदुस्थानसरकार यांच्या हिशोबाचा खातेउतारा असें हल्लींचें त्याचें स्वरूप आहे व जोंपर्यंत हिंदुस्थानसरकार व मुंबई सरकार यांच्या दरम्यानच सर्व व्यवहार चालत होता तोंपर्यंत हिशोबाची ही पद्धत कोणासहि गैरसोईची वाटण्याचें कारण नव्हतें; परंतु आतां लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींपुढें जर जमाखर्च मांडावयाचा आहे, तर ही पद्धत सोडून देऊन आम्हीं वर सुचविल्याप्रमाणें दुसरी कोणती तरी हिशोबाची रीत धरली पाहिजे. हिंदुस्थानसरकार त्या उत्पन्नाचा कांहीं भाग घेतें अशी जी हल्लीं स्थिति आहे त्यापेक्षां एकदम हिंदुस्थानसरकारास आम्हांस अमुक रुपये द्यावे लागतात असें स्पष्ट सांगणें व हिशोबांत दाखविणें हें अधिक सोईचें व लवकर समजूत पडण्यासारखें आहे.

अस्तु. हिशोब कोणत्या रीतीनें ठेवल्यास बरें हें सांगण्यापूर्वी ते हल्लीं कसे ठेवतात हें सांगणें विशेष महत्त्वाचें आहे. करितां पहिल्यानें प्रसिद्ध झालेल्या बजेटाचाच विचार करूं. मुंबई इलाख्याचें जें एकंदर उत्पन्न आहे तें सर्व मुंबईसरकारचे ताब्यांत नाहीं. एकंदर हिंदुस्थानचें राज्य चालण्यास ज्या कांहीं गोष्टी अवश्य आहेत, व तार, पोस्ट वगैरे जीं कांहीं खातीं सर्व देशास साधारण आहेत त्यांचा खर्च भागण्यासाठीं इलाख्याच्या एकंदर उत्पन्नापैकीं कांहीं रक्कम हिंदुस्थानसरकार आपल्या तिजोरींत मागून घेतें. ही हिंदुस्थानसरकारची मागणी दिवसानुदिवस वाढत चालली आहे व सरहद्दीवरील आणि लष्करीखात्याचा अवाढव्य खर्च जोंपर्यंत आहे तसाच राहील तोंपर्यंत ही हिंदुस्थानसरकारची मागणी कधींहि कमी व्हावयाची नाहीं. हिंदुस्थानसरकारानें मुंबई इलाख्याच्या उत्पन्नापैकीं किती पैसे घ्यावे व मुंबईसरकारास किती शिल्लक ठेवावे याबद्दल दोन्ही सरकारांत मोठी मारामार चाललेली असते. दर पांच वर्षीं हिंदुस्थानसरकार व स्थानिकसरकार यांच्या दरम्यान करारमदार होत असतात व त्यास प्राव्हिनशिअल कॉन्ट्रेक्ट असें म्हणतात; परंतु हे करार म्हणजे फारसे कायमचे आहेत असें मात्र समजूं नये. सामान्यतः पाहिलें म्हणजे हा पंचवार्षिक करार झाल्यानंतर करारांतील शर्तींप्रमाणें उत्पन्नाचा जो भाग मुंबईसरकारच्या वांट्यास येईल त्यांतून काटकसर करून त्यांनीं कांहीं शिल्लक टाकल्यास तिचा फायदा स्थानिकसरकारासच मिळाला पाहिजे; नाहींपेक्षां इलाख्याइलाख्यांत एकावर ओझें जास्त व दुसऱ्यावर ओझें कमी असा अन्याय होणार आहे. एकंदर हिंदुस्थानसरकारच्या राज्याचा गाडा हांकणें हें मुंबई इलाख्यास जितक इष्ट आहे, तितकें मद्रासेसहि आहे, व या गाड्यास

लागणारा वंगणाचा खर्च प्रत्येक इलाख्यानें आपापल्या शक्तीप्रमाणें दिला पाहिजे. हिंदुस्थानसरकार आणि स्थानिकसरकार यांच्या दरम्यान पंचवार्षिक करार होतात म्हणून जें वर सांगितलें आहे तें केवळ मुंबई इलाख्यासच लागू आहे असें नाहीं, तर मुंबई, मद्रास, बंगाल वगैरे सर्व इलाख्यांशीं त्याचप्रमाणें करार करण्यांत येतात. या कराराअन्वयें हिंदुस्थानसरकारास प्रतिवर्षीं प्रत्येक इलाख्यांतून रक्कम गेल्यानंतर बाकी इलाख्याचें उत्पन्न इलाखासरकारच्या पूर्ण ताब्यांत असतें अगर असावें अशी समज आहे; परंतु त्याप्रमाणें नेहमीं अंमल होतो असें नाहीं. हिंदुस्थानसरकार बहुतेक खर्चानें सतावल्यासारखें झालें आहे, व नेहमींच त्यांची पैशाची ओढ असते. एखाद्या इलाख्यांत तेथील सरकारानें काटकसर करून कांहीं थोडीशी शिल्लक टाकली कीं त्यावर लागलीच हिंदुस्थानसरकारची धाड येते, व त्यामुळें पंचवार्षिक करार करण्याचा जो मुख्य हेतु तो प्रायः कधींहि सिद्धीस जात नाहीं. सन १८९०।९१ सालीं मुंबई इलाख्याकडून करारांतील रकमेपेक्षां १७॥ लाख रुपये हिंदुस्थानसरकारनें जास्त घेतले होते. कोणीहि, काटकसर करून करारांत जी रक्कम स्थानिक सरकारास देण्याचें ठरलें आहे, त्यांतून कांहीं शिल्लक मागें टाकल्यास, अशा रीतीनें हिंदुस्थानसरकारची इकडे दृष्टि असल्यामुळें काटकसर करण्याकडे कोणत्याहि इलाखासरकारचें लक्ष जात नाहीं. सारांश, पंचवार्षिक करार म्हटला म्हणजे तो बहुतेक कागदी करारच म्हणावयाचा! हा प्रकार कधीं बंद होईल तो होवो. कौन्सिलांत बजेट वाचावें लागेल व लोकांमध्यें त्याची चर्चा होईल या भीतीनें हिंदुस्थानसरकारचें वर्तन यापुढें कदाचित् कमी दांडगाईचें होण्याचा संभव आहे; पण आजच त्याबद्दल निश्चयानें कांहीं सांगतां येत नाहीं.

आतां हा पंचवार्षिक करार कोणाच्या प्रकारचा असतो तो पाहूं. राज्याचें उत्पन्न नेहमीं वाढत असतें तेव्हां हिंदुस्थानसरकार स्थानिकसरकारापासून उक्ती रक्कम घेण्यास तयार नाहीं; कारण हिंदुस्थानसरकारचा खर्चहि वाढतच आहे. या कारणामुळें पंचवार्षिक करारास बरेंच भानगडीचें स्वरूप आलेलें असतें. आपण पहिल्यानें उत्पन्नाची बाजू घेऊं. जमीनसाऱ्याचें जें उत्पन्न आहे त्यापैकीं $\frac{1}{4}$ उत्पन्न मुंबईसरकारास मिळतें व $\frac{3}{4}$ हिंदुस्थान सरकारास जातें. याखेरीज न्याय, पोलीस, शाळा, वैद्यकी वगैरे जीं दिवाणी खातीं आहेत त्यांचें सर्व उत्पन्न मुंबईसरकारासच मिळतें. स्टांप, रजिस्ट्रेशन, जंगल आणि अबकारी वगैरे खात्यांसंबंधानें जितकें उत्पन्न मुंबईसरकारास मिळतें त्याच मानानें त्या त्या खात्यांतील खर्च सरकारास करावा लागतो; म्हणजे स्टांपपैकीं $\frac{3}{4}$; जंगल, रजिस्ट्रेशन आणि इतर कर यांपैकीं निम्मे आणि एक्साईसपैकीं $\frac{1}{4}$ याप्रमाणें वांटणी होते. यापैकीं ज्या खात्याचें निम्मे उत्पन्न मुंबईसरकारास मिळतें, त्या खात्याचा निम्मा खर्च त्यांनीं चालवावा; $\frac{1}{4}$ मिळल्यास $\frac{1}{4}$ चालवावा इत्यादि. परंतु हा नियम याखे-

रीज इतर खात्यांस लागू नाहीं. म्हणजे जमीनबाबींच्या उत्पन्नापैकीं जरी फक्त ½ च मुंबईसरकारास मिळतें, तरी त्याचा खर्च मुंबईसरकारासच सोसावा लागतो. आतां खर्चाची बाजू पाहतां मुलकी व दिवाणी खात्यांचा खर्च, न्याय, पोलीस, शाळा, वैद्यक आणि दुसऱ्या किरकोळ खात्यांचा सर्व खर्च मुंबई सरकारानें करावा. पोस्ट, टेलिग्राफ, मीठ, अफू वगैरे कांहीं खातीं हिंदुस्थान सरकारचींच आहेत व त्यांचा खर्च हिंदुस्थान सरकाराकडूनच होतो. सारांश जमेच्या व खर्चाच्या ज्या निरनिळ्या बाबी आहेत, त्यांची हिंदुस्थानसरकार व मुंबईसरकार यांच्या दरम्यान वांटणी झालेली आहे. या वांटणीप्रमाणें मुंबई इलाख्याचें बजेट म्हटलें म्हणजे उत्पन्नाच्या प्रत्येक बाबींतील करारांत नमूद केलेला हिस्सा जमेस धरावयाचा आणि खर्चाच्या बाजूस जीं जीं खातीं मुंबईसरकाराकडे ठेविलीं आहेत, त्यांसंबंधें होणारा सर्व खर्च घालावयाचा; अशा तऱ्हेनें बजेट तयार केलें म्हणजे बहुधा जमेपेक्षां खर्च जास्त दिसतो व ही तूट भरून काढण्यासाठीं हिंदुस्थानसरकार आपल्या उत्पन्नांतून (मुंबई इलाख्याच्या उत्पन्नांतून जो कराराप्रमाणें त्यांनीं भाग घेतला असतो त्यांतून) परत मुंबईसरकारास कांहीं रक्कम देतें. सन १८९३।९४ सालीं ही रक्कम ७७, लक्ष ३२ हजार आहे. दरवर्षीं रक्कम हिंदुस्थानसरकार मुंबई सरकारास देतें असें दाखविण्यापेक्षां मुंबई इलाख्याच्या उत्पन्नापैकीं जो भाग हिंदुस्थानसरकाराकडे जातो तोच कमी केल्यास हा हिशोबांतील घोटाळा निघणार नाहीं काय ? परंतु हल्लींची पद्धतच वर लिहिल्याप्रमाणें भानगडीची असल्यामुळें त्याचा कोणी विचार करीत नाहीं. पण वार्षिक कराराप्रमाणें मुंबईसरकारची शिल्लक निदान २० लाख रुपये तरी नेहमीं असली पाहिजे असा नियम आहे. प्रतिवर्षीं बहुधा याहून जास्त शिल्लक रहाते; पैकीं कांहीं रक्कम रेल्वे, धरणें, कालवे वगैरे उत्पन्नाच्या बाबतींत सरकार खर्च करितें व कित्येक प्रसंगीं कोर्टें, ऑफिसें वगैरे बांधण्याकडे ज्या रकमा खर्च होतात त्याहि या शिलकेंतून दिल्या जातात. इतकेंहि करून करारांतील शर्तीपेक्षां शिल्लक जास्त झाली तर त्यावर हिंदुस्थानसरकारचा डोळा असतोच ! मुंबईसरकारचें एकंदर उत्पन्न १२।१३ कोटींचें आहे; पैकीं १८९२।-९३ सालीं जो पंचवार्षिक करार झाला व हल्लीं अमलांत आहे त्या अन्वयें एकंदर उत्पन्नापैकीं वर दिलेल्या हिस्सेरशीप्रमाणें ३,१२,३९,००० रुपये मुंबईसरकारास मिळतात व ज्या खात्याचा खर्च मुंबईसरकारानें करावयाचा तो सर्व एकंदर ३,८९,५३,००० आहे. म्हणजे दर सालीं, ७७,१४,००० हिशोबी तूट आहे ही तूट भरून काढण्यासाठीं मुंबईच्या एकंदर बारा तेरा कोट उत्पन्नापैकीं ९ कोट रुपये जें हिंदुस्थानसरकार घेतें त्यांतून ९७ लक्ष १४ हजार रुपये मुंबईसरकारास मिळतात. सन १८९३।९४ सालीं हिंदुस्थान सरकारानें ७७ लक्ष ३२ हजार रुपये देण्याचें जें कबूल केलें आहे त्याचें कारण असें कीं, या

सालीं करारापेक्षां दुसरा कांहीं जास्त खर्च हिंदुस्थान सरकारानें मुंबईसरकारा-कडून करविला त्याबद्दल खर्च झालेली रक्कम मुंबईसरकारास परत मिळाळी. अशा रीतीनें दरवर्षी आमच्या इलाख्याचा अनागुंदी जमाखर्च होत असतो. या-पेक्षां एकदम मुंबई इलाख्याचें १२।१३ कोट उत्पन्न दाखवून त्यांपैकीं फक्त सुमारें ४ कोट रुपयेच आम्हांस इलाख्यांत खर्चण्यास सांपडतात असें एकदम सांगितलें तर बरें नव्हे काय ?

आतां सन १८९३।९४ सालाच्या जमेचा व खर्चाचा जो अंदाज केला आहे त्याचा विचार करूं. बजेटांत नेहमीं तीन तीन वर्षांचे आंकडे देत असतात. म्हणजे यंदाच्या किंवा १८९३।९४ सालच्या बजेटांत १८९२।९३ व १८९१।९२ या दोन सालांचे आंकडे दिलेले असतात. १८९१।९२ चे हिशेब आतां पुरे झाले आहेत; करितां ते आंकडे आतां नक्की झाले आहेत. १८९२।९३ चे हिशेब जरी अद्याप पुरे झाले नाहींत, तरी वर्षाचा खर्च होऊन गेला असल्यामुळें केवळ सालारंभीं केलेल्या अंदाजावर अवलंबून न राहतां जवळ जवळ नक्की रकमा सांगतां येतात. त्यामुळें यंदाच्या बजेटांत १८९१।९२ सालचे नक्की १८९२।९३ सालचे जवळ जवळ नक्की आणि १८९३।९४ सालचे अदमासाचे जमेचे व खर्चाचे आंकडे दिले आहेत. हे तिन्ही वर्षांचे आंकडे एकत्र असले म्हणजे जमा अगर खर्च प्रतिवर्षीं किती वाढला अगर कमी झाला याची तुलना करितां येते. हे सर्व आंकडे येथें देण्यास अवकाश नाहीं. करितां फक्त यंदाचे म्हणजे १८९३।९४ सालचे आंकडेच देण्याचें योजलें आहे. सन १८९३।९४ सालीं शिल्लक सालगुदस्त ३५,५८,००० रुपये आहे. जमेचा अदमास ४,००,७७,००० रुपयांचा आहे व खर्च ४,१३,६२,००० होईल असा अदमास आहे. म्हणजे सुमारें १२,८५,००० रुपयांची तूट येईल ती सालारंभींच्या शिलकेंतून वजा घालतां १८९३।९४ अखेर २२,७३, ००० रुपये शिल्लक राहील, असा बजे-टांत अंदाज केलेला आहे. पंचवार्षिक करारापमाणें कमींतकमी २० लाख रुपये शिल्लक असली पाहिजे ती यांत वजा घातली म्हणजे २ लक्ष ७३ हजार रुपयेच काय ती मुंबईसरकाराजवळ फाजील शिल्लक रहाते.

बजेटांतील निरनिराळ्या बाबींचा विचार करितां जमीनसारा बाबींचा हिशोब दिला आहे तो येणेंप्रमाणें:—

उत्पन्न

साऱ्याच्या उत्पन्नाचा एक चतुर्थांश पंचवार्षिक करारापमाणें	९२,८०,०००
दुमाला.....	९१,१६,०००
तूटभरतीसाठीं हिंदुस्थानसरकाराकडून परत जमा	७७,३२,०००
	२,६१,२८,०००

खर्च.

जिल्ह्यानिहाय मुलकीखात्याचा खर्च	२९,९०,०००
सर्व्हे सेटलमेंट खातें	६,३४,०००
शेतकी	१०७,०००
जिल्हा व गांवकामगारांस दिलेल्या रकमा	२७,८६,०००
	६५,१७,०००

यावरून या खात्यांच्या उत्पन्नांतील बरीच रक्कम दुसरीकडे खर्च करण्याकरितां शिल्लक रहाते असें दिसतें. मुख्य उत्पन्नाचें खातें कायतें हेंच आहे, तेव्हां असें होणें वाजवीच आहे; तथापि ऑनरे० मि० फेरोजशहा मेथा यांनीं म्हटल्याप्रमाणें जिल्हानिहाय मुलकी खात्याचा जो खर्च दाखविला आहे तो याहूनहि कमी करतां येण्यासारखा आहे. फौजदारी काम मुलकी कामगारांच्या हातून काढून घेतलें म्हणजे हल्लींच्या इतके असिस्टंट कलेक्टर न लागतां त्यांचें काम थोड्या पगाराच्या मुनसफांच्या हातून करून घेतां येईल; परंतु ही व्यवस्था मुंबईसरकारच्या हातून होण्यास विलायतेहून हुकूम आला पाहिजे! न्याय व मुलकी या दोन्ही खात्यांत पुष्कळ काटकसर करण्यास जागा आहे. प्रत्येक जिल्ह्यास एकेकच अगर प्रत्येक भागास एकेक कमिशनर असण्याची आवश्यकताच आहे असें नाहीं. हा खर्च कमी करून जर ती रक्कम विद्याखात्याकडे किंवा दुसऱ्या कोणत्या उपयुक्त कार्याकडे लावली तर त्यापासून रयतेचें पुष्कळ हित होईल. यंदा बजेटावर जो वादविवाद झाला त्यांत नेटिव्ह सभासदांकडून या बाबतींत जितकी चर्चा व्हावी तितकी झाली नाहीं हें खरें; पण प्रतिवर्षी असाच प्रकार घडून येईल असें नाहीं. मुलकी व न्यायखात्यांत काय काय सुधारणा केल्या असतां खात्याची उपयुक्तता कमी न होतां खर्च कमी होईल याचा विचार उत्तरोत्तर लोकांनीं निवडलेल्या सभासदांकडून जास्त होऊं लागली म्हणजे सरकारासहि इकडे लक्ष पुरविलेंच पाहिजे. बजेटांतील दुसरें सदर एकसाईझ किंवा अबकारीचें होय. सन १८९३।९४ सालीं या खात्याचें उत्पन्न २५,५०,००० व खर्च ८९,००० होईल असा अदमास केला आहे. अबकारीचीं कंत्राटें देण्याची पद्धत बदलल्यामुळें व अमुकच दारू खपविली पाहिजे असा आतां निर्बंध नसल्यामुळें यंदाचें या खात्याचें उत्पन्न कमी धरलें आहे; परंतु या कारणामुळें फारशी तूट येईल असें वाटत नाहीं या खात्याचें उत्पन्न कमी झालें असतां वस्तुतः पाहतां कोणासहि वाईट वाटूं नये; कारण कमी उत्पन्न म्हणजे मादक पदार्थांचा कमी खप आणि या पदार्थांचा कमी खप होणेंच इष्ट आहे. जंगल खात्याचें उत्पन्न बजेटांत १७, ५५,००० धरलें आहे व खर्च ११,२६,००० धरला आहे. यंदाचे सालीं या खात्यांतील वरिष्ठ ऊर्फ गोऱ्या अंमलदारांच्या जागा, पगार व पेन्शनें

यांत सुधारणा व्हावयाच्या आहेत व त्यामुळें या खात्याचा खर्च दोन लाखांनीं वाढता धरला आहे. या गोऱ्या जंगली ऑफिसरांचे पगार वाढवून त्यांस आस्वलें मारण्यास उत्तेजन देण्यापेक्षां गरीब लोकांवर गायरानें फारेस्टांत घेतल्यामुळें जो जुलूम होत आहे त्याचा प्रतिकार करण्याची कांहीं तोड काढली असती तर बरें झालें असतें. ऑनरे. रा. रा. नातू यांनीं गुरें चरण्याची फी माप करावी अशी सूचनाहि केली होती; परंतु त्यास जंगल खात्याचे देव सेटलवर्थसाहेब यांनीं, लाखों गुरें सरकारी कुरणांतून फुकट चरताहेत व चारणीची फी दर गुरास चार आठ आणेच आहे असें उत्तर दिलें. हें उत्तर आमच्या मतें अगदीं अप्रयोजक आहे. कारण, ज्या लोकांचीं गायरानें सरकारानें जंगलांत घेतलीं त्यांचीं गुरें फुकट चरूं दिलीं तर त्यांच्यावर उपकार केले असें नाहीं .या खात्यासंबंधानें मुंबईइलाख्याची एकंदर बरीच तक्रार आहे, व हळूहळू त्या सर्व तक्रारीचा सरकारास विचार केला पाहिजे, वरिष्ठ अंमलदारांचे पगार वाढवण्याची सूचना किती लवकर पास होते व गरीब रयतेस गुरें चारण्यास अगर कवळठा नेण्यासहि मोकळीक देण्याची मारामार पडते हें मोठें आश्चर्य आहे! बजेटांतील चौथी बाब व्याजाची होय. या बाबतींत उत्पन्न २,६२,००० व खर्च २,२०,००० आहे. शेकतऱ्यांस तगाईदाखल ज्या रकमा देण्यांत येतात त्या दुसऱ्या रकमांवरील व्याज सरकारास मिळतें व हिंदुस्थानसरकराकडून मुंबई सरकार जी वेळोवेळीं रक्कम घेतें त्याबद्दल व्याज मुंबईसरकारास वेळोवेळीं भरावें लागतें. बजेटांतील पांचवी बाब न्यायखात्याची होय. यांचें उत्पन्न ४,०७,००० व खर्च ४४,६४,००० आहे. उत्पन्नांत कोर्ट फी, दंड वगैरे धरले जातात व खर्चांत हायकोर्ट जज्जपासून तों मुन्सफ कोर्टांतल्या शिपायापर्यंत सर्वांच्या पगाराचा समावेश होतो. या खात्यावरील खर्चहि कमी करण्यास बरीच सवड आहे हें आम्हीं वर दाखविलेंच आहे. न्यायखात्याखालीं तुरुंगाचें खातें येतें. यांचें उत्पन्न १,९८;०१० असून खर्च ६,८५,००० आहे. या पुढचें खातें पोलिसाचें होय. याचा सर्व खर्च वरील बाबीप्रमाणेंच मुंबईसरकारासच करावा लागतो, व यांतच हल्लीं रेलवेपोलिसाचाहि समावेश होतो. या खात्याचे उत्पन्न ३,९५,००० असून खर्च ५५,१४,००० धरला आहे. यंदाच्या सालीं डिस्ट्रिक्ट व शहरपोलीस यांची सुधारणा करण्याचें सरकारच्या मनांत आहे व त्यासाठीं पांच लक्ष चोवीस हजार रुपये खर्चाच्या अंदाजांत जास्त धरले आहेत. ही सुधारणा कशी काय होते व त्यापासून पोलीस खातें खरोखरच जास्त उपयुक्त होतें कीं काय हें पाहणें आहे. विद्याखात्याचें उत्पन्न २,८३,००० धरून खर्च १७,४१,००० धरला आहे. हा खर्च जास्त व्हावयास पाहिजे असें ऑनरे. मेथा आदिकरून दोन तीन कौन्सिलरांनीं सुचविलें होतें. मेडिकल खात्याची जमा १,१७,००० व खर्च १५, २६,००० धरला आहे. या खात्यांत दवाखाने, वेड्यांचीं इस्पितळें, मेडिकल

स्कूल व कॉलैज, देवी आणि आरोग्य या सर्व खात्यांचा समावेश होतो. इतकीं खातीं एकत्र घालण्यापेक्षां त्यांची निरनिराळी फोड केली असती तर बरें. शेवटचें खातें किरकोळ होय. यांत बऱ्याच लहानसहान बाबींचा समावेश होतो. उत्पन्न ६७,००० धरलें असून खर्च २,६०,००० धरला आहे.

येणेंप्रमाणें बजेटाची थोडक्यांत हकीगत आहे. निरनिराळ्या बाबींचा पृथक् विचार करूं लागल्यास प्रत्येक बाबीस बरीच जागा द्यावी लागेल, तें काम खरें म्हटलें म्हणजे आमचे कौन्सिलांत जे सभासद गेले आहेत त्यांचें होय. आम्हीं जो वर गोषवारा दिला आहे तो सामान्य वाचकांकरितां आहे व त्यावरून इलाखासरकारची जमाखर्च ठेवण्याची पद्धत कशी काय आहे, त्यांत कोणकोणत्या सुधारणा करणें अवश्य आहे, कोणकोणत्या खात्याचें उत्पन्न किती आहे, व त्यांतील किती मुंबईसरकारास खर्च करण्याचा अधिकार आहे इत्यादि गोष्टीची निवळ महाराष्ट्र वाचकांस थोडीबहुत तरी माहिती मिळेल अशी आमची आशा आहे. बजेटावर टीका करून त्यांत दुरुस्ती करण्याबद्दल सूचना करणें म्हणजे सर्व इलाख्याच्या राज्यपद्धतीचें आधीं यथास्थितपणें ज्ञान करून घेतलें पाहिजे. हें काम बऱ्याच श्रमाचें असून त्यांत वेळहि बराच खर्च होणार आहे. इतका वेळ व परिश्रम या कामास खर्चीं घालण्यास आमच्या वतीनें कौन्सिलांत गेलेल्या सभासदांनीं तयार असलें पाहिजे व यंदां जो वादविवाद झाला त्यावरून सगळे नाहींत तरी निदान कांहींजण तरी अशा रीतीनें तयार होतील असा रंग दिसतो.

❖ ❖ ❖

* हिंदुमुसलमानांचा दंगा

मुंबईच्या दंग्याची हकीगत दुसरीकडे दिली आहे ती वाचून व ऐकून मनांत नानातऱ्हेचे तर्क उत्पन्न होतात. मुंबई शहरांत बाहेर गांवांहून म्हणजे पुणें, ठाणें, वगैरे ठिकाणांहून सुमार तीन साडेतीन हजार लष्करी शिपाई मुंबईस गेला आहे. मुंबईच्या सरकारी आरमारावरील लोक व रेलवेमधील कांहीं व्हालंटीअर लोकहि मुंबई पोलिसास मदत करीत आहेत. परंतु या चार हजार लोकांकडून अद्यापं व्हावा तसा बंदोबस्त होत नाहीं. मुसलमान हिंदूंस व हिंदु मुसलमानांस साधेल तेथें व साधेल तसे लुटताहेत; दोन तीनशें लोक जखमी झाले; दोन तीनशें कैद केले; पन्नास साठ प्राणास मुकले आणि सर्व लहानसहान गल्ल्यांतून व घरोघर लोक भीतीनें व काळजीनें व्याकूळ झाले आहेत; ही स्थिति पाहून इंग्रजसर-

---

* [केसरी—ता. १५ आगष्ट १८९३]

कारचें प्रजेच्या रक्षणाबद्दलच्या तयारीचें कोणासहि आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. मुंबईबेट म्हणजे फार मोठें आहे असें नाहीं; तथापि व्यापाराचें व राज्याचें तें मुख्य ठिकाण असल्यामुळें तेथें बहुतेक सर्व जातीचे व धर्मांचे लोक वाळूच्या कणाप्रमाणें एकत्र झालेले दृष्टीस पडतात. युरोपियन, खिस्ती, पार्शी, मुसलमान, अरब, शिद्दी, बाटे, खोजे, वाणी, मारवाडी, घाटी, दक्षिणी, कोंकणी वगैरे सर्व प्रकारचे लोक तेथें उद्योगाकरितां जाऊन येऊन नेहमीं रहात असतात. या लोकांमध्यें व्यापाराखेरीज सर्वांस सामान्य व सर्वांच्या सारखी हिताची अशी दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं. हा व्यापाराकरितां एकत्र झालेला निरनिराळ्या जातींचा समूह केव्हां फाटेल व केव्हां एकत्र होईल हें सांगणें मोठें दुर्घट आहे. व हें लक्षांत ठेवून मुंबईच्या संरक्षणाची योग्य तजवीज सरकारानें ठेवावयास पाहिजे. नेपोलियन बोनापार्टचें असें म्हणणें असें कीं, फ्रेंच रेव्होल्युशन वेळेवरच तोफेचा व गोळ्यांचा उपयोग केला असता तर तावडतोब बंद करितां आली असती; व हाच न्याय बहुतेक सर्व दंग्यांस थोडयाबहुत अंशानें लागू आहे. जुम्मामशिदींतून दीन दीन करीत रात्रीं जे लोक बाहेर पडले त्यांचा पहिल्यानेंच जर पोलिसानें नीट समाचार घेतला असता तर ही दंग्याची आग इतकी पसरली असती कीं नाहीं याची आम्हांस शंकाच आहे. मुंबईचे पोलिस बातमी मिळविण्यांत मोठें कुशल असेल, पण दंग्याचें बीज मोडण्याइतकेंहि त्यांजजवळ लष्करीसामर्थ्य असूं नये ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. मुंबईइलाख्यांत एका शहरीं दंगा झाला तर त्यास येथून लष्करी लोकांची कुमक पाठवावी लागली. तेव्हां हाच दंगा जर दोन चार ठिकाणीं झाला असता तर सरकारची काय तारांबळ उडून गेली असती ह्याची सहज कल्पना होते. सरकार दंगा मोडण्यास इतकें दुर्बल आहे अशी बदमाष लोकांची समजूत होणें इष्ट नाहीं, करितां हल्लींच्या दंग्यापासून सरकारनें बोध घेऊन आपल्या पोलिसाची व लष्कराच्या वांटणीची व्यवस्था सुधारावी अशी आमची सूचना आहे. इंग्रजी राज्यांत लोकांच्या मालमत्तेवर व जीवितावर अशा प्रकारचे हल्ले क्वचित् होतात हें खरें आहे; पण जेव्हां ते होतात तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांची मोठी धांदल उडून जाते अशी. सामान्य जनांची समजूत होऊन कधींहि निभाव लागणार नाहीं.

सरकारच्या तयारीविषयीं हा विचार झाला. पण ज्या लोकांमध्यें हा दंगा सुरू झाला आहे त्यांच्यामधील परस्परसंबंधाचा विचार केला म्हणजे दुसरेहि अनेक प्रश्न उत्पन्न होतात. मुंबईच्या दंग्याची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून हा दंगा अकस्मात् उत्पन्न होण्यास प्रभासपट्टण येथील दंग्याचें मुख्य कारण असावें असें उघड दिसतें. मुसलमान लोक चिरडीस जाण्यास हिंदु लोकांनीं पट्टण येथील लोकांस मदत करण्यासाठीं भरविलेल्या सभा मुख्यत्वेंकरून कारण झाल्या असें कित्येकांचें म्हणणें आहे; परंतु

त्याचा अर्थ आम्हांस बरोबर समजत नाहीं. हिंदु लोकांनीं मोठमोठ्या सभा भरवून मुसलमानांवर स्वारी करण्याचें अगर त्यांजवर कोणत्याहि रीतीनें छापा घालण्याचें अगर हल्ला करण्याचें ठरविलें नव्हतें. दुःखितांस अगर निराश्रितांस मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे व त्याच हेतूनें मुंबईतील गुजराथी मंडळीनें प्रभासपट्टण येथील लोकांस मदत करण्याकरितां मोठमोठ्या सभा भरविल्या होत्या. या सभांपासून मुसलमान लोकांस जर त्वेष आला असला तर त्याचा सर्व दोष मुसलमान लोकांकडेच आहे. सभा भरविण्यांत हिंदूंची कांहीं चूक नव्हती व जोंपर्यंत त्यांचा सर्व व्यवहार कायदेशीर होता तोंपर्यंत त्यांनीं, केलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल मुसलमानांस वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मुसलमान लोकांनींहि आपल्या जातभाईंस मदत करण्याकरितां सभा भरविली होती व तेथेंहि वरीच वर्गणी गोळा झाली होती, अशा रीतीनें सभेस सभा झाल्यावर फिरून मुसलमान लोक जर हिंदूंवर हल्ला करूं लागले तर हा दोष सर्वांशीं मुसलमानांवर टाकणेंच न्याय्य आहे. अशा रीतीनें जाणून-बुजून व विनाकारण मुसलमानांनीं हिंदूंवर हल्ला करण्यास प्रवृत्त व्हावें हें मोठेंच आश्चर्य आहे. व अद्यापहि सरकाराकडून जर याचा नीट बंदोबस्त होणार नाहीं, तर मुसलमान लोकांचा शिरजोरपणा उत्तरोत्तर वाढत जाऊन तो अखेरीस सर्वांसच असमाधानकारक होईल यांत संशय नाहीं. मुंबईचे पोलिस कमिशनर व्हिन्सेंट साहेब यांच्या मतें गोरक्षणाबद्दल हल्लीं जी चळवळ सुरू आहे त्यामुळें हे दंगे झाले असावेत; परंतु हीहि सबब अगदीं निरर्थक व निष्प्रयोजक आहे. उत्तरहिंदुस्थान व दक्षिणहिंदुस्थान यांमधील मुसलमानांची स्थिति अगदीं भिन्न आहे व हिंदुस्थानांत ज्या कांहीं गोष्टी असल्या दंग्यास कारणीभूत होतात त्या आमच्या इलाख्यांत होण्याचा संभव नाहीं. गोरक्षणाची चळवळ सुरू झाल्यापासून मुसलमान लोकांस पोटभर खावयास न मिळाल्याचें कोठेंहि ऐकिवांत नाहीं! करितां टाइम्स ऑफ इंडियासारख्या पत्रकर्त्यानें गोरक्षणाचा व दंग्याचा संबंध जोडून देणें म्हणजे एक प्रकारें मुसलमान लोकांस अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजन देण्यासारखेंच आहे. मुसलमान लोकांची सर्वत्र अशी समजूत आहे कीं, सरकार आपणांस भितें व यामुळें केव्हांहि दंगा झाला असतां सरकार सहसा हिंदूंची बाजू घ्यावयाचें नाहीं. ही समजूत खरी असो वा खोटी असो त्याचा येथें विचार कर्तव्य नाहीं. मुसलमान लोकांची अशी समजूत आहे ही गोष्ट आमच्या मतें निर्विवाद आहे व लॉर्ड हॅरीस यांनीं परवां शेट लखमीदास खिमजी यांची भेट घेण्याचें नाकारलें, ह्या व अशा प्रकारच्या दुसऱ्या उदाहरणांवरून थोडीबहुत तरी ती दृढ होत जाते. सरकार अशा रीतीनें एका धर्माच्या लोकांस वचकतें अगर त्यांचा फाजील सन्मान ठेवतें अशी कोणाचीहि समजूत होणें प्रजेच्या स्वास्थ्यास अपायकारक आहे; व विशेषेंकरून आम्हां महाराष्ट्रीयांस

तर ही सरकारची समजूत अत्यंत घातुक आहे. उत्तराहिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं मुसलमानांचें प्राबल्य असेल, परंतु आमच्या इलाख्यांत तसा प्रकार आजपर्यंत कधींहि नव्हता. इंग्रजी राज्य होण्यापूर्वी महाराष्ट्राचा इतिहास पाहिला म्हणजे मराठेलोकांनीं खुद्द दिल्लीच्या बादशहापासून गोरक्षणाची सनद मिळवून आणल्याचें इतिहासांत नमूद आहे. मुसलमानांचें राज्य जारी असतां जर गोरक्षणाची अशा तऱ्हेनें आपआपसांत व्यवस्था लागली, तर आजच मुसलमानांनीं आमच्या प्रांतांत गोरक्षणनिमित्त हिंदूंवर हल्ला करण्यास प्रवृत्त कां व्हावें याचें कारण आम्हांस समजत नाहीं. हिंदु व मुसलमानांत अशा तऱ्हेचें वैमनस्य उत्पन्न होऊन त्यांनीं एकमेकांत मारामारी करावी हें कोणाहि समंजस मनुष्यास इष्ट वाटणार नाहीं. पण हल्लीं जो प्रकार होत आहे तो समंजस मनुष्याच्या सल्ल्यानें अगर कानाडोळ्यानें होतो असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं. मुसलमान लोक जर शेफारले असले तर आमच्या मतें त्यांचें मुख्य कारण सरकारची फूस हें होय. लॉर्ड हॅरीस ह्यांनीं परवां कौन्सिल हॉलांत हिंदुमुसलमान लोकांच्या पुढाऱ्यांस हा दंगा मोडण्याबद्दल मोठ्या कळकळीनें उपदेश केला हें खरें आहे, पण हा उपदेश करितांना या मंडळीचा दंगेखोर लोकांशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे याचें लॉर्ड हॅरीस यांस चांगलेसें ज्ञान नाहीं अथवा ते घाईत ती गोष्ट विसरलें असें म्हणावें लागतें; कौन्सिलांत मुंबईतील मुसलमान लोकांचा एकहि प्रतिनिधी नाहीं व हिंदु लोकांस शांत करण्यास मि० मेथा, मि० जव्हेरीलाल किंवा मि० सेटलवाड यांपैकीं कोणाचीहि जरूर नाहीं; मुंबईचे हिंदु लोक जे चवताळले आहेत ते मुसलमानांसारखे धर्मवेडानें अगर अविचारीपणानें नव्हे तर केवळ आत्मसंरक्षणार्थच होय; एक दिवसपर्यंत त्यांनीं वाट पाहिली; पोलिसाच्या हातून त्यांचें संरक्षण होईना, तेव्हां आपल्या संरक्षणाकरितां त्यांना दंगेखोरांचा प्रतिकार करणें भाग पडलें; हिंदु लोक प्रथमतः दंग्यास प्रवृत्त झाले नाहींत हें एकंदर हकीकतीवरून अगदीं स्पष्ट दिसत आहे, व सरकारची मदत योग्य वेळेस जर येऊन पोंचली असती तर प्रायः कोणीहि हिंदु मारामारी करण्यास धजला नसता. अद्यापहि सरकार जर हिंदूंचें संरक्षण करण्याचें व मुसलमानांनीं विनाकारण केलेल्या दंग्याबद्दल त्यांस शासन करण्याचें अभिवचन देईल तर हिंदु मोठ्या खुषीनें दंग्यांतून परत फिरतील अशी आमची समजूत आहे.

युरोपिअन लोक हिंदु लोकांस नेहमीं असें हिणवीत असतात कीं, इंग्रजी राज्य आहे म्हणून हिंदु लोकांचें मुसलमानांपासून संरक्षण होत आहे. आज जर इंग्रज लोक हिंदुस्थानांतून गेले तर मुलमान लोक हिंदु लोकांस खाऊन टाकतील! जणुं काय मुसलमान लोकांपासून आमचें संरक्षण करण्याकरितांच परमेश्वरानें त्यांस पाठविलें आहे! परंतु ही समजूत अगदीं चुकीची आहे, इतकेंच नव्हे तर असल्याच उद्गारांनीं मुसलमान लोकांस विनाकारण उत्तेजन मिळत गेलें आहे. इंग्रजलोक

हिंदुस्तान सोडून गेले असतां आमचें काय होईल याची आम्हांस बिलकूल काळजी नाहीं, इंग्रजांनीं हिंदुस्थानांत पाऊल ठेवण्यापूर्वीच मुसलमानांची सत्ता मोडत चालली होती, व इंग्लिशांनीं हिंदुस्थानचें राज्य कमावलें तें मुसलमांनां-पासून नव्हे तर मराठे व शीख लोकांपासून होय.

टिपूचें राज्य खालसा केल्यानंतर ज्याप्रमाणें म्हैसूरच्या जुन्या राज्यघराण्याचे वंशज हुडकून आणून त्यांस गादीवर बसविलें त्याचप्रमाणें दिल्लीच्या वृद्ध बादशहा-चीहि इंग्रजांस व्यवस्था करावी लागली, हें सुप्रसिद्ध आहे; व इंग्रजसरकारचा जर या देशांत रिघाव झाला नसता तर आज जीं एकदोन मुसलमान संस्थानें राहिलीं आहेत तींहि केव्हांच नामशेष होऊन गेलीं असतीं. असो. या जुन्या गोष्टी सांगत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. सध्यां सरकारास आमचें इतकेंच सुचविणें आहे कीं, मुसलमानांची नुस्ती प्रौढी गाऊन त्यांस हरभऱ्याच्या झाडा-वर चढवावयाचा जो नेहमीं उद्योग सुरू आहे तो आम्हांसच काय पण एकं-दर इंग्रजीराज्यास अपायकारक आहे. आमच्या महाराष्ट्रांत तरी मुसलमान वर-चढ होण्यास कोणतेंहि ऐतिहासिक कारण घडलेलें नाहीं, व इंग्रजसरकार अथवा त्यांचे कामगार जर विनाकारण मुसलमानांस वचकून त्यांची प्रौढी गाणार नाहींत तर असले दंगे या इलाख्यांत तरी कोठेंहि होण्याचा संभव नाहीं. सरतेशेवटीं गव्हर्नरसाहेबांनीं जो निरनिराळ्या जातींच्या पुढारी लोकांस उपदेश केला त्या-संबंधानें थोडेंसें लिहून हा लेख आटपतों. लॉर्ड हॅरीस यांच्या भाषणावरून त्यांस अद्याप नेटिव्ह लोकांच्या स्थितीचें खरें रहस्य कळलें आहे असें दिसत नाहीं. लॉर्ड हॅरीस ज्यांस लोकांचे पुढारी समजतात त्यांच्या हातून असले दंगे उत्पन्नहि व्हावयाचे नाहींत व मिटावयाचेहि नाहींत. या कामांतले पुढारी लोक निराळेच असतात व जरी त्यांच्या हातून दंगा करण्यास थोडाबहुत मदत झाली तरी अखेरीस तो बंद करणें त्यांच्या इच्छेवर अवलंबून नसतें. मि. ह्यूमसाहेब यांनीं मागें एका प्रसंगीं शेतकऱ्यांच्या दंग्याबद्दल जो उल्लेख केला आहे तो प्रस्तुतच्या दंग्यासहि पूर्णपणें लागू पडतो व ह्यूमसाहेबांचाच या बाबतींतील अंदमास गव्हर्नरसाहेबांच्या अंदमासापेक्षां अधिकबरोबर आहे. ह्यूमसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं, शेतकऱ्यांचे दंगे जेव्हां उपस्थित होतील तेव्हां सरकार व सुशिक्षित पुढारी लोक या दोघांसहि त्यापासून सारखाच त्रास सोसावा लागेल. हिंदु-मुसलमानांतील दंग्याचा प्रकार यांतलाच होय. मि० बद्रुद्दीन तय्यबजी, अगर मि० सयानी यांचें आरब व शिद्द्यांवर जितकें वजन आहे अथवा नाहीं, तित-केंच मि० जव्हेरीलाल अथवा मि० तेलंग यांचें मुंबईतील टोळीवाले लोक, घाटी अगर गिरण्यांतील मजूर ह्यांच्यावर आहे. दोघांच्याहि विद्वत्तेनें व उपदे-शानें या प्रसंगीं कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. फार लांब कशाला, खुद्द लॉर्ड हॅरीस यांनींहि चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या तरी त्यांच्या युक्तीच्या गोष्टींनीं

हें प्रकरण तडीस जाण्यासारखें नाहीं. हें एक खूळ आहे व त्याचा प्रतिकार करण्याचा खरा मार्ग म्हटला म्हणजे कडक रीतीनें त्याचा प्रथमतःच बंदोबस्त करणें हा होय. त्याप्रमाणें सरकारनें आतां तजवीज केलीच आहे व दंग्याचा बहुतेक बीमोड झाला आहे हें पाहून आम्हांस आनंद वाटतो. सरकार अशाच रीतीनें जर नेहमीं वर्तन ठेवील व विनाकारण मुसलमानांस उत्तेजन देण्यासारखी कोणतीहि गोष्ट करणार नाहीं, तर पश्चिम हिंदुस्थानांत मुसलमान व हिंदु एकदिलानें एकत्र राहण्यास फारशी अडचण पडेल असें आम्हांस वाटत नाहीं, इंग्रजी राज्यामुळें निरनिराळ्या जाती एकत्र होण्यास हल्लीं अनेक हेतु व साधनें झालीं आहेत व होत आहेत व हींच साधनें उत्तरोत्तर वृद्धिंगत करून दोन्ही धर्मांच्या लोकांचा होईल तितका मिलाफ करून देण्यास झटावें हें सरकारचें व लोकांचें कर्तव्य आहे. कित्येक सरकारी अंमलदार वन्याच वेळीं ही गोष्ट विसरून जाऊन हिंदुमुसलमानांतील द्वेषभाव कायम राहिला तरच इंग्रजी राज्याचें हित आहे, अशा समजुतीनें मुसलमान लोकांस चिथविण्याचा हस्तें परहस्तें प्रयत्न करीत असतात, लॉर्ड हॅरिससारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं असले प्रकार जेणेंकरून बंद होतील अशी व्यवस्था व वर्तणूक ठेवली पाहिजे व इतकें करूनहि जर कोठें दंगा झाला तर दंगा करण्यास प्रथमतः प्रवृत्त झाले त्यांस कोणाचीहि भीड, मुर्वत न ठेवतां योग्य शासन करावें, म्हणजे असले प्रकार प्रायः कधींहि घडून येणार नाहींत.

❁ ❁ ❁

* मुंबईतील दंगा आणि सरकारचें कर्तव्य

यासंबंधानें गेल्या अंकांतील आमचा लेख प्रसिद्ध झाल्यापासून तों आजपर्यंत इतर वर्तमानपत्रांतून वगैरे जे लेख येत आहेत व अन्यत्र ठिकाणीं या विषयाची जी चर्चा सुरू आहे त्यावरून पाहतां हिंदुमुसलमानांमधील दंग्याचें खरें कारण काय असावें याबद्दल आम्हीं जें मत दिलें होतें तेंच सर्वत्रांस ग्राह्य आहे असें दिसतें. दंगा आतां बहुतेक विझला आहे टाईम्सपत्रकारानें आपली लेखणी थोडीशी आंखडून धरली आहे व कांहीं थोड्या हिंदुमुसलमानांनीं आमच्या इंग्रजी बंधूंची थोडीशी कानउघाडणी करण्याचाहि प्रयत्न केला आहे; परंतु इतक्यानेंच हें प्रकरण मिटेल असें आम्हांस वाटत नाहीं. आज जे १३०० लोक कैदेंत आहेत त्यांची अद्याप चौकशी व्हावयाची आहे व सदर चौकशीच्या वेळीं आरोपीस गुन्हेगार अगर गैर गुन्हेगार ठरवितांना या दंग्यांत मुख्य पुढारी कोण

* [केसरी—ता. २२ आगष्ट १८९३]

व केवळ स्वसंरक्षणाकरितांच किती लोकांस हातांत काठ्या घ्याव्या लागल्या ह्याचा निर्णय आधीं अवश्य झाला पाहिजे. स्वतः दंग्यास प्रवृत्त होणें आणि अंगावर आलेली घोरपड टाळण्याकरितां मारामारीस तयार होणें किंवहुना लोकांच्या अंगावर चालून जाणें या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. आमचा जुना शास्त्रार्थ म्हटला म्हणजे,

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।
आततायिनमायांतं हन्यादेवाविचारयन् ॥

असा आहे. म्हणजे आपले अंगावर चालून आलेला मनुष्य कोणीहि असो विद्वान् ब्राह्मण असो अगर बाप असो त्यास बेलाशक चोपावा. बहुश्रुत ब्राह्मण अंगावर चालून आल्यावर जर ही अवस्था तर मुसलमान अंगावर चालून आल्यावर हिंदूनीं काय करावें हें वरील मनुवचनावरून कैमुतिकन्यायानेंच सिद्ध होतें. मुंबईतील कामाठी; घांटी वगैरे लोकांनीं प्रस्तुतच्या दंग्यांत याच न्यायाकडे लक्ष देऊन मुसलमान लोकांवर हल्ला केला असावा असें त्यांनीं पोलिसास जी हकीकत कळविली त्यावरून उघड होतें. ज्या गिरणींतील मजुरांनीं शनिवारीं मुसलमान लोकांवर हल्ला केला त्यांनीं पोलिसास असें कळविलें होतें कीं, " आमचा सरकाराशीं किंवा पोलिसाशीं दांडगाई करण्याचा काडीइतका देखील हेतु नाहीं. सरकार आमचें मायबाप आहे, परंतु हे मुसलमान लोक उन्मत्त झाले आहेत यांनीं आमचीं देवळें बाटविलीं व आमच्या बायकांवर हात टाकला; करितां यांस तुम्हीं परवानगी दिल्यास बॅकबेमध्यें पिटून लावतों. " गिरणीच्या मजुरांचें हे उद्गार वर लिहिल्याप्रमाणेंच अक्षरशः इंग्रजी पत्रांतून आले आहेत व ते वाचून त्यांचें नीट मनन केलें असतां ते अयथार्थ आहेत असें कोणासहि वाटणार नाहीं. हिंदु लोक मुसलमानांप्रमाणें हिरवट व रानटी नसल्यामुळें आपण होऊन दुसऱ्याच्या अंगावर चालून जाण्याचें साहस त्यांच्या हातून बहुधा होत नाहीं हें खरें आहे; पण हिंदुलोकांत, निदान मराठे लोकांत तरी ' दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नयेच सोसावें " अशा तऱ्हेचा नामर्दपणा अद्याप उत्पन्न झाला नाहीं, ही मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे. मुंबईच्या दंग्यापासून सरकारानें जर कांहीं बोध घ्यावयासारखा असला तर तो हाच होय, व ही स्थिति लक्षांत आणून पुढील बंदोबस्त सरकारानें केला, तरच हिंदुमुसलमानांतील दंग्याचें खरें बीज नाहींसें होऊन राष्ट्रांत शांतता राहण्याचा संभव आहे, हल्लीं मुसलमानांबद्दल सरकारी अम्मलदार जो पक्षपात दाखवितात तो अन्याय्य आहे, इतकेंच नव्हे तर लॉर्ड हॅरीस यांनीं या बाबतींत कांहीं सुधारणा न केल्यास एकंदर इंग्रजी राज्याच्या इमारतीस तो अपायकारक होईल, अशी आमची पक्की खात्री आहे. वास्तविक पाहिलें असतां आमच्या मुसलमानबंधूंचा इंग्रजसरकारानें इतका बडेजाव करण्याचें कांहीं एक कारण नाहीं, हें आम्हीं गेल्या अंकीं दाखविलेंच आहे. मुसलमान लोकांतील

शिद्दी, पठाण वगैरे कांहीं जाती फाजील आडमूठ व आडदांड आहेत व आमच्यांतील गुजराथी, पांढरपेशे, वगैरे कांहीं लोक असावे तितके धीट अगर शूर नाहींत ही गोष्ट खरी आहे; तथापि एकंदरींत मुसलमानांनीं दंगा केला असतां हिंदु लोक त्यांस भीक घालतील असें नाहीं एवढें हल्लींच्या दंग्यावरून उघड होत आहे; व हेंच मुख्यत्वेंकरून वाचकांच्या व सरकारच्या नजरेस आणण्याचा आमचा इरादा आहे. हिंदु व मुसलमान या दोघांत जर सलोखा व ऐक्य रहावयाचें असेल तर दोन्ही जाती एकमेकांचा प्रतिकार करण्यास समर्थ आहेत अशी त्यांची समजूत होणें अगदीं अवश्य आहे. समानशीलंव्यसनेषु सख्यं अशी आमची एक जुनी म्हण आहे त्याप्रमाणें वाघ वाघ एकत्र राहूं शकतील; बकरीं बकरीं एकत्र राहतील; परंतु बकरें आणि वाघ एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केल्यास दरवेशी आहे तोंपर्यंतच त्यांची मैत्री राहील व जरा दरवेशाची नजरचूक झाली कीं एक दुसऱ्याच्या बोकांडीं बसेल हें अगदीं साहाजिक आहे. हिंदुमुसलमान हे या शेवटच्या वर्गांत न मोडतां पहिल्या दोन वर्गांत येतात हें मराठ्यांच्या इतिहासावरून आणि हल्लींच्या दंग्यावरून चांगलें सिद्ध झालें आहे. आतां इंग्रजसरकारनें या बाबतींत कोणत्या प्रकारचें वर्तन ठेवलें पाहिजे एवढाच कायतो प्रश्न आहे.

मुसलमान लोकांच्या उन्मत्तपणाचा प्रतिकार करण्यास हिंदु लोक जरी समर्थ असले तरी त्यांची इच्छा दंगाधोपा होऊं नये व सर्वत्र शांतता रहावी अशी असल्याचें आकर्थ साहेबांच्या सभेंत हिंदु मुसलमान पुढारी गृहस्थांचीं जीं भाषणें झालीं त्यावरून कोणासहि उघड कळून येणार आहे. ऑनरे० काजी शाबुद्दीन मि० बद्रुद्दीन, तय्यबजी मि० अमरुद्दीन, ऑ० फाजलभाई यांस हल्लींच्या दंग्याचें जितकें वाईट वाटत आहे तितकेंच राव ब० रानडे, ऑनरे० मि० तेलंग, मि० जव्हेरीलाल, मि० वरजीवनदास वगैरे गृहस्थांसहि वाटत आहे. इंग्रजसरकारच्या राज्यांत सर्वांनीं सुखासंतोषानें राहून एकमेकांच्या हक्कास जपावें, एकमेकांस साह्य करावें, व्यापारधंद्यास उत्तेजन द्यावें, व हरएकप्रकारें आपल्या देशाची स्थिति सुधारून जेणेंकरून आपणास सौख्य होईल तो मार्ग स्वीकारावा असें प्रत्येक सुशिक्षित हिंदूचें व मुसलमानाचें मत आहे. दोन्ही धर्मांतील लोकांस परस्परविरुद्ध अशीं कांहीं तत्त्वें धर्मदृष्ट्या ग्राह्य आहेत. उदाहरणार्थ, गाय मारणें व गाय पूज्य मानणें, मूर्तीचा भंग करणें व मूर्तिपूजा करणें इत्यादि. परंतु मोंगलाईंत अगर पेशवाईंत ज्याप्रमाणें अनुक्रमें मुसलमानधर्माची व हिंदुधर्माची सरशी होण्यास मुसलमान अगर हिंदु लोक प्रयत्न करीत असत तसे दिवस आतां राहिले नाहींत; हें दोन्ही धर्मांतील लोकांस बहुतेक पूर्णपणें समजलें आहे. शंभर वर्षांपूर्वी महादजी शिंद्यानें दिल्लीच्या बादशहापासून मोंगलाच्या मुलखांत गोवध बंद करण्याची सनद ज्याप्रमाणें घेतली तसा प्रकार हल्लींच्या काळांत होणें शक्य

नाहीं अगर अवरंगजेबानें ज्याप्रमाणें हिंदूंचा छळ केला तसा आतां मुसलमानांसहि करतां येणार नाहीं, या दोन्हींहि गोष्टी त्या त्या धर्मांतील लोकांस माहीत आहेत. प्रस्तुतचे राज्यकर्ते हिंदुहि नाहींत व मुसलमानहि नाहींत. करितां त्यांस धर्मसंबंधानें औदासीन्य स्वीकारणें भाग पडलें आहे व हें औदासीन्य धरल्यामुळेंच त्यांच्या राज्याचा गाडा आज पाऊणशें ऐंशीं वर्षें सुरळीत चालला आहे. हें औदासीन्य जोंपर्यंत कायम राहील, जोंपर्यंत इंग्रजसरकार आपण होऊन मुसलमानास हातीं धरून हिंदूचा अव्हेर करणार नाहीं, अगर हिंदूंचा पक्षपात करून मुसलमानांस स्वधर्माप्रमाणें आचरण करण्यास प्रतिबंध करणार नाहीं तोंपर्यंतच मोठमोठ्या इंग्रजी मुत्सद्यांनीं दूरदर्शीपणानें रचलेला इंग्रजी राज्याचा पाया कायम राहील. त्यांतूनहि ज्या दोन जातींचा तंटा सरकारास मिटवावयाचा आहे त्यांपैकीं एक अत्यंत दुर्बळ, गरीब व भित्री आणि दुसरी त्याचमानानें बलवान, उद्धट व दांडगी असती तर गोष्ट निराळी; परंतु वर सांगितल्याप्रमाणें हिंदुमुसलमानांची स्थिती अशा प्रकारची नाहीं. निदान महाराष्ट्रांत तरी मराठे लोक मुसलमानांनीं केलेला आपला अपमान सहन न करतां त्यांजवर तुटून पडून अब्रू राखतील हें निर्विवाद आहे. अशा स्थितींत प्रत्येक जातीस इतर लोकांचा उपसर्ग न होतां आपआपल्या धर्माप्रमाणें वागूं देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. हिंदु लोकांस ज्याप्रमाणें आपले सणवार करण्याचा हक्क आहे त्याचप्रमाणें मुसलमान लोकांसाहि आहे, व जाणूनबुजून जोंपर्यंत यांपैकीं एकजण दुसऱ्याच्या वाटेस जात नाहीं अगर त्याचें मन दुखविण्याचा प्रयत्न करीत नाहीं तोंपर्यंत सरकारनें निःपक्षपातानें दोघांचेंहि सारखेंच संरक्षण केलें पाहिजे. महादजी शिंद्याप्रमाणें इंग्रजलोकांनीं हिंदु लोकांसाठीं गायी न मारण्याची सनद मुसलमान लोकांपासून घ्यावी असें आम्ही म्हणत नाहीं व म्हटलें असतां इंग्रजसरकार ऐकावयाचेंहि नाहीं; परंतु ज्या ठिकाणीं गायी मारण्याचीं दुकानें नव्हतीं त्या ठिकाणीं भर हिंदूंच्या वस्तींत मुसलमानांस सदर दुकानें घालण्याची परवानगी देणें म्हणजे हिंदुलोकांस विनाकारण चिथविण्यासारखें आहे व केव्हांना केव्हां तरी त्याचा प्रतिकार करण्याचें हिंदु लोकांच्या मनांत राहील हें सरकारनें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे. मुंबईचे पोलिसकमिशनर मि० व्हिन्सेट, तेथील म्युनिसिपाल कमिशनर मि० आक्वर्थ आणि त्यांचे पाठराखे टाइम्स ऑफ इंडिया या त्रिवर्गांनीं वरील सिद्धांत खोटा ठरविण्याचा बराच प्रयत्न केला आहे; पण या बाबतींत या त्रिकुटाचें मत अगदीं चुकीचें, पक्षपाताचें, अन्यायाचें व अपघाताचें आहे असें अगदीं स्वल्प विचारांतीं कोणाहि विचारी मनुष्यास कळून येईल. मि० व्हिन्सेंट ह्यांनीं पोलिसकमिशनर या नात्यानें मुंबईचा दंगा मोडण्यासाठीं अत्यंत परिश्रम केले हें आम्हांस मान्य आहे व याबद्दल लोकांनीं त्यांचे अवश्य आभार मानले पाहिजेत; परंतु आग विझविण्यासाठीं रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या बंबवाल्यास आगीचें खरें

कारण पुष्कळ वेळां कळण्याचा ज्याप्रमाणें संभव नसतो त्याचप्रमाणें हल्लींच्या बाबतींत मि० व्हिन्सेंट यांची स्थिती झाली आहे ! हिंदुमुसलमानांचे दंगे कां होतात, ते मोडण्यास कोणते उपाय योजावे वगैरे गोष्टींचा विचार अगर निर्णय करण्याचें काम राज्यसूत्रें चालविणाऱ्या मुत्सद्याचें आहे, पोलिसांचें नव्हे; व याच-साठीं मि० व्हिन्सेंट यांच्या समजुतीकडे प्रथमतः आम्हीं लक्ष दिलें नाहीं. परंतु मि० आक्वर्थ व टाइम्स ऑफ इंडिया या दोघांनींहि मि० व्हिन्सेंट यांच्यासा-रखीच ओरड़ करण्यास जेव्हां आरंभ केला व नामदार गव्हर्नरसाहेब यांच्या आजपर्यंतच्या एकंदर वर्तनावरून त्यांचे कान या एकतर्फी ओरडीनेंच भरून जाण्याचा किती संभव आहे, हें जेव्हां आमचे लक्षांत आलें तेव्हां असल्या मह-त्वाच्या बाबतींत सरकारचें खरें कर्तव्य काय आहे हें जरा स्पष्टपणें आम्हांस सांगावें लागलें. पोलिसकमिशनरास राज्यव्यवस्थेचे असले बिकट प्रश्न सोडविण्याचें जर सामर्थ्य असलें तर ओझ्याचीं ओझीं पगार देऊन कौन्सिलदार मंडळी ठेव-ण्याची कांहीं जरूर नव्हती. पोलिसाचें काम पोलिसानें उत्तम रीतीनें बजाविलें आहे हें निर्विवाद आहे. आतां सरकार आपलें काम कसें बजाविते एवढेंच पहाणें आहे व तें त्यांनीं निःपक्षपातीपणानें बजावलें असतां त्यांतच इंग्रजी राज्याचें व आमचें हित आहे असें आमचें म्हणणें आहे. कोणत्याहि धर्माचा अभिमान न ठेवतां दोघांसहि आ-आपल्या धर्मानें वागण्याची सवलत द्यावी व विनाकारण एका जातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांस हरकत करूं लागल्यास त्यांचें राजानें शासन करावें हेंच शहाणपणाचें तत्त्व आहे. हिंदु लोक गंध लावतात, सोंवळ्यानें जेवतात, नागाची पूजा करतात, मूर्ति स्थापतात, गाईस भजतात म्हणून जर मुसलमान लोकांस वाईट वाटून दंगा कर-ण्यास प्रवृत्त झाले तर त्यांस इंग्रज सरकारानें शासन केलें पाहिजे व असें शासन न झाल्यास हिंदु लोकांच्या मनांतील रुखरुख कधींहि नाहींशी न होतां संधि सांपडेल तेव्हां ते मुसलमानांचा सूड घेण्यास प्रवृत्त होतील. उलट मुसलमानांचा प्रकारहि याचप्रमाणें आहे. हिंदु लोक गाईस पूज्य मानतात म्हणून जर ते मुसलमान मोहल्यांत जाऊन खाटकाच्या हातून बलात्कारानें गाय सोडवून आणतील तर त्यांचाहि इंग्रज सरकारच्या कायद्यानें बंदोबस्त झाला पाहिजे. सारांश, धारवाडी कांट्यांत घातल्याप्रमाणें समतोल एका मापानें हिंदु-मुसलमांस जेव्हां न्याय मिळूं लागेल तेव्हांच दोन्ही जातींतील वैमनस्य नाहींसें होऊन त्या सुखानें नांदूं लागतील. इंग्रजसरकारचे कांहीं कामगार हें तत्त्व विस-रून जाऊन अनेक वेळां हिंदुस्थानांतील लोकांत कलह लागले तरच इंग्रजी राज्याचें हित आहे अशा समजुतीनें मुसलमान लोकांस फाजील उत्तेजन देत असतात; व तोच प्रकार हल्लीं मुंबईस सुरू आहे. हिंदूंनीं प्रभासपट्टण येथील लोकांस मदत करण्याकरितां सभा भरवून पैसे गोळा केले यामुळेंच मुसलमान लोक चिडले असें सिद्ध करण्याचा प्रयत्न चालू आहे; परंतु या लेखकांस असें

समजत नाहीं कीं; हिंदुलोक धोतर नेसातात म्हणून जर उद्यां मुसलमानलोक चिडूं लागले तर त्यांत मूर्खपणा व दोष कोणाचा ? अशा वेळीं मुसलमानलोकांस सरकारानें चांगलीच जरब देऊन ताळ्यावर आणणें जरूर आहे. मुसलमानलोकांस वचकून अथवा भिऊन आम्हीं जर आमच्या नेहमींच्या गोष्टीं करणें सोडून द्यावयाचें, तर मग इंग्रजसरकारचें राज्य असण्याची बिलकुल जरूर नाहीं. आम्हीं जाऊन मुसलमानांच्या पाया पडूं व ते देतील तें खाऊं पण ही स्थिति जोंपर्यंत आली नाहीं, जोंपर्यंत हिंदुलोक इतके हताश अगर नामर्द झाले नाहींत, अगर मुसलमानलोकांचा प्रतिकार करण्याची त्याचे अंगांत धमक आहे, तोंपर्यंत सरकारास दोन्ही जातींस न्यायानें आणि निःपक्षपातानें वागाविणें जरूर आहे. ही स्थिती लक्षांत आणून लॉर्ड हॅरीस यांनीं काय व्यवस्था करणें असेल ती करावी ही हीच आमची त्यांत अखेरची विनंती आहे. हिंदु मुसलमान जातींचे पुढारी लोक एकत्र करून त्यांच्या सहीचे जाहिरनामे प्रसिद्ध करण्यांत कांहींएक अर्थ नाहीं; हें नुसतें ढोंग आहे; व सरकारास जर निःपक्षपातीपणानें न्याय करावयाचा नसेल तर असले वरकरणी उपाय करण्याचेंहि त्यांनीं सोडून द्यावें म्हणजे मग निदान पुढें काय करावयाचें त्याचा विचार करण्यास तरी आम्हांस ठीक पडेल. आजच यापेक्षां जास्त कांहीं लिहितां येत नाहीं.

❁ ❁ ❁

* दंगे कशानें बंद होतील ?

गेल्या आठ पंधरा दिवस मुंबईस जी मोठी धामधूम उडाली होती ती आतां विझत चालली आहे व त्यामुळें या भयंकर आगीच्या ठिणग्या अन्यत्र ठिकाणींहि जाऊन पडतात कीं काय अशी जी भीति वाटत होती तीहि आतां राहिली नाहीं. हिंदु व मुसलमानलोकांतील पुढारीगृहस्थांची एक कमिटी नेमून तिच्या मार्फत दंग्यांत दुखविलेल्या गोरगरिबांस व त्यांच्या कुटुंबास मदत करण्याचें काम चालू आहे व मुंबईच्या मॅजिस्ट्रेटासमोर शेंकडों गुन्हेगारांच्या चवकशीस आरंभ झाला आहे. अशा वेळीं हा दंगा कशानें झाला व असले दंगे होण्यास जीं कारणें होतात तीं काढून टाकण्यास काय इलाज करावे याबद्दल फिरून एकवार लिहिलें तरी गैरवाजवी होणार नाहीं असें समजून आज पुन्हां याच विषयावर लिहिण्याचें योजिलें आहे.

लॉर्ड हॅरीससाहेबांनीं हिंदु मुसलमान लोकांच्या पुढाऱ्यांस दगा मिटविण्याबद्दल विनंती करून आपलेवरील जबाबदारी कमी केली व ऐन दंग्याच्या वेळीं

---

* [केसरी—ता. २९ आगस्ट १८९३]

ते पुण्यांतच कांहीं महत्त्वाचीं सरकारी कामें पहात बसले ही गोष्ट बरी झाली कीं वाईट झाली याचा निर्णय करण्याची आतां कांहीं एक जरूर राहिली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. या बाबतींत आमचें व आमच्या बंधूंचें बहुतेक एकमत झाल्यासारखेंच झालें आहे; परंतु या विषयाचा दुसरा जो भाग आमच्या मतें महत्त्वाचा आहे तिकडे अद्याप जावें तितकें लोकांचें लक्ष गेलें नाहीं. लॉर्ड हॅरीससाहेबांनीं हिंदु पुढाऱ्यांस कौन्सिलहॉलांत केलेली सूचना व मि० आर्कर्थ-साहेबांनीं केलेला तिचा अंमल या दोन्हीहि गोष्टी अगदीं गैर फायद्याच्या आहेत असें आमचें म्हणणें नाहीं; परंतु हिंदु मुसलमान पुढारी गृहस्थांच्या सहीचे शहरांत जाहीरनामे प्रसिद्ध केल्यानें अगर दंगा होऊन गेल्यावर जखमी लोकांच्या हातपायांस पट्टया लावल्यानें अथवा मोडक्या देवळांमशिदीस ठिगळें दिल्यानें असले दंगे होणें पुढें बंद होईल असें जर लॉर्ड हॅरीस, मि. आर्कर्थ व त्यांनीं गोळा केलेले हिंदु-मुसलमानांचे पुढारी यांस वाटत असेल तर ती त्यांची मोठी चूक आहे. हिंदुमुसलमानांचा दंगा मुंबईसच झाला आहे असें नाहीं. ब्रह्मदेश आणि उत्तरहिंदुस्थान यांतहि अशाच प्रकारचे दंगे नुक्तेच झाले आहेत व या सर्वांचा एकत्र विचार करून लॉर्ड हॅरीससारख्या अधिकाऱ्यांनीं जर दंग्याचीं खरीं कारणें शोधून काढून त्याप्रमाणें इतउत्तर व्यवस्था ठेवण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या हातून मुंबई इलाख्यावर किंबहुना सर्वत्र देशावर मोठेच उपकार होतील. परंतु सर चार्लस क्रास्थवेट, वायव्य प्रांताचे लेफ्टनेंट गव्हर्नर यांनीं नुक्तींच जीं एकदोन ठिकाणीं भाषणें केलीं आहेत त्यावरून आणि टाइम्स ऑफ इंडिया, मि. आर्कर्थ, मि. व्हिन्सेंट वगैरे युरोपियन वर्तमानपत्रकर्ते व गृहस्थ यांनीं मुंबईच्या दंग्यासंबंधानें जीं मतें दिलीं आहेत त्यावरून बड्या इंग्रजी अधिकाऱ्यांचीं मनें हिंदुलोकांबद्दल बरींच कलुषित झालीं आहेत असें मानणें भाग पडतें. लॉर्ड हॅरीस यांच्या सूचनेप्रमाणें जे मुंबईतील पुढारी गृहस्थ एकत्र झाले त्यांनीं या गोष्टीचा अद्याप फारसा विचार केला आहेसें दिसत नाहीं व अशा स्थितींत जर ते आणखीं कांहीं दिवस काढतील तर हिंदुलोकांबद्दल वाईट ग्रह उत्पन्न करण्याचा हल्लीं जो प्रयत्न सुरू आहे त्यासच अधिकाधिक यश येण्याचा संभव आहे; करितां आमच्या पुढाऱ्यांनीं वेळींच सावध व्हावें अशी त्यांस आमची सूचना आहे.

हिंदुमुसलमान लोकांच्या पुढाऱ्यांनीं एकत्र मिळून दंगे मिटवावे व पुढें असले दंगे न होण्याची तजवीज ठेवावी म्हणून सरकारी अधिकारी जो डांगोरा पिटीत आहेत तो अगदीं एकतर्फी व आपमतलबी आहे असें आमचें मत आहे; व सरकारच्या सूचनेस भुलून जर आमचे पुढारी लोक ही सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊं पाहतील तर केव्हांना केव्हां तरी फसल्यासारखें होऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदुमुसलमानांच्या दंग्यांचीं

कारणें पहातेवेळीं हिंदु आणि मुसलमान असे दोनच पक्ष आहेत व या दोन पक्षांचाच कायतो आपणास विचार कर्तव्य आहे असें सकृद्दर्शनीं कोणासहि वाटणें साहाजिक आहे. वायव्य प्रांताचें लेफ्टनेंट गव्हरनर सर चार्लस क्रास्थवेट यांनीं गेल्या आठवड्यांत जीं एकदोन भाषणें केलीं त्यांतील आशयहि याच प्रकारचा आहे; परंतु जरा सूक्ष्म विचार केला असतां प्रत्येक विचारी मनुष्यास असें आढळून येईल कीं, हिंदु, मुसलमान आणि सरकार असे तीन पक्ष घेतल्याखेरीज दंग्याच्या कारणाची नीट उपपत्ति लागत नाहीं. मागील राज्यांतून जातींच्या पुढाऱ्यास अगर पंचांस जो अधिकार असे तो आतां राहिला नाहीं. सर्व गोष्टी कायद्यानें बांधून गेल्या आहेत व कायदा ज्यास त्यास समजूं लागला आहे. अशा स्थितींत फक्त हिंदु व मुसलमान पुढाऱ्यांच्या हातूनच दंग्याचीं कारणें निःशेष होतील असें आम्हांस वाटत नाहीं. गोडीगुलाबीनें जेवढा भाग व्हावयाचा असेल तेवढा भाग या पुढाऱ्यांच्या हातून पार पडेल; पण जेथें अमुक गोष्ट अमक्या लोकांनीं करावी कीं नाहीं अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात व त्यांचा निकाल कायदेशिर रीतीनेंच लागणें जरूर आहे तेथें दंगा होणें अगर न होणें हें सर्वस्वी सरकारी अधिकाऱ्यांच्याच वर्तनावर अवलंबून आहे. मुसलमान व हिंदु यांचे कांहीं कांहीं आचार व रीति परस्परांस अगदीं चीड येण्यासारख्या आहेत व त्या एकमेकांनीं किती पाळाव्या याबद्दल कांहीं तरी स्पस्ट नियम असणें व ते नियम सरकारी अधिकारी यांनीं निर्भीडपणें व निर्धास्तपणें अमलांत आणणें अगदीं अवश्य आहे. जोंपर्यंत असे नियम झाले नाहींत, जोंपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांकडून भीतीनें म्हणा अगर पक्षपातानें म्हणा मुसलमान लोकांसच फूस मिळत आहे व जोंपर्यंत सर चार्लस क्रास्थवेट सारखे अधिकारी विनाकारण हिंदुलोकांस नांवें ठेवण्यास व दूषणें देण्यास तयार आहेत तोंपर्यंत हिंदु अगर मुसलमान पुढाऱ्यांच्या हातून असल्या दंग्यांचा सर्वस्वीं बीमोड होणें अगदीं अशक्य होय. पुढारी व समंजस लोक मग ते हिंदु असोत वा मुसलमान असोत, बहुधा कोठेहि असल्या दंग्यांत आपण होऊन पडत नाहींत हें आतां निर्विवाद सिद्ध झालें आहे. हिंदु-मुसलमानांचे तंटे होणें त्यांस इष्ट वाटत नाहीं इतकेंच नव्हे, तर आपल्याकडून ते असल्या गोष्टीपासून होईल तितके अलिप्त रहात असतात. दंगे होण्यास मुख्य कारण अडाणी लोकच होत व त्यांची समजूत सरकारनें आपलें वर्तन सुधारल्याखेरीज नुसत्या पुढारी लोकांकडून कधींहि व्हावयाची नाहीं. पुढारी लोकांस विनंती करून सरकार आपणावरील जबाबदारी कमी करूं पहात आहे, पण हा प्रयत्न सिद्धीस जाईल असें आमच्यानें म्हणवत नाहीं.

आम्हीं म्हणतों त्याची सत्यता प्रत्ययास येण्यास दोन तीन ठिकाणच्या दंग्याची हकीकत पाहिली म्हणजे पुरे आहे. हिंदूंच्या देवळाजवळ गाई मारूं नये

असा हुकूम केल्यामुळें ब्रह्मदेशांत दंगा झाला व हिंदूंच्या वस्तींत हव्या तिकडे मुसलमानांस गाई मारूं दिल्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत दंगा झाला असें आतां प्रसिद्ध झालें आहे. रंगून व अजीमगड येथील दंग्यांचीं कारणें जरी अशा-रीतीनें भिन्न भिन्न होतीं तरी अखेर परिणाम एकच झाला, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सर चार्लस क्रास्थवेट यांचें असें म्हणणें आहे कीं, अजीमगड प्रांतांतील हिंदुपुढारी लोकांनीं शेतकऱ्यांस व गांवकऱ्यांस चिथवून देऊन दंगा करण्यास प्रवृत्त केलें ! परंतु याच दंग्याची लखनौचे प्रसिद्ध बॅरिस्टर बिसन नारा-यण धार यांनीं जी हकीकत प्रसिद्ध केली आहे त्यांत सर्व दोष अविचारी व उद्धट कलेक्टरच्या माथीं मारला आहे. हिंदुलोक प्रथमतः दंगा करण्यास प्रवृत्त झाले ही गोष्ट मि० धार यांनीं निःपक्षपातीपणानें कबूल केली आहे; परंतु हा सर्व प्रकार त्या प्रांतांतील कलेक्टरसाहेबाच्या मूर्खपणानें घडून आला असें त्यांनीं सिद्ध केलें आहे. उघडच आहे कीं, हिंदुलोकांच्या भरवस्तींत मुसलमानांस हव्या तेथें गाई मारण्यास जर एखादा कलेक्टर परवानगी देईल व आपल्या हुकमास कोणीं हरकत केल्यास त्याजवर खटला करून त्यास शिक्षा देईल तर त्यामुळें सर्व हिंदुलोक त्रासून साहाजिक रीतीनें दंगा करण्यास प्रवृत्त होतील. अजीमगड येथें असा प्रकार झाला होता; परंतु त्याचा कांहीं एक विचार न करितां वायव्य-प्रांतांतील लेफ्टनन्ट गव्हर्नरांनीं ज्या अर्थीं हिंदुलोकांवरच सर्व दोष लादण्याचा प्रयत्न केला आहे त्याअर्थीं दंग्याच्या उत्पत्तीचीं खरीं कारणें अद्याप बड्या सर-कारी अधिकाऱ्यांच्या नीट नजरेस आलीं नाहींत असें म्हणावें लागतें. आमच्या इलाख्याचे अधिपति लॉर्ड हॅरीस यांनीं मुंबईंतील दंग्याच्या उत्पत्तीबद्दल अजून आपले विचार उघडपणें प्रसिद्ध केले नाहींत, तेव्हां इतक्यांतच त्यांस सर चार्लस क्रास्थवेट यांच्या वर्गांत ओढतां येत नाहीं; तथापि एकंदरींत आजपर्यंत त्यांचें जें वर्तन झालें आहे तें व मि० आर्कर्थ आणि व्हिन्सेंट यांनीं जे उद्गार काढले आहेत ते लक्षांत आणतां लॉर्ड हॅरीस हे प्रतिक्रास्थवेट न बनतील अशीहि जिम्मा घेणें मोठें कठीण आहे. अशा प्रसंगीं ठिकठिकाणच्या पुढारी लोकांनीं हिंदुमुस-लमानांचे दंगे मिटविण्याकरितां सरकारी अधिकाऱ्यांनीं कोणत्या तऱ्हेचें वर्तन ठेविलें पाहिजे याबद्दलचे आपले विचार स्पष्टपणें सरकारास कळविणें जरूर आहे. कोणत्याहि कारणानें कां होईना सरकारी अधिकाऱ्यांचा कल मुसलमान लोकांकडे विशेष असल्याचें उत्तरोत्तर आढळून येत आहे. व हा जर कल असाच राहिला तर हिंदु आणि मुसलमान लोकांचे पुढारी एकत्र होऊन कांहींएक फायदा व्हाव-याचा नाहीं. उलट आम्हीं वर लिहिल्याप्रमाणें अपयशाचें खापर मात्र पुढारी लोकांच्या डोक्यावर फुटण्याचा संभव आहे, व ह्याचसाठीं त्यांनीं वेळेवरच सावधगिरी राखून सरकारी अधिकाऱ्यांचें वर्तन निःपक्षपातीपणाचें झाल्याखेरीज इतर सर्व प्रयत्न फुकट आहेत असें सरकारास कळविलें पाहिजे.

रंगून आणि अजीमगड या दोन ठिकाणच्या दंग्यांची हकीकत मुंबईच्या दंग्याहून भिन्न आहे, तथापि एकंदरींत सूक्ष्मरीतीनें विचार करितां असें म्हणावें लांगतें कीं, सरकारानें जेथें जेथें दंगा होईल तेथें तेथें जे लोक बेकायदेशीर रीतीनें प्रथमतः दंगा करण्यास प्रवृत्त होतील त्यांस कडक शिक्षा दिल्याखेरीज दंग्याचें बीज कधींहि मोडणार नाहीं. दंग्यामध्यें हिंदु, मुसलमान आणि सरकारी असे तीन पक्ष असतात हें वर सांगितलेंच आहे. सरकारी अधिकारी यांनीं आपलें वर्तन नेहमीं निःपक्षपाताचें ठेवणें ही पहिली गोष्ट होय. मुसलमान हिंदूंचे सण एके दिवशीं आले असतां एकास तुमची नागपंचमी बंद राहूंद्या असें म्हणणें जितकें अन्यायाचें आहे तितकेंच गोकुळाष्टमीनिमित्त डोले काढूं नका असा हुकूम देणेंहि अगदीं गैरशिस्त होय. अशा व्यवस्थेनें कोणा तरी एका जातीच्या लोकांचीं मनें नेहमीं असंतुष्ट होऊन राहिलेलीं असतात व त्यांची एकसारखी धुसफूस सुरू राहून, संधि साधेल तेव्हां सूड घेण्यास ते तयार होतात. हिंदु व मुसलमान यांतील तंटे जर मिटवावयाचे असले तर दोन्ही लोकांचे सण, वार व उत्साह त्यांस निर्विघ्नपणें करूं देण्यास सरकारनें मदत केली पाहिजे. मुसलमानलोकांनीं हिंदुलोकांच्या मोहल्यांत गाई मारल्या तर मुसलमानांस शिक्षा झाली पाहिजे, व कोणीहि हिंदु मुसलमान खाटकाच्या घरांत शिरून दंगा करून गाय सोडवून आणील तर तोहि शिक्षेस पात्र धरला पाहिजे. परंतु जोंपर्यंत एकाकडून कांहीं आगळीक झाली नाहीं व जोंपर्यंत गोरक्षणाची चळवळ फक्त सभा भरविण्यापलीकडे व उपदेश पढविण्यापलीकडे जात नाहीं तोंपर्यंत मुसलमानांनीं उगीच कांहीं तरी डोक्यांत घेऊन दंगा केल्यास त्यांस शिक्षा देण्यासहि सरकारी अधिकारी यांनीं मागेंपुढें पाहतां कामा नये, अशा तऱ्हेनें अधिकाऱ्यांचें वर्तन होऊं लागलें म्हणजे प्रत्येक जातींतील पुढाऱ्यांस आपआपल्या जातींतील लोकांची समजूत घालण्यास ठीक पडेल. पुढारी लोक समंजस असतात म्हणून ते एखाद वेळेस पडती बाजू घेऊन दंगा मिटविण्यास तयार होतील, परंतु सामान्य लोकांचें वर्तन तसें घडणें शक्य नाहीं. या लोकांच्या वर्तनास आळा घालण्यास निःपक्षपाती न्याय हें एकच साधन आहे, व सरकार नेहमीं न्यायानें चालेल व आपण जोंपर्यंत फाजीलपणा केला नाहीं तोंपर्यंत आपलें रक्षण करील व आपल्या हातून कायद्याचें उल्लंघन झालें असतां आपणांस शिक्षा करील असा जोंपर्यंत त्यांस वचक आहे, तोंपर्यंतच ते त्यांच्या पुढाऱ्यांनीं सांगितलेल्या सामोपचाराच्या गोष्टी ऐकून घेतील. पुढाऱ्यांच्या हातांत कोणच्याहि प्रकारची सत्ता नाहीं; फार झालें तर तें बोधाच्या गोष्टी सांगणार परंतु याच बोधाच्या गोष्टी जर सरकारी अम्मलदार झुगारून देऊन कधीं हिंदूंचा व कधीं मुसलमानांचा असा पक्षपात करूं लागले तर ज्या लोकांचे हक्क अशा पक्षपातानें बुडविले जातात त्या लोकांनीं दंगा केल्यास त्यास पुढाऱ्यांनीं काय करावें? मुंबईस

दंगा चालला असतां ज्याप्रमाणें दोन्ही जातींतील समंजस माणसें दंग्याकडे सखेददृष्टीनें पहात होतीं तोच मार्ग अशा स्थलींहि या पुढाऱ्यांस स्वीकारावा लागणार. सरकार हिंदूंचा पक्षपात करील तर मुसलमानांस चीड येईल व मुसलमानांचा पक्षपात करील तर हिंदूंस चीड येईल व ज्या जातीच्या लोकांस चीड येईल ते प्रथमतः दंगा करण्यास प्रवृत्त होतील हें अगदीं साहाजिक आहे. आमच्या सुदैवानें सरकार हिंदु नाहीं व मुसलमानहि नाहीं, तेव्हां हिंदु-मुसलमान लोकांसंबंधें जे जे कांहीं प्रश्न उपस्थित होतील त्यांचा नेहमीं निःपक्षपातानें निकाल करणें हें त्यांस अगदीं सुलभ आहे; इतकेंच नव्हे तर हेंच त्यांचें कर्तव्य होय. हें कर्तव्य जोंपर्यंत सरकार करीत आहे तोंपर्यंत पुढारी लोकांची सरकारास नेहमीं मदत होईल. ज्या दिवशीं सरकार आपणच कर्तव्यपराङ्मुख होऊन एक जातीच्या लोकांस आवडते व दुसऱ्या जातीच्या लोकांस नावडते म्हणूं लागेल तेव्हां अर्थातच पुढाऱ्यांचा नाइलाज होऊन दंगे बंद पडण्याचा संभव रहाणार नाहीं. करितां या सर्व गोष्टी लक्षांत आणून लॉर्ड हॅरीस यांनीं दोन्ही जातींच्या पुढाऱ्यांस ज्याप्रमाणें सूचना केल्या आहेत त्याचप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांसहि सूचना करून क्रिकेटच्या मैदानावर जें शौर्य व धोरण त्यांनीं प्रकट केलें आहे तेंच राजकीय प्रकरणींहि प्रकट करावें अशी आमची त्यांस विनंती आहे.

❖ ❖ ❖

* पुण्यांतील हिंदुलोकांची जंगी जाहिर सभा

तारीख १० रोजीं शनवारवाड्यापुढील विस्तीर्ण मैदानांत हिंदुलोकांची जी मोठी जाहिरसभा भरली होती त्याची हकीकत आम्हीं गेल्या अंकीं दिलीच आहे. या सभेच्या उद्देशासंबंधें बळेंच आपला गैरसमज करून घेऊन रावबहादुरांच्या नादीं लागलेल्या आमच्या कित्येक ग्रामस्थ बंधूंनीं व हिंदुलोकांबद्दल नित्यशः कुत्सित लेख लिहिणाऱ्या टाइम्स आदिकरून वर्तमानपत्रांनीं गेल्या आठ दहा दिवसांत जे अभिप्राय प्रसिद्ध केले आहेत ते पाहून असली सभा भरविण्याचीं कारणें व उद्देश यांचा थोडासा जास्त खुलासा करण्याचें आम्हीं आज योजिलें आहे. हिंदुमुसलमानलोकांमध्यें जे दंगे होतात त्यास सरकारी कामगारांचें वर्तन मुळींच कारण नाहीं असें कोणींहि हिंदुपत्रकारानें म्हटल्याचें आम्हांस माहीत नाहीं. हिंदु, मुसलमान आणि सरकार अशा तीन पक्षांचा या प्रश्नाचा उलगडा करतेवेळीं आपणांस विचार केला पाहिजे, असें जें आम्हीं मागें लिहिलें होतें तेंच प्रायः सर्वत्रांस संमत आहे. व या तिन्ही पक्षांत सरकारची

* [केसरी ता. १९ सप्टेंबर १८९३]

बाजू न्यायाधिशाची असून हिंदु व मुसलमान हे एका दृष्टीनें पक्षकार आहेत, हेंहि त्यांस कबूल आहे. इंग्रजसरकारानें दोन्हीं जातींतील व धर्मांतील लोकांस आपआपल्या धर्माप्रमाणें वागण्याची सवलत दिली व दोघां-सहि निःपक्षपातानें व समदृष्टीनें वागाविलें तरच इंग्रजी राज्यास चिरस्थायित्व व दृढता येईल असें जें राणीच्या जाहीरनाम्यांत नमूद केलें आहे त्याचाच योग्य अम्मल सर्वत्र झाला पाहिजे असें जो तो म्हणत आहे. इतक्या गोष्टी कबूल असल्यावर फक्त हिंदुलोकांचीच सभा भरून सरकारास हिंदुलोकांचें म्हणणें आज कळवूं नये असें म्हणणारे व हिंदुलोकांची सभा होत असल्यास ती मोड-ण्याचा आपल्या हातून होईल तितका इमानेंइतबारें प्रयत्न करणारे कांहीं गृहस्थ तरी आम्हांमध्यें कां मिळावे याचें खरें कारण आम्हांस अद्यापहि बरोबर सम-जत नाहीं. कित्येकांच्या मतें " ये तु भ्रान्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे " या कोटींतच असल्या गृहस्थांचा समावेश करावा असें आहे. हल्लींच्या आमच्या माहितीवरून तसें करण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं; तथापि या गृहस्थांच्या हेतूचा जास्त खुलासा होईपर्यंत आम्ही त्यासंबंधानें आजच कांहीं लिहूं शकत नाहीं. हिंदुमुसलमानांतील दंग्याचीं कारणें केव्हांना केव्हां तरी हिंदुलोकांच्या तर्फे सरकारापुढें मांडलीं पाहिजेत हें निःसंशय आहे. हिंदु-मुसलमान एक दिलानें वागतील तरच त्यांत आपल्या देशाचें कल्याण आहे ही गोष्ट आम्हांस सर्वस्वीं कबूल आहे; परंतु आमच्या दुर्दैवानें या दोन्ही जातींत जर हल्लीं तंटे होत आहेत तर हिंदु-मुसलमानांच्या पुढाऱ्यांची सभा नुस्ती भरविल्यानें असले दंगे पुनरपि न होण्यास जे उपाय करावयास पाहिजेत ते सर्व आपोआप घडून येतील, असें आम्हांस वाटत नाहीं. आमच्या सुदैवानें आज हिंदु व मुसलमान यांपैकीं एकाच्याहि हातीं राजसत्ता राहिली नाहीं व ज्यांच्या हातांत राजसत्ता आहे ते दोन्ही जातींतील तंटे न्यायानें तोडण्यास कबूल आहेत. इतकेंच नव्हे तर तशा अर्थाचें त्यांचें अभिवचनहि आहे. अशा स्थितींत हिंदु-मुसलमानांचें ऐक्य दिव-सानुदिवस वृद्धिंगत होण्यास नुसत्या उदारबुद्धीपेक्षां न्याय आणि उदारबुद्धि यांच्या जोडगोळीनें या कामाचा निकाल लवकर व कायमचा लागेल हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. गव्हर्नरसाहेबांनीं मुंबईच्या सभेंत सर्वांना उदार-बुद्धि अंतःकरणांत बाळगण्याबद्दल जो उपदेश केला तो एका प्रकारें योग्यच होता; पण उदारबुद्धीच्या एकाच चाकानें हा गाडा रेटणें अशक्य आहे. हिंदु-लोक हे जात्याच धर्मसंबंधीं जितके उदार आहेत तितके दुसऱ्या कोणत्याहि धर्मांतले लोक आढळावयाचे नाहींत असें असतां जर हिंदु मुसलमानांमध्यें तंटे होतात तर नुस्त्या औदार्यानें ते दंगे मिटतील असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदु-स्थानांत ज्या निरनिराळ्या जाती हल्लीं एकमेकांशीं मिळून मिसळून वागत आहेत त्याचें कारण इंग्रजी राज्याची न्यायपद्धती हेंच होय व त्या पद्धतीनें

हिंदु-मुसलमानांमधील वैमनस्य नाहींसें होऊन कायमचें सख्य जडण्याचा संभव आहे.

परंतु अशा रीतीनें न्याय होण्यास प्रत्येक पक्षानें आपापली बाजू सरकारापुढें यथास्थित रीतीनें मांडली पाहिजे; व तें काम हिंदु-मुसलमानांच्या सभा करविल्यानें सर्वत्र पार पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदु व मुसलमान या दोघांच्याहि हातीं हल्लीं राज्यसत्ता नाहीं हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. करितां दोघांचें म्हणणें ऐकून घेऊन अखेर जे कांहीं नियम करणें असतील ते करण्याचें काम दोघांनींहि सरकाराकडेच सोंपविलें पाहिजे; त्यास दुसरा इलाज नाहीं. आपण असें समजूं, कीं हिंदु व मुसलमान पुढारी लोकांची या बाबतींत एकवाक्यता झाली; तरी सदर पुढारीलोक जें कांहीं सांगतील त्याचा खालच्या प्रतीच्या लोकांवर कोणत्या रीतीनें अम्मल व्हावा हा प्रश्न शिल्लक रहातो तो रहातोच. सारांश, अखेरीस या बाबतींत सरकारचें वर्तन अमुक एक प्रकारचें असलें पाहिजे व त्यांनीं अमुक एका प्रकारचे नियम केले पाहिजेत असें म्हणणें भाग पडतें. हे नियम सर्वांशीं हिंदूंस अगर मुसलमानलोकांस अनुकूल होतील असें नाहीं व म्हणूनच ते हिंदु-मुसलमानलोकांच्या मिश्रसभेंत पसंत होणें अगदीं दुरापास्त आहे. हिंदूंना ज्या कांहीं गोष्टी पाहिजे आहेत त्या मुसलमानांस नकोत, व मुसलमानांस पाहिजेत, त्या हिंदूंस नको आहेत. अशा ठिकाणीं ज्यानें त्यानें आपापली बाजू शांतपणें तिऱ्हाइतापुढें मांडून न्याय करून घ्यावा हाच एक उपाय आहे. ही गोष्ट लक्षांत आणूनच येथील सभेच्या चालकांनीं फक्त हिंदुलोकांची सभा भरविण्याचा निश्चय केला होता. या सभेंतील ठराव व भाषणें पुष्कळ समंजस मुसलमानलोकांस पसंत पडतील असें आमचें मत आहे; पण ठरावांत नमूद केलेल्या विषयांची चर्चा सर्व प्रतीचे हिंदु व मुसलमानलोक ज्या सभेंत एकत्र झाले आहेत असल्या सभेंत करितां येणें शक्य नाहीं, असें वाटल्यावरून फक्त हिंदुलोकांचीच सभा भरविण्याचा येथील मंडळीनें उद्योग केला. हा उद्योग व हेतु कित्येकांस मान्य होत नसेल, पण आजपर्यंत कधींहि न केला इतका हव्यास करून आमच्या रावबहादुरांनीं असली सभा मोडून टाकण्याचा निश्चय करावा अशा प्रकारचें कोणतेंहि संकट यापासून प्राप्त होण्याचा संभव आहे, अगर होता अशी आमची मनोदेवता अद्यापहि आम्हांस साक्ष देत नाहीं. केव्हांना केव्हां तरी हिंदुलोकांची बाजू सरकारापुढें मांडणें तर अवश्य आहे तर ज्या ठिकाणीं दंगा होण्याचा संभव नाहीं तेथील हिंदुलोकांनीं होईल तितकी लवकर ती सरकारापुढें मांडण्यास आम्हांस कोणतीहि हरकत दिसत नाहीं; व ता० १० रोजीं भरलेली हिंदुलोकांची जाहिरसभा याच हेतूनें बोलाविली होती.

परंतु आमच्या पुण्यामध्यें सार्वजनिक कामें चालविण्याचा ज्यांनीं आपण होऊनच मक्ता घेतला आहे त्यांच्या नाइकास ही गोष्ट पसंत न पडल्यामुळें

सभेच्या उत्पादकांचे हेतु व सभा भरविण्याचे उद्देश यांबद्दल जितका लोकांचा गैरसमज होईल तितका करण्याचा उद्योग सुरू झाला. पुण्यांतल्या पुण्यांत अशा प्रकारचा गैरसमज करणें कठीण होतें. कारण थोरली सभा भरण्यापूर्वी या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं जी एक लहानशी सभा ता० २५ आगस्ट रोजीं भरली होती त्यांत सर्व गोष्टींचा खल होऊन अखेरीस पाऊणशें लोकांपैकीं आठ-दहा लोक खेरीजकरून बाकीच्यांच्या मतानें "हिंदुमुसलमान लोकांत जे दंगे होतात ते बंद करण्यास व दोन्ही लोकांतील मित्रत्व वाढविण्यास कोणते उपाय करावे याबद्दल हिंदुलोकांचें मत सरकारास कळविण्याकरितां फक्त हिंदुलोकांचीच सभा भरवावी" असा ठराव झाला व हाच ठराव हस्तपत्रकांत दाखल करून जाहीरसभा बोलाविली होती. थोरल्या सभेंत राणीसरकारचे आभार मानण्याचा वगैरे तीन ठराव येणार आहेत हें पुण्यांतील रावबहादुरांस सभा होण्यापूर्वी निदान पांचसहा दिवस तरी ठाऊक होतें. कारण पहिल्या छोट्या सभेंतहि त्याचा उल्लेख झाला होता, असें असतांहि मुंबईतील फेरोजशहा मेथा आदि-करून कांहीं गृहस्थ, हायकोर्टातील अठरा वकील व टाइम्स ऑफ इंडिया पत्रां-तील लेखक यांचा या सभेच्या उद्देशाबद्दल जो गैरसमज झाला अगर करण्यांत आला त्याचें आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. टाइम्सपत्रकारानें सभेविरुद्ध जे एक दोन लेख लिहिले आहेत ते त्यास विश्वासू व चांगल्या वाटत असलेल्या गृह-स्थांच्या सांगण्यावरून लिहिले आहेत असें त्यांच्याच लेखांवरून उघड होतें. विश्वासू व प्रामाणिक गृहस्थांनीं अशा तऱ्हेचीं कामें करण्यास प्रवृत्त व्हावें हें आमच्या मतें अत्यंत अश्लाघ्य आहे व टाइम्सपत्रकारानें जर आपल्या बातमी-दारास हें सर्टिफिकेट दिलें नसतें तर विश्वासू व प्रामाणिक गृहस्थांनीं अशी गोष्ट केली असें मानण्यापेक्षां या गृहस्थांची योग्यताच कमी आहे, असें आम्हीं मोठ्या आनंदानें मानलें असतें. कसेंहि असो; सार्वजनिक कामांत मतभेद पडला असतां एका पक्षानें दुसऱ्या पक्षाचा अशा रीतीनें पाडाव करण्याचा प्रयत्न करणें हें आमच्या सार्वजनिक पुढाऱ्यांस अत्यंत लज्जास्पद आहे व अशा तऱ्हेनें पुण्यांतील लोक एकमेकांच्या विरुद्ध एकमेक खटपट करूं लागले तर येथें एकहि संस्था चालेल कीं नाहीं याचा आम्हांस वानवा आहे. राव० रानडे हे शांत आहेत, पोक्त आहेत, विचारी आहेत, अनुभवशीर आहेत ह्या सर्व गोष्टी आम्हांस मान्य आहेत; परंतु त्यांचीं मतें नेहमींच बरोबर असतात किंवा असतीलच असा आमचा समज नाहीं. रावबहादुरांनीं सांगितलेली गोष्ट आमच्या विचारें जर मान्य ठरेल तर ती आम्ही मान्य करूं, नाहींतर करणार नाहीं असा आमचा पूर्वापार क्रम आहे व तोच सभ्यांच्या प्रकरणीं आम्हीं स्वीकारला आहे. रावबहा-दुर हे जागोजाग रुपेरी शृंखलेनें बद्ध झाले असल्यामुळें राजकीय बाबतींत त्यांचीं मतें नेहमीं आमच्या हिताचींच असतील असें आमच्यानें म्हणवत

नाहीं. ते जी कांहीं गोष्ट सांगतील व जीं कारणें दाखवितील त्यांचा प्रत्येकानें विचार करावा हें म्हणणें रास्त आहे; परंतु तीं प्रत्येकानें कबूल केलींच पाहिजेत असें रावबहादुरांच्या बगलबच्चांखेरीज कोणीहि कबूल करणार नाहीं. रावब० रानडे यांचें मत परवांच्या सभेस प्रतिकूल होतें म्हणून दुसऱ्या कित्येक रावबहादुरांनीं पाहिल्यानें अनुकूल मत दिलें असतांहि तें फिरविलें; हें रावबहादुरीच्या धंद्यास उचित असेल, पण स्वतंत्रपणास अगर संभावितपणास उचित आहे असें आम्हांस वाटत नाहीं. पुण्यांत रावबहादुरांचा एवढा आग्रह दृष्टीस पडल्यावर मुंबईच्या कित्येक गृहस्थांचा गैरसमज झाला तर त्यांत नवल तें कोणतें? रावब० रानडे यांनीं आपल्या सहीचें आजपर्यंत कोणत्याहि राजकीय सभेंत वाचण्यासाठीं पत्र धाडलें असेल असें आम्हांस वाटत नाहीं; परंतु हल्लींच्या प्रसंगीं ही त्यांच्या मनाची नेहमींची समता कायम न राहतां त्यांनीं आपल्या सहीनें आपलें प्रतिकूल मत सभेच्या अध्यक्षांस सभेपुढें मांडण्यास लेखी कळाविलें होतें व हें लेखी पत्र सार्वजनिक सभेचे चेअरमन रावब० भिडे यांनीं म्यानेजिंग कमिटीस न विचारतां सभेच्या अध्यक्षाकडे रवाना केलें. आमच्या मतें सार्वजनिक सभेनें या बाबतींत विनाकारण पडण्याची कांहींएक जरूर नव्हती, व सभेची अशीच स्थिति जर कायम राहील तर ती आपल्या सार्वजनिकपणास लवकरच मुकेल. सरतेशेवटीं रावबहादुरादि मंडळी सभेस हजर नव्हती याबद्दल जीं कांहीं इंग्रजी वर्तमानपत्रांतून दूषणें देण्यांत आलीं आहेत त्याचा थोडासा विचार करून हा लेख संपवितों. रावब. रानडे यांस जी गोष्ट पसंत पडेल तेंच समाजाचें मत असलें पाहिजे असें आम्ही मानीत नाहीं. इतकेंच नव्हे तर, असें मानणें गैरशिस्त आहे असें आम्ही समजतों. लोक आणि त्यांचे पुढारी यांमधील संबंध धनी आणि चाकर यांच्यामधील संबंधापेक्षां फार निराळा आहे. पुढारी हे लोकांचे धनी नव्हत तर चाकर होत. जोंपर्यंत पुढाऱ्यांचें मत लोकमताहून फारसें भिन्न नसतें तोंपर्यंतच लोकांच्या आदरास ते पात्र होतात. परंतु पुढाऱ्यांचें मत लोकमताहून अगदीं भिन्न असलें म्हणजे मग अर्थातच तेवढ्यापुरता तरी काडी मोडून देण्याचा प्रसंग येतो. लोकांचें मत सरकारास कळविते म्हणून सार्वजनिक सभेस किंमत आली आहे—रावबहादुरांचें मत कळविते म्हणून नव्हे—हें सभेनें लक्षांत ठेविलें पाहिजे, व हें लक्षांत न ठेवील, तर आपल्याच हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेईल. आज इंग्लंडांत ग्ल्याडस्टनसाहेब आयरीश लोकांची मुक्तता व्हावी म्हणून अश्रांत परिश्रम करीत आहेत; परंतु ग्ल्याडंस्टनसाहेबांचें मत लोकमत झालें आहे कीं नाहीं असा जो प्रश्न निघतो त्यांतील बीज आमच्या इकडील पुढाऱ्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. लोकसमुदाय एका रावबहादुराच्याच तंत्रानें वागतो असें नाहीं. उदीमधंद्यांत, व्यापारांत, वैद्यकींत, वकीलींत, शेतकींत, सावकारींत आणि इतर धंद्यांत. जो

तो आपआपल्या मानानें व योग्यतेनें कोठें पांच पंचवीस व कोठें दोन चारशें लोकांचा पुढारी होत असतो. लोकांनीं अशा तऱ्हेनें ज्यांस मान दिला आहे अशा शेंकडों लोकांस रावबहादुरांचें मत जर ग्राह्य होईल तर रावबहादुरांचें मत लोकमत होईल; व रावबहादुर लोकमताचे प्रतिपादक आहेत असें म्हणतां येईल. रावबहादुरांचें मत जर या शेंकडों पुढाऱ्यांस कबूल नसेल तर या शेंकडों लोकांचें मत तें लोकमत व रावबहादुरांचें मत तें व्यक्तीचें मत असें म्हणावें लागेल. परवां हिंदुलोकांची जी जंगी सभा भरली होती ती रावबहादुरांचें मत सरकारास कळविण्याकरितां नव्हे, तर लोकमत कळविण्यासाठीं भरली होती. तें लोकमत त्या सभेनें सरकारास कळविलें. रावबहादूर त्या सभेस हजर असते तर लोकांस बरें वाटलें असतें; पण जर ते आपण होऊन हजर राहिले नाहींत तर यामुळें सभेचें कोणतेंहि नुकसान झालें नाहीं. रावबहादुरांचें हल्लीं झालें आहे तसें मत होण्यास कांहीं कारणें असतील, नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं; पण तीं कारणें जोंपर्यंत इतर लोकांस योग्य वाटत नाहींत तोंपर्यंत रावबहादुरांचें मत तें लोकमत असें आम्ही म्हणूं शकत नाहीं. आज या गोष्टी इतक्या स्पष्ट तऱ्हेनें पुन्हां एकवार कळवाव्या लागल्या याबद्दल रावबहादुरांची माफी मागून हा लेख पुरा करितों.

❁ ❁ ❁

* रावब. रानडे व त्यांचे अनुयायी

येथें हिंदुलोकांची जंगी जाहिरसभा झाल्या दिवसापासून कित्येक पत्रकारांनीं जे कुत्सित लेख प्रसिद्ध केले त्यामुळें कोणाचा गैरसमज झाला असल्यास तो दूर व्हावा, म्हणून आज हा विषय आम्ही मुद्दाम हातीं घेत आहों. हिंदुसभेस प्रतिकूल असणाऱ्या पत्रकारांचे गेल्या आठवड्यांत जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून त्यांच्या मनाची नाहीं तरी लेखणीची तीव्रता पुष्कळच कमती झाली आहे, असें कोणासहि सहज कळून येईल. कांट्यानें कांटा काढावा लागतो, अथवा 'विषस्य विषमौषधं' अशी जी जुनी म्हण आहे ती अगदीं यथार्थ आहे. असल्या उपायानेंच आमच्या बंधुवर्गाचीं फिरलेलीं माथीं पुनः ताळ्यावर येऊन ते आतां कोठें थोडेबहुत शुद्धींत बोलावयास लागले आहेत. असल्या प्रसंगीं तीव्र उपायांची योजना न करितां सौम्य शब्दांनींच त्यांचा प्रतिकार केला पाहिजे हें जाणून आम्हींहि जरा बोथटलेली लेखणीच आज हातीं घेण्याचा विचार केला आहे. हिंदुसभेविरुद्ध जे आक्षेप करण्यांत आले त्यांतील

* [केसरी—ता. २६ सप्टेंबर १८९३]

मुख्य आक्षेप असा कीं, ही सभा रावब. रानडे, मि. मेथा वगैरे मंडळी हिंदुसख्याविरुद्ध आग्रहानें भरविण्यांत आली. हा आक्षेप आम्हांस कबूल नाहीं. रावबहादुर रावब. रानडे हे सभेस अनुकूल होते असें आम्हीं कधींहि म्हटलें नाहीं; पूर्वक खल केलाण्याचा आमचा इरादाहि नाहीं; तथापि रावबहादुर सभेस प्रतिकूल म्हणणें लोकांलोकांनीं सभा करूंच नये अगर केली तर त्यांचा त्यांत मुर्खपणा भराविण्याचा मात्र आम्हांस वाटत नाहीं. रावबहादुरांचे अनुयायी व आम्ही यांमध्यें द्यावयाचें मतभेद आहे तो हाच होय. प्रो. गोखले यांच्या मतें रावब. रानडे ती. रावबहाविचारी मंडळीनें " सभा भरवूं नका असें सांगितलें असतां आग्रह असल्या प्रसंगीं विणें अविचाराचें द्योतक होय. " असें वाटतें. आमच्या दुर्दैवानें मंडळी अजून तसें वाटूं लागलें नाहीं; करितां प्रो. गोखले आदिकरून राहीं, रावब. अनुयायी यांच्या व आमच्या मध्यें असा मतभेद कां व्हावा याबद्दल कांहीं तरी थोडासा खुलासा खालीं केला आहे, त्यावरून आमचे विचार वाचक म्हणतील रेस येतील; व कोणत्याहि प्रकारचा गैरसमज पुन्हां उत्पन्न होणार वर्तनक्रमाचा आमची आशा आहे.

कै० रावब. नूलकर, कै० नामदार तेलंग वगैरे आम्हां हिंदुलोकांन्हीहि गोष्टी झाले अगर आहेत त्यापैकीं सर्वांत रावब. रानडे यांस आम्हीं पाहिलें र त्यांच्या हें आमच्या मतें वारंवार सांगण्याची जरूर आहे असें नाहीं. रावब. हादुरांच्या सुटून पड. अंगीं कांहीं न्यूनता नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. तेलंगांचा गोडबोलेक वाचाळ, अंगीं असता तर हायकोर्ट जजाच्या जागीं यांची यापूर्वीच नेमणूक इ ' रावबहाअथवा कै० मंडलीक अगर मि० मेथा यांच्या धीटपणाचा चतुर्थांश इजच उत्पन्न यांच्यामध्यें असता तर आज त्यांचा आम्हांस जो उपयोग होत विरुद्धपक्षाच्या शतपट अधिक उपयोग होऊन लोकांस यापेक्षांहि चांगलें वळण ला करणारांनीं परंतु ईश्वरानें सर्वच गुण एका व्यक्तीस दिलेले बहुशः आढळण्यांत येत नाहींत. पोपटास वाणी, मयुरास पिसारा, सिंहास शक्ति अशी गुणांची वांटणी पशुपक्षांतच नव्हे, तर मनुष्यांतहि ईश्वरानें केली आहे. या वांटणीचा विचार करूनच आम्हीं प्रस्तुतच्या पुढाऱ्यांत रावब. रानडे यांस पहिलें स्थान दिलें आहे. दुसऱ्या कोणत्याहि पुढाऱ्यापेक्षां रावबहादुरांच्या बुद्धीची व्यापकता आणि तीव्रता अधिक आहे, इतकेंच नव्हे, तर त्यांचा व्यासंगहि त्या मानानें जबरा आहे ही गोष्ट क़बूल करण्यास आम्हांस मोठा आनंद वाटतो, व याबद्दल रावबहादुरांची स्तुती करणें झाल्यास ती केसरीकारांकडून जितकी वठेंल तितकी ती रावबहादुरांच्या बगलबच्चांकडून वठेल कीं नाहीं याची शंकाच आहे. रावबहादुरांचे जे खरे गुण आहेत त्याबद्दल आम्हांस यत्किंचित्हि हेवा वाळगण्याचें कारण नाहीं. रावबहादुरांची ही देणगी ईश्वरदत्त आहे व ती दुसऱ्या कोणास नसल्यास रावबहादुरांचा हेवा करून त्यास कांहींएक प्राप्त व्हावयाचें नाहीं. परंतु इतकें झालें तरी रावबहादुर कधींहि

तो आपआपल्या नाहींत असें मात्र म्हणण्यास आमचें मन आम्हांस सांगत नाहीं. आमचे लोकांचा पुढारीपणाचा हक्क यांसाहि ही गोष्ट संमत आहे, पण राववहादुर यांचीं मतें अमुक अशा शेंकडों लोकांस ग्राह्य किंवा अग्राह्य हें ठरविण्याचीं साधनें कोणतीं याचा खुलासा लोकमत होईल; व त्यांनीं पाहिजे तसा केला नाहीं. शारदासदनासंबंधानें राववहादुरांचें राववहादुरांचें मत काय होतें हें आतां सांगावयास पाहिजे असें नाहीं. हयूमसाहेबांचीं लोकांचें मत तें दोन कडक सरक्युलरें पाहून मि० मेथा सारखें धीट लोकहि लागेल. परवां हिंदु चळवळे हें सर्वत्रांस माहितच आहे. तेव्हां राव० रानडे सरकारास कळविण्याकरितां सांगितलेली प्रत्येक गोष्ट नेहमीं खरीच असेल असें मानणें लोकमत त्या सभेनें कारें सदर गृहास्थांबद्दल असलेल्या आपल्या पूज्यबुद्धीस आपल्या लोकांस बरें वाटलेंर पगडा बसवूं देण्यासारखें आहे, असें आम्हांस वाटतें. कै० नाम-यामुळें सभेचें कोणतींही हायकोर्ट जजाचीं चागा पत्करली म्हणून त्याचप्रमाणें जर मि० तसें मत होण्यास हे पत्करावी असा त्यांस कोणी उपदेश करूं लागेल तर त्यास काय तीं कारणें जोंपर्यंत याची कल्पना वाचकांनींच करावी. तेलंग व मेथा यांची विद्येच्या तें लोकमत असें आ करितां तेलंग हे कांकणभर जास्त येतील. मग तेलंग यांनीं दिलेला पुन्हां एकवार कत्तींनीं कां गिरवूं नये असा कोणीं प्रश्न केल्यास रुचिवैचित्र्य, मत-लेख पुरा करितों. णे विचारशक्तीचा एकदेशीय प्रवाह वगैरे कारणें त्यांस सांगावीं लाग-

च्या प्रतिपक्षांनीं जर या गोष्टी लक्षांत ठेवल्या असत्या तर हल्लीं थेत झाला आहे तो कधींच झाला नसता. राव० रानडे हे लेहिल्याप्रमाणें इतर पुढाऱ्यांहून श्रेष्ठ आहेत खरे व तेवढ्याचसाठीं

* राव त्याचा मोठ्या काळजीनें व आस्थापूर्वक विचार केला पाहिजे.

ास राववहादूर प्रतिकूल असले तर त्यांची कारणें आपणास सम-येथें हिंदुलोकांच्हेजेत व तीं आपल्यास समजत नसल्यास त्यांच्याकडे जाऊन पुनः त्याची फोड करून घ्यावी हें म्हणणें अगदीं सयुक्तिक आहे; परंतु राववहादुरांनीं सांगितलेलीं कारणें कोणास जर अपुरीं वाटत असलीं अगर त्यांनीं सांगितलेल्या गोष्टींनीं जर कोणाची खात्री होत नसली तर खात्री न होईल तो मूर्ख, आप-मतलबी आणि हेवेखोर आणि राववहादुर तेवढे शहाणे असें राववहादुरांच्या अनुयायांखेरीज दुसऱ्या कोणासहि म्हणजे खुद्द राववहादुरांस सुद्धां—वाटणार नाहीं अशी आमची खात्री आहे. राववहादुरांनीं दाखविलेलीं कारणें खरीं किंवा खोटीं, पुरीं किंवा अपुरीं हें पाहण्यास डोक्यास बराच त्रास द्यावा लागतो, तो त्रास घेण्यास ज्यांची खुषी अगर शक्ति नाहीं त्यांनीं राव-वहादुरांचा अनुयायीपणा पत्करून त्यांचे आम्ही बगलबच्चे आहों असें म्हणवून घेण्यांत पाहिजे तर खुशाल धन्यता मानावी. आम्ही राववहादुरांचे जरी गुणग्राही आहों तरी अशा तऱ्हेचे अनुयायी नाहीं हें उघडपणें सांगण्यास आम्हांस कोण-तीहि भीति अगर लाज वाटत नाहीं. राववहादुर हे खरोखरीच पोक्त आहेत.

विचारी आहेत, व अनुभवशीर आहेत, असें आमचें मत आहे. व येथील हिंदुसभेच्या चालकांसहि याचप्रमाणें वाटत होतें आणि त्याचकरितां त्यांनीं रावबहादुरांचें विरुद्ध म्हणणें सर्व ऐकून घेऊन त्याचा पुनः पुनः विचारपूर्वक खल केला व अखेरीस पन्नास लोकांची सभा बोलावून त्यांतहि दोन्ही पक्षांचें म्हणणें लोकांपुढें मांडून त्यांचीं मतें घेतलीं आणि मग हिंदुलोकांची जंगी सभा भरविण्याचा बेत कायम केला. रावबहादुर विरुद्ध नसते अगर त्यांच्या म्हणण्यास मान द्यावयाचें मनांत नसतें तर इतका पुनः पुनः विचार करण्याची कांहींएक जरूर नव्हती. रावबहादुरांच्या अनुयायांस हा मार्ग पसंत होणार नाहीं हें आम्ही जाणून आहों. असल्या प्रसंगीं आपल्या स्वतःच्या मतापेक्षां रावबहादुरांच्याच मतास ही अनुयायी मंडळी जास्त मान देईल व देत असते. त्यांचें असें म्हणणें असतें कीं, रावब. ज्याअर्थीं विरुद्ध आहेत त्याअर्थीं त्यांत आपल्यास न कळण्यासारखेंच कींहीं तरी असलें पाहिजे; मग आपण उगीच डोकेफोड कशास करा. रावबहादुर म्हणतील त्याच मार्गानें गेलें म्हणजे झालें. मानवी स्वभावाप्रमाणें हा एक वर्तनक्रमाचा मार्ग आहे व कित्येकांस त्याचें अवलंबन करणें अवश्य असतें. या दोन्हीहि गोष्टी आमच्या लक्षांत आहेत व त्या जाणूनच आम्ही रावबहादुरांस अगर त्यांच्या अनुयायांस केवळ तेवढ्यासाठींच दोष देऊं इच्छित नाहीं; परंतु रावबहादुरांच्या विरुद्ध ज्यांचें मत आहे त्यांच्यावर ज्या वेळेस रावबहादुरांचे अनुयायी तुटून पडतात आणि रावबहादुर तेवढे सद्बुद्धीचे आणि त्यांच्या विरुद्ध मताचे लोक वाचाळ, आपमतलबी आणि राजद्रोही अशी फुशारकी मिरवितात, तेव्हां मात्र 'रावबहादुरांस तरी सद्बुद्धीची सनद कोठून मिळाली आहे' असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. सभेच्या पुरस्कर्त्यांचे हेतु भलभलतेच असून त्यांनीं अखेरीस विरुद्धपक्षाच्या कानउघाडणीमुळें आपले हेतु बदलले असा खोटा गैरसमज उत्पन्न करणारांनीं रावबहादुरांबद्दलहि अशाच तऱ्हेचा गैरसमज उत्पन्न करणें शक्य आहे. अशा अर्थानेंच "हायकोर्टाची जागा मिळविण्याचा व सभेस मोडा घालण्याचा संबंध लावतां येईल" असें व्याकरणांत ज्यास संदेहार्थक वाक्य म्हणतात तसें वाक्य आम्हीं लिहिलें होतें. वास्तविक पाहतां सभा भरविण्याच्या बाबतींत येथें जर दोन मतें होतीं तर कोणींहि कोणाच्या उद्देशाबद्दल शंका घेणें अगदीं असभ्यपणाचें व गैरशिस्त होय. देशाचें हित करणारे तेवढे रावबहादुर व बाकी सर्व देशबुडवे असा जर रावबहादुरांच्या अनुयायांचा समज झाला असेल, तर त्यांनीं तो निदान आपल्या ओठाबाहेर तरी काढूं नये हें चांगलें. राजकीय व सामाजिक प्रश्न इतके बिकट असतात कीं, त्यासंबंधानें निरनिराळीं मतें असणें अगदीं संभवनीय आहे इतकेंच नव्हे, तर कांहीं अंशीं जरूरहि आहे. ईश्वरप्राप्तीचा अमुक एक मार्ग आहे असें सांगणें जितक्या धोक्याचें आहे तितकेंच एखाद्या बिकट राजकीय प्रश्नासंबंधानें अमुक व्यवस्था झाली तरच ती राष्ट्रास हितप्रद होईल

असें म्हणणें हें होय. प्रत्येकास आपापल्या मताचा थोडाबहुत अभिमान असतोच व त्या अभिमानानेंच जो तो आपलें मत तडीस न्यावें याबद्दल खटपट करीत असतो. सर्वांची भिस्त लोकसुदायावर असते. समाज ज्याचें मत घेऊन चालेल त्याचें मत त्या वेळेस खरें मानिलें पाहिजे व हें तत्त्व लक्षांत ठेऊनच ग्ल्याडस्ट-नसारखे मुत्सद्दी लोकमत जागृत करून आपणास अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. आमच्या सुधारकांस ही गोष्ट कळत नाहीं किंवा जाणूनबुजून तिचा ते अव्हेर करतात ही त्यांची मोठी चूक आहे. संख्येचा व अकलेचा जर कांहीं संबंध नाहीं व "जर शाळेंतलीं पोरेंसोरें, तेलीतांबोळी, उदमाव्यापारी, भटेंभिक्षुकें व कांहीं खातेपिते आणि लिहिणारे व वाचणारे" यांची आमच्या खर्डेघाशा, पोरेंहांकू सुधारकांस कांहीं किंमत नाहीं, तर मग राष्ट्रीयसभेसारख्या मोठमोठ्या सभा तरी कशास पाहिजेत ? कायदेकौन्सिलें, सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा, उदीम-धंदे, शेतकी इत्यादि विषयांवर रावब. रानडे वगैरे कांहीं थोर व हुंशार गृहस्थ व त्यांचे अनुयायी यांच्या सहीचा एक अर्ज सरकाराकडे पाठविला म्हणजे झालें; परंतु असा प्रकार जोंपर्यंत चालत नाहीं तोंपर्यंत खातेपिते लोकांचा अभिप्राय हीच आपल्या मताची प्रतीति पाहण्याची कसोटी आहे, हें प्रत्येकानें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. करितां उदमाव्यापारी, भटेंभिक्षुकें आणि कांहीं खातेपिते व लिहिणारे वाचणारे अशांस शिव्या देऊन देशाचें कांहीं हित होईल असें आम्हांस वाटत नाहीं. ज्यांची समजूत अशा प्रकारची असेल त्यांनीं गांवाबाहेर आपलीं घरें बांधून आपल्या शहाणपणाचा तेथें खुशाल टेंभा मिरवीत रहावें, त्यांस कोणीहि प्रत्यवाय करूं इच्छित नाहीं; व तसें करण्यास इंग्रजसरकारच्या दयाळू अमलाखालीं कोणास अधिकारहि नाहीं. मात्र आपला शहाणपणाचा हेका मिरविणारे हे लोक स्वतःच्या शहाणपणाच्या घमेंडीवर पांघरून घालण्याकरितां लोकांस जेव्हां पंडितमन्य ठरविण्याचा प्रयत्न करतात तेव्हां मात्र यांच्या मूर्खपणाचें कधीं कौतुक वाटतें व कधीं तिरस्कार येतो.

असो. रावबहादुरांचे अनुयायांत व आमच्यांत कोणत्या प्रकारचा भेद आहे याचें स्वरूप थोडें तरी वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल. आतां येथील हिंदुसभेसंबंधानें दोन गोष्टी सांगणें जरूर वाटतें, तेवढ्या सांगून हा लेख आटपतों. या सभेसंबंधानें रावबहादुरांचें मत पहिल्यापासून प्रतिकूल होतें. सभेचे उद्देश त्यांस मान्य नव्हते असें नाहीं हें येथें विशेष उघड रीतीनें सांगितलें पाहिजे. सभेचे उद्देश कोणते, त्यांत ठराव काय काय होतील हें रावबहादुरांस सभा होण्यापूर्वी आठ दिवस ठाऊक होतें; इतकेंच नव्हे तर सभेंत जीं भाषणें करावयाचीं तीं अगोदर लिहून काढण्याचें ठरलें आहे, हेंहि त्यांस ठाऊक होतें व पाहिजे असल्यास तीं लेखी भाषणें व ठराव आगाऊ आपण वांचून पहा व आपण ज्या सुधारणा करण्यास सांगाल त्याप्रमाणें सभेचें काम चालवूं अशीहि

सभेच्या चालकांनीं त्यांस विनंती केली होती. सभा भरविणारांचे उद्देश भलतेसलतेच होते अशी खोटी बातमी पिकविणारांनीं वरील गोष्टींबद्दल पाहिजे तर रावबहरांस विचारून आपली खात्री करून घ्यावी. सारांश, रावबहादुर सभा भरविण्याची ही वेळ नव्हे असें सांगत होते, म्हणून सभेच्या चालकांनीं अगदीं पाहिल्यापासूनच सभेंत कोणत्याहि प्रकारचा गैरशिस्त प्रकार होऊं नये अशी खबरदारी घेतली होती व तशी खबरदारी घेतली आहे, असें रावबहादुरांस कळविलें होतें. सभा होण्यापूर्वी आठ दिवस रावबहादुरांचें मत सभेस फारसें प्रतिकूल नव्हतें. मात्र या आदितवारीं सभा भरवावयाची ती पुढच्या आदितवारीं भरवा असें त्यांनीं सांगितलें होतें; परंतु अखेर अखेर त्यांच्या मनानें पुनः उलट खाल्ली व असली सभा आज भरवूं देऊं नये म्हणून उद्योग करण्यास ते प्रवृत्त झाले. ईश्वरकृपेनें हा त्यांचा उद्योग तडीस गेला नाहीं म्हणून त्यांस वाईट वाटत असेल; परंतु त्यांच्या अनुयायांप्रमाणें प्रतिपक्षाचा उद्देश विपरीत करून दाखविण्याचा ते कधींहि प्रयत्न करणार नाहींत अशी आमची खात्री आहे. त्यांच्या अनुयायांनीं हा प्रयत्न मूर्खपणानें केला आहे व शिष्यापराधे गुरोर्दंडः या न्यायानें आमच्या अनुयायांच्या मूर्खपणाचें फळ थोडेंबहुत रावबहादुरांसहि सोसावें लागत आहे, हें पाहून आम्हांस वाईट वाटतें. पण वाग्युद्धास एकदां प्रवृत्त झाल्यावर आम्हांस प्रतिपक्षांमधील अशा तऱ्हेची आवडनिवड करतां येत नाहीं, यास आमचा नाइलाज आहे. अशा प्रसंगीं पर्यायानेंच कां होईना पण रावबहादुरांचें मन दुखविण्याचा आरोप आमच्यावर ठेवण्यापेक्षां रावबहादुर आपल्या अनुयायांस योग्य दिशा दाखवून देत नाहींत याबद्दल त्यांसच नांवें ठेवणें अधिक प्रशस्त होईल, असें आम्हांस वाटतें. आमची ही सूचना कदाचित् चुकीची असेल पण ती खऱ्या हेतूनें केलेली आहे. ज्यास रावबहादुरांचे अनुयायी बनावयाचें असेल त्यांनीं तो मार्ग खुशाल स्वीकारावा, त्यांस आमची कोणतीहि हरकत नाहीं. मात्र इतर लोक आपल्या गोटांत येऊन रावबहादुरांच्या ठाईं चूक होण्याचा बिलकूल संभव नाहीं, असें कबूल करीत नाहींत म्हणून त्यांच्या नांवानें मात्र खडे फोडूं नये म्हणजे झालें. राजकीय बाबतींत रुचिवैचित्र्य व मतवैचित्र्य यास पुष्कळ अवकाश आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे. व एखाद्या बाबतींतील मतवैचित्र्यामुळें झालेला भेद नेहमीं मनांत न बाळगतां दुसऱ्या बाबतींत म्हणजे, मतभेद नसेल तेथें पुनः एकच व्हावयास पाहिजे, हेंच एकुणसाव्या शतकांतील उदार शिक्षणाचें फळ आहे. रावबहादुरांच्या मतें आज ज्या गोष्टी चुकीच्या असतील त्या कालांतरानें खऱ्या आहेत असेंहि केव्हां केव्हां दिसून येईल. करितां कोणत्याहि बाबतींत मतभेद झाला तरी तो गांवांतील चार प्रतिष्ठित लोकांपुढें मांडून लोकमताचें अनुकरण करणें हाच खऱ्या लोकहिताचा मार्ग होय. तसें न करतां रावबहादुरांच्या कांसेस धरून पायाखालीलं

शिडीस लाथेनें झाडणारे लोक आपणांस उपहास्यतेस व लोकांच्या तिरस्कारास मात्र पात्र करून घेतील, हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. या विषयावर पुनः लिहिण्याचा प्रसंग न येईल अशी आमची आशा आहे.

❖ ❖ ❖

* स्वतंत्र चौकशी झालीच पाहिजे

हिंदु मुसलमानांत वैमनस्य कशानें उत्पन्न झालें आहे याबद्दल निरनिराळ्या लोकांचे निरानिराळे कयास चालू आहेत. कित्येकांच्या मतें राशियाचें यांत कांहीं तरी अंग आहे; कित्येक गोरक्षणाशीं याचा संबंध जोडूं पहातात; कित्येक कॉंग्रेसमुळें हे दंगे उत्पन्न झाले असें प्रतिपादन करतात व कित्येक इंग्रजी राज्यव्यवस्थेस दोष देतात. हिंदुमुसलमानांच्या दंग्यांचीं हीं जीं निरनिराळीं कारणें दाखविलीं यांपैकीं खरीं कोणतीं व खोटीं कोणतीं याचा वस्तुतः निर्णय करण्यासाठीं स्वतंत्र चौकशीच झाली पाहिजे, परंतु निदान हिंदुस्थानसरकारचा तरी अशी चौकशी करण्याचा मानस आहे असें दिसून येत नाहीं. हिंदुमुसलमानांचे दंगे होतात यांत सरकारी अंमलदारांकडे कांहीं दोष असेल असें सरकारच्या स्वप्नींहि येत नाहीं व कलकत्त्यांतील एका पत्रकर्त्यानें म्हटल्याप्रमाणें राशियाचा कांहीं संबंध असल्यास तोहि उघडपणें बोलतां येत नाहीं. तेव्हां गोरक्षण आणि नवीन शिकलेल्या लोकांनीं आरंभलेली कॉंग्रेसादि चळवळ या दोहोंपैकीं कशाशीं तरी दंग्याचा संबंध जोडून देणें सरकारास अवश्य झाल्यासारखें दिसत आहे. बंगाल्यांत एका मॅजिस्ट्रेटाची नेमणूक मुद्दाम गोरक्षणाची चौकशी करण्याकरतां झाली आहे व गोरक्षणासंबंधीं कोठें कांहीं जरा गैरशिस्त चळवळ दिसून आल्यास सदर चळवळ करणारावर खटले करण्याचाहि त्यास अधिकार दिला आहे. अमृतबझारपत्रिकाकर्ते यांनीं गया येथील मॅजिस्ट्रेटानें तेथील गोरक्षण सभेंत जे पंचवीस प्रश्न दिले आहेत तेहि प्रसिद्ध केले आहेत व अशाच तऱ्हेचीं सर्वयुलरें अगर प्रश्न ठिकठिकाणीं पोलिसाकडे अगर गोरक्षणी सभेकडे गेलेले असतील असा आमचा अजमास आहे. आमच्याइकडे अशा तऱ्हेचे प्रश्न सरकाराकडून निदान उघडपणें तरी कोठें विचारल्याचें आमच्या ऐकण्यांत नाहीं; पण इतर प्रांतांची वहिवाट पाहतां येथेंहि कांहीं गुप्त चौकशी चालू नसेल असें म्हणवत नाहीं. मुंबईच्या मुसलमान लोकांस कोणीं चिथावलें याचा जरी पोलिसांस पत्ता लागला नाहीं तरी दुसऱ्या दिवशीं कामाठी लोक केवळ आत्मसंरक्षणाकरितां जे चालून गेले ते कोणाच्या तरी सांगण्यानें गेले असतील असें दाखविण्याचा प्रयत्न

* [केसरी—ता. ३ माहे आक्टोबर १८९३]

बिलकुल झाला नसेल असें म्हणणें कठीण आहे. कोणाहि सुशिक्षित मनुष्याचा दंग्याशीं यत्किंचितहि संबंध लावतां आला नाहीं, हें एक आमचें सुदैवच समजलें पाहिजे. मुंबईस जे कांहीं दहापंधरा अगर पांच-पंचवीस हजार लोक दंग्यांत होते त्यांपैकीं काँग्रेस हा शब्दहि बहुतेकांस माहित नसेल असें ग्याझेट पत्रकर्त्यानें स्पष्ट लिहिलें आहे; तेव्हां निदान मुंबईचे दंगे तरी काँग्रेससारख्या चळवळीपासून उत्पन्न होतात असें म्हणतां येणें अगदीं अशक्य आहे. राहतां राहतां गोरक्षणाचीच बाब काय ती राहिली. व्हिन्सेंट, आर्कर्थ वगैरे गृहस्थांचे व तदनुयायी पत्रकर्त्यांचे आजपर्यंतचे उद्गार व लेख मनांत आणले म्हणजे मुंबईच्या दंग्याच्या अखेरीस गरीब बिचाऱ्या गाईंशींच कांहीं संबंध जोडला जाईल अशी धास्ती वाटते. दिव्याखालीं अंधेर असतो या न्यायानें इंग्रजी अंमलदारांस स्वतःच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं दोष आढळून येत नाहींत असें वर सांगितलेंच आहें; परंतु तिऱ्हाइतपणानें कोणत्याहि गोष्टीचा ज्यांस विचार करावयाचा आहे त्यास केवळ इंग्रजी अंमलदारांचेंच म्हणणें प्रमाण धरतां येणार नाहीं. गाय ही आजच हिंदु लोकांस पवित्र वाटूं लागली आहे असें नाहीं; पण गाईच्यामुळें आजपर्यंत कोठें विशेष दंगे झाले नव्हते. इंग्रजी अम्मलदारांच्या वर्तनामुळें दंगे होतात असें म्हटलें तर प्रभासपट्टण येथें जो दंगा झाला तो इंग्रजी अमलांत नाहीं असें उलट उदाहरण दाखवतां येण्या-सारखें आहे. मुसलमानी अमलाखालीं दंगे होतात असें म्हटलें तर निजामच्या राज्यांत अशा प्रकारचे दंगे होत नाहींत. सारांश, कोणतीहि कल्पना बसवूं गेलें असतां कांहींना कांहीं तरी विरुद्ध दाखले दाखवून तिचें खंड करतां येतें; तेव्हां हें गूढ आहे तरी काय हा सर्वांत एक मोठा प्रश्न पडला आहे. हिंदु-मुसलमानांमधील जर ही दुही वाढत जाईल तर प्रजेचेंचसें काय पण राजा-चेंहि त्यांत अकल्याण आहे, असें आतां बहुतेकांस वाटूं लागलें आहे. आमचे राज्यकर्ते असले दंगे मोडण्यास असमर्थ आहेत असें नाहीं; पण राज्याचा सुर-क्षितपणा दंगे न होण्यावर जितका अवलंबून असतो तितका दंगे मोडण्यावर असत नाहीं. सर डब्ल्यू. वेडरबर्न यांनीं इंग्रजसरकारच्या हिंदुस्थानांतील मुख्य राजधानींत दोन चार दिवस लोकांच्या शांततेचा भंग व्हावा याबद्दल जें आश्चर्य व खेद प्रदर्शित केला आहे तो अगदीं यथार्थ आहे. पुणें, काशी वगैरे शहरां-प्रमाणें मुंबई कोणत्याहि विशिष्ट लोकांच्या वस्तीचें स्थान नसून तेथें भिन्न भिन्न जातींचे लोक आज कित्येक वर्षें सलोख्यानें रहात आहेत. या शहरास जें कांहीं वैभव आहे तें इंग्रजी राज्यांतच प्राप्त झालें आहे. व इंग्रजी व्यापाराचें व राज्य-कारभाराचें हें मुख्य नाकें आहे. अशा ठिकाणीं जर हिंदुमुसलमान लोकांचे दंगे होऊन तीन चार हजार लष्करी लोक नेल्याखेरीज ते बंद होत नाहींत तर इतर ठिकाणीं काय स्थिति होणार हें सांगावयास नको. सारांश हिंदुमुसलमानांतील

दंगे होण्याचीं कारणें व तीं नाहींशीं करण्याचें उपाय याबद्दल स्वतंत्र चौकशी करून सरकारानें जर वेळींच कांहीं योग्य तजवीज केली नाहीं तर हा अग्नि शांत न होतां धुमसत राहून त्याजपासून कधींना कधीं तरी राज्यावर मोठें संकट ओढवण्याचा संभव आहे. याकरितां सरकारानें दुष्काळनिवारणार्थ ज्याप्रमाणें काय तजवीजी करावयाच्या हें कमिशन नेमून आगाऊ ठरविलें आहे; व ज्याप्रमाणें शेतकऱ्यांची दैन्यावस्था होण्याचीं कारणें शोधून काढण्याकरितां कमिशन नेमलें आहे, तशाच रीतीनें दंग्याबद्दलहि माहिती मिळवून व साक्षी पुरावा घेऊन सरकाराकडे रिपोर्ट करण्याकरितां एखादें कमिशन नेमणें हें राजाच्या व प्रजेच्या हिताचें जरूर आहे असें सर वुइल्यम वेडरबर्न यांनीं आपलें मत प्रसिद्ध केलें आहे. लॉर्ड हॅरीस यांनीं मुंबईस सारवासारवीचा बराच प्रकार चालविला आहे. पण त्यानें शेवटपर्यंत निभाव लागणें कठीण आहे. तडा गेलेल्या भिंतीस गिलाव्यानें जितकी बळकटी येईल तितकाच हल्लींच्या तडजोडीच्या उपायांनीं हिंदु-मुसलमानांतील ऐक्य वाढण्यास मदत होणार आहे. यासाठीं सर डब्ल्यु—वेडरबर्न म्हणतात त्याप्रमाणें खऱ्या मुत्सद्यानें हिंदुमुसलमानांत वैमनस्य वाढण्याचीं अगदीं मूळ कारणें शोधून काढून त्याचा प्रतिकार करण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे, हें निर्विवाद आहे. सर वेडरबर्न यांनीं पार्लमेंट सभेंत प्रश्न केला होता व पुढेंमागें तोच प्रश्न पुनः निघण्याचाहि संभव आहे. आमच्याकडील शहाणी मंडळी असल्या प्रश्नाचा विचार करण्याचा अद्याप काल आला नाहीं असें घोकीत बसली आहे; पण या त्यांच्या म्हणण्यांत कांहीं अर्थ आहे असें आम्हांस वाटत नाहीं. विलायतेंत व हिंदुस्थानांत बऱ्याच लोकांचें लक्ष या विषयाकडे लागलें आहे. निरनिराळे लोक निरनिराळे तर्क करीत आहेत. अशा वेळीं आपण जर स्वस्थ बसलों, तर कदाचित् अखेर निकाल आपल्याविरुद्ध होण्याचाहि संभव आहे. करितां आमच्या थंडावलेल्या पुढारी म्हणवून घेणाऱ्या गृहस्थांस पुनः एकवार स्वस्थ न बसण्याची विनंति करावी असें मनांत येतें. मग त्यांच्या दूरदर्शित्वाच्या अद्यापहि ती टप्प्यांत न आल्यास त्यास आमचा नाइलाज आहे.

हिंदुमुसलमानांमधील दुहीच्या कारणांचा विचार करूं गेलें असतां हल्लीं ठिकठिकाणीं जे दंगे होतात ते सर्व एकाच कारणामुळें होत असतील असें मानणें अशक्य आहे. हिंदुमुसलमानांच्या चाली, रीतिभाती, सण आणि उत्साह इतके भिन्न आहेत कीं, दोन्ही लोकांचे सण जेव्हां एककालीं येतात तेव्हां थोडाबहुत तरी दंगा होण्याचा नेहमीं संभव असतो. गोरक्षणाची चळवळ अगदीं अलीकडची आहे. व पट्टणच्या दंग्याशीं त्याचा अर्थाअर्थीं कांहींएक संबंध नव्हता हें सदर दंग्याच्या हकीकतविरून स्पष्ट कळण्यासारखें आहे. गोरक्षणासंबंधानें कांहीं ठिकाणीं कित्येक गृहस्थांकडून फाजिल व बेकायदेशीर

प्रयत्न झाले नसतील असें आम्ही म्हणत नाहीं; पण सदर प्रयत्नांस वैमनस्याचीं कारणें म्हणण्यापेक्षां हल्लीं हिंदु मुसलमानांमध्यें वाढत असलेल्या वैमनस्याचे परिणाम म्हणणें अधिक सयुक्तिक होईल असें आम्हांस वाटतें. दंगा होण्यापूर्वी जीं कांहीं कारणें घडून येतात त्यांपैकीं एखादे वेळेस गोरक्षण, एखादे वेळेस ताबुद आणि दुसऱ्या एखाद्या वेळेस हिंदु अगर मुसलमानांची यात्रा हीं असण्याचा संभव आहे; परंतु हिंदुमुसलमानांचें वैमनस्य ज्यास मोडावयाचें आहे त्यास या सर्व गोष्टींच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. मुसलमानी राज्याच्या भर अमदानींत जर असल्या प्रकारचे दंगे होत नव्हते तर इंग्रज लोकांस म्हणजे त्याचा प्रतिकार करतां येणार नाहीं असें नाहीं. बकरी–ईदच्या दिवशीं मुसलमान लोकांनीं शेळी, मेंढी अगर उंट मारावें असें कुराणांत लिहिलें आहे. गाय मारण्याचीच कांहीं जरूर नाहीं असें डॉ. लोनरसाहेबांनीं नुकतेंच विलायतेस प्रसिद्ध केल्याची तार आली आहे. हिंदुस्थानांतहि पुष्कळ लोकांचें असेंच म्हणणें आहे; करितां गोरक्षणासंबंधानेंहि कांहीं तडजोड निघणें अशक्य आहे असें नाहीं. मुसलमानी राज्यांत दिल्लीच्या बादशहांनीं गोवध बंद करण्याबद्दल सनदा दिल्याचीं उदाहरणें मागें आम्हीं सांगितलीच आहेत. इंग्रज राज्यकर्त्यांस हिंदुमुसलमानांमध्यें जर कांहीं तोड काढावयाची असली तर ती याच धोरणावर काढली पाहिजे. कोणत्याहि मुसलमानास हवी तिथें गाय मारण्याचा अधिकार आहे व भररस्त्यांत त्यानें गाय मारली तरी हिंदुलोकांचीं मनें धर्मदृष्ट्या दुखविण्याचा त्यांच्यावर गुन्हा लागू होत नाहीं असले ठराव आणि तेहि हायकोर्टातील न्यायाधीशाकडून होणें म्हणजे एक प्रकारें मुसलमानांस फूस देण्यासारखेंच आहे. हिंदुलोक मुसलमानलोकांइतके जात्याच दंडेल नाहींत हें सरकारानें व सरकारी कामदारांनीं नेहमीं लक्षांत ठेवावयास पाहिजे. गोरक्षणाकरितां जर हिंदुलोक दंगा करतात असें मानलें तर मग युरोपियन अगर खिश्चनलोकांविरुद्ध ते कां दंगा करीत नाहींत? खिश्चनलोक गोमांस खातात ही गोष्ट हिंदुलोकांस माहित नाहीं असें नाहीं, परंतु हिंदुलोकांनीं खिश्चनलोकांस मार दिल्याचें कोठें उदाहरण अद्याप घडून आलें नाहीं. यावरून असें उघड होतें कीं, हिंदुमुसलमानांतील वैमनस्य इतर कांहीं कारणामुळें हल्लीं जास्त वाढलें असून कधीं कधीं त्यांच्या मनानें पेट घेण्यास गोरक्षणादिकांची सबब पुरी होते. वास्तविक गोरक्षण हें त्याचें कारण नव्हे. हिंदुमुसलमानांमध्यें जो कांहीं स्वभावतःच थोडा द्वैतभाव आहे, तो शिक्षणाचा अधिक प्रसार झाल्याखेरीज व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदांताची अधिक मिसळ झाल्याखेरीज कधींहि पूर्णपणें नाहींसा व्हावयाचा नाहीं. यापैकीं शिक्षणप्रसाराचें काम सरकारानेंच अंगावर घेतलें पाहिजे. दुसरें काम मुसलमान मौलवींच्या हातून होईल; परंतु ह्या दोन्ही गोष्टी घडून येण्यास दिनावधि लागेल; तोंपर्यंत गोवध, ताबूद वगैरे बाबतींत कोणाचे कस-

कसे हक्क आहेत ते नीट मनांत आणून त्या बाबतींत सरकारनें केलेले नियम कोणाची भीड मुर्वत न धरतां पाळावे असा बंदोबस्त झाला पाहिजे. दोघांसहि सारख्या सवलती ठेवणें व शांततेचा पहिल्यानें जो भंग करील त्यास योग्य शासन करणें हे हल्लींच्या स्थितींत सलोखा ठेवण्याचे दोन उत्तम उपाय आहेत. ज्ञानाचा जास्त जास्त प्रसार होऊन लोकस्थिति ज्या मानानें सुधारेल त्या मानानें या उपायांची कमी कमी आवश्यकता होत जाईल हें उघड आहे. परंतु ती स्थिति येईपर्यंत वर लिहिलेल्या उपायांचीच योजना केली पाहिजे. सर वेडरबर्न स्वतंत्र कमिशन मागत आहेत ते या गोष्टीचा विचार करण्याकरितांच होय. सरकार आपण होऊन हीं कारणें व उपाय उघडपणें कधींहि कबूल करणार नाहींत, तेव्हां स्वतंत्र कमिशन नेमून चौकशी केल्याखेरीज दुसरें गत्यंतरच नाहीं असें म्हणणें भाग पडतें.

❖ ❖ ❖

* हिंदुमुसलमानांचा समेट

आज दुसरीकडे एका मुसलमान गृहस्थाचें पत्र छापलें आहे त्यावरून मागील अंकीं पत्रव्यवहार या सदराखालीं दिवाण काजी शहाबुद्दीन यांस उद्देशून जो मजकूर प्रसिद्ध झाला होता तो आमच्या कांहीं मुसलमानबंधूंस पसंत नाहीं असें दिसतें. सदर मजकुराची जबाबदारी केसरीकारांवर नाहीं हें उघडच आहे; तथापि काजीसाहेबांच्या भाषणासंबंधानें मत देणें असल्यास गेल्या अंकांतील मजकुरांत प्रसिद्ध झालेल्या मताप्रमाणेंच बहुशः तें आम्हांस द्यावें लागेल. काजीसाहेबांचें भाषण मौलवीसाहेबांच्या भाषणाशीं विसंगत होतें इतकेंच नव्हे, तर तें प्रसंगास अनुचित आणि अयथार्थ होतें असें तें भाषण प्रत्यक्ष ऐकून आमचेंहि मत झालें आहे. काजीसाहेबांनीं स्वतंत्र रीतीनें आपलें मत दिलें याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों. पण त्यांनीं जितक्या निर्भीडपणानें आपलें मत सांगितलें तितक्याच निर्भीडपणें आमचें मत आम्हांला सांगण्याचा अधिकार आहे हें आमच्या मुसलमान बंधूंनीं विसरतां कामा नये. काजीसाहेब हे केवळ मुसलमानाचेच नव्हेत तर सर्व जातीच्या लोकांच्या पुढाऱ्यापैकींच एक आहेत असें आम्हीं समजतों. त्यांची नोकरी हिंदुस्थानांत झाली आहे व त्यांनीं आपलें सर्व आयुष्य बहुतेक हिंदुंच्या सहवासांतच घालविलें आहे हेंहि आम्हांस माहीत आहे. तरी समयविशेषीं ते चुकणार नाहींत असें नाहीं आणि हिराबागच्या सभेंत तर त्यांची निःसंशय चूक झाली असें आम्हांस वाटतें. काजीसाहेब त्या ठिकाणीं अध्यक्ष

* [केसरी--ता. १० आक्टोबर १८९३]

असल्यामुळें त्यांचें अध्यक्ष या नात्यानें झालेलें शेवटचें भाषण ' छपरावरून ' उपरोधिक बोलल्याप्रमाणेंच झालें असल्यामुळें त्यास सभेंत उंत्तर मिळालें नाहीं. नाहींपेक्षां जेथल्या तेथेंच त्याचा प्रतिकार व्हावयाचा. काजीसाहेबांच्या भाषणांतील रोख असा होता कीं, दोन्ही जातींतील दुही माजण्यास हिंदुलोकांच्या वर्तमानपत्रांतील लेख व हिंदुलोकांचें वर्तन हेंच विशेषतः कारणीभूत आहे. हिरा-बागेंत मौलवीसाहेबांच्या भाषणानंतर अशा प्रकारचे उद्गार काढणें म्हणजे दुधांत मिठाचा खडा टाकण्यासारखेंच होतें. त्यांतूनहि काजीसाहेबांच्या आक्षेपांत जर कांहीं खरेपणा असतां तर एक वेळ चाललें असतें; पण खरेपणाहि नाहीं आणि समयोचितताहि नाहीं तर तें भाषण कोणास आवडलें नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. काजीसाहेबांनीं मुसलमानी वर्तमानपत्रें व ग्रंथ एक तर फारसे पाहिले नसावे; अथवा पाहूनहि त्यांचा सदर प्रसंगीं त्यांस विसर पडला असावा. एरव्हीं अशा रीतीनें गैरसावध उद्गार त्यांच्या तोंडांतून निघाले नसते.

इतिहासदृष्ट्या या प्रश्नाचा विचार करण्यांत कांहीं हंशील आहे असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदुमुसलमान लोकांत पूर्वी हल्लींच्याप्रमाणें निष्कारण व केवळ चुरशीचे दंगे होत नसत हें खरें आहे. पण राज्य मिळविण्याकरितां हिंदु आणि मुसलमान यांच्या ज्या अनेक झटापटी झाल्या त्यांत या दोन्ही जातींमध्यें विरुद्ध भाव नव्हता असें कधींहि म्हणतां येणार नाहीं अकबराप्रमाणें दिलदार व उदार कांहीं मुसलमानी बादशहा होते व त्यांची कीर्तिहि इतिहासांत गाजत आहे. आमच्याकडे शिवाजीनें अफझुलखानास मारलें तरी त्याच्या बायकामुलांस कांहीं इजा केली नाहीं हेंहि सर्वत्रांस श्रुत आहे. सारांश नुसता इतिहासच पाहिला तर हिंदु आणि मुसलमान या दोन्ही जातींत उदार अंतःकरणाचे पुष्कळ पुरुष निर्माण झाले होते असें आढळून येईल. पेशवे, गायकवाड वगैरे मराठे सरदारांच्या पदरीं ज्याप्रमाणें पुष्कळ मुसलमान नोकर होते त्याचप्रमाणें दिल्लीचे बादशहा व निजाम यांच्या पदरींहि मोठमोठे हिंदुलोक लष्करांत नौकर असत; परंतु गिझनीचा महमद बादशहा हिंदुस्थानावर स्वारी करूं लागल्या दिवसापासून तों मराठे व शिख लोकांचा उत्कर्ष होईपर्यंत मुसलमान लोकांनीं हिंदू लोकांवर बराच जुलूम केला असें इतिहासावरून उघड होतें. आजमितीस हिंदुस्थानांत जे मुसलमान आहेत त्यांपैकीं फारच थोडे हिंदुस्थानच्या बाहेरील प्रदेशांतून इकडे आले आहेत हें लक्षांत आणलें म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता वाचकांच्या नजरेस येईल. या इतिहासांतील जुन्यापुराण्या गोष्टी आतां काढीत बसण्याची जरूर नाहीं. आजमित्तीस एकमेकांत तंटे करून कोणासहि राज्य मिळण्याचा संभव नाहीं हें दोघांसहि पक्कें माहीत आहे. कोणतेंहि काम करण्यास सामान्यतः स्वार्थ आणि परार्थ असे दोन हेतु असतात. दंगे करून कांहीं स्वार्थ होणार नाहीं हें आम्हीं सांगावयास नकोच. राज्यांतील सर्व मोठमोठ्या जागा आणि एकंदर राज्याचीं

सूत्रेंहि परमेश्वरसत्तेनें तिन्हाइताच्या हातांत भक्कम रीतीनें पडलीं आहेत. अशा वेळीं न नीचो यवनात्परः अथवा काफर अतएव दया न करितां वध्य या दोन्हीहि वचनांची आठवण करून कांहीं उपयोग नाहीं. काफर हा शब्द म्लेंच्छाइतका हलका नाहीं असें आमच्या मुसलमान पत्रकारांचें म्हणणें आहे; पण ही त्यांची चूक आहे. हिंदुधर्माची मुसलमानांनीं किती अवहेलना केली आहे याची कल्पनाहि करणें अशक्य आहे व परमेश्वरकृपेनें सध्यां ती करण्याची जरूराहि नाहीं व पुढें ती येईल असें वाटतहि नाहीं. या गोष्टी आतां आपणांस विसरल्या पाहिजेत व हिंदुमुसलमानांच्या दंग्याचीं जीं कारणें सांगावयाचीं आहेत तीं ह्या व्यतिरिक्त जीं दुसरीं कांहीं कारणें असतील तीं दाखविलीं पाहिजेत. दंगे करण्यांत स्वार्थ नाहीं हें तर उघडच आहे; पण परमार्थहि नाहीं हें मौलवी साहेबांच्या भाषणांत विशेषेंकरून प्रतिपादन केलें होतें. शांति, क्षमा, दया आणि बंधुप्रीति हीं तत्त्वें विशेषतः हिंदुधर्माचींच आहेत असें म्हणण्यास कोणतीही हरकत नाहीं. धर्मवेडानें मुसलमान बेफाम झाल्याचीं ज्याप्रमाणें शेंकडों उदाहरणें आहेत तशीं हिंदूंचीं क्वचितच सांपडतील. आपला धर्म आपण पाळावा, लोकांचा लोकांस पाळूं द्यावा, परक्यास मदत करावी, हिंसा करूं नये, भूतदया ठेवावी ह्या गोष्टी आमच्या हाडापिंडास जितक्या खिळल्या आहेत तितक्या मुसलमानबंधूंच्या अंगीं खिळण्यास आणखी कांहीं दिवस गेले पाहिजेत. ही अशी स्थिति कां झाली आहे याचीं कारणें शोधीत बसण्याची तूर्त जरूर नाहीं. शांति व भूतदया हे गुण हिंदुधर्माचें मुख्य अधारस्तंभ होत व आमच्या मुसलमानबंधूंच्या धर्मांत जर या तत्त्वांचा पूर्ण रिघाव होईल तर मौलवीसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें हिंदु मुसलमानांमधील दंगे नामशेष होण्यास फारसा अवकाश लागणार नाहीं. दंगे करण्यांत स्वार्थ हा नाहींच नाहीं व परमार्थहि नाहीं अशी दुहेरी खात्री झाल्यावर ' न कारणमनूद्दिश्य न मंदोपि प्रवर्तते ' या न्यायानें कोणाचीहि दंग्याकडे प्रवृत्ति होणार नाहीं.

स्वार्थ आणि परमार्थ हे दोन्हीहि हेतु अशा रीतीनें नष्ट झाले म्हणजे हिंदुमुसलमानांचा समेट करण्यास फारशी अडचण पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्रजी राज्याखालीं प्रत्येकास मतस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्य पूर्ण उपभोगावयास सांपडत आहे व तें तसेंच नेहमीं उपभोगावयास सांपडेल अशी एकदां मनाची खात्री झाल्यावर काजीसाहेबांनीं हिरवागेंत ज्या बारीकसारीक गोष्टी सांगितल्या तिकडे कोणाचेंहि लक्ष जाणार नाहीं. मग त्या खऱ्या असोत वा खोट्या असोत. हिंदुमुसलमानांत रोटीबेटी व्यवहार होण्याइतकें धर्मौदासीन्य अथवा धर्मौदार्य निदान कधींहि होईल असें आमच्या बुद्धीस तरी वाटत नाहीं. निदान हजार पांचशें वर्षांत तरी ही गोष्ट होण्यासारखी नाहीं आणि हजार पांचशें वर्षांपलीकडल्या स्थितीचा आज विचार करीत बसलों म्हणजे मनांत मांडे खात बसण्या-

सारखेंच आहे. करितां हिंदु-मुसलमान लोकांनीं ज्या नात्यानें एकत्र रहावयाचें तें कांहीं अंशीं अमेरिकेंत निरानिराळ्या जातींचे निरानिराळ्या धर्मांचे लोक जसे एकत्र राहतात तशा प्रकारचेंच असलें पाहिजे. काजीसाहेब म्हणत होते त्याप्रमाणें हिंदुलोकांस जिंकून मुसलमानांनीं राज्य केलें हें जितकें खरें आहे, तितकेंच हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वी मुसलमानांचा अंमल संपुष्टांत आला होता हेंहि इतिहासांत प्रसिद्ध आहे. कित्येक युरोपियन कामगार मुसलमान लोकांस तुम्ही राज्यकर्ते होतां, व हिंदूपेक्षां तुम्ही अधिक तेजस्वी आहां अशी फूस देत असतात; पण हा सर्व प्रकार लावालावीचा असून अठराव्या शतकांतील हिंदुस्थानच्या इतिहासावरून खरा प्रकार केवळ हे कामगार म्हणतात तसाच आहे असें म्हणतां येत नाहीं, हें आमच्या मुसलमान बंधूंनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. रजपूत, शिख व मराठे इत्यादि हिंदुलोकांतहि बऱ्याच जाती मुसलमानांच्या बरोबरीनें शूर, धीट व तेजस्वी आहेत व इंग्रजसरकारचा अंमल नाहींसा झाला तर हिंदुलोकांस केवळ मुसलमानांसच शरण जावयास नको. एकमेकांच्या शौर्याबद्दल व पराक्रमाबद्दल असा ग्रह झाला असला म्हणजे दंग्याचें पहिलें कारण नाहींसें होईल व हिंदु आणि मुसलमान मिळून दोघेहि आपल्या शक्तीचा उपयोग दोघांच्या साधारण हितासाठीं करतील. हिंदुस्थानच्या इतिहासानें अशा रीतीचा ज्यांच्या मनावर परिणाम झाला आहे व ज्यांची धर्मबुद्धि वेदांत विचारांनीं उदात्त झाली आहे त्यांस आपापसांतील तंट्यांचीं वारीकसारीक कारणें काढून टाकण्यास पंचाईत पडणार नाहीं. हिंदु-मुसलमान लोकांचें खाणेंपिणें, रीतरिवाज, संस्कार, सोहाळे, उत्साह आणि विधि हे बऱ्याच गोष्टींत भिन्न आहेत; परंतु एकदां सलोख्यानें आणि मित्रत्वानें वागावयाचें असा निश्चय झाल्यावर एकमेकांनीं एकमेकांच्या सोयीसाठीं व समजुतीसाठीं कांहीं कांहीं गोष्टी करण्यास व कांहीं सोडण्यास कबूल झालें पाहिजे. अकबरबादशहानें गोवध बंद केला होता व निजामसरकारच्या राज्यांत अद्यापहि तशा प्रकारचा हिंदूंस त्रास होत नाहीं यांतील बीज हेंच होय. मुसलमानलोकांनीं हिंदूंशीं अशा रीतीनें वागावें हें कित्येक सरकारी अम्मलदारांस इष्ट वाटत नाहीं; परंतु हा त्यांचा उपदेश केवळ आपमतलबीपणाचा आहे असें जर आमचे मुसलमान बंधु ध्यानांत ठेवतील तर गोवधासारख्या प्रकरणींहि दोघांसहि हितकारक अशी तोड निघेल अशी आमची खात्री आहे. ही तोड कशी व कोणत्या प्रकारची असावी हेंच स्वतंत्र चौकशीनें मुख्यत्वेंकरून ठरवावयाचें आहे व इंग्रजसरकार तो योग घडवून आणण्यास कदापिहि मागें घेणार नाहीं अशी आम्ही आशा करितों.

❋ ❋ ❋

* येवल्याचा दंगा.

हिंदुमुसलमानांमधील दंगे गोरक्षणामुळें होत नाहींत असें डॉ. लेटनरप्रमाणें ज्या लोकांचें म्हणणें आहे त्यास येवल्यांच्या दंग्यावरून चांगली बळकटी येते: किंबहुना, आकर्थ व व्हिन्सेंट यांनीं गोरक्षणाची कल्पना काढण्यापूर्वी हे दंगे गोरक्षणाच्या चळवळीपासून उत्पन्न होतात, असें कोणासहि वाटत नव्हतें. वेळगांव, राजापूर,मालेगांव वगैरे कित्येक ठिकाणीं हिंदु-मुसलमानलोकांचे या इलाख्यांत जे दंगे झाले होते ते सर्व दोन्ही जातींच्या लोकांचे सण एककालीं आल्यामुळें झाले होते असें दिसून येईल. मुंबईच्या पोलिसांस दंगा आधींच बंद करतां आला नाहीं, म्हणून कोणावर तरी अपयशाचें खापर फोडलें पाहिजे व तें मुसलमानलोकांच्या डोक्यावर फोडलें असतां ते लोक जात्याच उच्छृंखल असल्यामुळें त्यांपासून पोलिसांस अधिक त्रास होण्याचा संभव आहे, ह्या किंवा असल्याच दुसऱ्या कारणामुळें दंग्याचा गोरक्षणाशीं संबंध जोडून देण्याची कल्पना व्हिन्सेंट व आकर्थ यांच्या मनांत आली असावी. ही कल्पना खोटी आहे, असें मागें अनेक वेळां आम्हीं लिहिलें आहे; व येवल्याच्या हकीगतीवरून आमचे म्हणण्यासच अधिक बळकटी येते, असें कोणासहि कळून येईल. इतक्याउपर सर ऑड्र्यू स्कोवल यांनीं म्हटल्याप्रमाणें आमच्या इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड हॅरीस हे जर व्हिन्सेंटसाहेबांचेंच मत घेऊन गोरक्षणावर कटाक्ष ठेवतील, तर हें आमचें मोठें दुर्दैवच समजलें पाहिजे.

येवल्याच्या दंग्याची हकीकत अद्याप पुरी प्रसिद्ध झाली नाहीं, तथापि ज्या गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांवरून दंग्याचीं कारणें व ते मोडण्याचे उपाय यांबद्दल कांहीं ठोकळ अनुमानें सहज निघण्यासारखीं आहेत. येवल्यास बालाजीची पालखी निघत असते ती पाटलाच्या मशिदीवरून वाजत जावी कीं नाहीं येवढाच तंटा होता. जिल्ह्याचे कलेक्टर व मॅजिस्ट्रेट यांनीं नव्या पोलिसॲक्टाखालीं असा हुकूम केला होता कीं, मशिदीवरून पालखी नेण्यास कांहीं हरकत नाहीं. फक्त घड्याळाखेरीज दुसरें कोणतेंहि वाद्य मशिदीच्या आगेंमागें १५ पावलें वाजवूं नये, व मशिदीपुढें विनाकारण थांबू नये. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं आणखींहि असा हुकूम केला होता कीं, सदर दिवशीं मुसलमानलोकांनीं मशिदींत एकत्र जमा होऊं नये. हे दोन्ही हुकूम करण्याचा पोलिस ॲक्टाप्रमाणें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस अधिकार होता. आतां कदाचित् ते हुकूम पूर्वापार रीतीस अनुसरून नसतील, पण डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटाच्या अधिकाराबद्दल शंका घेण्यास कोणतेंहि कारण नव्हतें. या हुकुमाविरुद्ध येवल्याच्या मुसलमानांनीं आपल्या काजीमार्फत

---

* [केसरी–ता. २४ आक्टोबर १८९३]

हायकोर्टांत अपील केलें; परंतु हायकोर्ट जज्जांनींहि मॅजिस्ट्रेटचा हुकूम फिरविण्याचें कारण दिसत नाहीं, असा दंग्याच्या आदल्या दिवशीं ठराव केला होता. दंग्याच्या दिवशीं म्हणजे गेल्या बुधवारीं बालाजीची पालखी मशिदीवरून जात असतां मुसलमानलोकांनीं मशिदींतून दगड मारण्यास आरंभ केला व पुढें दंगा उपस्थित होऊन त्यांत पोलिस सुपरिंटेंडेंट व मॅजिस्ट्रेट यांनीं कांहीं हिंदूंस व मुसलमानांस पकडलें अशी बातमी आली आहे. मुसलमानलोक मॅजिस्ट्रेटच्या हुकुमाविरुद्ध मशिदींत गोळा झाले होते व त्यांनींच प्रथमतः दंग्यास सुरुवात केली, असेंहि समजतें. दंग्यांत पकडलेल्या माणसांची रीतीप्रमाणें चवकशीहि होईलच व पोलिस संरक्षण करण्यास तयार असतां विनाकारण कांहीं हिंदूंनीं जर मारामारी केली असेल तर त्यांसहि शिक्षा होणें रास्त आहे. परंतु आपणांस ज्या गोष्टीचा तूर्त विचार करावयाचा आहे ती यांहून अगदीं निराळी आहे. दंग्याचीं कारणें व तीं मोडण्याचे उपाय वरील हकीगतीवरून कांहीं सुचतात कीं काय एवढेंच मुख्यत्वें करून आपणास पाहणें आहे व याचाच आम्ही विचार करणार आहों !

बेळगांव, येवलें, मालेगांव, राजापूर वगैरे ठिकाणच्या दंग्यांची हकीगत पाहत मुसलमान हिंदूंचे सण एककालीं आल्यानें दोघांच्या हक्कांबद्दल परस्परांत वाद पडून अखेरीस मुसलमान जात्याच कडवट असल्यामुळें ते बऱ्याच ठिकाणीं प्रथमतः हातघाईवर येतात य त्यापासून पुढें दंगा उत्पन्न होतो, असें सामान्यतः दिसून येतें. गोरक्षणाचा त्यांत कांहीं एक संबंध नाहीं. आम्हीं जें हें अनुमान काढलें आहे तें सरकारास माहीत नाहीं असें नाहीं. कारण अशा प्रसंगीं पोलिसानें कोणत्या प्रकारें वर्तणूक करावी याबद्दल सन १८९० सालच्या पोलिस ॲक्टांत जे त्यांनीं नियम घालून दिले आहेत ते एऱ्हवीं घालून दिले नसते. या ॲक्टांतील कलम ४२,४३ व ४४ यांत या प्रश्नाचा विचार केला आहे. ४२ कलमांत असें लिहिलें आहे कीं, दोन जातींच्या अगर धर्मांच्या लोकांत वैमनस्यें अगर तंटे वाढण्याचा जेथें संभव असेल तेथें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट किंवा पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांनीं काठ्या, सोटे, हत्यारें वगैरे वापरण्याची अगर गाणीं, व्याख्यानें अगर जाहिराती म्हणण्याची, देण्याची अगर लावण्याची, जाहिरनामा प्रसिद्ध करून मनाई करावी. कलम ४३ यांत एखादा मोठा दंगा पुढें होऊं नये म्हणून वेळींच कोणत्याहि इमारतीचा कबजा घेण्याचा अथवा ती बंद करण्याचा अथवा त्यांत नियमित लोकांसच येऊं देण्याचा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस अधिकार दिला आहे. कलम ४४ यांत असें सांगितलें आहे कीं, कोणतीहि मिरवणूक एखाद्या विशिष्ट मार्गानें अगर रस्त्यानें नेली असतां कोणत्याहि धर्माच्या लोकांचीं मनें दुखवण्याचा संभव असेल तर, अथवा मिरवणुकीच्या हक्काबद्दल वादविवाद असेल तर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं अशा वेळीं दंगा बंद करण्याकरतां मामूल वहिवाटीप्रमाणें वर्तन ठेवण्याबद्दल जाहिर हुकूम प्रसिद्ध करावा,

व त्याप्रमाणें सर्वांनीं वर्तन ठेवावें. ज्या कोणास हा हूकूम गैरशिस्त वाटत असेल त्यांनीं रीतीप्रमाणें दिवाणी कोडतांत दावा करून कोर्टाचा हुकूमनामा मिळवावा, म्हणजे त्या हुकूमनाम्याप्रमाणें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आपला हुकूम बदलतील. पोलीस ॲक्टांत दंगा मोडण्याबद्दल पोलिसानें कोणते उपाय करावे याविषयीं याखेरीज दुसरीं कलमें नाहींत व येवल्याच्या दंग्यासंबंधानें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं जो हुकूम दिला होता तो याच म्हणजे ४२।४३।४४ कलमांवरून दिला होता. येवल्याच्या मुसलमान लोकांनीं हायकोर्टांत जें या हुकुमावर अपील केलें होतें त्यांत हायकोर्टचे जज यांनीं असें ठरविलें कीं, मॅजिस्ट्रेटचा हुकूम जर कदाचित् मामूल वहिवाटीस अनुसरून नसला तर तो रद्द करण्याकरितां मुसलमान लोकांनीं दिवाणी कोडतांत दावा आणावयाचा होता. अपिलांत त्याचा निकाल करतां येत नाहीं व ज्या अर्थीं मॅजिस्ट्रेटास असा हुकूम देण्याचा कायद्याप्रमाणें अधिकार आहे त्या अर्थीं तो हुकूमहि हायकोर्टास फिरवितां येत नाहीं.

हायकोर्टाचा हा निकाल कायद्याप्रमाणें बरोबर आहे असें उघड होतें; परंतु या निकालावरून व मुसलमान लोकांनीं पुढें जो दंगा केला त्यावरून कायद्यांतच कांहीं तरी सुधारणा झाली पाहिजे, असें म्हणावें लागतें. येवल्याच्याच दंग्याचें उदाहरण घेतलें असतां मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं दिलेला हुकूम हिंदु व मुसलमान या दोघांसहि पसंत नव्हता असें आढळून येतें. हिंदुलोकांच्या मतें घड्याळाखेरीज इतर वाद्यांहि मशिदीसमोरून वाजतीत नेण्यास कांहीं हरकत नसावी व मुसलमानलोकांच्या मतें कोणतेंहि वाद्य वाजविण्याचा हिंदूंस अधिकार नसावा. कायद्याच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे हा प्रश्न दिवाणी सार्वजनिक हक्काचा आहे. व त्याचा निकालहि मामूलवहिवाटीकडे व्हावा हें न्याय्य आहे. परंतु ही मामूलवहिवाट ठरवावी कोणी व कशी याचा आमच्या मतें पोलीस कायद्यांत नीट खुलासा अगर तजवीज केलेली नाहीं. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं आयत्या वेळेपुरता मामूलवहिवाट म्हणून हवा तो हुकूम द्यावा व ज्यास तो नापसंत त्यानें दिवाणी कोडताची वाट धरावी हा कांहीं न्याय नव्हे. अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं, उदाहरणार्थ ' उद्यां दंगा होण्याचा संभव आहे ' असें आतांच कळल्यास आज अशारीतीचे लष्करी हुकूम करण्याचा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस हुकूम असावा हें इष्ट आहे;पण सामान्यतः जेथें दहा पंधरा दिवसांचा अवकाश आहे तेथें मामूल वहिवाट कशी आहे याची योग्य चौकशी करून मगच डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं या बाबतींत हुकूम द्यावे हें अधिक सोईचें व कायदेशीर आहे. अशा तऱ्हेचे हुकूम झाल्यावरहि जर हिंदु किंवा मुसलमान यांपैकीं कोणी दंगा करील तर दंग्यास प्रथमतः जे प्रवृत्त होतील त्यांस कडक शिक्षा झाली पाहिजे. हिंदुमुसलमानांमधील दंगे होण्यास सार्वजनिक हक्कांसंबंधीं वाद व दांडगाई केली असतां आपणांस हक्क मिळतील अशी अडाणी मुसलमानांची समजूत हींच मूळ कारणें आहेत, व

दंगे मोडण्यास योग्य उपाय म्हटले म्हणजे मामूलवहिवाटीप्रमाणें हक्काचा निःपक्षपातीपणानें न्याय करणें आणि केलेला न्याय कोणाचीहि भीडमुरवत न धरतां जरूर पडल्यास कडक रीतीनें अमलांत आणणें हेच होत. न्याय देण्याच्या कामीं समता व निःपक्षपातीपणा व अंमलबजवणीच्या कामीं निग्रह व कडकपणा हीं सरकारच्या अंगीं नाहींत असें नाहीं. हिंदुस्थानचें एवढें मोठें राज्य जें सुरळीत चाललें आहे तें राज्यकर्त्यांच्या अंगीं वरील गुण आहेत म्हणूनच चाललें आहे, हें सर्वत्रांस माहित आहे. कित्येक प्रसंगीं कित्येक अधिकाऱ्यांकडून एखाद्या विशिष्ट जातीस जी फूस मिळते ती जर बंद झाली व सारखा न्याय व कडक अंमल करण्यास सरकार समर्थ आहे इतकेंच नव्हे, तर तसें करण्यास सरकार कधींहि मागें घ्याययाचें नाहीं, अशी जर सर्वत्रांची खात्री होईल तर हिंदु-मुससमानांतील दंगे लवकरच नामशेष होतील अशी आमची खात्री आहे.

डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं मामुल वहिवाट पाहून हुकूम द्यावा असें जें पोलिस ॲक्टांत कलम आहे हें गैरवाजवी नाहीं; तथापि वर सांगितल्याप्रमाणें सदर ॲक्टांत मामूल वहिवाट ठरविण्याची कांहीं तरी व्यवस्था असणें जरूर आहे, असें आम्हांस वाटतें. उदाहरणार्थ आपण येवल्याचा दंगाच घेऊं. येवल्यास वहिवाट कशी आहे याचा पांच पंचवीस संभावित हिंदु व पांच पंचवीस संभावित मुसलमान जमवून जर आधीं निकाल केला असता तर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या ठरावावर तक्रार करण्यास कोणासहि सवड मिळाली नसती. इतकेंच नव्हे तर ह्या संभावित हिंदु व मुसलमान गृहस्थांनीं इतर लोकांची समजूत पाडून त्यांस मॅजिस्ट्रेच्या हुकुमाप्रमाणें वर्तन करण्यास प्रवृत्त केलें असतें. आजचा काल स्थानिक स्वराज्याचा आहे, हें सरकारनें लक्षांत ठेवलें पाहिजे. खुनासारख्या खटल्यांचीहि ज्यूरीच्या मार्फत चौकशी होते व स्थानिक कामें बहुतेक लोकल बोर्डें व कमिट्यांकडे दिलीं आहेत. हीं कामें व हे खटले जर पंचांमार्फत तोडणें इष्ट आहे तर जातीजातींतील सार्वजनिक हक्काबद्दलचे तंटे पंचाकडे जावे हेंच अधिक सोईचें व न्याय्य आहे. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं जो हुकूम करावयाचा तो गांवांतील शिष्ट हिंदु-मुसलमानांस बोलावून त्यांचें मत घेऊन करावा. एवढी जर पोलिस ॲक्टांत सुधारणा झाली तर या ॲक्टांतील कलमें दंग्याचा बीमोड करण्यास बरींच उपयोगीं पडतील असें आम्हांस वाटतें. मात्र डॉ. लेटनर यांनीं म्हटल्याप्रमाणें शिष्ट लोकांत केवळ इंग्रजी शिकलेल्या लोकांचाच समावेशकरून उपयोग नाहीं. वायव्य प्रांतांत सर चार्लस ॲस्थवेट यांनीं अशा तऱ्हेच्या हिंदू मुसलमानांच्या मिश्र कमिट्या ठिकठिकाणीं नेमाव्या असा नुक्ताच एक ठराव प्रसिद्ध केला आहे व त्याचेंच इकडे अनुकरण झालें असतां या कमिट्या व पोलिस ॲक्टाप्रमाणें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस दिलेला अधिकार या दोहोंच्या मदतीनें बराच कार्यभाग उरकेल अशी आमची समजूत आहे. शनवारवाड्यापुढील सभेंत जो ठराव झाला होता

तोहि अशाच अर्थाचा होता. हिंदु-मुसलमानांतील दंग्याचें मूळ कारण गोरक्षण नाहीं व हे दंगे मोडण्यास दोन्ही जातींतील लोकांच्या हक्काची व रीतिरिवाजाची निःपक्षपणानें चौकशी होऊन जे रीतरिवाज अगर हक्क शास्त्रीत ठरतील त्यांचा कोणाचीहि भीडमुरवत न धरतां सरकारनें अंमल करावा, अशाच अर्थाचा तो ठराव होता; व उत्तरोत्तर तशाच प्रकारची व्यवस्था करण्याकडे सरकारची प्रवृत्ति होत आहे, हें पाहून आम्हांस आनंद होतो.

❁ ❁ ❁

* मुंबईइलाख्याच्या जमाखर्चाचा मक्ता

यंदाच्या सालच्या मुंबईइलाख्याच्या बजेटाची हकीकत देतांना प्रांतिक व हिंदुस्थानसरकार यांच्या दरम्यान इलाख्याच्या उत्पन्नाची कशी वांटणी होते याची थोडीशी माहिती आम्हीं दिली होती व पंचवार्षिक कराराचाहि त्यावेळीं उल्लेख करण्यांत आला होता. हा पंचवार्षिक करार म्हणजे काय व तो कसा उत्पन्न झाला याची सविस्तर हकीकत सार्वजनिक सभेच्या त्रैमासिक पुस्तकाच्या गेल्या दोन अंकांत प्रसिद्ध झाली आहे. तिचा थोडासा गोषवारा मराठी वाचकांच्या माहितीकरतां आज येथें देण्याचा आमचा विचार आहे. त्यावरून मुंबईइलाख्याचें बजेट म्हणजे काय, मुंबईसरकारास खर्चाचा कोठपर्यंत अधिकार असतो वगैरे कांहीं गोष्टींचा नीट खुलासा होईल. बजेटावर वादविवाद करण्याचा जो आम्हांस नवा हक्क मिळाला आहे त्या हक्काच्या संबंधानें ही माहिती फारच महत्त्वाची आहे.

सन १८७० च्या म्हणजे सुमारें २३ वर्षांपूर्वी एकंदर हिंदुस्थानचा जमाखर्च व बजेट एकाच ठिकाणीं वहींत होत असे. मुंबईसरकारास जमेची अगर खर्चाची कोणचीहि बाब कमी अगर जास्त करण्याचा अधिकार नव्हता. सर्व देशाचें बजेट हिंदुस्थानसरकाराकडून होई; त्यांत मुंबईइलाख्यांत खर्च करण्यासाठीं जेवढ्या रकमा मंजूर पडत तेवढ्याच खर्च करण्याचा मुंबईसरकारास अधिकार होता. या व्यवस्थेचा परिणाम असा होत गेला कीं, स्थानिक सरकार अगदीं भाडोत्री बनत चाललें. जमा वाढविण्याकडे अगर खर्च कमी करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होण्यास कांहींच कारण राहिलें नव्हतें. होईल तेवढी जमा हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत भरावी आणि हिंदुस्थानसरकार मंजूर करील तेवढा खर्च करावा, यापलीकडे स्थानिक सरकारास कोणतीहि गोष्ट पहाण्याची जरूर नव्हती. इकडे राज्याचा खर्च तर उत्तरोत्तर वाढत चालला तेव्हां उत्पन्नाची आणि खर्चाची तोंडमिळवणी व्हावी, उत्पन्न वाढावें व खर्च

* [केसरी–ता. ३१ माहे अक्टोबर १८९३]

कमी व्हावा अशी कांहीं तरी व्यवस्था हिंदुस्थानसरकारास करणें भाग पडलें. ही व्यवस्था त्यांनीं प्रथमतः सन १८७० सालीं केली व तीसच पंचवार्षिक करार असें नांव आहे. पहिल्या पंचवार्षिक कराराची मुदत सन १८७१ पासून १८७६ पर्यंत होती. व हा करार लॉर्ड मेयो यांच्या कारकीर्दींत झाला. असा करार करण्यांत केवळ खर्चाची काटकसर व्हावी एवढाच लॉर्ड मेयो यांचा उद्देश नव्हता. जमेच्या व खर्चाच्या कांहीं बाबी स्थानिकसरकारच्या ताब्यांत दिल्यानें स्थानिक-स्वराज्याचा एका रीतीनें पाया पडेल व जमाखर्चाचें दरएक इलाख्यांतील लोकांस शिक्षण मिळेल असें लॉर्ड मेयो यांस ही व्यवस्था करतांना वाटलें होतें; व हे त्यांचे विचार त्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या ठरावांतहि प्रसिद्ध झाले होते. मुंबई-इलाख्याची सर्व जमा हिंदुस्थान सरकार आपल्याकडे घेते व सर्व खर्चास सिमल्याहून, अगर कलकत्त्याहून मंजुरी देतें, हा प्रकार मोडून टाकून कांहीं जमेच्या व खर्चाच्या बाबी स्थानिकसरकाराकडे दिल्यानें व खर्च कमी करून व जमा वाढवून शिल्लक राहिल्यास ती स्थानिकसरकारानें स्थानिकखर्चाकडे लावावी असा ठराव केल्यानें खर्चाचें मान नेहमीं बेताबाताचें राहून प्रत्येक इलाख्यांतील लोकांस एका प्रकारें स्थानिक स्वराज्याचे हक्क दिल्यासारखें होतील. या दुहेरी हेतूनें ही व्यवस्था अमलांत आणली होती.

पहिल्या वर्षीं म्हणजे सन १८७०–७१ सालीं पहिला पंचवार्षिक करार करण्यांत आला. या सालीं जमेच्या म्हणण्यासारख्या बाबी स्थानिकसरकाराकडे देण्यांत आल्या नाहींत; परंतु खर्चाच्या संबंधानें मात्र (१) तुरुंग, (२) रजिस्ट्रेशन, (३) पोलिस, (४) शाळाखातें, (५) वैद्यकीखातें (नोकर लोक सोडून बाकी खर्चासंबंधानें) (६) छपाई, (७) रस्ते, (८) किरकोळ व (९) इमारत. येणेंप्रमाणें खातीं स्थानिक सरकाराकडे देण्यांत आलीं. या खात्यांत एकंदर खर्च सुमारें १ कोट १ हजार रुपये होईल असा अदमास केला होता. पैकीं त्याच खात्यांचें उत्पन्न ५ लक्ष ५२ हजार धरून बाकी ९४ लक्ष ६१ हजार राहिली. पैकीं सुमारें ८८ लक्ष रुपये हिंदुस्थानसरकारानें रोख देण्याचें ठरविलें व बाकी सुमारें ६॥ लाखांची रक्कम खर्चांत काटकसर करून मुंबईसरकारानें भागवावी म्हणून ठरविलें. सारांश ९ खात्यांचें उत्पन्न मुंबईसरकारानें घ्यावें आणि त्यांचा खर्चहि मुंबईसरकारानें करावा. या कामीं खर्चाची बाब जास्त आहे म्हणून सुमारें ८८ लाख रुपये हिंदुस्थानसरकारानें मुंबई सरकारास ग्रांट द्यावी. म्हणजे लक्ष ८८ आणि या खात्याचें उत्पन्न एवढ्यांत या नऊ खात्यांचा खर्च मुंबईसरकारानें भागविला पाहिजे असा या कराराचा अर्थ होता. इतकेंहि करून शिल्लक राहिलायस ती मुंबईसरकारची व तिचा मुंबईसरकारास घुढें उपयोग करितां येईल असेंहि ठरलें होतें. सन १८७६ अखेर हिशेब करतां असें दिसून आलें कीं, या मक्त्यांत मुंबईसरकारास एकंदर

७ लाख रुपये नफा झाला व ही रक्कम मुंबईसरकारची पुढच्या कराराच्या वेळीं जमा धरण्यांत आली. जीं नऊ खातीं वर सांगितलीं आहेत त्यांपैकीं तुरुंग, विद्या खातें, छपाई व लोकलफंड वगैरे खात्यांत ३३॥। लक्ष नफा झाला आणि राजि-स्ट्रेशन, पोलीस वगैरे खात्यांत २६॥ लक्ष तोटा आला, व एकंदर पांच वर्षांत ७ लाख रुपये शिल्लक राहिले. वर जीं नवीं नऊ खातीं दिलीं आहेत, त्यांखेरीज लोकलफंड वगैरे स्थानिक जमेच्या बाबी स्थानिक सरकाराकडे ठेविल्या होत्या.

ही पहिल्या पंचवार्षिक कराराची हकीकत आहे. यावरून मुंबईसरकारचा खर्च करण्याचा अधिकार किती मर्यादित आहे हें दिसून येईल. हिंदुस्थानसरकार जेवढी भाकरी देईल तेवढी खाऊन रहावें व सवड सांपडल्यास त्यांतील शिल्लक टाकावी अशी मुंबईसरकारची स्थिति आहे. मुंबईइलाख्याचें सर्व उत्पन्न त्यांच्या ताब्यांत नाहीं इतकेंच नव्हे तर जीं नऊ खातीं त्यांच्या ताब्यांत दिलीं होतीं त्यांतहि हवा तसा खर्च कमी करण्याचा त्यास अधिकार नव्हता. २५० रुपयां-च्यावरील पगाराचा नवा कामगार मुंबईसरकारानें नेमूं नये व मोठ्या अधिका-ऱ्यांच्या जागा अगर ग्रेड हिंदुस्थानसरकारास विचारल्याखेरीज कमी करूं नयेत, आणि जीं खातीं त्यांच्याकडे दिलीं नाहींत त्यांतील अधिकाऱ्यांचा पगार अगर भत्ता वाढवूं नये, इत्यादि कडक अटी पहिल्यापासूनच घालून देण्यांत आल्या होत्या. या सर्व अटी संभाळून दिलेल्या नऊ खात्यांत ५ वर्षांत ७ लाखांची शिल्लक मुंबई सरकारनें पाडली. यावरून पंचवार्षिक मक्त्यानें जमाखर्चाच्या बाबी स्थानिक सरकारकडे दिल्यापासून हिंदुस्थान सरकारास एकंदर किती फायदा आहे हें सहज लक्षांत येईल. या नऊ खात्यांवर १८७० सालापूर्वी जेवढी रक्कम हिंदुस्थान सरकारास खर्च करावी लागत होती त्यांत ६॥ लाख पहिल्यानेंच कमी केले. व इतकें करूनहि पुनः पांच वर्षांत सात लाख उत्पन्न वाढलें तें वाढलेंच. इकडे मुंबई सरकारच्या हातांत खर्च करण्याचा अधिकार मिळाल्यामुळें त्यांसहि बरें वाटलें. मुंबई सरकार प्रतिवर्षीं जें बजेट करतें तें त्यांना तोडून दिलेल्या जमाखर्चाच्या बाबीविषयींचेंच असतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

आतां दुसऱ्या पंचवार्षिक कराराचा विचार करूं. हा करार १८७७ सालीं झाला. परंतु तेव्हां लिटनशाही असल्यामुळें लॉर्ड मेयोच्या कारकीर्दींत निघालेल्या ठरावांत जे हेतू व उद्देश दाखविले होते ते या वेळच्या सरकारास पसंत नव्हते. तथापि एकंदरींत कराराची पद्धत हितावह वाटल्यामुळें तीच पुढें चालू ठेविली. फक्त पूर्वी ज्या शर्ती होत्या त्या वाढवून जरा अधिक कडक केल्या, व हिंदुस्थानसरका-रच्या परवानगीखेरीज कोणताहि कर बसवूं नये, खातें काढूं नये, अगर २५० रुप-यांचा पूर्वीचा अधिकारी कामावरून दूर करूं नये अशा नव्या अटी घातल्या. पहिल्या करारांत जीं नऊ खातीं स्थानिक सरकाराकडे दिली होतीं. तीं सर्व खर्चाचीं होतीं.

या खेपेस तीं सर्व कायम ठेऊन आणखीं जास्ती जमेचीं आणि खर्चाचीं खातीं मुंबईसरकाराकडे देण्यांत आलीं. इनामदारांकडून वगैरे जो वसूल येतो तो काळीपैकीं वसूल, अबकारी, स्टांप, कस्टम, मरीन व किरकोळ हीं जमेचीं खातीं आणि पूर्वी सांगितलेल्या नऊ खात्यांखेरीज मुलकी; अबकारी, कस्टम. मीठ, स्टांप, दिवाणी किरकोळ खातीं, न्याय, मरीन, धर्मखातें, वैद्यकखातें, स्टेशनरी, पेन्शन आणि किरकोळ या सर्व खर्चाच्या बाबी स्थानिकसरकारच्या ताब्यांत देण्यांत आल्या. एकंदर उत्पन्न १ कोट ६५ लक्ष ३० हजार रुपये होईल असा अदमास केला होता व खर्च ३ कोट २४ लक्ष १७ हजारांचा धरला होता. म्हणजे खर्चाची व जमेची तोंडमिळवणी करण्याकरतां हिंदुस्थानसरकारनें मुंबईसरकारास १ कोट ५८ लक्ष ८७ हजार रुपये द्यावयास पाहिजे होते; परंतु तोडून दिलेल्या खर्च खात्यांत शेंकडा ५ टक्केप्रमाणें खर्च कमी करण्याची सवड आहे, म्हणून ५ लक्ष ६७ हजार रुपये वजा करून पहिल्या सालीं हिंदुस्थानसरकारानें मुंबईसरकारास १ कोट ५३ लक्ष २० हजार रुपये द्यावे असें ठरविलें. याखेरीज दरवर्षीं अबकारी व स्टांप यांचें उत्पन्न १॥ लाख रुपये वाढेल असा अदमास धरला होता, त्याप्रमाणें दरवर्षीं हिंदुस्थानसरकारकडून मुंबईसरकारास मिळणाऱ्या रकमत ही रक्कम मजुरा द्यावी व ५ वर्षांच्या अखेर दर वर्षास कमी करीत करीत हिंदुस्थानसरकारानें १८८१–८२खालीं फक्त १कोट ४६ लक्ष २० हजार मुंबईसरकारास द्यावे असा करार झाला. यावरून या मक्त्याच्या व्यवस्थेनें बिनतक्रार उत्पन्न कसें वाढत गेलें व हिंदुस्थानसरकारावरील खर्चाचें ओझें कसें कमी होत गेलें हें लक्षांत येईल. मक्ता घेतल्यामुळें तोडून दिलेल्या खात्यांचें उत्पन्न वाढविणें व खर्च कमी करणें हें मुंबईसरकारचें कामच होऊन बसलें. व या दुसऱ्या कराराच्या मुदतींत त्यांनीं २१ लक्ष रुपये मिळाविले म्हणजे ही २१ लक्ष रुपयांची रक्कम मुंबईसरकारच्या नांवें हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत जमा झाली. या कराराच्या मुदतींत लोकलफंडाचें उत्पन्न चांगलें झालें.

तिसऱ्या पंचवार्षिक करारास १८८२ सालीं सुरुवात झाली. या वेळीं लॉर्ड रिपन हे व्हाइसराय असून मे० बेथरिंग हे त्यांचे फडणीस होते, तेव्हां लिटनशाहीपेक्षां हा मक्ता जरा सढळ हातानें ठरविण्यांत आला. या तिसऱ्या मक्त्यांत विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी होती कीं, जमेच्या आणि खर्चाच्या बाबी तोडून देऊन तोंडमिळवणीसाठीं दरवर्षास अमुक कोट किंवा अमुक लक्ष म्हणून जी उक्ती रक्कम हिंदुस्थानसरकार मुंबईसरकारास देई तशी न देतां दुसऱ्या कोणत्या तरी उत्पन्नाच्या बाबींतील उत्पन्नाचा नियमित भाग देण्याचें ठरलें. या व्यवस्थेप्रमाणें जमीन महसुलापैकीं शेंकडा ६० रुपये मुंबईसरकारानें घ्यावे असें ठरलें, व जंगल, अबकारी, इन्कमटॅक्स, स्टांप आणि रजिस्ट्रेशन यांच्या उत्पनापैकीं निम्मे, आणि न्यायखातें, शाळाखातें वगैरे मागें सांगितलेल्या

खात्यांचें सर्व उत्पन्न मुंबईसरकाराकडे तोडून दिलें. खर्चाच्या बाबींतहि अशाच तऱ्हेचा फेरफार करण्यांत आला. जमीनमहसुलाच्या बाबींतील सर्व खर्च मुंबई-सरकारानें करावा असें ठरलें. जंगल, अबकारी, स्टांप, रजिस्ट्रेशन वगैरे ज्या खात्यांचें निम्में उत्पन्न मुंबईसरकारास दिलें त्या त्या खात्यांचा निम्में व बाकीच्या खात्यांचा सर्व खर्च मुंबईसरकारानें सोसावा असा करार झाला. या कराराप्रमाणें एकंदर ३ कोट ४९ लक्ष २ हजारांचें उत्पन्न व ३ कोट ४५ लक्ष १५ हजारांचा खर्च मुंबईसरकारास तोडून दिला. उत्पन्नाची बाब जास्त असल्यामुळें दुष्काळ वगैरे पडला असतां हिंदुस्थानसरकाराकडून मदत मिळणार नाहीं असा ठराव करण्यांत आला. दुसऱ्या कराराप्रमाणें २१ लाख रुपये शिल्लक होते. त्याखेरीज सन १८७९–८० सालीं अफगाणिस्थानच्या लढाईकरितां म्हणून ८ लाख रुपये मुंबईसरकारकडून घेतले होते ते लॉर्ड रिपन यांनीं मुंबईसरकारास परत दिले व जमीनसारासुटीबद्दल म्हणून २५ लाख ५० हजार व मिठागरें वगैरे बांधण्यासाठीं २॥ लाख रुपयांची आणखी रक्कम दिली. यामुळें या तिसऱ्या कराराच्या आरंभीं मुंबईसरकाराजवळ सुमारें ५७ लक्ष रुपये शिल्लक होते.

परंतु या सर्वांपेक्षां यावेळीं विशेष महत्त्वाचा जो ठराव करण्यांत आला तो असा कीं, ज्याप्रमाणें हिंदुस्थानसरकारानें जमेच्या कांहीं बाबी मुंबईसरकारास दिल्या आहेत त्याचप्रमाणें मुंबईसरकारानें लोकलफंड वगैरे उत्पन्नाच्या आणि खर्चाच्या बाबी ठिकठिकाणच्या कमिट्यांकडे सोंपवून द्याव्या. लोकलबोर्डें आणि म्युनिसिपालिट्या यांस १८८४ सालीं जे हक्क देण्यांत आले ते या ठरावावरूनच होत. जमाखर्चाच्या कांहीं बाबी लोकल कमिट्यांस देऊन खर्चाच्या बाबी जमेच्या बाबींपेक्षां जास्त असल्यास तोंडमिळवणी करण्यापुर्तीं रक्कम लोकल कमिट्यांस स्थानिक सरकारानें आपल्या म्हणजे स्थानिक तिजोरींतून द्यावी अशी व्यवस्था करण्यांत आली व तींच व्यवस्था अद्याप चालू आहे. या तिसऱ्या व पंचवार्षिक कराराच्या अखेर मुंबईसरकाराजवळ ५५ लक्ष रुपये शिल्लक रहावयाची; पण १८८६–८७ सालीं मुंबईसरकाराबाहेर हिंदुस्थानसरकारानें २० लक्ष रुपये उचलल्यामुळें करार संपण्याच्या वेळीं पडणाऱ्या शिलकेंतून ती रक्कम कमी झाली.

चवथा पंचवार्षिक करार सन १८८७ सालीं झाला. हा करार बहुतेक मागल्या करारासारखाच होता. परंतु जीं जमेचीं व खर्चाचीं खातीं हिंदुस्थान व स्थानिक सरकारांनीं पूर्वीं वांटून घेतलीं होतीं त्यांच्या वांटणींत थोडासा फरक झाला. जमीनमहसुलापैकीं व अबकारीपैकीं चतुर्थांश, स्टांपापैकीं तीनचतुर्थांश व जंगल, रजिस्ट्रेशन, इन्कमट्याक्स वगैरेपैकीं निम्में उत्पन्न स्थानिकसरकारानें घ्यावें असें यावेळीं ठरलें. जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं मुंबईसरकारास देण्याचा भाग

कमी पडल्यामुळें जमेच्या व खर्चाच्या बाबींची तोंडमिळवणी होईना, तेव्हां ती करण्याकरितां दरसाल ८१ लक्ष ८७ हजार रुपये हिंदुस्थानसरकारानें मुंबई-सरकारास द्यावे असें ठरलें. या कराराच्या आरंभीं पंचावन लक्ष रुपये मुंबई-सरकाराजवळ शिल्लक होती, ती हा करार संपण्याच्या वेळीं २७॥ लक्ष झाली. असें होण्याचें कारण या पांच वर्षांत १७॥ लाख रुपये मुंबईसरकारानें हिंदुस्थान-सरकारास दिले व एकंदर ६० लक्ष रुपये पब्लिकवर्क्स खात्याकडे खर्च-करण्यांत आले.

हल्लीं असलेला पंचवार्षिक पांचवा करार सन १८९१ सालीं झाला. यांत जमेच्या आणि खर्चाच्या बाबी कशा वांटल्या गेल्या आहेत हें बजेटवर लिहि-तांना आम्हीं सांगितलेंच आहे. मुंबईसरकारची शिल्लक निदान २० लाख तरी असलीच पाहिजे असा या वेळीं ठराव करण्यांत आला. या करारान्वयें मुंबईसर-कारास तोडून दिलेलें उत्पन्न ३ कोट १२ लक्ष ३९ हजार आहे व खर्च ३ कोट ८९ लक्ष ५३ हजार होईल; असा अदमास आहे. या दोहोंची तोंड-मिळवणी होण्यासाठीं दरसाल ७७ लक्ष १४ हजार रुपये हिंदुस्थानसरकाराकडून मुंबईसरकारास मिळतात; म्हणजे दरसाल एकंदर सुमारें ३ कोट रुपयांचा बजेट करण्याचा मुंबईसरकारास अधिकार आहे. तथापि कोणत्याहि खात्यांत २५० रुपयांपेक्षां जास्त पगाराचे अधिकारी कमीजास्त करणें, नवीं खातीं काढणें वगैरे सर्व मोठ्या उलाढाली हिंदुस्थानसरकारच्या परवानगीशिवाय मुंबईसरकारास करतां येत नाहींत.

येणेंप्रमाणें आमच्या इलाख्याच्या जमाखर्चाच्या बजेटाची स्थिति आहे. यांत मुंबईसरकारास स्वातंत्र्य किती आहे तें वाचकांच्या सहज लक्षांत येईलच. जमा-खर्चाच्या बाबी मुंबईसरकारास देऊन पुनः आणखी वर दक्षिणा द्यावयाची आणि इकडे त्यांचें स्वातंत्र्य कमी करावयाचें हा सर्व प्रकार पाहून कोणासहि थोडेंसें आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. जमाखर्चाच्या कोणत्याहि पद्धतीनें उत्पन्न वाढतें असें नाहीं. करितां एकदम अमुक रुपये अगर अमुक बाबी अजी-बात मुंबईसरकारास तोडून दिल्यानें आमच्या मतें अधिक सोईचें व हितावह होईल. जमाखर्च ठेवण्याच्या पद्धतींतहि बरीच सुधारणा करण्यासारखी आहे; पण आजचा लेख बराच लांबल्यामुळें त्याचा पुढें एखादे वेळेस विचार करूं.

* लॉर्ड लॅन्सडाऊन यांचे गोरक्षणावर विचार

बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर यांचें गोरक्षणी सभांबद्दल काय म्हणणें आहे व सदर सभांचा सरकारास व लोकांस कोणत्या तऱ्हेनें उपयोग करून घेतां येईल इत्यादि प्रश्नांबद्दल त्यांनीं बंगाल सरकारच्या ठरावांत ज्या सूचना केल्या आहेत त्या गेल्या अंकीं थोडक्यांत आम्हीं कळविल्याच होत्या. या आठवड्यांत हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं या संबंधानें आग्रचास केलेलें भाषण प्रसिद्ध झालें आहे. हें भाषण व त्यांत व्हाइसराय साहेबांनीं सांगितलेलें सामान्य सिद्धांत इतक्या महत्त्वाचे आहेत कीं, लॉर्ड लॅन्सडाऊन यांची व आमची एकवाक्यता किती आहे, व मतभेद कोणच्या बाबतींत आहे याचा थोडा, पण स्पष्ट रीतीनें खुलासा करणें जरूर आहे. गोरक्षणासंबंधी हिंदुस्थान-सरकारचा विलायतसरकारास जो खलिता गेला आहे त्यांत हिंदुमुसलमानांमधील दंग्याची सर्व नाहीं तरी बरीच जबाबदारी गोरक्षणी सभांवर टाकली होती असें कांहीं इंग्रजीपत्रांतून प्रसिद्ध झालें होतें. ही बातमी किती विश्वसनीय होती हें समजण्यास खलिता प्रसिद्ध न झाल्यामुळें आमच्या जवळ कांहीं साधन नव्हतें; परंतु ही बातमी जर खरी असेल तर हल्लीं व्हाइसराय साहेबांनीं आग्रा येथें जें भाषण केलें, त्यांतील कांहीं भागाचा रोंख दिसतो त्याहून कांहीं तरी निराळा असावा असें मानावें लागेल. विलायतसरकाराकडे गुप्त खलिता पाठविणें आणि हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत प्रसिद्धपणें मानपत्रास दिलेल्या उत्तरांत राजनीतीचीं सामान्य तत्त्वें सांगणें, यामध्यें पुष्कळ अंतर आहे हें कोणींहि कबूल करील. तथापि आग्रा येथें व्हाइसरायसाहेबांनीं केलेल्या भाषणांत ज्या दोनचार मुद्याच्या गोष्टी त्यांनीं सांगितल्या आहेत, त्या इतक्या महत्त्वाच्या आहेत कीं, त्या खलित्यांत असोत कीं भाषणांत असोत, कोठेंहि असल्या तरी त्या सर्वत्रांस परिणामीं हितावह असल्यामुळें सर्व जातींच्या लोकांनीं त्या नेहमीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत, व यांच कारणाकरितां गव्हर्नर जनरल यांच्या सदर भाषणाचें आज विवेचन करण्याचें आम्हीं योजिलें आहे. या विषयावर हिंदुस्थानसरकारचे विचार या भाषणांत पहिल्यानेंच बाहेर पडले असल्यामुळें तिकडूनहि सदर भाषणास विशेष महत्त्व आलें आहे, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

आग्रा येथील मानपत्रांत सदर शहरांतील हिंदु व मुसलमानांत कांहीं वैमनस्य नसून दसऱ्याचा सण कांहीं एक गडबड न होता सुखानें पार पडला असें लिहिलें होतें. या वाक्यास उद्देशूनच लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं गोरक्षणी सभा व हिंदु-मुसलमानांमधील दंगे यांसंबंधानें आपलें मत प्रदर्शित केलें. ते म्हणाले कीं, " मी

(केसरी–ता. २१ नोव्हेंबर सन १८९३.)

येथें कोणास नांवें ठेवण्यास आलों नाहीं. एका हातानें कांहीं टाळी वाजत नसते, अशा अर्थाची इंग्रजींत एक म्हण आहे. व त्याप्रमाणें पाहिलें म्हणजे दंग्याचा सर्व दोष नेहमीं सर्वस्वी एका बाजूवर टाकणें मुष्कील आहे; परंतु दोषाची वांटणी कोणच्याहि प्रकारें केली तरी मला आपणांस एवढेंच स्पष्टपणें कळविणें आहे कीं, हे दंगे व ही पुंडाई पुन्हां न होऊं देण्याची सक्त तजवीज करण्यास हिंदुस्थानसरकार मागेंपुढें पाहणार नाहीं. सरकार धर्माच्या बाबतींत उदासीन आहे खरें; पण हें औदासीन्य म्हणजे दंगे करण्यास परवानगी असें जर कोणी समजत असेल तर ही समजूत चुकीची आहे असें मी आपणांस निक्षून सांगतों."

अशा प्रकारचा उपोद्घात झाल्यावर व्हाइसरायसाहेब मुख्य मुद्याकडे वळले. ते म्हणाले कीं, " हिंदुस्थानसरकारची जबाबदारी दोन प्रकारची आहे; एक, देशांत सर्वत्र शांतता राहून राणीसरकारच्या सर्व प्रजेच्या शरीराचें व मालमत्तेचें चांगल्या प्रकारें संरक्षण व्हावें, आणि दुसरी अशी कीं, या देशांत निरनिराळ्या धर्माचे जे लोक आहेत त्यांस आपआपल्या धर्माप्रमाणें वर्तन ठेवण्यास दुसऱ्या कोणाचाहि अडथळा, अगर त्रास असूं नये. मुसलमान लोकांनीं आपल्या पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें आपले सणवार करावे, असा कायद्यानें त्यांस हक्क दिला आहे खरा, परंतु त्याजबरोबर त्यांनीं हिंदुलोकांचीं मनें विनाकारण दुखवूं नयेत असाहि निर्बंध आहे. आणि एवढ्याचकरितां लोकांचीं मनें दुखवलीं जातील अशा प्रकारें उघड रीतीनें गोवध करणें याचा कायद्यानें निषेध केला आहे. हा जो कायद्याचा नियम आहे, तो केवळ दांडगाई केल्यानें आम्ही अमलांत आणण्याचें सोडून देऊं असें कोणींहि समजूं नये. बळी देण्याकरितां अगर मांसाकरितां इतउत्तर सरकार गोवध कधींहि करूं देणार नाहीं असेंहि तुम्हीं समजूं नका. हिंदु आणि मुसलमान या दोघांच्याहि धर्मसमजुती आम्हांस सारख्याच रीतीनें राखल्या पाहिजेत; व कोणी कोणाचीं मनें अकारण दुखवूं नये, एवढा आम्ही सक्त बंदोबस्त ठेवूं. मीं जो आतां आपणांस सिद्धांत सांगितला हा कांहीं नवा नाहीं. राणीसरकारचा सन १८५८ सालीं जो जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे व जो आपल्या हक्काची मूळ सनद असें येथील सर्व लोक वास्तविक समजतात, त्यांतहि राणीसरकारच्या प्रजेस आपआपल्या धर्माप्रमाणें चालण्याची मोकळीक असावी व कोणीं कोणास यासंबंधानें त्रास दिल्यास त्याचा निःपक्षपातानें कायद्यानें न्याय व्हावा असें स्पष्ट जाहिर केलें आहे. आमचे कायदेहि याच तत्त्वास अनुसरून केले आहेत व हीं तत्त्वें व हे कायदे नुकत्याच घडून आलेल्या चळवळीमुळें अमलांत आणण्याचें सोडून देऊन कोणत्याहि पक्षास फाजील हक्क देण्यास अगर त्यांचे योग्य हक्क काढून घेण्यास आम्ही प्रवृत्त होणार नाहीं, अगर एखाद्या ठिकाणीं एखाद्या धर्मांतील लोकांची संख्या कमी असल्यास त्यांस इतर धर्मांच्या लोकांकडून त्रास होऊं लागल्यास तो बंद करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं.

येथें हिंदु पुष्कळ असले तर दुसऱ्या ठिकाणीं मुसलमान पुष्कळ आहेत; करितां सर्व ठिकाणीं दोघांनींहि समतेनें वागणें यांतच दोघांचें हित आहे. हिंदुस्थान-सरकार धर्माच्या बाबतींत उदासीन आहे खरें; पण उदासीन म्हणजे हिंदु-मुसलमानांमधील दंगे मुकाट्यानें पाहणारें नव्हे. या देशांतील लोकांच्या धर्मसमजुती किती दृढ असतात हें आम्हांस माहीत आहे. देशांतील लोकांपैकीं बराच मोठा समुदाय गाईस पवित्र मानतो व त्याची गाईबद्दल जी पूज्यबुद्धि आहे ती इतकी विलक्षण आहे कीं, त्याची आम्हांस कल्पनाहि करितां येत नाहीं. गाईबद्दलची अशी पूज्यबुद्धि होण्यास धर्मांखेरीज दुसरींहि कारणें आहेत, हेंहि आम्ही जाणतों. ह्या समजुती बऱ्या किंवा वाईट हें आम्हांस पहावयाचें नाहीं. वीस कोट प्रजेची अशा प्रकारची समजूत आहे, व या बाबतींत त्यांचीं मनें दुखवून त्यांचा निष्कारण छल होऊं नये अशी तजवीज करणें अवश्य आहे. मुसलमानलोकहि ज्या समजुतीनें हजारों अडचणी सोसून शरीराची व जिवाची पर्वा न धरतां येथून मक्केस जातात, त्या समजुतीहि किती बळकट आहेत हें आम्हांस माहीत आहे. अशा प्रकारच्या धर्मसमजुती असल्या म्हणजे त्यामुळें कधीं कधीं मनुष्यें फाजील जातात हें खरें; परंतु ज्यांच्या अशा समजुती आहेत त्यांचीं मनें निष्कारण दुखवूं न देणें हें सरकारचें कर्तव्य आहे व तें बजावण्यांत सरकार कधींहि कसूर करणार नाहीं हें तुम्हीं लक्षांत ठेवलें पाहिजे. कायदा स्पष्ट आहे. तो अमलांत आणणें हें आमचें व तो पाळणें हें तुमचें कर्तव्य आहे. ”

येणेंप्रमाणें कायद्याच्या तत्त्वाचें उद्‌घाटन झाल्यावर व्हाइसरायसाहेबांनीं हिंदु-मुसलमान लोकांच्या पुढाऱ्यांस व विशेषतः वर्तमानपत्रकर्त्यांस थोडासा उपदेश केला; “ व यासंबंधाची हकीकत प्रसिद्ध करतांना सर्वांनीं आपल्या मनाची समता कायम ठेवावी व खोट्यानाट्या गोष्टी लिहून लोकांचीं मनें क्षुब्ध करण्यापेक्षां शांतता राखण्याकडे त्यांच्या मनाची जेणेंकरून प्रवृत्ति होईल अशा रीतीनें राणीसरकारांनीं त्यांस मुद्रणस्वातंत्र्याचा जो अधिकार दिला आहे त्याचा व त्यांच्या हातांत असलेल्या शक्तीचा सदुपयोग करावा असें सांगितलें. जे आपल्या अधिकाराचा ह्याप्रमाणें सदुपयोग करतील त्यांचीच वर्तणूक सरकारास पसंत होईल! जातीजातींतिल वैमनस्यें वाढविण्याचा सरकारचा इरादा आहे व अशा रीतीनें दुही माजवण्यास सरकार उत्तेजन देतें असा जो सरकारावर आरोप आहे तो किती नीचपणाचा आहे हें शब्दांनीं व्यक्त करून दाखविणें अशक्य आहे. ज्यांनीं हा आरोप आणला आहे ते देखील हा खरा मानीत नसतील व माझी अशी खात्री आहे कीं, हा घाणेरडा खोटा आरोप ह्या देशांत कोणासहि संभवनीय वाटत नाहीं. करितां सरतेशेवटीं मुसलमानलोकांस माझें असें सांगणें आहे कीं, ‘ तुमच्या धर्माप्रमाणें तुम्ही वर्तन करा; परंतु त्यामुळें तुमच्या हिंदु शेजाऱ्यांचीं मनें न दुखतील अशी खबरदारी राखा.’ त्याचप्रमाणें हिंदूंसहि

मी असें सांगतों कीं, 'तुमच्या गोरक्षणी सभांचे उद्योग अव्याहत चालूं द्या. जनावरांची जितकी काळजी घेणें शक्य आहे तितकी घेत जा. त्यांना निर्दय रीतीनें वागवूं नका व तीं म्हातारीं व निरुपयोगीं झालीं असतां त्यांस यमयातनेंत जें कुचंबत पडावें लागतें तशी स्थिति येऊं देऊं नका. परंतु तुमच्या सभांमुळें तुमच्या शेजाऱ्यांस त्रास होऊं नये आणि धर्मद्वेष व जातिद्वेष वाढूं नये अशी खबरदारी द्या,' हिंदु व मुसलमान या दोघांसहि माझें असें सांगणें आहे कीं, 'या बाबतींत सरकारी अधिकाऱ्यांकडून पक्षपात झाल्याचें अगर कायदेकानू मोडल्याचें उदाहरण जर तुम्ही आमच्या नजरेस आणाल तर अदालतींतून अथवा सरकारांतून त्याचा योग्य बंदोबस्त करण्यांत येईल."

व्हाइसरायसाहेबांनीं वरील भाषणांत जीं तत्त्वें व जे सिद्धांत सांगितले आहेत ते बहुतेक आमच्या म्हणण्याप्रमाणेंच असून ते आम्हांस पूर्णपणें मान्य आहेत. या बाबतींत हिंदु-मुसलमान आणि सरकारी कामगार असे तीन पक्ष आहेत हें आम्हीं मागेंच लिहिलें होतें व व्हाइसरायसाहेबांनीं शेवटीं केलेल्या उपदेशावरून हेंच मत त्यांस ग्राह्य आहे असें उघड होतें. दोन्ही धर्मांतील लोकांचे हक्क सारखेच आहेत व एकमेकांनीं एकमेकांच्या सलोख्यानें वागलें पाहिजे हें कायद्याचें मूलतत्त्वहि आम्हांस व व्हाइसरायसाहेबांस सारखेंच मान्य आहे. गोरक्षणी सभांचे कांहीं सभासद उच्छृंखल असतील, पण असा उच्छृंखलपणा मुसलमानलोकांत व सरकारी कामगारांत विशेष आढळतो ही गोष्ट मात्र लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं जितकी स्पष्ट करावयास पाहिजे होती तितकी स्पष्ट केली नाहीं. जातीजातींतील वैमनस्यें वाढावीं असा राणीसरकारचा इरादा नाहीं हें लॉर्ड लॅन्सडाऊन ह्यांच्याप्रमाणें आम्हांसहि करतलामलकवत् दिसत आहे. त्यांच्यांत व आमच्यांत भेद एवढाच आहे कीं, सन १८५८ सालच्या जाहीरनाम्यांतील दुसऱ्या कित्येक अभिवचनांस ज्याप्रमाणें इंग्रजी बढे अम्मंलदार हरताळ लावतात, तसाच प्रकृत विषयासंबंधानेंहि प्रकार घडून येतो असें आमचें म्हणणें आहे व तें त्यांस पसंत नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व जागा जातिभेद व वर्णभेद मनांत न आणतां योग्यतेनुरूप सर्वत्रांस सारख्या दिल्या जातील असें राणीसरकारचें वचन आहे; परंतु इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत सिव्हिलसार्विसची परीक्षा घ्यावी अशी शिफारस करण्याचें ज्याप्रमाणें हिंदुस्थानसरकारचें अद्यापहि धैर्य होत नाहीं, तसेंच या बाबतींतहि पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांचें वर्तन आहे. हिंदु-मुसलमानांस सारख्या रीतीनें वागवावें, परस्परांचा परस्परांस त्रास होऊं देऊं नये, हीं सामान्य तत्त्वें बोलण्यास व लिहिण्यास जितकीं सुकर आहेत तितक्या सुलभ रीतीनें तीं अमलांत येत नाहींत हें लॉर्ड लॅन्सडाऊन विसरले असावे ? मुंबईस ज्या लोकांनीं प्रथमतः मुसलमानांस चिथाविलें, त्यांचा अद्याप पत्ता नाहीं व येवल्यास मुसलमानलोकांनीं कलेक्टरचा हुकूम तोडून दंगा केला तरी अखेरीस कांहीं हिंदूस

कमजास्त शिक्षा करण्यांत आल्या त्या अल्याच ! हीं उदाहरणें डोळ्यापुढें असतां 'कोणीं सरकारी अधिकाऱ्यांनीं पक्षपात केल्याचें अगर कायदेकानू मोडल्याचें उदाहरण असल्यास आम्हांस कळवा म्हणजे त्याची योग्य दाद लागेल' अथवा 'कोणी दंगा करील या भीतीनें कायद्याचा अंमल करण्यास आम्हीं मागें घेणार नाहीं' असें जें व्हाइसराय साहेबांनीं अखेरीस सांगितलें व वर्तमानपत्रकारांवर ताशेरा झाडला त्याचा अर्थ काय ? राणीसरकारच्या जाहिरनाम्यांत नमूद केलेलीं राज्यनीतीचीं तत्त्वें दूरदर्शीपणाचीं व न्यायाचीं आहेत हें प्रतिपादन करण्यास लॉर्ड लॅन्सडाऊन यांच्या भाषणाची कांहीं जरूर होती असें आम्हांस वाटत नाहीं. त्या तत्त्वांचा अम्मल नीट होत नाहीं अशी लोकांची तक्रार आहे. व ही तक्रार खरी कीं खोटी, व खरी असल्यास ती कशी काढून टाकावी हेंच मुख्यतः गव्हर्नर जनरलसाहेबांचें काम आहे. येवल्याच्या उदाहरणावरून आपण स्वतः दिलेला हुकूमहि अमलांत आणण्यास कलेक्टर व असिस्टंट कलेक्टर कसे भितात व त्यामुळें सरकारची कशी नापत होते हें चांगलें व्यक्त झालें आहे. ही स्थिति जर कांहीं सुधारेल तरच हीं वैमनस्यें व दंगे मोडण्याचा संभव आहे. राणीसाहेबांच्या जाहिरनाम्याचा विस्तारेंकरून व्हाइसराय साहेबांनीं अर्थ सांगितल्यानेंच केवळ समाधान होईल असें नाहीं. वायव्य प्रांतांत मुसलमानलोकांस फाजील हक्क दिल्यामुळें हिंदुलोक बिथरले असें पंडित बिसन नारायण धार यांनीं सिद्ध केलें आहे; पण व्हाइसरायांच्या भाषणांत कायद्याचीं सामान्य तत्त्वें, सरकारचें धर्मौदासीन्य आणि त्याचा खरा अर्थ, हिंदुमुसलमानांचा सारखा न्याय करण्याची सरकारची इच्छा या दोन चार ठरीव गोष्टींखेरीज वर्तमानपत्रकारांस दिलेल्या पुष्पांजलीखेरीज दुसरें कांहींएक सांगितलें नाहीं. मुंबईच्या दंग्याचे प्रवर्तक जोंपर्यंत मुंबई पोलिसास सांपडले नाहींत, जोंपर्यंत कलेक्टरसाहेबांनीं एकदां दिलेला हुकूम मुसलमानलोकांनीं हातीं काठ्या घेतल्यामुळें बजावण्याची साहेब बहादुरांस हिम्मत होत नाहीं तोंपर्यंत कायद्याच्या तत्त्वांचा काथ्याकूट करण्यांत आम्हांस कांहीं हंशील दिसत नाहीं. व्हाइसरायसाहेबांस हीं तत्त्वें मान्य आहेत हें पाहून एक प्रकारें आम्हांस आनंद होतो खरा; पण हीं तत्त्वें मान्य नसतीं तर त्याचें याहून जास्त आश्चर्य वाटलें असतें. मुख्य प्रश्न या तत्त्वांचीं अम्मलबजावणी सरकारी अम्मलदार कशी करतात हा होय. व याबद्दल सरकारांतून कांहीं स्पष्ट नियम व्हावयास पाहिजे आहेत असें आमचें मागणें आहे; परंतु लॉर्ड लॅन्सडाऊन यांच्या भाषणांत त्याचा कांहीं उल्लेख आलेला नाहीं हें पाहून मनांत निराशा व थोडीशी शंकाहि उत्पन्न होते. आमच्या मतें प्रेसिडेन्सी असोसिएशन, सार्वजनिकसभा वगैरे संस्थांनीं हा विषय हातीं घेऊन राणीसरकारच्या जाहिरनाम्यांतील उद्देश ज्या रीतीनें पार पडतील ते उपाय सरकारास सुचविण्याचा आतां समय आला आहे.

* मे. ह्यूमसाहेब यांची शेवटची भेट

ह्यूमसाहेब ह्या वर्षी हिंदुस्थानांत जे आले आहेत ते प्रायःसर्व ठिकाणच्या लोकांच्या शेवटच्या भेटी घ्याव्या ह्या हेतूनें आले आहेत. अशा वेळीं ठिकठिकाणीं त्यांचा जो आदरसत्कार होत आहे तो त्यांनीं आम्हांवर व आमच्या देशावर जे आजपर्यंत उपकार केले आहेत त्यांच्या मानानें अगदीं योग्य किंबहुना कमीच म्हटला तरी चालेल. ह्यूमसाहेबांनीं आमच्याकरितां काय केलें आहे याचा आम्हीं वेळोंवेळीं उल्लेख केलाच आहे; तथापि प्रसंगानुसार आज थोडक्यांत एवढें सागणें जरूर आहे कीं, इंग्रजी राज्याखालीं हिंदुस्थानांतील भिन्नाभिन्न जाती एकवट करून त्यांस एकराष्ट्राचें स्वरूप आणण्यास ज्या कल्पनांची आणि साधनांची आवश्यकता आहे तीं सर्व ह्यूमसाहेबांच्या डोक्यांत जरी प्रथमतः आलीं नसलीं तरी ती अमलांत आणण्याचें श्रेय सर्वस्वी या उदार व परोपकारी पुरुषासच दिलें पाहिजे. इंग्रजी राज्य होण्यापूर्वी हिंदुस्थानची स्थिति काय होती व इंग्रज येथें आले नसते तर काय झालें असतें या गोष्टीचा सध्यां विचार करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. इंग्रज येण्यापूर्वी कित्येक शतकें आम्ही परकीयांच्या अमलाखालीं गेलों होतों. दक्षिणेंत मराठेलोक आणि सरहद्दीवर शीखलोक यांनीं हें परकीय लोकांचें राज्य बरेंच निर्मूल करीत आणलें होतें; परंतु पूर्वापार इतिहासावरून पाहिलें असतां या सर्व लढाऊ लोकांस ऐक्य होऊन त्यांच्या अमलाखालीं आज जी आम्ही शांतता भोगीत आहों ती आम्हांस मिळाली असती कीं नाहीं याचा कांहीं अंशीं वानवाच दिसतो. मराठे, शीख आणि रजपूत यांस एकत्र होण्याची संधि आली नव्हती असें नाहीं व तिचा जर कोणीं त्या वेळीं उपयोग करून घेतला नाहीं तर पुढें तरी तसा योग आला असता असें खात्रीनें म्हणणें अशक्य आहे. कसेंहि असो. या जुन्या गोष्टी सांगत बसण्यापेक्षां इतिहासाचा ओघ पुढें कसा गेला आहे तो पाहूं. हिंदुस्थानांत ज्या कांहीं लढाऊ जाती होत्या त्यांच्यामध्यें ऐक्य नसल्यामुळें अथवा दुसऱ्या कांहीं कांहीं कारणांनीं आज हिंदुस्थानांत एका मोठ्या शहाण्या व प्रबल राष्ट्राची सत्ता स्थापन झाली आहे. हें राज्य स्थापण्यास सुरुवात झाल्यापासून कित्येक ठिकाणीं शंभर व कित्येक ठिकाणीं पाऊणशें वर्षें इंग्रजी मुत्सद्यांनीं त्याचें दृढीकरण करण्यांत घालविलीं. आजमितीस सर्व हिंदुस्थानावर इंग्रजांची जी सार्वभौम सत्ता चालू आहे ती या प्रयत्नाचें फल होय. मराठे, रजपूत, मुसलमान, शीख, बंगाली आणि मद्रासी इत्यादि सर्व जाती एका राज्यकर्त्याच्या अमलाखालीं आतां बहुतेक मोकळ्या मनानें व्यवहार करूं लागल्या आहेत. कित्येक

[केसरीः—ता. २८ नोव्हेंबर १८९३]

ठिकाणीं यांमधील वैमनस्यें अथवा भेद अद्याप कायम असतील; पण सामान्यतः त्या सर्व एके ठिकाणीं आणणें हें हल्लींच्या राज्यपद्धतीस अत्यंत आवश्यक असल्यामुळें त्यांच्यामधील भेद कालांतरानें तरी नाहींसे होतील अशी आशा आहे. सारांश इंग्रजी राज्याखालीं शेळी आणि वाघ एके ठिकाणीं पाणी पिऊं लागलीं असे जें कित्येकांचें म्हणणें आहे तें बऱ्याच अंशीं खरें आहे; परंतु अशा रीतीनें निरनिराळ्या जाती एकछत्राखालीं आणल्या म्हणजे राज्यकर्त्यांचें काम झालें व इंग्रजी राज्यवैभवाची कमाल झाली कीं काय असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. हिंदुस्थानचे अंडर–सेक्रेटरी लॉर्ड रसेल यांनीं यंदाच्या बजेटावर पार्लमेंटांत जें भाषण केलें त्यांत या प्रश्नाचें उत्तर देण्याचा त्यांनीं थोडासा प्रयत्न केला होता. ते म्हणाले कीं, निरनिराळ्या जाती जिंकल्यानें इंग्रज सरकारचें काम झालें असें कोणीं समजूं नये. या सर्व जाती एकवटून त्यांस एकराष्ट्रीयत्व यावें असा इंग्रजी राज्यकर्त्यांचा अखेर हेतु आहे व ती गोष्ट हल्लींच्या राज्यांतच घडून येणें शक्य आहे. रसेल साहेबांचे हे उद्गार आम्हांस पूर्णपणें मान्य आहेत. रसेल साहेबांच्या पूर्वीहि पुष्कळांनीं असेच उद्गार काढले होते; पण ही कल्पना अमलांत आणावी कशी हें राष्ट्रीयसभा होण्यापूर्वीं कोणाच्याहि चांगलें लक्षांत आलें नव्हतें. निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळ्या जातींचे शहाणे, विचारी व शिकलेले बरेच नेटिव्ह गृहस्थ आहेत; परंतु विलायतेंतून सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देऊन आलेल्या लोकांस निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या हुद्यांचे अधिकार चालविण्याची जी सोय असते तशी नेटिव्हांस नसल्यामुळें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांचें एकीकरण करण्याचें काम या सनदी नोकरांपैकींच कोणी तरी उचलावयास पाहिजे होतें, आणि तें ह्यूम साहेबांनीं केवळ परोपकारबुद्धीनें आम्हांसाठीं पत्करिलें. ह्यूम साहेबांस यासाठीं किती झीज सोसावी लागली व स्वजातीयांकडून त्यांस किती पुष्पवृष्टि मिळाली यांचा आज पुनः निर्देश करण्यांत हंशील नाहीं. इंग्रजी राज्याची स्थापना आणि विस्तार ज्या थोर इंग्रजी मुत्सद्यांनीं केला त्यांचेच हेतु व काम मि. ह्यूम हे स्वजातीयांचा छल सोसून आणि पिशवीस खार लावून शेवटास नेत आहेत. यांची कर्तव्यताबुद्धि, काम करण्याची उमेद, आपण केलेल्या श्रमांचा केव्हांना केव्हां तरी योग्य मोबदला मिळेल असा भरंवसा हीं इतकीं दृढ आहेत कीं, ही उमेद, हा उत्साह आमच्याकडील तरुण मंडळींतहि सांपडणें अशक्य आहे, तेव्हां अशा पुरुषास सर्व हिंदुस्थानभर ठिकाठिकाणच्या लोकांनीं मान दिला तर त्यांत नवल कोणतें ?

परंतु हा मान देत असतांना व ह्यूम साहेबांचा शेवटचा निरोप घेत असतांना आपण ज्यांचा निरोप घेत आहों त्यांच्यामागें आपल्यावर कोणत्या प्रकारची जबाबदारी येत आहे याचाहि प्रत्येकानें थोडाबहुत विचार केला पाहिजे. इंग्रजी राज्याचा अखेर परिणाम जर वर सांगितल्याप्रमाणेंच व्हावयाचा असेल

तर तो राष्ट्रीय सभेसारख्या संस्था हल्लीं चालल्या आहेत त्यापेक्षां शतपट अधिक जोरानें चालल्या पाहिजेत; इतकेंच नव्हे तर जागोजाग असल्या संस्थांच्या शाखा उत्पन्न होऊन ह्यूम साहेबांनीं सुरतेस उपदेश केल्याप्रमाणें त्या शाखांचें कामहि निर्भीडपणें व जारीनें चाललें पाहिजे. राष्ट्रीय सभेविरुद्ध पुष्कळांनीं पुष्कळ आक्षेप काढिले आहैत. पण आम्हांस इतर सर्व आक्षेपांपेक्षां ज्याची विशेष भीति वाटते तो असा कीं, "असल्या संस्था चालविण्याची कुवत हिंदुस्थानच्या लोकांत येण्यापूर्वीच ह्यूम साहेबांनीं राष्ट्रीय सभेस सुरुवात केल्यामुळें ती आपोआप लयास जाण्याचा संभव आहे." मि. ह्यूम साहेबांनीं काल पुणेकरांस सांगितल्याप्रमाणें त्यांच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत ते या संस्थेचें पितृव्रत परिपालन करतील इतकेंच नव्हे, तर कधीं सामोपचारानें व कधीं रागावून आमच्या हातूनही योग्य काम करून घेतल्याखेरीज सोडणार नाहींत; पण हा प्रकार कोठपर्यंत चालावयाचा? ह्यूम साहेबांच्या मागें हिंदुस्थानांत त्यांच्या जोडीचा नाहीं तर निदान त्यांच्या खालच्या प्रतीचा तरी राष्ट्रीय सभेसारख्या संस्था सतत परिश्रमानें चालविण्यास जर कोणी तयार झाला नाहीं तर त्यांनीं केलेलें श्रम निरर्थक होतील आणि सर्व सुधारलेल्या जगभर आमचा उपहास होईल हें आम्हीं लक्षांत बाळगिलें पाहिजे. आजपर्यंत ह्यूम साहेबांनीं आमचे दोष पदरांत येऊन हा मोठा गाडा कसा तरी हांकला होता; पण तसा प्रकार नेहमीं होणें शक्य नाहीं. आपली हल्लींची स्थिति सुधारणें आपल्याच हातांत आहे व ती सुधारण्याचे मार्गहि ह्यूम साहेबांच्या कामगिरीनें आतां आपणास कळूं लागले आहेत. इतकें शिक्षण मिळाल्यावरहि जर आम्ही जागचे जागींच उभे राहूं, ह्यूम साहेबांनीं सफा केलेल्या रस्त्यावरहि पुनः रान वाढूं देऊं तर मग आमची धन्य झाली असेंच म्हटलें पाहिजे. मि. मार्गन ब्राऊन यांनीं ही गोष्ट आपल्या कालच्या भाषणांत चांगली व्यक्त करून दाखविली होती. तुमच्यावर हल्लीं इंग्रजांचें राज्य आहे व त्या राज्यांतील दोष काढून टाकणें असल्यास तें काम इंग्रजी इतिहासांतल्या पद्धतीप्रमाणेंच पार पाडल्याखेरीज तुम्हांस दुसरा मार्ग नाहीं असें त्यांनीं साफ बोलून दाखविलें. हा मार्ग म्हणजे राष्ट्रीय सभेसारख्या संस्था अस्तित्वांत आणणें, त्या चालविण्यास दहापांच पुरुषांनीं कायावाचामनेंकरून खटपट करणें व त्यांच्या जागोजाग शाखा स्थापन करून त्यांस बळकटी आणणें हाच होय. विलायतेंतील कांहीं सद्गृहस्थांची आपणांस मदत आहे ही गोष्ट खरी आहे; पण मार्गन साहेबांनीं सांगितल्याप्रमाणें दुसऱ्याच्या हातानें पाणी पिऊन आमचा कधींहि निभाव लागावयाचा नाहीं. अखेरीस या संस्था आमच्या आम्हींच चालविल्या पाहिजेत व त्या तशा चालविणें असल्यास एव्हांपासूनच त्याची कांहीं तरी तजवीज झाली पाहिजे. आपणांस जें काम करावयाचें आहे तें कांहीं लहानसान नाहीं. हिंदु-

स्थानांत ठिकठिकाणीं लहान लहान राजांचा जो अंमल होता तो सर्व काढून टाकून त्या ठिकाणीं हल्लीं सनदी लोकांचा एकछत्री अंमल सुरू झाला आहे; परंतु हाहि अंमल नाहींसा होऊन ह्याऐवजीं कालांतरानें कां होईना, पण लोकांचा अंमल चालू होण्याचा पूर्ण संभव आज आमच्या डोळ्यांपुढें आम्हांस दिसत आहे. आम्ही हातपाय हालवूं तर ही गोष्ट सिद्धीस जाईल, नाहींपेक्षां उलट अधिकाधिक विपत्तींत मात्र पडूं हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. सन १८८९ सालीं ह्यूम साहेब आपल्या जनरल सेक्रेटरीच्या जाग्याचा राजीनामा देण्यास जेव्हां तयार झाले होते तेव्हांपासून या प्रश्नाची थोडीबहुत चर्चा चालूच आहे. मध्यंतरीं पंडित अयोध्यानाथ यांस ह्यूम साहेबांचे मदतनीस म्हणून नेमलें होतें, पण पंडितजींचा अशा रीतीनें आम्हांस उपयोग होण्याचें आमच्या नशिबीं नसल्यामुळें त्यांची जागा लवकरच रिकामी झाली. मि० ह्यूम यांनीं मि० ब्राऊन यांस आपल्याबरोबर जें हल्लीं आणिलें आहे तें पुढें त्यांस जनरल सेक्रेटरीची जागा देण्याकरितांच होय. मि० ब्राऊन हे त्यांच्या हल्लींच्या वर्तनावरून सदर जागेचें काम ह्यूम साहेबांप्रमाणेंच करतील अशी आशा आहे. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, अशा रीतीनें काम करण्यास तिन्ही इलाख्यांत ह्यूम साहेबांस आमच्यापैकीं कोणीं मनुष्य मिळूं नये. कोणाच्या अंगीं पैशानें, बुद्धीनें व मनानें योग्यता असल्यास इच्छा नाहीं आणि कोणाची इच्छा असल्यास बुद्धि, धन किंवा मान्यता यांपैकीं कशाची तरी त्यास उणीव असते, असाच प्रकार प्रायः आढळण्यांत येतो. आमच्या मतें लाहोर येथील राष्ट्रीय सभेंत ज्या प्रश्नांचा विचार व्हावयाचा आहे त्यांपैकीं हा अत्यंत महत्वाचा होय. हुंडणावळ चढल्यामुळें युरोपियनचे वाढलेले पगार, पब्लिक सर्व्हिस, कौन्सिलचे नियम इत्यादि विषय दरवर्षीं चाललेच आहेत; पण राष्ट्रीय सभेसारख्या संस्था ह्यूम साहेबांच्या मागें कोणीं व कशा चालवाव्या याचा विचार दादाभाई व ह्यूम हे दोघेहि हजर असतां जितक्या पूर्णतेनें होईल तितक्या दुसऱ्या कोणत्याहि वेळीं होणार नाहीं अशी आमची समजूत आहे व म्हणून, ह्यूम साहेबांचा शेवटचा निरोप घेतांना ठिकठिकाणच्या मंडळींनीं याचा विचार करून मग लाहोरास यावें अशी आमची त्यांस विनंति आहे. गेल्या सालीं प्रयागास भरलेली राष्ट्रीय सभा ह्यूम येथें नसतां भरली होती हें लक्षांत आणलें म्हणजे असल्या संस्था चालविण्याची बुद्धि अगर हिम्मत आमच्यांत नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं; परंतु इतकें असूनहि ह्यूम साहेबांप्रमाणें योग्यतेनें, अधिकारानें, बुद्धीनें आणि खऱ्या आस्थेनें काम करणारा एकहि गृहस्थ अद्याप आपणांस मिळाला नाहीं हेंहि खरें आहे. करितां या सर्व गोष्टींचा विचार होऊन लाहोरास यंदा कांहीं तरी त्याची तोड निघेल अशी आम्हांस उमेद आहे. ह्यूम साहेबांची हल्लींची भेट शेवटची तर खरीच व ती शेवटची

असें समजूनच आम्हीं आपल्या व्यवस्थेस लागावें हा मार्ग उत्तम; तथापि परमेश्वरकृपेनें ज्या महात्म्यानें एकंदर इंग्रजी राज्यांतील प्रजेस राजकीय उन्नती होण्याच्या साधनांची किल्ली दाखवून दिली त्याची पुनः भेट होण्याचा योग येऊन आजपर्यंत त्यांच्या भेटीनें जसें आम्हांस वारंवार उत्तेजन मिळत गेलें तसेंच पुढेंहि मिळत जावो अशी आम्ही मनापासून प्रार्थना करतों.

❁ ❁ ❁

* राजधर्माचे नवे उपदेशक यांतील बीज काय ?

आजच्या अंकांत गेल्या रविवारीं येथें जो अभूतपूर्व समारंभ झाला त्याची व त्याच्यापूर्वीच एक दिवस मुंबईंत झालेल्या सभेची जी हकीगत दिली आहे त्यावरून ऑनरे. मि. दादाभाई नवरोजी यांचा ठिकठिकाणीं कसा सन्मान होत आहे हें वाचकांस कळून येईलच. पार्लमेंटसभेंत अडसष्टाव्या वर्षी शिरलेल्या या " काळ्या गृहस्थाचा " आम्हीं जो एवंढा सन्मान करीत आहों, व त्याबद्दल जी पूज्यबुद्धि, कृतज्ञता व प्रेम दाखवीत आहों यांतील इंगित काय व अशा प्रकारें सन्मान करण्यांत आम्हांस कांहीं तरी भुरळ पडली नाहींना अशी कदाचित् कित्येकांच्या मनांत शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. आनरे. मि. फेरोजशहा, आनरे. मि. जव्हेरीलाल व स्वतः मि. दादाभाई हे असल्या गोष्टीस आपली संमति देतात तेव्हां असली शंका निर्मूल असावी असें प्रथमदर्शनीं प्रत्येकांस वाटेलच. परंतु तेवढ्यानें मनाचें पूर्ण समाधान होत नाहीं. दादाभाईसारखे या देशांत विद्वान् नाहींत काय ? पार्लमेंटसभेचा सभासद होणें इतकें मोठें दुर्घट आहे काय ? असेंहि, दुसरे कित्येक प्रश्न विचारतील. करितां या सर्व शंकांस आज जबाब देण्याचा आम्हीं विचार केला आहे. मि. दादाभाई हे जर नुसत्या पार्लमेंटसभेचे दुसऱ्या केव्हां तरी सभासद झाले असते, अगर हल्लींपेक्षांहि देशसेवेंत एकनिष्ठपणें त्यांनीं अधिक वर्षें घातलीं असतीं तरी त्यांस आज जो मान मिळत आहे तसा मिळाला नसता. तेव्हां हजारों हिंदु, पार्शी आणि मुसलमान लोक या राजर्षीच्या दर्शनास इतके आतुर झालेले जे आज दृष्टीस पडतात यांतील बीज कांहीं निराळेंच असावें हें उघड आहे. हें बीज नीट लक्षांत येण्यास प्रस्तुतची देशास्थिति व इतिहास याचा थोडासा विचार केला पाहिजे.

हल्लीं आपली स्थिति कोणत्या प्रकारची झाली आहे याचा विस्तारेंकरून आज उल्लेख करण्याची जरूरी नाहीं. महाराणीच्या सार्वभौम सत्तेखालीं सर्व हिंदुस्थानभर शांतता होऊन हिंदु-मुसलमान, पार्शी, शीख वगैरे सर्व जातींच्या व धंद्यांच्या

[* केसरी–ता. १९ डिसेंबर १८९३]

लोकांस त्यांनीं एकाच वर्गांत ओढून त्यांच्या हिताहिताचा एक संबंध करून टाकिला आहे. इंग्रजी राज्यापूर्वी कोठें मराठे, कोठें मुसलमान, कोठें शीख व कोठें रजपूत आपापल्या सामर्थ्याप्रमाणें राज्यवैभवाचा उपभोग घेत अगर दुसऱ्याचे अंकित होऊन रहात. आमच्या दुर्दैवानें अगर सुदैवानें तसा प्रकार आतां राहिला नाहीं. राज्यवैभव सर्व इंग्रज लोकांनीं आपल्या हातांत राखलें आहे; व हिंदु, मुसलमान, व पार्शी वगैरे निरनिराळ्या जातींतील लोकांच्या गुण-दोषांत कितीहि अंतर असलें तरी त्या सर्वांस " नेटिव्ह " या एकाच वर्गांत घालून जे त्यांस काय अधिकार अथवा हक्क द्यावयाचे तेहि सारखेच दिले आहेत; सारांश राज्यकर्ते व प्रजा असे राजकीय दृष्ट्या दोनच वर्ग हल्लीं हिंदुस्थानांत आहेत असें म्हटलें तरी चालेल. निरानिराळ्या जातींतल्या लोकांस आपली खरी स्थिति कळूं लागेपर्यंत जातीजातींतील पूर्वापार चालत आलेलीं वैमनस्यें नष्ट व्हावयाचीं नाहींत हें खरें आहे; तथापि तसा दिवस येण्यास फार अवकाश लागेल असें हल्लींच्या चिन्हांवरून दिसत नाहीं. सर्व जातींतील सुशिक्षित लोक एकदिलाचे आहेत हें कॉंग्रेससारख्या संस्थांवरून व मुंबईतील दंग्याच्या हकीकतीवरूनहि व्यक्त होत आहे; व इंग्रज सरकारचें राज्य आणखी कांहीं दिवस राहिल्यास हें आमचें राजधर्मबंधुत्व उत्तरोत्तर वाढत जाऊन अखेरीस आम्ही व राज्यकर्ते असे दोनच लौकिकदृष्ट्या वर्ग होतील अशी आमच्या राज्यकर्त्यांची आणि आमची उमेद व आशा आहे. परंतु वर जे दोन वर्ग सांगितले त्यांची व्यावहारिक स्थिति एकमेकांहून फार भिन्न आहे. राणीसरकारच्या राज्याखालीं हिमालयापासून केपकुमारीपर्यंत सर्वत्र शांततेची ध्वजा फडकत आहे हें खरें; पण ही शांतता राखण्यास आमच्या भाकरीपैकीं निम्मीं भाकर राज्यकर्ते व त्यांचे व्यापारी बंधू यांस दरवर्षीं द्यावी लागत असल्यामुळें आम्ही उत्तरोत्तर कंगाल होत चाललों आहों, व ही स्थिति कायम राहिल्यास " आमचें पुढें होणार तरी काय ? " याची विचारी मनुष्यांस धास्ती वाटूं लागली आहे. पूर्वीच्या काळीं हिंदु, मुसलमान, शीख ह्यांपैकीं कोणाच्याहि मनांत असले विचार आले असतां जो तो आपापल्या जातीपुरतें पाहत असे. परंतु तसा विचार हल्लीं आपणांस करितां येत नाहीं, इतकेंच नव्हे तर कोणी करूंहि देणार नाहीं. आमच्या राज्यकर्त्यांचें सामर्थ्य इतकें जबर आहे कीं, वर सांगितलेल्या जातींपैकीं कोणाचाहि निरर्थक शिरजोरपणा ते चालूं देणार नाहींत. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस जें काय करणें असेल तें त्यांनीं एकदिलानेंच केलें पाहिजे. मग कोणाचें सामर्थ्य कमी असो किंवा कोणाचें जास्त असो, तो भेद लक्षांत घ्यावयाचा नाहीं. इंग्रजी राज्यानें हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या लोकांची एक मोळी केली आहे व त्या मोळीचा बंध तुटून पुनः त्यांतील लांकडें निरनिराळीं होऊं नयेत अशी व्यवस्था करण्याचें सामर्थ्यहि त्यांच्यांत आहे. " ब्रिटिश राज्यामुळें आम्ही एक्य झालों,

"ब्रिटिश लोकांनींच आम्हांस एकत्र होण्यास शिकविलें" असे जे ऑनरे० मि० दादाभाई वरचेवर उद्गार काढितात त्यांतील रहस्यहि हेंच होय. आमची राजकीय स्थिति अशा प्रकारची आहे हें कोणाहि स्वदेशहितचिंतकानें विसरतां कामा नये. किंबहुना विसरेल तो घसरेल आणि घसरेल तो पडेलच. या राजकीय स्थितीचें खरें स्वरूप आणि महत्त्व मि० दादाभाई यांनीं जितक्या चांगल्या रितीनें ओळखिलें आहे तितकें तें दुसऱ्या कोणत्याहि हिंदुस्थानांतील मुत्सद्याच्या मनांत बिंबलें असेल किंवा नाहीं याचा वानवाच आहे. आमच्या भोंवतीं इंग्रजी राज्याची जी मिठी पडली आहे ती अभेद्य आहे इतकेंच नव्हे, तर तिनेंच आपणांस एकत्र केलें आहे; व तिचें बंधन कायम असलें तरच आमचा सांधा बेमालूम जडेल अशी ह्या महापुरुषाची इतकी दृढ खातरी झाली आहे कीं, आपल्या मताप्रमाणें मुखावाटे उद्गार काढून त्याकरिता इंग्रजी राज्याची स्तुति केल्यानें इंग्लंडांतील कांहीं सोशालिस्टिक मंडळी नाखुष होईल याची देखील तो परवा करीत नाहीं. इंग्लंडांत ऑ० दादाभाई यांच्या बोलण्यास जो मान मिळतो त्यांचें एक मुख्य कारण वर सांगितलेली खात्री हेंच होय.

इंग्रजी राज्यानें आम्हीं एकत्र झालों आहों, आमच्यामधील दुजाभाव नाहींसा होण्यास त्या राज्याचें बंधन असणें जरूर आहे व हल्लींच्या राज्यांत जर आमची निकृष्टावस्था असेल तर ती सुधारण्यास हें बंधन कायम ठेऊनच आपणांस कांहीं उद्योग करणें असल्यास तो केला पाहिजे असें ह्यावरून उघड होतें. इंग्रजी राज्यांत शांतता असली तरी आमची स्थिति अगदीं निकृष्ट आहे, दारिद्र्याचा आमच्यावर उत्तरोत्तर जास्त पगडा बसत चालला आहे, आणि शौर्य, नीति, अभिमान, साहस वगैरे राजतेजाचे गुण आमच्यामधून शोचनीय रीतीनें नाहींसे होत चालले आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. अशावेळीं ही स्थिति सुधारण्यास आतां आम्हांस कांहीं मार्ग आहे काय ? असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. हा प्रश्न पुष्कळांच्या लक्षांत आला असेल व इतिहासाच्या पुस्तकांची पारायणें केलेल्या बऱ्याच गृहस्थांनीं "असें करावें, तसें करावें; हा एकमार्ग आहे, तो एक मार्ग आहे," अशीं तोंडीं अगर लेखी पांडित्यानें भरलेलीं उत्तरेंहि दिलीं असतील. परंतु तो मार्ग कोणता, व त्या मार्गानें गेलें असतां आपणांस कितपत यश येईल हें अनुभवानें सिद्ध करून देणारा दादाभाईखेरीज दुसरा कोणीहि आजपर्यंत निघाला नाहीं.

हिंदुस्थानांतील इंग्रज राज्यकर्ते यांच्या जवळ ओरड करून कांहीं एक मिळावयाचें नाहीं, यांच्याजवळ भांडत बसणें म्हणजे दगडावर डोकें आपटून घेण्यासारखें आहे, हें तत्व अनुभवानें आम्हांस कळून चुकलें आहे; व त्याबरोबरच आमची कांहीं दाद लागली तर विलायतेस लागेल अशी इतिहासावरून आम्हांस थोडी आशा लागली आहे. परंतु विलायतेस आपली डाळ कितपत शिजते,

तेथील लोक आपल्या जातिबांधवांच्या म्हणण्यापेक्षां आमच्या म्हणण्याकडे विशेष लक्ष देतील किंवा नाहीं याचा आम्हांस कोणत्याहि तऱ्हेचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता तो आज दादाभाई यांनीं आणून दिला. ते विलायतेस गेले; तेथें सर्व अडचणी सोसून, स्वार्थाकडे दृष्टी न देतां दहापांच वर्षें राहिले. लोकांची समजूत काढिली, तीस कोटी प्रजेस न्याय द्या अशी त्यांच्या कानीं कपाळीं ओरड केली आणि पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानच्या लोकांचे मुखत्यार म्हणून आपला प्रवेश करून घेतला ! कालांतरानें विलायतच्या लोकांची खात्री झाल्यावर आमच्या मागण्यापैकीं सर्व नाहींत तरी बऱ्याच मागण्या ते पुरवतील; सिव्हिल सर्व्हिसची परिक्षा हिंदुस्थानांत होऊं लागेल व स्थानिक स्वराज्याचा अधिकार वाढून आमच्या देशाच्या राज्यकारभारांत आमचीं मतेंहि घेऊं लागतील. ह्या सर्व गोष्टी अगदीं न्याय्य आहेत, व केव्हांना केव्हां तरी त्या आपणांस न्यायानेंच प्राप्त होतील हें खरें आहे, आणि प्राप्त झाल्या म्हणजे विलायतेंतील लोकांच्या न्यायबुद्धीचें आम्हांस आश्चर्यहि वाटूं लागेल परंतु ह्या सर्वांपेक्षां आमच्यामतें विशेष महत्वाची गोष्ट ही कीं, आपला प्रतिनिधि म्हणून त्या लोकांनीं ऑ० दादाभाई यांस पार्लमेंट सभेचा सभासद निवडून दिलें. काळ्या मनुष्यास अशा रितीनें आपला प्रतिनिधी निवडून देणें यापेक्षां त्यांच्या न्याय्यबुद्धीचा आणखी जास्त दाखला तो कोणता व हा दाखला ज्यानें आम्हांस आणून दिला, त्यास राजकीय नावाड्या अगर नूतन राजधर्मोपदेशक म्हणण्यास कोणती हरकत आहे ? देशास विपन्न काल आला असतां त्यांतून सुटका होण्याचे मार्ग दाखवणारे जे महापुरुष निर्माण होतात त्यांतच दादाभाईंची गणना केली पाहिजे.

सरतेशेवटीं कोणी अशी शंका घेतील कीं, ऐर्लंडाचे ऐशीं सभासद पार्लमेंटांत असतांहि जर शेंकडों वर्षांचीं त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेण्यास इंग्लंड तयार नाहीं तर एकटे दादाभाई पार्लमेंट सभेंत गेल्यानें आमचें काय होणार ? परंतु ही शंका घेणारे लोक हिंदुस्थान व ऐर्लंड यामधील भेद लक्षांत ठेवीत नाहींत असें वाटतें. शरीराचें हातपाय वगैरे जसे अवयव असतात तसाच ऐर्लंड हा ग्रेटब्रिटन व ऐर्लंड या संयुक्त राज्याचा एक अवयव बनून गेला आहे; व ऐर्लंडास स्थानिक स्वराज्याचे हक्क दिल्यानें ह्या संयुक्त राज्यपुरुषाचा एक अवयव तोडल्यासारखा होतो अशी, खरी म्हणा अगर खोटी म्हणा, इंग्लंडांतील पुष्कळ लोकांची समजूत झाली आहे. मि. ग्लाडस्टन यांचे मार्गांत जे अडथळे येतात ते याच समजुतीचे परिणाम होत. हिंदुस्थानाबद्दल कोणत्याहि प्रकारचा असा ग्रह विलायतेंतल्या लोकांचा झाला नाहीं. उलट हिंदुस्थानांतील लोकांचें आम्हीं स्वातंत्र्य नष्ट केलें आहे तेव्हां त्यांचा संतोष हींच आपल्या राज्याची मजबुती व तो संतोष कायम ठेवणें हेंच आपलें कर्तव्य असें पुष्कळांचें मत आहे. ह्याच मताचा फायदा घेऊन हिंदुस्थानाचीं वास्तविक गाऱ्हाणीं व दुःखें जर आम्हीं

यांस कळविलीं तर ग्रीस, इटली, हंगेरी वगैरे देशांतील लोकांस ज्याप्रमाणें इंग्लंडांतील लोकांनीं मदत केली त्याचप्रमाणें ते आम्हांसहि करितील अशी उमेद आहे. ही उमेद बाळगूनच ग्रीस, इटली वगैरे देशांतल्या स्वदेश भक्तमंडळीप्रमाणें ऑ० दादाभाई यांनीं उद्योग सुरूं केला, व निश्चयानें, एकनिष्ठपणानें आणि दीर्घ परिश्रमानें तो सिद्धीस जाईल अशी आम्हां सर्वांची खातरी करून देऊन इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर केलें ! हल्लींच्या काळांत व स्थितींत यापेक्षां एकट्या माणसानें स्वदेशहितासाठीं जास्त करावयाचें तरी काय ? दादाभाईकडे हजारों लोकांचा जो जीव ओढतो तो ह्याचसाठीं होय. हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता, हिंदुस्थानवासी हेंच आम्हां सर्वांचें बंधुत्वाचें नातें, आणि वस्तुस्थिति लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक स्थिति सुधारण्याचा एकनिष्ठपणानें व स्वार्थाकडे लक्ष न देतां सतत परिश्रम करणें हाच आमचा धर्म हें दादाभाईंच्या चरित्रावरून पूर्णपणें व्यक्त होत आहे; व त्यांस हल्लीं जो सन्मान मिळत आहे त्यावरून ह्या नूतन राजधर्माचा हिंदुस्थानभर लवकरच प्रसार होईल अशी आमची खात्री आहे.

❋ ❋ ❋

* मुंबईच्या दंग्यावर सरकारचा ठराव

गेल्या खेपेस या ठरावासंबंधानेंच थोडासा उल्लेख करून त्यांत मुंबईचे पोलीस कमिशनर मि० व्हिन्सेंट यांचें मताप्रमाणें दंग्याचा गोरक्षण सभांशीं सरकारनें संबंध जुळविला नाहीं याबद्दल सरकारचे आभार मानिले होते. आज त्या ठरावाचा सविस्तर विचार करणार आहों. मि० व्हिन्सेंट व मि० आर्कर्थ यांनीं गोरक्षण सभांवर व त्यांच्या कामांवर जे आक्षेप केले होते त्यांस सरकारनें रुकार दिला नाहीं, निदान गोरक्षण हें दंग्याचें मुख्य कारण नव्हे असें स्पष्टपणें ठरावांत नमूद केलें हाच आमच्या मतें ह्या ठरावाचा मुख्य गुण आहे. सरकारचें असें मत होण्यास आजपर्यंत ह्या विषयाची झालेली ठिकठिकाणीं चर्चा व विशेषेंकरून आग्रा येथें लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं केलेलें भाषण हींच कारणीभूत झालीं असावीं हें उघड आहे. एरव्हीं पोलिस कमिशनर आणि म्युनिसिपल कमिशनर यांच्या सारख्यांचीं मतें हल्लींच्या कारकीर्दीत कधींहि बाजूस ठेविलीं गेलीं नसतीं. मि० व्हिन्सेंट यांच्या मतास मुंबईसरकारानें द्यावा तितका मान दिला नाहीं याबद्दल टाइम्सपत्रकर्त्यानें खेद प्रदर्शित केला आहे; पण टाइम्सपत्राचें आणि मे० आर्कर्थ

---

* [केसरीः—ता. १६ जानेवारी १८९४.]

आणि व्हिन्सेंट यांचें या बाबतींत कसें ऐकमत्य होतें हें ज्यांस माहित आहे त्यांस या खेदप्रदर्शनाचें कांहीं नवल वाटणार नाहीं.

आतां ठरावांतील दुसऱ्या भागाकडे वळूं; परंतु तत्पूर्वी अशा प्रकारच्या सरकारी ठरावांत कोणत्या गोष्टीचा समावेश झाला पाहिजे याबद्दलचा थोडासा खुलासा करणें जरूर आहे. मुंबईच्या दंग्यास सुरुवात झाल्यावर तो मोडण्याकरितां ज्यानें ज्यानें खटपट केली त्याचे आभार मानणें हें सरकारचें पहिलें काम आहे हें आम्हीहि मोठ्या संतोषानें कबूल करितों. झालेला दंगा तावडतोब मोडणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे—मग तो सरकारी अंमलदार असो वा नसो—व आपलें कर्तव्य स्मरून जो या कामीं मदत करील तो सरकारच्या व लोकांच्या प्रशंसनेस पात्र होईल. मि० व्हिन्सेंट, लष्करीलोक, लष्करी कामगार आणि आनररी माजिस्ट्रेट या सर्वांचे ठरावांत जे आभार मानिले आहेत ते वर लिहिलेल्या कारणाकरितां अगदीं योग्य आहेत असें म्हटलें पाहिजे. परंतु झालेला दंगा मोडणें, आणि दंगा मोडण्यासाठीं परिश्रम अगर मदत करणाऱ्या लोकांचे आभार मानणें एवढ्यानेंच सरकारचें कर्तव्य संपलें असें आम्ही समजत नाहीं. मागें दंग्याबद्दल लिहितांना एकंदर या प्रकरणाचे आम्हीं तीन भाग केले होते. झालेला दंगा मोडणें, दंग्यांत सांपडलेल्या लोकांची चौकशी करून त्यांस शासन करणें आणि असले दंगे कां व कसे होतात यांचीं कारणें शोधून काढून ते पुन्हां होऊं नयेत म्हणून तरतूद करणें. ह्या तिन्हीं व्यवस्था निरानिराळ्या अंमलदारांकडे अगर खात्यांकडे सोंपविलेल्या आहेत. दंगा मोडणें हें पोलिसांचें आणि लष्करीलोकांचें काम आहे. दंग्यांत सांपडलेल्या लोकांस शिक्षा करणें तीहि न्यायाधीश करितातच. राहतां राहिला तिसरा भाग त्याची सर्व जबाबदारी ज्यास आम्ही सरकार म्हणतों त्यावर पडते हें उघड आहे. यासाठीं सरकारी ठरावांत जर दंग्याच्या कारणांचा निश्चय करून तशीं कारणें पुन्हां उद्भवण्याची कांहीं तजवीज सुचविली नसेल, तर या बाबतींत सेक्रेटरीएटमधील लोकांनीं आपलें कर्तव्यकर्म केलें असें कधींहि म्हणतां येणार नाहीं. प्रस्तुतच्या ठरावाचा प्रकार बहुतेक अंशीं अशाच मासल्याचा आहे. गोरक्षणी सभांमुळें दंगे झाले नसावेत असें ठरावांत स्पष्ट लिहिलें असल्यामुळें हिंदुलोकांचें मत तरी ठरावांत लिहिलेल्या इतर गोष्टींविरुद्ध होणार नाहीं असें जर कोणास कदाचित् वाटत असलें तर एका अंशीं ही चूकच आहे असें त्यांस आढळून येईल. गोरक्षणाच्या बाबतींत सरकारनें आपलें मन वरेंच उदार करून हा ठराव लिहिला आहे व त्याबद्दल त्यांचे लोकांवर फार उपकार आहेत हें आम्हीहि कबूल करितों; पण तेवढ्यासाठीं ठरावांत नमूद केलेल्या इतर गोष्टींबद्दल आम्हांस आपली मान्यता प्रदर्शित करितां येत नाहीं.

हा दंगा होणार अशी बातमी पोलिसास तीन आठवड्यांपूर्वी होती हें व्हिन्सेंटसाहेबांनींच आपल्या रिपोर्टांत कबूल केलें आहे. माधवबाग येथें भरलेल्या हिंदुलोकांच्या सभेंतहि त्या बातमीचा उल्लेख केलेला होता. तथापि ११ आगस्ट रोजीं दंग्याचा पोलिसांस विशेषसा प्रतिकार करितां आला नाहीं हें दंग्याच्या हकीगतीवरून निर्विवाद आहे. दंगा इतक्या थरास जाईल असें आपणास वाटत नव्हतें एरव्हीं जास्त तयारी केली असती असें व्हिन्सेंटसाहेब म्हणतात व सरकारचें मतहि त्याचप्रमाणें आहे. व्हिन्सेंटसाहेबांनीं जाणून बुजून कमी तयारी ठेविली असावी असें आम्हीहि म्हणत नाहीं; तथापि दंगा होण्याची विश्वसनीय बातमी लागल्याबरोबर पोलिसानें जितकी काळजी घ्यावयास पाहिजे होती तितकी घेतली नाहीं असें आम्हांस वाटतें. गोष्ट घडून आल्यावर उपदेश करणें फार सोपें असा यावर कित्येकांचा आक्षेप आहे पण असल्या आक्षेपांनीं एकेकाचें खंडन करीत बसण्यापेक्षां दंगा होण्याची बातमी लागण्याबरोबर पोलिसानें थोडीशी जास्ती तयारी ठेवावी अशा तऱ्हेचा सामान्य नियम घालून देणें आम्हांस अधिक प्रशस्त वाटतें. कोणासहि दोष न ठेवतां अशा तऱ्हेचें मत सरकारास आपल्या ठरावांत प्रसिद्ध करितां आलें असतें.

पण याहिपेक्षां विशेष महत्त्वाचा मुद्दा म्हटला म्हणजे दंग्याच्या पूर्वकारणासंबंधाचा होय. गोरक्षण हें दंग्याचें मुख्य कारण नव्हे. जुनागडच्या दरबारापासून मुंबईच्या लोकांस चिथविण्यांत आलें नव्हतें इत्यादि ज्या गोष्टी ठरावांत दाखल केल्या आहेत त्याबद्दल कोणाची तक्रार नाहीं. पण जुम्मामशिदींत जातांना लोकांच्या हातांत काठ्या दिसल्या नाहींत, बाहेर पडते वेळेस मात्र त्यांच्या हातांत काठ्या नजरेस आल्या इत्यादि गोष्टी सरकारास कबूल असतां मुसलमान लोकांस या कामीं प्रथमतः चिथवून देणारे लोक मुंबई पोलिसास अद्याप मिळूं नयेत याबद्दल सरकारी ठरावांत कोणत्याहि प्रकारचें आश्चर्य व खेद दाखविला नाहीं, ही आमच्या मतें मोठी चूक आहे. दंग्यांत सांपडलेल्या लोकांस आज हायकोर्टाकडून कोणास पांच वर्षें व कोणास दहा वर्षें अशा जबर शिक्षा होत आहेत. पण ज्या लोकांनीं हे दंगे उत्पन्न केले त्यांचा अद्याप पोलिसास थांग नाहीं व थांग न लाविल्याबद्दल सरकार त्यांस कोणत्याहि प्रकारचा दोष लावीत नाहीं ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. देशी वर्तमानपत्रकारांनीं या गोष्टीचा अनेक वेळां उल्लेख केला होता व सरकारी ठरावांत याचा कांहीं तरी खुलासा होईल असें त्यांस वाटत होतें; परंतु त्याबद्दल हल्लींच्या ठरावांत कांहीं विशेष चर्चा केलेली नाहीं इतकेंच नव्हे, तर या बाबतींत विशेष चौकशी करण्याचा सरकारचा इरादाहि नाहीं असें आतां दिसून येतें. दंग्याच्या कारणांसंबंधानें उघड चौकशी चालू ठेविली असतां लोकांचीं खवळलेलीं मनें शांत होणार नाहींत, सबब तो नाद सोडून देऊन फार झालें तर गुप्त चौकशीनेंच मिळेल तेवढी माहिती मिळवावी

असा सरकारी ठरावांत मजकूर आहे; परंतु आमचें असें मत आहे कीं, या असल्या गुप्त चौकशीपासून कांहींएक फायदा व्हावयाचा नाहीं. पोलिसानें पाहिजे ती चौकशी करावयाची असल्यास गुप्त करावी; परंतु दंग्यास प्रवृत्त करणारे लोक कोणते व त्यांनीं कशाकरितां एवढी खटपट केली याची अखेरीस प्रसिद्धपणें चर्चा झाल्याखेरीस कोणाचेंहि समाधान व्हावयाचें नाहीं. करितां एक तर चौकशी प्रसिद्धपणें करावी नाहीं तर मुळींच करूं नये हें बरें असें आम्हांस वाटतें.

ठरावांत गिरण्यांतील मजुरांबद्दल व विशेषतः त्यांनीं एकजुटीनें मुसलमानलोकांनीं केलेल्या अपमानाच्या प्रतिकाराबद्दल जो उल्लेख केला आहे तोहि अगदीं गैरशिस्त आहे असें आमचें मत आहे. गिरण्यांतून काम करीत असलेल्या हजारों मजुरांस एकत्र होऊन अशा तऱ्हेचें काम करितां येतें हें एक नवेंच भीतीचें कारण उत्पन्न झालें आहे व त्यामुळें पोलिसांची संख्या जास्त वाढविली पाहिजे असें ठरावांत लिहिलेलें आहे. गिरण्यांतील मजुरांबद्दल सरकारी ठरावांत याप्रमाणें जी प्रीति दर्शविली आहे ती अगदीं निरर्थक व अयोग्य आहे. गिरण्यांतील मजूर स्वभावतः दंगेखोर व उच्छृंखल अथवा बदमाष नसतात हें आम्हीं सरकारास कळविलें पाहिजे असें नाहीं. मुंबई शहरांत एकंदर आठ नऊ लाखांची वस्ती आहे, पैकीं दोनतृतीयांश तरी हिंदु असतील. या सर्वांचें मुसलमानलोकांपासून रक्षण करण्यास दोनशें पिवळ्या पगड्या पुरे आहेत असें म्हणणें म्हणजे पोलिसांची बहुतेक थट्टा करण्यासारखीच आहे. गिरण्यांतील मजूर स्वभावतः जर बदमाष असते तर दंगा झाल्याबरोबर त्यांनीं लुटालूट करण्यास सुरुवात केली असती; परंतु तसा कोणताहि प्रकार घडून आला नाहीं. बारा आणि बारा चोवीस तासपर्यंत मुसलमानलोकांचें अकांडतांडव सुरू होतें. पोलिसांच्या हातून बंदोबस्त होईना तेव्हां हिंदुलोकांनीं करावें तरी काय? हातांत काठ्या घेऊन जमावानें व एकजुटीनें बाहेर पडणें त्यांस भाग होतें व गिरणीच्या मजुरांनीं तें काम करून सर्व हिंदुलोकांवरील संकट दूर केलें यांत त्यांनीं कोणत्याहि प्रकारचें गैरशिस्त काम केलें नाहीं एवढेंच नव्हे, तर दंगा मोडण्यास सरकारास एक प्रकारचें सहाय्यच केलें असें समजलें पाहिजे. कांहीं बदमाष हिंदुलोकांनीं चोऱ्या केल्या असतील, व आहेतहि; परंतु आम्ही व्यक्तीचा विचार न करितां वर्गाबद्दल बोलत आहों; व तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे गिरण्यांच्या मजुरांत असलेली जी एकजूट आज नजरेस आली आहे त्यामुळें पुढें भीति बाळगण्याचें कांहीं कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

सरतेशेवटीं सरकारानें आपल्या मतानें दंग्याचीं जीं एकदोन कारणें म्हणून दिलीं आहेत त्यांचा विचार करून हालेख आटपतों. इंग्रजी राज्यांत मुसलमानलोकांचे हक्क व अधिकार कमी कमी होत जाऊन हिंदुलोकांचें प्राबल्य वाढत चाललें आहे, अशी त्या लोकांची समजूत होत चालली आहे, व त्यापासून खालच्या प्रतीच्या मुसलमानलोकांस

आपला धर्म संरक्षण करणें जरूर आहे असेंहि वाटूं लागण्याचा संभव आहे, किंबहुना वाटत आहे, व त्यामुळेंच असले दंगे करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते असें नामदार गव्हर्नर आणि त्यांचें कौन्सिल यांचें मत असल्याचें या ठरावांत लिहिलें आहे. नामदार साहेबांचें हें मत कोणत्या कारणामुळें झालें याचा जर खुलासा समजला असता तर याबद्दल विशेष चर्चा करितां आली असती; पण तसा ठरावांत खुलासा केला नसल्यामुळें नामदार गव्हर्नरसाहेब व कौन्सिलर यांचें हें मत चुकीचें असून त्यापासून कदाचित् पुढेंमागें आम्हांस बराच त्रास सोसावा लागेल येवढेंच आज येथें सांगून त्याचा जास्त विचार करण्याचें काम आज तहकूब ठेविलें पाहिजे. मुसलमानलोक विद्येंत मागासलेले आहेत ही गोष्ट सर्वांस कबूल आहे; परंतु आपणांस इंग्रजी राज्यांत ब्राह्मणांप्रमाणें नोकऱ्या मिळत नाहींत म्हणून दंगा करावा असें त्यांच्या मनांत येतें, असें म्हणणें म्हणजे कॉंग्रेसचा संबंध दंग्याशीं जोडून देण्यासारखेंच आहे. नामदार गव्हर्नर साहेब व त्यांचे कौन्सिलर यांच्या डोक्यांत ही कल्पना कोठून आली असेल ती असो. निदान तिचा ह्या ठरावांत उल्लेख करण्याची तरी जरूरी नव्हती.

सारांश कोणत्याहि पक्षाचें मन न दुखविण्याची जर सरकारची इच्छा असली तर ती या ठरावानें विशेष सिद्धीस जाईलसें आम्हांस वाटत नाहीं. ठराव निःपक्षपातीपणाच्या डौलावर लिहिला आहे; परंतु त्यांत ज्या गोष्टींबद्दल निकाल पाहिजे त्यांचा निकाल लाविला नसल्यामुळें, व कांहीं नसत्या गोष्टी आंत घातल्यामुळें, त्यास एकंदरींत पुष्कळच गौणत्व आलें आहे, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

* * *

* लॅन्सडौन साहेबांची शेवटची सलामी

माजी राणीप्रतिनिधि लॉर्ड लान्सडौन यांची कारकीर्द गेल्या शनवारीं संपून लॉर्ड एल्गिनच्या रियासतीस प्रारंभ झाला. ते दिवशीं सकाळीं लॅन्सडौनसाहेबांनीं आपला भाला खालीं ठेऊन लगेच हेस्टिंग्स आगबोटीनें लंकेच्या मार्गानें निजधामास प्रयाण केलें. साहेबमहसुफांची पंचवार्षिक कारकीर्द कोणत्या प्रकारची झाली व त्यांचें बादशाहिणीच्या एतद्देशीय प्रजेविषयीं वारंवार दिसून येणारें विलक्षण प्रेम एकंदरीनें आम्हांस कसें भोंवलें याचें मागें दिग्दर्शन केलेंच आहे. तेव्हां त्यासंबंधानें आतां पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. गेलीं पांच वर्षें हिंदुस्थानांत फार धामधुमीचीं गेलीं खरीं, व त्या अवधींत सरकारचें वर्तन जितकें हरएक बाबतींत लोकांना प्रतिकूल होतें तितकें लोकांचेंहि पाऊल पुढें पडत गेलें

* [केसरी—ता. ३० जानेवारी १८९४]

हेंहि खरें; तथापि ह्या थोड्याबहुत अंशानें अनिवार्य व सामान्य गोष्टी माजी व्हाइसरायांच्या कारकीर्दींला महत्त्व आणण्यास पुरेशा नाहींत. लोकांत शिक्षण, व्यापार व दारिद्र्य जशीं वाढतील तसतशी चळवळहि वाढणारच, व सरकारी अधिकारी कालानुसार घुढें पाऊल टाकण्यास तयार नसल्यामुळें सरकार व लोक यांजमधील विरोध बळावत जाऊन तंटेहि वाढावयाचेच. तेव्हां या कालौघप्राप्त गोष्टींचें श्रेय एकट्या व्हाइसरायास देणें म्हणजे गलबताच्या डोलकाठीवर बसलेल्या कावळ्याकडे तारवाचें चालकत्व देण्यासारखेंच आहे. लान्सडौनच्या जागीं दुसरा कोणी अधिकारीमंडळीचा अधिपति असता तरी व्हावयाची ती सुधारणा झालीच असती. फार झालें तर तिचा वेग कमी जास्ती झाला असता इतकेंच. हिंदुस्थानचा व्यापार वाढला, आगगाड्या वाढल्या, सरहद्दीचा कडेकोट बंदोबस्त झाला, देशांत शांतता राहिली वगैरे गोष्टींबद्दल आंग्लो–इंडियन पत्रकार लान्सडौनसाहेबांची फार तारीफ करीत आहेत तें ठीकच. सरकारच्या ठरीव भाटांनीं व्हाइसरायापासून तों पोलीस कान्स्टेबलापर्यंत प्रत्येक गोऱ्या कामदाराची नेहमीं स्तुति करीत असणेंच स्वाभाविक आहे. परंतु हिंदुस्थानच्या राज्यकारभारासारखा जबरदस्त बोजा पांच वर्षें शिरावर वाहिल्यानंतर शेवटीं आपल्या निस्सीम भक्तांकडूनहि वरच्यासारख्या पाणचट प्रशंसेपेक्षां अधिक कांहीं सर्टिफिकीट मिळूं नये हें पाहून लान्सडौनसाहेबांस खरोखरच वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. आपण हिंदुस्थानांतून गेलों तरी ज्यांचे खिसे भरले त्यांनीं प्रत्युपकारार्थ जमविलेल्या साठ सत्तर हजारांच्या योगानें आपला दगडी पुतळा आपल्या कलकत्त्याच्या मैदानावर 'थंडीवारा खात उभा राहील, एवढी एक लान्सडौनसाहेबांस समाधान मानण्यास जागा आहे खरी, पण वस्तुतः त्याचा काय उपयोग ? साहेबमहसुफांचा पुतळा दृष्टीसमोर असल्यानें त्यांच्या एक एक कृत्याविषयीं लोकांची आठवण सदोदित जागृत राहील; पण खुद्द लॉर्ड लान्सडौन यांस त्यापासून किमपिहि शांति मिळावयाची नाहीं. ज्या लोकांच्या पैशावर आपण पांच वर्षें चैन मारली त्या लोकांचें आपण कांहींएक हित केलें नाहीं, तर उलट अतोनात नुकसान केलें ही लॉर्ड साहेबांच्या मनांतील खुरखुर आमच्या मतें स्वार्थपरायण बंदीजनांनीं दिलेल्या शेंकडों पुतळ्यांनीं किंवा मानपत्रांच्या भेंडोळ्यांनीं नाहींशी व्हावयाची नाहीं ही गोष्ट त्यांसहि माहीत असलीच पाहिजे. पण गेली घडी ती पुनः येत नाहीं. अष्ठावीस कोटी लोकांचें कल्याण करून आशीर्वाद संपादन करण्याची दुर्मिळ संधी मिळाली असून ती घरीं आलेल्या कामधेनूला हांकून देणाऱ्या अभाग्याप्रमाणें लॉर्ड लान्सडौन यांनीं दवडली याबद्दल त्यांना आतां पश्चात्ताप होत असला तरी त्याचा आतां काय उपयोग ! कोठें तरी आपल्या नांवाचा दगड बसवून घेण्यापेक्षां " रिपन, रे प्रमाणें सदैव लोकांच्या जिव्हाग्रीं वास करीत राहणें श्रेयस्कर आहे; पण लान्सडौनसाहेबांच्या

आणि हिंदुस्थानवासी प्रजेच्या दुर्दैवानें मानसिक औदार्य, उदात्त विचार, दूरदृष्टि, कर्तृत्वशक्ति इत्यादि खऱ्या राज्यधुरीणाला अवश्य लागणाऱ्या गुणांचा त्यांच्याठायीं अभाव असल्यामुळें त्यांना ती गोष्ट साध्य झाली नाहीं यांत त्यांचा अपराध म्हणण्यापेक्षां त्यांना नेमणारांचाच दोष म्हटला पाहिजे. तात्पर्य, बऱ्या किंवा वाईट कामाची कसोटी लावली असतां लान्सडौनसाहेबांची कारकीर्द संस्मरणीय होण्यास मुळींच कारण नाहीं; तथापि त्यांच्यामध्यें एक विशेष असल्यामुळें त्याचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरकालिक होईल यांत शंका नाहीं.

गेल्या तीस पसतीस वर्षांत या देशावर जेवढे अधिपति येऊन गेले त्यांत मेयो, नार्थब्रुक, व रिपनसारखे कित्येक उदारधी होते व त्यांनीं येथें सत्कीर्ति मिळविली. लिटनसारखे उलट प्रकारचेहि कांहीं होते व त्यांनीं आपल्या परीनें नांव मिळाविलें. पण लॉर्ड लान्सडौन यांस कोणत्या वर्गांत घालावें याची भावी इतिहासकारांस फार पंचाईत पडेल असें आम्हांस वाटतें. लिटनशाहीशीं लान्सडौनशाहीचें पुष्कळ साम्य आहे व कित्येक बाबतींत तर आमच्या माजी व्हाइसरायांनीं लॉर्ड लिटनासहि खालीं पाहावयास लावलें यांत शंका नाहीं; पण त्या दोघांना एका वर्गांत घालणें म्हणजे लॉर्ड लान्सडौनांस फाजील बहुमान देण्यासारखें आहे. लॉर्ड लिटन कितीहि कुत्सित, हेकेखोर, अदूरदृष्टि असले तरी त्यांच्या अंगीं स्वाभाविक तरतरी असल्यामुळें तिजपासून एखादे वेळेस चांगलें कार्यहि घडून येई. अनुकूल काल व स्थळ मिळालें असतें तर लिटनसारख्या अकांडतांडवी पुरुषापासून आमचें कल्याणहि घडून येण्याचा संभव होता. परंतु लॉर्ड लान्सडौनसारख्या निरुपद्रवी, निरुत्साह व कर्तृत्वशून्य गृहस्थांच्या हातून चांगलें किंवा वाईट कोणत्याच प्रकारचें काम होण्याची आशा नाहीं. वाईट कृत्य करण्यालाहि जें थोडेंबहुत सामर्थ्य लागतें तेवढें तरी लान्सडौनसाहेबांच्या अंगीं होतें कीं नाहीं याची आम्हांला बळकट शंका असल्यामुळें त्यांना कोणतें विशेषण द्यावें हें सांगवत नाहीं. मग त्यांच्या हातून इतकीं वाईट कृत्यें कशीं घडलीं असा प्रश्न येतो, पण त्याला उत्तर सोपें आहे. रिपन चांगले व्हाइसराय होते तसे लिटन वाईट होते; पण लान्सडौन दोन्ही नव्हते, म्हणजे ते केवळ नामधारी अधिपति असून सर्व अधिकार त्यांच्या दुय्यमांच्या हातीं होता. लान्सडौन हरएक बाबतींत आपल्या हाताखालील गोऱ्या कामदारांच्या तंत्रानें वागणारे असल्यामुळें गेल्या पांच वर्षांत घडून आलेल्या बऱ्या वाईट गोष्टींचें केवळ सही करण्यापलीकडे त्यांस श्रेय कां द्यावें हें कोणालाहि सांगतां येणार नाहीं. लिटन कितीहि वाईट असले तरी स्वतः विचार करीत असत व आरंभिलेलें कार्य नेटानें तडीस नेत; पण हाताखालच्या अधिकाऱ्यांना यथेच्छ वागूं देऊन मागाहून त्यांच्या कृत्यांचें कसेंबसें समर्थन करणें एवढीच काय ती लान्सडौनसाहेबांनीं गेल्या पांच वर्षांस कामगिरी बजावलेली दिसते. कर्णधार कमजोर

असला कीं, तारूं डळमळूं लागतें तशासारखी हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची अलीकडे स्थिति झाली होती तिला कारण लॉर्ड लान्सडौनच असें कोण म्हणणार नाहीं ? मूठभर गोऱ्या कामदारांनीं कोल्हेकुई करतांच हिंदुस्थानच्या दरिद्री प्रजेवर कोटी दीड कोटीचा बोजा येऊन पडावा ही गोष्ट दुसऱ्या कोणत्याहि व्हाइसरायाच्या कारकीर्दीत शक्य झाली नसती. एक वेळ लिटनसारखे अधिपति पुरवतील; कारण त्यांच्या एकट्याच्याच स्वेच्छवृत्तीनें लोकांवर जुलूम होईल तेवढाच सोसावा लागतो पण लॉर्ड लान्सडौनसारखे शून्याकृति व्हाइसराय आले कीं एकाऐवजीं पांच पन्नास निरर्गल यजमान आमच्या डोक्यावर बसतात आणि त्यांचा प्रभाव मात्र लोकांना दुःसह होतो. एवढ्याचकरितां आम्हीं लान्सडौन-साहेबांस लिटनपेक्षां निराळ्या वर्गांत घातलें.

लॉर्ड लान्सडौन हे एक अत्यंत निरुपद्रवी प्राणी आहेत अशीच आमची आजपर्यंत समजून होती. पण आपल्या कारकिर्दीचा शेवट आला असें पाहून गेल्या आठवड्यांत जातां जातां त्यांनीं आपल्या वरिष्ठांवर, व इतके दिवस ज्यांची भाकर खाल्ली त्या हिंदुस्थानच्या लोकांवर ज्या लाथा झाडल्या आहेत त्यावरून दीर्घद्वेष, हेकटपणा व क्षुद्रबुद्धि यांचा बराच वांटा परमेश्वरानें साहेब-मजकुरांच्या अंगीं ठेवला आहे असें स्पष्ट दिसून येतें. आतां प्रगट झालेले हे गुण पांच वर्षेंपर्यंत कसे झांकून राहिंले हें आश्चर्य आहे खरें; पण कर्तृत्वशक्तीचा पूर्ण अभाव हेंच बहुधा नैसर्गिकवृत्तीप्रमाणें लान्सडौन साहेबांच्या हातून आचरण न घडण्यास कारण झालें असावें. कसेंहि असो, जातां जातां तरी साहेबमहसुफांनीं लोकांस निजरूप दाखविलें व आजपर्यंत त्यांजविषयीं जो थोडासा आदर वाटत होता तोहि घालविला हा एकाअर्थीं आमच्यावर त्यांचा उपकारच आहे.

लान्सडौन साहेबांस मानपत्र देण्यासंबंधानें कलकत्ता म्युनिसिपालिटींत झालेली वाचाबाची आमच्या वाचकांस माहीत असेलच. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, यांनीं त्याप्रसंगीं दाखविलेलें धैर्य वर्णनीय होतें. त्याचप्रमाणें महामेडन असोसिएशन किंवा चेंबर ऑफ कामर्स खेरीजकरून कोणत्याहि जुन्या व सार्वजनिक सभांनीं त्यांस मानपत्र देण्याचा फार्स केला नाहीं हेंहि चांगलें झालें. खुद्द लान्सडौन साहेबांनीं मुंबईकडे येण्याची तसदी न घेतां परस्पर प्रयाण केलें ह्यांत पुष्कळच दूरदर्शीपणा दाखविला. पण सर्व बारीकसारीक गोष्टींना महत्त्व येण्याला कारण त्यांनीं गेल्या आठवड्यांत चेंबर ऑफ कामर्सच्या भोजनप्रसंगीं केलेलें अजब बाक्पांडित्य होय, यांत बिलकुल शंका नाहीं. सदर्हू भाषणाचें वर्णन करावें तितकें थोडेंच. तें मुळांतच साद्यंत वाचल्याशिवाय त्याचें पूर्ण स्वारस्य कळावयाचें नाहीं, व मराठींत त्याचें भाषांतर किंवा गोषवारा देऊन आम्ही आपल्या पत्राची जागा विटाळवूं इच्छित नाहीं. राज्यकारभाराचें ओझें कमी झाल्यानें एकदम मिळालेलें स्वातंत्र्य, स्वजातीय व समानशील मित्रगणाच्या अहोरूपमहोध्वनिः प्रकारानें उचं-

बळूं लागलेल्या मनोवृत्ति आणि नेहमींच भोजनोत्तर वाढणारें जिव्हालौल्य इत्यादि अनेक कारणें एकत्र झाल्यानें, सदर्हू प्रसंगीं लान्सडौन साहेबांचा वाक्प्रवाह अबाधित चालूं लागला यांत फारसें नवल नाहीं. काबूलच्या अमिराशीं अलौकिक शिष्टाईबद्दल साहेबांनीं आपली पाठ थोपटून घेतली, किंवा नवीन कायदेकौन्सिलाच्या कायद्यांचें सर्व श्रेय आपणच बळकावलें या गोष्टी स्वाभाविक होत्या. तसेंच राष्ट्रीय सभा, दादाभाई नवरोजी, सिव्हिल सर्व्हिसचा ठराव पार्लमेंटांत पास करविणारे मि० पाल वगैरे तमाम नेटिव्हांच्या हितचिंतकांवर त्यांनीं यथेच्छ तोंडमुख घेतलें याचें फारसें आश्चर्य मानावयास नको. कारण असले प्रकार पूर्वीच्या व्हाइसरायांनीं व इतर गोऱ्या अधिकाऱ्यांनींहि पुष्कळदां केले आहेत; पण आपल्या वरिष्ठावर आणि जिची आज्ञा सर्व ब्रिटिश राज्यांत प्रमाणभूत मानली जाते त्या पार्लमेंटसभेवरहि प्रसिद्धपणें तोंड टाकण्याचें लान्सडौन साहेबांच्या पूर्वी कोणत्याहि व्हाइसरायानें धाडस केलें नव्हतें! आम्ही कायते शहाणे व आमच्या कारभारांत पार्लमेंटानेंहि हात घालतां कामा नये ही आंग्लो–इंडियन कामदारांची नेहमींचीच कुरकुर आहे. पण व्हाइसरायसारख्या जबाबदार अधिकाऱ्यानें असले प्रलाप करणें म्हणजे आपल्या अधिकाराला, ब्रिटिश सरकारच्या इभ्रतीस आणि ज्या पार्लमेंटानें आपणास नेमलें तिच्या योग्यतेस बट्टा लावण्यासारखें किंबहुना इंग्रजी राज्यसत्तेविरुद्ध बंड करण्यासारखें आहे. लॉर्ड लान्सडौन आतां अधिकारवियुक्त झाल्यामुळें आपल्या निरर्गल प्रलापांबद्दल जबाब देण्याची त्यांना पाळी येणार नाहीं हें खरें; तथापि त्यांचें हें वाक्पांडित्य विलायतेपर्यंत पोंचून तेथील लोकांस आपण नेमलेल्या राज्ञी–प्रतिनिधीच्या शहाणपणाची पूर्ण ओळख पटेल यांत संशय नाहीं. वस्तुतः पाहतां पार्लमेंट सभेस शिव्या दिल्यानें हिंदुस्थानसरकारास जास्त स्वातंत्र्य मिळेल हें मुळींच संभवत नाहीं. कंपनी सरकारचा अधिकार काढून पार्लमेंटसभेनें राणीकडे १८५८ सालीं दिला. तेव्हांहि सभेविरुद्ध अशीच कोल्हेकुई चालविली होती. पण अशा कोल्हेकुईनें पार्लमेंटसभेची सत्ता कमी होण्यापेक्षां उलट ती वळावत जाण्याचाच जास्त संभव आहे. हिंदुस्थानचें राज्य जर सनदी नोकरांच्या सल्ल्यानेंच चालवावयाचें तर मग सेक्रेटरी ऑफ् स्टेट व पार्लमेंट हवी तरी कशाला? लॉर्ड लान्सडौन यांचा कटाक्ष सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दोन ठिकाणीं घेण्याचें सभेनें ठरविलें यावरच होता. पण त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें कीं, अशानें पार्लमेंटसभा भ्यावयाची नाहीं. राज्यकारभार कोणत्या धोरणानें चालवावयाचा हें ठरविणें पार्लमेंटसभेचें काम आहे; व त्या धोरणावर ज्यास कारभार चालवावयाचा नसेल त्यानें–मग तो व्हाइसराय असो किंवा कारकून असो–आपल्या जाग्याचा राजीनामा देऊन मग काय बोलणें असेल तें खुशाल बडबडत बसावें. सभेची त्यास कोणतीहि हरकत नाहीं. सभेंत लॉर्ड लान्सडौन यांच्या योग्यतेचे

किंवहुना त्यांच्याहून हुषार असे शेंकडों मुत्सद्दी आहेत. व आपल्या मनाप्रमाणें त्यांनीं आपणांस वागूं दिलें नाहीं म्हणून त्यांच्यावर तोंड सोडणें हें आमच्या मतें असभ्यतेचें व अराजनिष्ठपणाचें लक्षण होय; व खुद्द व्हाइसराय साहेबांनींच या दोन गोष्टींचा धडा लोकांस घालून द्यावा हें आमचें मोठेंच दुर्दैव समजलें पाहिजे. असो. लान्सडौनसाहेबाचा हा शेवटचा निरोप आहे, तेव्हां त्यांना निरर्थक दोष देत न बसतां त्यांचीं आमच्याविषयीं अतोनात कळकळ व अनुभव इतःपर आम्हांस बाधक न होवो एवढीच आशा करून आज आम्हीहि त्यांची रजा घेतों.

* * *

* मुसलमानांच्या उद्धारार्थ नवा अवतार !

राष्ट्रीयसभा लाहोरास भरली त्यावेळीं अल्लीगड येथें मुसलमानांची जी विद्यापरिषद भरली होती त्याची थोडीशी हकीगत मागें आम्हीं दिलीच आहे. आज त्याच परिषदेच्या अंगभूत म्हणून जी दुसरी एक सभा स्थापन झाली आहे तिच्या प्राणप्रतिष्ठेच्या वेळीं अल्लीगड येथील सर सय्यद अहंमद यांनीं स्थापिलेल्या मुसलमानी कॉलेजाचे प्रिन्सिपाल मि. बेक यांनीं जें भाषण केलें त्याचा सारांश देण्याचा आमचा विचार आहे. हिंदुलोक मुसलमानांशीं नीट वागत नाहींत इत्यादि प्रकारचे त्यांजवर आरोप करणारे व वर्तमानपत्रकारांनीं अमक्या तऱ्हेनें लिहावें असा त्यांस उपदेश करणारे दिवाण बहादुर काजी शहाबुद्दीन मुसलमानाच्या उद्धारार्थ अवतीर्ण झालेल्या या युरोपियन गृहस्थाचे उद्गार ऐकण्यास अल्लीगड येथें हजर नव्हते हें एक आमचें मोठें दुर्दैवच समजलें पाहिजे. तथापि या दिवाणबहादुरांची उणीव सर सय्यद अहंमद, नबाब मेहदीअल्ली ऊर्फ मोशीन उल्मुलुख वगैरे बड्याबड्या मुसलमान अधिकाऱ्यांनीं भरून काढिली होती. तेव्हां बेकसाहेबांनीं केलेलें भाषण बऱ्याच मोठमोठ्या मुसलमानांस पसंत असावें, किंवहुना त्यांस पसंत होतें म्हणूनच असें घाणेरडें आणि उद्दाम व्याख्यान देण्यास बेकसाहेब धजावले असें म्हणण्यास आम्हांस कोणतीहि हरकत दिसत नाहीं. मुसलमान लोक विद्येंत मागसलेले आहेत म्हणून त्यांस विद्या देण्यासाठीं होईल तितकी खटपट करणें हें सरकारचें, मुसलमानांचें आणि इतर लोकांचेंहि कर्तव्य आहे; परंतु मुसलमानांस विद्या देण्याच्या मिषानें जर कोणी त्यांच्या मनांत हिंदूबद्दल द्वेषभाव उत्पन्न करून देईल तर तो इंग्रजी राज्याचा व हिंदुस्थानांतील लोकांचा पुरा शत्रु आहे असें म्हणण्यास आम्हांस बिलकुल शंका

---

* [केसरीः—ता. ६ फेब्रुवारी १८९४]

वाटत नाहीं. मि. बेक यांची गणना त्यांच्या व्याख्यानावरून याच वर्गांत करावी लागते. मुसलमानी कॉलेजाचे हे प्रिन्सिपाल आहेत, व त्या नात्यानें भावी मुसलमान विद्वानांवर त्यांच्या बोलण्याचा वाईट परिणाम होण्याचा संभव आहे म्हणूनच आम्ही त्यांच्या भाषणास इतकें महत्त्व देतों. नाहींपेक्षां मि० बेक यांची वेड्यांत गणना करून आम्ही स्वस्थ राहिलों असतों.

राष्ट्रीयसभेस शिव्या द्याव्या, हिंदु लोकांशीं मिसळूं नये आणि इंग्रजांची कांस बळकट धरावी हीं तीन मि० बेक यांनीं उपदेशिलेल्या धर्माचीं मुख्य तत्त्वें होत. इंग्रज लोकांस हिंदुस्थानांतून हांकून देण्याकरितां राष्ट्रीयसभा स्थापन झाली आहे व मुसलमानांस चिडविण्याकरितां आणि इंग्रजलोकांचें व मुसलमान लोकांचें अन्न तोडण्याकरितां गोरक्षणाची चळवळ हिंदूंनीं चालविली आहे असेंहि या राजेश्रींनीं सभेंत जमलेल्या लहानथोर मुसलमानांस स्पष्टपणें सांगितलें आहे. इतकेंच नव्हे तर मुंबईचा दंगा हिंदुलोक हल्लीं जी राजकीय हक्क मिळविण्याकरितां चळवळ करीत आहेत त्या चळवळीचा अप्रत्यक्षच परिणाम होय व राष्ट्रीयसभेच्या चळवळीनें पुढें मागें असेच दंगे होतील असेंहि ह्या साहेबांनीं भाकीत केलें आहे ! अलीगड येथें जमलेले मुसलमान गृहस्थ अशा प्रकारचें बेकसाहेबांचें भाषण स्तब्धपणें ऐकून घेण्याइतकें वेडेपीर असतील असें आम्हांस आजपर्यंत वाटत नव्हतें. दंग्याचीं कारणें सांपडणें अशक्य आहे व तीं शोधून काढण्याचा प्रयत्न करणें निरर्थक होईल असा जो मुंबईसरकारानें आपल्या ठरावांत शेरा दिला आहे त्यापूर्वी अलीगड येथील मुसलमानांच्या उद्धारार्थ निपजलेल्या या नव्या पिराचें भाकीत व सिद्धांत त्यांच्या कानीं पडले नसावे असें आम्हांस वाटतें. एरव्हीं व्हिन्सेंटसाहेबांच्याऐवजीं बेकसाहेबांची मुंबईच्या पोलिस कमिशनरच्या जागीं त्यांनीं खास योजना केली असती !

हिंदुलोकांनीं हल्लीं ज्या चळवळी चालविल्या आहेत त्यांमुळें सर्व राज्यसत्ता त्यांच्या हातांत जाईल आणि मुसलमानांस कोणीहि विचारणार नाहीं असा बेकसाहेबांच्या मनाचा ग्रह झाला आहे. निदान आपल्या मुसलमान श्रोत्यांचा तरी तसा ग्रह व्हावा अशी त्यांची इच्छा आहे असें त्यांच्या भाषणावरून दिसून येतें; व हें संकट टाळण्यासाठीं मुसलमान व इंग्रज यांनीं मिळून एक सभा स्थापन करावी व संयुक्त सभेनें मुसलमानांचे हक्क सुरक्षित ठेवून इंग्रजी राज्याचा पाया बळकट करण्यास झटावें अशी बेकसाहेबांची सूचना होती. हिंदुलोकांच्या चळवळीचा प्रतिकार हा केलाच पाहिजे; परंतु तो कसा करावा याबद्दल बेकसाहेबांनीं चार उपाय सुचवून अखेरीस मुसलमान–इंग्रजांची सभा स्थापावी हाच उपाय सर्वांशीं निर्दोष व हितकारक आहे असें आपल्या मतांनीं सिद्ध केलें. ते म्हणाले कीं, हिंदुलोक ज्या चळवळी करीत आहेत त्या सर्व राजद्रोही असल्यामुळें मुसलमानलोकांस त्यांत शिरतां येत नाहीं. हिंदुलोकांप्रमाणें मुसलमानांनींहि

चळवळ करावी हा दुसरा उपाय होय. पण एकदां चळवळ सुरू झाली असतां तिचा मुख्यत्वेंकरून मुसलमानलोकांवर काय परिणाम होईल याचा साहेबबहादुरांस नीटसा अदमास लागत नसल्यामुळें त्यांनीं आपल्या श्रोत्यांस हा मार्ग सोडून देण्यास सांगितलें. न जाणो आपण करावयास जावें एक आणि होईल तिसरेंच. मुसलमानलोकांस चळवळ करावयास शिकविली तर ते पुढेंमागें कदाचित् हिंदूसहि जाऊन मिळतील व तसें झालें म्हणजे हिंदुस्थानांतील इंग्रजलोकांची सत्ता नाहींशी होईल आणि त्यावरोबरच बेकसाहेबांस आपला गाशा गुंडाळून विलायतेस जावें लागेल अशी बेकसाहेबांस भीति पडली असावी. कसेंहि असो. राष्ट्रीयसभेसारख्या संस्थांस तुम्ही जाऊन मिळूं नका. इतकेंच नव्हे तर सदर सभेसारख्या मुसलमानी संस्थाहि काढूं नका असा त्यांनीं आपल्या भाविक शिष्यांस स्पष्ट उपदेश केला. राष्ट्रीयसभेस मिळूं नका आणि सदर सभेसारख्या सभाहि काढूं नका तर करा तरी काय असा सहजच एक प्रश्न उत्पन्न होतो. बेकसाहेबांनीं ह्या प्रश्नास असें उत्तर दिलें आहे कीं, एक लहानशी सभा काढून युरोपियन लोकांच्या मदतीनें आणि सल्ल्यानें मुसलमान लोकांचे हक्क सरकारापुढें मांडा, व हिंदुविरुद्ध सरकारास लागेल तेवढी मदत करा म्हणजे झालें. या सभेची रचना व नियम कसे असावे याचा विचार बेकसाहेबांनीं आपल्या भाषणांत केला नाहीं. हें काम कमिटीकडे सोंपवावें अशी त्यांची सूचना होती व त्याप्रमाणें एक कमिटीहि नेमण्यांत आली आहे. मुसलमान-इंग्रजांची एक छोटीशी सभा करून सदर सभेनें हिंदुलोकांच्या चळवळी होईल तितक्या बंद करण्यास झटावें एवढाच बेकसाहेबांच्या बोलण्याचा आशय होता व एवढ्याच• करितां विद्या परिषदेच्या वेळीं त्यांनीं हें भाषण केलें असावें.

असो. बेकसाहेबांनीं असें कां भाषण केलें याची मिमांसा करीत बसण्यापेक्षां त्यांच्या भाषणांत सत्याचा, सौजन्याचा आणि राजनिष्ठतेचा किती भाग आहे एवढेंच आपण तूर्त पाहूं. राष्ट्रीयसभा इंग्रज लोकांस हांकून देण्यास आणि गोरक्षण सभा मुसलमान लोकांस उपाशीं मारण्यास स्थापन झाल्या आहेत असें म्हणण्याचें धाष्टर्य कोणाहि नेटिव्ह गृहस्थास झालें असतें कीं नाहीं याचा आम्हांस वानवाच आहे. बेकसाहेबांस हीं दोन तत्त्वें कोठें सापडलीं असतील तीं असोत. परंतु मोठमोठे मुसलमान लोकहि हीं तत्त्वें मुकाट्यानें ऐकून घेतात, तर इंग्रजी अधिकारी हिंदुस्थानांतील रहिवाशांत दुफळी माजवून आपलें राज्य चालवितात व ते स्वतःच गोभक्षक असल्यामुळें मुसलमान लोकांची ते तरफदारी करतात असले आरोप कोणाहि हिंदूनें सरकाराविरुद्ध केल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. बेकसाहेबांचें मत मुसलमानांनीं विद्याभ्यास करावा असें आहे यांतच आम्हांस संतोष आहे. कारण इंग्रजी विद्येचें व इतिहासाचें ज्यानें परिशीलन केलें आहे त्यास इंग्रज लोक मुसलमानांस अगर हिंदूंस अखेरीस सारखेच गणून दोघांपैकीं

कोणासहि भांडल्याखेरीज मुळींच हक्क देणार नाहींत असें आज नाहीं तर उद्यां उघड कळून येईल. राज्यकर्ते आणि प्रजा हा मुख्य भेद आहे, व त्याच्यापुढें हिंदुमुसलमानादि सर्व भेद रद्द होत. आज मुसलमान लोकांवर कांहीं इंग्रज फिदा होत असतील पण इंग्रज लोकांचा हा अनुग्रह अगदीं कावेबाजीपणाचा आहे हें धूर्त मुसलमानांच्या कधींहि लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. राष्ट्रीय-सभेस हल्लीं जे कित्येक मुसलमान सद्गृहस्थ येतात त्यांनीं हा उदेश लक्षांत आणूनच राष्ट्रीयसभेस मदत करण्याचें व्रीद पतकरिलें आहे, व राज्यकर्त्यांकडून जर कांहीं आपलें कल्याण करून घ्यावयाचें असलें तर तें हिंदुमुसलमानांच्या एकोप्याखेरीज कधींहि व्हावयाचें नाहीं, असा त्यांच्या मनाचा ग्रह झालेला आहे. बेकसाहेबांनीं कितीहि ओरड केली तरी भावी सुशिक्षित मुसलमानांचा असा ग्रह झाल्यावांचून कदापिहि राहणार नाहीं. राष्ट्रीयसभा कोणत्याहि विशिष्ट जाती-करितां नसून ती ज्या हक्कांकरितां भांडत आहे ते मुसलमानांस व हिंदूंस सार-खेस मिळावयाचे आहेत. राष्ट्रीयसभेस शिव्या देतांना सदर सभेच्या उद्योगामुळें प्राप्त झालेले हक्क मुसलमानलोकांनीं घेऊं नयेत असा जर बेकसाहेबांनीं आपल्या श्रोत्यांस उपदेश केला असता तर आपल्याच समजुतीप्रमाणेंच कां होईना पण सद्बुद्धीनें तरी हे साहेब उपदेश करीत आहेत असें आम्हीं म्हटलें असतें, पण सध्यांच्या त्यांच्या भाषणावरून हिंदुस्थानांत कज्जे लावण्यांत व राणीच्या प्रजेमध्यें असंतोष व वैमनस्य उत्पन्न करून राजद्रोह संपादन करण्यास बेकसाहेबांचा अव-तार येयें झाला आहे असें आम्हांस म्हणावें लागतें; व साहेब बहादुरांच्या ह्या उपदेशाचें खरें स्वरूप आमचे मुसलमानबंधूहि लवकरच ओळखल्याखेरीज राह-णार नाहींत अशी आमची उमेद आहे.

❖ ❖ ❖

* येवल्याच्या दंग्याचा पुनः उद्भव

दुसरीकडे आमच्या एका येवले येथील "परिचित" बातमीदाराचें पत्र छापिलें आहे. त्यावरून गेल्या मंगळवारीं येवल्यास जी भयंकर गर्दी झाली, आगी लागल्या व खून पडले त्यांची सविस्तर हकीकत वाचकांस कळून येईलच, त्याची पुनरुक्ति येथें करण्याची जरूरी नाहीं. आमच्या बातमीदारांनीं दिलेल्या सर्व गोष्टी पुऱ्या व प्रत्यक्ष माहितीवरून दिल्या आहेत, व मुंबईतील टाइम्स-पत्रकारांच्या मुद्दाम पाठविलेल्या बातमीदारानें त्या बहुतेक सर्व गोष्टी, त्यानें धाडलेल्या शेवटच्या पत्रांत कबूल केल्या आहेत. येवलें येथें हा दंगा आज नव्या-

* [केसरीः—ता. १३ फेब्रुवारी १८९४]

नेंच उपस्थित झाला असें नाहीं. गेल्या सप्टंबर महिन्यापासून म्हणजे मुंबईचा दंगा झाल्यापासून सुमारें एक महिना गेल्यावर गणेशचतुर्थींच्या वेळीं तेथील हिंदुमुसलमानांमध्यें वैमनस्य पडण्यास कारण झालें. यासंबंधाची सर्व हकीकत मागें आम्हीं दिलीच आहे. तथापि आज पुनः एवढें सांगणें जरूर आहे कीं, गणेशचतुर्थींच्या दिवशीं व पुढें बालाजीची पालखी निघाली त्यावेळीं मुसलमान लोकांनीं जरी पुष्कळ उद्धटपणा केला होता तरी हिंदुलोकांनीं कोणत्याहि प्रकारें गैरशिस्त वर्तन अगर आगळीक केली नाहीं. कलेक्टरसाहेब आणि इंजग्रसरकार आपले मामूल हक्क आपणांस पूर्णपणें बजावूं देण्याची तजवीज करितील असा त्यांचा पक्का भरंवसा होता व या भरंवशावरच त्यांनीं आजपर्यंत दम खाल्ला. गणेशचतुर्थी गेली, दसरा गेला, विठोबाची पालखी झाली, तरीहि त्यांची कोंणी दाद घेईना ! उलट दरखेपेस सरकारी अधिकारी उत्तरोत्तर मुसलमानांचा पक्ष घेऊन हिंदूंचे हक्क बुडवूं लागले. गणेशचतुर्थींच्या दिवशीं हिंदु लोकांस आपले गणपती निराळ्या रस्त्यानें आणावे लागले; बालाजीची पालखी घड्याळा-सकट मशिदीवरून वाजत जाण्याचा हुकूम झाला असतांहि तो हुकूम मुसलमान-लोकांनीं दंगा केल्यामुळें असिस्टंट कलेक्टर यांनीं परत घेतला; आणि ता० २० नोव्हेंबर रोजीं विठोबाची पालखी निघावयाची ती मुळींच काढूं दिली नाहीं ! सारांश, दर वेळेस हिंदु लोकांचे हक्कांवरच अधिकाधिक घाड येऊं लागली व अधिकारी लोकांच्या पक्षपाती व पोंचट वर्तनामुळें मुसलमान लोक शेफारून जाऊन त्यांनीं हिंदूंस एकसारखा त्रास देण्याची सुरुवात केली. आज राघोजी बोवाची समाध भ्रष्ट कर, उद्यां अमका एक मारुती उपटून टाक, परवां अमुक एक नाटकगृह जाळून फस्त कर, असा त्यांचा उद्दामक्रम सुरू झाला, व तो आज दोन तीन महिने चालू आहे. इतकेंहि झालें तरी हिंदु लोकांनीं गैरकायदा वर्तन न करण्याचा आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. सरकारी अधिकारी जर आपणांस योग्य मदत करीत नाहींत, तर त्यांच्यावर सरकाराकडे अपील करून दाद मागावी व तोंपर्यंत शेफारलेल्या मुसलमान लोकांशीं देण्याघेण्याचा व्यवहार बंद करावा, असा त्यांनीं कायदेशीर व शहाणपणाचा ठराव केला, व एकदोनदां हा तंटा मिटविण्याकरितां बोलणेंचालणेंहि सुरू केलें. पण ह्या सर्व खटपटीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मुसलमान लोक जे चढून गेले होते ते कांहीं केल्या ऐकेनात. मध्यभागचे कमिशनर मि. फ्लीट हे मागें येवल्यास गेले होते तेव्हां मुसलमान लोकांचा नाठाळपणा व दांडगाई त्यांच्याहि पूर्ण लक्षांत आली होती. पण हिंदु लोकांस कायदेशीरहि मदत करावयाची नाहीं असा अधिकाऱ्यांचा समज असल्यामुळें मुसलमान लोकांचा दुराग्रह नजरेस आला होता तरीहि फ्लीट साहेबांनीं त्यांस ताळ्यावर आणण्याचा कांहीं उपाय केला नाहीं. भित्रे मामलेदार मिशनरी लोकांप्रमाणें हलक्या हिंदूंची व अडाणी मुसलमानांची कींव बाळगणारे

कलेक्टर, मुसलमान पोलीस इन्स्पेक्टर, आणि प्राचीन शोधांत गुंतलेले कमिशनर इतके सर्व एकत्र मिळाल्यावर मग काय विचारावयाचें? हिंदूंची कोणीहि दाद घेईना, नेटिव्ह वर्तमानपत्रांतून आरडाओरड केली व खुद्द टाइम्सपत्रकारानेंहि येवलें येथील अधिकाऱ्यांचें वर्तन दूषणार्ह आहे असें लिहिलें तथापि हिंदुलोकांवर होत असलेल्या जुलमाची वार्ता लॉर्ड हारिस अगर त्यांचे कौन्सिलर यांच्या गावींहि असल्याचें आढळून येईना ! येवल्याच्या लोकांनीं कलेक्टर व सरकार यांजकडे आजपर्यंत अनेक तारा व अर्ज केले असतील; पण ही बडी मंडळी इतकी खमंग झाली होती कीं, नाशिकचे कलेक्टर मि. वुइंटर यांनीं तारेच्या पाठीवर " तारेस अर्जाचें टिकीट नाहीं, सबब परत " असा स्वदस्तुरचा इंग्रजी शेरा लिहून ती परत पाठविलेली आम्हीं स्वतः पाहिली आहे !! तारेस आणि विशेषतः करून सार्वजानिक कामासंबंधें कलेक्टरसाहेबांस पाठविलेल्या तारेस कोर्टफीचें तिकीट लागतें असा मूर्खपणाचा हूकूम देणारे वुइंटरसाहेबांखेरीज दुसरे कोणतेहि अधिकारी हिंदुस्थानांत अगर दुसऱ्या कोणत्याहि देशांत सांपडतील असें आम्हांस वाटत नाहीं. तारेस तिकीट तरी कसें लावावयाचें हें आम्हांस कळत नाहीं. तारेंतून कोर्टफीचें तिकीट पाठविण्याची अजब युक्ति वुइंटरसाहेबांस माहीत असल्यास ती त्यांनीं मेहेरबानी करून प्रसिद्ध करावी म्हणजे लवकरच त्यांस आम्ही फोनोग्राफ शोधून काढलेल्या एडिसनच्या पंक्तीस बसवूं. येवलें येथील लोकांनीं या सर्व गोष्टी सरकारच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न केला होता, पण लॉर्ड हारिस यांच्या कारकीर्दीत नेटिव्हलोकांच्या पुढाऱ्यांचें म्हणणें ऐकून घेण्याची वहिवाट नसल्यामुळें कलेक्टर व कमिशनर यांच्या रिपोर्टापलीकडे सरकारास कांहींच दिसत नव्हतें, व चार महिने येवल्यास हा दंगा धुमसत असतां गव्हर्नर, कौन्सिलर, सेकेटरी सर्व जणू काय झोंप घेत पडले होते ! अशा रीतीनें चोहोंकडे बेदाद झाल्यावर आपलें संरक्षण आतां आपणांसच केलें पाहिजे अशी हिंदुलोकांची समजूत झाली असल्यास त्यांत आश्चर्य तरी काय ? येवलें येथील हिंदुलोक तेथील मुसलमानांपेक्षां कांहीं कमी बळवान आहेत असें नाहीं. आजपर्यंत मुसलमानांची आगळीक, दांडगाई व अन्याय जीं त्यांनीं सहन करून घेतलीं व घेत होते ती फक्त सरकार न्याय करील ह्या आशेवरच घेत होते. ती आशा संपली तेव्हां अर्थातच आत्मसंरक्षणार्थ अखेरच्या प्रसंगीं त्यांस हातांत काठ्या घेणें भाग पडलें. आपण होऊन स्वतः या कृत्यास त्यांनीं कधींहि आरंभ केला नाहीं. इतक्या आगळिकी झाल्या, सरकार दाद घेतनासें झालें तरीहि गेल्या मंगळवारपर्यंत त्यांनीं कांहीं एक केलें नव्हतें. रविवारीं म्हणजे दंगा होण्याच्या पूर्वीं दोन दिवस मुसलमान लोकांनीं नागपुरी कोष्टयांच्या मारुतीच्या देवळासमोर पाल लावलें होतें तें जाळून टाकिलें, व मारुती फोडून छिन्नभिन्न केला, त्यामुळें अखेर नागपुरी कोष्टी लोक थोडेसे चवताळून गेले होते; तथापि

मंगळवारीं मशिदींत डुक्कर कापल्याची हूल उठवून मुसलमानलोक अंगावर चालून येईपर्यंत हिंदुलोक मारामारी करण्यास प्रवृत्त झाले नव्हते. " डुक्कर मारल्याची हूल " असें म्हणण्याचें कारण येवढेंच कीं, आमच्या बातमीदाराच्या पत्राप्रमाणें मुसलमानांनीं गाई मारल्याचा जसा मुद्दा सांपडतो तसा डुक्कर मारल्याचा मुद्दा अगर पत्ता कलेक्टरसाहेबांच्या दृष्टीस पडला नाहीं. पण आपण असेंहि कबूल केलें कीं, हा डुक्कर मशिदींत मारला होता, व पुरावा असो वा नसो असें समजूं कीं, तो हिंदूंनीं मारला तथापि त्याच्यापूर्वी दोन दिवस म्हणजे रविवारीं रात्रीं मुसलमानलोकांनीं मारुतीपुढील मंडपास आग लाविली होती व मारुतीची मूर्ती फोडून टाकिली होती ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे. यावरून हल्लीं हिंदूंनींच दंग्यास पुनः सुरुवात केली असें म्हणणें किती अन्यायाचें, व पक्षपातीपणाचें आणि खोडसाळ आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. येवल्याच्या हिंदूंनीं आजपर्यंत जी शांतता दाखविली व गय खाल्ली तसें वर्तन इतर कोणच्याहि ठिकाणच्या लोकांनीं केलें असतें असें आम्हांस वाटत नाहीं इतकें असूनहि पुनः हिंदूवरच दंगा उपस्थित केल्याचा दोष येऊन त्यांजवर प्युनिटिव्ह पोलिसचा खर्च लादला जावा हें आमच्या मतें लार्ड हारिस यांच्या कारकीर्दीस, किंबहुना इंग्रजसरकारच्या न्यायी राज्यास काळिमा आणण्यासारखें कृत्य आहे.


नगराहून गेलेल्या लष्करी लोकांच्या साहाय्यानें मि० वुइंटर आणि मि. फ्लिट-यांनीं लवकरच दंगा बंद करून येवल्यास शांतता आणिली हें पाहून आम्हांस फार आनंद होतो; परंतु तेवढ्यानेंच या प्रश्नाचा अखेरचा निकाल झाला असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्रजसरकार येवल्यासारख्या यःकश्चित् ठिकाणचा दंगा मोडण्यास असमर्थ आहे असें कोणाच्या स्वप्नींहि येणार नाहीं. हे दंगे इंग्रजसरकारची सत्ता कमी करण्याकरितां अगर इंग्रजी राज्याची मजबुती किती आहे हें पाहण्याकरितां होतात असें जर कोणास वाटत असेल तर ही त्याची समजूत अगदीं मूर्खपणाची आहे. हे दंगे इंग्रजसरकारच्या विरुद्ध होतात असें मानण्यास काडीचाहि पुरावा अगर कारण आढळून येणार नाहीं, त्याचप्रमाणें असल्या दंग्याबद्दल नेटिव्ह वर्तमानपत्रांतून जे कित्येक वेळां कडक लेख येतात त्यांचीहि स्थिति होय. हिंदुमुसलमानांमधील दंगे मिटून दोघांनीं सलोख्यानें वागावें हें इंग्रजसरकारास जितकें इष्ट आहे तितकें आम्हांसहि आहे; व आम्ही यासंबंधानें ज्या ज्या कांहीं सूचना करितों त्या खरी माहिती सरकारास मिळून त्याप्रमाणें त्याना आपला वर्तनक्रम सुधारतां यावा येवढ्याच करितां केलेल्या असतात. हिंदुमुसलमानांतील तंट्याचें खरें बीज निदान आमच्या मुंबईसरकारच्या तरी अद्याप लक्षांत आलें आहे असें आम्हांस वाटत नाहीं; आणि जोंपर्यंत हें बीज त्यांच्या लक्षांत आलें नाहीं, व जोंपर्यंत आपल्या ऑफिसरवर्गाच्या रिपोर्टांपलीकडे जाऊन लोकांपासून खरें तत्त्व समजून घेण्याचा उद्योग करण्यास लॉर्ड रेप्रमाणें लॉर्ड

हारिस तयार नाहींत तोंपर्यंत अधिकारी यांच्या हातून येवल्यास जसा चुका होत आहेत तशा चुका नेहमीं होत जातील आणि त्या सर्वांचें अपश्रय लॅर्ड हारिस यांच्या माथीं बसेल यांत आम्हांस कांहीं संशय वाटत नाहीं. मुंबईच्या दंग्याचीं कारणें शोधून काढण्याची अथवा ज्यांनीं तो मूळ उपस्थित केला त्यांचा शोध लावून त्यांस शिक्षा देण्याची मुंबईसरकारानें जी हयगय करूं दिली व केवळ सामोपचाराच्या गोष्टी सांगून हिंदुमुसलमानांचें सख्य जोडण्याचा प्रयत्न केला त्याचेंच फल आज येवल्यास दृष्टीस पडत आहे. लॉर्ड हारीस यांस आमचें आग्रहपूर्वक असें सुचविणें आहे कीं, हिंदुमुसलमान यांचा तंटा मिटविण्याची जी त्यांनीं युक्ति काढिली आहे ती अगदीं निरुपयोगी आहे. हिंदु आणि मुसलमान या दोन्ही लोकांच्या धर्मांमध्यें आचारांत आणि विचारांत जें अंतर आहे तें अजीबात नाहींसें होऊन दोन्ही लोक एकविचाराचे आणि एकदिलाचे होण्यास किती शतकें लागतील किंबहुना होतील कीं नाहीं हेंहि आज सांगतां येत नाहीं. आमच्यापैकीं कांहीं मंडळी अशी आहे कीं, मुसलमानांनीं कांहींहि आगळिकी केल्या तरी भावी परिणामावर नजर ठेवून बंधुत्वाच्या नात्यानें आम्हीं त्यांस आलिंगन द्यावें, आणि क्षमा व शांति हे ब्रह्मगुणप्रकट करावे असें ते प्रतिपादन करीत असतात. आजची स्थिति लक्षांत आणितां हा पक्ष आम्हांस बिलकुल मान्य नाहीं, इतकेंच नाहीं तर सरकारानेंहि तो मान्य करितां कामा नये अशी आमची समजूत आहे. हिंदुस्थानांतील प्रजेचे सामान्य हक्क संपादन करण्याकरितां जरी आम्ही एक झालों व होऊं, तरी धर्माचा, खाण्यापिण्याचा, आणि आचार-विचाराचा हिंदुमुसलमान यांच्यांत जो भेद आहे तो कित्येक शतकें तरी कायम राहील या समजुतीवरच सरकारानें व आम्हीं त्याची योग्य व्यवस्था लाविली पाहिजे. आणि ती व्यवस्था म्हटली म्हणजे लॉर्ड लॅन्सडौन यांनीं आग्रा येथें सांगितल्याप्रमाणें अथवा १८५८ सालच्या राणीसरकारच्या जाहिरनाम्याप्रमाणें निरनिराळ्या जातींस आपापल्या चालीरीति, एकमेकांस त्रास अगर उपसर्ग न लावतां, पाळूं देण्याची सवलत देणें हीच होय. हिंदु-मुसलमान यांच्या चाली-रीति जर भिन्न असल्या तर हल्लींच्या कायद्याप्रमाणें परस्परांचें व्यक्तिस्वातंत्र्य कायम राहण्यास परस्परांस जितका प्रतिबंध करणें जरूर असेल तितका करून एकमेकांचे हक्क बजावण्यास मॅजिस्ट्रेट किंवा सरकारचे इतर अधिकारी यांनीं कायद्याप्रमाणें योग्य मदत दिली पाहिजे. हिंदुस्थानासारख्या, म्हणजे ज्या देशांत भिन्न भिन्न जातीचे लोक एकाच अधिकाऱ्याच्या अमलाखालीं असतात तेथल्या अंमलदारांस असल्या कामीं मोठ्या दक्षतेनें आणि शहाणपणानें वागलें पाहिजे. मुसलमान लोक अडाणी आहेत अगर हिंदुलोकांच्या समजुती साहेबलोकांच्या मताप्रमाणें वेडगळपणाच्या आहेत अशा सबबीवर कोणाहि अधिकाऱ्यानें हिंदूंचा अगर मुसलमानांचा पक्ष स्वीकारल्यास त्यापासून भयंकर अनर्थ होतात हें

येवल्यास या आठवड्यांत घडलेल्या प्रकारावरून उघड सिद्ध होतें, व अद्याप तरी अशा तऱ्हेचा पक्षपात, हलगर्जीपणा अगर भित्रेपणा सरकारच्या अधिकाऱ्यांच्या हातून होणार नाहीं याजविषयीं मुंबईसरकारनें योग्य खबरदारी घ्यावी अशी त्यांस आमची विनंति आहे. हिंदु मुसलमानांमधील दंगे कसे उद्भवतात यांचें येवल्याचा दंगा हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ज्या ठिकाणीं दंगा होतो त्या ठिकाणचे पोलिस अधिकारी अगर मॅजिस्ट्रेट आपल्यावरचा दोष टळण्यासाठीं गोरक्षण, कॉंग्रेस वगैरे कांहीं तरी गोष्टींचा दंग्याशीं बळेंच संबंध जोडून देऊन सरकारच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न करीत असतात. येवल्याच्या दंग्याशीं तसा कोणत्याहि गोष्टीचा संबंध दाखवितां येत नाहीं. खेरीज येवलेकर हिंदूंचे व मुसलमानांचे हक्क, चाली आणि रीति यांबद्दलहि कांहीं संदिग्धपणा राहिला आहे असें नाहीं. हे लोक आज कित्येक वर्षेंपर्यंत आपले सण करीत व मिरवणुकी काढीत आले आहेत. कधीं कधीं त्यांच्यामध्यें मतभेद पडत असे; पण तो मतभेद वहिवाट पाहून मामलेदार अगर पोलिसचे अधिकारी काढून टाकीत आणि त्यांनीं केलेला हुकूम अक्षरशः अमलांत येई, असे सरकारी दप्तरांतच अनेक दाखले आहेत; असें असतां गेल्या चारपांच महिन्यांतच मुसलमानलोकांनीं दांडगाई करण्यास प्रवृत्त व्हावें यांतील बीज काय तें आतां सांगावयास पाहिजे असें नाहीं, आम्ही स्पष्टपणें असें म्हणतों कीं, येवल्याचा दंगा तेथील मामलेदार, पोलिस इन्स्पेक्टर, असिस्टंट कलेक्टर आणि कलेक्टर यांच्या अविचारानें, भित्रेपणानें आणि पक्षपातीपणानें उत्पन्न झाला आहे, व गेल्या आठवड्यांस जे दहा पांच खून झाले त्या सर्वांबद्दल यांसच नीतिदृष्ट्या जबाबदार धरलें पाहिजे. असले अधिकारी इंग्रजसरकारच्या राज्याच्या न्यायीपणाच्या लौकिकास काळिमा आणितात आणि लोकांच्या मनांतील सरकारबद्दलची पूज्यबुद्धी कमी करितात हें राज्याचीं सूत्रें धारण करणाऱ्या लॉर्ड हारीससारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. सरकारानें आपल्या कामगारांस दोष देऊन सहसा परत बोलावूं नये हें तत्त्व आम्हांसहि मान्य आहे; कारण त्यामुळें अधिकाऱ्यांचा बोज रहात नाहीं. पण हें तत्त्व पाळण्याची कांहीं मर्यादा आहे आणि अधिकारी लोकांच्या अविचारामुळें अगर कमकुवतपणामुळें जर दंगे उत्पन्न होऊन खून पडूं लागले तर अधिकाऱ्यांच्या अपराधासाठीं लोकांस फांशीं देण्यापेक्षां असल्या अधिकाऱ्यांची बदली करून त्याच्या जागीं दुसरे योग्य अधिकारी नेमणें हेंच सरकारास अधिक श्रेयस्कर आहे. लॉर्ड हारिस या सर्व गोष्टींचा जर संथपणें विचार करितील तर आम्ही म्हणतों याची सत्यता त्यांच्या नजरेस येईल. येवल्याच्या दंग्याचा सर्व दोष तेथील अधिकारी यांजकडे आहे, व ते अधिकारी हलवल्याखेरीज नुसते प्युनिटिव्ह पोलिस नेमल्यानें हा दंगा कधींहि मोडावयाचा नाहीं. हिंदु आणि मुसलमान या दोघांसहि

समसमान रीतीनें वागविणारे मामलेदार अगर पोलिस इन्स्पेक्टर सरकारी नोकरींत नाहींत असें नाहीं. अशा रीतीचे, पण हल्लींच्यापेक्षां जरा वजनदार आणि हिंमतदार अधिकारी जर येवल्यास पाठविले, व त्यांस कलेक्टरसाहेबांनीं चांगली मदत केली तर येवल्याचा तीनचतुर्थांश दंगा पंधरा दिवसांत मोडून जाईल अशीं आमची खात्री आहे; व याजकरितां ही गोष्ट वारंवार सरकारचे नजरेस आणण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों. अशा रीतीनें अधिकारी लोकांवर आरोप करणें ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे; परंतु राणीसरकारच्या न्यायी राज्याचा लौकिक व शांतता यांस जेथें धक्का पोहोंचण्याचा संभव आहे तेथें एकंदर सार्वजनिक हिताकरितां सरकारी अधिकाऱ्यांवर—मग ते अधिकारी कमिशनर असोत, कलेक्टर असोत वा पोलिस इन्स्पेक्टर असोत, त्यांजवर कडक टीका करणें आमचें कर्तव्य आहे. गेल्या खेपेसच हायकोर्टानें रावेर प्रकरणीं जो ठराव केला तो किती अन्यायाचा आहे हें दाखविलें होतें; व आज येवलें येथील अधिकाऱ्यांस उघडपणें दोष देणें भाग पडलें आहे. हिंदुमुसलमानांमधील कोणत्याहि प्रकारच्या वहिवाटीबद्दल तंटा पडल्यास त्याचा निकाल घुरावा घेऊन दिवाणीकोर्टानें केला पाहिजे, व दिवाणीकोर्ट जो निकाल देईल तो निकाल मॅजिस्ट्रेट अगर पोलिस अधिकारी यांनीं अक्षरशः पाळला पाहिजे, तरच या दोन्ही जातींमधील तंटे मिटण्याचा कांहीं संभव आहे; हें तत्त्व आतां आम्हीं विशेष रीतीनें कोणासहि समजून दिलें पाहिजे असें नाहीं. राणीचा जाहिनामा व लॉर्ड लॅन्सडाऊन यांचें आग्रा येथील भाषण यांत हें पूर्णपणें नमूद झालें आहे; परंतु आमच्या दुर्दैवानें मुंबई हायकोर्ट आणि येवलें येथील अंमलदार यांनीं इकडे दुर्लक्ष करून मनःपूत ठराव व वर्तन करण्यास सुरुवात केली आहे. याचे परिणाम काय होतील हें परवांच्या उदाहरणावरून कोणाच्याहि लक्षांत येईल; आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. इतकें असूनहि जर लॉर्ड हारिस इकडे लक्ष पुरवून या महत्त्वाच्या प्रकरणाचा निकाल लावणार नाहींत तर ते आपल्या कारकीर्दीच्या बेबंशाईचा व स्वतःच्या कोते विचाराचा एक ठळक दाखलाच मागें ठेवून जातील असें म्हणावें लागेल. येवल्याचा दंगा कशामुळें उद्भवला हें ढळढळीत दिसत असतां डोळ्यांत केर व कानांत फुंकर अशी स्थिति जर होऊं लागली तर त्यास त्यापेक्षां दुसरें काय म्हणावें हें आम्हांस कळत नाहीं. मुंबईसरकार काय करितें हें पाहून येवलेकरांनीं हें प्रकरण शेवटपर्यंत नेण्यास मागें घुढें पाहूं नये अशी त्यांसहि आमची सूचना आहे.

* * *



* नेकनामदार लॉर्ड हारिस ह्यांचे हुजुरास

खुला विनंती अर्ज ऐसाजे, येवलें येथें झालेल्या दंग्याची हकीगत सरकारी कामगारांमार्फत, आणि नेटिव्ह प्रेसरिपोर्टर यांच्या मार्फत आपले कानीं थोडी-बहुत तरी गेलीच असेल; तथापि आपण व आपले कौन्सिलर यांचा जो ठराव नुक्ताच बाहेर पडला आहे त्यावरून या दंग्यासंबंधाची कच्ची माहिती आपल्या नजरेस खालील अधिकाऱ्यांनीं आणिली कीं नाहीं ह्यांची थोडी शंका वाटतें; व ती खरी असल्यास अपुऱ्या माहितीमुळें आपल्या हातून कोणत्याहि प्रकारें इंग्रजी राज्यास कमीपणा आणणारें वर्तन घडल्याचा दोष आपल्याकडे येऊं नये अशा बुद्धीनें आम्ही हा अर्ज सादर करीत आहों; व त्याचा नामदारसाहेबांकडून योग्य विचार होईल अशी आमची उमेद आहे.

हिंदु आणि मुसलमान लोकांमध्यें गेल्या दहापांच वर्षांतच विशेष तंटे कां होऊं लागले, व ते मिटवण्यास काय उपाय करावे या प्रश्नाचा विचार करतेवेळीं ज्या प्रांतावर अंमल करण्यासाठीं दयाळू राणीसरकार यांनीं आपली योजना केली आहे त्याचा पूर्व इतिहास, तेथील लोकांच्या रीतिभाती व विशेषेंकरून तेथल्या हिंदु–मुसलमान लोकांमधील संबंध ह्यांचा सरकाराकडून नीट विचार झाला पाहिजे. मुंबई इलाख्याचा बराच मोठा भाग पेशवाई बुडाल्यानंतर इंग्रजसरकाऱ्याच्या ताब्यांत आला, व इंग्रजीराज्यापूर्वी या प्रांतांतील हिंदुलोकांनीं हिंदुस्थानांत बरीच चळवळ केली होती या गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेत, व आपल्यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्या नेहमीं लक्षांत ठेवल्या पाहिजेत. हाताखालील प्रजेचे स्वभाव, आणि गुणावगुण माहीत असल्याखेरीज कोणाहि राज्यकर्त्यास राज्याचा कारभार सुरळीतपणें चालण्यास थोडीबहुत तरी अडचण पडते हें आम्हीं सुचवावयास पाहिजे असें नाहीं. " राजा प्रकृतिरंजनात् " अशी इकडील शेक्स्पीयरची उक्ति आहे, व त्याप्रमाणें राजाकडून अगर राजाचे प्रतिनिधींकडून आचरण होण्यास प्रजेचा स्वभाव आणि चालीरीती त्यास पूर्णपणें अवगत असल्या पाहिजेत हें उघड होतें.

आतां प्रजेच्या चालीरीती समजण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे आपल्यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं प्रजेशीं अथवा प्रजेपैकीं प्रमुख लोकांशीं होईल तितकें संघटण ठेवणें हाच होय. नेकनामदार लॉर्ड रे हे अशा प्रकारें वर्तन करीत असत, व तोच कित्ता आपल्या हातूनहि गिरवला जाईल अशी आम्हांस आशा होती; परंतु आपल्या कारकीर्दीत तसा प्रकार घडून येत असल्याचें दिसत नाहीं. आपली सर्व भिस्त खालील अधिकाऱ्यांवरच असते, आणि त्यांच्याखेरीज

---

* [केसरीः—ता. २० फेब्रुवारी १८९४]

अन्य तऱ्हेनें मिळालेली माहिती गैरपद्धतीची आणि चुकीची असते अशी आपली समजूत झाली असावी असें नजरेस येतें; परंतु ही समजूत वस्तुस्थितीस अनुसरून नाहीं; अशी आपणांस विनंति करण्याचें आम्हांस भाग पडलें आहे. महाराणी-साहेबांनीं आपली या इलाख्याच्या गव्हर्नराच्या जागीं जी नेमणूक केली आहे ती केवळ खालील अधिकाऱ्यांचें ऐकून घेण्याकरितां नव्हे तर प्रसंग पडल्यास रयतेच्या आबादानीसाठीं आणि सुखासाठीं अर्थात् राज्याच्या चिरस्थाईपणासाठीं अधिकाऱ्यांच्या चुका दाखवून त्यांस नीट मार्गास लावावें यासाठीं होय. आपल्या सरदारी बाण्यावरून आणि स्वभावावरून आपण अशा प्रकारचें आपलें कर्तव्यकर्म करण्यास कधींहि मागेंपुढें पाहणार नाहीं अशी आमची आशा आहे, व त्या आशेमुळेंच हा अर्ज आपणाकडे पाठविण्याचा आम्हीं धीर केला आहे. कोणत्याहि प्रकारें आम्हांस आपण विशेष मेहेरबानी दाखवावी असें आम्ही म्हणत नाहीं. इंग्रजी राज्यांत ईश्वराच्या दयेनें निरनिराळ्या जातींचे, धर्माचे आणि पंथाचे लोक एकत्र झाले आहेत व त्या लोकांचे परस्परसंबंध कोणत्या प्रकारचे राखले असतां त्यांचा प्रेमभाव कायम राहून राज्यास बळकटी येईल याबद्दल दयाळु राणीसरकारांनीं सन १८५८ सालच्या जाहीरनाम्यांत आपल्या पोक्त व दूरदर्शीपणाच्या आज्ञा आपल्या सर्व प्रजेस जाहीर केल्या आहेत. हिंदुस्थानांतल्या राणीसरकारच्या प्रजेस या त्यांच्या आज्ञा शिरसा मान्य असून अशोकाच्या शिलालेखापेक्षांहि लोक हा जाहीरनामा अधिक महत्त्वाचा आहे असें मानतात. या जाहीरनाम्यांतील आज्ञेप्रमाणें अधिकारी लोकांकडून अंमल होण्याची आपण तजवीज करावी येवढीच काय ती आपणास आमची विनंती आहे.

मुंबईइलाख्याच्या पूर्व इतिहासाकडे लक्ष देण्यासाठीं आपणांस आम्हीं वर विनंती केलीच आहे. त्या विनंतीप्रमाणें विचार झाला असतां आपल्यास असें आढळून येईल कीं, निदान या इलाख्यांत तरी हिंदूंनीं मुसलमानांचा अगर मुसलमानांनीं हिंदूंचा विनाकारण छल केला असें उदाहरण सांपडत नाहीं. हिंदु व मुसलमान यांमध्यें पूर्वीं तंटे होत नसत असें नाहीं, पण ते राज्याकरितां होत असत. हल्लींच्याप्रमाणें विनाकारण धर्माची सबब काढून कोणीहि एकमेकांस छळीत नसत, अगर एकमेकांस तुच्छहि मानीत नसत. पेशव्यांच्या पदरीं व महाराष्ट्रांत पुष्कळ मुसलमान गृहस्थ इनामदार व जहागीरदार असत व पेशवे-सरकारांकडून इतर सरकाराप्रमाणें त्यांचा मान राखण्यांत येत असे. राज्य हिंदूचें होतें खरें; पण मुसलमान लोक केवळ अधिकाराच्या जोरावरच त्या-वेळीं दबून राहिले होते असें नाहीं. महाराष्ट्रास लागूनच निजामसरकारचें जें त्यावेळीं राज्य होतें त्यांतील हिंदूची त्यावेळची अगर हल्लींची स्थिति लक्षांत आणिली असतां आमच्या म्हणण्याच्या सत्यतेची प्रतीति आपल्या नजरेस येईल. सारांश, हिंदु आणि मुसलमान या दोन जातींमधील लोक या प्रांतांत आज

कित्येक वर्षेंपर्यंत एकमेकांस वचकून सलोख्यानें व प्रेमानें वागत आले आहेत. हिंदुस्थानांतील इतर इलाख्यांत मुसलमान लोक हिंदूंस तुच्छ समजत असतील, पण आमच्याकडे तसा प्रकार नव्हता, आणि त्याचें कारणहि उघडच होतें. ह्या प्रांतांतील हिंदुलोक गरीब असले तरी आपण त्यांचा विनाकारण छळ केला असतां ते कधींहि सोसून घ्यावयाचे नाहींत अशी मुसलमानांची पक्की खात्री झाली आहे व मुसलमान लोकहि दांडगे आहेत हें हिंदूंस माहित आहे. ह्या परस्पर भयामुळेंच महाराष्ट्रांत हिंदु-मुसलमानांमध्यें गेल्या दोनचार वर्षांत जसे दंगे झाले तसे पूर्वी होत नसत; व मुंबईस आणि येवल्यास हिंदूंनीं मुसलमानांचा जो थोडासा प्रतिकार केला त्यावरून येथल्या हिंदुलोकांमधील नैसर्गिक तेज इंग्रजी राज्यांत अगदींच नाहींसें झालें नाहीं असेंहि आपल्या लक्षांत आलें असेल. एकमेकांचा प्रतिकार करण्यास समर्थ अशा दोन जातींतील लोक प्रेमभावानें नांदण्यास सरकारानें त्यांस न्यायानें व सारखेपणानें वागविलें पाहिजे हें कोणीहि कबूल करील व हें लक्षांत आणूनच सन १८५८ सालच्या जाहिरनाम्यांत आणि नुकतेंच लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं आग्रा येथें जें भाषण केलें त्यांत ' हिंदु व मुसलमान यांपैकीं कोणाचीहि तरफदारी न करितां सरकार त्यांस सारखेपणानें वागवील व ज्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें त्यांस बिनघोक वागूं देईल ' असें आश्वासन दिलें आहे.

परंतु आपल्या कारकीर्दीत हें आश्वासन जसें पाळलें जावें तसें जात नाहीं ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. मुंबईस जेव्हां हिंदुमुसलमानांचा मोठा दंगा झाला तेव्हां प्रथमतः ज्यांनीं दंग्यास सुरवात केली त्यांचा शोध लावून जर आपण त्यांस शिक्षा देवविल्या असत्या तर सरकारच्या न्यायीपणाचा विशेष लौकिक होऊन त्यांचें सामर्थ्यहि लोकांस पूर्णपणें कळून आलें असतें. इंग्रजसरकार जातीजातींतील शुष्क तंटे मिटविण्यास असमर्थ आहे, असें कोणीहि समजत नाहीं; परंतु सरकारचे अधिकारी कोणाचा तरी पक्ष घेऊन अथवा हयगयीमुळें असल्या कालांत योग्य न्याय देण्यास सहसा प्रवृत्त व्हावयाचे नाहींत अशी जी कित्येक लोकांची समजूत आहे ती मुंबईच्या दंग्याच्यावेळीं आपण जें वर्तन केलें त्यामुळें दृढ होत चालली आहे व येवल्याच्या दंग्यासंबंधानें जर तसाच प्रकार होईल तर ती पूर्णपणें कायम होऊन त्यामुळें दंगे करणाऱ्या लोकांस एक प्रकारें उत्तेजनच मिळेल अशी आमची अल्प समजूत आहे. आपणासारख्या थोर अधिकाऱ्यांस आम्हीं कांहीं विशेष लिहावें असें नाहीं. तथापि आम्हीं अगत्यपूर्वक येवढें सुचवितों कीं, दंगा पहिल्यानें कोणीं व कसा उपस्थित केला, कोणत्या बाजूचे हक्क कसे आहेत, व ते बजावीत असतां कोणत्या बाजूनें पहिल्यानें हरकत केली आहे इत्यादि गोष्टींचा विचार न करितां दंगा झाला म्हणजे तो लष्करी लोक आणून मिटवावयाचा आणि पुढें जादा पोलीस ठेऊन बाकी सर्व काम त्यांजवर सोपवा-

वयाचें अशा व्यवस्थेनें हे दंगे कधींहि निर्मूळ व्हावयाचे नाहींत. इतकेंच नव्हे तर पुढें येणाऱ्या गव्हर्नरास अशा प्रकारच्या वर्तनानें आपण एक मोठा बिकट प्रश्न उपस्थित करून दिल्यासारखें होईल. गोडीगुलाबीनें तंटे मिटवावयाची जी आपली कल्पना आहे ती कांहीं वावगी नाहीं; परंतु तेवढ्याकरितां न्यायान्याया-कडे अगदीं दुर्लक्ष करूनहि चालणार नाहीं एवढीच आमची आपणांस विनंति आहे. हिंदुलोक जे आज सहसा दंग्यास प्रवृत्त होत नाहींत ते अशिक्षितेमुळें नव्हत; त्यांचा असा पूर्ण भरंवसा आहे कीं, आपण दंडादंडी केली नाहीं तरी सरकार अखेरीस न्याय करील आणि आपले वाजवी हक्क आपणांस यथान्याय बजावूं देईल. हिंदुलोकांचा हा भरंवसा यत्किंचितहि कमी झाला तर त्यापासून ठिकाठिकाणीं किती अडचण पडणार आहे हें आपल्या लक्षांत येईलच. प्युनि-टिव्ह पोलीस नेमल्यानें अगर दंग्यांत पकडलेल्या माणसांस शिक्षा दिल्यानें हा भरंवसा दृढ होतो असें नाहीं. उलट तो कमी होण्याचा मात्र संभव आहे. दोन असामी दंगा करीत असतां त्यांस निरनिराळे करून दोघांस दोन खोलींत कोंडून ठेविल्यानें जशी त्यांच्या मनांतील खुमखुम कमी होत नाहीं, तद्वतच प्युनिटिव्ह पोलीसाचा प्रकार होय. लष्करीलोक आणिले, जादा पोलीस नेमले, अगर दंगेखोरास शिक्षा दिल्या तर त्यानें सुरू असलेला दंगा मोडून त्यावेळेपुरती स्वस्थता होईल खरी; पण अशा प्रकारें तलवारीच्या जोरावर राखलेली शांतता कोठवर टिकणार ? लोकांचीं मनेंच जर साफ झालीं नाहींत, अथवा सरकारा-कडून न्याय मिळण्याची जर त्यांस आशा नाहीं तर दंग्याचा पुन्हां उद्भव होण्यास अगदीं स्वल्प कारणहि पुरें होणार आहे, करितां नामदार साहेबांस आमचा असा अर्ज आहे कीं, भिन्नभिन्न जातींच्या लोकांस जेणेंकरून वाजवी न्याय मिळेल अशी तजवीज राखण्याबद्दल प्रांतांतील अधिकाऱ्यांस हुकूम व्हावा. हा हुकूम नवा द्यावयाचा आहे असें नाहीं, परंतु तो सरकारचे अधिकारी विसरत चालले आहेत असें येवल्याच्या हकीगतीवरून जर उघड दिसत आहे तर राणी-सरकारच्या राज्याचा लौकिक राखण्यासाठीं त्याची पुनरावृत्ती करणें व तो सक्तीनें अमलांत आणणें अगदीं जरूर आहे.

वर्तमानपत्रांत वगैरे आलेल्या येवल्याच्या हकीगतीवरून आपणांस खरा प्रकार कळून आला असेलच. आज पांचसहा महिने तेथील मुसलमानलोक अगदीं चढून गेल्यासारखे झाले आहेत. चांगले व घरंदाज मुसलमानलोक यांत सामील नसतात, अगर दंगा व्हावा अशी त्यांची इच्छाहि नसते; पण समाजांत अडा-णीच लोकांचा भरणा जास्त असल्यामुळें, व उइंटरसाहेबासारख्या मिनशरी कले-क्टरांचा ओढा स्वभावतःच त्या अडाणी लोकांकडे असल्यामुळें असले दंगे कर-ण्यास हे लोक प्रवृत्त होतात, आणि त्यांनीं केलेल्या बदमाषपणाचें फळ सर्वांस भोगावें लागतें. सरकारी अधिकाऱ्यांच्या चुकीनें, पक्षपातीपणानें अगर गैरसम-

जुतीनें केवढा अनर्थ होण्याचा संभव असतो हें येवल्याच्या दंग्यावरून उत्कृष्ट कळून येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील कलेक्टर म्हणजे त्या जिल्ह्याकरितां राणी-सरकारचे हे एक प्रतिनिधीच आहेत असें लोक समजतात, आणि त्यांच्या वर्तनाबद्दल सरकारांतून जर त्यांस कांहीं दोष ठेवण्यांत आला नाहीं तर कलेक्टरसाहेब करितात तें सरकारास मान्य आहे अशी सामान्य लोकांची समजूत होणें अगदीं साहजिक आहे. लोकांची अशी समजूत होऊं नये आणि बदमाषलोकांस दंगे करण्यास उत्तेजन मिळूं नये म्हणून कोणत्याहि कलेक्टराची असल्या प्रकरणीं चूक झाल्यास तिचा सरकारांतून उघड रीतीनें निषेध झाला पाहिजे. सिव्हिल सर्व्हिसमधील लोकांस अशा रीतीनें आपल्या बरोबरीच्या अधिकाऱ्यांची मानहानि होणें इष्ट वाटणार नाहीं व आपल्यास सल्ला देणारे सर्व लोक सनदी नौकरींतीलच असल्यामुळें कोणत्याहि कलेक्टराच्या चुकीचा सरकारांतून उघड निषेध होऊं नये अशाच प्रकारची ते आपणास शिफारस करितील; पण या सर्व सनदी अधिकाऱ्यांच्यावर मुद्दाम इंग्लंडांतून दर पांच वर्षांनीं आपणासारखे स्वतंत्र वरिष्ठ अधिकारी जे महाराणीसरकाराकडून नेमण्यांत येतात त्याचा मुख्य हेतु येवढाच आहे कीं, असल्या शिफारशीस न जुमानतां न्यायानें जें योग्य तेंच अमलांत आणण्याचा आपण नेहमीं हुकूम द्याल. महाराणी सरकारचा हा स्तुत्य हेतु सफल करून प्रजेस संतोषी ठेवणें हें आपल्या हातांत आहे. खुद्द येवल्यासच हिंदुलोकांनीं आज बरेच दिवस दम धरिला होता, पण दम धरण्यासहि कांहीं यत्ता आहे. एकदां दोनदां अगर तीनदां मनुष्य दम खाईल; पण कोठेंच न्याय न मिळण्याची त्याची जर खात्री झाली तर चवथ्यानें तो आपला हात चालविल्याखेरीज राहणार नाहीं; निदान महाराष्ट्रांतील लोक तरी इतके हतवीर्य झाले नाहींत हें त्यांच्या पूर्वइतिहासावरून आपल्यासारख्या थोर मुत्सद्याच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे, व तें लक्षांत घेऊनच आपण त्या प्रकरणाचा शोधक बुद्धीनें निकाल लावाल अशी आमची उमेद आहे.

येवले येथील पोलीस इन्स्पेक्टराची बदली केल्याचें वर्तमान नुकतेंच आलें आहे यावरून आमच्या म्हणण्याप्रमाणें कांहीं तरी निकाल होईल अशी आम्हांस बळकट आशा वाटत आहे. आमच्या मतें येवल्यास हल्लींच्यापेक्षां हुषार व पाणीदार असे अधिकारी जर पहिल्यानेंच नेमले गेले असते तर हा दंगा ह्या थरास कधींच आला नसता. उइंटरसाहेबापेक्षां हुषार कलेक्टर अगर दुसरे मामलेदार सरकारच्या पदरीं नाहींत असें नाहीं. दसऱ्याच्या वेळीं मुसलमानांनीं जी आगळीक केली तेव्हांपासून तों परवांच्या दंग्यापर्यंत ते हिंदुलोकांची कांहींना कांहीं तरी खोडी एकसारखे काढीत आले आहेत. त्यांच्याशीं व्यवहार करण्याचें सोडून देऊन व तडजोडीचें बोलणें लाऊन ते ताळ्यावर येतात कीं नाहीं हें पाहण्याचा हिंदुलोकांनीं बराच प्रयत्न केला; पण अधिकारीलोकांचें हिंदुलोकांस

कोणत्याहि प्रकारें साहाय्य नसल्यामुळें हे सर्व प्रयत्न निष्फळ झाले आणि अखेरीस आग पेटली तेव्हां सरकार जागें झालें. यापेक्षां दसऱ्याच्या दिवशीं नामदार-साहेबांची स्वारी जर येवल्यास येऊन गेली असती, व खालील अधिकाऱ्यांच्या रिपोर्टींवर भरंवसा न ठेवतां तेथील स्थिति प्रत्यक्ष पाहून आपण जर स्वतःच बंदोबस्त केला असता तर परवांचा प्रसंग खचित येता ना. अस्तु, झालेल्या गोष्टीस उपाय नाहीं; परंतु आतां तरी केवळ जादा पोलीस लोकांवर लादिलें आहे त्याच्या भरंवशावर न बसतां हिंदुमुसलमानांस न्याय मिळण्याची कांहींतरी तजवीज कराल अशी आम्हांस आशा आहे. ही तजवीज लवकर झाली तर प्युनिटिव्ह पोलीसहि महिना दोनमहिन्यापेक्षां ज्यास्त ठेवण्याची अवश्यकता पडणार नाहीं, आणि एकाच्या आगळिकीकरितां हल्लीं सर्वांस जो दंड सोसावा लागत आहे तो नाहींसा होऊन लवकरच सर्वत्र शांतता होईल असा आम्हांस भरंवसा आहे. दंग्याचें बीजच मोडलें म्हणजे प्युनिटिव्ह पोलीस नको आणि लष्करीलोकहि नकोत. जादा काय लिहिणें हे विनंती.

❖ ❖ ❖

* येवलें येथील पोलिस व फौजदारी अधिकाऱ्यांचा दंगा

येवलें प्रकरणासंबंधानें आमचे लेख वाचून आमच्या वाचकांस कंटाळा व वीट आला असेल हें आम्हीं जाणून आहों; परंतु वर्तमानपत्रांतून जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांजकडे व तेथील लोकांनीं केलेल्या अर्ज्या व तारा यांजकडे सर्वस्वी दुर्लक्ष करून सरकारनें येवलें येथील पोलीस व फौजदारी अधिकाऱ्यांस मनःपूत पुंडाई चालविण्याची जी सनद दिली आहे, व ज्या पुंडाईपासून भयंकर अनर्थ होण्याचा संभव आहे तिची हकीकत मनांत आणितां आमच्यानें पुनः एकवार या विषयाकडे वळल्याखेरीज राहवत नाहीं; व आमच्या दुर्दैवानें अद्यापहि जर दाद लागली नाहीं तर इंग्रजी राज्यांत जें एक शस्त्र वापरण्याची कायदेशीर मोकळीक आहे त्या शस्त्राचा पुनः पुनः आत्मदुःखनिवारणार्थ होईल तितका उपयोग करणें हें आमचें कर्तव्य आहे असें समजून आम्ही आपल्याकडून हीं लोकांची गाऱ्हाणीं सरकारच्या कानांत घुसविण्याचा शेवटपर्यंत एकसारखा यथाशक्ति प्रयत्न करूं. लोकांच्या मनांतील आशय आणि त्यांचें मत हीं स्पष्टपणें खुलासेवार आणि मोकळ्या मनानें भीडमुर्वत व धरितां सरकारास

* ता. १३ मार्च १८९४

कळविणें हें आमचें कर्तव्य आहे व त्यांतच आमचें व आमच्या सरकारचें हित आहे अशी आमच्या मनाची खात्री आहे; करितां हें कर्तव्य बजावीत असतां मि. क्यांबेलसारख्या आपला अधिकार अनियंत्रित चालावा अशी इच्छा करणाऱ्या अधिकऱ्यांनीं जरी आमचा उपहास अथवा निर्भर्त्सना केली तरी आम्ही तिकडे बिलकुल लक्ष देत नाहीं.

लॉर्ड हारिससाहेबांनीं परवां मुंबईस मंगळदास नथुभाई यांच्या मुलींच्या शाळेच्या बक्षिस समारंभाच्या वेळीं असें बोलून दाखविलें कीं, " आम्हीं राज्यकर्ते या देशांत परकीय असल्यामुळें आम्हांस तुमच्या कल्पना नीट समजत नाहींत, व त्या समजून घेण्यास लोकांशीं नेहमीं सहवास ठेविला पाहिजे. " लॉर्ड हारिस यांनीं हे उद्गार स्त्रीशिक्षणास उद्देशून काढिले होते; परंतु आमच्या मतें त्यांनीं हींच वाक्यें नीट लक्षांत ठेवून जर राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली तर त्यांचे हातून राणीसरकारची नौकरी अधिक चांगल्या रीतीनें बजाविली जाऊन आमच्या लोकांचेंहि त्यांत पुष्कळ हित होईल अशी आमची समजूत आहे. लॉर्ड हारिस यांची काम करण्याची जी हल्लींची पद्धत आहे ती अगदीं चुकीची आहे. यांच्यासारख्या अधिकाऱ्यांस येवढा मोठा पगार देऊन मुद्दाम विलायतेहून जे येथें धाडतात ते कांहीं खालच्या अधिकाऱ्यांच्या रिपोर्टावर विश्वासून बसण्याकरितां नव्हें हें आम्हीं मागेंच सांगितलें आहे, व आजहि पुनः तसेंच म्हणतों. लॉर्ड रे हे गव्हर्नर असतां सुरतेस आग लागून मोठें नुकसान झाल्याची बातमी आल्याबरोबर ते स्वतः तेथें गेले व लोकांची हकीकत ऐकून घेऊन त्यांस धीर दिला; परंतु लॉर्ड हारिस यांचा प्रकार यांच्या अगदीं उलट आहे. मुंबईच्या दंग्याच्या वेळची हकिकत अगदीं सोडून दिली तरी ती चूक पुनः होणार नाहीं अशी आमची आशा होती; पण येवल्याच्या प्रकरणावरून आमची आशा निष्फळ होत चालली आहे. येवल्यास नुसती आगच लागून राहिली आहे असें नाहीं; तर खूनहि झाले आहेत. पण अद्याप लॉर्ड हारिस त्याची स्वतः चौकशी करीत नाहींत अथवा आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांखेरीज दुसऱ्या कोणासहि माहिती विचारीत नाहींत हें आश्चर्य नव्हे काय ? हाताखालील अधिकारी कितीहि शहाणे असले तरी त्यांच्या मनांत एक प्रकारचा दुराग्रह व अभिनिवेश इतका भरलेला असतो कीं, त्यांनीं केलेले रिपोर्ट अगदीं एकतर्फी, चुकीचे आणि भ्रमोत्पादक असतात. या रिपोर्टांचें यथास्थित परीक्षण करून सत्यासत्यतेचा निकाल जर वरिष्ट अधिकाऱ्यांनीं करावयाचा नाहीं तर दरमहा रयतेचे पांच पांच हजार आणि दहा दहा हजार रुपये खर्च करून तरी काय उपयोग ? इंग्रजी राज्यांत सरकार हें निर्जीव, निरिंद्रिय आणि निराकार असें भाववाचक नाम झालें आहे हें खरेंच, पण त्यांतहि गव्हर्नर आणि त्यांचे दोघे कौन्सिलर यांच्या हातीं सर्व इलाख्याच्या राज्याचीं


सूत्रें असतात; व त्यांनींच खालील अधिकाऱ्यांचें व रयतेचें ऐकून घेऊन योग्या-योग्यतेचा व खऱ्याखोट्याचा निकाल केला पाहिजे. पण आमच्या दुर्दैवानें आम्हांस जे हल्लीं वरिष्ट अधिकारी मिळाले आहेत ते ह्या कामास अपात्र नसले तरी निदान कोणत्याहि बाबतींत स्वतंत्र रीतीनें चौकशी करण्याची त्यांची काडी-मात्र देखील इच्छा नाहीं हें दिवसानुदिवस अधिकाधिक व्यक्त होत आहे. लॉर्ड हॉरिस आणि त्यांचे कौन्सिलर हे आपल्या खोलींत बसून बाहेर जी मोठी आरडा-ओरड चालली आहे तिकडे बिलकुल लक्ष न देतां केवळ आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांच्या रिपोर्टाची वाट बघत आहेत असें दिसतें. लोकमताची इतक्या उदासीन तऱ्हेनें अवहेलना करणें नामदार साहेबांस कदाचित् शहाणपणाचें व मुत्सद्दीपणाचें कृत्य आहे, असें वाटत असेल; पण आम्ही त्यांस नम्रपणें पण निक्षून असें सुचवितों कीं, ही त्यांची समजूत अगदीं चुकीची, व परिणामीं घातक आहे. कालगतीनें जर सर्व गोष्टी आपोआप घडून येत असत्या तर इंग्रजांचें राज्यहि नको आणि गव्हर्नरहि नको होते. पण वस्तुतः तसा प्रकार नाहीं. कोणीहि मनुष्य अथवा ज्ञाती आपल्या हक्काच्या बाहेर वर्तन करूं लागल्यास त्यास राजानें दंड करावा आणि मामूल वाहिवाट पूर्ववत राखावी असा राजधर्म सर्व नव्या व जुन्या ग्रंथकारांनीं सांगितलेला आहे. या धर्माचें उल्लंघन खालील अधि-काऱ्यांचें हातून झालें असतां लॉर्ड हारिस व त्यांचे कौन्सिलदार आपल्या औदा-सिन्यानें त्यांस संमति देतील तर इंग्रजी राज्याचा पायाच खणण्याचा त्यांनीं उद्योग केला असें म्हणावें लागेल. " लागेल " अशा संशयार्थी लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, लॉर्ड हारिस यांचे हातून अगदींच न्याय मिळणार नाहीं, अशी अद्याप आमची पुरी खात्री होत नाहीं. आजपर्यंत जें त्यांनीं वर्तन केलें आहे त्यावरून फारशी आशा नाहीं ही गोष्ट खरी आहे; पण समूळ निराशा होण्यास अद्याप कांहीं थोडासा अवकाश आहे असें आम्हांस वाटतें.

असो. आज पुनः एवढी प्रस्तावना करण्याचें कारण इतकेंच कीं, येव-ल्यास तेथील अधिकाऱ्यांनीं जो दंगा माजविला आहे तो पूर्वीच्या दंग्यावरहि ताण करण्यासारखा आहे अशी खात्रीलायक बातमी आम्हांस मिळाली आहे. कोण-च्याहि शहरांत दंगा झाला असतां ऐन गर्दीच्या वेळीं दंग्यांत ज्या लोकांस पकडले जाईल त्यांस शिक्षा व्हावी, हें अगदीं अवश्य व न्याय्य आहे; पण दंगा आटोपल्यावर एका पक्षांतील माणसें दुसऱ्या पक्षांतील लोकांच्या सांगण्यावरून वारंटें देऊन घरांतून ओढून काढावीं आणि पन्नास पन्नास साठ साठ किंबहुना शंभर शंभर लोकांचे थवेच्या थवे आरोपी करून त्यांस शिक्षा द्याव्या अशा प्रकारची बेबंदशाई मौंलगाईपेक्षांहि वाईट राज्यांत सांपडणें दुरापास्त आहे. ज्या ठिकाणीं एक जातीचे लोक एका बाजूस व दुसऱ्या जातीचे लोक दुसऱ्या बाजूस अशी स्थिति आहे व दोन्ही जातींतील लोकांत मारामारी व खून होऊन एकमेकांच्या

घरांस व देवळांस आगी लावण्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे तेथें एका जातींतील दोन चार माणसांनीं दुसऱ्या जातींतल्या शंभर शंभर माणसांचीं नांवें एकदम आरोपींत दाखल करावींत आणि मॅजिस्ट्रेट साहेबांनीं 'अमुक आणि शंभर' यांजवर फिर्याद घेऊन 'अमक्याचा भाऊ धरून आणा' ह्मणून वारंटें काढीत सुटावें ही निव्वळ कायद्याची थट्टा आणि लोकांच्या हक्कांची पायमल्ली आहे. येवल्यास दंगा झाला व त्यांत हजारों लोक होते हें निर्विवाद आहे. पण या हजारों लोकांस कायदेशीर पुराव्यानें शिक्षा देतां येईल असें जर कोणास वाटत असेल तर त्या न्यायमूर्तीस कुलाव्यावर लवकरच पोंचविलें पाहिजे. न्यायदेवतेची अशा रीतीनें विटंबना करून पन्नास पन्नास आणि शंभर शंभर हिंदुलोकांस दहापांच मुसलमानांच्या साक्षीवरून तुरुंगांत पाठविण्यापेक्षां न्यायदेवता किती हजार लोक तुरुंगांत पाठविले असतां संतुष्ट होईल हें सरकारानें आगाऊ ठरवून येवल्यांतील तितकीं माणसें लाटरीनें निवडून तुरुंगांत पाठवावीं अथवा मागें आम्हीं सुचविल्याप्रमाणें येवल्याच्या हिंदु मोहोल्याभोंवतीं तुरुंगाची भिंत घालून सभोंवतीं मुसलमानांचा पहारा ठेवावा हें फार चांगलें! लॉर्ड हारिससाहेबांस ही बातमी समजली असेल कीं नाहीं व समजली असल्यास या बाबतींत कांहीं चवकशी करण्याचा त्यांचा हेतु आहे कीं नाहीं हें आम्हीं सांगूं शकत नाहीं. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, येवल्याच्या पोलीस व फौजदारी अधिकाऱ्यांनीं हल्लीं येवल्यास जी झोटिंग बादशाही चालविली आहे तीस कायद्यांत कोठेंहि आधार नाहीं एवढेंच नव्हे, तर ती सर्वांशीं अगदीं निंद्य आहे. येवल्यास दंगा झाला त्यावेळीं रस्त्यांत दंगा करणारांस पोलिसानें पकडून शिक्षा देवविल्या असत्या तर आम्हीं त्यास मोठी शाबासकी दिली असती. पण दंग्याच्या वेळेस ज्यांचें सर्व धैर्य नाहींसें झालें होतें व लष्करी लोकांच्या मदतीखेरीज ज्यांच्या अंगीं दंगा मोडण्याचें सामर्थ्य नव्हतें अशा काळ्या डगल्याच्या कांहीं शिपायांच्या आणि त्यांच्या डबल काळ्या नायकानें दहापांच अगर पांचपंचवीस मुसलमान हाताशीं घेऊन त्यांच्या साक्षीच्या जोरावर पांच सातशें हिंदुलोकांस घरांतून आतां ओढून काढण्याचें साहस करावें आणि त्यास मॅजिस्ट्रेट साहेबांनीं मदत करावी ही इंग्रजी राज्यास मोठी काळीमा आणणारी गोष्ट आहे. ज्या लोकांनीं देवळें जाळलीं, गोवध केला आणि प्रथमतः दंग्यास सुरुवात केली ते खोटी साक्ष देण्यास मागेंपुढें पाहतील असें आम्हांस वाटत नाहीं. उलट ज्या लोकांनीं आपल्या मशिदी जाळल्या त्यांचा कोणत्या रीतीनें सूड उगवून घ्यावा अशीच बुद्धि या पक्षांतील लोकांची नेहमीं असावयाची किंबहुना अशा रीतीनें वर्तन करणें हें स्वधर्म निष्ठेचें एक लक्षण व स्वधर्म रक्षणाचें एक साधन आहे असाहि त्यांच्या मनाचा ग्रह होऊं शकेल. असल्या लोकांच्या साक्षीवरून शेकडों हिंदुलोकांस शिक्षा देणें किती धोक्याचें व अन्यायाचें आहे हें आम्हीं सांगावयास

पाहिजे असें नाहीं. दंग्याच्या वेळीं जे लोक घरांत दारें लावून बसले होते तें देखील या खटल्यांतून आरोपी झाले आहेत; यावरून आमच्या म्हणण्याची सत्यता कोणाच्याहि लक्ष्यांत येईल. लॉर्ड हारिस यांस हा जुलूम, अन्याय व बेबंदशाई जर बंद करितां येत नसली तर त्यांनीं उघडपणें ही गोष्ट लोकांस कळवावी म्हणजे राणीसरकाराकडे त्यांच्या ऐवजीं दुसरा गव्हर्नर पाठविण्याविषयीं अर्ज करण्यास ठीक पडेल. अर्ज करणें एवढेंच काय तें आमच्या हातांत शस्त्र उरलें आहे व निराशेनें ग्रस्त झाल्यावर राणीसाहेबांकडे अशा रीतीनें अखेरची दाद मागणें आम्हांस अगदीं भाग पडेल. दंगा झाला, देवळें जाळलीं गेलीं, मशिदी फुटल्या आणि खून पडले गेले तरी दंग्याच्या मूळ कारणांचा अद्याप निकाल नाहीं तो नाहींच आणि गांवांतील मॅजिस्ट्रेट, लोकांचे थवेच्या थवे विनाकारण प्रतिपक्षाच्या कवडीमोल साक्षीच्या आधारें तुरुंगांत पाठवीत आहेत हाच जर इंग्रजी राज्यांतील न्यायाचा मासला असेल तर ह्या राज्याचा लौकिक लवकरच नाहींसा होऊन लोकांत त्याबद्दल अविश्वास उत्पन्न होईल व ते असंतुष्ट राहून त्याचें सर्व श्रेय लॉर्ड हारिस यांस मिळेल अशी आम्हांस धास्ती वाटत आहे. शेंकडों हिंदुलोकांस तुरुंगांत पाठवून हिंदुमुसलमानांमधील तंटे मिटतील असें जर लॉर्ड हारिस व त्यांचे कौन्सिलदार यांचें मत असेल तर तें अगदीं चुकीचें आहे व त्याच्यापासून त्यांस वाटतें आहे त्यापेक्षां फारच निराळ्या तऱ्हेचे परिणाम घडून येण्याचा संभव आहे असें त्यांस आम्ही खातरीनें सांगतों. लोकांच्या मनांतील अढी काढण्याचा जेथें सरकार आपण होऊन काडीइतकाहि प्रयत्न करीत नाहीं तेथें या वरकरणी उपायांनीं काय होणार ? दोनशें अगर चारशें हिंदु तुरुंगांत गेले तर तेवढ्यानें सर्व हिंदुलोक संपतात असें नाहीं, हें लक्षांत ठेऊन सरकार व त्यांचे अधिकारी यांनीं या कामीं वर्तन केलें पाहिजे. तशा रीतीनें जर अधिकार बजावण्याची लॉर्ड हारिस यांची इच्छा नसेल तर इंग्रजी राज्यास अथवा आम्हांस हे वाईट दिवसच आले आहेत असें म्हणावें लागेल. सबब आमच्याकरितां नाहीं तरी निदान राज्याच्या लौकिकाकरितां तरी लॉर्ड हारिस डोळे उघडून चवकशी करतील व या प्रकरणाचा अद्याप तरी शेवट लावतील अशी आम्ही आशा करतों.

❁ ❁



* मुंबई सरकारची अखेर झाली !

येवल्याच्या दंग्याबद्दल मुंबईसरकारानें जो नुकताच एक मोठा लांबलचक ठराव प्रसिद्ध केला आहे तो वाचला म्हणजे लॉर्ड हारिस आणि त्यांचे जोडीदार कौन्सिलर यांच्या काम करण्याच्या शिताफीची, आयदेपणाची आणि कर्तृत्वशून्यतेची कोणासहि खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. लॉर्ड हारिस यांच्या हातून येवल्याच्या हिंदु प्रजेस कांहीं तरी न्याय मिळेल अशी आम्हांस आजपर्यंत थोडीशी आशा होती. पण हा अखेरचा ठराव वाचून ती आतां समूळ नाहींशी झाली आहे. नामदार लॉर्ड हारिस यांच्या कौन्सिलांत या प्रश्नाचा नीट विचार करण्याइतकें सामर्थ्य कोणास नाहीं असें नाहीं; पण आमच्या हल्लींच्या गव्हर्नरसाहेबांची राज्य करण्याची पद्धतच अशी आहे कीं, खालील अधिकारी सांगतील त्यापेक्षां त्यांच्या हातून नवी अशी कोणतीच गोष्ट व्हावयाची नाहीं. दंग्याच्या ठिकाणीं जाऊन स्वतंत्र चवकशी करावयाची, लोकांचें म्हणणें ऐकून घ्यावयाचें, आणि आपणांस योग्य वाटेल तसा निःपक्षपातीपणाचा न्याय द्यावयाचा या गोष्टी लॉर्ड हारिस यांच्या स्वप्नींहि येत नसतील. उघडच आहे कीं, मुंबईस एवढा मोठा दंगा उसळला असतां जे आमचे नामदारसाहेब पुण्यास स्वारांची रवानगी करीत राहिले होते, व दोन चार दिवसांनीं लगेच क्रिकेटच्या खेळाकरतां मुंबईस गेले ते येवल्यासारख्या तालुक्याच्या ठिकाणीं खेप घालून आपला अमूल्य वेळ फुकट काय म्हणून घालवितील ? लोकांचें म्हणणें ऐकून घ्यावयाचें नाहीं व होईल तितकें करून लोकमतास मान द्यावयाचा नाहीं, हें लॉर्ड हारिस यांच्या कारकीर्दीचें रहस्यच होऊन गेलें आहे व या रहस्यास अनुसरूनच हल्लींचा ठराव त्यांनीं प्रसिद्ध केला आहे. या ठरावांत मि० वुइंटर, हेवर्ड आणि गिब्स या तिन्हीहि कामगारांची स्तुति करून, मामलेदार, अव्वलकारकून आणि पोलिस इन्स्पेक्टर या तीन नेटिव कामगारांस अनुक्रमें मामलेदारीच्या, नोकरीच्या आणि हल्लींच्या कामास नालायक ठरविलें आहे ! लॉर्ड हारिस यांनीं हा न्याय करण्यास कोणता तराजू आणला होता कोण जाणे. दंग्याची जी हकीकत आम्हांस माहीत आहे त्यावरून या कामीं नेटिवांस एक माप व युरोपियनांस दुसरें माप असा प्रकार झाल्याचें उघड दिसून येत आहे; व ठरावांतील इतर गोष्टी सोडून दिल्या तरी या एका गोष्टीवरूनच लॉर्ड हारिस यांनीं केलेला ठराव चुकीचा व पक्षपातीपणाचा आहे असें म्हणणें भाग पडतें. लॉर्ड हारिस यांच्या कौन्सिलांत यापेक्षां चांगला ठराव करणारा कोणीहि मुत्सद्दी या वेळीं असूं नये ही मोठ्या दुःखाची आणि दुर्दैवाची गोष्ट आहे, व आमच्या इलाख्याच्या राज्यकारभाराचीं

---

* [केसरी ता० २० मार्च १८९४]

सूत्रें जर अशींच या शहाण्या मुत्सद्यांच्या हातांत राहिलीं तर हिंदुमुसलमानांमधील दंगे कधींहि निर्मूल व्हावयाचे नाहींत अशी आम्हांस धास्ती वाटते.

असो; लॉर्ड हारिस यांनीं हा जो अखेरचा ठराव प्रसिद्ध केला आहे त्यांत सरकारी अम्मलदार व मुसलमान लोक यांची तरफदारी किती शिताफीनें केली आहे हें हा ठराव जो किंचित् लक्ष्यपूर्वक वाचील त्यास सहज कळून येईल. आपल्या विरुद्ध म्हणून जेवढा पुरावा असेल तो अजीबात गाळावयाचा व आपल्या पक्षकाराच्या तर्फे बारीकसारीक गोष्टीहि मोठ्या गौरवून सांगावयाच्या हा बॅरिस्टराचा धंदा होय. पण सरकारी ठरावांत अशा प्रकारचे लपंडाव व धरसोड करणें म्हणजे ज्या राणीसरकारचे लॉर्ड हारिस आदिकरून अधिकारी नौकर आहेत त्या महाराणीसरकारच्या राज्याच्या निःपक्षपातीपणाच्या लौकिकास कलंक लावण्यासारखें आहे. मुंबईसरकारच्या हातून अशा तऱ्हेची गोष्ट होईल अशी त्यांच्या एकंदर वर्तनावरून आम्हांस थोडीबहुत भीति वाटत होतीच; पण हल्लींच्या ठरावांत सरकारनें जितका उघड पक्षपातीपणा दाखविला आहे तितका दाखविण्यास दहादहा पांचपांच हजार रुपये दरमहा पगार घेणाऱ्या लोकांस थोडीबहुत तरी शंका येईल असें वाटत होतें. पण आमच्या दुर्दैवानें आमचा हा समज चुकीचा ठरला आणि 'शेतानेंच कुंपण खाल्लें' अशा तऱ्हेचा प्रकार घडून आला आहे. ज्यांच्या जवळ अखेर दाद मागावयाची तेच जर अशा रीतीनें सत्याचा आणि न्यायाचा अव्हेर करूं लागले तर गरीब रयतेच्या मनांत दुःख, निराशा आणि संताप यांचा तीव्र संचार झाल्यास त्यांत आश्चर्य तरी कोणतें ? पांच वर्षेंच कां होईना पण यापेक्षां चांगल्या रीतीनें इलाख्याचा राज्यकारभार चालविणारे गव्हर्नर व कौन्सिलर ज्या राज्यपद्धतीनें आपणांस मिळत नाहींत तींत खचित कांहीं तरी व्यंग असलें पाहिजे अशी लोकांची समजूत होणें अगदीं साहाजिक आहे, व ही समजूत दूर करण्यास इकडे जे गव्हर्नर पाठवावयाचे त्यांस क्रिकेटच्या खेळापेक्षां राज्यपद्धतीची कशी काय माहिती आहे याची चवकशी करून पाठविल्यास बरें होईल. मुंबईच्या दंग्याच्या वेळीं मि० व्हिन्सेंट आणि आक्वर्थ यांचीं मतें कशीं काय होतीं व मुंबईसरकारनें जर तीं सर्वांशीं ग्राह्य धरलीं असतीं तर काय परिणाम होता हें आम्हीं मागें लिहिलेंच आहे. येवल्याचा प्रकारहि त्यांतलाच होय. मि० वुइंटर, मि० हेवर्ड आणि मि० गिन्स या अम्मलदारांच्या भित्रेपणामुळें आणि गैरवाकबगारीनें जे दंगे उपस्थित झाले त्यांचीं कारणें व हकीकत त्याच कामगारांकडून मागवून तिच्यावर सरकारनें आपला ठराव करणें म्हणजे बोलून चालून अपराध्याच्या तोंडूनच माहिती ऐकून त्यावर निकाल देण्यासारखें आहे, हें आमच्या मुंबईसरकारास कसें कळलें नाहीं कोण जाणें ? येवल्यांतील लोकांप्रमाणेंच मि० वुइंटर आणि मि० हेवर्ड हे या कामीं गुन्हेगार आहेत व येवल्याच्या लोकांनीं लिहून पाठविलेल्या हकीकतींत

आणि वुइंटरसाहेबांनीं केलेल्या रिपोर्टांत जेथें जेथें तफावत आहे तेथें तेथें स्वतंत्र रीतीनें चवकशी केल्याखेरीज बरोबर निकाल देणें अगदीं अशक्य आहे. परंतु लॉर्ड हारिस यांच्या डोक्यांत ही कल्पना अद्याप येत नाहीं याचें आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. लॉर्ड हारिस अगर त्यांचे कौन्सिलर हे कांहीं परमेश्वर नव्हेत अगर महात्मे नव्हेत, करितां त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांच्या हातून चूक झाली असा जेव्हां सदर अधिकाऱ्यांवर आरोप असतो, तेव्हां स्वतंत्र चवकशी करून सत्यनिर्णय केल्याखेरीज दुसरा त्यांस मार्गच नाहीं. अशा रीतीची चवकशी सध्याच्या प्रकरणीं मुळींच झाली नसून केवळ आंधळ्याप्रमाणें खालील अधिकाऱ्यांनीं पाठविलेल्या माहितीवर मुंबईसरकारनें हा ठराव प्रसिद्ध केला आहे. हा ठराव वाचल्यावर गव्हर्नर आणि त्यांचे कौन्सिलर हे आपलें कर्तव्य नीट बजावीत नाहींत अशी कोणाचीहि खात्री होण्यास जास्त पुराव्याची अपेक्षा राहील असें आम्हांस वाटत नाहीं. लोकांचें काय म्हणणें आहे तें खोडून टाकण्याचा जर सरकारनें प्रयत्न केला असता तर या ठरावास थोडेंबहुत तरी निःपक्षपातीपणाचें स्वरूप आलें असतें. पण लोकांच्या आक्षेपांस उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां युरोपियन अधिकारी तेवढे चांगले, नेटिव्ह तेवढे वाईट आणि हिंदुलोकांच्या उद्धटपणामुळेंच दंगे उपस्थित झाले असें जेव्हां सरकार प्रसिद्ध करीत आहे, तेव्हां आमच्या सरकारच्या न्यायबुद्धीची, कर्तृत्वाची, निःपक्षपातीपणाची, चातुर्याची आणि मुत्सदीपणाची कमाल झाली असेंच म्हटलें पाहिजे.

येवल्याच्या दंग्याची हकीगत अव्वलपासून अखेरपर्यंत आमच्या पत्रांत येऊन गेलीच आहे. सबब त्याची पुनरावृत्ति न करतां सरकारी ठरावांत ज्या कांहीं मुद्याच्या दोन चार गोष्टी आहेत तेवढ्याच येथें दाखल करतों. पहिल्यानें म्हणजे १४ सप्टेंबर रोजीं साळ्यांनीं पाटलाच्या मशिदीवरून गणपती न आणतां पोलिसनें सांगितलेल्या दुसऱ्या रस्त्यानें आणला हें फार 'शहाणपणाचें' काम केलें असें सरकारी ठरावांत स्पष्ट लिहिलें आहे. परंतु हेच शहाणे साळी पुढें बेवकूब ठरून सरकारानें त्यांस इतर हिंदुलोकांबरोबर दंग्याचे पुढारी ठरविलें आहे! वुइंटरसाहेबांचा हुकूम ता० १९ आक्टोबर रोजीं हेवर्डसाहेबांनीं फिरविला ही गोष्ट सरकारास मान्य आहे, पण त्याबद्दल हेवर्डसाहेबांस दोष न देतां उलट त्यांच्या धैर्याची, चातुर्याची आणि शहाणपणाची सरकारनें तारीफ केली आहे! ही तारीफ करण्यास सरकारास काय कारण होतें हें ठरावांत सविस्तर सांगितलें नाहीं. मि० हेवर्डसाहेबांस मोठा दंगा होईल असें वाटल्यावरून त्यांनीं तो हुकूम रद्द केला, एवढेच शब्द ठरावांत नमूद आहेत. या शब्दांवरून हेवर्डसाहेब निर्दोषी आहेत, अशी आमची व आमच्याप्रमाणें आजपर्यंत झालेल्या दंग्याची हकीकत ज्यांनीं लक्ष्यपूर्वक वाचली आहे त्यांची खात्री होईल असें दिसत नाहीं. मुसलमान लोक हायकोर्टापर्यंत गेले असतांहि जो हुकूम फिरला नाहीं तो सदर

लोकांच्या दांडगाईस भिऊन ज्या अधिकाऱ्यानें एका क्षणांत फिरविला तो अधिकारी जिल्ह्याचे अगर तालुक्याचे कामास योग्य आहे असें हेवर्डसाहेब युरोपियन नसते तर मुंबईसरकारास वाटलें असतें काय? दंग्याच्या वेळीं दंगा करणारे लोक पकडले नाहींत, ह्मणून मामलेदार जर तालुक्याचें काम करण्यास नालायक ठरतो तर एकदां दिलेला हुकूम अमलांत आणण्याचें ज्या अम्मलदाराचें धैर्य नाहीं तो तालुक्याचें अगर जिल्ह्याचें काम कसें करणार ? मुंबईसरकारानें आपल्या ठरावांत या प्रश्नाचा कांहीं एक खुलासा न करतां हेवर्डसाहेब तरुण असतांहि त्यांनीं जो मित्रेपणाचा दूरदर्शीपणा दाखविला त्याबद्दल त्यांची उलट स्तुति केली आहे. एकदां दिलेला हुकूम फिरविला तरी दंग्याच्या वेळीं हे साहेब हजर होते हा मुंबईस वसून निकाल करणाऱ्या लॉर्ड हारिस आणि त्यांचे कौन्सिलर यांच्या नजरेनें कांहीं लहानसहान धीटपणा नव्हे. कोर्टफीचा स्टांप लावला नाहीं म्हणून वुइंटरसाहेबांनीं ज्या तारा परत केल्या त्याचाहि कोठें सरकारी ठरावांत उल्लेख केलेला नाहीं. पण ठरावांत वुइंटरसाहेबांची जी स्तुति केलेली आहे त्यावरून व कायदेकौन्सिलांत आनरे० सितलवाड यांस दिलेल्या उत्तरावरून हा मोंगलाई प्रकारहि सरकारास मान्य आहे असें उघड होतें.

परंतु याहिपेक्षां ठरावांत कित्येक आणखी विलक्षण चुका केल्या आहेत. ता० २३ आक्टोबर रोजीं हिंदूंच्या देवळांतील नंदी बाहेर फेंकून दिला होता तो हिंदूंनींच दिला असावा असें हिंदू जमादार व चीफ कान्स्टेबल सांगतात, यावरून खरा प्रकारहि तसाच असावा असें या ठरावांत ध्वनित केलें आहे; परंतु डुक्कर मुसलमान लोकांनीं मारलें असेल ही गोष्ट मात्र नामदारसाहेबांस खरी वाटत नाहीं? मुंबईसरकारचें हें शहाणपण पाहून कोणासहि विस्मय व खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. हिंदूंकरतां पुराव्याचा एक कायदा व मुसलमानाकरतां दुसरा असा लॉर्ड हारिस व त्यांचे कौन्सिलर यांचा समज असल्यास न कळे. परंतु जोंपर्यंत असा प्रकार असल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं तोंपर्यंत कायद्याच्या व न्यायाच्या तत्त्वांनीं हा ठराव लिहितेवेळीं नामदारसाहेबांची खोली सोडिली असावी असें म्हणणें भाग येतें. मुसलमानांकरतां तरफदारी करण्याचा नामदारसाहेबांचा कृतसंकल्पच होता हें दुसऱ्याहि एकदोन गोष्टींवरून व्यक्त होतें. हिंदुलोकांच्या यात्रा अगर मिरवणुकी निघतेवेळीं वाद्यें वाजविणें धर्मदृष्ट्या अवश्य नाहीं व मशिदींत प्रार्थना करण्याच्या हक्कास प्रतिबंध येत असेल तर वाद्यें बंद करावींत अशा अर्थाचा सदर–फौजदारी–अदालतीचा सन १८५९ चा ठराव सरकारनें हुडकून काढविला आहे त्यावरून येवल्याच्या लोकांस मशिदीवरून वाद्यें वाजवीत नेण्याचा हक्क नाहीं असा सरकारच्या म्हणण्याचा हेतु दिसतो. परंतु सरकारचा हा समज चुकीचा आहे हें मुंबई, मद्रास आणि कलकत्ता वगैरे हायकोर्टांचे जे अलीकडील ठराव झाले आहेत त्यांवरून उघड होतें. हे सर्व

ठराव मेनसाहेबांनीं पिनल कोडच्या १८८ कलमाच्या टीकेंत दिले आहेत, आणि लॉर्ड हारिस व त्यांचे कौन्सिलर यांनीं ते वाचण्याची जर तसदी घेतली असती तर १८५९ चा ठराव प्रसिद्ध करून आपणांस आपण होऊनच किती उपहासास्पद करून घेत आहों हें त्यांस कळून आलें असतें. सार्वजनिक रस्त्यावरून पाहिजे त्यास वाद्यें वगैरे साहित्य घेऊन जाण्याची हवी तेव्हां मोकळीक व हक्क आहे हें तत्त्व सर्व हायकोर्टांनीं आतां कबूल केलें आहे. म्हणजे अर्थातच वाद्यें अमुक एक ठिकाणीं वाजवूं नयेत असें ज्यांचें म्हणणें असेल त्यांनीं तशी वहिवाट शाबित केली पाहिजे. मुंबईसरकारास कायद्याचें हें तत्त्व माहीत नसल्यास तें समजून घेण्यास पंचाईत पडली असती असें नाहीं; परंतु त्यांच्या मनाची प्रवृत्तिच हिंदूंच्या उलट झाल्यामुळें ५९ चा सदर–दिवाणी–अदालतीचा ठराव त्यांस हुडकून काढावा लागला. सदर–दिवाणी–अदालतीचा हा ठरावहि मुसलमानलोकांस फारसा अनुकूल आहे असें नाहीं. प्रार्थना चालली असतां मशिदीवरून वाद्यें वाजवीत जाऊं नये इतर वेळीं जाण्यास हरकत नाहीं असें त्यांत स्पष्ट सांगितलें आहे; व या ठरावाप्रमाणेंच सरकारास निकाल कर्तव्य असेल तर मुसलमानलोकांच्या ज्या दोनचार प्रार्थनेच्या वेळा असतील तेवढ्या खेरीज करून मशिदीवरून वाद्यें वाजवीत नेण्यास सरकारनें हिंदूंस परवानगी दिली पाहिजे. परंतु आमचें मुंबईसरकार इतकें आंधळें झालें आहे कीं, हिंदु अगर मुसलमानलोकांनीं एकमेकांच्या देवालयावरून कधींहि वाद्यें वाजवीत जाऊं नये असा वुइंटरसाहेबांनीं ठराव केल्यास तो सरकार मान्य करील असें त्यांनीं म्हटलें आहे. सदर–दिवाणी–अदालतीच्या व हायकोर्टाच्या ठरावांवरून हें अनुमान कसें निघतें हें आम्हांस समजत नाहीं व मुंबई–कौन्सिलच्या बाहेरील कायदेपंडितासहि तें कळेल असें आम्हांस वाटत नाहीं. असल्या न्यायाच्या भानगडींत पडण्यापेक्षां मुंबईसरकारनें हा निकाल व त्याचें काम हायकोर्टाकडेच जर सोंपविलें असतें तर अव्यापारेषु व्यापार करून वेडेपणा पदरीं घेतल्याचा दोष तरी त्यांजकडे आला नसता.

पक्षपात, वेडेपणा आणि आपल्या अधिकाऱ्यांची बाजू राखण्याची अनिवार इच्छा या दोषत्रयानें या ठरावास बहुतेक मूर्छित केल्यासारखें केलें आहे हें वरील विवेचनावरून सिद्ध होईलच. तथापि आणखी एक दोन गोष्टी राहिल्या आहेत त्या येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हिंदुलोकांनीं बंदी केली म्हणून दंगा झाला व बंदी करावी असा सल्ला देणारे किंवा केलेली बंदी मान्य करणारे गृहस्थ दंगेखोरांप्रमाणेंच दोषास पात्र आहेत असा मुंबईसरकारचा समज आहे. म्हणजे हेवर्ड, वुइंटर, आदिकरून मंडळीनें हिंदुलोकांच्या हक्कांची कितीहि पायमल्ली केली तरी हिंदुलोकांनीं नेहमीं सौम्यपणा दाखवावा, अधिकाऱ्यांची चुकी बाहेर काढूं नये आणि मुकाट्यानें हिंदुमुसलमानांचा मिलाफ करण्याचा प्रयत्न करावा अशी नामदारसाहेबांची इच्छा आहे. सेक्रेटरीएटच्या खोलीमध्यें

बसून इलाख्याचा राज्यकारभार करूं इच्छिणाऱ्या गव्हर्नरसाहेबांची खरोखरच अशी इच्छा असली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. त्यांची इच्छा त्यांस ती लखलाभ होवो. आम्हांस मात्र ती बिलकूल कबूल नाहीं; इतकेंच नव्हे तर असला सौम्यपणा हिंदुलोकांनीं दाखविणें अगदीं भित्रेपणाचें व नामर्दपणाचें लक्षण असून त्यामुळें आपल्या हातून आपणांस अन्याय करून घेण्यासारखें आहे असें आमचें मत आहे. मुंबईसरकारचा वर्तमानपत्रांवर मोठा कटाक्ष आहे व बंदी करण्याच्या कामीं वर्तमानपत्रकारांकडून लोकांस जें एक प्रकारचें उत्तेजन मिळालें तें अगदीं गैरवाजवी आहे असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु सरकारचें हें मत अगदीं आपमतलबी व निराधार आहे. हिंदुलोक सौम्य खरे व होईल तितकें करून सामोपचारांनीं अडाणी मुसलमानलोकांस त्यांनीं आपल्या बाजूचे करून घ्यावें हेंहि खरेंच; पण सौम्यपणास कांहीं मर्यादा आहे एवढी गोष्ट जर सरकारी अधिकाऱ्यांनीं लक्ष्यांत ठेविली तर हिंदुलोकांच्या हातून कधींहि गैरवर्तन होणार नाहीं अशी आमची खात्री आहे. येवल्याचा अखेरचा दंगा हिंदुलोकांनीं बंदी केल्यामुळें झाला हें म्हणणें अगदीं अन्यायाचें व गैरसमजाचें आहे; व सरकारी ठरावांत यासंबंधानें जी उडवाउडव केली आहे तीहि सरकारास बिलकुल न शोभण्यासारखी आहे. येवलें येथील हिंदुमुसलमानलोकांत वैमनस्य उत्पन्न होऊन आज सहा महिने झाले असतां बंदी केल्यामुळेंच दंगा झाला असें म्हणणें कोणाहि शहाण्या मनुष्यास शोभत नाहीं. दंग्याचें खरें कारण हिंदुलोकांचे हक्क अधिकाऱ्यांनीं बजावूं दिले नाहींत हें होय, व हेंच जर खरें कारण आहे तर ता० १४ सप्टेंबरपासून दंगा झाल्याच्या तारखेपर्यंत हिंदु आणि मुससमानलोकांकडून ज्या गोष्टी झाल्या, त्यांपैकीं हिंदुलोकांचींच एखादी गोष्ट घेऊन ती दंग्यास कारण झाली हें म्हणणें थोड्या विचाराअंतीं गैरवाजवी आहे असें एखाद्या लहान पोरासहि कळून येईल. आज नंदी उपट, उद्यां रघूजीची समाध भ्रष्ट कर, परवां मारुतीचा मांडव जाळ, असा एकसारखा चारपांच महिने मुसलमानांनीं उच्छाद मांडला होता, व हेवर्डसाहेबांनीं हुकूम रद्द केल्यापासून तर ते अगदींच शेफारून गेले होते. अधिकारी लोकांच्या हातून यांचा कांहीं बंदोबस्त होईना. तेव्हां स्वपरित्राणार्थ बंदी केल्याखेरीज हिंदुलोकांस दुसरा कायदेशीर उपायच शिल्लक राहिला नव्हता. एकानें दुसऱ्याशीं व्यवहार ठेवणें हें ज्याच्या त्याच्या खुषीवर आहे, व मुसलमानलोक जर आपणांस त्रास देतात तर त्यांची पीडा नको असें म्हणून त्यांच्याशीं सर्व व्यवहार बंद करणें कायद्यास, रीतीस अगर शहाणपणास विरुद्ध आहे असें आमच्या हल्लींच्या कर्तृत्वशून्य सरकाराखेरीज कोणासहि वाटणार नाहीं. हिंदुलोकांनीं अशा तऱ्हेचा निश्चय करूं नये असें जर सरकारास वाटत होतें तर त्यांची गाऱ्हाणीं ऐकून तीं दूर करण्याची सरकारनें कांहीं तजवीज करावयास पाहिजे होती. परंतु लॉर्ड हॅरिसपासून तों

तहत हेवर्ड, गिन्ससाहेबांपर्यंत कोणीच जर हिंदुलोकांची दाद घेतली नाहीं तर बंदीकरितां हिंदुलोकांस नांवें ठेवणें म्हणजे आपलें पाप लोकांच्या माथीं मारण्यासारखेंच आहे. लॉर्ड हारिस व त्यांचे कौन्सिलर यांस अशा रीतीनें दंग्याचा व बंदीचा संबंध जोडण्यांत मोठी चतुराई केली असें कदाचित् वाटत असेल, पण आम्हांस तर हा प्रकार अगदीं वेडेपणाचा व पक्षपातीपणाचा दिसतो. आमचें सरकार जर राजधानींत रोज होणाऱ्या खेळांत व इतर कामांत गुंतून राहून लोकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करूं लागलें तर लोकांनीं तरी काय करावें. मुसलमानांनीं गोवध केला, मारुतीपुढील मंडप जाळला वगैरे गोष्टी सरकारच्या ठरावांत कोठें नमूद झालेल्या आम्हांस आढळल्या नाहींत. मग त्या खालील अधिकाऱ्यांनींच कळविल्या नाहींत किंवा कळवूनहि ठरावांत दाखल करणें सरकारास योग्य वाटलें नाहीं हें समजण्याचें कांहीं साधन नाहीं. बंदीमुळें दंगा झाला असें जर म्हणावयाचें तर मारुतीपुढील मंडप जाळल्यानें दंगा झाला व गोवधामुळें तो जास्त चेतला असें कां म्हणूं नये ? वस्तुतः पाहतां या कामीं पहिली आगळीक कोणाची झाली हें सरकारानें ठरवावयास पाहिजे होतें. पण मुंबईसरकारच्या हल्लींच्या कौन्सिलांत तशा प्रकारची स्वतंत्र चवकशी करूं इच्छिणारा कोणी पुरुष आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

हिंदुलोकांची मशिदीवरून वाद्यें वाजविण्याची चाल पूर्वापार नसावी असें कलेक्टर आदिकरून अधिकाऱ्यांनीं केलेल्या रिपोर्टावरून दिसतें, अशा अर्थाचा सरकारी ठरावांत एक शेरा आहे; व जर ही चाल पूर्वापार चालत आलेली नसेल तर मशिदीवरून व देवळावरून कोणतेंहि वाद्य कोणीहि वाजवीत जाऊं नये अशा प्रकारची नवीन तडजोड करण्यास कांहीं हरकत नाहीं असें सरकारानें सुचविलें आहे. ज्या कौन्सिलांत बर्डवूडसारखे हायकोर्टाचे जज्ज आहेत त्या कौन्सिलाकडून अशा तऱ्हेचा ठराव व्हावा हें खरोखरच आश्चर्य होय. येवलें येथील हिंदुलोक आपली पूर्वापार चाल सिद्ध करण्यास तयार आहेत व त्यांच्याजवळ दहापंधरा वर्षांच्या पूर्वीचे सरकारी अधिकाऱ्यांनीं काढलेले कांहीं जाहिरनामेहि आहेत. असें असतां केवळ अधिकाऱ्यांनीं गुप्तपणें पाठविलेल्या रिपोर्टावर सरकारानें भरंवसा ठेवून मामूल वहिवाटीचा निकाल करणें म्हणजे एकतर्फी पुरावा घेऊन खटल्याचा निकाल करण्यासारखेंच आहे. वस्तुतः पाहतां मुंबईसरकारास हा नसता उपद्व्याप करण्याची कांहीं एक जरूर नव्हती. मामूलवहिवाट आहे कीं नाहीं याचा निर्णय कोर्टमार्फत करून घ्यावा असा जर त्यांनीं ठराव केला असता तर कोर्टांत दोन्ही पक्षकारांचा पुरावा होऊन योग्य निर्णय झाला असता. मग तो कोणासहि अनुकूल होवो कीं प्रतिकूल होवो त्याचा दोष लॉर्ड हारिस आणि त्यांचे कौन्सिलर यांजकडे तरी निदान आला नसता. मामूलवहिवाटीबद्दल जेव्हां तंटा असेल तेव्हां अशाच रीतीनें त्यांचा निकाल करावा असें डिस्ट्रिक्ट पोलिस ॲक्टांत सांगितलें

आहे; व प्रस्तुत प्रकरणींहि सरकारानें तीच व्यवस्था करावयास पाहिजे होती. परंतु ज्याअर्थीं तशी व्यवस्था घडली नाहीं त्याअर्थीं त्यांत कांहीं तरी हेतु असावा असें लोकांस वाटणें अगदीं साहजिक आहे.

असो; याप्रमाणें या ठरावांत पुष्कळच चुका झालेल्या आहेत व त्या येथें सर्व दाखवीत बसलें तर त्यास जागा मिळणेंहि अशक्य आहे. असला हा चुकीचा व पक्षपातीपणाचा ठराव हिंदुलोक अखेरचा म्हणून कबूल करतील असें आम्हांस वाटत नाहीं, व त्यांनीं करूं नये हेंच न्याय्य होय. मुंबई सरकारास आपल्या युरोपियन अधिकाऱ्यांची चूक दिसत नसली तर ती हिंदुस्थानसरकारासहि दिसणार नाहीं असें नाहीं. करतां येवलें येथील लोकांनीं स्वस्थ न बसतां या ठरावावर हिंदुस्थानसरकाराकडे अपील करावें अशी त्यांस शिफारस करून आम्ही हा लेख पुरा करतों.

❖ ❖ ❖

करवीरक्षेत्रीं राजकीय कपिलाषष्ठीचा योग

हिंदुस्थान देशांतील सर्व संस्थानामध्यें (निदान महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें तरी) कोल्हापूर संस्थानची योग्यता विशेष आहे हें दुसरीकडे या संस्थानाची जी हकीकत दिली आहे त्यावरून दिसून येईल. हिंदुस्थानचा नकाशा उघडून पाहिला असतां तांबड्या रंगाच्या समुद्रांत जीं कोठें कोठें लहानमोठीं हिरवीं पिवळीं बेटें आढळून येतात तीं गेल्या शतकांत मुसलमानी राज्याचें ज्या पराक्रमी हिंदुराजपुरुषांनीं निर्दलन केलें त्यांनीं स्थापिलेल्या हिंदुराज्याचे तुकडे होत असें कित्येक इंग्रज ग्रंथकारांचें म्हणणें आहे, व हिंदुस्थानच्या इतिहासाचें जो कोणी लक्षपूर्वक मनन करील त्यास या म्हणण्याची सत्यता बरीच नजरेस येईल. इंग्रजलोकांची या देशांत राज्यस्थापना होण्यापूर्वीच मोंगलाईची इमारत ढांसळण्यास सुरुवात झाली होती. बंगाल, औध आणि दक्षिण या मुलुखांतील सुभेदार दिल्लीच्या बादशहाचा अधिकार बहुतेक नाकबूल करून आपणास स्वतंत्र म्हणवूं लागले होते; आणि दक्षिणेंत मराठे आणि वायव्येस शीखलोक यांनीं पुन्हा हिंदुराज्य स्थापन करण्याची उमेद धरिली होती. पूर्वीच्या मुसलमानी राज्याचा बराच भाग इंग्रजांनीं बादशहाच्या सुभेदारांकडून हस्तगत करून घेतला खरा; पण नागपूर, पंजाब, सातारा आणि दक्षिण आदिकरून मुलूख मराठे आणि शीख यांजकडून जर इंग्रज लोकांकडे गेले नसते तर सन १८७७ सालचा दिल्लीदरबारचा थाट होण्यास आणखी कित्येक वर्षें जावीं लागलीं असतीं, अथवा कदाचित् तो प्रसं-

---

* [केसरी ता. ३ एप्रिल १८९४]

गाहि आला नसता. राजपुतान्यांतील रजपूत संस्थानिक हे आपणास मुसलमानी बादशाहीच्या पूर्वीच्या क्षत्रियराजांचे वंशज समजतात, व त्यांपैकीं कित्येक तर आपली वंशावळ थेट नल, पांडव, रामचंद्र आदिकरून चंद्रसूर्यवंशीय राजांपर्यंत नेऊन लावतात ! मुसलमानी बादशाहांस हीं संस्थानें अजिबात मोडून टाकून रजपूत-राजांस अगदीं नामशेष करितां आलें नाहीं हें खरें; पण कालचक्राच्या फेऱ्यामुळें मुसलमानी राज्यास जेव्हां ऱ्हासकला लागली तेव्हां या राजपुतान्यांतील वीरांच्या हातून आर्यभूमीच्या उद्धारार्थ व स्वातंत्र्यार्थ कांहीं एक प्रयत्न झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आणि प्रायः याच कारणामुळें हीं संस्थानें जरी फार पुरातन आहेत तरी मराठी संस्थानांपेक्षां त्यांस अलीकडील इतिहासांत कमी महत्व देण्यांत येतें. कसेंहि असो; हिंदुस्थानांतील मोगलाईवर नांगर फिरविणाऱ्या शूर हिंदु पुरुषांचीं आमचीं संस्थानें हीं स्मारकें आहेत असें जें कित्येक इतिहासकारांनीं म्हटलें आहे तें किती सप्रमाण आहे हें यावरून वाचकांच्या लक्षांत येईल. आतां ह्या संस्थानांचा इतिहास पाहिला असतां त्यांतलीं बहुतेक संस्थानें मुसलमानी राज्य मोडून त्याच्या ठिकाणीं जीं हिंदुराज्यें स्थापन झालीं होतीं त्यांच्या शाखाच होत असें आढळून येईल. मोगलाईचा मोड होऊन त्या ठिकाणीं हिंदुराज्याच्या नव्या वृक्षाचें जें रोंप लाविलें होतें त्याच्या शाखा राहून मुळाचा अगदीं कोठेंच मागमूस राहूं नये ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. ह्याचीं कारणें काय आहेत, हें सांगण्याची ही वेळ नव्हे. गेल्या शतकांत आमच्या लोकांनीं जें हिंदुराज्य स्थापण्यास प्रारंभ केला आणि तें बहुतेक स्थापिलें होतेंच असें म्हटलें तरी चालेल, त्याचें एक मूळ हल्लीं करवीर क्षेत्रांतच काय तें राहिलें आहे एवढें येथें सांगितलें म्हणजे या संस्थानची योग्यता आम्हास विशेष कां वाटते, व महाराष्ट्रीयांस त्याच्या भरभराटीबद्दल इतकी कळकळ व अभिमान कां असावा ह्याचें बीज कोणाच्याहि अगदीं सहज लक्षांत येईल. असल्या संस्थानास आज जो उत्सवाचा दिवस प्राप्त झाला आहे तो सर्व महाराष्ट्रीयांसहि त्याचप्रमाणें आनंदाचा आणि उत्सवाचा वाटत आहे हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं.

करवीर संस्थानच्या प्रजेस तर कोल्हापूरच्या गादीवर श्री शाहूमहाराज छत्रपती ह्यांची स्थापना झालेली पाहून प्रतिपच्चंद्रदर्शनाप्रमाणें आनंद झाला असेल यांत संशय नाहीं. कोल्हापुरासारखें छोटें राज्य खालसा करण्याचा इंग्रजसरकारच्या मनांत कधींहि हेतु नव्हता हें लोकांस माहित आहे. पण दैवगतीमुळें आज पन्नास साठ वर्षें असा कांहीं योग घडून आला आहे कीं, त्यामुळें कोल्हापूरच्या प्रजेस आपल्या राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं राहण्याचा प्रसंग बहुतेक मुळींच आला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. श्रीमंत बाबासाहेब महाराज सन १८३७ सालीं गादीवर आले, पण ते अज्ञान असल्यामुळें तेव्हांपासून दिवाणशाही, रिजंटशाही आणि कौन्सिलशाही यांस जी सुरुवात झाली आहे ती बाबासाहेब महाराज

यांच्या मुखत्यारीचीं तीन वर्षें खेरीजकरून आज तारखेपर्यंत सतत एकसारखी चालू आहे. येवढ्या मुदतींत इंग्रजी कायदेकानू, हास्पिटलें, शाळा, मोजणी, इमारती वगैरे बहुतेक इंग्रजी सुधारणा कोल्हापूरच्या राज्यांत सुरू होऊन तेथील प्रजेस खालसा मुलुखांतील प्रजेप्रमाणेंच सुयंत्रित राज्यव्यवस्थेचा अनुभव मिळाला व मिळत आहे ही गोष्ट खरी आहे; पण मराठी संस्थानच्या प्रजेचें अशा रीतीनें परकीयांनीं कितीं जरी संगोपन केलें तरी बोर्डिंगांत घातलेल्या मुलांस केव्हांना केव्हां तरी आपल्या आईबापांची आठवण होऊन त्यांच्या दर्शनाकरितां तीं जशीं उत्सुक होतात तद्वत्च करवीरसंस्थानच्या प्रजेची मनोवृत्ति झाली होती. त्यांतूनहि जेव्हां एक महाराज मुखत्यारी मिळाल्याबरोबर परलोकवासी झाले; दुसऱ्यास मुखत्यारी मिळण्यापूर्वीच हूण देशांत आर्नोनदीच्या काठीं शीताकुल होऊन देह ठेवावा लागला, आणि तिसऱ्यास युरोपियन लोकांच्या पहाऱ्यांत ज्या शहरावर त्याच्या पूर्वजांनीं स्वाऱ्या केल्या होत्या तेथेंच राम म्हणण्याचा प्रसग आला, तेव्हां स्वप्रभूच्या दर्शनाचा लाभ आतां आपणास घडतो तरी केव्हां असें संस्थानच्या प्रजेस वाटूं लागणें अगदीं स्वाभाविक होतें. संस्थानच्या खऱ्या प्रभूच्या दर्शनासाठीं प्रजेची उत्सुकता इतकी वृद्धिंगत झालेली क्वचित् आढळेल व नेक नामदार गव्हर्नरसाहेब यांनीं आपल्या भाषणांत त्याचा उल्लेख करणें अगदीं स्वाभाविक होतें. कालचा दिवस सर्व महाराष्ट्रीयांस आनंदाचा तर खराच. पण त्यांतूनहि कोल्हापूरच्या प्रजेस हा एक कपिलाषष्टीचा अपूर्व योग होता असें ह्यावरून दिसून येईल. दिवाण, रिजंट आणि कारभारी यांनीं आपापालीं कामें आस्थेनें आणि संस्थानचें कल्याण करण्याच्या बुद्धीनें बजावलीं नाहींत असें आम्ही म्हणत नाहीं. उलट त्यापैकीं कित्येकांची कारकीर्द अद्यापि कोल्हापूरचे लोक आठवीत असतात हें आम्हांस माहीत आहे. पण संस्थानचा खरा मालक अधिकारारूढ नसल्यामुळें प्रजेच्या मनांत जें एक प्रकारचें अस्वास्थ्य उत्पन्न होतें तें नुसत्या चांगल्या राज्यव्यस्थेनें दूर होत नाहीं आणि वरच्या दुधानें मुलाचें ज्याप्रमाणें पूर्ण पोषण कधीं होऊं शकत नाहीं तद्वत्च संस्थानच्या प्रजेची कांहीं अंशीं स्थिति होऊन जाते. हा प्रकार लक्षांत आणूनच सन १८८२ सालीं सर जेम्स फरग्युसन यांनीं श्रीमंत आबासाहेब कागलकर यांची रिजंटच्या जागीं नेमणूक करून रिजंट आणि कौन्सिल यांस बहुतेक पूर्ण अधिकार दिला होता. मनांत हेतु कीं श्रीमत आबासाहेब कागलकर हे करवीर संस्थानचे मांडलीक असल्यामुळें राजविरहाचा प्रजेस कांहीं तरी विसर पडेल. ही व्यवस्था कांहीं अंशीं बरी होती, पण तिचाहि करवीरसंस्थानच्या प्रजेस फार दिवस लाभ मिळाला नाहीं. सन १८८५ सालीं श्रीमंत आबासाहेब कैलासवासी झाले आणि पुन्हां दिवाण, कौन्सिल आणि एजंट यांच्याच हातीं जीं राज्यसूत्रें पडलीं तीं आजपर्यंत. अशा

स्थितींत कालचा समारंभ करवीरच्या लोकांस अतिशय आनंदाचा, अपूर्व आणि मंगलप्रद वाटला ह्यांत कांहींच नवल नाहीं !

श्रीमंत शाहूछत्रपती माहाराजांचें आजच्या अंकांत जें चरित्र व तसबीर दिली आहे त्यावरून महाराजांची वाचकांस बरीच ओळख होईल. महाराजांचे पहिल्या घरचें वडील श्रीमंत आबासाहेब कागलकर हे जर आज हयात असते तर महाराजांचें शिक्षण हल्लींच्याहून कांहीं निराळ्या प्रकारचें झालें असतें. तथापि त्यांस आजपर्यंत जें शिक्षण प्राप्त झालें आहे व जी माहिती मिळालेली आहे ती त्यांस हल्लीं जों अधिकार प्राप्त झाला आहे त्यास उपयुक्त पडेल अशाच प्रकारची दिलेली आहे. महाराजांस विलायतेस पाठविणार अशी मध्यें बातमी निघाली होती; परंतु तसा प्रकार न घडतां महाराजांस अधिकार देण्याचा आज योग घडून आला हेंच फार उत्तम झालें असें आम्हांस वाटतें. प्रवासानें मनुष्याचें मन उदार आणि विकसित होऊन निरनिराळ्या देशांतीत राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था यांचा त्यास प्रत्यक्ष अनुभव येतो ही गोष्ट खरी आहे, पण आमच्याकडील संस्थानिकांनीं असल्या भावी फायद्यासाठीं अल्पयवयांत विलायतची यात्रा करणें कांहीं अंशीं धोक्याचें आहे असें म्हणण्यास बरींच कारणें आहेत. महाराजांच्या मनांत विलायतेस जावयाचें असल्यास त्यांस अद्यापहि तिकडे जातां येईल, व त्यांनीं इकडील व्यवस्थेचा पूर्ण अनुभव घेऊन कांहीं वर्षांनीं तरी ही महायात्रा एकदां करावी असें म्हणणें कांहीं गैरवाजवी नाहीं. पण अधिकारारूढ होण्यापूर्वीच त्यांस ही यात्रा घडली पाहिजे हें म्हणणें बऱ्याच अंशीं दुराग्रहाचें होय. असो; त्याजबद्दल आज आपणास विचार कर्तव्य नाहीं. करितां या आनंदाच्या प्रसंगीं आमच्या मनांत जे संस्थानच्या संबंधानें एक दोन विचार उद्भवले आहेत ते महाराजांस कळवून हा अभिनंदपर लेख संपवितों. हिंदुस्थानच्या संस्थानिकांची स्थिति १०० वर्षांपूर्वी कशी होती व हल्लीं कशी आहे हें महाराजांस अवगत असेलच, व या स्थित्यंतरामुळें संस्थानिकांच्या कर्तव्यांतहि किती फरक झाला आहे हेंहि आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. सार्वभौम इंग्रजसरकारच्या सभोंवार समुद्राप्रमाणें पसरलेल्या राज्यविस्तारांत कोल्हापूर संस्थानाचें नांव अजरामर रहाण्यास सार्वभौम राज्यपद्धतीचा व राजकर्तव्याचा महाराजांनीं बऱ्याच अंशीं अंगीकार करणें हाच एक मार्ग होय. कोल्हापूरची राज्यव्यवस्था बहुतेक हल्लीं इंग्रजीपद्धतीवर चाललेली आहे. संस्थानांतील सर्व जमिनीची मोजणी होऊन व इनामदार लोकांचे हक्क ठरून जाऊन राज्याचें उत्पन्न १४ लाख होतें तें अठरा लाख झालें आहे; शाळा, कोर्टें, पोस्टऑफिसें, दवाखाने, कॉलेज, आगगाडी, सडका वगैरे सुधारलेल्या राज्यपद्धीस अवश्य लागणारीं सर्व साधनें कोल्हापूरकरांस गेल्या २५।३० वर्षांत प्राप्त झालीं आहेत; तिजोरींत दहा बारा लाख रुपये शिल्लक आहेत; आणि संस्थानचे सर्व व्यवहार खालसा मुलखांतील राज्यकारभाराप्रमाणें

अगदीं सुरळति चालू आहेत. सारांश इतक्या प्रकारें व्यवस्थित स्थितींत कोणाहि महाराजांस यापूर्वीं राज्य मिळालें नसेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि महाराजांस त्यामुळें कांहीं कर्तव्य उरलें नाहीं, असें मात्र त्यांनीं समजतां कामा नये. उलट लॉर्ड हारिस यांनीं सांगितल्याप्रमाणें ही राज्यव्यवस्था याहिपेक्षां उत्तरोत्तर जास्त जास्त सुधारण्याची व ती सुधारणा अमलांत आणण्यास योग्य ऑफिसर निवडण्याची जबाबदारी आतां महाराजांवर येऊन पडली आहे. इंग्रज सरकारची राज्यव्यवस्था जरी सुयंत्रित आहे तरी लोकांस त्यांनीं जितके हक्क द्यावयास पाहिजे होते तितके दिले नाहींत असा त्यांच्यावर आक्षेप आहे, व स्थानिक स्वराज्याचे जे थोडेबहुत हक्क आम्हांस हल्लीं देण्यांत येत आहेत त्यांवरून हा आक्षेप अगदीं यथार्थ आहे असें दिसून येतें. धंदेशिक्षणाच्या संबंधानेंहि इंग्रजसरकारानें करावी तितकी अद्याप व्यवस्था केली नाहीं, व प्राथमिक शिक्षणाचाहि प्रकार त्यांतलाच होय. या सर्व सुधारणा हिंदुस्थानांत प्रथम सुरू करण्याचें श्रेय संस्थानिकांस सहज प्राप्त करून घेण्यासारखें आहे. बडोदा आणि म्हैसूर या संस्थानांचे अधिपती त्याप्रमाणें प्रयत्न करीत आहेत; व श्रीमंत शाहू-महाराज ह्यांच्या कारकीर्दीत कोल्हापुरकरांसहि या सुधारणांचा लाभ होईल अशी आमची उमेद आहे. कोल्हापूर संस्थानचीं राज्यसूत्रें संस्थानच्या खऱ्या अधिपतीच्या आज बऱ्याच वर्षें हातांत नसल्यामुळें सदर संस्थानचा त्याचे मांडलिक व सार्वभौम राज्यकर्ते यांच्याशीं परस्पर संबंध कोणत्या प्रकारचा असावा ह्याचाहि देशकालानुरूप निर्णय करण्याचें काम हल्लींच्या महाराजांसच करावें लागेल. इंग्रजसरकारच्या मेहरबानीनें कोल्हापूरच्या अकरा मांडलीक संस्थानांपैकीं कांहीं संस्थानिक महाराजांप्रमाणें सुशिक्षित असून त्यांचे समवयस्क आहेत. करितां वर निर्दिष्ट केलेली व्यवस्था करण्यास हल्लींच्या इतकी चांगली वेळ पुनः यावयाची नाहीं असें आम्हांस वाटतें. सारांश कोल्हापूर संस्थानची व्यवस्था आज किती जरी सुयंत्रित असली तरी त्यांत सुधारणा करण्यास अद्याप पुष्कळ जागा आहे, व महाराजांस आजपर्यंत जें सुशिक्षण मिळालें आहे त्यावरून या सुधारणा त्यांच्या कारकीर्दीत अमलांत येऊन कोल्हापूर संस्थान राज्यव्यवस्थेंत इतर संस्थानांच्या किंबहुना इंग्रजी राज्याच्याहि पुढें जाईल अशी आम्हांस आशा आहे.

आपल्याकंडील संस्थानिकांचीं हल्लींच्या कालांत कोणतीं कर्तव्यें आहेत हें यापेक्षां विस्तारें करून सांगण्याची आज जरूरी नाहीं. कोल्हापूरचें राज्य ज्यांनीं स्थापन केलें त्यांच्या वंशांतील पुरुषांनीं जीं महत्कृत्यें केलीं, जो देशाभिमान दाखविला, व जी कीर्ति संपादन केली ती इतिहासविश्रुत आहे. हल्लींचा काल बदलला आहे खरा; तथापि सकल महाराष्ट्रीयांस अभिमानास्पदीभूत झालेल्या श्रीशिवछत्रपतीच्या वंशांतील पुरुषांनीं अद्यापहि आपल्या संस्थानांतील प्रजेच्या, महाराष्ट्रीयांच्या किंबहुना हिंदुस्थानवासी लोकांच्या कल्याणासाठीं पुष्कळ गोष्टी

करण्यासारख्या आहेत. हिंदुत्वाचा योग्य अभिमान बाळगून त्याच्या अभ्युदयाकरितां निष्कामबुद्धीनें आपला देह झिजविणें हें कोल्हापूरकर महाराजांचें कुलव्रत आहे, व तें पाळण्यास श्रीमंत शाहूछत्रपतीमहाराजांस ईश्वर सुबुद्धि, धैर्य, आणि दीर्घायुष्य देवो, व महाराजांस त्याप्रमाणें यशःप्राप्ति होऊन त्यांचा स्वदेव सारखा उत्कर्ष होवो अशी आजच्या मंगलप्रसंगीं प्रार्थना करून हा स्वल्प अभिनंदनपर लेख येथेंच संपवितों.

❁ ❁ ❁

* बदसल्लागार कोण ?

अलीकडे अलीकडे हिंदुस्थानांतील मोठमोठ्या सरकारी युरोपियन कामगारांचें जें वर्तन नजरेस येतें त्यामुळें हल्लीं या कामगारांच्या वर्गास उतरतीकळा लागली आहे कीं काय असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था चांगली राखण्यास युरोपियन सनदी नोकर असल्याशिवाय निभाव लागणार नाहीं या समजुतीवरच सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा विलायतेंत घेण्यांत येते, व नेटिवांचा सदर नोकरींत प्रवेश होऊं देत नाहींत. परंतु गेल्या पंधरावीस वर्षांतील युरोपियन सनदी नोकरांची कर्तबगारी पाहवी तों एकंदरींत समाधान मानण्यासारखी स्थिति आढळून येत नाहीं. लोकांत मिळून मिसळून वागणें, त्यांच्या पुढाऱ्यांशीं संबंध ठेऊन त्यांची खरी स्थिति समजून घेण्याचा प्रयत्न करणें, त्यांस ममतेनें वागवूनहि आपली त्यांच्यावर छाप राखणें इत्यादि वरिष्ठ कामगारांत असणारे अवश्य गुण हल्लींच्या युरोपियन अधिकाऱ्यांत दृष्टीस पडत नाहींत, असें हिंदुमुसलमानांमध्यें जे दंगे हल्लीं होत आहेत त्यांवरूनच दिसून येतें. पन्नास वर्षांपूर्वी हिंदुस्थानची जी स्थिति होती त्यापेक्षां आतां ती पुष्कळ बदलली आहे व विद्येचा प्रसार आणि कॉंग्रेस, कान्फरन्स वगैरे सार्वजनिक संस्था यांच्या योगानें राज्य करण्याचें काम उत्तरोत्तर कठीण होत चाललें आहे ही गोष्ट खरी आहे; पण राज्य करण्याचें काम जर कठीण होत चाललें तर त्या मानानें अधिकारी वर्गाचें शहाणपणहि वाढत जावयास पाहिजे. तें वाढलेलें दिसत नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे, व याचा परिणाम अखेरीस काय होईल हें आज सांगतां येत नाहीं. हिंदुमुसलमानांमधील तंटे सोडून दिले तरी इतर कारणांमुळें जे दंगे उद्भवतात त्यांच्या हकीकतीवरूनहि आम्हीं वर लिहिल्याप्रमाणेंच अनुमान निघतें. उदाहरणार्थ आसामचा दंगा घेऊं. हा दंगा आसामच्या शेतकऱ्यांनीं गेल्या फेब्रुवारींत केला व तो मोडण्यास कांहीं शेतकऱ्यांवर गोळ्या घालाव्या लागल्या असें प्रसिद्ध

* [केसरी–ता. १० एप्रिल १८९४]

झालें आहे. या दंग्यासंबंधीं हिंदुस्थानसरकारच्या विलायतसरकारकडे गेलेल्या खलित्याचा जो सारांश बाहेर आला आहे त्यावरून असें उघड होतें कीं, हा दंगा जमिनीवरील सारा एकदम अतिशय वाढाविल्यामुळें उत्पन्न झाला. पूर्वीच्या पैमाषींत आसाम प्रांतांत जो सारा बसविला होता त्यापेक्षां नव्वद सालच्या पैमाषींत कांहीं ठिकाणीं शेंकडा पंचवीस, कांहीं ठिकाणीं शेंकडा पन्नास व कांहीं ठिकाणीं शेंकडा शंभर म्हणजे दुप्पट सारा वाढाविण्यांत येऊन सगळ्या प्रांतांत सोळा लाख रुपये अथवा सरासरीनें शेंकडा त्रेपन या मानानें साऱ्याची वाढ करण्याचें सरकारानें मनांत आणलें. अशा रीतीनें सारा वाढाविला असतां लोकांवर जुलूम होऊन लोक नाराज व दंगा करण्यास प्रवृत्त होतील हें कलेक्टर आदिकरून मोठ्या कामगारांस कळावयास पाहिजे होतें. पण तसा प्रकार घडून आला नाहीं व चीफ कमिशनरच्या भरंवशावर हजारों लोकांचे अर्ज आले तरी हिंदुस्थानसरकारानें तिकडे बरेच दिवस लक्ष दिलें नाहीं. पण ही स्थिति किती दिवस चालणार ? साऱ्याचें ओझें सोसण्याची रयतेस कितपत शक्ति आहे या गोष्टीचाहि ज्यांस नीट अदमास करितां येत नाहीं अशा अधिकाऱ्यांच्या चुकीनें व खालील अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवून स्वस्थ बसणाऱ्या हिंदुस्थानसरकारच्या हयगर्यीनें लोक अगदीं त्रासून गेले, व निराश होऊन त्यांपैकीं कित्येकांनीं दंगाहि केला. शेतकऱ्यांची अशा प्रकारची फार दुर्दशा होत चालली आहे व केव्हांना केव्हां तरी त्यापासून इंग्रजी राज्यावर संकट ओढवणार आहे असें जेव्हां गेल्या सालीं ह्यूमसाहेबांनीं बोलून दाखविलें तेव्हां त्यांजवर इंग्रजी वर्तमानपत्रकारांनीं शिव्यांची चांगली वृष्टि केली होती, व ह्यूमसाहेबांस निमकहराम व राजद्रोही ठरविलें होतें. परंतु सदर लेख लिहिल्यापासून वर्ष दोन वर्षांच्या आंतच वाढलेला सारा देण्याची शक्ति नाहीं म्हणून आसामसारख्या एका कोंपऱ्यांतल्या प्रांतांतील लोक दंगा करण्यास प्रवृत्त झाले यावरून ह्यूमसाहेबांनीं केलेलें अनुमानच बरोबर होतें असें म्हणावें लागतें. हे दंगे कसे मोडावे आणि ते पुनः न उद्भवण्यास काय उपाय योजावे हा हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांस हल्लीं मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे व राणीसरकारच्या राज्याचें हित चिंतणाऱ्या लोकांनीं तिकडे अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे. वायव्य दिशेकडून रशियाचे जे प्रयत्न चालू आहेत त्यांचा प्रतिकार करणें फारसें अवघड पडणार नाहीं; परंतु हिंदुमुसलमानांचे व शेतकऱ्यांचे दंगे समूळ नाहींसे करण्याचा जर कोणी शहाणपणानें व दूरदर्शीपणानें उद्योग केला नाहीं, तर त्यापासून सरकारास व प्रजेस पुष्कळ त्रास होण्याचा संभव आहे. यामुळें राज्यक्रांतीची भीति बाळगावयास नको ही गोष्ट खरी आहे, पण राज्यक्रांतीची भीति नाहींशी झाली म्हणजे राज्यकर्त्यांचें सर्व काम आटोपलें अशी आमची समजूत नाहीं. राज्य सुरळीत चालण्यास त्यांतील प्रजा सुखी असून राज्यांतील निरनिराळ्या लोकांत प्रेमभाव असला पाहिजे " आमच्या प्रजेची आबादानी हेंच

आमचें सामर्थ्य " असें जें दयाळू राणीसरकारांनीं आपल्या जाहिरनाम्यांत म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे; आणि तशी स्थिति आणण्याचा जे अधिकारी अगर मुत्सद्दी प्रयत्न करणार नाहींत ते जाणून बुजून म्हणा अगर अज्ञानानें म्हणा राणीसरकारच्या राज्याचें एकप्रकारें अहितकर्तेच होत असें म्हटलें पाहिजे.

येवलें येथील दंग्याच्या संबंधानें मुंबईसरकारचा किंवा आसामच्या दंग्यासंबंधानें हिंदुस्थानसरकारचा जो ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यावरून वरील विचार आज आमच्या ध्यानांत आले. हे दंगे कोणत्या कारणामुळें झालें हें उघड उघड दिसत असतां तिकडे दुर्लक्ष करून व तीं कारणें नाहींशीं करण्यास ज्या तजविजी केल्या पाहिजेत त्यांचा बिलकूल विचार न करितां सदर दंग्याबद्दल सरकारनें सर्व दोष लोकांस वाईट सल्ला देणाऱ्या गृहस्थांवर लादला आहे व आपल्या अधिकाऱ्यांस दोषमुक्त केलें आहे. हे वाईट सल्ला देणारे गृहस्थ कोण हें जरी ठरावांत स्पष्टपणें लिहिलेलें नाहीं, तरी सरकारचा रोख कोणच्या प्रकारचा आहे हें सदर ठराव वाचणारास सहज कळून येण्यासारखें आहे. सुमारें पन्नास वर्षांपूर्वी सरकारी अधिकारी व विशेषतः युरोपियन अधिकारी म्हणजे देव अशी जी समजूत होती ती आतां कमी होत जाऊन सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावरून वर्तमानपत्रांतून व सार्वजनिक संस्थांच्या अर्जांतून जी कडक टीका येते व ज्यामुळें लोक अधिकाऱ्यांनीं केलेला ठराव किंवा हुकूम पूर्वीप्रमाणें शिरसावंद्य न समजतां अधिकाऱ्यांस उलट गोष्टी सांगूं लागतात, तो प्रकार सरकारी अधिकाऱ्यांस व विशेषतः करून " हम् करेसो कायदा " हें तत्त्व ज्यांच्या डोक्यांत पूर्ण बिंबून गेलें आहे अशा कामगारांस असह्य वाटूं लागला आहे. यांची अशी समजूत आहे कीं, ईश्वरानें विचार, शहाणपणा आणि कर्तृत्वशक्ति या सर्वांचा गड्डा आपणांजवळ आणून दिला आहे. आम्ही हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां राज्य करीत आहों व आम्ही ज्या ज्या गोष्टी करतों त्या त्या गरीब रयतेनें मुकाट्यानें ऐकून घेऊन त्यास मान डोलवावी. या विरुद्ध जर त्यास कोणी सल्ला दिली तर सल्ला देणारा राजद्रोही आणि त्याची सल्ला वाईट आहे असें सरकारनें मानलें पाहिजे. तात्पर्य, अधिकारी लोक आणि सार्वजनिक संस्थांतील लोक असे जे हल्लीं इंग्रजी विद्येच्या प्रसारानें दोन वर्ग झाले आहेत त्यापैकीं दुसऱ्या वर्गांतील लोकांच्या वाईट सल्लयानें लोकांचीं मनें बिघडून जाऊन ते दंगा करण्यास प्रवृत्त होतात असा सरकारचा गर्भित अर्थ आहे. ही गोष्ट जितक्या स्पष्ट रीतीनें सांगावयास पाहिजे होती तितक्या स्पष्ट रीतीनें ठरावांत सांगितली नाहीं; पण ठरावाचा ध्वनितार्थ वर लिहिल्याप्रमाणेंच आहे हें कोणाहि धूर्त वाचकाच्या तेव्हांच लक्षांत येईल. वर्तमानपत्रें व सार्वजनिक संस्था यांच्या योगानें वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांचें काम बरेंच अवघड होत चाललें आहे ही गोष्ट आम्हीं वर नमूद केलीच आहे; पण त्यामुळें

अधिकारी वर्गानें या दुसऱ्या वर्गावर तुटून पडावें व त्यांस बदसल्लागार ठरविण्याचा प्रयत्न करावा हें आमच्या मतें अगदीं वेडेपणाचें व चुकीचें कृत्य आहे. शेतकरी लोकांस वाढलेला सारा जबर असल्यास तो देऊं नये असा उपदेश करण्यास कोणाचीहि जरूर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. जमिनीवर सारा वाढाविण्याची कांहीं तरी यत्ता आहे हें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनींच कबूल केलें आहे. त्या यत्तेच्या बाहेर सारा वाढला व तो लोकांस असह्य झाला तर हिंदुलोक हाडाचे गरीब म्हणून पहिल्यानें स्थानिक सरकाराकडे, मग हिंदुस्थानसरकाराकडे व अखेरीस विलायतसरकाराडेहि अर्ज करतील; पण जितकें जितकें वर जावें तितकें तितकें सरकार जास्त आंधळें असा जर त्यांस अनुभव येऊं लागला तर त्यांचा धीर लवकरच सुटून जाऊन त्यांनीं तें साहस करण्यास प्रवृत्त व्हावें हें अगदीं स्वाभाविक आहे. सरकारी अधिकाऱ्यांस जर ही गोष्ट कळत नसली तर राज्यकारभार करण्यास ते नालायक आहेत असेंच म्हटलें पाहिजे. त्यांचा दोष दुसऱ्या वर्गांतील लोकांनीं दिलेल्या सल्ल्यावर टाकणें अगदीं अन्यायाचें व गैरशिस्त आहे. स्वतःचा दोष व नालायकी लपविण्याचा हा एक मार्ग आहे, दुसरें कांहीं एक नाहीं असें म्हणण्यास आम्हांस कोणतीहि शंका वाटत नाहीं. आपण येवल्याच्या दंग्याचेंच उदाहरण घेऊं. हा दंगा पुनः न होण्यास येवलें येथील हिंदुमुसलमान लोकांच्या मिरवणुकीच्या हक्काची कांहीं तरी योग्य व्यवस्था लावल्याखेरीज दुसरा उपाय नाहीं असें आम्हीं व दुसऱ्या पुष्कळ लोकांनीं मुंबईसरकारास सुचविलें आहे, पण तिकडे दुर्लक्ष करून व गैरवाकबगार व कांहीं अंशीं नालायक अशा कामगारांच्या रिपोर्टावर भरंवसा ठेवून आमचे गव्हर्नरसाहेब आणि त्यांचे कौन्सिलर जादा पोलीस नेमून जे एकदां स्वस्थ बसले आहेत ते कांहीं केल्या हलत नाहींत. यांची अशी समजूत आहे कीं, दंडपाणीपणा दाखविला म्हणजे हिंदुमुसलमान लोक आपापसांत आपली समजूत करून घेतील, अधिकार गाजविणें एवढेंच काय तें सरकारचें कर्तव्य आहे व तेवढें आम्हीं केलें म्हणजे झालें. ही समजूत किती चुकीची व अनर्थमूलक आहे याचा आतां पूर्ण अनुभव आला आहे. करितां आम्हीं असें स्पष्ट म्हणतों कीं, वरच्याप्रमाणें सरकारास अभिप्राय देणारी मंडळीच बदसल्लागार होत. राज्याचें जर कधीं अकल्याण झालें तर तें असल्या सल्ल्यानेंच होईल. सार्वजनिक संस्थांच्या सल्ल्यानें होणार नाहीं. रयतेस कराचें ओझें सोसण्याची किती शक्ति आहे याचा अदमास करून व लोकांस हल्लीं बऱ्यावाईट गोष्टी कळूं लागल्या आहेत हें लक्षांत ठेवून सरकारी अधिकाऱ्यांनीं आतां आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. आम्हींच काय ते शहाणे व आमच्या खेरीजच काय ती चांगली सल्ला सांठविलेली आहे ही घमेंड आतां चालावयाची नाहीं. विद्याप्रसारानें लोकमत उत्तरोत्तर विशेष जागृत होत आहे व कोणतीहि गोष्ट करणें असल्यास ती न्यायास व मामूल वहिवाटीस अनुसरूनच

आमचें सामर्थ्य " असें जें दयाळू राणीसरकारांनीं आपल्या जाहिरनाम्यांत म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे; आणि तशी स्थिति आणण्याचा जे अधिकारी अगर मुत्सद्दी प्रयत्न करणार नाहींत ते जाणून बुजून म्हणा अगर अज्ञानानें म्हणा राणीसरकारच्या राज्याचें एकप्रकारें अहितकर्तेच होत असें म्हटलें पाहिजे.

येवलें येथील दंग्याच्या संबंधानें मुंबईसरकारचा किंवा आसामच्या दंग्यासंबंधानें हिंदुस्थानसरकारचा जो ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यावरून वरील विचार आज आमच्या ध्यानांत आले. हे दंगे कोणत्या कारणामुळें झालें हें उघड उघड दिसत असतां तिकडे दुर्लक्ष करून व तीं कारणें नाहींशीं करण्यास ज्या तजविजी केल्या पाहिजेत त्यांचा बिलकूल विचार न करितां सदर दंग्याबद्दल सरकारनें सर्व दोष लोकांस वाईट सल्ला देणाऱ्या गृहस्थांवर लादला आहे व आपल्या अधिकाऱ्यांस दोषमुक्त केलें आहे. हे वाईट सल्ला देणारे गृहस्थ कोण हें जरी ठरावांत स्पष्टपणें लिहिलेलें नाहीं, तरी सरकारचा रोख कोणच्या प्रकारचा आहे हें सदर ठराव वाचणारास सहज कळून येण्यासारखें आहे. सुमारें पन्नास वर्षांपूर्वी सरकारी अधिकारी व विशेषतः युरोपियन अधिकारी म्हणजे देव अशी जी समजूत होती ती आतां कमी होत जाऊन सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावरून वर्तमानपत्रांतून व सार्वजनिक संस्थांच्या अर्जांतून जी कडक टीका येते व ज्यामुळें लोक अधिकाऱ्यांनीं केलेला ठराव किंवा हुकूम पूर्वीप्रमाणें शिरसावंद्य न समजतां अधिकाऱ्यांस उलट गोष्टी सांगूं लागतात, तो प्रकार सरकारी अधिकाऱ्यांस व विशेषतः करून " हम् करेसो कायदा " हें तत्त्व ज्यांच्या डोक्यांत पूर्ण बिंबून गेलें आहे अशा कामगारांस असह्य वाटूं लागला आहे. यांची अशी समजूत आहे कीं, ईश्वरानें विचार, शहाणपणा आणि कर्तृत्वशक्ति या सर्वांचा गठ्ठा आपणांजवळ आणून दिला आहे. आम्ही हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां राज्य करीत आहों व आम्ही ज्या ज्या गोष्टी करतों त्या त्या गरीब रयतेनें मुकाट्यानें ऐकून घेऊन त्यास मान डोलवावी. या विरुद्ध जर त्यास कोणी सल्ला दिली तर सल्ला देणारा राजद्रोही आणि त्याची सल्ला वाईट आहे असें सरकारनें मानलें पाहिजे. तात्पर्य, अधिकारी लोक आणि सार्वजनिक संस्थांतील लोक असे जे हल्लीं इंग्रजी विद्येच्या प्रसारानें दोन वर्ग झाले आहेत त्यापैकीं दुसऱ्या वर्गांतील लोकांच्या वाईट सल्लयानें लोकांचीं मनें बिघडून जाऊन ते दंगा करण्यास प्रवृत्त होतात असा सरकारचा गर्भित अर्थ आहे. ही गोष्ट जितक्या स्पष्ट रीतीनें सांगावयास पाहिजे होती तितक्या स्पष्ट रीतीनें ठरावांत सांगितली नाहीं; पण ठरावाचा ध्वनितार्थ वर लिहिल्याप्रमाणेंच आहे हें कोणाहि धूर्त वाचकाच्या तेव्हांच लक्षांत येईल. वर्तमानपत्रें व सार्वजनिक संस्था यांच्या योगानें वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांचें काम बरेंच अवघड होत चाललें आहे ही गोष्ट आम्हीं वर नमूद केलीच आहे; पण त्यामुळें

अधिकारी वर्गानें या दुसऱ्या वर्गावर तुटून पडावें व त्यांस बदसल्लागार ठरविण्याचा प्रयत्न करावा हें आमच्या मतें अगदीं वेडेपणाचें व चुकीचें कृत्य आहे. शेतकरी लोकांस वाढलेला सारा जबर असल्यास तो देऊं नये असा उपदेश करण्यास कोणाचीहि जरूर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. जमिनीवर सारा वाढाविण्याची कांहीं तरी यत्ता आहे हें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनींच कबूल केलें आहे. त्या यत्तेच्या बाहेर सारा वाढला व तो लोकांस असह्य झाला तर हिंदुलोक हाडाचे गरीब म्हणून पहिल्यानें स्थानिक सरकाराकडे, मग हिंदुस्थानसरकाराकडे व अखेरीस विलायतसरकाराडेहि अर्ज करतील; पण ज़ितकें ज़ितकें वर जावें तितकें तितकें सरकार जास्त आंधळें असा जर त्यांस अनुभव येऊं लागला तर त्यांचा धीर लवकरच सुटून जाऊन त्यांनीं तें साहस करण्यास प्रवृत्त व्हावें हें अगदीं स्वाभाविक आहे. सरकारी अधिकाऱ्यांस जर ही गोष्ट कळत नसली तर राज्यकारभार करण्यास ते नालायक आहेत असेंच म्हटलें पाहिजे. त्यांचा दोष दुसऱ्या वर्गांतील लोकांनीं दिलेल्या सल्लयावर टाकणें अगदीं अन्यायाचें व गैरशिस्त आहे. स्वतःचा दोष व नालायकी लपविण्याचा हा एक मार्ग आहे, दुसरें कांहीं एक नाहीं असें म्हणण्यास आम्हांस कोणतीहि शंका वाटत नाहीं. आपण येवल्याच्या दंग्याचेंच उदाहरण घेऊं. हा दंगा पुनः न होण्यास येवलें येथील हिंदुमुसलमान लोकांच्या मिरवणुकीच्या हकाची कांहीं तरी योग्य व्यवस्था लावल्याखेरीज दुसरा उपाय नाहीं असें आम्हीं व दुसऱ्या पुष्कळ लोकांनीं मुंबईसरकारास सुचविलें आहे, पण तिकडे दुर्लक्ष करून व गैरवाकबगार व कांहीं अंशीं नालायक अशा कामगारांच्या रिपोर्टावर भरंवसा ठेवून आमचे गव्हर्नर-साहेब आणि त्यांचे कौन्सिलर जादा पोलीस नेमून जे एकदां स्वस्थ बसले आहेत ते कांहीं केल्या हलत नाहींत. यांची अशी समजूत आहे कीं, दंडपाणीपणा दाखविला म्हणजे हिंदुमुसलमान लोक आपापसांत आपली समजूत करून घेतील, अधिकार गाजविणें एवढेंच काय तें सरकारचें कर्तव्य आहे व तेवढें आम्हीं केलें म्हणजे झालें. ही समजूत किती चुकीची व अनर्थमूलक आहे याचा आतां पूर्ण अनुभव आला आहे. करितां आम्हीं असें स्पष्ट म्हणतों कीं, वरच्याप्रमाणें सरकारास अभिप्राय देणारी मंडळीच बदसल्लागार होत. राज्याचें जर कधीं अकल्याण झालें तर तें असल्या सल्लयानेंच होईल. सार्वजनिक संस्थांच्या सल्लयानें होणार नाहीं. रयतेस कराचें ओझें सोसण्याची किती शक्ति आहे याचा अदमास करून व लोकांस हल्लीं बऱ्यावाईट गोष्टी कळूं लागल्या आहेत हें लक्षांत ठेवून सरकारी अधिकाऱ्यांनीं आतां आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. आम्हींच काय ते शहाणे व आमच्या खोलींतच काय ती चांगली सल्ला सांठविलेली आहे ही घमेंड आतां चालावयाची नाहीं. विद्याप्रसारानें लोकमत उत्तरोत्तर विशेष जागृत होत आहे व कोणतीहि गोष्ट करणें असल्यास ती न्यायास व मामूल वहिवाटीस अनुसरूनच

अधिकारी यांनीं केली पाहिजे. आमच्या दुर्दैवानें आमचीं राज्यसूत्रें महाराणीसरकारांनीं ज्यांच्या हातांत दिलीं आहेत त्यांची समजूत याहून भिन्न आहे व आपल्या अधिकाऱ्यांच्या मताविरुद्ध लोकांस जर कोणीं कांहीं गोष्ट सांगितली तर ती बदसल्ला होते असें त्यांचें मत असल्याचें त्यांनीं केलेल्या ठरावावरून दिसून येतें, व आसाम प्रांतांतहि असाच प्रकार घडून आलेला दृष्टीस पडतो. परंतु ही राजकीय चूक फार दिवस अशीच राहील असें आम्हांस वाटत नाहीं. दंग्याचीं खरीं कारणें शोधून काढून तीं निर्मूल करण्याचीं साधनें कोणतीं याचा निर्णय करणारा कोणी तरी शहाणा मुत्सद्दी इंग्रजी कामगारांत लवकरच निघेल अशी आम्हांस बळकट आशा आहे. सध्यां मेघांचें अवडंबर आलें आहे खरें, पण वस्तुस्थितीच्या तीव्र किरणांनीं हें भ्रमाचें पटल लवकरच नाहींसें होईल व खरे बदसल्लागार कोण हें जगास चांगलें कळून येण्याचा समय येईल अशी आमची मनोदेवता आम्हांस पूर्ण साक्ष देते. इंग्रजी राज्याचें स्वास्थ्य या प्रश्नाच्या निकालावर अवलंबून आहे व इंग्लंडसारख्या कर्त्या राष्ट्रांत तर स्वास्थ्य कोणच्या उपायांनीं राहील याची मीमांसा करणारा हुषार पुरुष निघणार नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं.

❖ ❖ ❖

* दंगे बंद करण्याचे दोन उपाय

आजपर्यंत दहापांच ठिकाणच्या दंग्याची जी हकीकत आली आहे त्यावरून निदान आमच्या इलाख्यांतील तरी दंगे देवाच्या मिरवणुकीच्या वगैरे बाबतींत हिंदुमुसलमानामध्यें लढा पडून उत्पन्न होतात असें स्पष्ट दिसून आलें आहे. हिंदुमुसलमानांमध्यें हे तंटे ज्यांस मिटवावयाचे असतील त्यांनीं वास्तविक पाहिलें असतां दोन्ही जातींतील लोकांच्या वर सांगितलेल्या हक्काचा प्रसंगविशेषीं कसा निर्णय करावयाचा याचा आधीं विचार केला पाहिजे. शिक्षा म्हणून जादापोलीस लोकांवर लादल्यानें अगर लोकांकरितां सरकाराश्रीं भांडणाऱ्या गृहस्थांस शिव्या दिल्यानें काम भागत नाहीं. दंगे उपस्थित होण्यास जीं कारणें आहेत तीं जेणेंकरून कमी होतील अगर नाहींशीं होतील तेच उपाय योग्य होत. कारणें कोणतीं हें आतां बहुतेक ठरल्यासारखेंच आहे. तेव्हां तीं दूर कशीं करावीं एवढाच काय तो प्रश्न राहिला. या प्रश्नाचा विचार करतेवेळीं सरकारी अधिकारी व लोक या दोघांचीं या बाबतींत काय कर्तव्यें आहेत याचा पृथक् पृथक् विचार केला पाहिजे.

---

* [केसरी ता. २४ एप्रिल १८९४]

पहिल्यानें सरकारी अधिकाऱ्यांनीं या बाबतींत काय करावयास पाहिजे तें पाहूं. येवलें प्रकरणांत सरकारी अधिकाऱ्यांकडून ज्या चुका झाल्या आहेत त्या किंवा तसल्याच मासल्याच्या दुसऱ्या चुका होण्याचा नेहमीं पुष्कळ संभव असतो. वास्तविक म्हटलें म्हणजे दोन्ही पक्षांचे हक्क काय आहेत तें पाहून त्याप्रमाणें असल्या बाबतींत निकाल दिला पाहिजे. कायद्याच्या दृष्टीनें दोन्ही धर्म समसमान मानले जातात व दोन्ही धर्मांतील लोकांचे हक्कहि समसमानच आहेत. देवळासमोर कोणीं कधींहि वाजवूं नये असा नियम घालणें चुकीचें व अन्यायाचें होईल असें मद्रास हायकोर्टानें एके ठिकाणीं म्हटलें आहे. मुसलमान व इंग्रजलोकांमध्यें जी सार्वजानिक प्रार्थनेची पद्धत आहे तशी हिंदुलोकांत सामान्यतः आढळून येत नाहीं. सबब मशिदीवरून वाद्यें न वाजवूं देण्याचे जे नियम आहेत ते सर्वांशींच हिंदुदेवालयांस लागू होतील कीं नाहीं याची थोडीशी शंका आहे. परंतु हा भाग जरी तूर्त एका बाजूस ठेवला तरी प्रार्थनेच्या वेळेखेरीज कोणत्याहि देवळावरून अगर मशिदीवरून सार्वजनिक रस्त्यानें समारंभ नेण्याचा सर्वत्रांस कायद्यानें सारखाच हक्क दिला आहे. हें मॅजिस्ट्रेटांनीं लक्षांत ठेवावयास पाहिजे. मशिदीवरून केव्हांहि कोणी वाजत गाजत जाऊं नये असा कायद्याचा नियम केल्यास एखादे ठिकाणीं मोठमोठ्या सार्वजनिक रस्यावर मशिदी बांधून कोणी सर्वच रस्ते अडवून टाकतील! सारांश प्रार्थनेच्या वेळेखेरीज (आणि या वेळा कोणत्या हें प्रसिद्ध करण्याची जबाबदारी ज्या त्या ज्ञातीवर आहे) कोणत्याहि वेळीं देवालयावरून अगर मशिदीवरून कोणताहि समारंभ नेण्यास कोणासहि हरकत होऊं नये असें कायद्याचें खरें तत्त्व आहे. मॅजिस्ट्रेटांस वाद्यें हवीं तेव्हां बंद करण्याचा जो अधिकार दिला आहे तो केवळ दंगा न होऊं देण्याकरितां दिलेला आहे. परंतु तो अधिकार फारच संकुचित आहे व कोठेंहि जरा इकूं कां चूं झालें म्हणजे मॅजिस्ट्रेटांनीं त्याचा उपयोग करावयाचा नाहीं. होतां होईल तोंपर्यंत मॅजिस्ट्रेटांनीं कायद्याचें वर दिलेलें तत्त्व पाळून ज्या त्या जातीचे हक्क त्या त्या जातींतील लोकांस बजावण्यास पूर्ण मदत केली पाहिजे. अमुक एक मशिदींतील अगर तालमींतील लोक दंगा करण्याचें भय घालतात म्हणून हिंदूंनीं सदर जागेवरून जातांना वाजवूं नये असा हुकूम देणें हा अन्याय होय. मुसलमानांनीं हिंदूंच्या अगर हिंदूंनीं मुसलमानांच्या हक्कास प्रतिबंध करण्याचें भय दाखविल्याबरोबर जर मॅजिस्ट्रेट कोणताहि समारंभ बंद करूं लागेल तर त्यांनीं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला असें म्हणावें लागेल. कारण मॅजिस्ट्रेट नसले तरी हा प्रकार घडण्यास मोठीशी पंचाईत पडेल असें नाहीं. ज्याचे अंगांत शक्ति असेल तो भय घालील आणि गरीब असेल तो ऐकेल; यास मॅजिस्ट्रेट कशास पाहिजे? अशा वेळीं बलहीन पक्षाचे योग्य हक्काचें आपल्या अधिकाराच्या जोरानें संरक्षण करणें हेंच सरकारी अधिकाऱ्यांचें मुख्य कर्तव्य

होय. आपले जवळ दंगा बंद करण्याचीं जीं कांहीं साधनें असतील त्या सर्व साधनांचा असल्या पक्षास मदत देण्याकडे मॅजिस्ट्रेटांनीं उपयोग केला तरच त्यास निःपक्षपाती व घीट म्हणतां येईल. एकंदर दंग्यांची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यांत अशा प्रकारचा घीटपणा अगर निःपक्षपातीपणा सरकारी अधिकाऱ्यांनीं दाखविल्याचीं उदाहरणें फारच कमी आढळून येतात. कसेंहि करून दंगा बंद करावा मग त्याकरितां कोणाच्याहि योग्य हक्काकडे दुर्लक्ष झालें तरी हरकत नाहीं असाच बहुतेक अधिकाऱ्यांचा समज असतो; व या समाजामुळेंच घुष्कळदां दोन ज्ञातींमधील तेढ अधिकाधिक वृद्धिंगत होत जाते. याकरितां पोलीस व फौजदारी अधिकाऱ्यांनीं प्रथमतः ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हवें तें काम बंद करण्याचा कायद्यानें जो त्यांस अधिकार दिला आहे तो कांहीं अधिकार दाखविण्याकरितां नाहीं; व विशेषतः करून हिंदुमुसलमानांमधील दंग्याचे संबंधानें या अधिकाराचा उपयोग करतेवेळीं जुनी वहिवाट व कायद्याचीं तत्त्वेंहि पाळण्याकडे सदर अधिकाऱ्यांनीं पूर्ण लक्ष दिलें पाहिजे. माजिस्ट्रेट म्हणजे सरकार अशी पुष्कळांची समजूत असते व जे दंगे निःपक्षपातीपणानें न्याय करून पहिल्यानेंच मोडतां आले असते तेच दंगे मॅजिस्ट्रेटच्या चुकीमुळें विकोपास जातात अशीं प्रत्यक्ष उदाहरणें घडून आलीं आहेत. तेव्हां दंगे बंद करण्याकरितां म्हणून जो मॅजिस्ट्रेट यास कायद्यानें अधिकार दिला आहे त्याचा दुरुपयोग न होऊं देण्याबद्दल त्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे अशी सरकाराकडून त्यांस इशारत मिळाली पाहिजे.

अधिकाऱ्यांस अशी इशारत पोंचली तरी वहिवाटीच्या व एकंदर हक्काच्या संबंधानें दोन्ही जातींमधील मतभेद मोडून मिलाफ करण्याकरितां दोहों पक्षांकडील शिष्ट लोकांची मदत घेण्याची सरकारानें तजवीज केली पाहिजे. कित्येक प्रसंगीं कायद्याचीं तत्त्वेंच केवळ अमलांत आणून उपयोग होत नाहीं, अशा समयीं लोकांची समजूत काढून त्यांस सामोपचाराच्या दोन गोष्टी सांगण्याकरितां सरकारी अधिकारी व खालील लोक यांच्या दरम्यान कोणत्या तरी तऱ्हेचे लोक अथवा मंडळ्या असल्यानें सर्वांसच फायदा होण्याचा संभव असतो. वायव्य प्रांतांतील सरकारानें या बाबतींत ज्या कमिट्या नेमल्या आहेत त्यांची रचना कदाचित् आमच्याकडे जशीच्या तशीच घेतां येणार नाहीं; तथापि सदर रचनेंत योग्य फेरफार करून त्या धर्तीवर मुंबई सरकारानें या इलाख्यांत जर ठिकठिकाणीं कमिट्या नेमल्या तर दंग्याचें बीज लवकरच नाहींसें होईल असें आम्हीं अनेक वेळां लिहिलें आहे. आमच्या मुंबईसरकारास इतका खटाटोप करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं, हें आमचें मोठें दुर्दैव आहे. ठिकठिकाणच्या हिंदु व मुसलमानलोकांनीं सारखे सारखे पंच निवडून दिले व त्यांच्या कमिट्या नेमल्या तर थोड्याबहुत अंशांनीं तरी मॅजिस्ट्रेटचा अधिकार कमी होईल अशी

सरकारास भीति वाटत नसेलना ? कसेंहि असो; या बाबतींत लोकांनीं आपलें कर्तव्य बजावून सरकार निजलें असल्यास त्यास जागें केलें पाहिजे. दंग्याच्या कारणांचा वर्तमानपत्रांतून बराच उहापोह झालेला आहे; पण अद्याप हा विषय कोणत्याहि सार्वजनिक संस्थांनीं हातीं घेतल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. या संस्थांस कदाचित् हा वादग्रस्त विषय हातीं घेण्याचें भय वाटत असेल; परंतु विषय वादग्रस्त आहे म्हणून तो सोडून द्यावयाचा हें कांहीं शहाणपणाचें काम नव्हे. बरें, सार्वजनिक संस्था सोडून दिल्या तरी निरनिराळ्या ठिकाणीं हिंदूंच्या मुसलमानांच्या अगर हिंदुमुसलमानांच्या साधेल त्याप्रमाणें सभा भरवून सरकारास या बाबतींत आपले विचार कळविण्यास काय हरकत आहे ? काजी, पंच वगैरे पूर्वी जो अधिकार चालवीत असत तोच या कामीं लोकनियुक्त पंचांच्या कमिट्यांनीं चालविल्यास त्यांत नुकसान कोणतें ? ठिकठिकाणीं निरनिराळ्या जातींचे व लोकांचे जे हक्क असतील त्यांची नोंद करावी व जेथें वाद असेल तेथें त्याचा निकाल करण्याकरितां न्याय खात्यांतील कामगारांस अधिकार असावा अशा अर्थाची सूचना सरकारास करण्यास आम्हांस तर कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. मुंबई हायकोर्टाचा रावेर प्रकरणीं जो ठराव झाला आहे त्यामुळें दिवाणी कोर्टांचा अधिकार बराच संकुचित झालेला आहे; पण सरकारचे मनांत असल्यास नवा कायदा करून तो अधिकार दिवाणी कोर्टांस देण्यास मोठीशी अडचण नाहीं. हिंदुमुसलमानांच्या कमिट्या नेमावयाच्या म्हणजे अर्थातच त्यांची रचना काय असावयाची व त्यांजकडे अधिकार किती व कसा सोंपवावयाचा याचा कायद्यानें कांहीं निर्बंध केला पाहिजे. व तो निर्बंध एखादा लहानसा तरी नवा कायदा केल्याखेरीज व्हावयाचा नाहीं. मुंबईसरकारच्या हल्लींच्या वर्तनावरून इतका खटाटोप करण्यास मुंबईसरकार आतां तयार होईल कीं नाहीं याचा बराच संशय आहे; तथापि लोकांनीं व सार्वजनिक संस्थांनीं आपलें कर्तव्य बजाविण्यास मागें-पुढें पाहूं नये अशी त्यांस आमची विनंति आहे. हे दंगे कां होतात यांचीं कारणें मागें एके प्रसंगीं सांगत असतां आम्हीं असें लिहिलें होतें कीं, दंग्यांचा विचार करते वेळीं सरकार, हिंदु आणि मुसलमान हे तीन पक्ष आहेत असें घेऊन आपणांस चाललें पाहिजे. यांपैकीं वर लिहिल्याप्रमाणें अधिकाऱ्यांनीं आपलीं कर्तव्यें कशीं बजावावीं याचा आधीं खुलासा करून नंतर कमिट्यांची स्थापना केल्यानें तिन्ही पक्षांचा मिलाफ होऊन फार दिवस धुमसत असलेलें हें प्रकरण शांत होईल असें आम्हांस वाटतें. आणि मुंबईसरकारच्या कौन्सिलांत पोक्तपणानें या प्रश्नाचा विचार करणारा जर कोणी मुत्सद्दी असेल तर त्यासहि असेंच वाटेल अशी आमची उमेद आहे.

❖ ❖ ❖

* कायदा आणि शिष्टाचार

ज्या मिरवणुकीसंबंधानें हिंदु आणि मुसलमान यांच्यामध्यें आमच्या इलाख्यांत तंटे सुरू होतात त्या रस्त्यांतून नेण्याबद्दल कायद्यांत किती व कोणत्या प्रकारचा प्रतिबंध आहे हें दुसरीकडे दिलेल्या माहितीवरून वाचकांस कळून येईल. रस्ते हे सार्वजनिक आहेत व कोणत्याहि रस्त्यावरून केव्हांहि वाजतगाजत अगर मुकाट्यानें जाण्याचा सर्वत्रांस कायद्यानें हक्क सारखाच दिला आहे. रस्त्यानें जाणाऱ्या मनुष्यांची संख्या कितीहि असो, हा हक्क सर्वांस सारखाच असतो व त्यांत जातीसंबंधानें कोणताहि भेद राखला जात नाहीं. हा सार्वजनिक हक्क कोणीहि बजावीत असतां जर त्यास कोणी हरकत करील तर त्या मनुष्यानें आपणास अशी हरकत करण्याचा काय अधिकार आहे हें दाखविलें पाहिजे. आमची इमारत रस्त्यावर आहे व ती मोठी पवित्र आहे ही सबब रस्त्याचा सार्वजनिक उपयोग करणाऱ्या मनुष्यास हरकत आणण्यास पुरी होत नाहीं असें मद्रास हायकोर्टानें ठरविलें आहे. देवळांत अगर मशिदींत जर कोणी प्रार्थना करीत असतील तर मात्र त्यांस त्रास होईल अशा रीतीनें रस्त्याचा उपयोग करूं नये असा कायद्याचा निर्बंध आहे. पण एवढ्या निर्बंधाखेरीज सार्वजनिक रस्त्यानें मिरवणूक नेण्यास कोणत्याहि प्रकारची कायद्यानें हरकत ठेविली नाहीं.

आतां मिरवणुकीसंबंधानें मॅजिस्ट्रेट जे हुकूम देतात ते देण्यास त्यांस कितपत अधिकार आहे तो पाहूं. लोकांस कायद्यानें दिलेले हक्क व अधिकार ज्यांचे त्यांस बजाविण्यास मदत करावी हें कोणत्याहि मॅजिस्ट्रेटाचें पहिलें कर्तव्य आहे. असें आमच्या हायकोर्टांनीं ठरविलें आहे. अमक्या एका रस्त्यानें अमक्या एका गृहस्थानें कधींहि जाऊं नये असा हुकूम देण्याचा मॅजिस्ट्रेट यास अधिकार नाहीं व तसा हुकूम त्यानें दिला तर हायकोर्टाकडून तो रद्द करण्यांत येईल. ज्याचे-त्याचे कायदेशिर हक्क ज्यास त्यास मिळावे असा प्रत्येक मॅजिस्ट्रेटानें होईल तितकें करून प्रथमतः बंदोबस्त केला पाहिजे; पण प्रसंगविशेषीं जर आपलेजवळ पोलीस कमी असल्यामुळें अगर अन्य कारणामुळें असा बंदोबस्त करणें धोक्याचें आहे असें मॅजिस्ट्रेटास वाटेल तर 'कांहीं होवो पण शांतता राहो' या मुद्यावर लोकांचे कायदेशिर हक्कहि त्यांस बजावूं न देण्याचा मॅजिस्ट्रेट यास फौजदारी काम चालविण्याच्या कायद्यानें अधिकार दिला आहे. पण हा अधिकार फक्त त्या प्रसंगापुरताच आहे. मॅजिस्ट्रेटाजवळ पोलिस भरपूर असून कोणी दंगा केला असतां तो मोडण्याचीं जेव्हां त्याजजवळ सर्व साधनें असतील तेव्हां हा अधिकार त्यास चालवितां येणार नाहीं. सारांश, कायदेशिर हक्क

* [केसरी ता. ८ मे १८९४]

बजावूं देण्यास प्रत्येकास मॅजिस्ट्रेटानें मदत करावी हें त्याचें पहिलें काम आहे व सदर हक्काची अम्मलबजावणी बंद ठेवण्याचा जो त्यास अधिकार दिला आहे तो अपवाद असून जवळ दंगा बंद करण्याचीं पूर्ण साधनें नाहींत अशा अडचणीच्या प्रसंगींच त्यानें त्यांचा उपयोग करावा असा कायद्याचा हेतु आहे.

म्हणजे जेथें कोणत्याहि प्रकारची पुरातन वहिवाट नाहीं तेथें हिंदुलोक आपल्या देवाची मिरवणूक मशिदीवरून नेत असतां त्यांस वाद्यें बंद करण्यास सांगण्याचा मॅजिस्ट्रेट यास अधिकार नाहीं. इतर लोकांप्रमाणेंच हिंदुलोकांचा हा सार्वजनिक हक्क आहे व तो हक्क बजावीत असतां त्यांचें संरक्षण करणें हेंच मॅजिस्ट्रेटाचें काम आहे. पण मुसलमानलोकांनीं दंगा केला असतां तो मोडण्याइतके पोलीस आपणाजवळ नाहीं असें जेव्हां मॅजिस्ट्रेटास वाटेल तेव्हां आणि फक्त तेवढ्याच प्रसंगीं शांतता राखण्याकरितां मॅजिस्ट्रेटानें जरूर असल्यास मशिदीवरून मिरवणूक, वाजंत्रीं वाजत जाणें बंद करावें; मग त्यावेळीं तेथें प्रार्थना होत असो वा नसो. असल्या अडचणीच्या प्रसंगाखेरीज मशिदीवरून भजनाची वेळ वर्ज्य करून इतर वेळीं वाजंवीत जाण्याचा सर्वत्रांस हक्क आहे इतकेंच तव्हे, तर तो हक्क बजाविण्यास मॅजिस्ट्रेट यानें मदत केली पाहिजे.

वर सांगितलेलीं कायद्याचीं तत्त्वें इतकीं स्पष्ट आहेत कीं त्याबद्दल आतां कोणत्याहि प्रकारची शंका राहिलेली नाहीं. अमक्या मशिदीवरून कधींहि वाजंत्री वाजवीत हिंदुलोकांस जाऊं देऊं नये अशा रीतीचे जे नवे नवे हक्क मुसलमान लोक सर्व ठिकाणीं सांगूं लागले आहेत त्यांस कायद्यांत कोणत्याहि प्रकारचा आधार नाहीं; व मॅजिस्ट्रेटलोकांनीं ते कबूल करून हिंदुलोकांस मिरवणुकीच्या वेळीं नव्यानव्या मशिदीवरूनहि वाजंत्रीं बंद करण्यास सांगणें हें अगदीं बेकायदेशीर व अन्यायाचें आहे. किंबहुना असला बेकायदेशीर हुकूम जर कोणी तोडला तर तो गुन्हेगार होत नाहीं असेंहि हायकोर्टानें ठरविलें आहे. असें असतां ठिकठिकाणीं, व नुकतेंच आमच्या शहरांताहि, मशिदीवरून वाजंत्रीं बंद ठेवण्याचें मॅजिस्ट्रेट यांनीं जे हुकूम दिले आहेत त्यांस आधार काय व ते कशाकरितां असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. हे हुकूम देण्यास कायद्यांत कांहीं आधार नाहीं हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. आतां त्यांस जीं दुसरीं कारणें देण्यांत येतात त्यांचा विचार करूं. हीं कारणें मुंबईसरकारनें रावेरप्रकरणीं जो नुकताच एक ठराव प्रसिद्ध केला आहे, त्यांत व मुंबईच्या ज्ञानोदय नामक खिस्ती पत्रांत पुण्याच्या दंग्यासंबंधानें जो एक इंग्रजी स्फुट लेख आला आहे त्यांत दिलीं आहेत.

आमचे खिस्ती बंधू म्हणतात कीं, "बाबांनो, मशिदीवरून वाजंत्रीं वाजत नेण्याचा जरी कायद्यानें तुम्हांस हक्क दिला असला तरी सभ्यपणाचे रीतीस अनुसरून असले क्षुल्लक हक्क बजाविण्याकरितां आपल्या मुसलमान शेजाऱ्यांचीं मनें

दुखवूं नका. ज्याचें त्याचें देऊळ ज्यास त्यास पूज्यच आहे व मुसलमानांनीं पवित्र मानलेल्या स्थानांपुढें वाद्यें बंद ठेऊन सदर स्थानांचा तुम्हीं मान राखावा यांतच तुमचा मोठेपणा व सौजन्य आहे. तुम्हां दोघांस जर एकत्र रहावयाचें आहे तर एकमेकांच्या पवित्र स्थानाबद्दल एकमेकांनीं पूज्यबुद्धि बाळगून त्याप्रमाणें वर्तन ठेवण्यास तुमचें कांहीं जात नाहीं. उद्यां जर मुसलमान लोक तुमच्याशीं याच-प्रमाणें दांडगाई करूं लागले तर काय होईल याचा विचार करा. सौजन्यानें व्यवहार करण्यास कांहीं खर्च लागत नाहीं" आमच्या जुन्या खिस्तीबंधूचा हा उपदेश किती तरी गोड आहे म्हणून सांगावा ! मिशनरी लोक नुकत्याच वयांत आलेल्या कोवळ्या पोरास जेव्हां बाटवितात व मुलास सोळा अगर अठरा वर्षें पुरीं होऊन दोन दिवस झाले आहेत आतां बापाचें कांहीं चालणार नाहीं असें जेव्हां कोर्टांत कायदेशीर बोलूं लागतात तेव्हां हे शिष्टाचार कोठें जातात ? लॉर्ड हारिस-साहेबांनीं लक्ष्मीदास खिमजी यांची भेट सुद्धां घेऊं नये अथवा रेलवेच्या शिटीनें ज्यांचीं डोकीं उठत नाहींत त्याच युरोपियनलोकांस रेलवेच्या जवळ असलेल्या रेशीम आणि सुताच्या गिरणीची शीळ कर्णकटु व असह्य होते हेंहि वरील सौज-न्याचे व शिष्टाचाराचेच मासले होत ! शिष्टसांप्रदायाच्या गोष्टीं सांगणें फार सुलभ आहे पण " कोठें गेला होता तेव्हां राधासुता तुझा धर्म " असें स्पष्टपणें विचार-णारा जेव्हां कोणी उभा राहतो तेव्हां उत्तर देण्याची किती मुष्किल पडते हें एक कर्णासच माहीत.

शिष्टाचार आणि सौजन्य हे दोन शब्द मोठे मोहक आहेत खरे; पण जरा सूक्ष्मदृष्टीनें विचार केला असतां कायदेशीर हक्क असला तरी शिष्टपणानें आणि सौजन्यानें तो बजाविण्याच्या नादीं पडूं नका असा जो आपल्या खिस्तबंधूंनीं उपदेश केला आहे व जो उपदेश मुंबईसरकारास मान्य आहे तो अगदीं चुकीचा भ्रांतिमूलक व भ्रांत्युत्पादक आहे असें कोणासहि कळून येईल. आपण प्रथमतः असा विचार करूं कीं, सुजनता आणि सौजन्य यांचा कोणी अंमल करावयाचा ? कोणीहि आपल्या शेजाऱ्याशीं नीट बोलावें तो अजारी पडला तर त्याची विचार-पूस करावी आणि अडचणींत असतां त्यास द्रव्यद्वारां मदत करावी या गोष्टीं-बद्दल कायद्यानें सक्ती होऊं शकत नाहीं. त्या ज्याच्या त्याच्या इच्छेवर व स्वभा-वावर अवलंबून असतात आणि जर कोणी अधिकारी त्याचा कायद्यानें निर्बंध करूं म्हणेल तर त्यापासून लोकांस त्रास होऊन त्यांजवर जुलूम होईल असा आतां सर्व विचारी लोकांचा सिद्धांत ठरला आहे. कायदेशीर हक्क निराळे व शिष्टचाराचे प्रकार निराळे. मानापमानाचे—उदाहरणार्थ उजवें डावें जाण्याचे—कांहीं प्रश्न कोर्टांत येऊन कोर्टमार्फत त्यांचा निकाल झाला आहे खरा, पण अशा ठिकाणीं कोर्टानें जुन्या व पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीच्या आधारेंच निकाल केला आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. विशिष्ट प्रकारच्या मानापमानाची

अगर शिष्टाचाराची जुनी वहिवाट ज्या ठिकाणीं नाहीं अगर शाबीत होत नाहीं त्या ठिकाणीं सार्वजनिक हक्क सर्वत्रांस सारखेच बजावूं देणें एवढाच काय तो कोर्टास मार्ग आहे. सारांश जुनी वहिवाट अगर कायदेशीर हक्क यांखेरीज इतर कोणत्याहि प्रकारचा सौजन्याचा, शिष्टाचाराचा अगर संभावितपणाचा हक्क कोर्ट कबूल करीत नाहीं, व असें करणें अगदीं अवश्यकहि आहे. उदाहरणार्थ आपण असें समजूं कीं, कलेक्टरसाहेब रस्त्यांतून जात असतां कोणी त्यांस सलाम केला नाहीं. आतां शिष्टाचाराच्या व सौजन्याच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे तिजोरींतून रोज शंभर रुपये काढणाऱ्या जिल्हाधिपतीस एखाद्या लंगोट्यानें सलाम न करणें हें वाजवी आहे काय ? नाहीं. मग सलाम न करणाऱ्या माणसास शिक्षा देण्यास अगर सलाम करीत जा म्हणून त्यास हुकूम देण्यास हरकत कोणती ? उघडच आहे कीं, ह्या बाबी कायद्यानें ठरवावयाच्या नव्हत. मनुष्यमात्राचे सर्व व्यवहार कायद्यानें नियंत्रित होऊं शकत नाहींत व करणेंहि इष्ट नाहीं. शिष्टचाराचा प्रकारहि त्यांतलाच होय.

वरील विवेचनावरून वाचकांच्या एवढें लक्षांत येईल कीं, कायदेशीर हक्क असला तरी सौजन्यानें तो हक्क बजाविण्याचा आग्रह धरूं नका असा जो मुंबई-सरकार व ख्रिस्तीबंधू आम्हांस उपदेश करीत आहेत तो अगदीं एकतर्फी व चुकीचा आहे. मुसलमानलोकाशीं सौजन्यानें वागूं नये अथवा शेजारधर्म पाळूं नये असें आम्ही बिलकूल म्हणत नाहीं. उलट शेजाऱ्याकरितां प्रसंगविशेषीं झीज सोसण्यासहि आपण तयार असलें पाहिजे असें आमचें मत आहे. पण हे शेजार-धर्म कोठपर्यंत ? एकमेकांचा सलोखा आहे तोंपर्यंत. शिवाय शेजारधर्म दोघां-सहि सारखेच लागू आहेत हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. चावडी व सरकारी ऑफिसें वगैरे इमारतीवरून वाद्यें बंद ठेवण्याची जी कांहीं ठिकाणीं रीत आहे ती सार्वजनिक सोयीसाठीं असून ती मुसलमानांस एक व हिंदूंस एक असा भेद नाहीं; परंतु मुसलमानांच्या मशिदीवरून हिंदूंनीं वाजत मिरवणूक काढूं नये व मुसलमानांनीं मात्र आमच्या देवांचा व देवळांचा यत्किंचित् मान राखूं नये हा न्याय कोठला ? मुसलमान लोक जर शिष्टसांप्रदाय आणि सौजन्य यांजकडे लक्ष देऊन हिंदुलोकांशीं वागण्यास तयार असतील तर हिंदुलोक त्यांच्याशीं सभ्य-पणाच्या रीतीनें वागण्यास कधींहि मागें घ्यावयाचे नाहींत, परंतु सभ्यांचा प्रकार त्याहून अगदीं भिन्न आहे. मुसलमानलोक हिंदुलोकांशीं सभ्यतेनें वागण्यास व हिंदुदेवांचा व देवालयांचा मान राखण्यास तयार नाहींत. अशा प्रसंगीं ते सांग-तील तेथें हिंदुलोकांस शिष्टाचाराच्या सबबीवर सरकारनें अगर मॅजिस्ट्रेटांनीं वाद्यें बंद करण्यास सांगणें म्हणजे मुसलमानलोकांस एक प्रकारें दंगा करण्यास उत्तेजन देण्याप्रमाणेंच आहे. आमच्या नामदार साहेबांचा वर्तमानपत्रांतील लेखकांवर मोठा कटाक्ष आहे, पण वर्तमानपत्रांतील शंभर लेखांनीं जें काम

व्हावयाचें नाहीं तें " शिष्टाचाराच्या सबबीवर मशिदीपुढें (मग ती जुनी असो वा नवी असो) हिंदुलोकांचीं वाद्यें बंद करण्यास कांहीं हरकत नाहीं " अशा आशयाचा एक गुप्त ठराव सर्व सरकारी अधिकाऱ्यांकडे धाडल्यानें होतें, हें मुंबईसरकारच्या कसें लक्षांत येत नाहीं कोण जाणें ? आम्हांस तर हा प्रकार फारच गर्हणीय वाटतो. कायदा आणि वहिवाट यांजकडे न पाहतां केवळ शिष्टाचाराच्या सबबीवर मॅजिस्ट्रेट लोकांनीं मशिदीपुढें वाद्यें बंद करवावीं आणि अशा रीतीनें कायदा झुगारून दिल्याबद्दल सरकारानें त्यांची पाठ थोपटावी यापेक्षां दुसरा अन्याय व मूर्खपणा तो कोणता असणार ? मुसलमानलोक जर दिवसानुदिवस अधिकाधिक मागण्या करण्यास व दंगे करण्यास प्रवृत्त झाले तर त्याचा सर्व दोष वरील आशयाचा गुप्त ठराव करणाऱ्या सरकारच्या माथीं येणार आहे. शिष्टाचार सक्तीनें अमलांत आणणें हें सरकारचें काम नव्हे, इतकेंच नाहीं तर सरकारकडे गेले असतां कायद्याप्रमाणेंच न्याय व्हावयाचा अशी जोंपर्यंत लोकांची समज आहे तोंपर्यंतच ते सौजन्यानें काम करण्यास तयार असतात. असो; स्थलसंकोचास्तव आजच यासंबंधानें जास्त लिहितां येत नाहीं, पुन्हा एखादे प्रसंगीं या प्रश्नाचा आणखी विचार करूं.

❁ ❁ ❁

* क्यांबेलसाहेबांस ऑनरेबल मि० फेरोझशहा मेथा यांचें उत्तर

मुंबई शहरांतील पोलिसांची संख्या वाढवावी कीं नाहीं, याबद्दल सरकार आणि म्युनिसिपालिटी यांच्यामध्यें हल्लीं मोठा कडाक्याचा वाद चालू आहे. हिंदुमुसलमानांमधील दंगा होण्यापूर्वी मुंबईचे पोलिस कमिशनर यांनीं पोलिस वाढविण्याबद्दल सरकारास शिफारस केली होती. पण त्यावेळीं ती सरकारानें नामंजूर केली. पुढें व्हिन्सेंटसाहेबांनीं दंगा झाल्यास त्याचा बंदोबस्त करण्याकरितां म्हणून जास्त पोलिस लागतें या सबबीवर सुमारें तीनशें शिपाई जास्त ठेवण्याची सरकारास सूचना केली; व सदर सूचना करितांना मागच्या पोलिसकमिशनरांनीं पोलिस वाढविण्यासाठीं जीं कारणें दिलीं होतीं त्यांचाहि आपल्या रिपोर्टांत उल्लेख केला. व्हिन्सेंटसाहेबांचा हा रिपोर्ट वर गेल्यावर या बाबतींत चौकशी करण्याकरितां सरकारानें एक कमिटी नेमली ! व त्या कमिटींत मुंबई म्युनिसिपालिटीच्या तर्फे आनरे० मि० फेरोझशहा मेथा यांची निवडणूक झाली.

* [केसरी ता. १५ मे १८९४]

कमिटीची सभा भरली तेव्हां आनरे० मि० मेथा यांनीं असें सुचविलें कीं, व्हिन्सेंटसाहेबांच्या रिपोर्टांत दिलेलीं कारणें व माहिती कितपत सबळ अगर निर्बळ आहेत हें कमिटीस पाहिलें पाहिजे; परंतु कमिटीच्या इतर सभासदांस हा प्रकार पसंत न पडतां व्हिन्सेंटसाहेबांनीं दिलेलीं कारणें खरीं धरून त्यांच्या सूचनेप्रमाणें अधिक पोलिस ठेवावे असा बहुतेक सभासदांनीं आपला अभिप्राय दिला. या कामीं ऑनरे० मि० मेथा यांच्या म्हणण्याकडे त्यांनीं इतकें दुर्लक्ष केलें कीं, कमिटीच्या रिपोर्टावर आपला अभिप्राय देण्याची सवलत देखील ऑनरे० मि० मेथा यांस त्यांनीं दिली नाहीं. कमिटीचा हा रिपोर्ट मुंबईसरकाराकडे गेल्यावर त्यावर अनुकूल अभिप्राय देऊन तो त्यांनीं हिंदुस्थानसरकाराकडे पाठविला; व म्युनिसिपालिटीस त्यावर आपलें मत विचारलें. मुंबई म्युनिसिपालिटीनें एक कमिटी नेमून त्या कमिटीनें ह्या बाबतींत आपणाकडे रिपोर्ट करावा असें ठरवून सदर रिपोर्ट येईपर्यंत म्हणजे सुमारें एक महिन्याची मुदत आपणास द्यावी अशी सरकारास विनंती केली. ही विनंती सरकारानें मान्य केली असती तर १५ मेपर्यंत म्युनिसिपालिटीस मुदत द्यावी लागली असती; परंतु सरकारची कृति नेहमींच कांहीं तरी विलक्षण असते. चार आठवड्यांच्या ऐवजीं तीनच आठवड्यांची तुम्हांस मुदत दिली आहे व ७ मेच्या आंत तुमचें मत आलें पाहिजे असें त्यांनीं म्युनिसिपालिटीस कळविलें. तेव्हां नाइलाज होऊन घाईघाईनें सभा भरवून पोलिस वाढविण्याची जरूर नाहीं अशा अर्थाचें आपलें मत गेल्या आठवड्यांत म्युनिसिपालिटीनें सरकाराकडे पाठवून दिलें. या प्रकरणीं आनरे० मि० फेरोझशहा मेथा यांनीं सरकारनें नेमलेल्या कमिटीच्या सभासदांनीं जी दांडगाई केली त्याची हकीकत मागेंच प्रसिद्ध केली होती; व गेल्या आठवड्यांत म्युनिसिपालिटीची जी सभा भरली होती तेव्हांहि एकंदर विषयाची त्यांनीं चांगली फोड करून सरकारचें वर्तन किती दांडगाईचें आहे हें स्पष्ट करून दाखविलें. ऑनरे० मि० फेरोझशहा मेथा यांच्या या वेळच्या भाषणांतील एक दोन मुद्यांचा आज आम्ही विचार करणार आहों.

पहिल्यानें प्रकृत विषयाच्या संबंधानें पाहतां पोलिसची संख्या विनाकारण वाढविण्याची जी कल्पना निघाली आहे ती केवळ पोलिसकमिशनर यांनीं आपल्या खात्याच्या अभिमानामुळें काढली आहे असें कोणासहि दिसून येईल. दोन वर्षांपूर्वी जर पोलिसांची संख्या वाढविण्याची जरूर नव्हती तर आतांच मुंबईच्या स्थितींत असा कोणता फरक झाला आहे कीं, ज्यामुळें तीनशें पोलिस जास्त ठेवावयास पाहिजे. गेल्या सालच्या दंग्याखेरीज नवें कोणतेंहि कारण दिसत नाहीं हें उघड आहे; व हें कारण सयुक्तिक नाहीं असें ऑनरे० मि० मेथा यांनीं उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन केलें आहे, मुंबईच्या दंग्यासारखा भयंकर दंगा मोडण्यास लष्करी लोकांची मदत पाहिजे हें गेल्या सालच्या दंग्यावरून पूर्णपणें सिद्ध

झालें आहे. तीनचार हजार लष्करी शिपाई आणले तेव्हां जो दंगा मिटला तो किंवा तसल्या प्रकारचा दुसरा दंगा केवळ दोनतीनशें जास्त पोलिस ठेविल्यानें उद्भवणार नाहीं असें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. लहानसहान दंगा पोलिसास मिटवितां येईल. पण मोठे दंगे मोडण्यास लष्करी लोकांचीच मदत पाहिजे हें सन १८७४ सालींच सरकारानें कबूल केलें आहे. सारांश, रोजची व्यवस्था ठेवणें व लहानसहान दंगेधोपे मिटविणें यास जेवढें अवश्य पोलिस लागेल त्यापेक्षां ज्यास्त पोलिस ठेवण्याची जरूर नाहीं, असें ऑनरे० मि० फेरोझशहा मेथा यांचे म्हणणें आहे; व म्युनिसिपालिटींतील इतर बड्या गृहस्थांचाहि त्याचप्रमाणें अभिप्राय आहे. वर सांगितलेलीं नेहमींचीं कामें पोलिसांचे हातून निर्विघ्नपणें पार पडलीं म्हणजे त्यांचें कर्तव्य संपलें; मोठा दंगाधोपा मोडणें हें त्यांचें काम नव्हे व त्याकरतां त्यांची नेमणूकहि नाहीं. याखेरीज दुसरा असाहि एक मुद्दा आहे कीं, ज्या अर्थीं मुंबई पोलिसाचा तीनचतुर्थांश खर्च म्युनिसिपालिटीस द्यावा लागतो त्या अर्थीं ज्यास्त पोलिसाच्या खर्चाचें ओझें सरकारानें म्युनिसिपालिटीवर तिच्या संमतीखेरीज बसवूं नये. जें काम सरकारी लष्करी शिपायांनीं केलें पाहिजे तें काम करण्याकरतां जादा पोलिसाची नेमणूक करून म्युनिसिपालिटीकडून त्याचा खर्च घेणें म्हणजे एक प्रकारें लष्करी खर्चाचा बोजा म्युनिसिपालिटीवर लादण्याचारचेंच आहे, असें ऑनरे० मि० फेरोझशहा मेथा यांनीं सांगितलें आहे व आमच्या दृष्टीनें ऑनरे० मि० मेथा यांची ही कोटी पुष्कळ अंशीं ग्राह्य आहे. मुंबईसरकारनें पोलिसकमिशनरच्या रिपोर्टावर भरंवसा ठेवून या बाबतींत जी दांडगाई आरंभिली आहे ती त्यांच्या नेहमींच्या क्रमास अनुरूपच आहे. परंतु युक्तीचा अगर सौजन्याचा आम्हांस त्यांत स्वल्प देखील अंश दिसत नाहीं. दोनशें शिपाई जास्त वाढविल्यानें दंगा होण्याचें अजिबात बंद होईल असें सरकारास वाटत असल्यास नकळे; आमच्या बुद्धीस तसें वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर ती कल्पनाच मुळीं चुकीची आहे व सरकारची तरी अशी समजूत कशी झाली याचें आम्हांस आश्चर्य वाटतें.

परंतु याहिपेक्षां विशेष महत्त्वाचा मुद्दा म्हटला म्हणजे ऑनरे० मि० मेथा यांनीं मि. क्यांबेल यांच्या तिसऱ्या आक्षेपास दिलेलें उत्तर हा होय. मि. क्यांबेल हे मुंबईचे कलेक्टर असून सुशिक्षित नेटिवांबद्दल त्यांच्या मनांत इतर अँग्लोइंडियनांप्रमाणेंच तिरस्कारबुद्धि वसत आहे. मुंबईंत दंगा झाला त्यावेळीं या साहेबबहादुरांस जर सरकारानें त्यांचें मत विचारलें असतें तर हा दंगा इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या चिथावणीनें झाला असें साहेबांनीं साफ लिहून दिलें असतें; परंतु साहेबांच्या दुर्दैवानें त्यांस त्यावेळीं असली संधी मिळाली नाहीं.. पुढें सरकारनें व्हिन्सेंटसाहेबांच्या रिपोर्टावर चौकशी करण्याकरितां जी कमिटी नेमिली त्यांत क्यांबेलसाहेब यांचें नांव दाखल केलें; व या कमिटीचा रिपोर्ट

लिहिण्याची वेळ आली तेव्हां साहेबांनीं आपला पूर्वीचा मनोदय पुरा करून घेतला. पोलिसांत शिकलेले नेटिव्ह लोक ठेवले असतां युरोपियन लोकांपेक्षां काम जास्त चांगलें होईल असें जें नेटिव्ह लोकांचें मागणें आहे तें फार चुकीचें आहे व दंग्याच्या वेळीं सर्व शिकलेले नेटिव्ह लोक घरोघर बसले होते यावरून त्यांचा भित्रेपणा स्पष्ट सिद्ध होतो असें साहेबांनीं आपल्या मिनिटांत लिहिलें आहे. मि. क्यांबेलसाहेबांनीं नेटिव्ह लोकांची जी ही विनाकारण निंदा केली आहे त्याचें ऑनरे० मि. फेरोझशहा मेथा यांनीं फारच चांगल्या रीतीनें निराकरण केलें आहे. ते म्हणाले कीं, क्यांबेलसाहेबांनीं नेटिव्हांवर जो हा आरोप केला आहे त्यापेक्षां अधिक आरोप करणें अशक्य आहे. कुत्सित व या असल्या आरोपामुळें क्यांबेलसाहेबांचें दौर्जन्य मात्र अधिक व्यक्त होतें. शिकलेले नेटिव्हलोक दंगा मोडण्याच्या कामीं नाखुष अगर नामर्द आहेत असें नाहीं. पण जेथें अशी स्थिति आहे कीं, एखादा शिकलेला गृहस्थ दंग्यांत सांपडल्याबरोबर लगेच त्यावर दंगेखोरांस चिथवल्याबद्दल आरोप येतो तेथें या लोकांनीं घरीं बसूं नये तर करावें तरी काय ? बरें, इतकेंहि करून बाहेर पडण्याचें कोणाच्या मनांत आलेंच तर त्यास हातांत काठीहि कोणी घेऊं देत नाहीं, मग शस्त्राची वार्ता तर दूरच. आमच्या मतें ऑनरे० मि. फेरोझशहा मेथा यांनीं क्यांबेलसाहेब यांस जें हें उत्तर दिलें तें अगदीं यथार्थ आहे. दंगा मोडण्याचे कामीं मि. व्हिन्सेंट आदिकरून युरोपियन मंडळींनीं बरीच मेहनत केली हें आम्हांस कबूल आहे; पण त्यांचेच अधिकार जर सुशिक्षित नेटिव्ह लोकांस दिले असते तर नेटिव्ह अधिकाऱ्यांच्या हातून त्यांच्याप्रमाणें बंदोबस्त झाला नसता असें म्हणण्यास बिलकूल आधार नाहीं. अधिकार आणि शस्त्रें जवळ नसलीं म्हणजे युरोपियन कामगारांचीहि कशी गाळण होते हें ५७ सालीं डोळ्यानें पाहिलेले गृहस्थ अद्याप बरेच हयात आहेत. क्यांबेल साहेबांस ग्याझिटियर लिहितेवेळीं तरी त्याची थोडी बहुत माहिती झाली असेल; पण आज ती कशास आठवते. नेटिव्ह लोकांस शस्त्रें घेण्याची परवानगी नाहीं व मोठमोठे अधिकारहि द्यावयाचे नाहींत इतकेंच नव्हे, तर उलट भित्रेपणाचा त्यांच्यावर आरोप करावयाचा हा अगदीं नीचपणाचा प्रकार नव्हे काय ?

परंतु एवढ्यानेंच क्यांबेलसाहेबांची तृप्ति झाली नाहीं. शिकलेले नेटिव्हलोक भित्रे आहेत इतकेंच नव्हे, तर ते गिरण्यांतील मजुरांस चिथावून देऊन त्यांस दंगा करण्यास प्रवृत्त करतात असाहि क्यांबेलसाहेबांनीं त्यांजवर भयंकर आरोप केला आहे. हा आरोप करण्यास क्यांबेलसाहेबांजवळ कांहीं पुरावा असल्यास तो त्यांनीं बेलाशक प्रसिद्ध करावा अशी आम्ही त्यांस सूचना करतों. शिकलेले नेटिव्ह लोक साहेबांच्या डोळ्यांत खुपत असले तरी अशा प्रकारें त्यांची निंदा करणें हें अगदीं राक्षसीपणाचें काम आहे. हिंदुमुसलमानांमधील दंगे होण्यास

क्यांबेलसाहेबासारखे दुर्विचारी, अरेरावी आणि खाल्ल्याघरचे वांसे मोजणारे गृहस्थ जितकें प्रोत्साहन देतात त्याच्या सहस्रांश देखील दुसरा कोणी देत नसेल. किंबहुना हे तंटे युरोपियन अधिकाऱ्यांच्या गैरसमजुतीनें, चुकीनें, पक्षपातानें अगर अन्यायानेंच ठिकठिकाणीं उपस्थित होतात हें आम्हीं अनेकवेळां सांगितलें आहे. मुंबईचा दंगा झाल्यावर हिंदुलोकांची पुण्यास जी एक जंगी सभा भरली होती त्यांतहि याच आशयाचा एक ठराव सर्वानुमतें पास झाला होता. हिंदुमुसलमानांमधील तंटे बहुतेक दोन जातींच्या दिवाणी हक्कांसंबंधानें असतात व हे हक्क जर युरोपियन अधिकारी न्यायानें व समतेनें राखण्याचा प्रयत्न करतील तर बहुतेक दंगे निर्मूल होतील यांत आम्हांस कांहीं शंका वाटत नाहीं. परंतु आमच्या दुर्दैवानें अशा रीतीनें राणीसरकारच्या जाहिरनाम्यास धरून वर्तन करणारा इंग्रजी कामगार क्वचितच आढळतो. जिकडे तिकडे क्यांबेलांचाच भरणा फार; व आ० मि० मेथा यांनीं सांगितल्याप्रमाणें जातीजातींत वैमनस्य उत्पन्न करणें हाच ते आपला धंदा समजतात. ऑनरे० मि. फेरोझशहा मेथा यानीं यासंबंधानें जे उद्गार काढले आहेत ते इतक्या महत्त्वाचे आहेत कीं, ते जसेच्या तसेच येथें देणें आम्हांस इष्ट वाटतें. ऑनरे० मि० मेथा यांनीं प्रथमतः क्यांबेलसाहेबांनीं सुशिक्षित लोकांवर केलेला वरील आक्षेप वाचून दाखवून पुढें असें सागितलें कीं, " क्यांबेलसाहेबांच्या या आक्षेपास उघड आणि स्पष्ट रीतीनें जबाब देणें मला भाग पडत आहे. सरकार हिंदुमुसलमानांमध्यें वैमनस्य पाडूं इच्छितें असें कित्येकांचें म्हणणें आहे व त्याचा निषेधहि कित्येकांकडून झाला आहे. सरकार आपण होऊन हे तंटे लावतें असें मी म्हणत नाहीं, परंतु क्यांबेलसाहेब आज दहा वर्षें जो दुरुद्योग करीत आहेत तसा उद्योग करणाऱ्या कित्येक गृहस्थांच्या कृत्यानें हीं वैमनस्यें बऱ्याच अंशीं उपस्थित होतात असें म्हणण्यास मला कांहींच हरकत वाटत नाहीं. क्यांबेलसाहेबांबद्दल लोकमत विचाराल तर तें असें आहे कीं, हे साहेब बहादुर पार्शी, हिंदु आणि मुसलमान या सगळ्यांचा मनांतून सारखाच द्वेष करतात. पण हिंदूंपेक्षां मुसलमानांवर आणि पारश्यांपेक्षां हिंदूंवर आपला द्वेष कमी दाखवितात. याचें कारण इतकेंच कीं, पारशांचा आपण परमावधीचा द्वेष करतों असें दाखवितां यावें. क्यांबेलसाहेबांच्या या दुष्ट कृत्याबद्दल सरकार जबाबदार नाहीं हें मला कबूल आहे, परंतु मी असें स्पष्ट सांगतों कीं, क्यांबेलसाहेबांप्रमाणें ज्यांच्या हातांत अधिकार आहे व त्यांच्या सारखेंच जे वर्तन ठेवतात त्यांच्यामुळेंच मुख्यत्वेंकरून जातीजातींमधील वैमनस्यें उत्पन्न होऊन अखेरीस मुंबईच्या दंग्यासारखे दंगे उपस्थित होतात. " आ० मि० फेरोझशहा मेथा यांनीं आपलें जें हें हृद्गत कळविलें आहे तें किती यथार्थ आहे याचा अजमास निरनिराळ्या दंग्यांची ज्यांनीं हकीकत वाचली असेल त्यांस सहज करतां येईल. आम्हीं अनेक वेळां ही गोष्ट सरकारच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न केला होता,

पण तिकडे सरकारानें अद्याप लक्ष पुरविलें नसलें तर आ० मि० फेरोझशहा मेथा यांच्या प्रस्तुतच्या भाषणानें तरी या विषयाचा विचार करण्याची सरकारच्या मनांत बुद्धि उत्पन्न होवो यवढीच आमची इच्छा आहे. शिकलेले नेटिव्ह लोक सरकारास जो सल्ला देत आहेत तोच यथार्थ आहे व क्यांबेल आणि त्यांच्या जोडीचे गृहस्थ हेच सरकारचे व देशाचे खरे शत्रु होत हें सरकारच्या जर अजून नजरेस आलें नाहीं तर आमचें व देशाचें मोठें दुर्भाग्यच समजलें पाहिजे !

❖ ❖ ❖

*दंगे ज्यास्त होण्याचीं सरकारी चार कारणें

हिंदुमुसलमानांमधील दंगे अलीकडे जास्त कां होऊं लागले या विषयावरील हिंदुस्थानसरकारचा विलायतसरकारकडे गेलेला खलिता नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा खलिता गेल्या डिसेंबर महिन्यांत येथून रवाना होऊन या वर्षाच्या जानेवारी महिन्यांत सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या हातीं पडला. तेव्हां अर्थातच गेल्या ५।६ महिन्यांची हकीकत त्यांत दाखल केलेली नाहीं. शिवाय, हा खलिता पाठविला त्यावेळीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें लॉर्ड लॅन्डसडौन यांच्या हातीं होतीं हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे.

ह्या खलित्याचे दोन भाग करतां येतील. पहिल्या भागांत हिंदुमुसलमानांमधील दंग्याचीं सामान्य कारणें आहेत, व दुसऱ्यांत हे दंगे अलीकडे जास्त कां होऊं लागले यार्चीं विशेष कारणें दिलीं आहेत. पहिला भाग हा अर्थात्च अगदीं सामान्य ऐतिहासिक माहितीनेंच भरला असल्यामुळें त्याचा विशेष विचार करण्याची येथें फारशी जरूर नाहीं. दंगे इंग्रजी अमलापूर्वीहि होत असत असें जें सरकारानें आपल्या खलित्यांत म्हटलें आहे तें आम्हांसहि कबूल आहे. हिंदूंचे व मुसलमानांचे आचारविचार निराळे आहेत; करितां दोन्ही लोकांचे सण एकाच वेळेस आले असतां हे तंटे कधीं कधीं उपस्थित होतात, व ते इंग्रजी अमलापूर्वीचे राज्यांत व हल्लीं नेटिव्ह संस्थानांतूनहि होत असतात, ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु अलीकडे दहा वर्षांत या दंग्यांची अधिक प्रवृत्ति कां व्हावी हाच कायतो मुख्य प्रश्न आहे, व त्यासंबंधानें हिंदुस्थानसरकारचें काय म्हणणें आहे, हें विशेषतः पाहिलें पाहिजे.

हिंदुस्थानसरकारच्या मतें अलीकडे दंगे जास्त होण्याचीं तीनचार मुख्य कारणें आहेत. पहिलें कारण असें कीं, अलीकडे आगगाड्या, तारायंत्र व पोष्ट ऑफीस यांच्यायोगें बातमी पसरण्याचीं जीं जास्त साधनें झालीं आहेत त्यामुळें एखाद्या ठिकाणीं

---

* [केसरी ता. २२ मे १८९४]

दंगा झाला असतां लागलीच वर्तमानपत्रांतून त्याची भवति न भवति सुरू होऊन त्यामुळें निरनिराळ्या धर्मांतील लोकांचीं मनें लौकर क्षुब्ध होतात. वर्तमानपत्रें, जाहिरसभा आणि फिरत्या उपदेशकांची भाषणें यामुळेंहि असाच परिणाम घडून येतो; व राज्यव्यवस्था सुराळित राखण्यास त्यापासून बऱ्याच अडचणी उपस्थित झाल्या आहेत. हिंदुस्थानसरकारानें दिलेलें हें कारण किती सयुक्तिक आहे हें आमच्या वाचकांच्या तावडतोब लक्षांत येईलच. आगगाड्या, तारायंत्रें वगैरे सुधारणेचें साहित्य ज्या पाश्चात्य राष्ट्रांत आज शेंकडों वर्षें उपयोगांत आलेलें आहे, तेथें जर त्यापासून असे अनर्थ होत नाहींत तर हिंदुस्थानांतच तसा प्रकार कां घडून यावा हें आम्हांस समजत नाहीं. आगगाडी व तारायंत्रें यांच्या योगानें देशांतील दळणवळण वाढून परस्परांतील मत्सरभाव कमी होतो असें मेकालेसाहेबांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे, व हिंदुस्थानसरकारच्या मतें तर हींच साधनें दंगे जास्त होण्यास कारणीभूत होतात. तेव्हां आतां खरें कोणाचें मानावें असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. वर्तमानपत्रें, जाहिरसभा वगैरेसहि हाच न्याय लागू आहे. वर्तमानपत्रांतून वगैरे दंग्याबद्दल जी चर्चा होते तिचा नीट विचार करून सरकारनें न्याय केला तर वर्तमानपत्रांतील लेखांपासून तिळमात्र देखील नुकसान होण्याचा संभव नाहीं. पण सरकारचे मनांतून ज्यावेळीं कोणत्या तरी एखाद्या पक्षास उत्तेजन द्यावयाचें असतें तेव्हां मात्र वर्तमानपत्रांतील टीका त्यांस प्रतिकूल होऊन सरकाराबद्दल लोकांचा वाईट ग्रह होऊं लागतो. परंतु तेवढ्यामुळें लोक दंगा करण्यास अधिकाधिक प्रवृत्त होतात असें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. वर्तमानपत्रांतील टीका आणि जाहिरसभेंतील ठराव ह्यामुळें राज्यव्यवस्थेचें काम पूर्वीच्या प्रमाणें अरेरावी पद्धतीनें चालवितां येत नाहीं हें खरें आहे; निदान सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेल्या कामाची अलीकडे विशेष चर्चा होते व अधिकाऱ्यांचीं व्यंगें आणि दोष लोक निर्भीडपणें दाखवितात येवढें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. पण त्यामुळें दंगे अधिक होतात असें म्हणणें म्हणजे ज्या शहाण्या इंग्रजी मुत्सद्यांनीं आगगाड्या, तारायंत्रें, वर्तमानपत्रें वगैरे सुधारणेची मुख्य साधनें आमच्या देशांत सुरू केलीं त्यांनीं मूर्खपणा केला असें म्हणण्यासारखेंच आहें. लॉर्ड लॅन्सडौन यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानसरकाराकडून असें मत विलायतसरकाराकडे जावें यांत कांहीं नवल नाहीं. पाश्चात्य सुधारणेचीं साधनें हिंदुस्थानच्या लोकांस इंग्रजी राज्यांत उपलब्ध झाली हें एकंदर राजकीयदृष्ट्या चांगलें झालें नाहीं असें प्रतिपादन करणारे जे कांहीं इंग्रजलोक आहेत त्यापैकींच लॉर्ड लॅन्सडौन हे एक होत. हें त्यांनीं हिंदुस्थान सोडते वेळीं जें भाषण केलें त्यावरूनच उघड दिसून येत आहे. आगगाडीमुळें आणि तारायंत्रामुळें दंग्याची बातमी लौकर पसरून दंगे अधिकाधिक होण्याचा जर संभव आहे तर त्याच साधनांमुळें दंगे मोडण्यास लष्करीलोक एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं लौकर नेतां येतात व कोणाहि खालील अधिकाऱ्यास मुख्य सरकारास हुकूम पाठविणें असल्यास तो लौकर पाठवितां येऊन न्याय देण्याची तजवीज तावडतोब करण्यास मिळते; ह्या गोष्टींचाहि सरकारानें उल्लेख करावयास पाहिजे होता. परंतु " कोर्ट फी स्टांप लाविला नाहीं म्हणून तार परत केली आहे " अशा अर्थाचा मूर्ख शेरा देणारे कलेक्टर ज्यांच्या पदरीं आहेत व त्यांनीं केलेलीं कामें डोळे मिटून लॉर्ड हारिस आदिकरून मंडळी जेथें मंजूर करीत आहेत तेथें एकोणिसावे शतकांतील सुधारणेच्या साधनांचा आमच्या सरकारास काय उपयोग? स्वतःचा सुस्तपणा, मौर्ख्य आणि आरेरावी हीं जगास विदित होतात, म्हणून या सुधारणेच्या साधनांच्या नांवानें खडे फोडणें एवढेंच काय तें आमच्या सरकारच्या अधिकाऱ्यांचें काम राहिलें आहे.

दंगे जास्त होण्याचें सरकारनें दुसरें असें कारण दाखविलें आहे कीं, इंग्रजी राज्यांत हिंदुलोकांस राज्यकारभारांत जो अधिकार व मान मिळत आहे तो मुसलमानलोकांच्या डोळ्यांत सलत असून त्यामुळें त्यांचीं मनें हिंदुलोकांबद्दल कलुषित झालीं आहेत. सरकारनें दिलेलें हें कारण आमच्या मतें अगदीं अप्रयोजक आहे, इतकेंच नव्हे तर हिंदुमुसलमानांमधील वैमनस्य वाढण्यास असल्या लेखांपासून उलट उत्तेजन मिळण्याचा संभव आहे. हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत सर्व मोठ्या जागा हिंदूंसहि मिळत नाहींत व मुसलमानांसहि मिळत नाहींत; तर त्या सर्व विलायतेंतून इकडे येणाऱ्या तरुण वांडांकरतां राखून ठेविल्या आहेत हें न कळण्याइतके मुसलमानलोक मूर्ख असतील असें आम्हांस वाटत नाहीं. शिवाय हिंदुलोकांस हल्लीं खालच्या प्रतीच्या कारकुनाच्या अगर अधिकाराच्या ज्या जागा मिळतात त्या इंग्रजी राज्यांत म्हणजे नवीन मिळूं लागल्या असेंहि नाहीं. खुद्द आमच्या महाराष्ट्रदेशाची स्थिति घेतली तर इंग्रजलोकांचें येथें राज्य होण्यापूर्वीं सर्व मोठ्या जागा हिंदूंस मिळत होत्या व मुसलमानलोकांचें राज्यकारभारांत फारसें अंग नव्हतें असेंच इतिहासावरून आढळून येतें. आणि इंग्रजी राज्यापूर्वी ज्या ठिकाणीं मुसलमानी राज्य होतें तेथेंहि कांहीं अंशीं असाच प्रकार सुरू होता. म्हणजे मुसलमानलोक राजे असत, नबाब असत, अमीर असत; पण कारकुनीच्या वगैरे जागा हिंदूंसच मिळत असत. सारांश, आज जर मुसलमानलोकांची पूर्वीची योग्यता कोणीं कमी केली असली तर ती इंग्रजसरकारनें केली आहे व त्यासाठीं जर कोणाचा हेवा अगर मत्सर करणें असेल तर तो आमच्या-मुसलमानबंधूंनीं इंग्रजी कामगारांचा केला पाहिजे. कारकुनीच्या कामावर हिंदुलोक मुसलमानांपेक्षां अधिक आहेत हें खरें आहे; पण त्याकरितां शिपाईबाण्याच्या मुसलमानलोकांस मत्सर वाटत असेल असें म्हणतां येत नाहीं. इंग्रजसरकारच्या राज्यांत शिक्षणाचा मार्ग सर्वांस सारखाच खुला असल्यामुळें मुसलमानलोकांस या बाबतींत तक्रार करण्याचें कांहीं कारण नाहीं, हेंहि हिंदुस्थानसरकाराने लक्षांत

ठेवावयास पाहिजे होतें. पण या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून आपले दोष झांकण्याकरितां सरकारनें केवळ आपमतलबी हेतूनें मुसलमानलोकांस मत्सरी ठरवून त्यांचा दंग्याशीं संबंध जोडून दिला आहे ! ईश्वर करो आणि या असल्या लेखानें नसता मत्सरभाव उत्पन्न न होवो म्हणजे झालें.

हिंदुलोकांत हिंदुधर्माचें हल्लीं जें पुनरुज्जीवन होत आहे त्यामुळें व गोरक्षणसभांस अलीकडे जें महत्त्व आलें आहे त्यामुळें हिंदुमुसलमानांमधील दंगे अधिकाधिक होऊं लागले, असें दंगे जास्त होण्याचें तिसरें कारण ठरावांत सांगितलें आहे. परंतु हेंहि कारण एकतर्फीच आहे. मराठ्यांच्या अमलांत हिंदुधर्माचा हल्लींच्या पेक्षां जास्त अभिमान होता; पण तेव्हांहि जे दंगे झाले नाहींत ते आतां इतके जास्त काय म्हणून व्हावे ? शिवाय हिंदुधर्माचें ज्याप्रमाणें पुनरुज्जीवन होत आहे तितकेंच मुसलमानीधर्माचें होत नाहीं काय ? ज्या खोजेलोकांची दायविभागव्यवस्था आजपर्यंत हिंदुधर्मशास्त्रानें होत होती, त्यांनीं मुसलमानी धर्मशास्त्र आपणास लागू करावें अशा अर्थाचा कांहीं महिन्यांपूर्वी जो अर्ज हिंदुस्थानसरकाराकडे पाठविला होता त्याचें हा खलिता लिहिते वेळीं सरकारास विस्मरण झालें होतें कीं काय नकळे ! गाईबद्दल लोकांची पूज्यबुद्धि आजकाल नवीन उत्पन्न झाली असेंहि नाहीं. गोरक्षणसंस्था आज फारा दिवसांच्या आहेत व निदान आमचेकडे तरी सदर सभांचें काम मोठ्या जारीनें सुरू आहे असें आम्हांस आढळून येत नाहीं. मुंबईतील दंग्याचा या संस्थांशीं कांहीं संबंध नाहीं असें खुद्द मुंबईसरकारानेंहि कबूल केलें आहे. तेव्हां आतां दंगे जास्त होण्यास गोरक्षणसभा कारण आहेत असें म्हणण्यास कांहीं एक पुरावा राहिला नाहीं. हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाची सरकारानें जी सबब पुढें आणिली आहे ती खरी असती तर आम्हीं एक प्रकारें आनंद मानला असता; परंतु खरा प्रकार त्याच्या अगदीं विरुद्ध आहे. इंग्रजी शिक्षणानें उत्तरोत्तर शिकलेल्या लोकांची धर्मावरील श्रद्धा कमी होत चालली आहे, व कित्येक तर खाण्यापिण्यांतहि साहेबलोकांचें अनुकरण करूं लागले आहेत. खालच्या प्रतीच्या लोकांत असा प्रकार अद्याप आढळून येत नाहीं हें खरें; पण धर्माचे बाबतींत त्यांचीं मतें कायम असलीं, तथापि हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनासाठीं ते मोठीशी खटपट करीत आहेत असें नाहीं. थिऑसफी वगैरे पुनरुज्जीवनाचे जे कांहीं हल्लीं पंथ निघाले आहेत ते इंग्रजी शिकलेल्या लोकांकरितां आहेत व सर्व धर्मांतील लोकांनीं एकमेकांचा द्वेष न करितां प्रीतीनें वागावें हें या पंथाचें पहिलें तत्त्व आहे. तेव्हां हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनानें अलीकडे दंगे अधिक होऊं लागले हें म्हणणेंहि अगदीं निराधार व भ्रांतिमूलक आहे.

दंगे जास्त होण्यास हिंदुस्थानसरकारनें जीं हीं कारणें सांगितलीं आहेत तीं बरोबर नाहींत तर दुसरीं कारणें कोणतीं असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. वर

दिलेल्या कारणांखेरीज हिंदुस्थानसरकारच्या ठरावांत दुसरीं कारणें सांगितलीं नाहींत हें खरें आहे; पण येवढ्यानें तीं सांगणें कठीण आहे असें मात्र होत नाहीं. या विषयावर आम्हीं वेळोंवेळीं जे निबंध लिहिले आहेत त्यांवरून दंगे जास्त होण्याचें खरें कारण काय तें आमच्या वाचकांस कळून आलें असेलच. हें कारण सरकारी अधिकाऱ्यांची चूक, गैरवर्तणूक अथवा पक्षपातीपणा हें होय. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वी कोठें हिंदूंचें व कोठें मुसलमानांचें राज्य होतें, व जेथें मुसलमानांचें राज्य होतें तेथें हिंदूंच्या आणि हिंदूंचें राज्य होतें तेथें मुसलमानांच्या हक्कांची पायमल्ली होत होती असें जें हिंदुस्थानसरकारानें आपल्या ठरावांत लिहिलें आहे तें कांहीं अंशीं आम्हासहि मान्य आहे. रणजितसिंग आपल्या राज्यांत गोवध करणारास ज्याप्रमाणें खुनाची शिक्षा करीत असे व महादजी शिंदे यांनीं दिल्लीच्या बादशहापासून गोवधाच्या मनाईची जशी सनद आणली होती, तसा प्रकार इंग्रजी राज्यांत होणें शक्य नाहीं हें आम्ही जाणून आहों. पण हिंदुमुसलमानांचे हक्क ज्यांस त्यांस पाळूं देण्याची सारखी व्यवस्था ठेवली जाईल असें जें राणीसरकारांनीं आम्हांस वचन दिलें आहे त्याचा अंमल कसा करावा याबद्दल जोंपर्यंत हिंदुस्थानसरकार कांहीं सामान्य नियम घालून देत नाहीं तोंपर्यंत हे दंगे कधींहि समूळ नाहींसे व्हावयाचे नाहींत असें आमचें मत आहे. हिंदुमुसलमानांस सारख्या रीतीनें वागवूं असें नुसतें अभिवचन दिल्यानें कांहीं कार्य होत नाहीं. गोवधाची काय व्यवस्था करावयाची, सार्वजनिक रस्त्यानें मिरवणूक काढण्याचा हक्क हिंदु व मुसलमानांस सारखा कशानें मिळेल, इत्यादि प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करून दूर दृष्टीनें आणि मुत्सद्दीपणानें त्यांचा निकाल लावणें हें गव्हर्नर, गव्हर्नर-जनरल आणि त्यांचे कौन्सिलर यांचें काम आहे. परंतु आमच्या दुर्दैवानें अशा रीतीनें या प्रश्नांचा विचार करणारे शहाणे गव्हर्नर किंवा गव्हर्नर-जनरल हल्लीं हिंदुस्थानांत नाहींत अगर असल्यास ते या कामीं लक्ष पुरवीत नाहींत असें म्हणावें लागतें. या असल्या गव्हर्नर व गव्हर्नर-जनरल यांच्या कारकीर्दीत कलेक्टर आदिकरून खालील इंग्रजी अधिकाऱ्यांचें प्रस्थहि दिवसेंदिवस फार माजत चाललें आहे. उघडच आहे कीं, सरकारच्या कौन्सिलरांचें जर कोणतेंहि मत कायम झालेलें नाहीं, तर खालील अधिकारी सांगतील तोच न्याय. निदान आमच्या इलाख्यांत तरी ही स्थिति पूर्णपणें आढळून येते. ऑनरे० फेरोझशहा मेथा यांनीं सांगितल्याप्रमाणें क्यांबेलसाहेबांच्या वर्गांतले बरेच ऑफिसर जिल्हाधिपतीचे जागीं आहेत; व राजकीय हक्कपातीकरतां कॉंग्रेस आदिकरून हिंदुलोक ज्या कांहीं खटपटी करीत आहेत त्या या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत एकसारख्या सलत असतात आणि मुसलमानलोकांस हातीं धरून या चळवळीचा होईल तेवढा प्रतिकार केला पाहिजे असें त्यांचें मत झालेलें आहे. सारांश, हिंदुलोकांबद्दल मुसलमानांस मत्सर वाटत आहे

असें जें ठरावांत लिहिलें आहे तें खरें नसून त्याच्या ऐवजीं इंग्रजी अधिकाऱ्यांस हिंदुलोकांची चळवळ पाहून वैषम्य वाटत आहे असें म्हणावयास पाहिजे होतें. हे अधिकारी जेथें तेथें हिंदुमुसलमानांमधील तंटे सुरू करण्यास मुख्यत्वेंकरून कारणीभूत होतात. रंगून येथें मुसलमानांच्या वस्तींत गाय मारूं न दिल्यामुळें तंटा उपस्थित झाला, तर वायव्यप्रांतांत हिंदूंच्या वस्तींत मुसलमानांस गाय मारूं दिल्यानें झाला, ही हकीकत लक्षांत आणली म्हणजे अलीकडील इंग्रजी अंमलदार ज्या ठिकाणीं जो हुकूम लोकांस अप्रिय होईल तसलाच हुकूम देण्यास कसे प्रवृत्त होतात हें दिसून येईल. जणूं काय लोक कशानें नाखूष होतील एवढेंच हे अंमलदार पहात असतात. आगगाड्या व तारायंत्रें हीं साधनेंहि दंगे जास्त होण्यास कांहीं अंशीं कारणीभूत झालीं आहेत; परंतु तीं हिंदुस्थानसरकारानें सांगितल्याप्रमाणें मात्र नव्हत. आगगाडी व आगबोट यांमुळें विलायतचा प्रवास इतका स्वल्प झाला आहे कीं साहेब लोकांचें लक्ष पूर्वी ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांशीं मिळून मिसळून वागण्याकडे लागत असे, तसें आतां लागत नसून विलायतचीं ओढ ज्यास त्यास फार लागलेली आढळून येते ! यांचीं बायकापोरें विलायतेंत असावयाचीं; हे स्वतः निदान वर्ष दोन वर्षांनीं तरी विलायतेस जावयाचेच आणि पेन्शन् घेतल्यावरहि एकंदर मनाचा ओढा तिकडेसच असावयाचा. अशा स्थितींत हिंदुलोकांचीं खरीं दुःखें व तीं निवारण करण्याचे योग्य उपाय गव्हर्नरापासून तों कलेक्टरापर्यंत कोणासहि नीटपणें समजूं नयेत व खालील अधिकारी जें सांगतील तेंच वर बहाल व्हावें हें अगदीं स्वाभाविक आहे. रोज-च्यारोज आपल्यापुढें पडणारे कागदाचे भारे, छोटी अगर बडी सही करून निकालास लावावे, आपल्या सुखांत यत्किंचित्हि कमी पडल्यास कॉंपेन्सेशन् अलावन्सच्या रूपानें तिजोरी लुटण्यास कदापिहि मागेंपुढें पाहूं नये; येवढेंच बडे अधिकारी आपलें कर्तव्य समजतात. राज्यकारभार करण्याची ही पद्धत एकंदर इंग्रजी राज्यास व प्रजेस अहितकारक आहे असें इंग्रजी शिकलेले हिंदुलोक ओरडत असतात. हें ओरडणें अर्थातच या अधिकाऱ्यांस गोड वाटत नाहीं व त्यासाठीं मनांत असलेला हिंदुलोकांबद्दलचा द्वेष मुसलमानांस फूस देऊन उगवून घ्यावा अशा प्रकारचें नीच वर्तन त्यांच्या हातून घडत असतें. हा प्रकार इंग्रजी-राज्यास किती घातुक आहे हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. इंग्रजीराज्याची हिंदुस्थानांत ज्यांनीं स्थापना केली त्या लोकांस हीं दुश्चिन्हें दिसत होतीं व म्हणूनच सन १८५८ च्या प्रसिद्ध जाहिरनाम्याप्रमाणें जाहिरनामे काढून त्यांनीं लोकांस वेळोवेळीं आश्वासन दिलें. परंतु दुर्दैव आमचें कीं, हे जाहिरनामे पाळणें तर एकीकडेच राहिलें पण हिंदुस्थानांत आगगाड्या, तारायंत्रें, वर्तमानपत्रें यांचा प्रसार झाल्यामुळेंच हिंदुमुसलमानांमधील दंगे वारंवार उपस्थित होतात, असें म्हणणारे गव्हर्नर व गव्हर्नर-जनरल या देशांत येऊं लागले आहेत. वरें झालें कीं

५७ सालीं देशांत आगगाडीचा इतका प्रसार झाला नव्हता, नाहीं तर ५७ सालचें बंडहि आगगाड्यांमुळेंच झालें असें या शहाण्यांनीं आम्हांस सांगितलें असतें ! हिंदुस्थानसरकारच्या खलित्यांत दंगे मोडण्यास काय उपाय करावा याचा कांहीं विचार केलेला नाहीं; पण दंगे होण्यास जीं कारणें दिलीं आहेत तीं जर खरीं असतील तर आगगाड्या मोडून टाकणें, तारायंत्रें उपटणें व वर्तमानपत्रांचीं तोंडें दाबणारा लिटनसाहेबांनीं केलेला कायदा पुनः अमलांत आणणें, असलेच कांहीं तरी सरकारास इलाज केले पाहिजेत हें उघड आहे. हे उपाय सरकारानें जर आपल्या खलित्यांत सुचविले असते तर त्यांनीं दिलेल्या कारणांचा पोरकटपणा कोणाच्याहि तेव्हांच लक्षांत आला असता; व कदाचित् तो लक्षांत येऊं नये म्हणूनच दंगे मोडण्याबद्दलचे उपाय सरकारानें या ठरावांत सुचविले नसतील. कसेंहि असो; या प्रश्नाचा दूरदर्शीपणानें विचार करून हिंदुमुसलमानलोकांतील वैमनस्य काढून टाकणारा व त्यामुळें इंग्रजी राज्यास अधिक बळकटी आणणारा राज्यकर्ता पुरुष हल्लीं हिंदुस्थानांत नाहीं हें इंग्रजी राज्याचें व आमचें मोठेंच दुर्भाग्य आहे असें या खलित्यावरून स्पष्ट सिद्ध होतें.

❖ ❖ ❖

* येथील पोलिसांचें नवें शहाणपण

मशिदीपुढून वाद्यें वाजवीत जावीं कीं नाहीं याबद्दल आज पुष्कळ दिवस हिंदुमुसलमान लोकांमध्यें जो तंटा पडला आहे व ज्याचा निकाल कसा लावावा याचा सरकारासहि मोठा विचार पडलेला आहे, किंबहुना ज्या बाबतींत कोणत्या प्रकारचे नियम करावेत याबद्दल सरकारचा अद्याप निश्चय ठरला नाहीं असें म्हटलें तरीहि चालेल, त्या बाबतींत आमच्या शहरचे हुशार पोलिस सुपरिं० मे० म्याक्फर्सन हे आपलें डोकें शिरकावूं पहात आहेत हें पाहून कोणासहि थोडासा खेद व बरेंचसें आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. दरमहा दोन दोन चार चार हजार रुपये मिळविणारे सरकारचे अधिकारी जो तंटा मिटविण्यास प्रवृत्त होत नाहींत तोच तंटा एखाद्या लष्करी पोलिस सुपरिंटेंडेंटास मिटाविण्याचा कायद्यानें अधिकार असावा हें जरा विचित्र आहे व नव्या पोलिस ॲक्टाचा विचार करतां अशा तऱ्हेचा अधिकार डि० पो० सुपरिं० यांस आहे कीं नाहीं याची आम्हांस शंकाच आहे. सन १८६७ च्या पोलिस ॲक्टाच्या २७ व्या कलमाप्रमाणें " मिरवणुकीच्या आणि समारंभाच्या वेळीं रस्त्यांतून जीं वाद्यें जातील त्यांची व्यवस्था लावण्याचा " पोलिसास अधिकार दिला होता. आतां ' व्यवस्था लावणें " या शब्दांत ' वाद्यें बंद करणें '

---

* [केसरी ता० २८ आगष्ट १८९४]

याचासमावेश होतो कीं नाहीं हा एक स्वतंत्र प्रश्न आहे; व ज्याप्रमाणें एखाद्या आजारी मनुष्याची तब्येत पहाण्याचा अधिकार डॉक्टरास दिला असतां त्यास मारण्याची सदर डॉक्टरास परवानगी दिली असें होत नाहीं; तद्वतच वर लिहिलेल्या पोलिसाच्या अधिकाराची गोष्ट आहे. रस्त्यांत गर्दी न होतां सर्व लोकांस रस्त्याचा सारखा उपयोग करतां यावा यासाठीं रस्त्यांतून जाणारे येणारे समारंभ, वाद्यें, गाड्याघोडीं वगैरे यांची व्यवस्था पोलिसानें लावावी असा कायद्याचा नियम आहे. परंतु त्यामुळें रस्त्यांतील गाड्याघोडीं अथवा इतर व्यापार बंद ठेवून सार्वजनिक रस्त्यानें जाण्याच्या लोकांच्या हक्कास प्रतिबंध करण्याचा पोलिसास अधिकार मिळत नाहीं. असो. १८६७ चा कायदा रद्द होऊन त्याऐवजीं १८९० चा ४ हा कायदा सर रेमंडवेस्ट व लॉर्ड रे यांच्या कारकीर्दीत पसार झाला आहे व तोच हल्लीं अंमलांत आहे. हा कायदा पास होण्याच्या वेळीं कौन्सिलांत रावब० रानडे, ऑनरे० याज्ञिक आणि सयानी वगैरे मंडळी सभासद होती. व हा कायदा पास होतेवेळीं त्यांनीं जीं भाषणें केलीं त्यांत पोलिस ॲक्ट नवा करण्याचा उद्देश व कारणें यांचा चांगला खुलासा केला आहे. या कायद्यांत पूर्वीच्या कायद्यापेक्षां पोलिसास थोडेसे जास्त अधिकार दिलेले आहेत, पण एकंदर कायद्याचा उद्देश पोलिस अधिकाऱ्यांच्या स्वैर वर्तनास अधिक आळा घालावा आणि त्यापासून होणारे दुष्ट परिणाम अथवा त्रास बंद करण्याचीं लोकांस अधिक कायदेशीर साधनें व हक्क मिळावे" असा आहे, असें लॉर्ड रे यांनीं आपल्या भाषणांत त्यावेळीं स्पष्ट बोलून दाखविलें आहे. लॉर्ड रे यांनीं जे उद्गार काढले आहेत त्यांचा व इतर सभासदांच्या भाषणांचा मेळ घालतां सन १८९० च्या कायद्यांत पोलिसास सन १८६७ च्या कायद्यापेक्षां एकंदरींत कामें जास्त सांगितलीं असलीं तरी स्वातंत्र्य कमी केलेलें आहे असें उघड दिसून येतें. उदाहरणार्थ रस्त्यांत वाद्यें वाजविण्याचिच गोष्ट घेऊं. पूर्वीच्या कायद्यांत 'समारंभाच्या किंवा मिरवणुकीच्या' वेळीं वाजत जाणाऱ्या वाद्यांची व्यवस्था लावण्याचा पोलिसास अधिकार दिला होता. सन १८९० च्या कायद्यांत समारंभाचे आणि मिरवणुकीचे बाबतींत कोणी काय करावें हें पूर्वापार रीतीची चवकशी करून ठरविण्याचा हक्क कलम ४४ प्रमाणें डि० मॅजिस्ट्रेट यांस दिलेला आहे व डि० मॅजिस्ट्रेट यांनीं केलेला हुकूम कोणास अमान्य असल्यास त्यानें दिवाणी कोर्टांत फिर्याद करून आपले हक्क शाबीद करून घ्यावे असें स्पष्ट सांगितलें आहे. समारंभांतील आणि मिरवणुकींतील लोकांच्या हक्कांचा तूतांतूर्त निर्णय करण्याचा अधिकार याप्रमाणें डि० मॅजिस्ट्रेटास गेल्यावर मिरवणुकींतील वाद्यांची व्यवस्था लावण्याचा पोलिसाचा अधिकार त्या मानानें कमी झालाच पाहिजे; आणि १८९० च्या कायद्यांतील शब्दहि अशाच प्रकारचे आहेत. कलम ४८ यांत "पोलिसानें रस्त्यानें जाणारीं वाद्यें यांची, मॅजिस्ट्रेट

साहेबांचे या बाबतींत झालेले हुकूम लक्षांत आणून परवाने देऊन किंवा अन्य तऱ्हेनें, व्यवस्था लावावी'' असें सांगितलें आहे. या कलमांत 'समारंभ, मिरवणूक वगैरे' हे शब्द मुद्दाम गाळले आहेत, असें १८६७च्या कायद्यांतील कलमांची तुलना केली असतां सहज लक्षांत येण्यासारखें आहे. त्याचें कारणहि उघड आहे कीं, तो अधिकार नव्या ॲक्टाप्रमाणें डि० मॅजिस्ट्रेट यांस दिलेला आहे. डि. मॅजिस्ट्रेट यांच्या हातूनहि हा अधिकार चांगला बजावला जाणार नाहीं असा रावब० रानडे यांचा आक्षेप होता व त्यांनीं आपल्या भाषणांत असें बोलून दाखविलें आहे कीं, ''धर्मसंबंधीं अगर सामाजिक मिरवणुकींत अगर समारंभांत हात घालण्याचा जो या कायद्यानें मॅजिस्ट्रेट यांस अधिकार दिलेला आहे त्याचा दुरुपयोग होईल अशी मला फार भीति वाटते. कलेक्टरसाहेबांस घुष्कळ प्रसंगीं लोकांचे रीतरिवाज चांगले माहित नसतात आणि ज्वानीच्या भरांत अथवा अनुभवाच्या कमतरतेमुळें त्यांच्या हातून वेड्यावांकड्या चुक्या होण्याचा घुष्कळ संभव असतो. व अशा बाबतींत एकदां चूक होऊन गेली म्हणजे मग ती दुरुस्त करण्याचाहि मार्ग रहात नाहीं.'' रावब० रानडे हे अशा प्रकारें भाषण करीत असतां ऑनरे० वेस्टसाहेब यांनीं त्यांस असें सुचविलें कीं, डि० मॅजिस्ट्रेट यांनीं हा अधिकार कसा बजावावा याबद्दल सरकार रूळी करणार आहे व त्या रुळीप्रमाणें प्रत्येक डि० मॅजिस्ट्रेट यास काम करावें लागेल. यावर रावब० रानडे यांनीं असें उत्तर दिलें कीं, ज्याअर्थीं हा अधिकार सर्वोशीं डि० मॅजिस्ट्रेट याजकडेच आहे त्याअर्थीं सरकारच्या रूळी कितीहि चांगल्या असल्या तरी एकदां मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं चूक केल्यानंतर त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. समारंभाचे व मिरवणुकीचे हक्क असे असतात कीं त्यांचा निकाल जागच्या जागीं द्यावा लागतो व समारंभाचा दिवस निघून गेल्यानंतर वरातीमागून घोडें या न्यायानें रूळी कितीहि चांगल्या असल्या तरी त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. यावर लॉर्ड रे यांनीं असें सांगितलें कीं, सरकारचे उद्देश काय आहेत हें राणी सरकारच्या थोरल्या जाहीरनाम्यांत स्पष्ट सांगितलें असून त्याप्रमाणें लोकांच्या धर्मसंबंधीं चाली, रीति आणि मतें यांत हात घालावयाचा नाहीं हा नियम सक्तीनें पाळण्यांत येतो हें प्रत्येक कामगारास माहीत आहे व या नियमाचें जर कोणीं उल्लंघन करील तर त्यास हें (लॉर्ड रेचें) सरकार कडक शिक्षा दिल्याखेरीज राहणार नाहीं. लॉर्ड रे यांनीं दिलेलें हें आश्वासन अगदीं योग्य आणि न्यायाचें आहे असें कोणीहि कबूल करील. पण इंग्रजी राज्यांत सरकार हें नदीच्या पाण्याप्रमाणें अनिश्चित असल्यामुळें लॉर्ड रे यांच्या वेळेचें सरकार आणि लॉर्ड हारिससाहेबांचें सरकार यांच्यामध्यें बराच फरक पडलेला आहे. तेव्हां लॉर्ड रे यांनीं १८९० चा कायदा पास करतेवेळीं जे उद्गार काढले व जें आश्वासन दिलें तें आमच्या हल्लींच्या गव्हर्नरसाहेबांस मंजूर पडेल कीं नाहीं याचा आम्हांस मोठाच वानवा आहे. सन १८९० चा कायदा पास

झाल्यानंतर लॉर्ड रे लवकरच हा इलाखा सोडून गेले व या कायद्याप्रमाणें ज्या रूळी पास व्हावयाच्या होत्या त्या करण्याची तेव्हांपासून आतांपर्यंत आमच्या सरकारास फुरसतच सांपडली नाहीं. लॉर्ड हारिस यांचा या बाबतींत कांहीं दोष आहे असें आम्ही म्हणत नाहीं. कारण असलीं कामें करावयास अथवा जमाबंदीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल लावण्यास जेवढी फुरसूत हवी लागते तेवढी त्यांस कधींहि मिळत नाहीं त्यास त्यांचा नाइलाज आहे. परंतु सरकारास फुरसद नाहीं म्हणून डि० मॅजिस्ट्रेट यांनीं कोठपर्यंत वाट बघावी ? रूळीशिवायच ॲक्टाचा अंमल करण्याची त्यांनीं सुरुवात केली आहे; व त्यामुळें रावब० रानडे यांनीं जे अनर्थ घडतील असें भाकित केलें होतें ते जागोजाग घडून येत आहेत. असो. वरील हकीकतीवरून वाचकांच्या एवढें लक्षांत येईल कीं, १८९० च्या कायद्यानें जे अधिकार मॅजिस्ट्रेट यांस दिले आहेत व ज्यांचा सदर मॅजिस्ट्रेटहि दुरुपयोग करतील अशी भीति वाटत होती तेच अधिकार याच कायद्यानें पोलिसास दिले आहेत असें कदापिहि मानतां येणार नाहीं.

असें असतां पुण्याचे पोलिस सुपारिं. मेजर म्याक्फरसन यांनीं या अक्टान्वयें रस्त्यांत वाद्यें वाजविण्याबद्दल परवाने देण्याच्या शर्ती लावून खालीं लिहिल्या प्रमाणें नियम करावे अशी शिफारस केली आहे. हे नियम कलम ४८ यांत " परवाना देऊन अगर अन्य तऱ्हेनें " असे जे शब्द आहेत त्यांवरून पोलिसास प्राप्त होणाऱ्या अधिकारान्वयें काढण्याचा डि० पोलिस सुपरिं० हे विचार करीत आहेत. हा अधिकारच आमच्या मतें पोलिसास प्राप्त होत नाहीं असें वर सांगितलें आहे; तथापि या बाबतींत कांहीं तरी नियम होणें अवश्य आहे असें आमचें मत असल्यामुळें या नियमांचा आतां विचार करूं. पोलिसांनीं सुचविलेले नियम येणेंप्रमाणें:—

१ मशिदीपुढील रस्त्यांत आगें मागें ४० पावलें केव्हांहि वाद्यें वगैरे वाजवूं नयेत आणि देवळें व इतर प्रार्थनेच्या जागा यांच्या पुढील रस्त्यांत प्रार्थना चालू असतांना मात्र आगें मागें ४० पावलें वाद्यें बंद ठेवावीं.

२. रस्त्यांत अगर रस्त्यानजीक कोणी पुराण अगर कुराण वाचीत असेल तर तेथें आणि सरकारी ऑफिसांवरून जातांना ऑफिसें उघडीं असतील तेव्हां वाद्यें बंद ठेवावीं.

३. गाड्या अगर घोडीं रस्त्यांतून जात असतां अगर पोलिस कामगार सांगतील तेव्हां व तेथें वाद्यें बंद ठेवावीं.

४. परवाना मिळालेला इसम अगर मिरवणुकींतील अगर समारंभांतील दुसरा कोणीहि मनुष्य वरील नियम मोडील तर त्यास कायद्याप्रमाणें शिक्षा होईल. (२०० रुपये दंड.)

हे नियम वाचून आमचे डि० पोलिस सुपरिं० किती शहाणे आहेत याची आमच्या वाचकांस तात्काळ कल्पना करतां येईल. आमच्या सुदैवानें येथील कलेक्टर यांनीं हे नियम अभिप्रायाकरितां म्युनिसिपालिटीकडे पाठविले म्हणून बरें झालें. नाहीं तर हल्लींच्या कारकीर्दीत डि० पोलिस सुपारिंटेंन्डेंट यांनीं जो हा वेडेपणा करण्याचें योजिलें होतें तो वेडेपणा आम्हांस बराच भोवल्याखेरीज राहिला नसता. पोलीस म्हणजे आधींच अक्षरशत्रु आणि मेजर म्याक्फरसन हे त्याचे नायक, तेव्हां त्यांच्या हातून वर लिहिल्याप्रमाणें नियम सुचविण्यांत आले असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. त्यांचा सरकारांत नीट विचार होऊन च लोकमत काय आहे तें पाहून मग ते अमलांत आणावें एवढेंच काय तें आमचें म्हणणें आहे. कारण आज पुण्याच्या पोलिस सुपरिं०नीं जी व्यवस्था करण्याचें सुचविलें आहे अशा प्रकारचें नियम ठिकठिकाणचे पोलिस सुपरिंटेंडेंट सुचविण्यास मागें पहाणार नाहींत. १८९०चा ॲक्ट सर्व इलाख्यास सारखाच लागू आहे; व पुण्यास जे नियम होतील त्या धर्तीवर इतर ठिकाणींहि नियम होण्याचा संभव आहे. याकरतां हल्लींच्या नियमांचा आम्हीं येथें मुद्दाम थोडासा विस्तारानें विचार करीत आहों.

पहिला नियम चुकीचा आहे, इतकेंच नव्हे तर पक्षपातीपणाचा आहे हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें आपला अभिप्रायहि तसाच दिला आहे. गावांतील मोठमोठे सार्वजानिक अथवा खासगी समारंभ अगर मिरवणुकी यांत वाद्यें कोठें वाजवितात, कोठें बंद ठेवतात याचा वास्तविक निकाल म्हटला म्हणजे (१) वहिवाटीप्रमाणें अगर (२) एकमेकांच्या जतीमतीनें व्हावयास पाहिजे. परंतु जुनी वहिवाट कांहीं आहे ती जर ठरवितां येत नाहीं अथवा दोन पक्षांचा मेळ मिळत नाहीं तर सरकारानें जे नियम घालून द्यावयाचे ते दोन्ही पक्षांस सारखेच घालून दिले पाहिजेत, म्हणजे वाद्यें बंद ठेवावयाचीं असल्यास तीं देवळें आणि मशिदी यांच्यापुढें सारखींच बंद ठेविलीं पाहिजेत. मशिदीपुढें कधींहि वाजवूं नये आणि देवळापुढें भजनाच्या वेळीं वाजवूं नये असा भेद करणें वाजवी नाहीं. वास्तविक पाहिलें म्हणजे आमच्या देवळासमोरून वाद्यें वाजत जाण्यास आमची तक्रार नसते, पण मुसलमानलोकांनीं आपल्या मशिदीवरून कधींहि—मग ती प्रार्थनेची वेळ वा नसो—वाद्यें वाजत जाऊं नयेत असा दुराग्रह धरल्यामुळें व जेथें वहिवाट नाहीं तेथेंहि वाद्यें बंद करावीं म्हणून दांडगाई करण्यासहि तयार असल्यामुळें हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. पूर्वीची वहिवाट जर मुसलमान लोक इमानेंइतबारें पाळतील व प्रार्थनेच्या वेळांखेरीज करून वाद्यें मशिदीवरून वाजवीत नेण्यास अडथळा करणार नाहींत, तर हिंदूहि आपल्या देवळापुढें वाद्यें वाजवूं देंऊ नयेत अशी तक्रार सांगणार नाहींत. पण वहिवाटीचा मुद्दा सोडून दिला आणि मानापमानाचा मुद्दा काढला म्हणजे

केवळ सन्मानार्थच जर वाद्यें बंद ठेवावयाचीं असलीं तर कोणीहि हिंदु मशिदीपेक्षां देऊळ कमी पूज्य आहे असें म्हणणार नाहीं. सारांश, अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे मशिदी, देवळें आणि ऑफिसें (चावड्या वगैरे) यांच्यापुढें वाद्यें सारखींच बंद ठेविलीं पाहिजेत. आतां असा नियम झाला असतां दोन्ही पक्षांस पुष्कळ त्रास व अडचण होण्यासारखी आहे. देवळामध्यें रस्त्यावर वसविलेले छोटेखानी मारुती, म्हसोबा आणि सटवाई यांचा, मशिदीमध्यें लहानसहान दर्गे, पीर अथवा नवीन होत असलेल्या छोटेखानी निमाज पढण्याच्या अथवा विश्रांतीच्या जागा यांचा आणि ऑफिसांत लहानसहान शाळा स्टांपव्हेंडरचें दुकान अथवा पोलिस जमादारांची कचेरी यांचा समावेश केला म्हणजे कोणत्याहि रस्त्यांत वाद्यें वाजविण्यास सांपडतिल असें आम्हांस वाटत नाहीं. सबब देवळें, मशिदी आणि ऑफिसें यांच्यापुढें सारखींच वाद्यें बंद ठेवावयाचीं असल्यास मुख्यमुख्य देवळें, मशिदी व ऑफिसें यांची यादी मुक्रर केली पाहिजे, अशी जी पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें दुरुस्ती सुचविली आहे ती अगदीं योग्य आहे. ज्यांस रस्त्याचा त्रास सोसत नाहीं किंवा नको आहे त्यांनीं आपलीं देवळें अगर मशिदी रस्ता सोडून आंत बांधल्या पाहिजेत. रस्ता सार्वजनिक आहे व आपल्या प्रार्थनेंत कोणी व्यत्यय आणूं नये असें म्हणण्याचा प्रत्येकास जितका अधिकार आहे तितकाच रस्त्यानें वाद्यें घेऊन जाण्याचा प्रत्येकांस अधिकार आहे. कायद्यानें दिलेल्या या दोन्ही अधिकारांची आणि हक्कांची तडजोड लावण्यांत वर निर्दिष्ट केलेल्या उपायाखेरीज दुसरा चांगला उपाय आम्हांस सुचत नाहीं. पोलिस सुपरिं० यांनीं सुचविलेला दुसरा नियम तर आमच्या मतें अगदींच मूर्खपणाचा आहे. रस्त्यांत एखाद्यानें शनिमहात्म्याची अथवा कुराणाची पोथी सोडून वसावें आणि तेथें लोकांनीं आपलीं वाद्यें बंद ठेवावीं असा नियम करणें म्हणजे कोणाहि फकिरास अथवा भिक्षुकास रस्ता बंद करण्याचा अधिकार देण्यासारखेंच आहे. सबब या नियमांतील पहिला भाग अजिबात काढून टाकून दुसऱ्या भागांत ऑफिसांची याद कायम करावी अशी सुधारणा झाली पाहिजे. नियम तीन अशाच प्रकारचा आहे. गाडी अगर घोडा दृष्टीस पडल्याबरोबर वाद्यें बंद ठेवावीं असा नियम असला, तर पुण्यासारख्या शहरच्या रस्त्यांतून वाद्यें कधींहि वाजविण्याचा प्रसंग येणार नाहीं. देवळें, मशिदी, ऑफिसें, रस्त्यावर चाललेलें पुराणाचें अगर कुराणाचें वाचन आणि गाडीघोड्याचें दर्शन इतक्या ठिकाणीं जर वाद्यें बंद ठेवावयाचीं तर एवढा खटाटोप करण्यापेक्षां रस्त्यांत मुळींच वाद्यें वाजवूं नयेत असा नियम केल्यास बरें पडेल. निदान लोकांवर जुलूम करावयाचा तर तो तरी ढळढळीत केल्यासारखें होईल, पर्यायानें नको. सारांश, तिसरा नियम अगदींच वेडेपणाचा आहे. ज्याला आपला गाडीघोडा रस्त्यानें न्यावयाचा असेल त्यानें तो नीट चालतो कीं नाहीं याची आधीं खबर-

दारी घेतली पाहिजे. बुजरे घोडे गाडीला लावून लोकांचीं वाद्यें रस्त्यांत बंद करण्याचा कोणासहि अधिकार नाहीं असें कायद्यानें आतां अगदीं स्पष्ट ठरविलें आहे. प्रसंगविशेषीं आणि अडचणीच्या वेळीं एखाद्या गाडीच्या अगर घोड्याच्या मालकानें इषारा केल्यास लोक वाद्यें बंद ठेवीत नाहींत असें नाहीं व तशा वेळीं व तसा इषारा मिळाल्यावर प्रसंगविशेषीं वाद्यें बंद ठेवण्याबद्दल नियम केला तर चालेल—पण तोहि जरा विचारानेंच केला पाहिजे. पोलीस सांगेल तेथें वाद्यें बंद ठेवावयाचीं असा नियम करणें तर अगदींच चुकीचें आहे. पोलिसाचा जुलूम कमी व्हावा व त्यांस फाजील स्वातंत्र्य मिळूं नये म्हणून १८९० चा कायदा पास करण्यांत आला असें वर सांगितलेंच आहे. तेव्हां तिसऱ्या नियमांत सांगितल्याप्रमाणें पोलिसास वाद्यें हवीं तेथें बंद करण्याचा अधिकार देणें म्हणजे कायद्याचा हेतु एके बाजूस ठेवून काळ्या डगल्याच्या शिपुर्ड्यास गव्हर्नरसाहेब बनविण्यासारखेंच आहे. शिवाय असा अधिकार जर पोलिसास द्यावयाचा तर मशिदी व देवळें यांबद्दल नियम तरी कशास पाहिजेत. पोलिस सांगेल तेथें वाद्यें बंद करावींत असा एकच नियम असला म्हणजे पुरे. आमच्या म्युनिसिपालिटीकडून या सूचना कलेक्टरसाहेबांकडे गेल्याच आहेत तेव्हां त्यांचा विचार होऊन मग योग्य नियम योग्य अधिकाऱ्यांकडून बाहेर पडतील अशी आमची आशा आहे. आमच्या येथील सार्वजनिक सभेनेंहि या बाबतींत सरकारास अर्ज केला पाहिजे. कारण हे नियम पुढें सर्व इलाख्यास लागू होण्याचा संभव आहे. चवथ्या नियमासंबंधानें विशेष विचार करण्याची जरूर नाहीं. कारण एकदां नियम ठरल्यावर मग ते अमलांत आणण्याचा कांहीं तरी मार्ग ठेविलाच पाहिजे.

❖ ❖ ❖

*हिंदुस्थानचा कारभार

आमच्या देशावर राज्य करणाऱ्या इंग्लिशलोकांच्या व विशेषतः पार्लमेंटच्या माहितीकरितां प्रतिदहा वर्षांनीं हिंदुस्थानची आलबेल अगर हालहवाल कशी आहे याचा रिपोर्ट प्रसिद्ध करण्याची वहिवाट आहे. त्याप्रमाणें गेल्या दशवार्षिक कारभारासंबंधीं माहितीचें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. या पुस्तकांत निरनिराळ्या विषयांचा समावेश झाला आहे. त्यापैकीं आमच्या वाचकांच्या माहितीसाठीं आम्ही कांहीं विषयांचें विवेचन करणार आहों. आमचे उद्देश अर्थातच अनेक आहेत. त्यांतील एकदोन हेतूंचें दिग्दर्शन करणें इष्ट व प्रशस्त

* [केसरी तां. ११ सप्टेंबर १८९४]

दिसतें, तें करून आम्हीं मूळ विषयाकडे वळणार आहों. पहिला उद्देश असा आहे. हिंदुस्थानांत साम्राज्य करण्याचें पेशव्यांच्या मनांत फार होतें. परंतु कांहीं नैसर्गिक व कांहीं आकस्मिक कारणांचा उदय झाल्यामुळें त्यांचा हा सद्हेतु सिद्धीस गेला नाहीं. सन १८१८ सालीं पेशव्यांची जागा इंग्लिशांनीं पटकाविली आणि पंचवीस अगर तीस वर्षांच्या आंतबाहेर हिंदुस्थानांत अगर हिंदुस्थानच्या सरहद्दीवर जे कांहीं एतद्देशीय लोकांचे स्वातंत्र्यरक्षक आधारस्तंभ होते, ते सर्व पाडून टाकून पारतंत्र्यास अवश्य असे कांहीं मोडके तोडके खांब मात्र शिल्लक ठेविले, आणि १८५६ सालामध्यें हिमालयाच्या शिखरापासून तें तहत कन्याकुमारीनामक भूशिरापर्यंत पारतंत्र्यरूपी लंबकर्णाचा सररहा नांगर फिरविला आणि लोहमार्ग, तारायंत्र इत्यादिकांनीं आमची आर्यभू निगडित करून टाकिली. १८५७ सालीं हें पारतंत्र्याचें जूं बरेंच हेलाकावलें गेलें; तथापि इंग्लिशांच्या सत्तेस विशेषसा धोका न बसतां पुनः आमच्या सर्वांच्या शिरावर पराधीनतेनें आपला अंमल बसविला. ह्या अमलाच्या योगानें अंग, वंग, मद्र, महाराष्ट्र इत्यादि छपन्न देशचे लोक आतां एका राज्यचक्रामध्यें सांपडले आहेत. या सर्वांवर प्रायः एकाच शिस्तीनें अंमल होत आहे; कारभाराची शिस्त एकाच प्रकारची आहे; विद्येचें वळण एकाच धाटणीचें आहे; थोड्याबहुतानें आपण सर्वजण—ज्यांस विचार प्रकट करण्याची, नमूद करण्याची व समजून घेण्याची धारणाशक्ति आली आहे असे लोक एकाच भाषेमध्यें आपले विचार प्रगट करूं लागलों आहों, रीतीभातीहि एकस्वरूप होऊं पहात आहेत; सारांश एक अकबर खेंरीज करून मोंगलांच्या मनांत ज्याचा विचार कधींहि आला नाहीं व पेशव्यांस जें साधलें नाहीं त्या एकराष्ट्रीयत्वाचें बीज आमच्या फलद्रुपी आर्यमनोभूमीवर परक्यांचे श्रमानें रुजविलें जात आहे. तेव्हां सर्वांस एका मार्गानें नेणारी जी राज्यपद्धति तिचें स्वरूप कोणत्या तऱ्हेचें आहे हें वाचकांस समजून द्यावें हा प्रथम हेतु होय. याच्या अंगभूतच दुसरा हेतु आहे. तो असा, आमच्या सर्व एतद्देशीय पत्रांवर असा एक इंग्लिश लोकांचा आरोप आहे कीं, येथील वर्तमानपत्रांचे चालक अथवा संपादक यांस वस्तुस्थितीची कांहीं एक माहती नसते आणि म्हणून ते लोक कांहीं तरी अद्वातद्वा लिहून प्रजेचीं मनें राजाविरुद्ध संक्षुब्ध करीत असतात. यावर अशी एक प्रतिकोटी रचिली जाते कीं, खरी माहिती गोळा करण्याची आस्था सरकारास तरी कोठें असते? आंकडे गोळा करून ते ठरलेल्या कोष्टकांत घालावयाचे आणि हिंदुस्थान देश सालदरसाल जास्ती श्रीमंत होत आहे, लोकांची स्थिति सुधारत आहे, सर्वत्र आबादानी आहे असें नुसत्या तर्कावडंबरानें सिद्ध करून दाखवावयाचें! या कोटीप्रतिकोटीमध्यें तथ्याचा बराच अंश आहे हें खरें; तथापि इंग्लिश कामगारांच्या खलबत्यामध्यें कुटून तयार झालेल्या आंकड्यांवरूनच जर आंपणांस नेटिव्ह लोकांच्या दारिद्र्याचें, दीनाव-

स्थेचें व सरकारच्या हलगरजेचें भरपूर माप सरकारच्या पदरांत घांलतां आलें, तर येथील अरेरावी कामगारांनीं आपलें न्यायाचें मागणें आपल्यास दिलें नाहीं, तरी आपणास सर्व जगास ऐकूं जाईल असा टाहो फोडितां येईल आणि इंग्लंडांतील इंग्लिश लोक जागे होऊन आमच्या दुःखांचें परिमार्जन करतील. तेव्हां दर दशवार्षिकामध्यें काय काय फेरफार झाला आहे तें यथाकाळीं सांगून त्यावरून काय अनुमानें निघतात तीं पहावीं व तीं आमच्या प्रियवाचकांपुढें मांडावीं हा दुसरा हेतु होय. हे दोन आणि यांच्या अंगभूत असणारे इतर उद्देश–त्यांचें निरूपण यथास्थळीं होईलच–मनामध्यें धारण करून आम्हीं या विषयाकडे वळलों आहोंत; आतां येथें हें सांगणें इष्ट वाटतें कीं, कदाचित् हा विषय तीनचार आठवडेपर्यंत चालेल; तेव्हां वाचकांनीं ह्या इष्ट व महत्त्वाच्या विषय-निरूपणामध्यें आमच्याबरोबर चालावयास सिद्ध व्हावें. इतकें सांगून आतां येथील राज्याचें स्वरूप कसें आहे तें सांगण्याकडे वळतों.

हिंदुस्थानांतील मुख्य अधिकारी यांस गव्हर्नर जनरल अगर प्रतिनिधी किंवा पेशव्यांच्या भाषेनें सांगावयाचें झाल्यास सरसुभेदार असें म्हणतात. ह्या सरसुभेदास नेहमीं इंग्लंडच्या पार्लमेंट सभेंत असणाऱ्या हिंदुस्थानच्या प्रधानाच्या अनुसंधानानें वागावें लागतें. प्रतिनिधीस अमुक गोष्ट करावीशी वाटली आणि स्टेट सेक्रेटरीस ती आवडली नाहीं, तर येथील प्रतिनिधीस हार खावी लागते. पण हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत ह्या प्रतिनिधीची सत्ता अप्रतिहत आहे. कांहीं प्रांतांमध्यें म्हणजे बव्हाड, कुर्ग, बंगलोर इत्यादि प्रांतांमध्यें तर प्रतिनिधी करील ती पूर्वदिशा असा प्रकार आहे. ब्रह्मदेश, आसाम, आणि नागपूर येथें प्रतिनिधीचा हस्तक काम करितो, त्यास चीफ कमिशनर म्हणतात. बंगाल, अंतर्वेदी, पंजाब येथें त्याचा मुताालिक काम करितो, त्यास लेफ्टेनेंट–गव्हर्नर म्हणतात. पूर्वोक्त हस्तक व मुताालिक यांच्या जबाबदारीमध्यें थोडा फरक आहे, तो यथास्थलीं सांगण्यांत येईल. मुंबई व मद्रासचे सुभेदारांच्या नेमणुका इंग्लंडमध्यें होतात. तथापि हे सुभेदार प्रतिनिधीच्या ताब्यांत असले पाहिजेत असें पार्लमेंटच्या कायद्यानें ठरविलें आहे. या प्रत्येकास एक एक मंत्रिमंडळ अगर कौन्सिल असून त्यांच्या हाताखालीं कांहीं सनदी नोकर, एक स्थानिक फौज व सेनापति वगैरे नेमणुका आहेत. ह्या सुभेदारांस कांहीं बाबतींमध्यें खुद्द हिंदुस्थानच्या प्रधानाशीं पत्रव्यवहार करितां येतो. शिवाय आपआपल्या प्रांतापुरते कायदे करण्याचा अगर आज्ञापत्रें काढण्याचा अधिकारहि यांस आहे. मात्र प्रत्येक कायद्यास प्रतिनिधीची मंजुरी मिळाली पाहिजे. खुद्द प्रतिनिधीस एक मंत्रिमंडळ असतें व त्याशिवाय कायदे करणारी एक मंडळी असते. व्हाइसराय हा या दोन्ही मंडळांचा अध्यक्ष आहे, आणि मतें देण्यामध्यें दोन पक्ष होऊन समसमान मतें दोन्ही बाजूस पडलीं तर अध्यक्षास आणखी एक मत

देण्याचा अधिकार आहे. हिंदुस्थानांत जो प्रत्येक कायदा पास व्हावयाचा त्यास व्हाइसरायाची मंजुरी अवश्य पाहिजे असते. शिवाय मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं प्रतिनिधी यास अवश्य वाटल्यास आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर हुकूम सोडण्याचा अधिकार असतो व या हुकूमास सहा महिनेपर्यंत कायद्याचें स्वरूप येतें.

ह्या प्रतिनिधीस मदत करणारीं दोन मंडळें आहेत हें मागें सांगितलें आहे. एक कारभारी मंडळ आणि दुसरें कायदेकानू करणारें मंडळ. पहिल्या मंडळांत साधारणतः ५ सभासद असतात. शिवाय सेनापति व मुंबई, मद्रास येथें हिंदुस्थानचें कारभारी मंडळ बसल्यास तेथील गव्हर्नर अगर सुभेदार असतात. कारभारी मंडळांतील मंत्र्याची नेमणूक इंग्लंडच्या राजाज्ञेनें होते. यांनीं किती दिवस हिंदुस्थानांत काम करावें ह्याचा काळ ठरलेला नाहीं, तरी गव्हर्नर गव्हर्नर-जनरल यांच्याप्रमाणें हे मंत्री पांच वर्षांपेक्षां जास्त दिवस येथें रहात नाहींत. त्या पांचांपैकीं तीन असामींची नेमणूक हिंदुस्थानांतील सनदी नोकरांमधून होते. एक लष्करीखात्यांतील व पांचवा नाणावलेला वकील असतो. या पांचांकडे कामें वाटून देतात. म्हणजे लष्करी काम एकाकडे, नगदी किंवा जमाखर्चाचें काम दुसऱ्याकडे, इमारतखातें तिसऱ्याकडे, कायदेकानू करण्याचें खातें चवथ्याकडे आणि शेतकी, जमाबंदी व देशांतील इतर खातीं पांचव्याकडे असा श्रमविभाग आहे. सरसुभेदार बहुधा आपल्या हातांत परराज्यसंबंधाचें खातें ठेवितात. हे पांचहि मंत्री इंग्लंडातून नेमले जातात.

कायदे करणाऱ्या मंडळांत वरील सहा सभासद असून शिवाय हल्लीं कांहीं लोकानियुक्त व कांहीं सरकारांनीं निवडलेले असतात. सरासरीनें पाहतां सर्व प्रकारचे लोकांचा समावेश व्हावा अशी योजना करून सभासदांस जमाखर्चाचे संबंधानें प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आहे. पूर्वी गव्हर्नर-जनरल व त्यांचें मंत्रिमंडळ काय करतील ती पूर्वदिशा असा प्रकार होता. तो मनु आतां बदलून जाऊन बऱ्याच खात्यासंबंधानें सरकार असें कां करितें किंवा असें कां करीत नाहीं वगैरे प्रश्न विचारण्याचा परवाना मिळाला आहे. ही सुधारणा गेल्या दशतकांच झाली. अरेरावीपणानें वागण्यास शिकलेल्या कामगारांस ही सुधारणा झालेली पाहून रात्रंदिवस चैन पडत नाहीं; परंतु करतात काय ? आमच्या काँग्रेसांनीं जी खटपट केली, हिंदुस्थानची कळकळ बाळगणाऱ्या उदार आंग्लोइंडियन कामगारांनीं आम्हांस वेळोवेळीं जें साहाय्य दिलें, दादाभाईसारख्या स्वार्थत्यागतत्पर महात्म्यांनीं जे अश्रांत श्रम केले, त्या सर्वांच्या उद्योगाचें हें वरील फल होय. पूर्वीचा मनु आतां फिरला हें त्यांनीं समजून घ्यावें. लोकनियुक्त सभासद राजवर्णी लोकांच्या खुर्चीला खुर्ची लावून बसत आहेत, प्रश्न विचारीत आहेत इत्यादि गोष्टी अल्पशा जरी आज वाटल्या, तथापि ह्या गोष्टींमध्येंच आमच्या

खऱ्या हिताचें बीज असून जर कधीं काळीं आम्हांस आमचा कारभार सुपूर्तपणानें करावयास यावयायाचा असेल, तर तो ह्याच मार्गानें व ह्याच बीजांच्या आधारावर होणार आहे, शस्त्रानें हक्क मिळविणें हा पूर्वीचा मार्ग होता. आतां सामाच्या वाटेनें, बुद्धिप्रभावानें व मनोदारतेनें आपले गेलेले हक्क पुनः परत मिळवावयाचे आहेत, तेव्हां मिळालें आहे त्याचा सदुपयोग करून आणखी नवीन हक्क मिळविण्याचें काम जोरानें चालविलें तरच आमची शहामत खरी.

असो; या मंत्रीमंडळाच्या हाताखालीं मोठमोठाले फड अगर चिटणीस कचेऱ्या आहेत. त्यांचा विचार व स्थानिक सरकारें, जिल्ह्याची व्यवस्था, तालुक्याची व्यवस्था, इत्यादिकांचा विचार पुढें करूं. आज इंग्लिश राशतींत व मराठ्यांच्या राजपद्धतींत कांहीं साम्य आहे कीं काय हें पाहून आजचा लेख आटपतों.

व्हाइसराय हे इंग्लंडस्थ राजाचे प्रतिनिधी व पेशवे हे सातारच्या राजाचे प्रतिनिधी हें साम्य वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. गायकवाड, भोसले, सचीव इत्यादि खुद्द महाराजांच्या ताब्यांतले असत, त्याचप्रमाणें मुंबई व मद्रास येथील गव्हर्नरांची स्थिति आहे. पुढें पेशव्यांनीं सर्व कारभार स्वतः आटपून ह्या बरोबरीच्या जहागिरदारांस आपल्या कक्षांत आणलें तद्वत्च मद्रास व मुंबई हे आतां इंडियासरकारच्या ताब्यांत गेले आहेत. मराठी राज्यांत लष्करी व नगदी अगर जमाबंदी खात्यांवर खुप बहर होता, तसाच हल्लींच्या राज्यांत दृग्गोचर होत आहे. आतां मराठी राज्यांत न्यायमनसुब्याचे निकाल वहिवाटीवर होत असत व हल्लीं लिहिलेल्या कायद्याच्या अनुरोधानें होतात हा मोठा विशेष आहे. शिवाय त्यावेळीं कामगार करतील तेंच प्रमाण व हल्लीं कायदा सांगेल तें प्रमाण हा जरी मोठासा भेद दिसतो, तरी स्वराज्य असल्यामुळें व आमची ग्रामव्यवस्था चांगली असल्यामुळें रयतेची दाद जितक्या लौकर व सोप्या रीतीनें लागत असे, तितकी आतांच्या सुधारलेल्या व कायदेप्रिय राज्यांतहि लागत नाहीं. तथापि जसजसे जास्त हक्क लोकांस मिळत जातील, तसतसा वरील दोष नाहींसा होऊन एकंदर राज्यव्यवस्था लोकांस सुखकर होत जाईल असा सुमार दिसतो. मात्र राज्यकर्ते लोक शिकलेल्या लोकांचे हाल तिरस्कार व छळणूक करण्याचा जो क्रम घालूं पाहत आहेत तो त्यांनीं सोडून दिला पाहिजे. राज्यकर्ते लोकांस आमच्या लोकांची व आमच्या देशाची काळजी येथील समंजस विद्वानांपेक्षां जास्त आहे असें ह्मणणें निवळ धाष्टर्य होय. तेव्हां हे असले दुष्परिणामी विचार अगर आग्रह यांस रजा देऊन त्यांनीं आपलीं मनें शुद्ध केलीं व प्रेमभावानें येथील लोकांची सल्लामसलत विचारूं लागले व हल्लीं सवतीच्या पोरांसारखी जी आमची आबाळ चालविली आहे तिचा त्याग करून सख्ख्या भावंडांप्रमाणें जर आह्मांस वागणूक मिळूं लागली, तर राज्यकर्ते व प्रजा यांच्यामधील वैरभावाचीं बीजें निघून जाऊन त्यांत उभयतांचेंहि कल्याण होईल.

हल्लींची राज्यपद्धति पौरस्त्यपद्धतीपेक्षां जास्त सोईकर व जास्त सुखकर आहे हें आम्हांस कबूल आहे आणि म्हणूनच तिचें दिग्दर्शन करण्याचें योजलें आहे; तथापि गोड लागला म्हणून ऊंस जसा मुळासकट खातां येत नाहीं तद्वतच राज्यपद्धति चांगली म्हणून तिचा अंमलहि चांगलाच झाला पाहिजे असेंहि म्हणतां येणार नाहीं. चवथें साम्य म्हणजे पूर्वीचें फडाचें खातें आणि हल्लींचें सेक्रेटरीयट अगर चिटणीशी खातें हें होय. सर्व कामांची तपासणी या खात्याकडूनच व्हावयाची सारांश दोन्हींमध्यें फरक म्हणजे पूर्वी वहिवाटीचा जबर पगडा होता आणि हल्लीं तात्विक विचारांचा पगडा विशेष आहे. तथापि आतांच सांगितल्याप्रमाणें दोहोंचें क्षेत्रफळ एकच येत आहे.

❖ ❖ ❖

* गणपतीचा उत्सव

यंदांचा भाद्रपद महिना व विशेषतः गेली अनंतचतुर्दशी वगैरे दिवस मराठ्यांच्या इतिहासांत आणि मुख्यत्वेंकरून पेशव्यांची राजधानी जें पुणें शहर त्याच्या इतिहासांत सुवर्णाच्या अक्षरांनीं नोंदण्यासारखे गाजले. नागपंचमीचा सण झाल्यादिवसापासून तों थेट गणपतिविसर्जनाच्या म्हणजे अनंतचतुर्दशीच्या दिवसापर्यंत सर्व पुणें शहर गणपतीच्या भजनानें गजबजून गेलें होतें. गणपति देवता आजपर्यंत पांढरपेशे वगैरे लोकांमध्यें असून त्या देवतेसंबंधानें घरोघरीं उत्सव, मंत्रपुष्प, जाग्रणें, कीर्तनें वगैरे थाटानें होत असत हें खरें आहे; तथापि यंदां आम्हां मराठ्यांचा आधारस्तंभ जो वैश्यवर्ग अगर प्रत्यहीं निढळाच्या घामानें पैसे मिळवून आम्हां सर्वांचीं तोंडें उजळ करणारा साळी, माळी, रंगारी, सुतार, कुंभार, सोनार, वाणी, उदमी इत्यादि औद्योगिक वर्ग यांतील लोकांना यंदां विलक्षण रीतीचें सार्वजनिक स्फुरण येऊन त्यांनीं हा दिवस साजरा करण्यासाठीं जी कांहीं मेहनत घेतली ती केवळ अपूर्व आहे. दिवसभर कामधंदा करून घरीं आल्यानंतर चकाट्या पिटीत बसणारे, दारू पिऊन झिंगल्यामुळें गटारांत लोळणारे व ह्या दारूच्या पायीं बायकापोरांचे हाल करणारे अथवा तमाशामध्यें अचकट विचकट गाणीं ऐकत बसणारे या सर्वांस निदान कांहीं काळपर्यंत तरी उपरति होऊन त्यांचा रिकामा वेळ बुद्धिदात्या श्रीगजवदनाच्या भजनपूजनांत गेला ही गोष्ट कांहीं लहान सामान्य नाहीं. असो; गेल्या पंधरा दिवसपर्यंत पुण्याचे सर्व रस्ते रात्रौ मनुष्यांनीं फुलून गेलेले असत. प्रत्येक पेठेला किंबहुना प्रत्येक आळीला एक एक सार्वजनिक गणपती बसविलेला असून शक्त्यनुसार

---

* [केसरी ता० १८ सप्टेंबर १८९४]